# ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास''

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
तात्त्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी सादर केलेला
शोधप्रबंध


✻ अभ्यासक ✻
आगळे वैशाली रघुनाथ
(**PRN-02113007778**)

✻ मार्गदर्शक ✻
प्राचार्य डॉ. के. डी. पुराणे
श्री शिव छत्रपती महाविद्यालय,
जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.



ऑक्टोबर २०२१

# **प्रतिज्ञापत्र**

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की **''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास''** हा प्रबंध मी **डॉ. के. डी. पुराणे** यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन साधनांचा योग्य श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखेअंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी प्रस्तुत प्रबंध विद्यापीठास सादर करण्यात येत आहे. हा शोध-प्रबंध इतर कोणत्याही पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

**वैशाली रघुनाथ आगळे**

**अभ्यासक**

**स्थळ : पुणे**

**दिनांक : / /**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखेअतंर्गत राज्यशास्त्र विषयांतील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी **आगळे वैशाली रघुनाथ** यांनी **''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास''** या विषयातील शोधप्रबंधाचे काम माझ्या मागदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधनिबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती कोणत्याही पदवीकरीता त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु. जी. सी.) २००९ च्या नविन नियमाला अनुसरून सदर शोध प्रबंधाचे काम केलेले आहे.

**संशोधन मार्गदर्शक**

**प्राचार्य डॉ. के. डी. पुराणे**

श्री शिव छत्रपती महाविद्यालय,
जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.

स्थळ : पुणे

**दिनांक :  /  /**

## Declaration By The Candidate

I Hereby Declare That The Work Incorporated In The Entitled ''**अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास**'' That Is Being Submitted By For The Degree Doctor Of Philosophy In Political Science To The Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune Is Original And Has Not Being Previously Submitted For Any Other Degree Of Any University In India Or Abroad.

I Further Declare Material Obtained From Other Sources Has Been Duly Acknowledged In The Thesis.

**Miss. Agale Vaishali Raghunath**
Research Student
Department Of Political Science
Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

Place :

Date :     /     /

## Certificate of the Guide

Certified That The Work Incorporated In The Thesis Titled **''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास''** That Is Being Submitted By Miss. Agale Vaishali Raghunath Has Been Carried Out By The Candidate Under My Supervision And Guidance. The Material In The Thesis Is His Original Work And Material That Has Been Obtained From Other Sources Has Been Duly Acknowledged In This Thesis.

**Principal Dr. K. D. Purane**

Research Guide

Shri Shiv Chhatrapati Mahavidyalaya,
Junnar, Dist. Pune

Place :

Date : / /

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट विद्यापीठ पुणे यांच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखेअतंर्गत राज्यशास्त्र विषयांमध्ये ''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास'' या विषयावर पीएच. डी. पदवी करीता शोध प्रबंध सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. म्हणून मी प्रथमत: विद्यापीठाचे आभार मानते. प्रस्तुत संशोधन प्रबंध लिहिण्यासाठी मार्गदर्शन केले सहकार्य केले प्रेरणा दिली त्या सर्वांची कृतज्ञता व्यक्त करणे मी महत्त्वाचे मानते. माझे मार्गदर्शक प्राचार्य के. डी. पुराणे यांनी विषय सूचविण्यापासून ते संपूर्ण काम करून घेण्यापर्यंत या संशोधन प्रबंधाच्या कार्यास बहुमोल मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे हा प्रबंध पुर्ण होऊ शकला. संशोधन कार्याची दिशा अचूकता व नेमकेपणा तसेच अभ्यासातील सातत्य याबद्दल नेहमीच सरांचा कटाक्ष असायचा संशोधन प्रबंधासाठी आवश्यक संदर्भ साहित्य प्रबंधाची मांडणी संपादन संशोधनाबद्दलची नेमकी दिशा महत्त्वपूर्ण सूचना या कामी वेळोवेळी सरांचे मार्गदर्शन मला लाभले. माझ्या संशोधनाचे सर्व श्रेय त्यांनाच आहे. त्याबद्दल त्यांची मी अत्यंत आभारी आहे.

संशोधन प्रबंधाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. माणिक सोनावणे यांनी मदत केली. मी त्यांची मनपूर्वक आभारी आहे. तसेच प्रबंध सादरीकरणाच्या पुर्व समितीच्या बैठकीत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र शाखेचे आधिष्ठाता डॉ. बी. डी. कुलकर्णी यांनी सुचना केल्या त्या प्रबंध लिखाणात मौलिक ठरल्या त्याबद्दल त्यांचे मी अत्यंत आभारी आहे.

या संशोधन कार्यासाठी अनेकांची मदत मिळाली. अनेकांनी मार्गदर्शन केले त्यांचे सहकार्य व प्रोत्साहनामुळे हे कार्य पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली. या संशोधनासाठी डॉ. अशोक शिंदे यांचे संशोधन कार्यात मला मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. या शिवाय प्रत्यक्षात आणि अप्रत्यक्षात मदत करणारे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. पांडुरंग म्हस्के, अहमदनगर महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. विलास नाबदे तसेच प्रा. अनिल पवार, श्री. लक्ष्मण गारूळे, श्री. नवनाथ बढे, श्री. दिलीप फलके, बाळासाहेब आगळे यांचे मी अत्यंत आभारी आहे. तसेच महाराष्ट्र विधानसभेचे माजी सदस्य शंकरराव कोल्हे, आप्पासाहेब राजळे, पदवीधर मतदार संघाचे सदस्य सुधीर तांबे, मुळा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक यशवंतराव गडाख यांचे विशेष आभार मानते.

पीएच. डी. च्या कामात कुटुंबातील माझे वडील माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे, आई कौशल्या आगळे, माझे पती श्री. विलास भणगे, सासूबाई चंद्रभागा भणगे व मुलगा अभिजित भणगे यांनी वेळोवेळी मला साथ आणि मदत केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी माहिती अनेक संस्था व ग्रंथालयातून मिळवली आहे. त्यात विशेषतः सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय या ग्रंथालयांचा मुक्तपणे वापर केलेला आहे. या ग्रंथालयांचे कर्मचारी वर्ग आणि ग्रंथपाल यांची मी आभारी आहे. प्रबंध संगणकावर व्यवस्थित टंकलिखीत करून प्रस्तुत प्रबंधाची उत्तम प्रति पर्यंतचे टंकलेखन श्री. सचिन शिंदे यांनी केले त्याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे. तसेच सर्व मजकूर विद्यापीठाच्या नियमानुसार लेआऊट आणि श्री देव लिपीत टाईप करून दिल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेतील श्री. संदीप खाडे यांचेही मनःपूर्वक आभार.

**आगळे वैशाली रघुनाथ**

| अ. क्र. | तक्ता सूची |
|---|---|
| १.१ | सहकारी संस्थांची प्रगती |
| १.२ | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ |
| १.३ | अहमदनगर जिल्ह्यातील सन २००७–२००८ मधील सहकारी संस्थांची स्थिती |
| १.४ | अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांची माहिती |
| १.५ | अहमदनगर जिल्ह्यातील दुग्धविकास सहकारी संस्था |
| १.६ | अहमनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे चेअरमन व व्हाईस चेअरमन |
| १.७ | अहमनगर जिल्ह्यातील सन १९६२ पासुनचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष |
| १.८ | अहमदनगर जिल्ह्यातील अकोले विधानसभा सदस्य यादी |
| १.९ | अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर विधानसभा सदस्य यादी |
| १.१० | अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव विधानसभा सदस्य यादी |
| १.११ | अहमनगर जिल्ह्यातील राहता विधानसभा सदस्य यादी |
| १.१२ | अहमदनगर जिल्ह्यातील श्रीमरामपूर विधानसभा सदस्य यादी |
| १.१३ | अहमनगर जिल्ह्यातील नेवासा विधानसभा सदस्य यादी |
| १.१४ | अहमनगर जिल्ह्यातील शेवगाव विधानसभा सदस्य यादी |
| १.१५ | अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी विधानसभा सदस्य यादी |
| १.१६ | अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर ग्रामीण विधानसभा सदस्य यादी |
| १.१७ | अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर शहर विधानसभा सदस्य यादी |
| १.१८ | अहमदनगर जिल्ह्यातील राहूरी विधानसभा सदस्य यादी |
| १.१९ | अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर विधानसभा सदस्य यादी |
| १.२० | अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा विधानसभा सदस्य यादी |
| १.२१ | अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत विधानसभा सदस्य यादी |
| १.२२ | अहमदनगर लोकसभा मतदारसंघ नेतृत्व |

| | |
|---|---|
| ३.१ | महाराष्ट्र राज्याचा नकाशा |
| ३.२ | अहमदनगर जिल्ह्याचा नकाशा |
| ३.३ | अहमदनगर जिल्ह्यातील निवडलेल्या तालुक्यांचा नकाशा |
| ३.४ | अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी घराणी |
| ३.५ | अहमदनगर जिल्ह्यातील निवडलेली घराणी |
| ३.६ | मुलाखतीसाठी निवडलेल्या सहकारी घराण्यातील सदस्य यादी |
| ३.७ | निवडक सहकारी उद्योगसंस्था |

| | |
|---|---|
| ४.१ | घराणे शाहीनुसार वर्गीकरण |
| ४.२ | अहमदनगर जिल्ह्यातील निवडक पदाधिकाऱ्यांची शिक्षणानुसार वर्गवारी |
| ४.३ | अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांची सहकार क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांचे संस्थेनुसार वर्गीकरण |
| ४.४ | अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांची पदाधिकाऱ्यांच्या पदानुसार वर्गवारी |
| ४.५ | अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांचे सामाजिक / आर्थिक बदलाविषयी मतानुसार वर्गीकरण |
| ४.६ | अहमदनगर जिल्हा निवडक सभासद घराण्यांची प्रतिनिधित्वानुसार वर्गवारी |
| ४.७ | अहमदनगर जिल्हा निवडक सभासद घराण्यांची सहकारी संस्थांशी संबंधानुसार वर्गवारी |
| ४.८ | अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांचे सहकारी संस्था सभासदत्व लाभानुसार वर्गीकरण |
| ४.९ | अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांच्या काळातील झालेल्या बदलानुसार वर्गीकरण |
| ४.१० | अहमदनगर जिल्ह्यातील निवडक राजकीय घराण्यांचे तालुका विकासातील योगदान याविषयी लाभधारकांचे मत |

| | |
|---|---|
| ४.११ | अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय घराण्यांनी सामाजिक व आर्थिक क्षेत्रात केलेल्या बदलाचे परिणाम |
| ४.१२ | अहमदनगर जिल्ह्यातील निवडक राजकीय घराण्यांमुळे तालुक्याचा सर्वांगीण कायापालट झाला किंवा नाही |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संशोधन कार्याची ओळख | १ ते १२० |
| २. | उपलब्ध ऐतिहासिक साहित्याचा आढावा | १२१ ते १५७ |
| ३. | संशोधनाची कार्यपद्धती<br>३.१ संशोधन पद्धती<br>३.२ अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास | <br>१५८ ते १९२<br>१९३ ते ३१० |
| ४. | माहिती संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन | ३११ते ३३७ |
| ५. | माहितीचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी | ३३८ ते ३७० |
| ६. | संदर्भ ग्रंथ | ३७१ ते ३७९ |
| ७. | परिशिष्ट | ३८० ते ३८७ |

## प्रकरण १

# संशोधन कार्याची ओळख

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | प्रस्तावना | २ |
| १.२ | सहकाराचा उगम | ४ |
| १.३ | सहकाराची व्याख्या | ५ |
| १.४ | सहकाराची गरज आणि आवश्यकता | ८ |
| १.५ | सहकाराची वैशिष्ट्ये | १० |
| १.६ | सहकाराची तत्वे | ११ |
| १.७ | विविध देशातील सहकार चळवळी | १४ |
| १.८ | भारतातील सहकारी चळवळीचा आढावा | २३ |
| १.९ | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ | २७ |
| १.१० | महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती | २८ |
| १.११ | महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे विविध क्षेत्रांवर झालेले परिणाम | ३१ |
| १.१२ | सहकारी चळवळी समोरील आव्हाने | ३२ |
| १.१३ | अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळ | ३४ |
| १.१४ | अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची स्थिती | ३५ |
| १.१५ | सहकाराचे राजकीय नेतृत्वाचे भवितव्य | १०४ |
| १.१६ | सहकार चळवळीतील काही प्रमुख दोष | ११० |
| | | |

# प्रकरण १

# संशोधन कार्याची ओळख

## १.१. प्रस्तावना :–

सहकाराची संकल्पना प्राचीन आहे. मानवी विकासाच्या प्राथमिक अवस्थेत मनुष्य पुर्णतः स्वावलंबी होता. परंतु हळूहळू त्यांच्या गरजा वाढू लागल्या आणि तो परावलंबी होवू लागला. त्याला आपल्या शारीरिक, मानसिक आणि भौतिक मर्यादांची जाणीव झाली. आपल्या गरजा भागविण्यासाठी त्याला इतरांच्या सहकार्याची आणि सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता भासू लागली. यातूनच सहकाराचा पाया रचला गेला. मानवी समूह अस्तित्वात आले. मानवी उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सहकाराची गरज निर्माण झाली. सहकार म्हणजे उद्दिष्ट्यांच्या पुर्ततेसाठी एकत्रित काम करणे होय. ही एक मानवी अंतःप्रेरणा असून मानवी विकासाला ती कारणीभूत ठरली म्हणजेच मानवाच्या विकासांच्या अवस्थांमध्ये सहकार हा आधार होता. म्हणूनच डार्विन म्हणतात त्याप्रमाणे मानवाची उत्क्रांती ही आक्रमक स्पर्धेतून झाली नसून सहकारात्मक स्पर्धेतून झालेली आहे. मानवी सहकारातून संस्कृतीची भरभराट झाली. सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन करण्याचे सामर्थ्य सहकारामध्ये आहे.[१]

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदारांना मजुरांची पिळवणूक करता येते. मात्र भारताने समाजवादी समाज रचना निर्मितीचे धोरण स्वीकारल्यामुळे सहकारी चळवळ ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेस सक्षम पर्याय निर्माण झाली आहे. १९५६ ते १९९१ या काळात भारतात संमिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली होती. त्यातूनच समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे उद्दिष्ट होते. त्यासाठी सहकारी चळवळीने महत्वाचे योगदान दिले आहे.[२]

१९९१ नंतर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खुली अर्थव्यवस्था भारताने स्वीकारली त्यात सरकारी उद्योगांचे महत्व कमी झाले. खाजगी क्षेत्राचा हिस्सा वाढला त्याही परिस्थितीत सहकारी चळवळीचे महत्व कमी होण्याऐवजी वाढत गेले. ग्राहक उपयोगी संस्था, सहकारी ग्राहक भांडारे, सहकारी औद्योगिक संस्था, सहकारी बँका, शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था यामुळे भांडवलशाहीतील दोष नियंत्रित ठेवण्यास मदत झाली आहे. भारतात सहकारी क्षेत्राला उज्वल भवितव्य आहे. उत्पादकता, सामाजिक न्याय, उपक्रमशीलता यांना बांधिल

असणारे हे सहकार क्षेत्र आहे आणि ते गरीब आणि अशिक्षितांचे एकमेव आशास्थान आहे. राज्यातील विकासकामात सहकाराला नवीन क्षेत्रामध्ये आजही संधी उपलब्ध आहे.[३]

भारतात सहकारी चळवळीने आर्थिक, सामाजिक, नैतिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात चांगली प्रगती केल्याचे दिसून येते. समाजाची सावकारांकडून होणारी पिळवणुक कमी करण्यासाठी सहकारी चळवळीने प्रयत्न केले. तसेच सहकारी संस्था आणि औद्योगिक सहकारी संस्था यांनी ग्रामीण जनतेला दिलासा दिला आहे. थोडक्यात कर्जपुरवठ्यापासून ते कापड, साखर इ. वस्तू तयार करण्यापर्यंत सहकाराने प्रगती साधली आहे. अशा प्रकारे ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रक्रियेमध्ये सहकारी संस्थांनी वाटा उचलला आहे, यात शंका नाही परंतु हे जरी खरे असले तरी भारतासारख्या  देशातील गरजेच्या मानाने सहकारची खुपच प्रगती अद्याप होणे आवश्यक आहे व कार्य यशस्वीपणे घडवून आणण्यासाठी लोकजागृती केली पाहिजे. लोकांना त्यांच्या श्रमाची, सहकार्याची व संघकार्याची जाणीव करून दिल्याशिवाय भारताच्या भारताच्या ग्रामीण भागाच्या विकासास आवश्यक त्या प्रमाणात चालना मिळणार नाही. सहकारी चळवळीचा महामंत्र केवळ ठराविक क्षेत्रापुरताच मर्यादित न राहता समाज शिक्षण, आरोग्य, कृषीविस्तार आणि प्रशिक्षण या क्षेत्रातील व्यापक स्वरूपाची ग्रामीण कल्याणकारी कामे कार्यान्वित करण्याचे प्रभावशाली साधन बनले पाहिजे. यासाठी स्थानिक कर्तृत्व आणि उपक्रमशीलता यांना चालना देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी ग्रामीण जनतेला विकास कार्यक्रमात सामावून घेऊन पुढे वाटचाल करावयाची आहे. यासाठी सर्वाच्याच सहकार्याची, सहभागाची व सदिच्छाची गरज आहे आणि ते सर्व सहकारातूनच करणे शक्य आहे.[४]

शहरी व ग्रामीण भागात सहकाराचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे असे दिसून येते. शहरी भागात सहकारी नागरी बँका, सहकारी मजूर संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, पतसंस्था, ग्राहक भांडार यांचे महत्व दिसून येते. तसेच ग्रामीण भागातही शेतकऱ्यांच्या सहकारी सोसायट्या, सहकारी पतपेढ्या यांचे महत्व दिसून येते. सहकारी क्षेत्राने नवीन राजकीय नेतृत्व दिले आहे, किंबहुना राजकीय क्षेत्रातील नेतृत्व करण्यास आवश्यक ती पाठशाळा सहकारी संस्थात दिली आहे. ग्रामीण भागात शेतमाल विक्रीमध्ये शेतकऱ्यांस व्यापारी, सावकार आणि दलाल यांनी लुबाडले. त्यापासून संरक्षण देण्यासाठी सहकारी कृषी विपणन संस्था निर्माण झाल्या आहेत. सहकारी संस्थामुळे ग्रामीण भागाचा विकास झाला आहे. साखर, कापूस, तेल, ज्युट यासारख्या

कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणाऱ्या संस्थांच्या विकासामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्माण झाला आहे.[५]

## १.२ सहकाराचा उगम :–

रॉबर्ट ओएन (१७७१–१८५८) हा आधुनिक सहकारी चळवळीचा जनक होय. वयाच्या एकविसाव्या वर्षी स्कॅटलंडमधील गिरणीत तो भागीदार बनला. न्यू लानार्क येथे त्याचा कारखाना होता. तेथे कामगारांनी स्थिती सुधारण्यासाठी सहकारी पद्धतीचा अयशस्वी प्रयत्न केला. पुढे अमेरिकेतील इंडियाना येथे त्याने 'न्यू हार्मनी कॉलनी' ही सहकारी वसाहत स्थापन केली. ग्रेट ब्रिटनमधील रॉचडेल या सुती कापड गिरण्यांच्या छोट्या गावातील २८ कामगारांनी २१ डिसेंबर १८४४ रोजी इक्विटेबल पायोनिरर्स को–ऑपरेटिव्ह सोसायटी नावाच्या सहकारी भांडाराची स्थापना केली. त्यांनी स्वीकारलेली तत्त्वे सहकार चळवळीला मार्गदर्शक ठरली. सभासदत्व सर्वांना खुले असावे. प्रत्येकाला एकच मत असावे. भांडवलावर ठराविक व्याज दिले जावे. सर्व खर्च वजा जाता शिल्लक राहिल्यास ते सभासदत्व सर्वांना खुले असावे. प्रत्येकाला एकच मत असावे. भांडवलावर ठराविक व्याज दिले जावे. सर्व खर्च वजा जाता शिल्लक राहिल्यास ती सभासदांच्या खरेदीच्या प्रमाणात वाटून द्यावी. सर्व व्यवहार रोखीने व्हावा माल शुद्ध व निर्भेळ दिला जावा. वजने–मापे यांत गडबड होऊ नये. राजकारण व धर्म यांबाबत सोसायटीची तटस्थ भूमिका असावी. ही तत्वे पुढे बहुतेकांनी स्वीकारली. सहकाराच्या कल्पनेला व्यावहारिक व व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले. व्यवसाय संघटनेचा एक नवीन प्रकार म्हणून सहकारी संस्थांचा उपयोग पहिल्यांदा इंग्लंडमध्ये झाला.[६]

सहकारी चळवळीतील उपक्रम सहकारी पद्धतीने स्वेच्छेने व लोकशाही पद्धतीने चालविले जातात. तरीही शासनव्यवस्था किंवा सरकार यांचा सहकारी चळवळीचा काहीच संबंध असू नये असे नाही. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टीनेच सहकारी चळवळीत काम करावे लागत असल्याने तिचा सरकारशी अनेक प्रकारे संबंध येतो. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते आजपर्यंत जगातील विविध देशांनी असंख्य सहकारी कायदे संमत केलेले आहेत. इंग्लंडमध्ये संमत झालेला ब्रिटीश इंडस्ट्रिअल अँड प्राव्हिडन्ट सोसायटि ॲक्ट हा पहिला कायदा होय. भारतात १९०४ मध्ये पहिला सहकारी पतपुरवठा संस्था कायदा संमत केला गेला.

या कायद्यामुळे भारतात सहकारी चळवळीची वाटचाल सुरू झाली. गरीब शेतकरी कारागीर अल्प उत्पन्नधारक आदी घटकांमध्ये बचतीची सवय लावणे, त्यांच्यात सहकाराची भावना निर्माण करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे इत्यादींसाठी हा कायदा करण्यात आला. कायदे केल्यामुळे सहकारी संस्थांना कायदेशीर अस्तित्व प्राप्त होऊन व्यवहारात शिस्त व निश्चिती आली. सहकारी तत्वानुसार कामकाज चालविण्यासाठी मार्गदर्शन होऊन नियंत्रण प्रस्थापित करणे शक्य झाले.[७]

जगभरात सहकारी संस्थांना वेगवेगळ्या प्रकारे सरकारांकडून कायदेशीर संरक्षण व सहाय्य दिले जाते. भारतासारख्या विकसनशील देशात सरकारने सुरूवातीपासून सहकारी चळवळीला पोषक असे धोरण स्वीकारलेले दिसते. सहकारी चळवळीच्या विकासात सरकारांनी हस्तक्षेप करावा किंवा नाही याबाबत तज्ज्ञांमध्ये आजही मतभेद आहेत. विसाव्या शतकात बहुतेक देशांतील सरकारांनी कल्याणकारी राज्याची भूमिका स्वीकारली. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी सहकारी चळवळीला सहभागी करून घेण्याचा विचार दृढ झाला.[८]

## १.३ सहकाराची व्याख्या :–

सहकार (Co-operation) हा शब्द मुळ लॅटिन शब्द आहे. को. ऑपरी (Co-operi) या शब्दापासून आला असल्याचा उल्लेख आढळतो. येथे (Co) याचा अर्थ एकत्र असा होतो तर (Operi) ऑपरी याचा अर्थ काम करणे होतो. तेव्हा दोन्ही शब्दांचा एकत्रित अर्थ सर्वांनी किंवा एकत्रित किंवा परस्पर मदतीने कार्य करणे असा होतो. मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजात तो एकोप्याने राहतो. एकमेकांच्या सुख दु:खात सहभागी होऊन जीवन व्यतीत करतो. म्हणून सहकार मनुष्य जातीला नवीन नाही याबाबत वेल्स म्हणतात की, “Nature is a great friend of Co-Operation.” सहकार ही संकल्पना मानवाच्या सहजीवनातून उदयास आणि त्यामुळे एकमेकांना मदत करणे आणि त्याद्वारे जीवन समृद्ध बनविणे हा सहकार संकल्पनेचा मुलाधार आहे. सहकार ही मानवाच्या सामाजिक, आर्थिक जीवनाची प्रेरणा समजली जाते. त्यादृष्टीने परस्परांना सहाय्य करणे व परस्परांचे आर्थिक हित साधणे हा सहकाराचा अर्थ आहे.[९]

सहकार ही फार व्यापक संकल्पना आहे. सहकाराची नेमकी व्याख्या करता येणे कठिण आहे. आतापर्यंत अनेक शास्त्रज्ञांनी सहकाराची व्याख्या केलेली आहे. परंतु त्यातील कोणीही एक

व्याख्या सहकाराचे सर्व पैलू प्रकट करू शकले नाही. यामागचे कारण म्हणजे सहकारी चळवळ वेगवेगळ्या देशामध्ये भिन्न परिस्थितीत सुरू झाली व विकास पावली.

**सहकाराच्या वेगवेगळ्या तज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत :-**

अ. "प्राचीन भारतीय बायबाल संबोधलेल्या ऋग्वेदात नमुद केले आहे की (आपल्या समान हेतूसाठी आपल्या ह्रदयातील स्वरमेळ साधून तुम्ही सर्व एक दिलाने एकत्र येतात तेव्हा तुमच्या हातून ते काम चांगल्या कार्यक्षमतेने करता येते."[१०]

(The ancient Indian Scripture Riqveda states: "May you all have a common purpose, May your hearts be in unison, May you all be the same mind, so that you can do work efficiently well.")

**आ. एच कल्व्हर्ट यांच्या मते :-**

"समानतेच्या भूमिकेवरून प्रत्येक ठिकाणी आणि स्वत:च्या आर्थिक कल्याणाच्या उद्दिष्टाने स्वेच्छेने कार्य करणाऱ्या संघटनेचा प्रकार म्हणजे सहकार होय."[११]

**ब. वैकुंठभाई मेहता यांच्या मते :-**

भारतातील थोर सहकार तज्ञ वैकुंठभाई मेहताचा सहकारी चळवळीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक होता. त्यांच्या मते "सहकार हा लोकांनी लोकांच्या समाजिक व आर्थिक उद्धारासाठी चालविलेली एक चळवळ आहे." समान गरजा असलेल्या व समान आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकत्र आलेल्या व्यक्तीच्या स्वेच्छापुर्वक वाढ करण्याच्या व्यापक चळवळीची सहकार ही एक बाजू आहे. सहकारी संस्था ह्या लोकांनी स्वत:च्या उद्धारासाठी स्वेच्छेने स्वयंस्फुर्तीने स्थापन केलेल्या संस्था असतात त्यांचे कामकाज लोकशाही तत्वांवर चालते केवळ नफा मिळविणे एवढाच उद्देश नसतो.[१२]

**इ. सी. एफ स्ट्रिकलंड यांच्या मते :-**

"संयुक्त प्रयत्नांतून एक समान ध्येय गाठण्यासाठी एकत्र आलेला व्यक्तींचा गट किंवा समूह म्हणजे सहकार होय."[१३]

**उ. प्रा. लॅक्र्ट पॉल यांच्या मते**

"स्वत:च्या फायद्यासाठी व्यक्ती समूहाने स्थापन केलेली आणि दिग्दर्शित केलेली लोकशाही संकेतानुसार चालविलेली आणि समाजसेवेसाठी स्थापन केलेली व्यावहारिक संस्था म्हणजे सहकारी संस्था होय."[१४]

**ऊ. एम. डार्लिंग यांच्या मते :–**

"सहकार ही केवळ एक पद्धतीच नव्हे तर यापेक्षा त्यात अधिक अर्थ अभिप्रेत आहे. हृदय व मनाला आवाहन करणारे ते चैतन्य आहे. तो व्यवसायात अनुसरलेला धर्मच होय. स्वयंपुर्णता व सेवा यांचे ते आचारण तत्व होय."[१५]

**ऐ. श्री. हेरिल :–**

श्री हेरिल यांच्या व्याख्येतून सहकाराच्या लोकशाही व्यवस्थापनावर प्रकार पडतो ते म्हणतात "सहकार म्हणजे स्वेच्छेने संघटित झालेल्या व्यक्तीची अशी कृती की जिच्यामध्ये परस्परांच्या शब्दांचा साधनाचा तसेच कृतीचा प्रयत्नांचा एकमेकांच्या व्यवस्थापनाखाली फायदया तोट्यांच्या उद्देशाने केलेला उपभोग होय."[१६]

**ओ. एडगार पानिलच्या मते :–**

"सहकार ही स्वायत्तसंस्था असून तीचे नियंत्रण कायदेशीर व्यक्तीकडून एकमेकांस समान पद्धतीने या संस्थेच्या उपक्रमाचे समान हिस्सा मिळतो."[१७]

(Co-Operative is an enterprise freely & controleed by a group of legal person with the purpose of providing them selves with mutual benefits on equitable basis which arise from the activities of an enterprises. – Edgar Paneell)

**औ. आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेच्या मते :–**

"सहकार म्हणजे ज्या व्यक्तीकडे मर्यादित साधने आहेत अशा स्वेच्छेने सामान्य आर्थिक लाभासाठी लोकशाही तत्वावर नियंत्रित केलेल्या व्यवसायात भांडवलाच्या समान भाग उचलून त्या उद्योगाचे धोके व लाभ स्वीकारणाचा समुह होय."[१८]

("A Co-Operation is an association of persons usually of limited means who have voluntarily joined together to achieve a common economic & through the formation of a democrationally controleed business organization making equitable contribution to the capital required & accepting a fair share of the risk benefits of the undertaking." – International Labour Organisation (I.L.O.))

## १.४ सहकाराची गरज आणि आवश्यकता :–

भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशाच्या आर्थिक विकासासाठी नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा मार्ग आपण स्वीकारला पंचवार्षिक योजना आखून त्यांची अंमलबजावणी केली जाऊ लागली. भारतीय अर्थव्यवस्थेचा जलद विकास घडवून आणण्यासाठी सहकारी क्षेत्रांची गरज असल्याचे प्रतिपादीत केले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील अनेक क्षेत्रांचा विकास सहकाराच्या माध्यमातून साधणे शक्य आहे.

उदा. शेती, व्यापार, उद्योग इ. क्षेत्रांचा विकास सहकारातूनच करता येईल.

**अ. कृषी विकास :–** ग्रामीण भागातील जनतेचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन हे शेती आहे. भारतात जवळजवळ ६०% लोक शेतीवर अवलंबून आहे. शेती विकासासाठी शेतकरी सभासदांना सहकारी पतपुरवठा संस्था व सहकारी बँका मार्फत अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला जातो. पीक हंगामात शेतकऱ्यांना विशिष्ट पिकासाठी पीक कर्ज बी–बीयाणे, खते, कीटकनाशके इ. उपलब्ध करून दिली जातात. सहकारी शेती संस्था स्थापन करून जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण करून मोठ्या आकाराचे क्षेत्र निर्माण करता येते.

**ब. औद्योगिक विकास :–** कुशल कामगार किंवा कारागीर एकत्र येऊन सहकारी औद्योगिक संस्था स्थापन करतात. लघुउद्योग/ग्रामोद्योग यासारख्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्पादकांच्या

सहकारी संस्थेची स्थापना केली जाते. औद्योगिक सहकारी संस्था ही रस्ते, वीज, पाणी इ. ची देखील सोय उपलब्ध करून देतो. दुग्धव्यवसाय, सहकारी कुक्कूटपालन, सहकारी तेलगिरण्या, सूतगिरण्या, भातगिरण्या, सहकारी साखर कारखाने इ. व्यवसाय क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करून उद्योगांच्या विकासाला चालना देता येते म्हणूनच देशातील औद्योगिक क्षेत्राला विकासासाठी सहकारी क्षेत्राची नितांत गरज आहे.

**क. ग्रामीण भागांचा विकास :–** ग्रामीण भागाच्या विकासामुळे देशाच्या विकासाला गती प्राप्त होते. ग्रामीण भागात शेती व शेतीशी निगडित व्यवसाय उद्योगात अनेक लोक गुंतलेले असतात. बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन करून शेतकरी कारागीर अन्य व्यावसायिक यांना पतपुरवठा करून त्यांचे उत्पन्न वाढविता येते. प्राथमिक पतपुरवठा संस्था, सहकारी दुधउत्पादक संस्था, सहकारी साखर कारखाने यामुळे ग्रामीण भागांचा विकास होतो.

**ड. रोजगारात वाढ :–** वाहतूक, बँकिंग, विपणन, ग्राहक प्रक्रिया इ. सेवा क्षेत्रातही सहकारी संस्था स्थापन करता येत असल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी भात गिरण्या, तेल गिरण्या इ. संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होऊ शकतो.

**इ. बचत वाढ :–** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा खेडोपाडी कार्यरत आहेत. या बँका ग्रामीण भागातील लोकांचा शिलकी पैसा बचत खाते उघडून जमा करतात. या बचतीमुळे देशातील भांडवल निर्मितीस चालना मिळते. परिणामी देशातील भांडवली गुंतवणूक वाढून देशाच्या आर्थिक विकासाला गती प्राप्त होते.

**ई. वाजवी किंमती :–** सहकारी संस्थांमुळे ग्राहकांना जीवनावश्यक वस्तू रास्त दरात उपलब्ध होतात. ग्राहक सहकारी संस्था या थेट उत्पादकाकडून माल खरेदी करून ग्राहकांना विकतात. मोठ्या प्रमाणावरील खरेदीने खर्चात बचत होते. वाहतूक खर्चही कमी होतो. इतर खर्चही कमी होतात. उत्पादक–घाऊक, व्यापारी–किरकोळ, व्यापारी–फिरते, व्यापारी–ग्राहक अशी वस्तू वितरणाची साखळी असते. ग्राहक सहकारी संस्थांमध्ये मात्र मध्यस्थ व व्यापाऱ्यांची साखळी वगळली जाते.[१९]

## १.५ सहकाराची वैशिष्ट्ये :–

सहकाराची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. ऐच्छिक संघटन :–** सहकार हे एक ऐच्छिक संघटन आहे. समान गरजांच्या पुर्ततेसाठी प्रेरीत झालेल्या व्यक्ती स्वेच्छेने एकत्र येऊन सहकारी संघटना स्थापन करतात.

**२. सेवा :–** आपल्या सभासदांना व समाजाला विविध प्रकारच्या सेवा देण्यावर सहकारी संस्थांचा मुख्य भर असतो. सहकारामध्ये भेदभाव किंवा सेवावृत्ती अभिप्रेत असते.

**३. सामाजिक आशय :–** सहकाराचे सामाजिक अधिष्ठान महत्वाचे असून सामाजिक परिवर्तनासाठी सक्रीय हातभार असावा लागतो.

**४. समानता :–** सहकारामध्ये सर्व सभासदांना समान वागणूक दिली जाते. संस्थेच्या सेवा व्यवस्थातील सहभाग निवडणूकीसाठी मताधिकार या सर्व गोष्टी राबत पुर्णपणे समानतेचे तत्व अंमलात आणले जाते.

**५. लोकशाही स्वरूप :–** सहकारी संस्थांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविला जातो. एक व्यक्ती एक मत या लोकशाही तत्वाचा अवलंब सहकारामध्ये केला जातो.

**६. स्वावलंबन –** स्वत:ची मदत करणे हा सहकाराचा मुळाधार आहे. म्हणून आपणच आपली सर्व कामे केली पाहिजे. या विचारातून ग्राहकांच्या व उत्पादकांच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या आहेत.

**७. शैक्षणिक प्रचाराचे साधन :–** सहाकारी संस्थामुळे सभासदांचे साक्षरतेचे व शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले आहे. म्हणून सहकारी संस्था या एक प्रकारे सभासदांना शिक्षण देणारी सहकारी संस्था मानली जाते.

**८. आर्थिक न्याय :–** आर्थिक न्यायाची स्थिती निर्माण करणे. भांडवलशाही व खाजगीकरणामुळे श्रीमंत होता आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांचे जे शोषण होते. याला आळा घालणे हा हेतू या सहकारी अर्थव्यवस्थेचा असतो. तसेच भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मक्तेदारीचा उदय होतो ही मक्तेदारी नष्ट करणे हा सहकारी संस्था स्थापन करण्यामागे उद्देश आहे.

**९. कामगारांना योग्य वागणूक :–** भांडवलशाहीत जास्त काम व कमी मोबदला या पद्धतीमुळे कामगारांचे शोषण होते. कामगारांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थामध्ये ते स्वत: सभासद असतात. म्हणजेच ते मालकसुद्धा असतात.[२०]

**१०. अन्य उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहेत :–** समाजातील हेवेदावे, मत्सर, उच्च–नीच भाव नष्ट करणे, सामाजिक मूल्यांची जोपासना, समानतेची वागणूक देणे, परस्पर सहकार्यावर अधिक भर देणे, वर्णकलह टाळणे.

## १.६ सहकाराची तत्वे :–

जागतिक सहकारी चळवळीची सुरूवात १९ व्या शतकात इंग्लंडमध्ये झाली. इंग्लंडमधील रॉश्लेड प्रांतातील २८ विणकरांनी एकत्र येऊन १८४४ मध्ये रॉश्लेड इक्विटेबल पायोनियर्स सोसायटी या नावाची ग्राहक संस्था स्थापन केली परंतू वस्तूंच्या कमी किंमती व उधारीने व्यवहार यामुळे ती संस्था आर्थिक अडचणीत येऊन बंद पडली व यामुळे सहकारी संस्था चालविण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे असावीत यांचा विचार पुढे आला आणि त्यानुसार सहकाराचे मार्गदर्शन नियम निश्चित करण्यात आले. यानंतर पुन्हा नव्याने रॉश्लेड इक्विटेबल पायोनियर्स सोसायटी ही संस्था सुरू करण्यात आली. रॉश्लेड इक्विटेबल पायोनियर्स संस्था ज्या नियमांवर (तत्वांवर) चालविली जात होती. त्या नियमांना रॉश्लेड सरकारची तत्वे म्हणतात. ही तत्वे १९३७ च्या पॅरिस येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या कॉंग्रेसनी स्वीकारली. या तत्वांची इ.स. १९६६ मध्ये पुर्नरचना करण्यात आली. इ.स. १९९५ मध्ये मॅचस्टर येथे झालेल्या शताब्दी कॉंग्रेसमध्ये त्याची नव्याने मांडण्यात आली.

सहकारी संस्थेचे संघटन, तिचे व्यवहार, व्यवस्थापन प्रशासन, सभासद, संचालकांचे अधिकार व जबाबदारी अंतर्गत स्वरूप हिशेबाच्या पद्धती यासाठी जे नियम केलेले असतात त्या नियमांच्या संचाला सहकारी तत्वे म्हणता येईल. रॉश्लेड सहकारी भांडाराच्या स्थापनेनंतर जगातील विविध देशात विविध क्षेत्रात सहकारी संस्थांची स्थापना झाली. इ.स. १८२५ मध्ये लंडन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी महासभेत सहकाराची जागतिक संघटना निर्माण करावी असा विचार करून आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना करण्यात आली. रॉश्लेड संस्थेच्या नियमांना सहकारी तत्वे म्हणून मान्यता करण्यात आला.[२१]

### इ. स. १९३७ ची सहकारी तत्वे :–

सहकारी तत्वाची नवीन मांडणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे (International Co-Operative Alancs) समिती नेमली. या समितीने पॅरिस येथे इ.स. १९३७ साली भरलेल्या कॉंग्रेसमध्ये आपला अहवाल सादर केला त्यामध्ये पुढील तत्वांचा समावेश करण्यात आला.[२३]

१. खुले सभासदत्व

२. लोकशाही कारभार

३. भांडवलावर नियंत्रित व्याज

४. व्यवहाराच्या प्रमाणात नफा वाटणे.

५. रोखीने व्यवहार

६. निर्मळ व दर्जेदार वस्तूचा पुरवठा

७. सभासद शिक्षण

८. राजकीय व आर्थिक तटस्थता

**इ. स. १९६६ मध्ये कर्वे समितीने सुचविलेली तत्वे :–**

सहकाराची तत्वे काळानुरूप प्रत्यक्ष व्यवहारातून विकसित होत गेली. सहकारी तत्वानुसार आपल्या सभासदांचे हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था अशी व्याख्या कायद्यात करण्यात आली. पहिल्या महायुद्धापूर्वीच इंटरनॅशनल को–ऑपरेटिव्ह अलायन्स (आय.सी.ए.) ही संघटना अस्तित्वात आली. तिच्या वतीने १९३७ मध्ये भरलेल्या जागतिक सहकारी काँग्रेसमध्ये सहकाराची तत्वे अधिकृतपणे स्वीकारण्यात आली. १९६४ मध्ये इंटरनॅशनल कॉ–ऑपरेटिव्ह अलायन्सच्या मध्यवर्ती समितीने सहकारी तत्वांचा आढावा घेण्यासाठी पाच सदस्यीय आयोग नेमला. त्यामध्ये भारताचे प्रतिनिधीत्व म्हणून अर्थतज्ञ द. गो. कर्वे होते. या आयोगाचे अध्यक्ष तेच निवडले गेले. १९६६ मध्ये आयोगाने सहकाराची खालील तत्वे अधिकृतपणे स्वीकारली.

१. सहकारी संस्थेचे सदस्यत्व ऐच्छीक असावे. कोणाही व्यक्तीवर सभासद होण्यासाठी सक्ती अगर जबरदस्ती केली जाऊ नये. सर्वांना ते खुले असावे. सामाजिक, राजकीय, वांशिक किंवा धार्मिक कारणास्तव सदस्य मिळण्यात निर्बंध घातले जाऊ नयेत.

२. सहकारी संस्थेच्या कारभार लोकशाही पद्धतीने व सदस्यांची निवड नियुक्त केलेल्या व्यवस्थापन मंडळामार्फत केली जावी. सर्व सभासदांना समान हक्क असावेत व संस्थेशी संबंधित सर्व महत्वपूर्ण निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्याचा सहभाग असावा.

३. भाग भांडवलावर शक्य असल्यास मर्यादित दराने व्याज देण्यात यावे.

४. सहकारी संस्थेच्या व्यवहारातून काही वाढावा शिल्लक राहिल्यास तो सर्व सभासदांमध्ये समान प्रमाणात वाटप करावा. नंतर संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात नफा किंवा वाढावा घ्यावा.

५. सर्व सहकारी सोसायट्यांनी आपल्या सभासदांना, अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना व सर्वसामान्य जनतेला सहकाराचे आर्थिक आणि लोकशाही तत्वज्ञान व सिद्धातांचे शिक्षण प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

६. सर्व सहकारी संघटनांनी आपल्या सभासदांच्या व समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने तर सहकारी संस्थांनी स्थानिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळ्यांवर सर्व बाबतीत सहकार्य करावे.

१९८० नंतर जगात सार्वजनिक क्षेत्राचे अपयश हे अकार्यक्षमता व गुणवत्तेचा अभाव यामुळे आले. जागतिक धोरणात बदलाची गरज निर्माण झाली. १९९१ मध्ये गॅट करार जगातील विविध देशांनी स्विकारला. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या स्वरूपाचे नवीन आर्थिक धोरण स्विकारणे भाग पडले. या पार्श्वभूमीवर सन १९९५ मध्ये ब्रिटन मधील मॅचेस्टर शहरात इंटरनॅशनल को–ऑपरेटिव्ह अलायन्सचे अधिवेशन पार पडले. सदर अधिवेशनात सहकार तत्वांची पुर्नमांडणी करावी लागली.[२४]

**तत्वे :–**

१. एच्छिक व खुले सभासदत्व
२. संस्थेवरील लोकशाही नियंत्रण
३. सभासदांचा आर्थिक सहभाग
४. स्वायत्तता व स्वातंत्र्य
५. शिक्षण, प्रशिक्षण व माहिती
६. सहकारांतर्गत सहकार

सहकारी संस्थेच्या कामकाजासाठी काही मार्गदर्शक तत्वे नियम महत्वाची ठरतात. या तत्वांमुळे सहकारी संस्थेला आपली उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होते. ही तत्वे सहकारी संस्थांना आपल्या ध्येयपूर्तीसाठी मार्ग दाखवितात. सहकारी तत्वांच्या माध्यमातून आपण सहकारी संस्थांची ध्येये आणि उद्दिष्टे साध्य करू शकतो आणि म्हणुनच सहकारी संस्थेचा कारभार चालविताना या तत्वांचे पालन होणे गरजेचे असते.

## १.७ विविध देशांतील सहकारी चळवळ :–

### इंग्लंड (ग्रेट ब्रिटन) :–

इंग्लंड हे सहकारी चळवळीचे जन्मस्थान मानले जाते. १५ ऑगस्ट १८४४ मध्ये रॉश्डेल येथील २८ विणकरांनी इक्विटेबल पायोनियर्स सोसायटी स्थापन केली. मर्यादीत वेतनामध्ये चांगल्या स्वच्छ व योग्य वजनमापाच्या वस्तू स्वस्त दरात सभासदांना उपलब्ध करून देणे, हे या संस्थेचे उद्दिष्ट होते. हळूहळू या सोसायटीचा कारभार व सभासदांच्या वाढत गेली. १८५२ मध्ये सहकारी सोसायट्यांसंदर्भात संसदेत कायदा संमत झाला. ग्राहकांच्या संघटनेपासून प्रारंभ झालेल्या ग्रेट ब्रिटनमधील चळवळीचे स्वरूप अद्यापही प्रामुख्याने ग्राहकप्रधानच राहिले आहे. ग्राहकांचा फायदा व्हावा या हेतूने काही वस्तूंचे उत्पादन त्या संस्थानीच सुरू केले. त्या धर्तीवर उत्पादकांच्याही काही सोसायट्या निघाल्या. शेतीक्षेत्रामध्ये सहकारी चळवळीने प्रवेश केलेला आहे. २००७ मध्ये इंग्लंडमधील सहकारी सोसायट्यांची संख्या ४७३५ च्या वर पोहचली असून जवळपास २,३७,००० कामगारांना नोकऱ्या उपलब्ध झालेल्या आहेत. तेथील ग्राहक चळवळीमध्ये किरकोळ विक्री ग्राहक भांडारांना अनन्यसाधारण महत्व आहे. १९०० मध्ये भांडाराची संख्या १४०० होती. तर मध्यंतरीच्या काळात मोठ्या प्रमाणावर एकमेकांत विलिनीकरण झाल्यामुळे १९८४ मध्ये १२५ पर्यंत तर २००३ मध्ये ग्राहक सहकारी सोसायट्यांची सभासद संख्या ९,८९,८०० इतकी होती तर भागभांडवल २८० दशलक्ष पौंड होते. २००३ मध्ये सुपर स्टोअर्स २६ सुपरमार्केटस १४८८ सुविधा संस्था १७२४ व इतर १४ अशा अन्नविषयक ३,२५२ संस्थास कार्यरत होत्या. तर विभागीय भांडारे ९६ फार्मसी भांडारे ६,४४ पादत्राणे संस्था ३३० आणि इतर १३० अशा बिगर अन्नविषयक संस्था काम करीत होत्या. शेतीच्या क्षेत्रात सहकारी तत्वावर पहिला प्रयत्न १८२९ मध्ये झाला. पण पद्धतशीर सुरूवात १९०० मध्ये आयरिश कृषिक संघटना सोसायटीच्या स्थापनेपासून झाली.[२५]

### जर्मनी :–

ग्राहक संरक्षण संस्थांची मुहूर्तमेढ जशी ग्रेट ब्रिटनमध्ये तशी कारागीर व गरीब शेतकरी यांच्या सहकारी सोसायट्यांची सुरूवात जर्मनीमध्ये झाली. फान्ट्स शुल्झ (१८०८–८३) याने अनुक्रमे कारागिरांच्या तर फिड्रिख व्हिल्हेल्म रायफायझन (१८१८–८८) या अर्थशास्त्रज्ञाने गरीब शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला. आयफायझन याने (हेडेसडॉर्फ

बेनिफिसंट सोसायटी)ची स्थापना केली. पुढे तिचे (हेडेसडॉर्फ सोसायटी) असे नामांतर केले गेले. सर्व सभासदांची सामूहिक नैतिक पातळी व कठोर परिश्रमाची तयारी या सर्वामुळे या सोसायटीला अनेक व्यापारी कंपन्याकडून कर्ज मिळत जाऊन शेतकऱ्यांची स्थिती सुधारली सगळ्यांसाठी प्रत्येकजण व प्रत्येकासाठी सगळेजण हे सूत्र या संस्थेने रूढ केले.

पहिल्या महायुद्धामुळे (१९१४ ते १९१८) जर्मनीतील सहकारी पतसंस्थाचे नुकसान झाले. पतसंस्थांना सावरण्यासाठी त्यांचे विलीनीकरण करण्यात आले. एकत्रीकरणामुळे जरी संस्था सक्षम झाल्या तरी त्यानंतरच्या साम्यवादी क्रांतीमुळे आर्थिक क्षेत्रावरील सरकारी नियंत्रणात वाढ होऊन सहकारी संस्थाचे स्थान धोक्यात आले. दुसरे महायुद्ध (१९४५) संपल्यानंतर जर्मनीची विभागणी होऊन पूर्व जर्मनीत सहकारी शेतीसंस्था आणि ग्राहक सहकारी भांडारे यांचा प्रामुख्याने विकास घडून आला. तर पश्चिम जर्मनीत ग्रामीण नागरी सहकारी संस्था गृहनिर्माण संस्था ग्राहक सहकारी संस्था अशा विविध प्रकारच्या संस्था निघाल्या. १९६६ मध्ये त्यांची संख्या २२,००० होती तर सभासद संख्या ४४ लक्ष एवढी होती. सध्या जर्मनीत २० दशलक्ष लोक सहकारी संस्थांचे सभासद असून प्रत्येक चार व्यक्तीमध्ये एक व्यक्ती संस्थेची सभासद आहे.[२६]

**डेन्मार्क :–**

डेन्मार्कच्या अर्थव्यवस्थेतील सहकारी चळवळीचा मोठा वाटा आहे. या देशाने दुग्धव्यवसाय, शेतीपुरवठा व ग्राहक या क्षेत्रांत सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणावर विकसीत केली. डेन्मार्कमध्ये रॉचडेल तत्वांवर आधारित सहकारी भांडाराच्या स्थापनेने सहकारी चळवळीस सुरूवात झाली. औद्योगिक क्रांतीमुळे ग्रेट ब्रिटनमधील बहुसंख्य शेतकरी उद्द्योग व्यवसायाकडे वळल्यामुळे तेथे शेतमाल व दुधदूभते यांच्या आयातीची गरज वाढली. याचा फायदा इतर काही देशांप्रमाणे डेन्मार्कलाही मिळाला. १८८२ मध्ये स्टिलींग ॲडरसन यांच्या नेतृत्वाखाली जेडिंग येथील शेतकऱ्यांनी मलई लोणी साठवण कारखाना बांधण्याचा निर्णय घेतला. वर्गणीद्वारा भांडवल जमवून प्रत्येक सभासदांकडून होणाऱ्या दुधपुरवठ्याच्या प्रमाणात त्यात नफा वाटण्याचे ठरले. सर्व सभासदांच्या सुमारे ३००० गायी होत्या.लवकरच दुग्धशाळा (डेअरी) स्थापन झाली आणि यशस्वीरित्या व्यवहार करू लागली. डेन्मार्कच्या सहकारी डेअरी संस्थांची रचना संघीय स्वरूपाची असून अगदी खालच्या पातळीवर प्राथमिक संस्था असतात. विभागीय पातळीवर अशा संस्थांचा

एक विभागीय संघ असतो व सर्वोच्च स्तरावर फेडरेशन ऑफ डेअरी असोसिएशन असते. डेन्मार्क मध्ये तयार होणारे ७० टक्के दुग्धपदार्थ इंग्लंडला निर्यात केले जातात आणि उर्वरित उत्पादन स्थानिक बाजारात विकले जाते. डेन्मार्कमध्ये १८८७ मध्ये पहिली सहकारी बेकन संस्था स्थापन झाली.

डेन्मार्क हा शेतीप्रधान देश असून त्यांच्या अर्थव्यवस्थेवर सहकारी चळवळीचा मोठा प्रभाव जाणवतो. ९१ टक्के दुग्धव्यवसाय, ६५ टक्के लोणी निर्यात, ९० टक्के कत्तलखाने, ३६ अंडीनिर्यात, ४२ टक्के मांसनिर्यात आणि ५३ टक्के पशुखाद्य पुरवठा सहकारी संस्थामार्फत केला जातो. मध्यवर्ती सहकार समिती व नागरी सोसायटयांची संघटना देशातील सहकारी चळवळीला मार्गदर्शन करतात. शिवाय डेन्मार्क सहकारी पतसंस्था व सहकारी विमा संस्थाही मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. प्राथमिक ग्राहकसंस्था किंवा किरकोळ भांडारे कार्यरत असतात. जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहकसंस्था काम पाहतात. या संस्था विभागीय पातळीवर ग्राहक संस्था स्थापन करतात. सर्व विभागीय ग्राहक संस्थांचा केंद्रीय स्तरावरील संघ मध्यवर्ती म्हणजेच सेंट्रोसोयूस प्रजासत्ताक ग्राहक सहकारी संघ असतो. सहकारी ग्राहक सोसयटयांच्या कामाचे सुसूत्रीकरण घाऊक खरेदी पुरवठा किंमत मार्गदर्शन सोसायटयांच्या कामकाजावर देखरेख हिशेब सेवकभरती तांत्रिक वर्ग व्यवस्थापन वगैरे कामे या सेंट्रोसोयूसमार्फत केली जातात. या संस्थेमार्फत चार सहकारी उच्चशिक्षण संस्था १११ तंत्रशाळा आणि १०३ व्यायामशाळा चालविल्या जातात. सहकारी सोसायटीचा अध्यक्ष पूर्णवेळ काम करणारा व सहकारी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतलेला पाहिजे अशा अटी घालण्यात आल्या आहेत.[२७]

**इटली :–**

कर्जबाजारी शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी इटलीत सहकारी चळवळीला सुरूवात झाली. ल्यूइगी लुझाटी याने १८६४–६५ साली लोडो येथे सहकारी सोसायटी तर १८६६ मध्ये मिलान येथे पहिली सहकारी बँक स्थापन केली. कॅथलिकांनी या क्षेत्रात आपली सहकारी बँक १८९० मध्ये स्थापन केली. १९२२ मध्ये त्यांच्या सहकारी बँकाची संख्या ३५०० होती. बेनीतो मुसोलिनी हा इटलीचा हुकूमशाह झाल्यानंतर त्याने नॅशनल को–ऑपरेटिव्ह लीग बेकायदेशीर ठरविली व सहकारी सोसायटयांच्या व्यवस्थेत बरेच बदल केले अनेक सोसायटयांचे एकत्रीकरण करण्यात येऊन सर्व नियंत्रण सरकारच्या हाती सोपविले गेले. पुढे फॅसिस्टांच्या

पाडावानंतर (१९४४) सहकारी चळवळीची पुर्नघटना करण्यात आली. इटालियन को–ऑपरेटिव्हज १९४७ मध्ये जनरल असोसिएशनच्या ऑफ वर्क्स या पहिल्या मजूर सोसायटीची स्थापना झाली. १९०० मध्ये सोसायट्यांची संख्या ६०० होती. १९२१ मध्ये त्यांची संख्या ८८३० झाली. तर १९५६ मध्ये ती १५००० पर्यंत वाढली. १९६२ मध्ये देशात एकूण २१६९८ सहकारी सोसायट्या होत्या आणि सभासद संख्या ४४ लाख होती. त्यापैकी ४१७० ग्राहक ५७३२ मजूर व कारागीर ३३०१ शेती आणि ८४३५ गृहनिर्माण  सोसायट्या होत्या.

फ्रान्स:ल्वी ब्लां या विचारवंताच्या कल्पनेनुसार १९४० मध्ये पहिली सहकारी राष्ट्रीय कार्यशाळा स्थापन झाली. तिला सरकारी साहाय्य भरपूर प्रमाणात उपलब्ध होते. सरकारी कंत्राटे हेच तिचे प्रमुख ग्राहक होते. त्यानंतर १८५५ पासून देशात काही ठिकाणी कामगारांनी ग्राहक सहकारी संस्था चालविल्या होत्या. शेतीला कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था सिंडिकेट अगिकोल या नावाने १८५५ पासून कार्यरत होत्या. हळूहळू शेतीसाठी आवश्यक वस्तूंची खरेदी व पुरवठा करण्याचे काम या संस्थांनी सुरू केले. दुधपुरवठा क्षेत्रात सहकारी चळवळ एकाच प्रदेशात विकसित झाली असली तरी तिच्यामार्फत देशाच्या एकूण दुधपुरवठ्यापैकी निम्मा हिस्सा हाताळला जातो. कारागिरांच्या सहकारी संस्थाही फार पूर्वीपासून देशात काम करीत होत्या. १९०० च्या सुमारास तीन चार कारागिरांनी एकत्रितरित्या मेकर्स ऑफ प्रिसिझन इन्स्टुमेंट ही सहकारी संस्था स्थापन केली. तिचा व्याप बराच वाढलेला असून १९६० मध्ये तिची उलाढाल ४० लाख पौंड तर सेवकवर्गाची संख्या १५०० पर्यंत गेली. या संस्थेमार्फत विद्युत उपकरणांची व दुरध्वनीची साधनसामग्री तयार केली जाते. बांधकाम उद्योगातही बऱ्याच सहकारी संस्था कार्यरत असून राष्ट्रीय पातळीवर त्यांचा महासंघ आहे.[२८]

**स्वीडन :–**

एकोणीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत स्वीडन हा शेतीप्रधान देश होता. नंतर तेथे मोठमोठे उद्योग स्थापन झाले. उत्पादक संघ व मुल्यनिर्धारण संघटना यांच्याद्वारे बडे कारखानदार आणि व्यापाऱ्यांनी मोठी नफेखोरी चालविली होती. त्यापासून होणारी आपली लूट थांबविण्यासाठी कामगारांनी सहकारी चळवळीचा आश्रय घेतला. १८५० मध्ये जिल्हा वस्तु विक्री संस्था या नावाची सहकारी सोसायटी स्थापन झाली. ग्राहक सहकारी संस्थांची प्रगती होत गेली. १९६४ मध्ये या संस्थांची संख्या ३६५ व सभासदसंख्या १२.९ लक्ष होती. स्वीडनच्या सहकारी

चळवळीचा विकास ग्रेट ब्रिटनच्या धर्तीवर झालेला आहे. सोसायट्यांची संख्या कमी करून त्यांचा व्याप वाढविणे हे धोरण असून कुशल व्यवस्थापक वर्गामार्फत साखळी दुकाने, हॉटेल्स, बेकऱ्या इ. चालविल्या जातात. किंमती किमान ठेवण्याचे धोरण अवलंबिलेले आहे. को–ऑपरेटिव्ह फॉर बूंडट केएफ् १८९९ या घाऊक सोसायटीचा व्याप सतत वाढत गेला आहे. केएफ्ने स्वत:चे कारखानेही चालविले आहेत. १९६४ मध्ये या सोसायटीचा सेवकवर्ग २१२०५ भांडवल ५० कोटींचे व एकूण मालमत्ता २००० कोटींची होती. सरकारी शिक्षणाच्या क्षेत्रातही केएफ्ने महत्वपूर्ण उपक्रम चालविले आहेत. केएफ्चा प्रकाशनविभाग एक नियतकालिक चालवीत असून तो दरवर्षी सुमारे ३०० पुस्तके प्रसिद्ध करतो. इंटरनॅशनल को–ऑपरेटिव्ह अलायन्स या संघटनेच्या सहकार्याने केएफ्ने नवीन दिल्लीत एक शिक्षणकेंद्र चालविले आहे. स्वीडनमध्ये सध्या अवघे १३ टक्के लोक शेतीत गुंतलेले असून फक्त १० टक्के जमीन लागवडीखाली आहे. प्रत्यक्ष शेती करण्याचे काम व्यक्तिश: होत असले तरी खरेदी विक्री, कर्जपुरवठा प्रक्रिया वगैरे व्यवहार सोसायट्यांमार्फत केले जातात. राष्ट्रीय पातळीवर तेरा संस्था कार्यरत आहेत.[२९]

**इस्त्राइल :–**

या देशातील सहकारी चळवळीची पार्श्वभूमी वैशिष्ट्यपूर्ण आहे. ज्या लोकांनी आपले नवे राष्ट्र बसविण्याचा अभूतपूर्व उपक्रम केला. ही नवी उभारणी करताना त्यांनी सहकारी पद्धतीचा मोठ्या प्रमाणावर अवलंब केला. देशातील ९० टक्के शेतीचे राष्ट्रीयकरण झालेले असून नाममात्र भाड्याने जमीन लोकांना दिली जाते. इस्त्रायली कृषीपद्धतीची दोन महत्वाची वैशिष्ट्ये म्हणजे मोशाव व किबुन्स होत. मोशाव ही सहकारी शेती आणि किबुन्स हा सामुदायिक शेती प्रकार असून तो इस्त्राएलमध्ये विकसीत झाला आहे. झिऑनिस्ट ऑर्गनायझेशन या संघटनेने १९०१ मध्ये ज्यू राष्ट्रीय निधी स्थापन केला व त्यांच्या साहाय्याने पॅलेस्टाइनमधील जमीन खरेदी केली. देशातील ९४.६ टक्के जमीन या निधीच्या किंवा सहकारच्या मालकीची आहे. स्वातंत्र्यपूर्वी १९२४ मध्ये हेवराट ओवडिन (हे. ओ.) या नावाने एक सहकारी सोसायटी नोंदविण्यात आली. ही देशातील प्रभावशाली संस्था असून देशातील सुमारे ८० टक्के सोसायट्या हे. ओ. च्या छत्रछायेखाली काम करतात. कोणालाही एखाद्या सरकारी सोसायटीचे सभासद व्हावयाचे असेल तर त्याला प्रथम हे. ओ. चे सदस्य व्हावे लागते. या संघटनेला व्यापक अधिकार आहेत. एखाद्या सोसायटीतून सभासदाला कमी करणे, सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांसाठी पॅनेल सुचविणे,

सोसायटीने एखादा ठराव रद्द करणे असे अधिकार हे.ओ. ला आहेत. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना त्यांचा जम बसविण्यात मदत करणे बँका व प्राथमिक सोसायट्या उभारण्यास साहाय्य करणे. मच्छीमारी, उद्योगधंदे, वाहतूक इत्यादींच्या विकासाला मदत करणे, सभासदांचे कुटुंबीय व संपत्ती परदेशातून आणणे यांसारखी कामे हे. ओ. करते. हे. ओ. च्या देखरेखीखाली विविध सोसायट्या काम करतात. १९५९ मध्ये या सोसायट्यांची संख्या २४२७ होती. देशाच्या एकूण अर्थव्यवहारातील २९ टक्के भाग सहकारी संस्थामार्फत हाताळला जातो. शेतीच्या क्षेत्रात हे प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत आहे.[३०]

**चीन :–**

चीन हे १९१८ मध्ये प्रजासत्ताक राज्य बनले. सन–यत्–सेन (१८६६–१९२५) यांच्या पुढाकाराने सहकारी चळवळीला गती मिळाली. औद्योगिक मागासलेपणा वारंवार निर्माण होणारी दुष्काळाची व महापुराची स्थिती इत्यादींवर मात करण्यासाठी तेथे सहकाराचा मार्ग अवलंबिण्यात आला. १९१९ मध्ये शांघाय राष्ट्रीय सहकारी बचत बँक स्थापन झाली. त्यानंतर अनेक सहकारी कर्जपुरवठा करणाऱ्या स्थापन झाल्या. चीनच्या सहकारी चळवळीचा अभ्यास करताना त्यांचे विभागवार १९१२ ते १९३६, १९३७ ते १९४९ व नंतरचा काळ असे तीन टप्पे पडतात. १९१२ ते १९३६ या काळात सहकारी संस्थांची संख्या बऱ्यापैकी वाढली. परंतु अनेक संस्था अर्थदृष्ट्या कमकुवत असल्याने त्यांची पुनर्रचना करण्यात आली. अनेक दुर्बळ संस्थांचे विसर्जन करण्यात आले. १९३७ ते १९४९ या कालावधीत सरकारने सहकारी कायदे संमत केले. वित्तीय साहाय्य पुरवून चळवळीला मदत केली. त्यामुळे पतपुरवठा सहकारी संस्था, कृषी उत्पादन संस्था, ग्राहक सहकारी संस्था, विपणन सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था आदींना प्रोत्साहन मिळाले. लोकांना सहकार विषयक शिक्षण–प्रशिक्षण देण्यासाठी १९३८ मध्ये मध्यवर्ती सहकारी–प्रशासन निर्माण करण्यात आले. १९३९ मध्ये मध्यवर्ती सहकारी संस्था कृषी उत्पादन संस्था सुरू करण्यात आली. १९४९ नंतरच्या काळातील सहकारी चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे शेती–उत्पादन वाढविण्यासाठी केलेले शेतीचे सामूहिकीकरण होय. माओ–त्से–तुंगने चीनच्या ग्रामीण लोकसंख्येची सहकारी तत्वावर पुनर्रचना केली. त्यामध्ये शंभर ते तीनशे कुटुंबाची मिळून एक सहकारी संस्था केली. पुढे १९८८ मध्ये शेतजमिनीचे व्यवस्थापन पीपल्स कम्यूनसकडे सोपविण्यात आले. साम्यवादी पक्षाच्या मध्यवर्ती समितीने सहकारी शेती संस्थांचे तीन प्रकार

सुचविले ते असे : १) सामुदायिक श्रम पद्धतीची शेती, २) शेती उत्पादकांची एकत्रित शेती, ३) प्रगत कम्यून्स धर्तीची शेती, प्रगत शेती उत्पादकांच्या सहकारी शेतीलाच पीपल्स कम्यून्स असे संबोधले गेले.[३१]

**जपान :–**

जपानमध्ये सहकारी चळवळींचा प्रारंभ ग्राहक सोसायट्यांच्या स्थापनेने झाला. शेती हा जपानी अर्थ व्यवस्थेतील कमी महत्वाचा म्हणजेच १५ टक्के राष्ट्रीय उत्पन्न देणारा व्यवसाय असूनही त्याचे जवळपास संपूर्ण सहकारीकरण झाले आहे. औद्योगिक क्षेत्रातही सहकारी चळवळीचा चांगला विकास झाला असून तिने शिक्षणक्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावली आहे. जपानमध्ये पहिली ग्राहक सोसायटी १८७९ मध्ये स्थापन झाली. १८९८ मध्ये सोसायट्यांची संख्या ३४६ होती. १९०० मध्ये सहकारी सोसायटीचा कायदा केला गेला. १९०६ मध्ये राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संघाची स्थापना झाली. १९०९ मध्ये प्राथमिक सोसायट्यांची संख्या ५६९० आणि सभासद संख्या ३.८ लक्षांपर्यंत होती. १९२३ मध्ये राष्ट्रीय सहकारी खरेदी संघ व मध्यवर्ती सहकारी बँक या संस्था स्थापन झाल्या. शेतीक्षेत्रात कर्जपुरवठा व खरेदी–विक्री करणाऱ्या सोसायट्या विशेष वाढल्या. १९६४ मध्ये त्यांची संख्या १०८१३ असून त्यांनी सर्व खेडी व्यापली होती. शेतीवर निर्वाह करणारी सर्व कुटूंबे त्यांची सभासद बनली होती. शेतकऱ्यांना होणाऱ्या कर्ज पुरवठ्यापैकी ५१ टक्के हिस्सा सहकारी सोसायट्यामार्फत केला जात होता. शेतकऱ्यांच्या ७० टक्के ठेवी सहकारी सोसायट्यांत होत्या. सोसायट्यांमार्फत ४९ टक्के शेतमालाची विक्री व ७० टक्के खतांची खरेदी होत होती. शेतीच्या जोडधंद्याच्या क्षेत्रातही सहकारी चळवळीचा बराच विस्तार झाला. १९६० मध्ये पुढीलप्रमाणे सोसायट्यांची संख्या होती. रेशीम उत्पादन ८,८४७, पशुसंवर्धन ३, शेतकऱ्यांना, मीन विकास ५०३२, फळफळावळ ८९८, ग्रामीण उद्योग ७६६, इतर ८९५ एकूण १९५४४ जपानमध्ये मासेमारीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो. या क्षेत्रात खाजगी कंपन्यांबरोबरच सहकारी संस्थाही कार्यरत आहेत.[३२]

**कॅनडा :–**

१८७० मध्ये कॅनडामध्ये सहकारी चळवळीला सुरूवात झाली. शेती उत्पादन व विक्री क्षेत्रांवरील दलाल आणि मध्यस्थ यांच्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असे. त्यामुळे तेथे सहकारी खरेदी–विक्री संस्थांना सुरूवात झाली. १९०६ मध्ये शेतकऱ्यांची पहिली सहकारी खरेदी–विक्री

संस्था सुरू झाली. १९१९ मध्ये सरकारने गहु मंडळ स्थापन केली. निर्यातीस परवानगी देण्याचा अधिकार या मंडळाकडे होता. कॅनडातील खरेदी–विक्री संस्थांचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तेथील गव्हाच्या पिकांचे एकत्रीकरण व्हीट पूल होय. गव्हाच्या किंमती स्थिर राखणे व विक्री व्यवस्था सुसंघटित बनविणे या उद्देशाने १९२३ साली पहिले पूल सुरू करण्यात आले. या पद्धतीनुसार शेतकऱ्यांना आवश्यक असणारी सर्व साधने पूलामार्फत पुरविली जातात. तसेच शेतीमालाची विक्रीसुद्धा पुलमार्फत केली जाते. याशिवाय अनेक सर्वसाधारण सहकारी खरेदी–विक्री संस्थासुद्धा स्थापन झालेल्या आहेत. या संस्थांनी आपले संघ स्थापन केलेले असून या संघ संस्थांनी राष्ट्रीय स्तरावर इंटर प्रॉव्हिन्शल को–ऑपरेटिव्ह लि. ही संघटना स्थापन केलेली आहे.[३३]

**स्वित्झर्लंड :–**

स्वित्झर्लंडमध्ये ग्राहक व शेतकरी यांच्या सहकार्याने व्हीएसके नावाची संघटना कार्यरत आहे. तिची अनेक दुकाने असून काही कारखाने आहेत. घाऊक व्यापार मोठ्या प्रमाणावर केला जातो. दुधदुभते, भाजीपाला यांसारख्या वस्तूंचा पुरवठा व्हीएसकेच्या दुकानातून केला जातो. शेतकऱ्यांना दीर्घमुदतीचे कर्ज देणाऱ्या २७ मध्यवर्ती व १५६ खाजगी स्थानिक भूतारण बँका असून त्यांचेमार्फत १० ते ४० वर्ष मुदतीची कर्जे दिली जातात. या बँका बॅकिंगची इतरही कामे करतात. फेडरल मार्गेज ॲक्ट १९३१ या कायद्यानुसार मध्यवर्ती बँकासाठी एक व खाजगी स्थानिक बँकासाठी एक अशा दोन शिखर बँका स्थापन करण्यात आलेल्या आहेत. शेतकऱ्यांना लागणारी साधनसामुग्री पुरविण्याचे काम करणाऱ्या सोसायट्या प्रभावशाली आहेत. स्विस डेअरी युनियन ही मोठी व राष्ट्रव्यापी संघटना असून चीजचा निर्यात व्यापार मोठ्या प्रमाणावर चालतो.[३४]

**अमेरिकेची संयुक्त संस्थाने :–**

अठराव्या शतकात नवीन जमीन लागवडीखाली आणण्यासाठी अमेरिकेत छोट्या शेतकऱ्यांनी सहकाराचा अवलंब केला. पुढे १८२० च्या नंतर रॉबर्ट ओवेन या सहकारी चळवळीच्या अगदूताने आपले सहकार्याचे प्रयोग न्यू इंग्लंडमध्येच केले. १८५० मध्ये बॉस्टनजवळ स्थापन झालेली ब्रुकफाम ही वैशिष्ट्यपुर्ण वसाहत होती. धान्यसाठवण व धान्य चढविणे उतरविणे या क्षेत्रात सहकारी चळवळ विशेष विकसित झाली. चार लाख शेतकऱ्यांच्या सहकारी मालकीची चार हजार धान्य उच्चलक यंत्रे ग्रेन एलेव्हेटर्स एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस देशात काम करीत होती.

विसाव्या शतकातील सहकारी चळवळीने ग्रामीण विद्युतीकरण क्षेत्रात विशेष कामगिरी करून दाखविली. १९१४ मध्ये मिनेसोटा राज्यातील ग्रॅनाइल फॉल्स या गावी या क्षेत्रातील पहिली सहकारी सोसायटी स्थापन झाली. त्या सोसायटीने वीज वितरणाचे काम हाती घेतले. १९३५ मध्ये रूरल इलेक्ट्रिफिकेशन ॲडमिनिस्ट्रेशन ही बिनसरकारी संस्था उभारण्यात आली. तिच्यामार्फत शेतकऱ्यांच्या वीज सोसायट्यांना कर्जे देण्यात येऊ लागली. थोड्याच अवधीत अमेरिकेतील ९५ टक्के शेतांचे विद्युतीकरण झाले व २५ लाख लोकांना त्याचा फायदा मिळू लागला. काही सोसायट्यांनी वीजनिर्मितीचे ही काम सुरू केले.

अमेरिकेतील सहकारी चळवळीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे तेल उद्योगात तिने पदार्पण १९२६ मध्ये स्थापन झालेल्या मिडलॅंड को–ऑपरेटिव्ह होलसेल या संस्थेने तेल वाटपाचे काम सुरू केले. पेट्रोलियम वस्तूंच्या एकूण विक्रीपैकी १८ टक्के ते २२ टक्के विक्री सहकारी सोसायट्यांमार्फत केली जाते. त्यांच्या मालकीच्या २००० पेक्षा जास्त तेलविहिरी आहेत. कर्जपुरवठ्याच्या क्षेत्रात १९२१ पासून विशेष प्रगती झाली. १९९२१ मध्ये कर्जपुरवठा संघाची संख्या अवघी १९९ होती १९६० मध्ये ती २०००० च्या वर गेली. त्यांचे एक कोटी दहा लाख सभासद होते आणि भांडवल पाच अब्ज डॉलरपेक्षा अधिक होते. या प्रगतीचे श्रेय १९२१ मध्ये स्थापन झालेल्या क्रेडिट युनियन ऑफ नॅशनल एक्स्टेशन ब्यूरा' या संघटनेकडे जाते. तिच्या अथक प्रयत्नामुळे आवश्यक ते कायदे संमत झाले आणि कर्जपुरवठा संघाची वाढ झाली.

विमाक्षेत्रातील सहकारी चळवळीचा प्रारंभ मिडलॅंड सेंटल म्युच्युअल (एमसीएम) इन्शुरन्स कंपनीने केला. शेती क्षेत्रातील विम्याबरोबरच इतर क्षेत्रांतही सहकारी सोसायट्या विम्याचे काम करतात. ग्राहक सहकाराचा प्रारंभ १९५० मध्ये वाढलेल्या मक्तेदारी प्रवृत्तीविरूद्धच्या प्रतिक्रियेतून झाला. युनायटेड रबर वर्कर्स ऑफ अमेरिका या कामगार संघटनेने या कामी पुढाकार घेतला. त्यातूनच को–ऑपरेटिव्ह एंटरप्रायझेस ऑफ ॲकान ही संस्था उभी राहिली. तिने एका मागून एक विभागीय वस्तू भांडारे सुरू केली. १९३७ मध्ये तिचे दहावे दुकान सुरू झाले. यां व्यतिरिक्त ३३ ग्राहक सोसायट्या कार्यरत असून डेअरी मेन्स लीग ऑफ न्यूयॉर्क या दूधपुरवठा करणाऱ्या सोसायटीचे ४० सभासद आहेत. २०७ च्या आकडेवारीनुसार अमेरिकेतील २५ टक्के नागरिक सहकारी सोसायट्यांचे सभासद असून शेती उत्पादनातील ३० टक्के हिस्सा ३४०० सहकारी संस्थांमार्फत विक्री केला जातो.[३५]

## १.८ भारतातील सहकारी चळवळीचा आढावा :–

१७६० मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले. तेव्हा उत्पादित मालास बाजारपेठा शोधण्यात येऊ लागल्या. त्यावेळी भारताच्या भूप्रदेशाचा वापर इंग्लंडमध्ये तयार झालेल्या मालास बाजारपेठ म्हणून करण्याचे धोरण ब्रिटिशांनी राबविले. भारतातील कच्चा माल कमी दराने खरेदी करून तो इंग्लंडला निर्यात केला जात असे. याउलट इंग्लंडमधून तयार झालेला पक्का माल भारतात आयात करून तो जास्त दराने विकला जात असे. त्याचबरोबर औद्योगिक क्रांतीचा दुष्परिणाम म्हणजे भारतातील लघु कुटीर उद्योग स्पर्धा करू शकले नाहीत. त्यामुळे त्यात गुंतलेल्या व्यक्ती या शेतीकडे वळल्या. परिणामी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढली. परंतु भारतातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती दुर्बल होती. अवर्षण व दुष्काळ यामुळे उपजिविकेसाठी सावकारांकडून कर्जाऊ रकमा घेण्यात आल्या. शेती उत्पन्नात दुष्काळ व अवर्षणामुळे घट झाली. शेतकऱ्यावरील कर्जाचा बोजा वाढून ते सावकारी पेशात अडकले. कारण सावकार शेतकऱ्यांच्या जमिनी स्वतःच्या नावावर लिहून घेऊन कर्ज देत असे. कर्ज न फेडल्यास शेतीवर कब्जा करून घेत व त्याच जमिनीवर शेतकऱ्यांना शेतमजूर म्हणून राबवित.[३६]

तसेच ते सावकार कर्जावर अवास्तव व्याज आकारित, व्याजाची रक्कम पिकातील भरपूर वाटा देऊन सुद्धा फिटत नसे. मुद्दलापोटी सावकारांनी जमिनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू केला. अशा रितीने शेतकरी प्रक्षुब्ध झाले. त्यांनी बंड पुकारण्यास सुरूवात केली. त्यावेळी ब्रिटीश सरकारचे लक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे वळले. सरकारने काही फायदे करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. भारतातील सहकार चळवळीची सुरूवात शेतकऱ्यांच्या विकासासाठी झाली.

ब्रिटीशांच्या राजवटीत जनता संस्थानिक, जहागिरदार, सावकार इ. च्या मगर मिठीत सापडली होती. दुष्काळ, रोगराई, अवर्षणे यामुळे ग्रामीण जनतेचे आर्थिक जीवन उद्ध्वस्त होण्यास सुरूवात झाली होती. कर्जबाजारीपणा वाढला होता. सावकारांकडून पिळवणूक होत होती. त्यामुळे समाजात असंतोष पसरला. तातडीचा उपाय म्हणून ग्रामीण जनतेच्या कर्जबाजारीपणाची पाहणी करण्यासाठी शासनाने समित्या व मंडळे स्थापन केली. त्यापैकी दख्खन बंडाळी मंडळ हे एक होते. या मंडळाच्या शिफारशीनुसार शेतकरी मदत कायदा १८७९ मध्ये मंजूर करण्यात आला. या कायद्याने सावकारांवर बंधने टाकण्यात आली होती. परंतू या कायद्याचा

फारसा उपयोग झाला नाही.

इ.स. १८५२ साली न्या. महादेव रानडे यांनी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात शेतकरी बँक स्थापन करून शेतकऱ्यांना कर्ज देण्याची व्यवस्था केली. जुनी कर्जे फेडणे व जमीन सुधारणा करणे हा या बँकेचा उद्देश होता. तथापि त्यावेळेचे मंत्री लॉर्ड किंबर्ले यांनी ही योजना अमान्य केल्यामुळे ही बँक बंद करावी लागली. इ. स. १८८३ मध्ये ॲग्रिकल्चरल इम्प्रुव्हमेंट ॲक्ट व इ.स. १९८४ मध्ये ॲग्रिकल्चरल लोन ॲक्ट पास करून शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा देण्याचे कार्य तत्कालीन इंग्रज सरकारने केले. इ.स. १८८९ मध्ये बडोदा येथे सहकारी पतसंस्था चळवळचे जनक विठ्ठल लक्ष्मण कुमठेकर यांनी अन्योन्य सहकारी मंडळ या पतपेढीची स्थापना केली.[३७]

भारतात सहकारी संस्थाच्या स्थापनेचे पहिले पाऊल मद्रास सरकारने उचलल्याचे दिसून येते. इ.स. १८९२ मध्ये मद्रास सरकारने सर फेडरिक निकोलसन यांची नेमणूक करून त्यांनी जमीन व कृषी बँक सुरू करण्याची शक्यता पडताळून पाहण्यास सांगितले. त्यांनी युरोपचा अभ्यास दौरा करून इ.स. १८९९ मध्ये अहवाल सादर केला. यानुसार इ.स. १९०१ मध्ये भारत सरकारने सर एडवर्ड लॉ यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना केली. या अभ्यास गटाने फेडरिक निकोलसन समितीने केलेल्या शिफारशीचा दुजोरा दिला. वरील अभ्यासगट आणि समितीच्या शिफारशीनुसार इ. स. १९०४ झाली. शेतीस पतपुरवठा करण्यासाठी सहकारी पतपेढ्या निर्माण करण्याचा कायदा भारत सरकारने संमत केला. या कायद्यात बिगर शेती पतपेढ्या व बँका स्थापन करण्याची तरतूद नव्हती. सहकारी संस्थेच्या स्थापनेस किमान १० व्यक्तीची गरज होती. प्रत्येक प्रांतासाठी निबंधकाची नेमणूक करण्याविषयी उल्लेख होता. कायद्यात भाग विक्री करून किंवा कर्ज घेवून भांडवल उभारणी करण्याविषयी प्रावधान होते. एक व्यक्ती एक मत तत्वाचा पुरस्कार केला. संस्थेच्या सभासदांना कर्ज वाटप करण्याची व्यवस्था होती. ग्रामीण संस्थेत किमान ४/५ सभासद शेतकरी व नागरी पतसंस्थेत ४/५ सभासद शहरातील असावे असा उल्लेख होता. या संस्थांना स्टँप ड्यूटी आणि प्राप्ती करातून सूट देण्यात आली. इ.स. १९०४ च्या कायद्याने स्थापन झालेली चळवळ प्राथमिक अवस्थेत व सहकार प्रणीत होती आणि संस्थेच्या वाढीबरोबर कायदा अपुरा पडू लागले. पतपुरवठा संस्था सोडून इतर सहकारी संस्थांचा विकास झाला नाही. इ.स. १९९२ मध्ये नवीन कायदा करण्यात आला. इ.स. १९१४ मध्ये सर इण्डी मॅक्लेगन यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. इ.स. १९१५ साली मुंबई येथे

सारस्वत को–ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीची स्थापना झाली. ही भारतातील पहिली गृहनिर्माण संस्था होती. १९१७ पासून सहकारी संस्थांच्या स्थापनेस सुरूवात झाली.[३८]

मुंबई प्रांताचा सहकार कायदा १९२५ मध्ये संमत झाल्याने सहकार हा विषय प्रांत सरकारकडे आला. त्यानंतर बंगाल, ओरिसा, मद्रास, बिहार या प्रांतांनी सहकार क्षेत्रातील आपल्या राज्यापुरते स्वतंत्र कायदे केले. याच काळात सहकारी पतपुरवठा संस्था शेती सहकारी संस्था आणि संस्थांची सुरूवात झाली. इ. स. १९३९ मध्ये महायुद्धामुळे अर्थव्यवस्थेमध्ये तेजी आली. शेतमालाच्या किंमती वाढल्या. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. सरकारी संस्थांची थकीत कर्जे वसुल होऊ लागली. यांचा सहकार चळवळीवर अनुकूल परिणाम झाला. या कालावधीत सहकारी संस्थांची संख्या पण हजारांनी वाढून ती १७२०० पर्यंत पोहोचली. सभासद संख्या ४३.६ लाखांवरून ९१.६ लाखांवर पोहचली. या काळात ग्राहक सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था व बिगर पतसंस्थाचा विशेष विकास झाला. ग्रामीण भागात सुद्धा बहुउद्देशीय संस्थांचा विकास झाला.[३९]

१९४४ साली केंद्र सरकारने प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली कृषी अर्थपुरवठा समिती नियुक्त केली. या समितीने अभ्यास करून अशी शिफारस केली की, कृषी पतपुरवठासाठी सहकारी संस्था उत्कृष्ट उपाय असून शासनाने अशा संस्थांना आर्थिक मदत केली पाहिजे. कृषी कर्जपुरवठा महामंडळ स्थापन करावे, अशीही शिफारस समितीने केली. १९४५ साली सरकारने श्री. आर. जी. सरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी नियोजन समिती नियुक्त केली. भारत सरकारने नियोजनबद्ध आर्थिक विकास घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले. १९५१ मध्ये ग्रामीण भागामध्ये होणाऱ्या कर्जपुरवण्याचा अभ्यास करून शिफारस करण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीची श्री. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती केली होती. इ.स. १९५४ मध्ये या समितीने आपला अहवाल सरकारकडे सादर केला. सदर अहवालात या समितीने असे मत नोंदविले की सहकार अयशस्वी ठरला आहे. तथापि तो यशस्वी झालाच पाहिजे. अशा रीतीने पंचवार्षिक योजनादरम्यान सहकार चळवळीचा पुढे विकास झालेला दिसून येतो.[४०]

पहिल्या पंचवार्षिक योजनेची सुरूवात १९५०–५१ मध्ये झाली. या योजनेमध्ये असे नमूद करण्यात आले की, नियोजनबद्ध आर्थिक विकासासाठी सरकार चळवळ हे महत्वाचे साधन

आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात केंद्रसरकारने समाजवादी समाजरचनेचे धोरण स्वीकारले. परिणामी सहकारी चळवळीस अति महत्व देण्यात आले. सहकार क्षेत्रासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये मात्र या चळवळीवर प्रत्यक्ष रू. ५७ कोटीची तरतूद करण्यात आली. १९९१ मध्ये सरकारने नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केला. भारताने जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्विकारले. व जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण ही तत्वे मान्य करण्यात आली. या पार्श्वभूमीवर सहकारी क्षेत्राने महत्वपूर्ण भूमिका पार पाडावी असे सरकारने स्पष्ट केले. १९९८ मध्ये शेती व ग्रामीण विकासाला प्राधान्य देण्याचा हेतूने नवव्या योजनेत सरकारी चळवळीच्या विकासावर भर देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. रोजगार निर्मिती आणि द्रारिद्र्यनिर्मूलन या हेतूने ग्रामीण विकासाला चालना देण्यात आली.[४१]

दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सहकारी चळवळीतील लोकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. मात्र सरकारने आर्थिक सुधारणांची प्रक्रिया सुरू केल्याने सहकारी चळवळीसमोर नवीन आव्हाने निर्माण झाली आहे. तक्ता क्र. १.१ मध्ये सहकारी संस्थाची प्रगती दिलेली आहे.

**तक्ता क्र. १.१ सहकारी संस्थाची प्रगती :–**

| | | |
|---|---|---|
| १. | प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था | ९५,६७० |
| २. | प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारे | २६,४२६ |
| ३. | घाऊक सहकारी ग्राहकसंस्था | ७१२ |
| ४. | सहकारी सुतगिरण्या | १५९ |
| ५. | सहकारी दुग्धसंस्था | १,०३,३०५ |
| ६. | नागरी सरकारी बँक | २,०५३ |
| ७. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ३६८ |
| ८. | राज्य सहकारी बँक | ३० |

| | | |
|---|---|---|
| ९. | प्राथमिक भूविकास बँक | ७३८ |
| १०. | सहकारी साखर कारखाने | २३८ |
| ११. | जिल्हा खरेदी–विक्री संघ | ३८८ |

संदर्भ :– दहावी पंचवार्षिक योजना २००२–२००७

तक्ता क्र. १.१ अनुसार मार्च २००२ मध्ये ९५६७० प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था होत्या. प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारे २६४२६, तर ग्राहक संस्था ७१२ होत्या. १५९ सहकारी सूतगिरण्या, १०३३०५ सहकारी दुग्धसंस्था होत्या, २०५३ नागरी सहकारी बँक व ३६८ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका होत्या व ३० राज्य सहकारी बँका होत्या. अर्थ सहकारी चळवळीचे भारतीय नागरी व सामाजिक जीवन व्यापले होते.

## १.९ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :–

महाराष्ट्र हे सहकार क्षेत्रातील पुढारलेले राज्य असून राज्यभरात सहकारी संस्थांचे मोठे जाळे पसरलेले आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला शंभर वर्षाहून अधिक काळाचा इतिहास आहे. इ.स. १८८९ मध्ये तेव्हाच्या मुंबई प्रांतात अन्यान्य साहाय्यकारी मंडळी या नावाची सहकारी संस्था प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी स्थापन केली. १९०५ मध्ये पहिली प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था धारवाड जिल्ह्यात कनगीहाळ येथे स्थापन झाली. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेची स्थापना १९२३ मध्ये झाली. या बँकेचे पुढे राज्य शिखर बँकेत रूपांतर होऊन ती सध्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड म्हणून कार्यरत आहे.[४२] मॅक्लागॉन समितीच्या शिफारशीवरून महाराष्ट्रामध्ये सहकारी पतपुरवठ्याबाबत त्रिस्तरीय रचना स्विकारलेली आहे. प्राथमिक स्तरावर प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था दुसऱ्या स्तरावर जिल्हा सहकारी बँक कार्य करते व वरच्या तिसऱ्या स्तरावर राज्य सहकारी बँक शिखर बँक म्हणून काम करते.

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये संमत झाला. या कायद्यानुसार सहकारी संस्थांचे नियमन व नियंत्रण केले आहे. सहकारी चळवळीच्या विकासामध्ये भारतात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आहे. सहकारी

साखर कारखानदारीच्या विकासामुळे महाराष्ट्रातील शेती क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली. यामुळे शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे शक्य झाले. महाराष्ट्रामध्ये कृषी सहकारी संस्था, बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, विपणन सहकारी संस्था, ग्राहक संस्था अशा विविध सहकारी संस्थांची स्थापना झाली. त्या यशस्वीपणे कार्यरत असल्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य शेतकरी नागरिक सहकारी संस्थेच्या संपर्कात आली. परिणामी सहकारी संस्थांचा विकास झाला.[४३]

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही डॉ. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलदास ठाकरसी, लालूभाई शामलदास, गोपालकृष्ण गोखले, आर. जी. रमैय्या, भाऊसाहेब हिरे, विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, भाऊसाहेब थोरात इ. सहकारी चळवळीच्या संस्थापक सदस्यांशी निगडित आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही प्रामुख्याने पुणे विभागात विकसित झाली. सुरूवातीला ही चळवळ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांशी निगडित होती. पुढे ही चळवळ शेतमाल प्रक्रिया सहकारी संस्था, शेतमाल विपणन सहकारी संस्था, ग्रामीण सहकारी उद्योगसंस्था, ग्राहक सहकारी संस्था, नागरी सहकारी बँका याही क्षेत्रांमध्ये विकसित झाली.[४४]

## १.१० महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती :-

तक्ता क्र. १.२ मध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळ माहिती दिलेली आहे.

| **अ. क्र.** | **प्रकार** | **वर्ष** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **१९६१** | **१९७१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** | **२००५** | **२०११** |
| १. | प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था | १८९९८ | २००१४ | १८३८९ | १९४९४ | २०५२४ | २१०३७ | २०४३० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | प्राथमिक सहकारी बँक | – | २६५ | ३४५ | ३८१ | ६५४ | ६३७ | ५४१ |
| ३. | पगारदार नोकरांची सहकारी संस्था | – | २२२० | ४१८७ | ६११७ | ७०७९ | ७१५६ | ७३१७ |
| ४. | नागरी पतपुरवठा सहकारी संस्था | – | ४९४ | ९५२ | ४७८४ | १४२७७ | १८३४९ | १५५७५ |
| ५. | प्राथमिक विपणन सहकारी संस्था | ३२७ | ३८४ | ३९१ | ९०१ | १०८८ | ९३३ | १४२१ |
| ६. | दुग्ध सहकारी संस्था | ४३१ | २०२१ | ७८१९ | १४२८४ | २२४६६ | २६४९९ | २७११० |
| ७. | प्राथमिक गृहनिर्माण सहकारी संस्था | १४९५ | ७४२५ | १५४६० | ३३९१३ | ५२३३० | ६३४७५ | ८५३३५ |
| ८. | पाणीपुरवठा सहकारी संस्था | ११९ | ३०१ | ११८८ | ३२२४ | ४७९६ | ८३०५ | १०१६२ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | कामगार सहकारी संस्था | ३७१ | १११५ | ३३३४ | ४४३४ | ८१२७ | १०१६३ | १११९३ |
| १०. | सहकारी साखर कारखाने | – | – | ८७ | १३८ | १९७ | २०२ | १६४ |
| ११. | सहकारी सूत गिरण्या | ०३ | – | – | १२५ | २३३ | २०१ | १५६ |

संदर्भ : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात – २०११

**तक्ता क्र. १.२ आधारे पुढील प्रमाणे निष्कर्ष मांडता येतात :–**

१. १९६१ मध्ये प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांची संख्या १८९९८ होती ती २०११ मध्ये १०७.५३ टक्क्यांनी वाढून ती २०४३० इतकी झाली.

२. प्राथमिक सहकारी बँका १९७१ मध्ये २६५ होत्या त्या २०११ मध्ये दुप्पट होवून त्या ५४१ झाल्या. पगारदार नोकरांची सहकारी संस्था नागरी पतपुरवठा संस्था यात १९७१ च्या तुलनेत ३२९ टक्के ३१५३ टक्क्यांनी वाढला.

३. प्राथमिक विपणन संस्थांमध्ये १९६१ मध्ये ३२७ वरून २०११ मध्ये १४२९ म्हणजे ४३७ टक्क्यांनी वाढला.

४. १९८१ मध्ये ८७ सहकारी साखर कारखाने होते. ते २०११ मध्ये १६४ म्हणजे १८८ टक्क्यांनी वाढले. याचप्रकारे महाराष्ट्रात प्राथमिक गृहनिर्माण संस्था, पाणी पुरवठा सहकारी संस्था, कामगार सहकारी संस्था व सहकारी सूत गिरण्या यांच्यामध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे.

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की महाराष्ट्रामध्ये क्षेत्रनिहाय सहकारी संस्थांची वाढ झाली आहे. १९६१ पासून २०११ पर्यंतच्या सहकारी संस्थांच्या संख्येमध्ये झालेल्या वाढीवरून असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळ विकसित झालेली आहे.

## १.११ महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे विविध क्षेत्रांवर झालेले परिणाम :–

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती जरी झाली असली तरी इ.स. १९२५ मध्ये मुंबई सहकारी संस्था कायदा संमत झाल्यानंतरच्या काळाचा विचार करता सहकारी चळवळीस गती प्राप्त होऊन आज जवळजवळ ८५ वर्षाचा काळ उलटला आहे. या काळात सहकारी चळवळीने कृषीक्षेत्र व कृषिव्यतिरिक्त इतर क्षेत्रेही व्यापलेले दिसून येतात.

### १. आर्थिक क्षेत्र :–

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी पतपुरवठा संस्था यामुळे शेतकऱ्यांना कमी व्याजाने व दीर्घ मुदतीचे कर्ज मिळणे शक्य होऊन खाजगी सावकारांकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक थांबली आहे.सहकारी चळवळीमुळे विशेषतः सहकारी साखर कारखान्यांची दिलेल्या उत्तजेनामुळे कुटीरद्योगांचा विकास झाला आहे. गोबर गॅस, संयंत्रे बांधणे, सुलभ शौचालये बांधणे, पशुखाद्य तयार करणे, दुभती जनावरे पाळणे, कोंबड्या पाळणे यासारख्या बाबींना उत्तेजन दिले आहे. वीजनिर्मिती पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, खरेदी–विक्री, पतपुरवठा, मद्य इतर रसायने, कागद यांसारखे अनेक लहानमोठे उद्योग वाढवून सहकारी संस्थांनी मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती साध्य केली आहे.

### २. शैक्षणिक क्षेत्र :–

राज्यातील सहकारी संस्थामार्फत व विशेषतः सहकारी साखर कारखान्यांमार्फत इंग्रजी व मराठी माध्यमांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, तंत्रशिक्षण संस्था व महाविद्यालये चालविली जात आहेत. इतकेच नव्हे तर काही साखर कारखान्यांची वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासास फार मोठा हातभार लागला आहे.

### ३. सामाजिक क्षेत्र :–

सहकारी संस्थांमुळे ग्रामीण जनतेमध्ये कर्तव्याची जाणीव निर्माण झाली आहे. सहकारी तत्वांमुळे समतेच्या तत्वास उत्तेजन मिळून सामाजिक दुःखे कमी झाली आहेत. जातिजातीतील विषमता कमी झाली आहे असे जरी असले तरी राज्यातील सहकारी संस्था व विशेषतः सहकारी

साखर कारखाने काही विशिष्ट भागातच एकवटलेले असल्याने विकासाचा समतोल साधला गेलेला नाही.

**४ राजकीय क्षेत्र :–**

सहकारी चळवळीचा राजकीय क्षेत्रावर फार मोठा परिणाम झाला आहे. सहकारी चळवळीतूनच महाराष्ट्राला नेतृत्व मिळाले आहे. राज्यातील सहकारी संस्थांवर राजकीय ताबा मिळणे प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले. राज्यतील सहकारी संस्था ज्या गटाच्या वा पक्षाच्या ताब्यात त्याच गटाच्या वा पक्षाच्या ताब्यात राज्याची सत्ता अशी समीकरणेही मांडली जाऊ लागली आहेत.[४५]

**प्रशिक्षण :–**

जर सहकारी संस्थांमध्ये गतिमान लोकशाहीवादी उपक्रमशील आणि सर्वसमावेशक नेतृत्व निर्माण झाले नाही तर सहकाराचा पायाच ढासळून जाईल, तेथेही पिळवणूक सुरू होऊन सहकारी नोकरशाहीला सगळी यंत्रणा बळी पडेल त्यासाठी सहकारी क्षेत्रात निरनिराळ्या संस्थात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावरही सरकारने भर दिला आहे. सहकारी व्यवस्थापन व संशोधन यातील राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च संस्था पुण्यात आहे. वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ को.–ऑप. मॅनेजमेंट पुणे तसेच राज्यात २ सहकारी महाविद्यालये व १३ सहकारी प्रशिक्षण केंद्र आहेत. शासकीय आणि अशासकीय कार्यकर्त्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याची योजना महाराष्ट्र राज्य सहकारी संघ हे राबवतात. ५ विभागीय सहकारी मंडळे व ३० जिल्हा सहकारी मंडळे यासाठी नियुक्त आहेत.[४६]

## १.१२ सहकारी चळवळी समोरील आव्हाने :–

१९९१ पासून भारतात सर्वत्र जागतिकीकरणाचे वेध लागले आहे. तेव्हापासून सहकारी चळवळीसमोर नव नवी आव्हाने उभी राहीली आहेत. उदारीकरणामुळे व्यापारी जगात स्पर्धा तीव्र झाली आहे. त्यामध्ये अकार्यक्षम सहकारी संस्था सहकारी तत्वांच्या माहितीचा अभाव, निष्क्रिय संस्थांची अधिक संख्या, प्रादेशिक असमतोल, वसुलीचा प्रश्न, संस्थांना बचतीच्या सवयीचा अभाव, अयोग्य कर्जवाटप पद्धती, भ्रष्टाचार, घराणेशाही, राजकीय दबाव इ. कारणांमुळे

अलिकडच्या काळात सहकारी चळवळीला घरघर लागली आहे. सहकार की स्वाहाकार ? सहकार सभासदांसाठी की बिगर सभासदांसाठी ? सहकारात दुर्बलांचा विकास की सबलांचा ? सहकार काही लोकांसाठी की सर्वांसाठी ? अशा अनेक एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे शोधताना आमच्यासमोर अनेक प्रश्नचिन्ह निर्माण होतात. गेली काही दशके सहकारी चळवळीवर अव्याहतपणे टीका–टीपण्णी सुरू आहे. सहकाराइतकी टीका कोणत्याही आर्थिक, समाजिक चळवळीवर झालेली नाही. तरीही सहकार चळवळ अजून टिकून आहे. सहकारी चळवळीवरील लोकांचा विश्वास पूर्णपणे उडालेला नाही. त्यासाठी सहकारी चळवळीला आशेचा किरण देणे आवश्यक आहे. खाऊजा धोरणामुळे जे नवीन आव्हाने सहकारी चळवळीसमोर उभी राहिली आहेत ही आव्हाने पेलण्यासाठी सहकाराची खरी गरज निर्माण झाली आहे. ज्याप्रमाणे १९५४ च्या ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समितीने गोरावाला समिती असे म्हटले होते की, सहकाराचा पराभव झाला असला तरी सहकार यशस्वी होणे जरूरी आहे. त्याचप्रमाणे सहकारी चळवळीसमोर अनेक आव्हाने उभी असली तरी ही आव्हाने समर्थपणे पेलणे आवश्यक झाले आहे.[४७]

महाराष्ट्र सहकार चळवळीबाबत अग्रेसर राज्य म्हणून जरी ओळखले जात असले तरी महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा विस्तार असमतोल झाला आहे. महाराष्ट्रातील काही भागातच राजकारणी लोकांच्या प्रभावामुळे सहकारी चळवळ रूजली आहे. तर काही भागात तिचा विस्तार पाहिजे तेवढ्या प्रमाणात झाला नाही. विशेषत: विदर्भात काही जिल्ह्यांचा अपवाद वगळता इतर जिल्ह्यांमध्ये सहकारी चळवळ अधिक प्रमाणात रूजली आहे असे चित्र दिसत नाही. सहकार चळवळीला भ्रष्टाचाराची लागण झाली आहे. घराणेशाहीचा उदय झाला आहे. त्याचा परिणाम म्हणून आजच्या स्थितीला सहकार म्हणजे स्वाहाकार अशी परिस्थिती उद्‌भवली आहे. अलीकडेच एप्रिल २०११ लोकमत या वृत्तपत्राने सहकार की स्वाहाकार नावाची लेखमाला प्रकाशित केली या लेखमालेमुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे.[४८]

महाराष्ट्रात सहकारी चळवळीने प्रगती केली आहे. जून २०१० मध्ये राज्यात २,२४,३०६ सहकारी संस्था होत्या. आता राज्यात अडीच लाखापेक्षा जास्त सहकारी संस्था आहेत. राज्याच्या अर्थव्यवस्थेत वा चळवळीला महत्व आहे. १९९१ नंतर भारताचे आर्थिक धोरण बदलले त्यानंतर सहकारी चळवळ अडचणीत येईल असेच अंदाज व्यक्त केले जात होते. काही अंशी ते खरे ठरले पण नव्या घटना दुरूस्तीने भारतीय अर्थव्यवस्थेतील या चळवळीची आवश्यकता अधोरेखित

केली आहे. सहकारी चळवळीने सहकारी समाजाची निर्मिती करावी अशी अपेक्षा आहे. सर्वसामान्यांनी एकत्र येऊन आपल्याकडेच भांडवल एकत्र करून परस्परांना साहाय्य करून आर्थिक, सामाजिक उन्नती घडवून आणणारी, जात आणि धर्म यातून निर्माण करणारी, शोषण आणि पिळवणूक थांबवून आर्थिक विकास साध्य करणारी, राजकीय हस्तक्षेपापासून अलिप्त असलेली सहकारी चळवळ निर्माण करण्यात भारतीयांना अद्याप यश आलेले नाही. घटना दुरूस्तीने, राज्याच्या अध्यादेशाने काही सकारात्मक बदल होती आणि या चळवळीला गती मिळून आपले उद्दिष्ट या संस्था गाठतील, अशी अपेक्षा आहे. केवळ कायद्याने हे साध्य होईल, असे नाही पण या कायद्याने सहकारी चळवळीला नवी दिशा दिली आहे हे निश्चित.[४९]

## १.१३ अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ :–

प्रस्तूत संशोधनाचा विषय अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास असा आहे. १८७५ च्या सुमारास पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सावकारांची घरे जाळण्याचा प्रयत्न केला. याचाच परिणाम ब्रिटीश शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी १८७९ मध्ये डेक्कन ॲग्रीकल्चररीस्ट रिलिफ ॲक्ट १८८३ आणि १८८४ ला ॲग्रीकल्चरल इम्प्रुव्हमेंट लोन्स ॲक्ट ॲग्रीकल्चरिस्ट लोन्स ॲक्ट पास केले. शेतकऱ्यांना अल्प व दिर्घ मुदतीचे कर्ज तगाईच्या स्वरूपात उपलब्ध करून दिले. प्रत्यक्षात मात्र ही दिली जाणारी कर्ज कमी स्वरूपाची होती. वारंवार पडणाऱ्या दुष्काळी परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी त्यावेळचे व्हाईसरॉय लॉर्ड कर्झनने १९०१ मध्ये फॅमिन कमिशन नेमले. या कमिशनने टंचाईग्रस्त भागाचा दौरा करून शिफारशी सुचविल्या. शेतकऱ्यांसाठी सुधारित बी–बीयाणे, अवजारे, कर्ज इ. सुविधा पुरवण्यासाठी सहकारी संस्था, सहकारी पतपेढ्या निर्माण केल्या पाहिजेत. या देशात सहकारी संस्था निर्माण करून त्यांची निकोप वाढ झाली पाहिजे तरच भरघोस यश प्राप्त होईल असे मत कमिशनने मांडले फॅमिन कमिशनच्या ज्या विविध शिफारशी होत्या. त्यावर आधारित १९०४ मध्ये हिंदुस्थान क्रेडिट सोसायटीचा कायदा पास केला व कायद्यातून सहकाराची मुहूर्तमेढ रोवण्यास मदत झाली. देशात सहकार विषयक पहिला कायदा १९०४ ला संमत करण्यात आला. १९१२ मध्ये को–ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट आमंलात आणला. तसेच १९१९ मधील जेम्स मॉटफोर्ड कायद्यानुसार सहकार खाते प्रांतिक शासनाकडे सुपूर्त करून त्यासाठी स्वतंत्र सहकार खाते

स्थापन करण्याची व स्वतंत्र नियम करण्याची परवानगी राज्यशासनास देण्यात आली. तसेच १९२५ मध्ये सहकारी सोसायटी कायदा पास केला. हे निरनिराळे कायदे सहकारी चळवळीबाबत करण्यात आले. सहकारी चळवळ शेती व्यवसायांचा विकास आणि त्याद्वारे ग्रामीण भागात विकास व्हावा या उद्देशाने सुरू करण्यात आली.

देशातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर लोणी येथे १९४९ मध्ये सुरू झाला. त्यानंतर अनेक राज्यात सहकाराची आगेकुच झालेली आहे. देशातील सहकार चळवळीत आज महाराष्ट्र आघाडीवर आहे. महाराष्ट्रात सहकारी संस्थाच्या चळवळीत जे खंबीर व गतीमान नेतृत्व लाभले त्यात गोपाळ कृष्ण गोखले, विठ्ठलदास ठाकरसी, न. चिं. केळकर, जी. के. देवधर, चुनीलाल मेहता, वैकुंठलाल मेहता, रमणभाई सरैय्या, विठ्ठलराव विखे–पाटील, धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, शरद पवार अशा धूरींनी महाराष्ट्रात सहकारी संस्थांनी चळवळ रूजविण्यासाठी नेटाने प्रयत्न केला.

अहमदनगर जिल्ह्यात सहकारी चळवळीचे साद पडसाद उमटले गेले. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीची परंपरा तशी जुनीच आहे. इ.स. १९०४ पूर्वी अहमदनगर जिल्ह्यातील कष्टाळू शेतकऱ्यांनी स्वतः होऊनच सहकाराचा स्वीकार केलेला आहे. कोपरगाव, राहूरी व श्रीरामपूर परिसरात शेतकरी फड पद्धतीने ऊसाची पिके काढीत होते. ही फड पद्धत म्हणजे ऊसाची सहकाराची शेती होती. कोणाची जमीन असते, कोणाचे बैल असतात. कोणी नुसतेच कष्ट, मशागत करतो व येईल ते उत्पन्न हिस्से पद्धतीने वाटून घेत असत. या फड पद्धतीत लिखित नियम नाही. सर्व काही रूढीला अनुसरून परस्परांच्या विश्वासाने चालते. हीच पद्धत सहकारी चळवळीचा पाया बनला होता.[५१] भिशी ही सहकाराची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत आहे. दि. ०१ ऑक्टोबर १९१० मध्ये कर्जत तालुक्यात पहिली सहकारी पतपेढी स्थापन झाली. इ.स. १९२१ मध्ये डॉ. मॅन यांनी अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यात सहकारी शेतीचा प्रयोग केला होता. नंतर श्रीरामपूर तालुक्यात सहकारी चळवळीस चांगले बाळसे प्राप्त झाले आहेत. त्या खालोखाल जिल्ह्यातील सर्व तालुक्यात सहकारी चळवळीने चांगलाच जोर धरला.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातल्या माणसांना सहकार चळवळ माहित झाली आहे. १९५२ ते १९७२ च्या काळात श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सहकारात घडत असलेल्या राजकीय नेतृत्वाचे परिवर्तन अचूक ओळखले होते. गावागावांतून निर्माण झालेल्या नव्या पिढीला सहकारात

योग्य ते स्थान दिले. सहकारी संस्थेमध्ये राजकीय नेतृत्व घडत होते. जिल्हा काँग्रेस, सहकारी संस्था, जिल्हा परिषदा अशा ठिकाणी नवे नेतृत्व दिसून आले. विशेषता:` नेतृत्व ग्रामीण भागाच्या आर्थिक कायापालट करणाऱ्या सहकारी क्षेत्रात आणि शेतीमालाच्या प्रक्रिया कारखानदारी सहकारी क्षेत्रात आढळते. स्वातंत्र्योत्तर काळात अहमदनगर जिल्ह्यात सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक परिवर्तन घडून आले आहे.[५२]

## १.१४ अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थाची स्थिती :-

अहमदनगर जिल्ह्यातील सन २००७-०८ मध्ये ९५३३ सहकारी संस्था होत्या. त्यांची माहिती तक्ता क्र. १.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १.३ अहमदनगर जिल्ह्यातील सन २००७-०८ मधील सहकारी संस्थाची स्थिती :-**

| अ.क्र. | संस्थांचे प्रकार | एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | कृषी सहकारी क्रेडिट संस्था (एकूण) | १३२९ |
| | १. ए.डी.सी.सी. बँक लि. | ०१ |
| | २. प्राथमिक कृषी क्रेडिट संस्था | १२८१ |
| | ३. कृषी सुविधा संस्था | ०१ |
| | ४. बहुउद्देशीय आदिवासी विकास सहकारी संस्था | ३८ |
| २. | बिगर शेती क्रेडिट सहकारी बँक (एकूण) | ११७९ |
| | १. शहरी बँक | २३ |
| | २. शहरी क्रेडीट संस्था | ३०९ |
| | ३. कामगार क्रेडीट संस्था | २०१५ |
| | ४. इतर बिगर क्रेडिट संस्था | ६३२ |

| | | |
|---|---|---|
| ३. | विपणन सहकारी संस्था (एकूण)<br><br>१. जिल्हा विपणन संस्था<br>२. प्राथमिक विपणन संस्था<br>३. इतर विपणान संस्था | ६२<br><br>०१<br>१४<br>४७ |
| ४. | प्रक्रिया संस्था (एकूण)<br><br>१. सहकारी साखर कारखाने<br>२. इतर कृषी प्रक्रिया संस्था<br>३. विणकार संस्था (हातमाग)<br>४. औद्योगिक वसाहत संस्था<br>५. इतर औद्योगिक संस्था<br>६. दुध संस्था<br>७. मासेमारी संस्था<br>८. उपसा सिंचन संस्था<br>९. इतर उत्पादन संस्था | ४४२३<br><br>१५<br>०६<br>०३<br>०७<br>८४<br>२७९९<br>६१<br>६१०<br>८३८ |
| ५. | सार्वजनिक सुविधा संस्था (एकूण)<br><br>१. ग्राहक संस्था<br>२. गृहनिर्माण संस्था<br>३. हंगामी कामगार सहकारी संस्था<br>४. इतर सहकारी संस्था | २५४८<br><br>६३<br>७२०<br>८२१<br>९४४ |
| **६.** | **एकूण** | **९५३३** |

संदर्भ

तक्ताच्या  आधारे पुढील स्थिती लक्षात येते.

अहमदनगर जिल्ह्यात एकूण ९५३३ सहकारी संस्था होत्या. पैकी प्रक्रिया संस्था ४४२३ (४४.२३%) आहेत. त्या खालोखाल सार्वजनिक सुविधा संस्था २५४८ (२५.४८%) आहेत.

तर कृषि सहकारी क्रेडिट संस्था १३२१ (१३.२१%) व बिगर शेती कृषी क्रेडिट सहकारी संस्था ११७९ (११.७९%) आहेत. पाथर्डी तालुका ऊसतोडणी कामगारांचे आगार, कष्टकरी व शेतमजुरांचा तालुका म्हणून ओळखला जातो. सहकार चळवळीमध्ये तालुक्यातील अनेकांनी स्वत:ला झोकून दिले. मढी या गावी १९१४ साली विविध कार्यकारी सेवा सोसायटीची स्थापना केली.

१९२३ साली श्रीरामपूर भागात नाऊर गावात पहिली सोसायटी स्थापन झाली. जगन्नाथराव बनकर यांचा पुढाकार होता. पुढे लगेचच खिर्डी, वांगी, गुजरवाडी येथे सोसायट्या स्थापन होऊ लागल्या. पहिली काही वर्ष त्याचां कारभार चांगला चालला. बॉम्बे प्रोव्हिन्शिअल बँकेचे अधिकारी सहकार्य करत परंतु सहकारी तत्वावर घेतलेल्या कर्जाची परतफेड मात्र अभावानेच वेळेवर होईल. पावसाची अनियमितता नेहमीच, झालेला दुष्काळ आणि शेतीचे कारण दाखवून घेतलेले कर्ज दुसऱ्यास कारणासाठी वापरण्याची प्रवृत्ती यामुळे आर्थिक संकट वाढले. सोसायट्या थकबाकीत जाऊ लागल्या. १९५०–५५ च्या काळात दक्षिण नगर जिल्ह्यातही स्थिती फारशी वेगळी नव्हती. कर्जत–जामखेड भागात आबासाहेब निंबाळकर, शेवगाव–नेवासा भागात मारूतराव घुले, श्रीगोंदा भागात बापूसाहेब नागवडे यांनी सहकारी धोरण अवलंबिले. १९५२ याच वर्षी दि. बॉम्बे प्रोव्हिन्शिअल को–ऑप. बँकेचे पुन्हा नामकरण झाले. पुढे याच बँकेचे रूपांतर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत १९६१ मध्ये झाले.[५३] राष्ट्र उभारणीच्याच काळात सहकारावर कमालीची निष्ठा असलेल्या अत्यंत संयमी व समंजस्य, सुसंस्कृत नेत्याची फळी जिल्ह्याच्या विकासासाठी झटू लागली. स्वतंत्र चळवळ हा नगर जिल्ह्यातील नेतृत्वाचा पहिला टप्पा मानला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच नेतृत्वाने सहकाराची कास धरून ग्रामीण विकासासाठी अहोरात्र जीवाचे रान केले. सहकाराची गंगा हाच जिल्ह्याच्या नेतृत्वाचा दुसरा टप्पा ठरला.

१९६५ मध्ये जिल्ह्याच्या सर्वांगीण विकास व शेती प्रक्रिया उद्योगासाठी जिल्हा सहकारी उद्योग मंडळ स्थापन करण्यात आले. इंडस्ट्रियल कमिशन म्हणून हे मंडळ ओळखले जाई. ही जिल्ह्याच्या कृषी औद्योगिकीकरणाची पर्यायाने सहकारी साखर कारखानदारीची पहिली पायरी ठरावी. सुरूवातीच्याकाळात साखर कारखानांच्या उभारणीबरोबरच भागभांडवलीसाठीही कर्ज उपलब्ध करून दिले. ऊसाचे व कारखान्याचेही कर्ज पुर्णत: सुरक्षित होते. मात्र त्यातून निव्वळ फायदा मिळविण्याचे धोरण तत्कालिन धुरीणांनी ठेवले नाही. वाढत्या व्यवसायातून साखर

कारखानदारीला अधिक प्रात्साहन मिळत गेले. जिल्हा बँकच्या या धोरणामुळेच साखर कारखान्याची उभारणी जिल्ह्यात होऊ शकली. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना, मुळा सहकारी साखर कारखाना, संगमनेर सहकारी साखर कारखाना असे एका पाठोपाठ एक सहकारी कारखाने जिल्ह्यात सुरू झाले. एकेका कारखान्याने त्या–त्या पुर्ण तालुक्याच्या अर्थव्यवस्थेला नवे परिमाण प्राप्त करून दिले.[५४]

सहकारी साखर कारखानदारीच्याच धर्तीवर १९६५–१९६६ च्या दरम्यान कापूस लागवड व जिनिंग प्रेसिंग मिल तसेच तेलबियांची लागवड आणि ऑइल मिल अशा प्रक्रिया सहकीर उद्योगांना चालना देण्याचा प्रयत्न केला. पद्मश्री विखे–पाटलांनी शेतीच्या विकासासाठी सहकार तत्वावर सोसायटी स्थापन केली. सहकार महर्षी वैकुंठभाई मेहता, अर्थतज्ञ धनंजयराव गाडगीळ अशा दिग्गजांच्या कल्पनेतून सहकार चळवळीने राज्यात जोर धरला होता. १९५० मध्ये पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगरला सुरू झाला व १९५७ मध्ये जिल्हा बँकेची स्थापना झाली. मुळ अहमदनगर हा अवर्षणग्रस्त जिल्हा आहे. ब्रिटीशांनी दुष्काळ सुसज्य करण्यासाठी जिल्ह्याच्या उत्तर भागाला गोदारवरी प्रवरा कॅनॉल्सची सुविधा निर्माण केली. स्वातंत्र्योत्तर काळात मुळा, कुकडी, घोड इ. धरणांची निर्मिती झाली. अनेक पाझर तलाव, लघुबंधारे योजना पुर्ण केल्याने शेतकऱ्यांना पाण्याचे महत्व व गरजेची जाणीव होत चालली आहे. अहमदनगर हा राजकीय व सामाजिक दृष्ट्या जागृत जिल्हा आहे. मागच्या पिढीतील पद्‌मश्री विखे पाटील, बाळासाहेब भारदे, डॉ. आण्णासाहेब शिंदे, आबासाहेब निंबाळकर, डॉ. बाबूराव दादा तनपूरे, मारूतराव घुले, दत्ताजी देशमुख, पंडितराव जाधव, शंकरराव कोल्हे, भाऊसाहेब थोरात, ग. रा. म्हस्के, मोतीलालजी फिरोदिया, शंकरराव काळे, बाळासाहेब विखे, यशवंतराव गडाख, खाताळ पाटील, सोले पाटील अशा धुरीणांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे.[५५]

सहकारी क्षेत्रात केदारेश्वर कारखाना–पाथर्डी, शेवगावच्या पूर्व भागात श्री. बबनराव ढाकणे यांच्या प्रयत्नाने बोधेगावात उभरण्यात यशस्वी झाला. जिल्ह्यात जिरायत भागातील कर्जत व पाथर्डी येथे सहकारी साखर कारखाने निर्माण करण्याचे प्रयत्न सर्वश्री आबासाहेब निंबाळकर व दादा पाटील राजळे यांनी सुरू केले. कर्जतच्या जगदंबा सहकारी साखर कारखाना व पाथर्डीच्या वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना उभा राहिला. अकोले तालुक्यातील साखर कारखाना उभारावा म्हणून सर्वश्री भाऊसाहेब हांडे, मधुकरराव पिचड व दादासाहेब रूपवते हे प्रयत्नशील होते.

आदिवासी भागातील अगस्ती सहकारी साखर कारखाना उभारणीस सभासद भाग भांडवल उभारणीस व अंतरिम कर्ज उपलब्ध करून देणेस जिल्हा बँकेने महत्वपूर्ण भूमिका बजावली व कारखाना उभारणीचे आदिवासी तालुक्याचे स्वप्न पूर्ण झाले.[५६]

भंडादरा धरणाला सुमारे ८० वर्षे होऊन गेली मात्र अकोले व संगमनेरच्या काही भागाला बरीच वर्षे त्याचे पाणी उचलता येत नव्हते. एकीकडे उपसा जिलसिंचन योजनांना कर्ज पुरवठा सुरू करतानाच पाणी उचलण्याच्या परवानगीसाठी राजकीय पातळीवर प्रयत्न सुरू होते. परस्पर पुरक अशा या घटनांमुळे अकोले व संगमनेर पाठोपाठ जिल्ह्याच्या इतर भागातही पाणी आले. पाटबंधाऱ्याच्या सोयीमुळे तब्बल ८ लाख ५० हजार हेक्टर क्षेत्र तर असंख्य व्यक्तीगत योजनांवर उर्वरित ८ लाख हेक्टर क्षेत्र आठमाही पाण्याने भिजू लागले. यासाठी कामगिरीसाठी मोठे श्रेय हे तालुक्यातील सहकारी नेतृत्वाकडे जाते. सामूहिक स्वरूपाच्या मोठ्या १४६ योजनांवर १४६ कोटी रूपये खर्च झाले. या योजना चालविण्यात पुढे काही अडचणीही निर्माण झाल्या. परंतु व्यक्तीगत स्वरूपाच्या या योजनांनी जिल्ह्यातील शेती व्यवसायाचे रूपच बदलून टाकले. राहुरी तालुक्याचा काही भाग व अकोले, संगमनेर, नेवासे, शेवगाव, श्रीगोंदे, पारनेर व कर्जत अशा तालुक्यातील लाखो हेक्टर क्षेत्र केवळ उपसा जलसिंचन योजनांमुळे ऊस उत्पादक बनले. या आठमाही वर्गातील हिरवा चाराही प्रचंड वाढला. ज्या योगे जिल्ह्यात हरितक्रांतीच्या बरोबरीने धवलक्रांती झाली. वाढलेला चारा लक्षात घेवून जिल्हा बँकेनेच दुभत्या जनावरांसाठी अर्थसहाय्य सुरू केले. आज राज्यात सर्वाधिक दुध संकलन करणारा जिल्हा म्हणून नगरकडे पाहिले जाते. दररोज सुमारे १७ लाख लिटर दुधाचे संकलपन आणि वार्षिक ६०० कोटींची उलाढाल ही या उपसा जलसिंचन योजनांनी झाली आहे.[५७]

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाना :-**

अहमदनगर जिल्ह्यात प्रामुख्याने सहकार क्षेत्राचा मोठा विकास झालेला आहे. त्यात सहकारी साखर कारखानदारीचा मोठा वाटा आहे. एकुण जिल्ह्यात २२ साखर कारखाने आहेत. त्यापैकी १७ सहकारी साखर कारखाने ५ खाजगी तत्वावर चालणारे साखर कारखाने आहेत. सातत्याने दुष्काळ असणारे कर्जत, श्रीगोंदा, पाथर्डी, पारनेर, अहमदनगर, शेवगाव तालुक्यात देखील सहकारी साखर कारखाने स्थापन झालेले आहे. आश्चर्याची बाब अशी दिसते की श्रीगोंदा

हा दुष्काळी तालुका गणला जातो. मात्र याच तालुक्यात एकुण ४ साखर कारखाने आहेत. कोपरगाव, राहाता नेवासा या दोन तालुक्यात प्रत्येकी २ सहकारी साखर कारखाने आहेत. (तक्ता क्र. १४) प्रत्येक साखर कारखान्यांची गाळप क्षमतेपेक्षा जास्त पटीने साखरेचे गाळप करत असताना दिसून येते. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यात सहकार क्षेत्राचा विस्तार मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येतो.[५८]

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांची वाढ राजकीय नेतृत्वाच्या प्रभावाखाली झाले आहे. प्रत्येक तालुक्याचा विचार केला तर राजकीय नेतृत्वामुळेच सहकारी साखर कारखाना उभा राहिलेला आहे. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर येथे स्थापन करून विठ्ठलराव विखेंनी सहकार चळवळीला सुरूवात केलेली आहे. त्यानंतर सहकारी साखर कारखाना उभारणीस इतर तालुक्यातील नेतृत्वाला चालना मिळाली व आज राज्यामध्ये अहमदनगर जिल्हा हा साखर कारखानदारीसाठी अग्रेसर आहे.[५९]

मधुकरराव पिचड यांनी स्थापन केलेला अगस्ती सहकारी साखर कारखाना लि. अकोले सहकारी चळवळीमध्ये मोठे योगदान आहे. कामगारांच्या संख्येचा विचार केला तर २३१ नियमित कामगार व ४४४ कामगार हे हंगामी कामगार आहेत. म्हणजेच ४४४ लोकांना रोजगारांचे साधन उपलब्ध झालेले आहे. आदिवासी नेतृत्व मधुकर पिचड यांच्या योगदानामुळे रोजगार निर्मितीचे साधन बनले आहे. आदिवासी परिसरातील साखर कारखाना सिंचन क्षेत्राचा विकास आणि पाण्याची उपलब्धता यामुळे सातत्याने व्यवस्थितरित्या चालवण्यात आलेला आहे.[६०]

संगमनेर तालुक्यातील भाग सहकारी साखर कारखाना हा भाऊसाहेब थोरात यांनी १९९७ साली स्थापन केला. हा साखर कारखाना स्थापन करण्यात विठ्ठलराव विखे पाटील आणि भाऊसाहेब थोरात या दोन नेतृत्वाने पुढाकार घेत सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली आहे. रोजगार निर्मितीचा विचार केला तर ८६५ नियमित रोजगार आहेत. संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याची निर्मिती हा संगमनेर अकोले सिन्नर तालुक्यातील विकासाच्या चळवळीचा महत्वाचा टप्पा आहे. प्रारंभी केवळ ८०० टनी दैनिक गाळप क्षमता असलेला संगमनेर साखर कारखान्याची आजची गाळप क्षमता प्रतिदिनी ८,७३,३९६ मे. टन आहे. आज जिल्ह्यात सर्वात जास्त साखरेचे उत्पादन १,०१,९९६ मे. टन हे संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्यात आहे.[६१]

ऊस उत्पादक शेतकऱ्याला ऊसाला अधिकाधिक भाग दिला जावा म्हणून साखर कारखानदारी बरोबरच पुरक उद्योग उभारलेले आहेत. अर्क शाळा प्रकल्पातून निघणाऱ्या प्रदुषित पाण्यापासून वीजनिर्मिती केली जात आहे. ऊस गाळून झाल्यानंतर उरलेल्या चोथ्यापासून कागद तयार करण्यासाठी राजहंस कागद प्रकल्प उभारलेला आहे. भाऊसाहेब थोरात यांनी उभारलेल्या सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन हे १९८० नंतर भाऊसाहेब यांचे चिरंजीव बाळासाहेब थोरात हे करत आहेत. सहकारी साखर कारखान्यावर संचालक मंडळाच्या रूपाने थोरात घराण्याचे वर्चस्व राहिले आहे.

कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि. कोळपेवाडी या साखर कारखान्याची स्थापना शंकरराव काळे या नेतृत्वाच्या पुढाकाराने १९५६ साली करण्यात आली. १९७६ साली कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या आवारात आसवानी प्रकल्प (डिस्टिलरी) उभारला आहे. ऊसाच्या बगॅसपासून क्राफ्ट पेपर म्हणजे कागदनिर्मितीचा प्रकल्प सुरू केला आहे. कागदनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करावी लागते. पर्यायाने राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होते म्हणून पर्यावरणाचा तोल बिघडू नये म्हणून हा प्रकल्प राष्ट्रीय पातळीवर पारितोषिके व प्रमाणपत्र मिळाली आहे. शंकरराव काळे यांनी पुढाकार घेऊन बायोगॅस प्रकल्प सुरू केला आहे. बायोगॅस प्लॅन्टमधून शेवटच्या टप्प्यात बाहेर पडणारा स्पॉवॉश प्रेसग्रेडमध्ये मिसळून कंम्पोस्टिंग फर्टिलायझर बनविण्याचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. शंकरराव काळे यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव अशोक काळे यांचे नेतृत्व हे या साखर कारखान्यावर प्रस्थापित झाले आहे.[६२]

संजीवनी सहकारी साखर कारखाना लि. कोपरगाव या साखर कारखान्यावर कोल्हे आणि काळे गटाचे वर्चस्व होते. कारखाना परिसरात विविध प्रकल्प उभारण्यात आले आहे. १९८५ मध्ये ॲसिटिक ॲसिड पासून इथाईल ॲसिडची निर्मिती सुरू केली आहे. त्यानंतर मळीपासून अल्कोहोल तयार करण्यासाठी १९८६ साली डिस्टिलरी म्हणजे अल्कोहोल प्रकल्प उभारलेला आहे. बायोगॅस सहवीज निर्मिती प्रकल्पही संजीवनी साखर कारखान्याने सुरू केला आहे. देशात सहकारी क्षेत्रात अशाप्रकारे विविध केमिकल्स उत्पादने, औषधी उत्पादने, बायोगॅस व उसाचे चिपाडापासून सहवीज निर्मिती करणारा संजीवनी कारखाना देशातील साखर कारखानदारीसाठी आदर्श ठरला आहे. संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन हे बिपीन कोल्हे आहेत. ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सचिव व अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक आहेत.[६३]

सहकारी चळवळीच्या माध्यमातून अर्थव्यवस्था शेती शक्तीला आधार देण्यामध्ये विखे घराण्याचे मोठे योगदान आहे. मळीपासून अल्कोहोल, इथेनॉल कचऱ्यापासून बायोगॅस वीजनिर्मिती, खतप्रकल्प अशी विविध प्रकल्प राबविली जाता. विखे पाटील घराण्यात बाळासाहेब विखे पाटील यांच्यानंतर राधाकृष्ण विखे व त्याचे चिरंजीव सुजय विखे यांनी साखर कारखान्यावर वर्चस्व मिळवले आहे. राहाता तालुक्यातील गणेश सहकारी साखर कारखानाची स्थापना १९५६ साली विठ्ठलराव विखे यांच्या पुढाकाराने करण्यात आलेली आहे. या साखर कारखाना राजकारणात कोपरगाव तालुक्यातील कोल्हे घराणे व काळे घराणे या घराण्याने विखे पाटील घराण्यातील नेतृत्वाला सातत्याने विरोध करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू हा साखर कारखाना पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखान्याने सहभागी करार तत्वावर चालवण्याच्या अटींवर घेतलेला आहे. त्यामुळे विखे पाटील घराण्याच्या नेतृत्वाचे वर्चस्व या साखर कारखान्यावर राहिलेले आहे.[६४]

अशोक सहकारी साखर कारखाना १९५२ मध्ये माजी आमदार भास्करराव गलांडे यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आला आहे. या साखर कारखाना स्थापन करण्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्याचे ध्येय पुर्ण झाले आहे. १९७० मध्ये साखर कारखान्यावर सत्तञ्ज ही गोविंदराव आदिक यांच्याकडे होती. १९७३ ते १९८३ या दहा वर्षाच्या काळात साखर कारखान्याचे अध्यक्ष होते. साखर कारखान्यातील अंतर्गत संघर्षामुळे १९८४ ते १९८७ या काळात प्रशासकाच्या नियंत्रणाखाली साखर कारखाना राहिला. १९८७ पासून भानुदास मुरकुटे घराण्याचे वर्चस्व कायम आहे.[६५]

मुळा सहकारी साखर कारखाना हा यशवंतराव गडाख यांच्या पुढाकाराने १९७० साली उभारण्यात आला. या साखर कारखान्याचे संस्थापक संचालक यशवंतराव गडाख हे आहेत. मुळा सहकारी साखर कारखाना लि. सोनई या कारखान्याच्या माध्यमातून विविध विकास योजना राबविल्या जात आहेत. मुळा एज्युकेशन सोसायटी कामगार व सामाजिक उपक्रम, सिंचन विकास प्रकल्प, उपपदार्थ प्रकल्प, अनुसूचित जाती–जमाती विकास कार्यक्रम, मुळा सहकारी बँक, मुळा उद्योग समुह यामुळे ग्रामीण भागात आर्थिक सामाजिक व शैक्षणिक विकास झाला आहे. यशवंतराव गडाख यांनी स्थापन केलेल्या संस्था पुढे त्याचे वारसदार शंकरराव गडाख व प्रशांत गडाख चालवत आहेत.[६६]

नेवासा तालुक्यातील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना भेंडा हा दुसरा साखर कारखाना आहे. १९७५ मध्ये मारूतराव घुले यांच्या पुढाकाराने कारखाना उभारण्यात आला. साखर कारखाना उभारणीपासून या साखर कारखान्यावर घुले घराण्याची सत्ता राहिलेली आहे.[६७] घुले घराण्याने सहकार चळवळीतून शैक्षणिक, सामाजिक, राजकीय विकासाचे दालन खुले केले आहे. साखर कारखान्याने आर्थिक विकास घडवून आधुनिक यंत्रसामुग्री व तंत्रज्ञानाचा वापर करून कारखाना कार्यक्षमता वाढविली आहे. या तांत्रिक क्षमतेबरोबर कार्यक्षेत्रातील शेतीविकास दुग्ध व्यवसाय साखर उद्योगास पुरक उद्योग, शैक्षणिक कार्य, कामगार संघटना, कृषि विज्ञान फार्म व विविध योजना उपसा जलसिंचन योजना धरणग्रस्तांसाठी विविध विकास योजना श्री. मारूतराव घुले पाटील गृहनिर्माण संस्था अशा कारखाना पुरक योजना राबविल्या आहेत. हे कार्य पुढे मारूतराव घुले यांचे चिरंजीव नरेंद्र घुले व चंद्रशेखर घुले चालवित आहेत.

अहमदनगर जिल्हा राजकारणात सहकार नेतृत्व यशस्वी होण्याची एक स्पर्धा चालु आहे या स्पर्धेत मागे राहणार नाही असे नेतृत्वाच्या कल्पनेतून हा साखर कारखाना उभारणी करताना भौगोलिक स्थान आणि सभासद यांचा ताळमेळ घालावा लागतो. साखर कारखाना उभारण्याचा असाच प्रयत्न जनता दलाचे नेतृत्व बबनराव ढाकणे यांनी केला. पाथर्डी तालुका हा अत्यंत दुष्काळी भाग आहे. त्यामुळे साखर कारखान्याला पाहिजे त्या प्रमाणात यशस्वी करता आले नाही. त्यामुळे काही वर्षे हा साखर कारखाना बंद पडू नये म्हणून कमी गाळप करण्यात आले आहे. परिणामी कारखाना व्यवस्थापन बिघडलेले दिसते. दुष्काळी भागात साखर कारखाना उभारून ग्रामीण विकास घडवून आणणे हा खुप मोठा प्रयत्न बबनराव ढाकने यांनी केलेला दिसून येतो.[६८]

पाथर्डीसारख्या दुष्काळी डोंगराळ दुर्गम आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या भागाचा विकास व्हावा तालुक्याची प्रगती व्हावी म्हणून वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी दादा पाटील राजळे यांना महाराष्ट्राची माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक, मुख्यमंत्री वसंतदादा पाटील व माजी केंद्रीय कृषीमंत्री डॉ. आण्णासाहेब शिंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. १९७६ मध्ये वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना स्थापन केला. दादा पाटील राजळे यांनी कारखान्याचे सभासद व कामगार यांच्या सुखसोयीसाठी प्रयत्न केले आहे. कारखान्याच्या माध्यमातून परिसरातील सुशिक्षित तरूणांना रोजगाराची संधी उपलब्ध केली. कामगारांना प्रशिक्षण दिले जाते. वेळोवेळी

पगारवाढ करणे, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे म्हणून राष्ट्रीय साखर कामगार संघटना स्थापण्यात आली आहे. बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जातो. ऊस तज्ञांना कारखान्यावर आणून प्रत्यक्ष कृतीद्वारे शेतकऱ्यांसाठी मेळावे परिसंवाद याचे आयोजन केले जाते. कामगारासाठी कामगार पतसंस्था व शेतकरी कामगारांच्या हितासाठी आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली आहे. दादा पाटील राजळे यांनी दुष्काळी भागात कारखाना उभा करून तालुक्याच्या सर्वांगिण विकासात मोठी भर टाकलेली आहे. हे कार्य पुढे राजळे घराण्याचे वारसदार आप्पासाहेब राजळे व तिसरी पिढी राजीव राजळे व मोनिका राजळे करत आहेत.[६९]

अहमदनगर तालुक्यातील दादा पाटील यांच्या पुढाकारातून २००१ मध्ये नगर सहकारी साखर कारखाना उभारणी करण्यात आली. मात्र साखर कारखाना व्यवस्थापन प्रभावी व प्रयत्नशील अपेक्षित होते ते मिळाले नाही परिणामी साखर कारखाना भागामध्ये शेती विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही.[७०] पारनेर सहकारी साखर कारखान्याची उभारणी १९८२ मध्ये बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुढकाराने करण्यात आली. या साखर कारखान्याचे पहिले अध्यक्ष बाळासाहेब भगत होते. १९८५ मध्ये साखर कारखान्याची पहिली सार्वत्रिक निवडणुक घेण्यात आली. या साखर कारखान्यावर बाळासाहेब ठुबे पाटील यांच्या वर्चस्वाखालील पॅनल विजयी झाला. बाळासाहेब ठूबे पाटील हेच या निवडणुकीनंतर चेअरमन झाले. साखर कारखान्यातील गैरव्यवस्थापन व कर्जाच्या बाजामुळे कारखाना माजी खासदार विदूरा नवले यांनी विकत घेतला आहे. जगदंबा सहकारी साखर कारखाना लि. राशीन कर्ज या साखर कारखान्याची उभारणी १९७० साली आण्णासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. मात्र साखर कारखाना बंद करण्यात आला आहे.[७१]

अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागामध्ये सहकार, शिक्षण, कृषी, सामजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये शिवाजीराव नागवडे यांचे योगदान मोलाचे आहे. श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याची उभारणी १९६५ मध्ये शिवजीराव नागवडे, आबासाहेब निंबाळकर, खासेराव वाबळे, रंगराव पंधरकर यांच्या पुढाकारातून करण्यात आली आहे. सहकारी साखर कारखाना, सहकारी दूधसंघ, छत्रपती शिवाजी शिक्षणसंस्था, ज्ञानदीप शिक्षणसंस्था आदि संस्थांच्या माध्यमातून सहकाराचे मोठे कार्य शिवाजीराव नागवडे व त्यांचे चिरंजीव राजेंद्र नागडे पुढे चालवत आहे. श्रीगोंदा तालुक्याचा काही भाग दुष्काळग्रस्त येतो. कुकडी सहकारी साखर कारखान्याची स्थापना १९९७

साली झाली. कुंडलिकराव जगताप यांच्या पुढाकाराने साखर कारखाना उभारलेला आहे. साखर कारखान्याच्या उभारणीनंतर त्याला पुरक असे अनेक लघु उद्योग कारखान्याच्या परिसरात उभे केले आहेत. जगताप घराण्याचे वारसदार राहुल जगताप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार असून या युवा नेतृत्वाचे या साखर कारखान्यावर वर्चस्व राहिलेले आहे. साखर कारखाना हा उत्तम व्यवस्थापन आणि नियोजनामुळे शिस्तबद्ध चालू आहे.[७२]

**तक्ता क्र १.४ जिल्ह्यातील साखर कारखाने विषयक माहिती :–**

जिल्हा–अहमदनगर संदर्भ वर्ष – २०१५–१६

| अ.क्र. | तालुका | साखर कारखान्याचे नाव | सहकारी / खाजगी | कामगार (संख्या) | | गळीत क्षमता मे. टन | प्रत्यक्ष गाळप मे. टन | साखरेच `उत्पादन मे. टन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नियमित | हंगामी | | | |
| १. | अकोले | अगस्ती सह.सा.का.लि. अकोले | सहकारी | २२३ | ४१० | २५०० | ४५१९३० | ५१०८६ |
| २. | संगमनेर | संगमनेर भाग सह.सा.का.लि. , संगमनेर | सहकारी | ८६५ | २५३ | ३५०० | ८७३३९६ | १०१९९६ |
| ३. | कोपरगाव | कोपरगाव स.सा.का.लि., कोपरगाव | सहकारी | ३७५ | ५७७ | ४००० | ४९२४०७ | ५२४८० |
| ४. | कोपरगाव | संजीवनी स.सा.का.लि., कोपरगाव | सहकारी | ७७३ | ३८७ | ४५०० | ५५०६१० | ५८६७० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | राहाता | पद्मश्री विखे सह.सा.का.लि., प्रवरानगर | सहकारी | ४६५ | ६५८ | ५००० | ७८९०९१ | ९३९८५ |
| ६. | राहाता | गणेश स.सा.का.लि., गणेशनगर | सहकारी | १६५ | ५६० | १७५० | ३२३०६५ | ३६९०० |
| ७. | श्रीरामपुर | अशोक सह.सा.का.लि., अशोकनगर | सहकारी | ३९६ | ६२६ | २८०० | ४९६३३९ | ५४७७५ |
| ८. | नेवासा | मुळा स.सा.का.लि., सोनई | सहकारी | २६८ | ८१६ | ५००० | ६९१९३४ | ७२९२० |
| ९. | नेवासा | ज्ञानेश्वर स.सा.का.लि., भेंडा | सहकारी | ३२२ | १०५६ | ६००० | ८०६७२४ | ८३७८० |
| १०. | शेवगाव | केदारेश्वर सह.स.का.लि., शेवगाव | सहकारी | २२० | २५८ | २५०० | ४४१८६ | ३५३५ |
| ११. | पाथर्डी | वृद्धेश्वर स.सा.का.लि., तिसगाव | सहकारी | १७२ | २०२ | २५०० | २३४४८५ | २३७३० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | नगर | पियुष स.सा.का.लि., वाळकी | सहकारी | ६८ | ० | २५०० | ६९५१ | ३१६ |
| १३. | राहुरी | तनपुरे स.सा.का.लि., राहुरी फॅक्टरी | सहकारी | ० | ० | ० | ० | ० |
| १४. | पारनेर | पारनेर स.सा.का.लि., देवीभोयरे | सहकारी | १५५ | १७८ | १२५० | १२८७५५ | १४२१७ |
| १५. | श्रीगोंदा | स.शि.ना. नागवडे स.सा.का.लि. | सहकारी | १४२ | ३०३ | ५००० | ५६४६५७ | ६२७१२ |
| १६. | श्रीगोंदा | साईकृपा १ सा.का.लि. देवदैठण | सहकारी | १२० | १५० | १२५० | १७५१६४ | १८५३० |
| १७. | श्रीगोंदा | कुकडी स.सा.का.लि., पिंपळगाव पिसा | सहकारी | ११६ | ४०८ | ३५०० | ५१८८४६ | ५५६२० |
| १८. | श्रीगोंदा | साईकृपा २ सा.का.लि., हिरडगाव | खाजगी | ० | ० | ० | ० | ० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९. | कर्जत | अंबालिका सा.का. राशीन | खाजगी | ४५१ | १२० | ७५०० | १०७७७१७ | १२५१५० |
| २०. | शेवगाव | गंगामाई स.सा.का. शेवगाव | खाजगी | २०६ | ३२१ | ५५०० | ६२५१३३ | ६२६३० |
| २१. | राहुरी | प्रसाद स.सा.का. राहुरी | खाजगी | २२३ | २०७ | २५०० | २५८३१३ | २६४२२ |
| २२. | जामखेड | जय श्रीराम स.सा.का. जामखेड | खाजगी | ११० | २५० | २००० | १७१६३९ | १७९१० |

संदर्भ – प्रादेशिक सहसंचालक (साखर) अहमदनगर

**सहकारी दुग्धव्यवसाय :–**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांकडे जोडधंदा सुरू झाले पाहिजेत म्हणून सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील यांनी जोरदार प्रयत्न केला. त्यांनी हा व्यवसाय सहकारी क्षेत्रात सुरू करण्याचा प्रयत्न केला. पश्चिम महाराष्ट्रात दूधाचा धंदा मोठ्या प्रमाणात सुरू झाला त्यानंतर अहमदनगर, पुणे, नाशिक, सातारा, सोलापूर मध्ये दूध व्यवसायाला सुरूवात झाली. त्यामुळे या भागातील शेतकरी दुष्काळाला तोंड देऊ शकला व त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत करू शकला. ज्या भागात हा धंदा वाढला नाही तो भाग विदर्भ, मराठवाडा येथील शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचे प्रमाण सिद्ध झाले आहे. इतके महत्व या पुरक दूध व्यवसायाला आले आहे. दूध उत्पादनात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. जिल्ह्यात १२ दूध शितकरण केंद्रे आहे. या शितकरण केंद्रातील दूध मुंबई, पुणे येथे पाठवले जाते. साहजिकच यामुळे मोठा रोजगार प्राप्त झाला आहे.[७३]

अहमदनगर जिल्ह्यात २०१५-१६ या वर्षांत ९३९ इतक्या दुधसंस्था आहेत. या सहकारी दुधसंस्थामार्फत वर्षात २,११,५५३ लाख लिटर दुध संकलन केले जाते. अहमदनगर जिल्ह्यातील सर्वांत जास्त संगमनेर तालुक्यात दुग्ध विकास सहकारी संस्था आहेत. जिल्ह्याचे सहकारी दुध संघाच्या संकलनापैकी ४७ टक्के दूध संकलन संगमनेर दूध संघाने केलेले आहे. दूध संघाचे संस्थापक भाऊसाहेब थोरात यांनी १९७७ मध्ये संगमनेर तालुका सहकारी दुध संघाची स्थापना केली आहे.[७४]

९ जून २०११ रोजी दै. पुढारी या वृत्तपत्रामध्ये लेख प्रसिद्ध झालेला असून दूध संकलनात संगमनेरची आघाडी या मथळ्याखाली जिल्ह्यातील तालुकानिहाय दूध संकलनाची आकडेवारी प्रसिद्ध केलेली आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे कि साखरे बरोबरच दूध उत्पादनात आघाडीवर असलेल्या नगर जिल्ह्यात एकूण दूध संकलनात संगमनेरचा वाटा सुमारे १३ टक्के म्हणजेच सर्वाधिक आहे. जिल्ह्यात दररोज सुमारे २२.५ लाख लिटर्स दूध संकलन होते. त्यापैकी संगमनेर तालुक्यात सर्वाधिक ३ लाख ६५ हजारांपर्यंत दूध संकलन होत आहे.[७५]

अकोले तालुक्यात दुग्ध विकास सहकारी संस्था १४४ इतक्या आहेत. जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर अकोले तालुका आहे. आदिवासी परिसरातून मोठ्या प्रमाणावर दूध संकलन केले जाते. याचे श्रेय मधुकरराव पिचड यांना जाते. तालुक्यात एकूण दूध सहकारी संस्थांच्या सभासद संख्या ७,४८८ आहे. जिल्ह्यात एकमेव तालुक्यात २ शीतगृह आहेत.[७६]

१९७६ मध्ये शंकरराव कोल्हे यांनी गोदावरी खोरे सहकारी दूध उत्पादक संघाची स्थापना केली. दरताशी १५,००० लिटर दूधाचे शीतकरण करणारा हा प्लँट आहे. तर ताशी १०,००० लिटर दूध निर्जंतुकीकरण करण्याचा प्लँट आहे. १९७६ साली या दूध संघाची वार्षिक उलाढाल २० लाखांची होती. १९८९ मध्ये १३.५० कोटींची झाली आणि १९९१-९२ साली दूध संकलन वार्षिक २ कोटी लिटर एवढे होते. कोपरगाव तालुक्यात २०१५-१६ मध्ये ११६ दूध संकलन संस्था आहेत. ६०३२ एकूण सभासद संस्था आहे. जिल्ह्यात सर्वांत कमी दूध संकलन कर्जत तालुक्यात आहे. कर्जत तालुक्यामध्ये दूध उत्पादकांनी सहकारी संस्थांना दूध टाकणे बंद केल्यामुळे रकाना ६ मध्ये २ एवढीच संख्या दिसते.[७७]

नेवासा तालुक्यात दुग्धविकास सहकारी संस्थांची संख्या ३० आहे. यशवंतराव गडाख यांनी नेवासा तालुका सहकारी दूध व्यावसायिक संघ लि. सोनई येथे स्थापना केली आहे. या

प्रकल्पामध्ये प्रतिदिनी ४५००० लिटर दूध संकलित केले जाते. त्यावर प्रक्रिया करून ते दूध महानंदा, रूची सोमाग्रुप भोपाळ, महाराष्ट्र शासन मिल्क फेडरेशन, तिरूअनंतपुरम, आंध्रप्रदेश डेअरी, हैद्राबाद यांच्याकडे पाठविले जाते. दूध उत्पादन योजना राबवून १६ बल्क कुलर्स कार्यान्वित करून ४५००० लिटर्स दूधापैकी २०००० लिटर्स थंड दूध संकलित केले जाते.[७८]

अहमदनगर जिल्ह्यात सहकारी दूध संघाने दूध संकलन कमी होत आहे. खाजगी दूध संघाचा विकास जोमाने होत आहे. अशी परस्परविरोधी स्थिती दूध व्यवसायात दिसत आहे. जिल्ह्यातील एक तृतीयांश पेक्षाही जास्तीचा वाटा खाजगी संघाचा दिसतो. जिल्ह्यात सध्या १३९ खाजगी संघ असुन २०११ मध्ये प्रतिदिनी १५ लाख ९८ हजार ४०७ लिटर्स दुध संकलन झाले आहे. तर १५ सहकारी संघाचे दुध संकलन फक्त ५ लाख ८३ हजार ८२० लिटर्स झालेला आहे. २०१२–१३ या वर्षी दुग्धविकास सहकारी संस्थांची संख्या २९७४ एवढी होती. मात्र ती संख्या २०१४–१५ मध्ये १३९ कमी झालेली दिसते. अहमदनगर जिल्ह्यातील एक दूधसंघ आहे. सरकारी अनुदान या दुधसंघास मिळते. परंतु संगमनेर राहाता प्रवरानगर राहुरी, कोपरगाव, श्रीगोंदा येथे खाजगी दुधसंस्था आहेत. बाळासाहेब विखे पाटील, बाळासाहेब थोरात, प्रसाद तनपुरे, बबनराव पाचपुते यांनी १५ दुधसंस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यात आर्थिक जाळे तयार केले आहे.[७९]

**तक्ता क्र. १.५ दुग्धविकास सहकारी संस्था :–**

जिल्हा – अहमदनगर संदर्भ वर्ष : २०१५–१६

| अ. क्र. | तालुका | दुग्ध विकास सहकारी संस्थांची संख्या | त्यांची एकूण सभासद संख्या | वर्षभरातील संकलित केलेले दूध | | शीतगृहांची संख्या | शीतगृहांची क्षमता (००० लि.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण (०००लि.) | प्रतिदिन (सरासरी ०००लि.) | | |
| **१.** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १. | अकोले | १४४ | ७४८८ | २२१६२ | ६१ | २ | ६० |
| २. | संगमनेर | २१३ | ११०७६ | १०६७२ | २९१ | १ | ३०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | कोपरगाव | ११६ | ६०३२ | २६६८२ | ७३ | १ | १०० |
| ४. | राहाता | ८४ | ४३६८ | २१३७६ | ५९ | १ | ११५ |
| ५. | श्रीरामपुर | ३४ | १७६८ | २१३२ | ६ | १ | १० |
| ६. | नेवासा | ३० | १५६० | ८३०५ | २३ | १ | ४० |
| ७. | शेवगाव | ३३ | १७१६ | ३३९८ | ९ | १ | १० |
| ८. | पाथर्डी | ३३ | १७१६ | २६४४ | ७ | १ | १० |
| ९. | नगर | ४८ | २४९६ | ९६३ | ३ | १ | १०० |
| १०. | राहुरी | ३८ | १९७६ | ६७२९ | १८ | १ | ३० |
| ११. | पारनेर | ५० | २६०० | ४६६० | १३ | ० | ० |
| १२. | श्रीगोंदा | ३८ | १९७६ | ४१३८ | ११ | १ | १० |
| १३. | कर्जत | ४८ | २४९६ | ६९५ | २ | ० | ० |
| १४. | जामखेड | ३० | १५६० | १५९७ | ४ | ० | ० |
| | **एकूण जिल्हा** | **९३९** | **४८८२८** | **२११५५३** | **५८०** | **१२** | **७८५** |

आधार :– जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी अहमदनगर

**शिक्षण संस्था :–**

मुंबई, पुणे नंतर ग्रामीण भागात शिक्षणाचे हक्काचे माहेर घर म्हणजे अहमदनगर जिल्हा ओळखला जाऊ लागला आहे. अहमदनगर जिल्ह्याची एक वेगळी ओळख निर्माण होत आहे. जिल्ह्यातील शिक्षण संस्थांनी शिक्षणाचा वारसा पुढे सुरू ठेवला आहे. प्राथमिक, माध्यमिक, पदवी, पदविका, इंजिनिअरींग, वैद्यकीय, व्यवस्थापन शास्त्र, वास्तुविशारद अभ्यासक्रम यासह आयटीआय तंत्रशिक्षण, स्पर्धापरिक्षा मार्गदर्शन केंद्राच्या संस्थेत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.[८०]

अहमदनगर जिल्ह्यामध्ये विविध प्रकारच्या शाळा, कनिष्ट विद्यालये, महाविद्यालये शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे अनमोल कार्य करत आहेत. जिल्ह्यामध्ये शिक्षण क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्या संस्थांमध्ये अहमदनगर एज्युकेशन सोसायटी हिंद सेवा मंडळ, बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, रयत शिक्षण संस्था, प्रवरा एज्युकेशन डॉ. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, संजीवनी एज्युकेशन, अमृतवाहिनी शिक्षणसंस्था, मुळा एज्युकेशन सोसायटी, परिक्रमा संकुल, अगस्ती एज्युकेशन, राहुरी कृषी विद्यापीठ अशा प्रशिक्षण संस्था जिल्ह्यामध्ये शिक्षणाचे कार्य करत आहेत. १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील काल येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली होती. बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोचण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी संघर्ष केला आहे. कर्मवीरांचे नगर जिल्ह्यात विठ्ठलराव विखे दादा पाटील, शंकरराव काळे अनुयायी होतो. या नेतृत्वाने जिल्ह्यात रयत शिक्षण संस्थेची उभारणी केली. शंकरराव काळे यांनी रयत शिक्षणसंस्थेसाठी उभारणीपासून कार्य केलेले आहे. शंकरराव काळे यांनी स्वत:च्या शिक्षणसंस्था सुरू करू शकले असते. परंतु ते यापासून दूर राहिले. रावसाहेब शिंदे १९७८ पासून रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष होते.[८१]

शंकरराव काळेंनी कर्मवीरांनी सुरू केलेली संस्था वाढविल्या. शाळांना जागा दिल्या. इमारती उभ्या करून दिल्या. महाराष्ट्रात गावोगावी हिंडून कर्मवीर भाऊराव शाळा उभारण्याचे काम करीत असताना शंकरराव काळे यांनी साथ दिली. गणपतराव औताडे, विठ्ठलराव विखे पाटील यांनी नगरमध्ये शाखा विस्ताराचे कार्य केले. शंकरराव काळे यांनी आपल्या कारखाना परिसरात छत्रपती संभाजी विद्यालय सुरू करून पहिली शाळा सुरू केली. कर्जतमध्ये दादा पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेचे पहिले महाविद्यालय सुरू केले. १९७५ मध्ये शंकरराव काळे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांनी १९९० पर्यंत १५ वर्षे अध्यक्ष म्हणून कार्य केले. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात त्यांनी नगर जिल्ह्यात शाळा काढल्या. १९७८ साली विठ्ठलराव विखे रयत शिक्षण उपाध्यक्ष होते. त्यावेळी अध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे काम पहात होते. शंकरराव काळे हे १९६२ ते ७२ या दहा वर्षे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे नगर जिल्ह्यात जाळे पसरविले. त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शंकरराव काळे यांना साथ दिली. महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यात एकूण ७०० हून अधिक शाखा आहेत. माध्यमिक, प्राथमिक, ज्युनिअर, सिनीअर कॉलेजचा समावेश आहे. रयत शिक्षण

संस्थेच्या विकासात अहमदनगर जिल्ह्यांनी कॉ.पी.बी. कडू आण्णासाहेब शिंदे यांचे मोठे योगदान आहे.[८२]

१९१८ साली मराठा विद्या प्रसारक समाज अहमदनगर या शिक्षण संस्थेची स्थापना झाली. या संस्थेच्या आज २ पूर्वप्राथमिक शाळा, २ प्राथमिक शाळा, १ प्राथमिक आश्रमशाळा, १ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा, ७० माध्यमिक विद्यालय, २५ कनिष्ठ महाविद्यालये, १२ वरिष्ठ महाविद्यालये, १ विधी महाविद्यालय, १ ग्राहकभांडार, १ अध्यापक महाविद्यालय, व्यवस्थापन संशोधन व ग्रामीण विकास केंद्र इन्स्टिटट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, अभियांत्रिकी महाविद्यालय, १३ मागासवर्गीय वसतिगृहे, ३ तांत्रिक अभ्यासक्रमाचे कोर्सेस अशा प्रकारच्या संस्थेच्या सर्व शाखा ११ तालुक्यात विस्तारलेल्या आहेत. पाच हजार शिक्षण व साठ हजार विद्यार्थी अशी व्यापक स्वरूप आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्थापन झालेली शंभर वर्षे कार्यरत राहणारी ही शैक्षणिक संस्था राज्यातील एक अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून गणली जात आहे. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेच्या स्थापनेपासून विठ्ठलराव विखेंनी संस्थेला मदत केली. संस्थेचे अध्यक्ष म्हणून ग्रामीण भागात व जिल्हाभर शिक्षण प्रसार केला आहे. संस्थेच्या वाटचालीत विठ्ठलराव विखे, बाबूराव तनपूरे, आबासाहेब निंबाळकर यांचे योदान आहे.[८३]

कॉ.पी.बी. कडू यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. रयत शिक्षण संस्था प्रवरा शिक्षण संस्था मराठी विद्या प्रसारक संस्था यांच्या कार्यात भाग घेऊन माध्यमिक महाविद्यालये सुरू करण्यात मदत केली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याने प्रभावित झालेले पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये अहमदनगर जिल्ह्यासाठी मोलाची कामगिरी बजावली आहे. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन या संस्थेने ग्रामीण स्तरावर जाऊन शिक्षणाचा विस्तार व्यापक स्वरूपावर केला आहे. राहाता तालुक्यातील प्रवरानगर येथे सहकार चळवळीच्या माध्यमातून विकसीत झालेले शैक्षणिक केंद्र संपुर्ण भारतात नावारूपाला आले आहे. येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील शिक्षण संस्थेमध्ये व्यवस्थापन, वैद्यकिय, अभियांत्रिकी आदि विविध प्रकारचे शिक्षण घेण्यासाठी संपुर्ण देशभरातून या संस्थेमध्ये विद्यार्थी प्रवेश घेतात. ग्रामीण भागातील निरक्षरता आणि महिला सबलिकरणासाठी काळाची गरज ओळखून प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून तालुकास्तरावर शाळा सुरू केल्या. जिल्ह्यातील ग्रामीण

भागात खेडोपाडी प्रवरा पब्लिक स्कूल सुरू केल्या. ग्रामीण शिक्षण संस्थे अंतर्गत प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणासोबत इंजिनिअरिंग, फार्मसी, वास्तुशास्त्र, मेडिकल, नर्सिंग, व्यवस्थापन, औद्योगिक, प्रशिक्षण आदि अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. १९८३ मध्ये पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन अंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. या अभियांत्रिकी महाविद्यालयात सिव्हिल मॅकेनिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन इन्स्ट्युमेंटेशन हे कोर्सेस चालविले जातात. तांत्रिक शिक्षणाबरोबरच व्यवस्थापन क्षेत्राचे शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी १९८६ साली आयबीएमआरडी इन्स्टिटट्युटची स्थापना केली. येथे एमबीए व एमसीए हे पदव्युत्तर कोर्सेस शिकविले जातात. १९९४ साली संस्थेमार्फत औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, बी फार्मसी, एम फार्म शिक्षणाची सोय अहमदनगर जिल्ह्यात उपलब्ध करून दिली आहे. तांत्रिक व्यावसायिक शिक्षणानंतर आरोग्यविषयक ज्ञान देण्यासाठी नगर जिल्ह्यातील दुसऱ्या वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना २००४ मध्ये विखे फाऊंडेशन केली. या महाविद्यालयात एम.बी.बी.एस. व १४ विषयांचे पदव्युत्तर शिक्षण देण्यात येते. वैद्यकीय महाविद्यालयानंतर २००५ साली इन्स्टिटट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन २००७ मध्ये कॉलेज ऑफ बी.एस्सी नर्सिंग हे अभ्यासक्रम सुरू केले. मुलींसाठी स्वतंत्र निवासी शाळा आणि महाविद्यालये सुरू करण्यात आली आहेत.[८४]

राहुरी साखर कारखान्याच्या माध्यमातून सन १९५८ मध्ये स्वातंत्र्य सैनिक बाबूराव दादा तनपुरे यांनी श्री. शिवाजी महाराज प्रसारक मंडळाची स्थापना केली. राहुरी तालुक्यात आज संस्थेच्या विविध शाखांमधून १३७४४ विद्यार्थी व महाविद्यालय आहेत. शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या अहमदनगर एज्युकेशनचा वारस सन १९४८ मध्ये नव्या पेठेतील ॲग्लो स्कुल व १८६८ मध्ये आनंदी बाजारात इंग्रजी हायस्कूलची नगरच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण क्षेत्रात सिंहाचा वाटा आहे. १९३९ मध्ये नवीन मराठी शाळा १९४२ मध्ये भिंगार हायस्कूल १९४७ मध्ये डी. एड. कॉलेज सन १९५२ मध्ये इंग्रजी शाळा विद्यालये या अहमदनगर एज्युकेशन सोसायटीने स्थापन केल्या आहेत. [८५]

जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात हिंद सेवा मंडळाचे सेवा कार्य देखील अनमोल आहे. १९६० साली हिंद सेवा मंडळाचे सीताराम सारडा विद्यालय शहरातील बागडपट्टी मध्ये सुरू झाले आहे. या विद्यालयात ९५० पेक्षा अधिक विद्यार्थी विद्यार्थीनी शिक्षण घेत आहे. या संस्थेअंतर्गत १४

शाळा विद्यालये तसेच महाविद्यालये कार्यरत आहेत. शताब्दी वर्षाकडे वाटचाल करणारी ही संस्था शहर व परिसरातील मजूर, बिडी कामगार, विणकार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य करत आहेत. प्राथमिक शाळेपासून पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या या संस्थेने दिवसभर काम करून शिकण्याची जिद्द असणाऱ्या मुलांसाठी रात्रीची शाळा गरजुंसाठी वसतीगृह, तंत्रशिक्षण आधुनिक माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रम सुरू केले. अहमदनगर जिल्ह्यात अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व हिंद सेवा मंडळ या संस्था व्यतिरिक्त शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्था कार्यरत आहेत.[८६]

१९९० साली शहरात हुतात्मा कर्मवीर चौथे शिवाजी महाराज इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲण्ड रूरल डेव्हलपमेंट ही स्वतंत्र संस्था उभी केली आहे. नगर शहरातील पहिले महाविद्यालय म्हणून अहमदनगर महाविद्यालय शिक्षण पद्धतीत अग्रेसर आहे. ५५ एकर प्रशस्त जागेमध्ये प्रस्थापित असलेले महाविद्यालय म्हणजे अहमदनगर महाविद्यालयामध्ये आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसह महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थी या महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. डॉ. एस. के. हळबे यांनी शहरात ग्रामीण विकास केंद्र सीएसआरडी ही संस्था सुरू केली आहे. या संस्थेने संपूर्ण देशाला राष्ट्रीय सेवा योजनेसारखा उपक्रम दिला. एमएसडब्लू हा अभ्यासक्रम सर्वांत प्रथम सीएसआरडी या संस्थेत सुरू केला.[८७]

**अमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक :–**

शेतकऱ्यांना कर्जपुरवठा वसुलीत अहमदनगर जिल्हा बँक सहकारी बँकेमध्ये जिल्ह्यात नव्हे तर राज्यात स्थान टिकवून आहे. लातूर, पुणे, सातारा या जिल्ह्याबरोबर नगर जिल्हा बँकेचे कार्य उल्लेखनीय आहे. जिल्हाभर ग्रामीण भागात २८३ शाखांच्या माध्यमातून बॅकींग सेवा आणि सुविधा ग्रामीण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून कृषी व औद्योगिक विकासाबरोबर शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक परिवर्तनामध्ये या जिल्हा बँकेने महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. १ मे १९५८ रोजी अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेची स्थापना झाली. शेती पतपुरवठ्यासाठी त्रिस्तरीय पद्धती मान्य करण्यात आली. गावपातळीवर प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था हा पाया तर राज्य पातळीवर शिखर सहकारी बँक यांच्यातील मधला दूवा म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँकांनी जिल्ह्याची मध्यवर्ती वित्त पुरवठा यंत्रणा म्हणून काम करण्याचे ठरविले.

जिल्ह्यातील शेती पतपुरवठा संस्थांचे संघटन देखरेख व शेतमाल उत्पादनासाठी पतपुरवठा तसेच शेतमालाची प्रक्रिया व विक्री व्यवस्था यांची संघटनात्मक जबाबदारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर आहे. जिल्ह्यातील पतपुरवठ्यावर देखरेख करून जिल्हा बँक व जिल्ह्यातील प्राथमिक शेती संस्थांची शिखर बँक म्हणून काम करते. शेतकऱ्यांना केंद्र बिंदू मानून स्थापन झालेल्या बँकेचे जाळे जिल्हाभर आहे. शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात कर्जपुरवठा करून त्यांचा उत्कर्ष साधला आहे. बँक स्थापन झाली त्यावेळी शाखांची संख्या १७ होती. बँक स्थापनेपासून पुरोगामी आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वाची परंपरा संस्थापक मोतीभाऊ फिरोदिया, मारूतराव घुले पाटील, पद्मश्री विखे पाटील, आबासाहेब निंबाळकर, भाऊसाहेब थोरात, डॉ. बाबूराव दादा तनपूरे, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, यशवंतराव गडाख इ. चे बँकेच्या प्रगतीत योगदान आहे.[८८]

**तक्ता क्र. १.६ अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आणि व्हाईस चेअरमन**

| अ.क्र. | सन | मा. चेअरमन | मा. व्हाईस चेअरमन |
|---|---|---|---|
| १. | १९५८–६२ | मोतीलाल कुंदलमलजी फिरोदिया (सरकार नियुक्त) | रोहमारे कारभारी भिकाजी |
| २. | १९६३–६४ | रोहमारे कारभारी भिकाजी | आव्हाड नामदेवराव (वंजारी) |
| ३. | १९६४–६५ | पाटील साहेबराव बबनराव | आव्हाड नामदेवराव (वंजारी) |
| ४. | १९६५–६६ | **थोरात भाऊसाहेब संतुजी** | देशमुख भाऊसाहेब नारायण |
| ५. | १९६६–६८ | **थोरात भाऊसाहेब संतुजी** | कांबळे खासेराव लक्ष्मणराव |
| ६. | १९६८–७० | **विखे विठ्ठलराव एकनाथ** | थोरात भाऊसाहेब संतुजी |
| ७. | १९७०–७१ | हारदे केशवराव भिकाजी | हांडे वसंतराव काकाजी |
| ८. | १९७१–७२ | **विखे विठ्ठलराव एकनाथ** | भगत दत्तात्रय कोंडाजी |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | १९७२–७३ | **विखे विठ्ठलराव एकनाथ** | सोले पाटील गोरक्षराव बाबुराव |
| १०. | १९७३–७४ | **थोरात भाऊसाहेब संतुजी** | हराळे किसनराव राजाराम |
| ११. | १९७४–७७ | **थोरात भाऊसाहेब संतुजी** | पाटील भालचंद्र रामचंद्र |
| १२. | १९७७–७८ | **घुले मारूतराव शंकरराव** | निळळ श्रीकृष्ण विश्वनाथ |
| १३. | १९७८–७९ | **घुले मारूतराव शंकरराव** | हांडे भाऊसाहेब महादेव |
| १४. | १९७९–८० | रोहमारे कारभारी भिकाजी | सोले पाटील गोरक्षराव बाबुराव |
| १५. | १९८०–८१ | हराळे किसनराव राजाराम | म्हस्के चंद्रकांत गींपतराव |
| १६. | १९८१–८४ | हांडे भाऊसाहेब महादेव | साबळे रावसाहेब कोंडाजी |
| १७. | १९८५–८५ | साबळे रावसाहेब कोहाजी | नवले नामदेवराव रखमाजी |
| १८. | १९८५–८६ | साबळे रावसाहेब कोहाजी | पाचपुते शिवाजीराव दिनकरराव |
| १९. | १९८६–८७ | **घुले मारूतराव शंकरराव** | म्हस्के चंद्रकांत गणपतराव |
| २०. | १९८७–८८ | **घुले मारूतराव शंकरराव** | शेळके विठ्ठलराव श्रीपतराव |
| २१. | १९८८–९० | **घुले मारूतराव शंकरराव** | नागवडे शिवजीराव नारायणराव |
| २२. | १९९०–९१ | **घुले मारूतराव शंकरराव** | सोले गोपाळराव बाबुराव |
| २३. | १९९१–९२ | शेळके मारूती देवराम | रूपवते प्रभाकर हरी (महार) |
| २४. | १९९२–९३ | निंबाळकर एकनाथ बुवासाहेब | हांडे भाऊसाहेब महादेव |
| २५. | १९९३–९६ | **गडाख यशवंतराव पाटील** | औताडे गींपतराव गंगाधर |
| २६. | १९९६–९७ | **थोरात भाऊसाहेब संतुजी** | सोले गोपाळराव बाबुराव |

| | | | |
|---|---|---|---|
| २७. | १९९७–९९ | **थोरात भाऊसाहेब संतुजी** | म्हस्के चंद्रकांत गणपतराव |
| २८. | १९९९–२००२ | **गडाख यशवंतराव पाटील** | पठारे ज्ञानदेवराव दौलतराव |
| २९. | २००२–२००३ | **गडाख यशवंतराव पाटील** | विखे राधाकृष्ण एकनाथराव |
| ३०. | २००३–२००४ | **गडाख यशवंतराव पाटील** | कोल्हे बिपीनराव शंकरराव |
| ३१. | २००४–२००५ | **गडाख यशवंतराव पाटील** | रायकर सिताराम कोंडाजी |
| ३२. | २००५ | पठारे ज्ञानदेवराव | रायकर सिताराम कोंडाजी |
| ३३. | २००५–२००६ | **विखे राधाकृष्ण एकनाथराव** | रायकर सिताराम कोंडाजी |
| ३४. | २००६–२००७ | **विखे राधाकृष्ण एकनाथराव** | देशमुख बापूसाहेब |
| ३५. | २००७–२००८ | **गडाख शंकरराव यशवंतराव** | रायकर सिताराम कोंडाजी |
| ३६. | २००८–२००९ | कर्डिले शिवाजीराव भानूदास | राजळे राजीव आप्पासाहेब |
| ३७. | २००९–२०१० | पांडूरंग अभंग (माळी) | म्हस्के संपतराव बन्सीभाऊ |
| ३८. | २०१०–२०११ | पांडूरंग अभंग (माळी) | म्हस्के संपतराव बन्सीभाऊ |
| ३९. | १.१२.२०१५ ते ४.६.२०१५ | खेमनर बाजीराव खंडूजी (धनगर) | शेळके गुलाबराव |
| ४०. | १२.५.२०१५ | गायकर सिताराम कोंडाजी | वाघ रामदास काशिनाथ |

अहमदनगर जिल्हा सहकारी बँक कार्यालय, अहमदनगर सन २०१५–१६

देशात २२०० सहकारी बँका असून त्यांची एकूण उलाढाल दोन लाख कोटींची आहे. त्यातल्या ७८ बँक महाराष्ट्र व गुजरात मध्ये आहेत. महाराष्ट्रात त्या सर्वाधिक ७०० पर्यंत आहेत. कृषीप्रधान ग्रामीण अर्थवस्थेला बळकटी आणण्यासाठी जिल्हा सहकारी बँकांची निर्मिती झाली. राज्य सहकारी बँका जिल्हा सहकारी बँका व प्राथमिक कृषी पतसंस्था या त्रिस्तरीय पतयंत्रणेतून शेतीला कर्ज पुरवठा होतो. महाराष्ट्रातल्या लहान–लहान खेड्यांपर्यंत पतपुरवठा करून लक्षावधी

सर्वसामान्य शेतकऱ्यांना उभे करण्यात सहकारी बँकांचा मोठा सहभाग आहे. राज्यात कृषी प्रक्रिया व पूरक उद्योगांना चालना देऊन औद्योगिक आघाडीवर या बँकांनी लक्षणीय काम केले आहे. त्याचबरोबर राज्यातील नागरी बँकांचेही चांगले योगदान लाभले आहे.[८९]

देशाच्या उभारणीच्या काळात सहकारावर कमालीची निष्ठा असलेल्या संयमी व सामंजस सुसंस्कृत नेत्याची फळी जिल्ह्याच्या विकासासाठी झटू लागली होती. स्वातंत्र चळवळ हा नगर जिल्ह्यातील नेतृत्वाचा पहिला टप्पा मानला पाहिजे. याच नेतृत्वाने सहकाराची कास धरून ग्रामीण विकासासाठी अहोरात्र जीवाचे रान केले आहे. सहकाराची गंगा हाच जिल्ह्याच्या नेतृत्वाचा दुसरा टप्पा ठरला. त्याचे उदाहरण जिल्हा बँक आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यावेळी सावकारांचे विस्तृत व घट्ट जाळे होते. स्वतंत्र भारताची दुसरीच पंचवार्षिक लागू झाली होती. देशाची अर्थव्यवस्था बालव्यस्थेत होती. अन्नधान्याची मारामार होती. तरीही शेतीधोरणही निश्चित झालेले नव्हते. बँकांचे राष्ट्रीयकरण झालेले नव्हते. पाटपाण्याच्या सुविधा तोडक्या होत्या. मुख्य म्हणजे लोकांना बचतीची सवय लागली नव्हती. अशा सर्व बाजूंनी प्रतिकूल परिस्थितीत अहमदनगर जिल्हा बँक स्थापन झाली.

तत्कालीन मुंबई इलाख्यातील महाराष्ट्र व गुजरात ही दुसरी जिल्हा बँक असेल सावकारशाहीला आला घालण्यासाठी ब्रिटिशांनी १०० वर्षापूर्वी १९०४ सहकार कायदा अस्तित्वात आणला. सुरूवातीला त्यांचे स्वरूप बँकींग म्हणजेच पतपुरवठ्यापुरते मर्यादीत होते. डॉ. धनंजय गाडगीळ पद्‌मश्री विठ्ठलराव विखे पाटील व वैकुंठभाई मेहता यांनी साखर कारखानदारीद्वारे सहकारात कृषी औद्योगिकरणाची मुहूर्तमेढ रोवली. ती याच जिल्ह्यात या उद्योगाने पुढे महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. विखे पाटलांचा पहिला प्रवरा सहकारी साखर कारखाना सुरू झाल्यानंतर १० वर्षांनी स्थापन झालेलास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकाराची व्याप्ती आणखी वाढवली खरेदी विक्री संघ, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, उपसासिंचन योजना अशा विविध शेतीपुरक घटकांना कर्ज पुरवठा बँकेने केला.[९०]

पहिला २५ वर्षाचा आढावा घेताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की याच काळात जिल्हा बँकेची खऱ्या अर्थाने दमदार वाटचाल सुरू झाली. पायाच भरभक्कमपणे ओतला गेल्याने पुढे फारशा अडचणी आल्या नाहीत. या काळात बँकेला अध्यक्ष लाभले. सगळ्यांची कारकीर्द शेती केंद्रीत होती त्यात मोतीभाऊ फिरोदिया, भाऊसाहेब थोरात, पद्‌मश्री विखे पाटील, मारूतराव

घुले, रोहमारे दादा, आणासाहेब शिंदे, आबासाहेब निंबाळकर, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे यांचा बँकेच्या वाटचालीत सक्रीय सहभाग राहिला आहे.[११]

सहकारी साखर कारखानदारीच्याच धर्तीवर जिल्हा बँकेने १९६५-६६ च्या दरम्यान कापूस लागवड व जिनिंग प्रेसिंग मिल तसेच तेलबियांची लागवड आणि आईल मिल अशा प्रक्रिया उद्योगाला ही चालना देण्याचा प्रयत्न केला. त्याकाळी कापसाच्या लागवडीला मोठा कर्ज पुरवठा करण्यात आला. साखर कारखान्याप्रमाणेच तालूकानिहाय शेतकऱ्यांची जिनींग-प्रेसिंग मिल ऑईल मिल असावी अशी कल्पना त्यावेळी होती. ऑईल मिलच्या दुपटीने भुईमुग लागवडीलाही जिल्हा बँकेने प्रोत्साहन दिले. १९७८ मध्ये बँकेने ऐतिहासिक निर्णय घेतला. बँकेच्या या निर्णयाने जिल्ह्याचा चेहरा-मोहरा बदलून गेला. स्माईल स्टोन असेच वर्णन करावे लागेल हा निर्णय होता. उपसासिंचन योजनांचा कर्ज वितरणाचा सामुदायिक व व्यक्तिगत पाईपलाईनसाठी कर्ज देण्याचा निर्णय होऊन बँकेने जिल्ह्यातील पारंपारिक शेती व्यवसायाचे स्वरूपच बदलून टाकले.[१२]

अशाप्रकारे ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने बँकींग आणला आणि सेवा सुविधा खालीलप्रमाणे अनेक निर्णय महत्वपूर्ण घेतलेले दिसतात.

१. निर्मिती प्रक्रियेत महिलांना सहभागी करून घेतले व जिल्ह्यातील दहा हजार महिला बचतगट बँकेशी संलग्न आहे. या बचतगटांचे एक लाख ३० हजार सभासद आहेत.

२. सहा टक्के दराने २ लाख ६५६५५ शेतकऱ्यांना ४३६ कोटींचे कर्ज देण्यात आले हा ऐतिहासिक निर्णयाने असंख्य शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

३. जिल्ह्यातील एक लाख ९८ हजार ०४३ शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाईपोटी आतापर्यंत १२१ कोटी रूपये मिळाले आहेत. दुष्काळी स्थितीत कर्जदार शेतकऱ्यांना विमा हफ्ता जिल्हा बँकेने भरण्याचा निर्णय घेतला होता.

४. वीज वितरणाचा कृषी संजीवनी योजनेअंतर्गत ४७ हजार शेतकऱ्यांना बिले भरण्यासाठी २५ कोटी रूपयांचे कर्ज बँकेने दिले. शेतकऱ्यांना विजेचे थकित बील भरता आले. राज्यात असा निर्णय घेणारी ही एकमेव बँक आहे.

५. शेतकऱ्यांना डॉक्टर व कृषी यांत्रिकीकरणासाठी ३४६ कोटी रूपायांचा कर्जपुरवठा बँकेने केला आहे. आतापर्यंत शेतकऱ्यांना ६ हजार ३० टॅक्टर २४५ कोटी रूपयांचा कर्जपुरवठा केला आहे. एवढे टॅक्टर दुसऱ्या कुठल्या जिल्ह्यात वाटण्यात आले नसतील.

६. विहिरीवरील पंपसेट व पाईपलाईनसाठी २५२ कोटींची कर्ज देण्यात आले. नाबार्डची व्हेंचर कॅपीटल योजनेनुसार गायी, म्हशी व त्यांच्या गोठ्यांच्या बांधकामासाठी कर्ज मंजूरीच्या ४०% रकमेवर व्याज आणि ५०% रक्कम बिनव्याज कर्जदारास मिळणार आहे. या योजनेअंतर्गत ३६३ शेतकऱ्यांना ६ कोटी ७८ लाख रूपयांचे कर्ज देण्यात आले. राष्ट्रीय फळबाग योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा केला जातो. घरकुल ग्रामीण कारागीर द्रारिद्र्य रेषेखालील अल्प भूधारकांसाठी विविध अनुदान प्राप्त योजनेअंतर्गत ३६ कोटींचा कर्जपुरवठा बँकेने केला आहे.

७. जिल्ह्यातील २ लाख शेतकऱ्यांकडील १९३ कोटी रूपये थकीत कर्जाचे पुर्नगठण करण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पुर्नगठन करताना मुद्दलात व्याज न मिळवता मुद्दल व व्याजाचे स्वतंत्र हफ्ते पाडण्याचा महत्वाचा निर्णय बँकेने घेतला आहे.

८. राज्य शासनातर्फे हगणदारीमुक्त गाव ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शौचालय बांधण्यासाठी बँकेतर्फे फक्त ७.५% दराने कर्ज पुरवठा करण्याचा निर्णयही बँकेने घेतला आहे.

९. साखर कारखानदारी संकटात सापडली असताना बँकेने साखर कारखान्यांना दीड ते दोन टक्के व्याजात सुट दिली. त्यामुळे कारखान्यांना दहा कोटी बारा लाखाचा फायदा झाला. जिल्ह्यातील नगर व कुकडी साखर कारखाने बँकेने दत्तक घेऊन साखर कारखान्याचे शेअर्स घेण्यासाठी शेतकऱ्यांना पाच कोटी पन्नास लाख रूपयांचे कर्ज दिले. मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करून या दोन कारखान्यांची उभारणी बँकेने केली. सहवीज निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे ९% दराने बँकेने कर्ज पुरवठा केला. सह वीज निर्मिती व इतर मध्य मुदत कर्जे ७१ कोटी दिले. साखर कारखान्यासाठी यावर्षी खेळते भांडवल ७०८ कोटींचे दिले.

१०. जिल्ह्यात दररोज २०१५ लाख लिटर दुध संकलित होते. बँकेने ७३ हजार ७०५ शेतकऱ्यांना दुभत्या जनावरासाठी १२२ कोटी कर्ज उपलब्ध करून दिले. या व्यवसायातून दरवर्षी ७४६ कोटी रूपये शेतकऱ्यांना हाती पडतात.

बँकेने केवळ सहकार कृषी क्षेत्रासाठी आर्थिक मदत दिली असे नाही. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धर्मदाय वैद्यकीय कारणासाठी अर्थसाह्य दिले आहे. २,२९,६८,५१५ रूपयांची मदत या कामी देण्यात आली. नगर, अकोले, पारनेर, शेवगाव, पाथर्डी, राहूरी, श्रीगोंदा,

जामखेड महिला महाविद्यालये विधी महाविद्यालये प्रशिक्षण केंद्रे आदि १७ संस्थांना १३ लाख २० हजारचे अर्थसाह्य देण्यात आले. विना अनुदानित तत्वावर सुरू करण्यात आलेल्या अभियांत्रिकी वैद्यकीय तंत्रनिकेतन आर्युवेद महाविद्यालये आयटीआय आदि ९ संस्थांना ५२ हजारांचे अर्थसाह्य अर्थसाह्य देण्यात आले. ग्रामीण भागातील शिक्षण प्रसारासाठी विना अनुदानित १०१ माध्यमिक शाळांना ११ लाख ६० हजारांचे अर्थसाह्य करण्यात आले. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा निर्माण करण्यात आली. २००६–०७ या आर्थिक वर्षात ३७ तरूणांना उच्च शिक्षणासाठी ४३ लाखांचे कर्ज मंजूर करण्यात आले.[१३]

गेल्या २५ वर्षातील बँकेच्या अध्यक्ष पदांचा विचार केला तर विद्यमान संचालक व आमदार यशवंतराव गडाख यांनी जास्त वेळा अध्यक्ष पद भुषविले आहे. ज्ञानेश्वर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष मारूतराव घुले यांनी ही चार वेळा अध्यक्ष पद भूषविले आहे. ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक थोरात उद्योग समुहाचे प्रणेते भाऊसाहेब थोरात हे तीन वेळा अध्यक्ष होते. आमदार राधाकृष्ण विखे यांनी ही दोन सव्वा वर्षे अध्यक्ष पद भूषविले. आपल्या कार्यकाळात बँकेचा चेहरा बदलण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रावसाहेब साबळे दादापाटील शेळके आबासाहेब निंबाळकर, ज्ञानदेव पठारे यांनीही अध्यक्ष पद भूषविले आहे.२००७ पासून युवा कार्यकर्ते मुळा कारखान्यांचे माजी अध्यक्ष शंकरराव गडाख अध्यक्षपदी विराजमान होते.[१४] या सर्व नेत्यांचा नेतृत्वाचा फायदा जिल्हा बँकेला झाला. परिणामी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राज्यातील नव्हे तर आशिया खंडातील अग्रगण्य सहकारी बँक म्हणून नावारूपास आली. जिल्ह्यातील कारखानदारीला उत्तेजन देत ती नावारूपाला आणण्यात जिल्हा बँकेचा जसा हात आहे तसे शेतीला पुरक ठरलेल्या दुधधंद्याला उत्तेजन देऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक वृद्धीला बँक कारणीभूत ठरली प्रारंभी डिझेल इंजिन पुढे वीजपंप त्यानंतर विहिर व पाईपलाईन पॉवर टिलर सारखी छोटी यंत्रसामूग्री व नंतर थेट ट्रॅक्टरला कर्जपुरवठा करण्यापर्यंत बँकेचे कार्य आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या सहकार व कृषी क्षेत्रात भरीव प्रगती झाली.

**पंचायत राज्य प्रगतीतील राजकीय नेतृत्व :–**

अहमदनगर जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वांत मोठा आहे. महाराष्ट्रात राजकारणात राजकीय दृष्टीनेही या जिल्ह्याला महत्व आहे. स्वातंत्र्य संग्रामात या जिल्ह्याने दिलेले योगदानही मोलाचेच होते. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात अकोले या डोंगराळ भागातील कोळी आदिवासी

समाजाने इंग्रजांविरूद्ध झुंज दिली. पहिल्या महायुद्धाच्या वेळी सक्तीच्या सैन्यभरती वरून इंग्रजांविरूद्ध याच भागात उठाव झाला होता. सक्तीने सैन्यभरती करणारा मामलेदार घरात लपल्यामुळे लोकांनी त्याचे घरच पेटवून दिले होते. १९२० ला महात्मा गांधी असहकाराची जी चळवळ सुरू केली होती त्यातही या जिल्ह्याचा सिंहाचा वाटा आहे. १९३० चा मीठ सत्याग्रह, जंगल सत्याग्रहातही जिल्ह्यातील अनेकांचा सहभाग होता. यात प्रामुख्याने अच्युतराव पटवर्धन, दादासाहेब चौधरी, भाईसाहेब पटवा, कॉ. सरदेसाई, कॉ. लालजी देसाई, रामकृष्ण महाराज, भैय्याजी कुलकर्णी यांचा सहभाग होता. १९३० च्या मीठ सत्याग्रहाने रावसाहेब पटवर्धन सर्वांना परिचित झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात सेनापती बापट, अच्युतराव व रावसाहेब पटवर्धन बंधुंनी जिल्ह्याबाहेरही महत्वाचे कार्य केले.[९५]

अहमदनगर जिल्हा हा डाव्या विचारसरणीचा जिल्हा होता. या जिल्ह्याने स्वातंत्र्य संग्रामात महत्वाची कामगिरी बजावली त्याचप्रमाणे जंगल सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह, असहकार, चले जाव आंदोलन, कर्ज मुक्तीचा लढा, मुळा कुकडीचा लढा, पाटपाण्यासाठी संघर्ष अशा कितीतरी चळवळी आंदोलनात भाग घेतला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देशातील अनेक राजकीय नेत्यांना या जिल्ह्यात स्थानबद्ध केले होते, त्यात कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. व्ही. डी. देशपांडे, कॉ. मिरजकर होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव अनेकांवर पडला. त्यातूनच साम्यवाद या जिल्ह्यात फोफावला. डाव्या विचारसरणीचे आण्णासाहेब शिंदे, पी. बी. कडू पाटील, भाऊसाहेब थोरात, चंद्रभान आठरे पाटील, भास्करराव औटी, दत्ता देशमुख, शंकरराव काळे, आबासाहेब निंबाळकर आणि विनायकराव ताकटे वगैरे कार्यकर्ते होते तर काँग्रेस हा पक्ष १९८५ ला स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेला होता. या पक्षाचे लक्ष्मणराव कोळसे पाटील, बाजीराव कोलते पाटील, अच्युतराव व रावसाहेब पटवर्धन, बाळासाहेब भारदे, रामभाऊ गिरमे, के. बी. रोहमारे, स्वामी सहजानंद, भारती बाळासाहेब भगत, रामराव चव्हाण, बाबूराव दादा तनपूरे हे कार्यकर्ते होते.[९६]

१९४७ नंतर स्वातंत्र्य आंदोलनातील पिढी मागे पडली. त्यानंतर जिल्ह्यात राजकीय व आर्थिक बाबतीतही मोठी उलाढाल झाली. याचे प्रमुख कारण १९४९ ला प्रवरानगर येथे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी धनंजयराव गाडगीळ व वैकुंठभाई मेहता यांच्या सहकार्याने आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरू केला. सहकारामुळे या जिल्ह्यात फार मोठे राजकीय व आर्थिक परिवर्तन झाले. परंतु याचा परिणाम १९६० पर्यंतच्या निवडणुकांवर

झाला नाही. १९६० पर्यंत अहमदनगर जिल्ह्यात डावी विचारसरणी प्रभाव खाली राहिली. या काळामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळ व गोवा मुक्ती संग्राम हे दोन विषय डाव्यांकडे होते या दोन प्रश्नांच्या निराकरणासाठी यांनी जे प्रयत्न केले त्यातून या पक्षाला जनमाणसात चांगले स्थान मिळाले. त्याचबरोबर शेतकरी शेतमजूर मोठ्या शेतकऱ्यांकडे जमीन कसणारी कुळे, रोजगारातील मजुरांच्या समस्या हे प्रश्न सोडविण्यात डाव्यांचा सिंहाचा वाटा आहे. या संदर्भात चळवळी करून मोर्चे काढून सरकारचे या विषयाकडे लक्ष केंद्रित केले यातूनही जनमत डाव्यांना अनुकूल आहे.[१७]

**अ) जिल्हा परिषद :–**

१९६२ मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीची स्थापना झाली. पहिल्या निवडणूकीत काँग्रेसने ५८ पैकी ३४ जागा जिंकल्या आणि संयुक्त महाराष्ट्र समितीला २१ जागा मिळाल्या. जिल्हा परिषदेत काँग्रेसच्या विजयी उमेदवारात प्रामुख्याने साहेबराव पाटील, शंकरराव काळे, द. वि. पाटील, वसंतराव खंडागळे, जगन्नाथ बनकर, एकनाथराव विखे, काशीनाथ खिलारी, बाजीराव पाटील, सखाराम पाटील व बन्सी कोठारी यांचा समावेश होता आणि समितीचे ल. हे. पालवे, ज. का. काकडे, पी. बी. कडू पाटील, राम नांगरे, बी. के. देशमुख, बन्सीलाल बाहेती, रंगनाथ पंदरकर व चंद्रकांत रार्जे यांचा समावेश होता. काँग्रेस अंतर्गत दोन गट जिल्ह्यात होते. पहिल्या अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून शंकरराव काळे व उपाध्यक्ष म्हणून बाळासाहेब विखे यांची निवड झाली. १९६२ च्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमुळे काँग्रेस अंतर्गत गट प्रभावी होऊ लागल्याचे दिसते. याच दरम्यान साखर कारखाने जिल्हा बँक सहकारी सोसायट्या यामुळे राजकारणात सामान्य माणसालाही रस वाटत होता. सहकारातून नेतृत्व पुढे आले याचे उत्तम उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद शंकरराव काळे व उपाध्यक्ष बाळासाहेब विखे होय. जिल्ह्याच्या राजकरणात यांची पकड दिसते. पंचायत समिती निवडणुकांतूनही नेतृत्व पुढे आले. सहकाराचा प्रभाव स्थानिक राजकारणात दिसू लागला. सहकाराचे जाळे संपुर्ण जिल्ह्यात पसरलेले दिसते. कार्यकर्ते नेते व शेतकऱ्यांत उत्साह होता. साखर कारखान्याच्या माध्यमातून वेगवेगळ्या संस्था स्थापन झाल्या. शेतीशिवाय ग्रामविकास झाला. कारखान्यात डिस्टलरी कागदप्रकल्प व रसायन निर्मिती असे उपपदार्थ निर्मितीचे प्रयोग सुरू झाले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनाला वेगळी कलाटणी मिळाल्याचे दिसते. या काळात जिल्हा राजकारणात काँग्रेस अंतर्गत गटातटाचे राजकारण सहकारामुळे आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे प्रभावशाली वाटते. पंचायत

समिती व जिल्हा परिषदेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. अहमदनगर जिल्ह्यात सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूकांत जिल्हा पातळीवरील नेतृत्व भाग घेऊ लागले. बँकेच्या निवडणूकीतही त्या नेत्यांचा सहभाग होता. यांचे राजकारण येथेच थांबले नाही. तर ग्रामपातळीवरील त्यांचा सहभाग वाढला. जास्तीत जास्त ग्रामपंचायती सहकारी सोसायट्या आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करू लागले. त्यामुळे गावागावात राजकीय कॉंग्रेस गट दिसू लागले. विरोधी पक्षाचा प्रभाव कमी होऊ लागल्याचे दिसते. १९६७ च्या जिल्हा परिषद निवडणूकीनंतर जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून अनुक्रमे पुन्हा निवड झाली. या निवडणुकांमध्ये कॉंग्रेस अंतर्गत आबासाहेब निंबाळकर आणि खताळ पाटील असे गट दिसून येतात. विखे–खताळ–रोहमारे–गट व काळे–कोल्हे, थोरात, निंबाळकर गटाच्या प्रत्यय जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीत दिसून आलेला येत होता.[९८]

१९७९ च्या जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यशवंतराव गडाख हे नवीन नेतृत्व पंचायत समितीच्या सभापती पदापासून उदयाला आले. या नेतृत्वाने जिल्हा परिषदेचे अध्यक्ष उपाध्यक्ष असताना गावपातळीपासून जिल्हा पातळीवर अनेक विकास विकास कामे केलेली दिसते. १९७२ च्या दुष्काळात जिल्हा परिषदेने केलेल्या कामाची आणि नियोजनाची विशेषत्वाने नोंद घेतली जाते.[९९] १९८५ ते १९९० या कालावधीत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राजळे घराण्यांची दुसरी पिढी आप्पासाहेब राजळे हे नेतृत्व पुढहे आले. दुष्काळी भागातून पुढे आलेले दिसते. १९९९ मध्ये मारूतराव घुले यांचे चिरंजीव नरेंद्र घुले जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले. राज्यातील सर्वांत मोठी जिल्हा परिषद असलेली अहमदनगर जि. प. स्थापनेपासून १९९९ पर्यंत कॉंग्रेसच्या ताब्यात राहिली. या निवडणूकीनंतर कॉंग्रेस आय मधील डॉ. विमलताई ढेरे यांनी महिलांसाठी राखीव असणारी अध्यक्षपद देण्यात आले. त्यांच्यानंतर अशोक भांगरे यांनी अध्यक्षपद सांभाळले. राष्ट्रवादी कॉंग्रेसची निर्मिती झाल्यानंतर कॉंग्रेसने शिवसेनेशी हातमिळवणी करीत अध्यक्षपद आपल्याकडे ठेवलेले दिसते. युतिची राज्यामध्ये सत्ता असल्याने शिवसेना भाजपच संख्याबळ वाढले होते. तरीही कॉंग्रेसला सत्तेपासून दूर ठेवू शकले नाहीत. जिल्ह्यातील पंचायत समित्या आणि साखर कारखाने कॉंग्रेस नेतृत्वाकडे असल्याने यशवंतराव गडाखांनी पुढकार घेऊन जिल्हा परिषदेतील पदवाटप केले होते.[१००]

अहमदनगर जिल्हा परिषदेची सत्ता २००७ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून कॉंग्रेसकडे गेलेली

दिसते. अहमदनगर जिल्हा परिषदेत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस अशीच राजकीय स्पर्धा आहे. काँग्रेसमध्ये बाळासाहेब थोरात, बाळासाहेब विखे, यशवंतराव गडाख यांचे गट आहेत. त्यांनी संगमनेर ८ (थोरात गट), राहाता ५ (विखे गट), नेवासे ५ (गडाख गट) जिल्हा परिषद सदस्य निवडून आणले. या गटाचे संतूलन काँग्रेसमध्ये राहिले तर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मधुकर पिचड गटाचे ५ सदस्य निवडून आले. थोडक्यात संपूर्ण जिल्हाभर प्रभाव असणारा नेता दोन्ही काँग्रेसकडे नाही. दोन्ही काँग्रेसमध्ये स्पर्धा असताना त्यांच्या अंतर्गत गट व उपगटांमध्ये स्पर्धा दिसून येते. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण राजकारण एकसंघ नाही. हे राजकारण अस्थिर व अनिश्चित आहे. जिल्हा परिषद निवडणूकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची युती झाली व नवीन नेतृत्व पुढे आले. बाळासाहेब विखे यांची सुन शालिनी विखे अध्यक्ष व नंदकुमार झावरे उपाध्यक्ष झाले.[१०१]

अहमदनगर जिल्ह्यात दिग्गज नेत्यांनी दुसरी पिढी जिल्हा परिषद निवडणूकीत सक्रिय केलेली दिसते. विरोधी पक्ष नेते राधाकृष्ण विखे यांच्या पत्नी शालिनी विखे काँग्रेसकडून शेवगाव राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार नरेंद्र घुले यांचे चिरंजीव क्षितीज घुले, चंद्रशेखर घुले यांच्या पत्नी राजश्री घुले यांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी दिली गेली होती. नेवाशाचे भाजपाचे बाळासाहेब मुरकुटे यांच्या पत्नी आशा मुरकुटे तर माजी आमदार शंकराव गडाख यांच्या पत्नी सुनिता गडाख तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रताप ढाकणे यांच्या पत्नी प्रभावती ढाकणे व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विठ्ठलराव लंघे यांच्या कन्या तेजस्वी लंघे या नेवासा तालुक्यातून निवडणूकीत उतरलेल्या दिसतात. श्रीरामपूरचे माजी आमदार भानूदास मुरकुटे यांची सुन वंदना मुरकुटे भाजपाचे माजी आमदार राजीव राजळे यांचे बंधू राहूल राजळे नगर तालुक्यातील माजी खासदार दादा पाटील शेळके यांचे पुतणे प्रताप शेळके निवडणूकीत होते. शिवसेनेचे खासदार सदाशिव लोखंडे यांची सुन वंदना लोखंडे जामखेडहून जिल्हा परिषदेत सक्रीय दिसतात. राष्ट्रवादीचे आमदार अरूण जगताप यांच्या सून सुवर्णा जगताप श्रीगोंदातून पंचायत समितीतून राजकारणात दिसतात. पारनेरमधून राष्ट्रवादीचे वसंतराव झावरे यांच्या पत्नी सुप्रिया झावरे व चिरंजीव सुजीत झावरे यांनी जिल्हा परिषद निवडणूक लढविली आहे. श्रीगोंद्यातून राहूल जगताप यांच्या मातोश्री अनुराधा जगताप तर आमदार शिवाजीराव नागवडे यांच्या सून अनुराधा नागवडे जिल्हा परिषद निवडणूकीतून राजकारणात पुढे आलेल्या आहेत.[१०२]

अहमदनगर जिल्ह्याचे राजकारण हे स्थानिक स्तरातून विरोधकांशी हातमिळवणी करण्याचे राजकारण जिल्ह्यात दिसून येते. विधानसभा निवडणूकीत सलग दोनवेळा पराभव झालेल्या माजी आमदार वकिलराव लंघे यांचे चिरंजीव विठ्ठलराव लंघे यांनी भाजपचे जिल्ह्याध्यक्ष पद सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्या बदल्यात त्यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले. २०१४ पासून अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शालिनी विखे व आमदार नरेंद्र घुले यांची सुन राजश्री घुले उपाध्यक्ष आहेत. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विठ्ठलराव लंघे व नवीन नेतृत्व आप्पासाहेब राजळे यांची सुन मोनिका राजळे उपाध्यक्ष झाले. त्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसकडे सत्ता कायम राहिली.[१०३]

सारांशरूपाने निवडणूक कोणतीही असो त्यातील घराणेशाही आता मतदाराच्या सुद्धा अंगवळणी पडू लागली आहे किंबहुना मतदाराकडून ती जोपासली जात आहे. कोल्हापूरात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पी. एन. पाटील हे आपला मुलगा राहुल पाटील याला उमेदवारी देण्यास तयार नव्हते. परंतू त्या मतदारसंघातील त्यांच्या कार्यकर्त्यांनी तब्बल आठ तास त्यांना रोखून धरले राहुल पाटील याला उमेदवारी दिल्याशिवाय अन्य मतदार संघातील काँग्रेसचे उमेदवाराने ए. बी. फॉर्म स्वीकारले नाही. शेवटी लोकांच्या दबावामुळे मुलास उमेदवारी घेण्याचा निर्णय घ्यावा लागला. लोकसभा व विधानसभेला प्रस्थापित कुटूंबांतील उमेदवारांना संधी मिळते त्यामुळे जिल्हा परिषद पंचायत समितीला तरी किमान पक्षासाठी व नेत्यासाठी राबणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी दिली जावी, अशी अपेक्षा असते. परंतु तसे घडताना दिसत नाही. कारण या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्ता या नव्या आर्थिक व राजकीय सत्ता केंद्र बनले आहे. ग्रामीण राजकारणावर वर्चस्व मिळवता येते. त्यासाठी मग हे पद आपल्याच गोतावळ्यात राहावे असे नेत्यांना वाटत आहे.[१०४]

या संदर्भात राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर म्हणतात, राजकीय नेतृत्वाच्या वारसदारांना संधी दिली जावी, अशी मानसिकता आता मतदारांची आणि राजकीय पक्षांची ही होत आहे. त्यांच्याकडे आर्थिक सामर्थ्य, राजकीय वर्चस्व आणि यंत्रणा राबविण्याची ताकद असते. हे सर्व वारसाला अलगतपणे मिळते. ही घराणेशाही सर्व पक्षात दिसते म्हणून तर जयललिताशी कोणताही संबंध नसताना लोकशाही संकेत पायदळी तुडवून आता तामिळनाडूच्या मुख्यमंत्री पदी शशिकला यांची निवड झाली आहे. नेत्याच्या वारसदारांना त्यांच्याकडे क्षमता

असेल तर का संधी मिळू नये, अशी ही विचारणा केली जाते. परंतू समान संधीच्या तत्वाचा विचार केल्यास हे वारसादार शर्यत सुरू होण्यापूर्वीच पुढे असतात. विठ्ठलराव विखे कुटूंबापासून ते अनेक ठिकाणी असे अनुभवास येते की तिथे मागच्या पिढीच्या तुलनेत पुढील पिढीतील नेतृत्व तितकेसे प्रभावशाली नाही. परंतू तरीही त्यांना वारसा म्हणून ही संधी मिळाली आहे.[१०५]

**तक्ता क्र. १.७ सन १९६२ पासून अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष**

| **अ.क्र.** | **अहमदनगर जिल्हा परिषद अध्यक्षांचे नाव** | **कालावधी** | |
|---|---|---|---|
| | | **पासून** | **पर्यंत** |
| १. | **मा.श्री. शंकरराव देवराम काळे** | १२/८/१९६२ | ११/८/१९६७ |
| २. | **मा.श्री. शंकरराव देवराम काळे** | १२/८/१९६७ | ११/८/१९७२ |
| ३. | मा.श्री. रामनाथ लक्ष्मणराव वाघ | १२/८/१९७२ | १९/६/१९७९ |
| ४. | **मा.श्री. यशवंतराव कंकरराव गडाख** | २०/६/१९७९ | २६/११/१९८४ |
| ५. | मा.श्री. ज्ञानदेव बाबुराव कासार (प्रभारी) | २७/११/१९८४ | २८/०४/१९८५ |
| ६. | **मा.श्री. आप्पासाहेब दादाबा राजळे** | २९/०४/१९८५ | १८/०३/१९९० |
| ७. | मा.श्री. ज्ञानदेव बाबुराव कासार (प्रभारी) | १९/३/१९९० | १२/०४/१९९० |
| ८. | मा.श्री. बाबासाहेब निवृत्ती पवार | १२/०४/१९९० | ३०/०६/१९९० |
| ९. | मा.श्री. एस. जे. कुटे (प्रशासक) | १/०७/१९९० | २०/०३/१९९२ |
| १०. | मा.श्री. अरूण पुंजाजी कडू पा. | २१/०३/१९९२ | २०/०३/१९९७ |
| ११. | मा.श्रीमती डॉ. विम उत्तम ढेरे | २१/०३/१९९७ | २०/०३/१९९८ |
| १२. | मा.श्री. अशोक यशवंतराव भांगरे | २१/०३/१९९८ | २०/०३/१९९९ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | **मा.श्री. नरेंद्र मारूतराव घुले पा.** | २१/०३/१९९९ | १६/०८/१९९९ |
| १४. | मा.श्री. बाबासाहेब सहादू भोस (प्रभारी) | १७/०८/१९९९ | २८/१०/१९९९ |
| १५. | मा.श्री. बाबासाहेब सहादू भोस | २९/१०/१९९९ | २०/०३/२००२ |
| १६. | मा.श्री. मिस्टर दादा शेलार | २१/०३/२००२ | १७/०२/२००५ |
| १७. | मा.श्री. बाबासाहेब लक्ष्मण भिटे | १८/०२/२००५ | २०/०३/२००७ |
| १८. | **मा. श्रीमती शालिनीताई राधाकृष्ण विखे** | २१/०३/२००७ | २०/०३/२०१२ |
| १९. | मा.श्री. विठ्ठलराव वकिलराव लंघे | २१/०३/२०१२ | २०/०९/२०१४ |
| २०. | मा.श्री. मंजुषा राजेंद्र गुंड पाटील | २१/०९/२०१४ | २०/०३/२०१७ |
| २१. | **मा.श्रीमती शालिनीताई राधाकृष्ण विखे** | २१/०३/२०१७ | |

अहमदनगर जिल्हा परिषद कार्यालय

**ब) विधानसभा :–**

**अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व विधानसभा निवडणूक :–**

**१. अकोले :–**

चळवळीचा आणि डाव्या विचारांचा म्हणून अकोले तालुका ओळखला जातो. आदिवासी व बिगर आदिवासीची जवळपास सारखीच लोकसंख्या आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात सावकारशाहीच्या विरोधात लढे व जंगल सत्याग्रहाच्या चळवळी तालुक्यात घडल्या आहेत. तालुक्यात १९८० पर्यंत डावा विचार प्रभावी होता. त्यामुळेच येथून प्रथम समाजवादी पक्षाचा व कम्युनिष्ठ पक्षाचा उमेदवार विधानसभा निवडणुकीत विजयी झाला होता. समाजवादी व कम्युनिष्ठ यांचे तालुक्यातील वर्चस्व १९८० नंतर हळूहळू कमी झाले व काँग्रेस सत्तेवर आलेला दिसतो.

गोपाळराव भांगरे अकोले तालुक्यातील पहिला आमदार आहेत. त्यानंतर त्यांचे चिरंजीव यशवंतराव भांगरे यांनी १९६२, १९७२ व १९७८ अशा तीन निवडणूकांमध्ये विजय मिळविला. १९७७ मध्ये समाजवादी पक्षाचे नारायणराव नवाळी निवडून आले आणि १९६८ मध्ये कम्युनिष्ट

पक्षाचे कॉम्रेड पी. के. देशमुख आमदार झाले. त्यानंतर १९८० पासून मात्र मधुकर पिचड सलग सात निवडणूकांमध्ये विजयी झाले.[१०६]

**तक्ता क्र. १.८**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | यशवंतराव भांगरे | कॉंग्रेस |
| १९६७ | बी. के. देशमुख | भाकप |
| १९७२ | यशवंतराव भांगरे | कॉंग्रेस |
| १९७८ | यशवंतराव भांगरे | कॉंग्रेस |
| १९८० | **मधुकर पिचड** | कॉंग्रेस आय |
| १९८५ | **मधुकर पिचड** | कॉंग्रेस आय |
| १९९० | **मधुकर पिचड** | कॉंग्रेस |
| १९९५ | **मधुकर पिचड** | कॉंग्रेस |
| १९९९ | **मधुकर पिचड** | राष्ट्रवादी कॉंग्रेस |
| २००४ | **मधुकर पिचड** | राष्ट्रवादी कॉंग्रेस |
| २००९ | **मधुकर पिचड** | राष्ट्रवादी कॉंग्रेस |

क्षेत्रीय पाहणी

१९८० मध्ये मधुकर पिचड हे कॉंग्रेस मधून सत्तेत आले. १९९९मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रसची स्थापना झाल्यावर पिचड यांच्यासह तालुक्यातील बहुतेक सर्वच राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये गेले. तालुक्याचा आदिवासी भागात अपवाद वगळता राष्ट्रवादी व्यतिरिक्त अन्य पक्षाचे अस्तित्व फारसे दिसून येत नाही. तालुक्यात खऱ्या अर्थाने पिचड हेच पक्ष आहेत त्यामुळेच तालुक्यात पिचड विरूद्ध अन्य सर्व असा राजकीय संघर्ष सातत्याने सुरू असतो. विविध सहकारी संस्था जिल्हा

परिषद पंचायत समिती या निवडणूकांमधून ही बाब दिसून आली आहे. मधूकर पिचड यांनी सहकार क्षेत्रात मोठी कामगिरी केली. तर सत्तेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास कामे तालुक्यात केली. ते १९९९ ते २००४ या काळात कॅबिनेट मंत्री होते. पुढे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष होते. जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत रस्ते वीज उपसा सिंचन योजना पुल, बंधारे, धरणे, वीजप्रकल्प, नळपाणीपुरवठा निळवंडे धरणे आदि कामे त्यांनी केली. निळवंडे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा आदर्श निर्माण केला. तरूणांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून पर्यटन विकास केला. अकोले शिक्षण संस्थेच्या माध्यमातून उच्च शिक्षण पॉलिटेक्निक एमबीए या शिक्षणाची सोय केली. अशा रितीने अकोले तालुक्याचा मधुकर पिचड हे राजकीय नेतृत्वाचा वारसा वैभव पिचड चालवत आहे.[१०७]

## २. संगमनेर तालुका :–

संगमनेर तालुका डाव्या विचारांचा तालुका आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या तालुक्याने के. बी. दादा देशमुख यांच्या रूपाने नगर जिल्ह्याचे नेतृत्व केले. पंडित नेहरू यांच्या बेलापूर श्रीरामपूर येथे झालेल्या १९३२ मधील सभेचे नियोजन त्यांनी केले. त्या काळात दत्ता देशमुख बी. जे. खताळ पाटील भाऊसाहेब थोरात, आण्णासाहेब शिंदे, पी. बी. कडू, ॲड. भाऊसाहेब धुमाळ, भास्करराव दुर्वे, ॲड. रावसाहेब शिंदे या तरूण कार्यकर्त्यांचा उदय झाला. अशा वेगवेगळ्या अभ्यास कार्यकर्त्यांना काँग्रेसमध्ये घेण्याचे कार्य राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी १९६० नंतर सुरू केले. संगमनेर मतदारसंघाचे नेतृत्व लाल निशाण पक्षाचे दत्ता देशमुख करत होते. यांनीही काँग्रेसमध्ये यावे म्हणून यशवंतराव चव्हाणांनी प्रयत्न केला. त्यांनी पक्षाची ठाम भूमिका घेतली. बी. जे. खताळ यांना काँग्रेसमधून काँग्रेसची उमेदवारी देण्यात आली. खताळ पाटील, के. बी. दादा देशमुख यांचे जावई होते.

संगमनेरमध्ये १९६० च्या दशकात शेतकी संघाची स्थापना आणि संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. ग्रामीण भागातील मुलांची उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून विडी खाण कामगार, शेतकरी व्यापारी यांनी एकत्र येऊन शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली. संगमनेर महाविद्यालय सुरू झाले. त्यासाठी दत्ता देशमुख, खताळ पाटील, भाऊसाहेब थोरात, भाऊसाहेब धुमाळ, संभाजीराव थोरात भास्करराव दुर्वे उद्योगपती ओंकारनाथ मालपाणी

आदी एकत्र आले. त्यांनी सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्थेची स्थापना झाली. खताळ पाटील यांनी सलग १९७८ पर्यंत मतदारसंघाचे नेतृत्व केले.[१०८]

**तक्ता क्र. १.९**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | बी. जे. खताळ | काँग्रेस |
| १९६७ | बी. जे. खताळ | काँग्रेस |
| १९७२ | बी. जे. खताळ | काँग्रेस |
| १९७८ | **भाऊसाहेब थोरात** | काँग्रेस |
| १९८० | बी. जे. खताळ | काँग्रेस |
| १९८५ | **बाळासाहेब थोरात** | अपक्ष |
| १९९० | **बाळासाहेब थोरात** | काँग्रेस |
| १९९५ | **बाळासाहेब थोरात** | काँग्रेस |
| १९९९ | **बाळासाहेब थोरात** | काँग्रेस |
| २००४ | **बाळासाहेब थोरात** | काँग्रेस |
| २००९ | **बाळासाहेब थोरात** | काँग्रेस |

क्षेत्रीय पाहणी

विधानसभेची १९७८ ची निवडणूक भाऊसाहेब थोरात यांनी काँग्रेसकडून लढवली. त्यांनी महाराष्ट्र समाजवादी काँग्रेसचे उमेदवार खताळ पाटील यांचा पराभव केला. सन १९८० च्या निवडणूकीत संभाजीराव थोरात यांचा पराभव करून खताळ पुन्हा विजयी झाले. पुढे भाऊसाहेब थोरातांची दुसरी पिढी निवडणुकीत आली. बाळासाहेब थोरात विधानसभेच्या १९८४ च्या निवडणूकीत उतरले. परंतू ते अपक्ष म्हणून उभे राहिले. जोर्वे दूध संस्थेचे अध्यक्ष ते आमदार

असे राजकीय नेतृत्व विकसीत झाले. १९८० मध्ये तालुका दुध संघाचे संचालक होते. आमदार झाल्यानंतर ते संघाचे अध्यक्ष झाले. त्यामुळेच दुग्ध व्यवसायाला उच्चांक आला. १९७२ च्या दुष्काळात ३५ हजार जण रोजगार हमीच्या कामावर असायचे दुग्धव्यवसाय वाढीला लागल्यावर ते प्रमाण केवळ तीस हजारावर आले. आज ते प्रमाण शून्य आहे.

भंडारदऱ्याच्या पाण्याचे फेरवाटप करणे. बाळासाहेब थोरात यांनी राज्यसरकारला भाग पाडले. प्रवरेच्या हक्काचे पाणी मिळावे, यासाठी शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलने केली. अकोल्याचे आमदार मधुकर पिचड यांनी त्यांना साथ दिली. मुख्यमंत्री शरद पवार यांना हा प्रश्न समजला तेव्हा त्यांनी भंडारदऱ्याचे पाणीवाटप करून ऐतिहासिक निर्णय घेतला. बाळासाहेब थोरात हे १९९० मध्ये काँग्रेसचे उमेदवार झाले. त्यांनी विखे समर्थक अपक्ष उमेदवार ॲड. बापूसाहेब गुळवे यांचा पराभव केला. यावेळी बाळासाहेब थोरात संगमनेर साखर कारखान्याचे अध्यक्ष होते. सरकारच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यात अमृत बंधारे बांधले. प्रवरा, मुळा, आढळा, म्हाळुंगी या नद्यांवर जागा दिसेल तिथे बंधाऱ्याची शृंखला तयार केली. पावसाचे पाणी आडून भुगर्भात जिरले. विहिरींना पाणी आले. शिवार फुलवले ही रचनात्मक कामाची दूरदृष्टी बाळासाहेब थोरातांना कृतीतून दाखवली. पुढे बाळासाहेब थोरात व मुधकरराव पिचड यांनी निळवंडे धरणाच्या पुर्नवसनावर भर दिला. त्यासाठी बाळासाहेब थोरातांनी स्वत:ची पाच एकर जमीन धरणग्रस्तांना देऊन कृतीशील आदर्श उभा केला.

१९९५ मध्ये शिवसेना भारतीय जनता पक्ष युतीचे सरकार आले. मात्र बाळासाहेब थोरात तिसऱ्यांदा विजयी झालेले दिसतात. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये न जाता काँग्रेसमध्ये राहण्याचा त्यांचा निर्णय ठाम राहिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप शिंदे यांचा पराभव करून बाळसाहेब चौथ्यांदा विजयी झाले. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मंत्रीमंडळात बाळासाहेब थोरात पाटबंधारे खात्याचे राज्यमंत्रीपद होते.

विधानसभेच्या २००४ च्या निवडणूकीत शिवसेनेचे उमेदवार संभाजीराव थोरात यांच्यावर विजय मिळवून त्यांना कृषी व जलसंधारण खात्याचे मंत्रीपद देण्यात आले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना दुग्धव्यवसाय, एक लाख शेततळी, शेतकऱ्यांसाठी महापिक, पीकविमा, अपघाती विमा कृषी व शिवार फेऱ्या, कृषी विद्यापीठे, बांधावर शेतीसाठी मृदासंधारण जलसंधारण राज्यभर साखळी बंधारे मराठवाडा व विदर्भासाठी पाणलोट कार्यक्रम आदर्श गाव योजना अशा विविध

योजना राबविल्या. २००९ च्या निवडणूकीत बाळासाहेब थोरातांनी लढत शिवसेनेचे बाळासाहेब थोरात हे राजशिष्टाचार खात्याचे मंत्री झाले व काही काळ कृषी जसंधारण मंत्री होते. २०१४ च्या निवडणूकीतही बाळासाहेब थोरात काँग्रेसचे प्रतिनिधीत्व करत आहे. अशा रितीने थोरात घराण्याचे तिसरे वारसदार राजवर्धन थोरात राजकारणात येऊ पाहत आहेत.[१०९]

### ३. कोपरगाव तालुका :–

एके काळी पाऊस व पाण्याअभावी सतत होरपळणाऱ्या कोपरगाव तालुक्यात इंग्रज सरकारने पाणी आणले. त्यानंतर शेती फुलवली. प्रारंभी ऊसाची शेती करून देशात नावलौकिक केलेले दिसते. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात विकास करण्यासाठी सहकाराचा विकास घडून आणला. सहकारी साखर कारखाने सर्वाभिमुख विकासाचे माध्यम झाले. कोपरगाव तालुक्यातील नेत्यांनी राजकारण बाजूला ठेवून सहकारी जिवंत ठेवण्यासाठी सतत एकत्र काम केले. त्यामुळे तालुका आज स्वकर्तृत्वावर उभा राहिलेला दिसत आहे. सहकारी साखर कारखाने व शैक्षणिक संस्थांवर नेतृत्वाचे लक्ष आहे. त्यामुळे औद्योगिक विकास झालेला नाही.

कोपरगाव तालुक्यातील नेते राज्याचे कारभारी म्हणून गणले जात होते. तालुक्यातील पोहेगाव जिल्ह्याच्या राजकारणाची राजधानी होती. सहकारी साखर कारखान्याचे अगोदर के. बी. रोहमारे यांनी सुरू केलेल्या सहकारी तत्वावरील गोदावरी प्रवरा संस्थेने देशभर जाळे विणले होते. राज्यात डाव्या विचारसरणीचा प्रभाव असतानाही काँग्रसचे वर्चस्व तालुक्यात होते. यामध्ये शंकरराव काळे, के. बी. रोहमारे, दादा शहाजी रोहमारे, जगन्नाथ पाटील बारहाते आणि शंकराव कोल्हे यांचा सिंहाचा वाटा होता.[११०]

**तक्ता क्र. १.१०**

| वर्षे | आमदार | पक्ष |
|---|---|---|
| १९७८ | **शंकरराव कोल्हे** | काँग्रेस |
| १९८० | **शंकरराव कोल्हे** | काँग्रेस |
| १९८५ | दादासाहेब रोहमारे | काँग्रेस |
| १९९० | **शंकरराव कोल्हे** | काँग्रेस |

| | | |
|---|---|---|
| १९९५ | **शंकरराव कोल्हे** | काँग्रेस |
| १९९९ | **शंकरराव कोल्हे** | राष्ट्रवादी काँग्रेस |
| २००४ | **अशोक काळे** | शिवसेना |
| २००५ | **अशोक काळे** | शिवसेना |

क्षेत्रीय पाहणी

कोपरगाव तालुक्याचे सर्वाधिक काळ नेतृत्व करणारे लोकप्रतिनिधी शंकरराव कोल्हे आहेत. त्यांनी ३० वर्षे तालुक्याच्या राजकारणावर प्रभुत्व गाजविले. शंरराव काळे, मोहनराव गाडे, के. बी. रोहमारे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व माजी खासदार सुर्यभान वहाडणे व माजी केंद्रीय मंत्री बाळसाहेब विखे हे प्रमुख स्पर्धक होते. शंकरराव कोल्हे यांनी त्यांच्या कारकीर्दीत सहकारी साखर कारखान्याच्या विकासासह संजिवनी एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून मोठे शैक्षणिक काम केले. नामदेव परजणे यांनी १९९९ मध्ये शंकरराव कोल्हे यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवली. पण शंकरराव कोल्हे अधिक मतांनी विजयी झाले. तालुक्यात राजकीय स्पर्धेतून रोजगार हमी योजनेव्यतिरिक्त मोठी विकासकामे झालेली दिसतात. संजिवनी व कोपरगाव या दोन सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शंकरराव काळे व शंकरराव कोल्हे यांनी पाणी आडवा–पाणी जिरवा या संकल्पनेतून मोठे काम केले. गोदावरी नदीवर कोल्हापूर पद्धतीचे सात बंधारे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वर्षभर पाणी पुरेल ही व्यवस्था केली. गावागावात शेततळी पाझरतलाव वनबंधारे बांधली. शंकरराव काळे व शंकरराव कोल्हे ही जोडी राजकीय आखाड्यात सतत एकमेकांसमोर येऊन लढत होती. शंकरराव काळे यांनी कोपरगाव साखर कारखान्याच्या मध्यमातून रयत शिक्षणसंस्थेच्या अनेक शाखा उभ्या केल्या. शंकरराव कोल्हे यांनी रयत शिक्षण संस्थेला सहकार्य केले व आजही हे कार्य चालू आहे.

विधानसभेच्या २००४ मध्ये निवडणूकीत शिवसेनेतर्फे शंकरराव काळे यांची दुसरी पिढी यांचे चिरंजीव आशोक काळे यांनी शंकरराव कोल्हे यांची दुसरी पिढी यांचे चिरंजीव बिपीन कोल्हे यांच्यावर विजय मिळविला. सत्ता मिळाल्यानंतर शंकरराव काळे तालुक्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कामाला लागले. रस्ते, तलाव, पुल, पाणी अशा अनेक कामामध्ये विकास साधला. त्याच जोरावर २००९ मध्ये अशोक काळे पुन्हा आमदार झाले. दुसरीकडे दोन वेळा पराभव होऊनही बिपीन

कोल्हे यांना विकास कामे सोडली नाही. शहराला पाणी पुरवण्यासाठी तब्बल ४२ कोटी रूपयांची योजनेला मंजूरी आणून कामाला सुरूवात केली आहे. अशा रितीने कोपरगाव तालुक्यातील राजकीय नेतृत्व हे काळे कोल्हे घराण्यांशी जोडलेले आहे व दुसरी पिढी सत्तेसाठी संघर्ष करत आहे.[१११]

**४. राहाता तालुका :–**

जागरूक असणारा शिर्डी विधानसभा मतदारसंघ आहे. संपूर्णपणे निवडणूकीवर अपवाद वगळता विखे घराण्याचे वर्चस्व या मतदार संघावर दिसते. कृषीमंत्री राधाकृष्ण विखे पाटील वीस वर्षापासून या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत आहे. हा मतदार संघ गणेश व प्रवरा या दोन सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात भौगोलिक आणि राजकीयदृष्ट्या विभागलेला होता. विखे पाटील घराण्यातील उमेदवाराला म्हणजे माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के यांना व राधाकृष्ण विखे यांना अपवाद वगळता प्रत्येक निवडणूकीत संघर्ष करावा लागला. मात्र प्रवरा परिसरातील एकगठ्ठा मतांच्या जोरावर ते बाजी मारत आले. २००९ विधानसभा निवडणूकीनंतर या मतदारसंघाची भौगोलिक रचना बदलली. गणेश साखर कारखाना परिसरातील पुणतांब्यासह दहा गावे कोपरगाव मतदारसंघात जोडली गेली. संगमनेरच्या थोरात साखर कारखान्याच्या राजकीय आणि आर्थिक प्रभाव असलेली संगमनेर तालुक्यातील जोर्व्यासह २८ गावे शिर्डी मतदारसंघात समाविष्ट झाली. त्यामुळे मतदारसंघाचे राजकीय संदर्भ दिलले त्याची रचना प्रवरा व गणेश परिसर आणि संगमनेर परिसरातील गावे अशी त्रिकोणी झाली यामुळे विधानसभा व लोकसभा निवडणूकीवर परिणाम दिसून आला.[११२]

**तक्ता क्र. १.११**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | कारभारी रोहमारे | काँग्रेस |
| १९६७ | मोहनराव गाडे | अपक्ष |
| १९७२ | **शंकरराव कोल्हे** | अपक्ष |

| | | |
|---|---|---|
| १९७८ | चंद्रकांत घोगरे | काँग्रेस |
| १९८० | आण्णासाहेब म्हस्के | काँग्रेस |
| १९८५ | आण्णासाहेब म्हस्के | काँग्रेस |
| १९९० | **शंकरराव कोल्हे** | काँग्रेस |
| १९९५ | **राधाकृष्ण विखे** | काँग्रेस |
| १९९९ | **राधाकृष्ण विखे** | शिवसेना |
| २००४ | **राधाकृष्ण विखे** | काँग्रेस |
| २००९ | **राधाकृष्ण विखे** | काँग्रेस |
| २०१४ | **राधाकृष्ण विखे** | काँग्रेस |

क्षेत्रीय पाहणी

१९७८ मध्ये चंद्रभान घोगरे विधानसभेची निवडणूक लढवून विजयी झाले. त्यांनी महाराष्ट्र समाजवादी काँग्रेसचे उमेदवार व माजी खासदार बाळासाहेब विखे यांचे मावसभाऊ आण्णासाहेब म्हस्के यांचा पराभव केला. त्यानंतर दोन वर्षातच निवडणुका झाल्या व आण्णासाहेब म्हस्के आमदार झाले. बाळासाहेब विखे यांच्या प्रभावामुळे पुढे सलग १५ वर्षे त्यांनी आमदारकी अबाधित ठेवली. पुढील राजकारणात विखे घराण्याच्या तिसऱ्या पिढीचा उदय झाला. बाळासाहेब विखे यांचे चिरंजीव राधाकृष्ण विखे २५ वर्षापासून येथून निवडून येत आहेत.

अहमदनगर जिल्ह्याच्या निवडणूकांवर सहकार चळवळीचा प्रभाव होता. विखे पाटील घराण्याकडे प्रवरा साखर कारखाना आहे. विखे घराण्याला आव्हान देणारे पुणतांब्याचे भास्करराव जाधव यांच्याकडे गणेश साखर कारखान्याचे पाठबळ होते. कर्जबाजारीमुळे बंद पडलेला गणेश कारखाना तत्कालीन मंत्री असलेले शंकरराव कोल्हे यांनी पुढाकार सुरू केला. त्या माध्यमातून रहाता तालुक्यात कोल्हे यांचा राजकीय हस्तक्षेप वाढला. युती सरकारमध्ये राधाकृष्ण विखे हे मंत्री झाले. कोल्हे यांनी गणेश सहकारी साखर कारखाना भागीदारी तत्त्वावर चालविण्यास घेतला.[११३]

आण्णासाहेब म्हस्के १९८० मध्ये राहाता तालुक्यातील आमदार झाले. बाळासाहेब विखे हे शंकरराव चव्हाण गटाचे प्रतिनिधित्व करीत होते. शरद पवार समर्थक रावसाहेब म्हस्के हे राधाकृष्ण विखे विरोधी गटातून होते. बरीच वर्षे चव्हाण विरूद्ध पवार गट अशी विभागणी झाली. नगर जिल्ह्याच्या राजकारणातही विखे समर्थक विरोधी पवार गट अशी लढाई होत राहिली.

विधानसभेच्या १९९५ च्या निवडणूकीत राधाकृष्ण विखे आमदार झाले. पुढे विखे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. युती सरकारने राधाकृष्ण विखे यांच्याकडे मंत्री पद सोपविले. १९९९ च्या निवडणुकीत राधाकृष्ण विखे, रावसाहेब म्हस्के व एकनाथ गोंदकर अशी तिहेरी लढत झाली. मतविभाजनाचा फायदा मिळाल्याने राधाकृष्ण विखे विजयी झाले. त्यानंतरच्या निवडणूकीत २००४ मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश करत मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात कृषी मंत्री झाले. राधाकृष्ण विखे यांनी सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून विविध विकासकामे राबविली. ग्रामीण रूग्णालये, गोदावरी कालवे, साई संस्थान, पशुवैद्यकीय दवाखाने प्रवरा ग्रामीण रूग्णालय तालुक्यातील प्रवरा शैक्षणिक संकुल, कृषी उत्पन्न बाजार समिती प्रवरा व गोदावरी कालव्याच्या पाण्यामुळे बागायती झालेला आणि दोन सहकारी साखर कारखाने असलेला तालुका समृद्ध केलेला दिसून येतो.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे देवस्थान म्हणून शिर्डीचा १५ वर्षात उदय झाला. आर्थिक उलाढाल कित्येक पटींनी वाढली. वेगाने विस्तारीत होणारे हे विकासाचे नवे बेट तयार झाले. त्यामुळे साहजिकच १०–१२ गावातल्या आर्थिक उलाढालींवर परिणाम झाला. रोजगार निर्मिती झाली. अशा रितीने विखे घराण्यांच्या चौथ्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून सुजय विखे यांनी राजकारणात प्रवेश केला आहे. गणेश सहकारी साखर कारखान्याची जबाबदारी सुजय विखे वर सोपविली आहे. सध्या युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पद सुजय विखे यांच्याकडे आहे. काँग्रेस पक्ष संघटना सक्रीय करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.[११४]

### ५ . श्रीरामपूर तालुका :–

विधानसभेच्या श्रीरामपूर मतदारसंघावर कोणत्याही नेत्याला १५ वर्षांपेक्षा अधिक काळ मजबूत पकड ठेवता आलेली नाही. त्यामुळे साखरपट्ट्यातील घराणेशाहीला हा तालुका अपवाद राहिला आहे. ब्रिटीशांनी बांधलेल्या भंडारदरा धरणाच्या पाण्यावर तालुक्यातील शेती सुपीक बनली. हरेगाव व टिळकनगर हे पहिले खासगी साखर कारखाने सुरू झाले. श्रीरामपूर तालूक्यात

असलेल्या प्रवरानगर येथे विठ्ठलराव विखे व धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकारातून पहिला सहकारी साखर कारखाना सुरू झाला. त्यानंतर अशोक सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाली. साखर कारखान्यांच्या काळातच तालुक्यातून रेल्वेमार्ग गेला. त्यामुळे साखर बाहेरच्या बाजारपेठेत जाऊ लागली. पर्यायाने साखरेचे व गुळाचे उत्पादन वाढले. बाजारपेठेच्या निमित्ताने बारामती, पुणे, खानदेश, मराठवाड्यातील मंडळी येथे आली व श्रीरामपूर येथेच स्थिरावली. त्यामुळे व्यापाराबरोबरच राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांत स्थान निर्माण केले. माजी केंद्रीय कृषीमंत्री आण्णासाहेब शिंदे व माजी उपमुख्यमंत्री बॅरिस्टर रामराव आदिक श्रीरामपूर तालुक्यातील आहेत. त्यांच्या मंत्रीपदाचा तालुक्याला फायदा झाला.[११५]

श्रीरामपूर तालुक्यातील २१ गावे या मतदार संघात आली. १९६२ मध्ये वामन वाकचौरे व बाबूराव चतुर्भुज यांच्यात लढत झाली. चतुर्भुज निवडून आले. त्यांना कामगार चळवळीचा फायदा झाला. १९६७ ची निवडणूक बनकर व गंगाधर ओगले यांच्यात झाली. ज. बा. बनकर विजयी झाले. १९७२ च्या निवडणूकीत भास्करराव गलांडे व गोविंदराव आदिक यांच्यात लढत झाली व गोविंदराव आदिक यांना कोपरगाव तालुक्यातील २१ गावांमधून काळे कोल्हे यांना निवडून दिले. आणीबाणीनंतर जनता पक्ष केंद्रात आल्यावर १९७८ मध्ये गोविंदराव आदिक पुन्हा निवडून आले व आमदार बनले. एमआयडीसी न्यायालयाची इमारत, उड्डाणपूल, एसटी कार्यशाळा, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय अशी मोठी कामे त्या काळात झाली. आशिया खंडातील सहकारी तत्वावर वीजवितरण करणारी मुळाप्रवरा वीज संस्था, तालुका सूतगिरणी, पीपल्स बँक या संस्था स्थापन झाल्या. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या पुरोगामी लोकशाही दलाच्या मंत्रीमंडळात गोविंदराव आदिक पाटबंधारे मंत्री होते. परंतू १९८० मध्ये समाजवादी काँग्रेसचे गोविंदराव आदिव व काँग्रेसचे भानुदास मुरकूटे यांच्यात लढत झाली व दौलतराव पवार आमदार झाले.[११६]

१९९० व १९९५ च्या दोन्ही निवडणूकामध्ये भानुदास मुरकूटे विजयी झाले. १९९९ च्या निवडणूकीत खासदार असलेले गोविंदराव आदिक व बाळासाहेब विखे यांनी जयंत ससाणे यांना मदत केली. त्यामुळे १९९९ व २००४ मध्ये जयंत ससाणे हे आमदार राहिले. तालुक्यात नवीन प्रकल्प आणणारा व वेगाने विकास साधणारा नेता म्हणून जयंत ससाणेची ओळख झाली. अशोक सहकारी साखर कारखाना काळात तालुक्यातील सर्व सत्तास्थाने जयंत ससाणे यांच्याकडे होती.

परंतू राजकीय अंतर्गत वाद, पाटपाण्याचे नियोजन, धरणाचे हक्काचे पाणी कमी, कारखानदारीत अडचणी, खाजगी कारखाने, सुतगिरणी व पिपल्स बँक बंद पडल्या. एका पाठोपाठ संस्था बंद पडत गेल्याने तालुक्याचे अर्थकारण बदलले. बाजारपेठ व पर्यायाने तालुक्याच्या विकासावर परिणाम झाला.

**तक्ता क्र. १.१२**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | बाबूराव चतुर्भुज | काँग्रेस |
| १९६७ | ज. वा. बनकर | अपक्ष |
| १९७२ | गोविंदराव आदिक | अपक्ष |
| १९७८ | गोविंदराव आदिक | काँग्रेस |
| १९८० | **भानुदास मूरकुटे** | काँग्रेस |
| १९८५ | दौलतराव पवार | समाजवादी काँग्रेस |
| १९९० | **भानुदास मूरकुटे** | काँग्रेस |
| १९९५ | **भानुदास मूरकुटे** | काँग्रेस |
| १९९९ | जयंत ससाणे | काँग्रेस |
| २००४ | जयंत ससाणे | काँग्रेस |
| २००९ | भाऊसाहेब कांबळे | काँग्रेस |
| २०१४ | भाऊसाहेब कांबळे | काँग्रेस |

क्षेत्रीय पाहणी

२००९ मध्ये मतदारसंघ पुर्नरचनेत श्रीरामपूर तालुका अनुसुचित जातीसाठी राखीव झाला. राहुरी तालुक्यातील प्रवरा काठची ३२ गावे या मतदार संघात समाविष्ट झाली. २००९

च्या निवडणुकीत काँग्रेसने जयंत ससाणे यांचे समर्थक भाऊसाहेब कांबळे यांना उमेदवारी दिली. भानुदास मुरकूटे यांनी विजय शिंदे यांना अपक्ष म्हणून उभे केले. यातून भाऊसाहेब कांबळे निवडून आले. शासनाच्या योजनांबाबत सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असल्याने श्रीरामपूर मतदारसंघ आरक्षित झाल्यामुळे गोविंदराव आदिक भानुदास मुरकूटे आणि जयंत ससाणे या दिग्गज नेत्यांचे तालुक्यात फारसे लक्ष घालताना दिसत नाही. त्यातच मुळा-प्रवरा सहकारी वीज संस्था २०११ मध्ये अस्तगत झाली. संस्था पूर्णपणे बंद पडली. सोळाशे कामगार बेकार झाले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या श्रेयाच्या लढाईत एक सहकारी संस्था बंद पडली. त्यामुळे जनता विरोधात गेलेली दिसते.[११७]

### ६. नेवासा तालुका :-

ग्रंथश्रेष्ठ ज्ञानेश्वरीची जन्मभूमी असणारा नेवासे तालुका हा विकासच्या दृष्टीने काहीसा पिछाडीवर आहे. ज्ञानेश्वर व मुळा या दोन्ही साखर कारखान्यामुळे तालुक्याची आर्थिक प्रगती स्थित होत आहे. तालुक्यासह जिल्ह्यात दबदबा निर्माण करण्याचा ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे संस्थापक यशवंतराव गडाख दोघांभोवतीच तालुक्याचे राजकारण सतत फिरत राहिले आहे. तरीही ते नेहमीच बेभरवशाचे वाटत राहिले आहे. प्रस्थापितांच्या विरोधात तालुक्यात वकिलराव लंघे, तुकाराम गडाख, संभाजी फाटके यांच्यासारखे विरोधक ही आमदार बनले. सन १९६२ पासून नेवासे-शेवगाव तालुक्यांवर पकड असणारे व दोन वेळा आमदार असणारी मारूतराव घुले यांच्या वर्चस्वामुळे वकिलराव लंघे पराभूत झाले. घुले यांनी यशवंतराव गडाख यांना काँग्रेसकडून १९७२ च्या निवडणूकीत उभे केले. परंतू त्यावेळी वकिलराव लंघे निवडून आले. १९७८ मध्ये निवडणूकीत वकिलराव लंघे यांनी तत्कालीन पाटबंधारे मंत्री आबासाहेब निंबाळकर यांना पाठिंबा दिला. नेते एकत्र आले की जनता विरोधात जाते. याचा प्रत्यय म्हणजे राजकीय पार्श्वभूमी नसलेले संभाजी फाटके निवडून आले.

१९९० च्या निवडणूकीत पुन्हा तीच परिस्थिती दिसते. लंघे-गडाख-घुले एकत्र आले. मारूतराव घुले व तुकाराम गडाख यांच्या लढत होऊन तुकाराम गडाख विजयी झाले. १९९५ मध्ये विधानसभा निवडणूकीत अपक्ष असलेले तुकाराम गडाख व मारूतराव घुले यांनी पांडुरंग अभंग यांना उमेदवारी दिली. काही फरकाने पांडुरंग अभंग विजयी झाले.[११८]

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यशवंतराव गडाख हे १९८४ च्या समाजवादी काँग्रेसमधून काँग्रेसमध्ये गेले. लोकसभेच्या १९८४ च्या निवडणूकीत त्यांनी नगर–दक्षिण मतदारसंघातून जनता पक्षाचे उमेदवार बबनराव ढाकणेचा पराभव करून ते लोकसभा सदस्य झाले. यशवंतराव गडाख हे तीन वेळा खासदार व दोन वेळा आमदार झाले. गडाख कुटूंबाने नेहमीच विविध उपक्रम राबविले. यशवंतराव गडाख यांचे वारसदार प्रशांत गडाख यांच्या संकल्पनेतून यशवंत सामाजिक प्रतिष्ठानने राबविलेली नेत्रदान चळवळ ठसा उमटवत आहे. आजपर्यंत १६३ जणांनी मरणोत्तर नेत्रदान केले. ग्रामीण भागातील हा उपक्रम राज्यभर नावजला जात आहे. लोकसभेच्या १९९१ च्या मध्यावर्ती निवडणूकीत काँग्रेसने नगर दक्षिण मतदार संघातून उमेदवारी नाकारल्याने बाळासाहेब विखे व यशवंतराव गडाख यांच्या राजकीय संघर्ष वाढला. ही निवडणूक सर्वोच्च न्यायालयात गेली. यशवंतराव गडाखांची निवड रद्द झाली. मतदारयादीतून त्यांचे नाव सहा वर्षांसाठी बाद ठरवले गेले. जिल्हा परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष मारूतराव घुले यांचे चिरंजीव नरेंद्र घुले यांनी १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून विधानसभा निवडणूक लढविली व आमदार झाले. त्याचवेळी नगर उत्तर मतदारसंघात यशवंतराव गडाख यांचे चिरंजीव शंकरराव गडाख यांना अपक्ष शिवाजी कर्डिले व काँग्रेसचे भानुदास कोतकर लढतीमध्ये शंकरराव गडाख निवडून आले. सन २००४ मध्ये लोकसभा निवडणूकीच्या नगर दक्षिण मतदार संघात ना. स. फरांदे याचा पराभव करून तुकाराम गडाख विजयी झाले. २००४ मध्ये विधानसभा निवडणूकीत विठ्ठल लंघे यांच्या विरोधात नरेंद्र घुले आमदार झाले. २००९ मध्ये मतदारसंघाची पुर्नरचनेतून नेवासे स्वतंत्र मतदारसंघ झाला. त्यामुळे मारूतराव घुले यांनी नेवाशातून लक्ष कमी केले व शेवगाव पाथर्डीवर लक्ष केंद्रित केले. अनेक वर्ष विभागलेला नेवासे मतदार संघ एकसंघ झाल्याने एकहाती नेतृत्व यशवंतराव गडाख यांच्याकडे आले. मुळा कारखान्याच्या अध्यक्ष पदाच्या माध्यमातून राजकारणात सक्रीय झालेल्या शंकरराव गडाख यांनी वेध भविष्याचा हा विकास आराखडा मांडला. २०९९ मध्ये विठ्ठल लंघे यांचा पराभव करून तालुक्यीच सत्ता हातात घेतली. विधानसभा निवडणूकीत सलग दोनदा पराभव झालेल्या विठ्ठलराव लंघे यांनी भाजपचे जिल्हाध्यक्षपद सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्या बदल्यात त्यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद घेतले. शंकरराव गडाख यांनी पाणी, रस्ते, कालवे विविध प्रकल्प बंधारे ३३२ लहान मोठे तळे अशी तालुक्यात कामे केली. त्यांच्या बरोबरीने शंकरराव गडाखाची पत्नी सुनिता गडाख

यांनी पंधराशेहून अधिक बचतगटांच्या माध्यमातून महिलांना १३ कोटींचे आर्थिक साह्य मिळवून दिले. मुळा सहकारी साखर कारखाना, मुळा सहकारी बँक, मुळा उद्योग समूह अशा सहकारी संस्थांतून गडाख घराणे सहकारातून विकासकामे सक्रिय करत आहेत.[११९]

**७. शेवगाव तालुका :–**

शेवगाव तालुक्यात गोदावरी नदीमुळे सुपिक जमीन लाभलेली आहे. पण जायकवाडी धरणासाठी सरकारने या जमिनी घेतल्याने अनेक धरणग्रस्त हे समस्याग्रस्त झाले होते. धरणासाठी जमिनी दिल्या म्हणून शेतीला पाणी मिळण्यासाठी सरकारने ताजनापुर लिफ्ट योजना टप्पा क्र. १ चे काम केले परंतू शेवगाव तालुक्याला अजुनही पाणी मिळालेले नाही. त्यामुळे हा मोठा प्रश्न शेतकरी पुढे दिसतो. शेवगाव तालुक्यातून परळी–गेवराई–शेवगाव–बेलापूर असा रेल्वेमार्ग होण्यासाठी टाकलेले मातीचे भराव दिसतात. हा रेल्वेमार्ग झाला असता तर तालुक्यात विविध उद्योगांचे जाळे पसरलेले दिसले असते. बोधेगाव व परिसरातून राज्यात व परप्रांतांमध्ये ऊसतोडणीसाठी शेकडो कुटूंबाचे स्थलांतर झालेले दिसते. मारूतराव घुले यांनी सुरू केलेल्या ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. बॅ. आबासाहेब काकडे यांनी शेतीच्या पाण्यासाठी आंदोलने केली. गरीब विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृहे व शिक्षणासाठी विद्यालये सुरू केली. तालुक्याच्या राजकारणावर कम्युनिष्टांचा प्रभाव होता. या चळवळीत बाळासाहेब भारदे, अच्युतराव रसाळ, नानासाहेब भारदे, एकनाथ भागवत, घन:श्याम वराडे, श्रीधर सातपूते, पा. य. फलके, अचपळराव लांडे ,शादुराव कावरे, आबासाहेब नरवडे, आबासाहेब काकडे, गंगाधर पानसंबळ, जगन्नाथ मिस्तरी, लाल परदेशी, श्यामराव कर्डिले सक्रीय होते. यातील काही मंडळी काँग्रेसकडे आकर्षित झाली होती. कॉम्रेड वकिलराव लंघे यांनी शेवगाव नेवासे विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. काँग्रेसचे बाळासाहेब भारदे यांनी शेवगाव पाथर्डीचे एकदा व नगरचे दोनदा विधानसभेचे प्रतिनिधीत्व केले आहे. बाळासाहेब भारदे हे सहकार मंत्री व विधानसभेचे अध्यक्ष होते. विधानपरिषदेत सदस्य असलेले पा. य. फलके गुरूजी यांनी पहिले वरिष्ठ महाविद्यालय शेवगाव येथे सुरू केले. राज्य परिवहन महामंडळात सर्वसामान्य कुटुंबातील तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. बोधेगाव परिसरातील ३५ गावे जुन्या पाथर्डी विधानसभा मतदारसंघाला जोडली होती. आप्पसाहेब राजळे, बबनराव ढाकणे, राजीव राजळे यांनी या भागाचे प्रतिनिधीत्व केले. या सर्व काळात शेतीसाठी पाणी, पक्के रस्ते,

रोजगार निर्मिती इ. प्रश्न सुटलेले नाहीत. तालुक्याचा मोठा भाग अवर्षणातच राहिला आहे. हजारो एकरांचे उघडे भूभाग आजही वाळवंटासारखे रूक्ष दिसतात. बोधेगाव परिसरातील काही गावे वगळता बहुसंख्य ग्रामपंचायती विविध कार्यकारी संस्था राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात आहेत. कृषी उत्पन्न बाजार समिती व पंचायत समितीवर नगर जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केलेल्या मदतीमुळे मतदारावर घुले घराण्याचे वर्चस्व दिसून येते. चंद्रशेखर घुले व नरेंद्र घुले यांनी शेतीच्या पाण्यासाठी बंधाऱ्याची मालिका १० वीज उपकेंद्रे, रस्त्यांची कामे, गारपीट ग्रस्तांना मदतीसाठी प्रयत्न, दुष्काळात चारा छावण्या, प्रशासकीय इमारती, मुळा कालवा, संजय गांधी निराधार योजनेचा १६ हजार लाभार्थींना लाभ, कृषी विज्ञान केंद्र आदि विकास कामे मार्गी लावलेली दिसतात. अशा प्रकारे शेवगाव तालुक्याचे पाण्याभोवती फिरणारे गटातटाचे राजकारण दिसून येते.[१२०]

**तक्ता क्र. १.१३**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | **मारूतराव घुले** | काँग्रेस |
| १९६७ | **मारूतराव घुले** | अपक्ष |
| १९७२ | वकिलराव लंघे | भारतीय कम्युनिष्ट पक्ष |
| १९७८ | वकिलराव लंघे | भारतीय कम्युनिष्ट पक्ष |
| १९८० | संभाजीराव फाटके | काँग्रेस |
| १९८५ | संभाजीराव फाटके | काँग्रेस |
| १९९० | तुकाराम गडाख | अपक्ष |
| १९९५ | पांडुरंग अभंग | काँग्रेस |
| १९९९ | **नरेंद्र घुले** | राष्ट्रवादी काँग्रेस |

| | | |
|---|---|---|
| २००४ | **नरेंद्र घुले** | काँग्रेस |
| २००९ | **चंद्रशेखर घुले** | काँग्रेस |

क्षेत्रीय पाहणी

## ८. पाथर्डी तालुका :–

पाथर्डी तालुका कम्युनिष्ट विचारसरणीचा स्वातंत्र्यसेनानी बाळासाहेब भारदे, बाबूजी आव्हाड, माधवराव निऱ्हाळी, दादापाटील राजळे, चंद्रभान आठरे, गणपतराव म्हस्के, बबनराव ढाकणे, आप्पासाहेब राजळे, दगडू पाटील बडे यांनी तालुक्याचे प्रतिनिधीत्व केले आहे. पाथर्डी तालुका हा दुष्काळग्रस्त आहे. डोंगरदऱ्यांचा परिसर असल्याने जलसंधारणाची कामे करण्यास वाव होता. परंतु असे झालेले दिसत नाही. ऊसतोडणी हा येथील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय व राज्यातील साखर कारखानदारीला मजूर पुरविणारा हा तालुका आहे. रोजगार उपलब्ध करून देणारा एकही उद्योग तालुक्यात दिसत नाही.[१२१]

**तक्ता क्र. १.१४**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | नारायण गणपत आव्हाड | भाकप |
| १९६७ | बाळासाहेब भारदे | काँग्रेस |
| १९७२ | गणपतराव म्हस्के | अपक्ष |
| १९७८ | बबनराव ढाकणे | जनता पक्ष |
| १९८० | बबनराव ढाकणे | जनता पक्ष |
| १९८५ | बबनराव ढाकणे | जनता पक्ष |
| १९९० | **आप्पासहोब राजळे** | काँग्रेस |

| | | |
|---|---|---|
| १९९५ | **आप्पासहोब राजळे** | काँग्रेस |
| १९९९ | दगडू पाटील बडे | भाजप |
| २००४ | **राजीव राजळे** | काँग्रेस |
| २००९ | पासून मतदारसंघ बरखास्त | |

क्षेत्रीय पाहणी

## ९. नगर तालुका :–

विधानसभेच्या नगर उत्तर मतदारसंघाचे अस्तित्व पुर्नरचनेमुळे संपलेले आहे. श्रीगोंदा पारनेर आणि राहुरी मतदारसंघामध्ये तालुका विखुरला आहे. बबनराव पाचपुते, विजय औटी व शिवाजी कर्डिले या तीन नेतृत्वाचा उदय झालेला आहे. सोयरेधायरे किंवा मैत्रिच्या राजकारणाचा परिणाम या तालुक्यावर दिसतो. पाण्याचा प्रश्न, बुऱ्हाणनगर व घोसपुरी उद्योग बंद पडले. नगर तालुका सहकारी साखर कारखाना बंद पडला, कृषी उत्पन्न बाजार समितीवर कर्ज, खरेदी विक्री संघ सीना नदीच्या दूषित पाण्यामुळे अठरापेक्षा जास्त गावामधील शेतजमीन नापीक झाली. अशा अनेक प्रश्नांमधून नेते आपले अस्तित्व ठेवत आहेत.

नगर उत्तर मतदार संघात १९६२ मध्ये झालेल्या निवडणूकीत काँग्रेसचे विठ्ठलराव कुटे यांचा अपक्ष उमेदवार बाळासाहेब नागवडे यांनी पराभव केला. १९६७ ते १९७८ पर्यंत काकासाहेब म्हस्के हे काँग्रेसचे प्रतिनिधीत्व केले. १९७८ मध्ये अपक्ष मारूती देवराम उर्फ दादा पाटील शेळके यांनी सलग २५ वर्षे सत्तेत एक हाती राजकारण केले.[१२२]

**तक्ता क्र. १.१५**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | बाळासाहेब नागवडे | अपक्ष |
| १९६७ | काकासाहेब म्हस्के | काँग्रेस |
| १९७८ | काकासाहेब म्हस्के | काँग्रेस |

| | | |
|---|---|---|
| १९८० | दादापाटील शेळके | अपक्ष |
| १९८५ | दादापाटील शेळके | काँग्रेस |
| १९९० | दादापाटील शेळके | काँग्रेस |
| १९९५ | शिवाजी कर्डिले | अपक्ष |
| १९९९ | शिवाजी कर्डिले | अपक्ष |
| २००४ | शिवाजी कर्डिले | राष्ट्रवादी काँग्रेस |

क्षेत्रीय पाहणी

१९९५ च्या विधानसभा निवडणूकीमध्ये बाळासाहेब विखे यांनी जिल्हा विकास आघाडीचे तालुकाध्यक्ष शिवाजी कर्डिले यांना पाठिंबा दिला. त्यामुळे नवीन नेतृत्वाचा उदय झाला. त्यामुळे दादा पाटील शेळके यांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आले. शिवाजी कर्डिले तीन वेळा आमदार म्हणून नगर तालुक्याला लाभले.

**१०. नगर शहर :-**

एकदा निवडून आलेला उमेदवार पुन्हा विजयी होत नाही. ही नगर दक्षिण मतदार संघाची खासीयत अनिल राठोड यांनी बदलली आहे. ते १९९० नंतर २००९ पर्यंत सलग पाच वेळा निवडून आले. नगर शहरावर २५ वर्षापासून शिवसेनेच्या उमेदवाराचे अधिराज्य आहे. १९६२ मध्ये बाळासाहेब भारदे व १९६७ मध्ये एस. व्ही. मिसाळ यांनी काँग्रेसचे प्रतिनिधीत्व केले. १९७८ च्या निवडणूकीत जनता पक्षाकडून डॉ. कुमार सप्तर्षी १९८५ मध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी काँग्रेसचे दादा कळमकर यांनी विधानसभेचे प्रतिनिधीत्व केले. सन १९९५, १९९९, २००४ आणि २००९ या सलग निवडणुकांमध्ये अनिल राठोड हे विजयी झाले आहेत. सन १९९५ च्या विधानसभेवर अनिल राठोड राज्यमंत्री होते. अनिल राठोड हे चोवीस तास उपलब्ध होणारा आमदार ही त्यांनी तयार केलेली प्रतिमा झाली आहे.[१२३]

**तक्ता क्र. १.१६**

| वर्षे | आमदार | पक्ष |
|---|---|---|
| १९६२ | बाळासाहेब भारदे | काँग्रेस |
| १९६७ | एस. व्ही. मिसाळ | काँग्रेस |
| १९७२ | नवनीतभाई बार्शीकर | अपक्ष |
| १९७८ | कुमार सप्तर्षी | जनता पक्ष |
| १९८० | ए. एस. आय. असीर | काँग्रेस |
| १९८५ | दादाभाऊ कळमकार | समाजवादी काँग्रेस |
| १९९० | अनिल राठोड | शिवसेना |
| १९९५ | अनिल राठोड | शिवसेना |
| १९९९ | अनिल राठोड | शिवसेना |
| २००४ | अनिल राठोड | शिवसेना |
| २००९ | अनिल राठोड | शिवसेना |
| २०१४ | संग्राम जगताप | समाजवादी काँग्रेस |

क्षेत्रीय पाहणी

## ११. राहुरी तालुका :-

विधानसभेच्या राहुरी मतदारसंघातून आठ वेळा विजय मिळवत काँग्रसने वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यापैकी दोन वेळा बाबूराव दादासाहेब तनपूरे आणि पाच वेळा प्रसाद तनपूरे निवडून आलेले आहेत. तनपूरे यांचे जनसेवा मंडळ व त्या विरोधात सर्वपक्षीय जागृती मंडळ आणि नंतरचे सर्वपक्षीय तालुका विकास मंडळ असेच लढतीचे स्वरूप राहिले आहे. १९७२ मध्ये निवडणूकीत काँग्रसचा पराभव झाला व पी. बी. कडू आमदार झाले. बाबूराव तनपूरे यांच्या कार्यकाळात

तालुक्यात साखर कारखाना, सूतगिरणी, मुळा धरण, मुळा डावा कालवा, मुळा प्रवरा वीज सहकारी संस्था, महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि बाजार समिती अशी महत्त्वाची कामे झाली आहेत. तालुक्याच्या अर्थकारणावर सामाजिक, शैक्षणिक अशा क्षेत्रावर बाबूराव दादा तनपूरे यांचा प्रभाव दिसून येतो.

राहुरी तालुक्यात १९८० मध्ये बाबूराव तनपूरे यांची दुसरी पिढी राजकारणात आली. यांचे चिरंजीव प्रसाद तनपुरे यीन काँग्रसचे प्रतिनिधीत्व केले. सलग चार पंचवार्षिक निवडणूक प्रसाद तनपूरे निवडून आले. १९९९ मध्ये पुन्हा प्रसाद तनपुरे हे राहुरी तालुक्याचे आमदार झाले. तालुक्यातील सत्तास्थाने दीर्घकाळ तनपुरे घराण्याकडे राहिली आहे. चौदापैकी सात वेळा आमदारकी तनपुरे घराण्यात राहिली सहकारी कारखाना हे सत्तासंघर्षाचे केंद्र राहिले.[१२४]

**तक्ता क्र. १.१७**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | **बाबूराव तनपूरे** | काँग्रेस |
| १९६७ | **बाबूराव तनपूरे** | काँग्रेस |
| १९७२ | पी. बी. कडू | भारतीय कम्युनिष्ठ पक्ष |
| १९७८ | का. ल. पवार | काँग्रेस |
| १९८० | **प्रसाद तनपूरे** | काँग्रेस |
| १९८५ | **प्रसाद तनपूरे** | अपक्ष |
| १९९० | **प्रसाद तनपूरे** | काँग्रेस |
| १९९५ | **प्रसाद तनपूरे** | काँग्रेस |
| १९९८ | चंद्रशेखर कदम | भाजप |

| | | |
|---|---|---|
| १९९९ | **प्रसाद तनपूरे** | राष्ट्रवादी काँग्रेस |
| २००४ | चंद्रशेखर कदम | भाजप |
| २००९ | शिवाजी कर्डिले | भाजप |
| २०१४ | शिवाजी कर्डिले | भाजप |

क्षेत्रीय पाहणी

२००९ मध्ये भाजपकडून शिवाजी कर्डिले विजयी झाले. नवीन नेतृत्वाला स्विकारलेले दिसून येतो. विधानसभा मतदारसंघाच्या बदललेल्या रचनेमुळे राजकीय संघर्षास वेगळे परिणाम प्राप्त झालेले दिसते. राहुरी तालुक्यात अनेक विकासकामे पुर्ण करत तनपुरे घरण्यातील तिसरी पिढी (प्रसाद शुगर) या खाजगी साखर कारखानदारीच्या माध्यमातून राजकरणात येत आहे.

**१२. पारनेर तालुका :–**

पारनेर तालुका सतत दुष्काळी असणारा तालुका आहे. मात्र कर्तृत्वाच्या व बुद्धीच्या जोरावर आजही नगर जिल्ह्यात प्रगतिपथावर आहे. पुरोगामी विचारसरणीचा व कम्युनिष्ठ पक्षाचा बालेकिल्ला म्हणून पारनेर तालुका ओळखला जात होता. राजकीय वारसा नसलेल्या नेतृत्व राजकारणात आले आहे. त्यांचाच राजकीय दबदबा तालुक्यात वाढत आहे. तालुक्याची बांधणी पुरोगामी विचारांची असल्याने १९५२ व त्यानंतर १९६२ पर्यंत भास्करराव औटी यांनी तालुक्यातील कम्युनिष्ट पक्षाचे प्रतिनिधीत्व केले. तालुक्यातील काँग्रेसमध्ये १९७२ मध्ये कलह सुरू झाला. त्यामुळे काँग्रेस पक्षाने तालुक्याच्या बाहेरील कोपरगाव येथील शंकरराव काळे यांना उमेदवारी दिली. दोन पंचवार्षिक त्यांचे नेतृत्व तालुक्याला लाभले. १९७८ च्या पुरोगामी लोकशाही दलाच्या सरकारमध्ये शंकरराव काळे शिक्षण खात्याचे राज्यमंत्री होते. याच काळात तालुक्यात दुष्काळ पडल्याने शंकरराव काळे यांनी रोजगार हमी योजनेत मोठ्या प्रमाणात कामे केली. रस्ते, पाझर तलावाची कामे केली आहेत. त्यानंतर पुढे १० वर्षे नंदकुमार झावरे व पाच वर्षे वसंतराव झावरे काँग्रेसतर्फे निवडणूका लढवून आमदार झाले. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून पक्षातर्फे वसंतराव झवरे निवडून आले. विधानसभेचा २००४ च्या निवडणुकीत विजय औटी यांनी शिवसेनेची उमेदवारी मिळवली व सलग दुसऱ्यांदा विजयी झाले. पारनेर तालुक्यात काँग्रसचे वर्चस्व राहिलेले नाही. पारनेर तालुक्यातील झावरे कुटुंबातील दुसरी पिढी सुजित झावरे, राहुल

झावरे राजकारणात आहेत. माजी आमदार बाबासाहेब ठूबे यांचे चिरंजीव आझाद ठूबे (कम्युनिष्ट पक्ष) जिल्हा परिषद सदस्य आहेत.[१२५]

बाळासाहेब विखे यांच्या प्रयत्नातून १९८२ मध्ये पारनेर सहकारी साखर कारखाना सुरू केला होता. कारखान्याची विक्री थांबवून तो पुन्हा सुरू करणे हे पारनेर तालुक्यातील राजकीय नेतृत्वाला आव्हान आहे. सुपे लघुऔद्योगिक वसाहतीत मोठे उद्योग आणणे तसेच कान्हूर पठार व १६ गावे व पारनेरसह विसापूर तलावातून पिण्यासाठी व कुकडी कालव्यातून एक टीएमसी पाणी आणणे हे भविष्यकालीन आव्हान पारनेर समोर आहे.

**तक्ता क्र. १.१८**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | दत्तात्रय भगत | कॉंग्रेस |
| १९६७ | एन. टी. गुंजाळ | कॉंग्रेस |
| १९७२ | **शंकरराव काळे** | कॉंग्रेस |
| १९७८ | **शंकरराव काळे** | कॉंग्रेस |
| १९८० | बाबासाहेब ठुबे | भारतीय कम्युनिष्ठ पक्ष |
| १९८५ | नंदकुमार झावरे | कॉंग्रेस |
| १९९० | नंदकुमार झावरे | कॉंग्रेस |
| १९९५ | वसंतराव झावरे | कॉंग्रेस |
| १९९९ | वसंतराव झावरे | राष्ट्रवादी कॉंग्रेस |
| २००४ | विजय औटी | शिवसेना |
| २००९ | विजय औटी | शिवसेना |

क्षेत्रीय पाहणी

## १३. श्रीगोंदा तालुका :–

श्रीगोंदे मतदारसंघात कर्जत तालुक्यातील २८ गावे जोडली गेली आहेत. तसेच जिल्हा परिषदेचे नगर तालुक्यातील वाळकी व चिचोंडीपाटील गट ही जोडण्यात आला आहे. १९८० पर्यंत काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. पण पुढे व्यक्ती केंद्रीत राजकारणातून नेत्याचे महत्व वाढले आहे. काँग्रेसचे नेते शिवाजीराव नागवडे हे १९७८ मध्ये आमदार झाले. यांनी तालुक्याच्या विकासाला दिशा देणाऱ्या घोड धरणासाठी मोठा पाठपुरावा केला. उद्योगपती डहाणूकर यांच्या खाजगी साखर कारखाना विकत घेऊन त्याचे रूपांतर श्रीगोंदे सहकारी साखर कारखान्यात केले आणि नगर जिल्ह्याच्या दक्षिण भागात पहिला सहकारी साखर कारखाा उभा राहिला. यालाच विरोध म्हणून १९८० मध्ये नवीन राजकीय नेतृत्वाचा उदय झाला. बबनराव पाचपुते यांनी शिवाजीराव नागवडे यांच्या प्रस्थापित यंत्रणेला विरोध करत १९८० ते १९९५ पर्यंत श्रीगोंदा तालुक्यातील सत्ता सांभाळली. एकीकडे आमदार म्हणून पाचपूते मतदारसंघावर पकड वाढवत असतानाच नागवडे यांनी श्रीगोंदे सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना भक्कम आर्थिक आधार दिला होता. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी योगदान मानले जाते. १९८४ मध्ये श्रीगोंदा सहकारी कारखान्यावरही बबनराव पाचपुते यांनी वर्चस्व मिळविले होते. सन १९९९ मध्ये नागवडे व पाचपुते यांच्यात संघर्षाचे वातावरण निर्माण झाले. शिवाजीराव नागवडे यांचे चिरंजीव दिपक नागवडे यांनी निवडणुकीची सुत्रे सांभाळली. त्यामुळे लोकांनी पाचपुते यांना नाकारून नागवडे यांना संधी दिली. २००४ मध्ये बबनराव पाचपुते हे पुन्हा आमदार झाले. त्यांच्याकडे वन खात्याचे कॅबीनेट मंत्रीपद सांभाळले. २००८ मध्ये विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतिनिधीत्व करत आदिवासी विकासमंत्र झाले. त्यांच्याकडे चार वर्षे हे खाते होते तसेच बीड चे पालकमंत्री होते. पण दरम्यानच्या काळात त्यांच्या विरोधात असलेले नेतृत्व नागवडे, जगताप, शेलार, नहाट या नेत्यासह हे काँग्रेस पक्षात एकत्र आले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकारणात वर्चस्व मिळविले. जिल्हा परिषद, पंचायत समिती, कुकडी साखर कारखाना, बाजार समिती देखरेख संघ, खरेदी–विक्री संघ या सर्वांवर काँग्रेसने वर्चस्व मिळविले. दरम्यानच्या काळात पाचपूते यांचे मंत्रीपद गेले होते.[१२६]

श्रीगोंदा तालुक्यात पूर्वी एकच सहकारी कारखाना होता. त्यानंतर कुकडी सहकारी साखर

कारखाना देवदैठण येथील साईकृपा १ व हिरडगाव येथील साईकृपा२ हे खाजगी साखर कारखाने सुरू आहेत. असे चार कारखाने तालुक्यात आहेत. घोड व कुकडी धरणामुळे आणि भीमा घोड या नद्यांच्या पाण्यामुळे शेतीचे सिंचन वाढले. त्यामुळे राज्यात सिंचनाच्या बाबतीत तालुका पहिल्या पाच क्रमांकात आहे. बेलवंडी येथे ३० वर्षापूर्वी पहिले तंत्रनिकेतन सुरू झाले आहे. शिवाजीराव नागवडे यांनी ग्रामीण भागात माध्यमिक विद्यालये उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये सुरू केली आहेत. बबनराव पाचपुते यांची माध्यमिक विद्यालये व परिक्रमा शैक्षणिक संकुल आहेत. कुंडलिकराव जगताप यांचेही विद्यालये व शैक्षणिक कार्य मोलाचे आहेत.[१२७]

बबनराव पाचपुते, शिवाजीराव नागवडे, कुंडलिकराव जगताप यांच्या पुढच्या पिढीने विक्रमसिंह पाचपूते, राजेंद्र नागवडे, अनुराधा नागवडे, राहुल जगताप यांच्या रूपाने राजकारणात सक्रीय आहेत.

**तक्ता क्र. १.१९**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | बाबूराव भारस्कर | काँग्रेस |
| १९६७ | बाबूराव भारस्कर | काँग्रेस |
| १९७२ | बाबूराव भारस्कर | काँग्रेस |
| १९७८ | शिवाजीराव नागवडे | काँग्रेस |
| १९८० | बबनराव पाचपुते | जनता पक्ष |
| १९८५ | बबनराव पाचपुते | जनता पक्ष |
| १९९० | बबनराव पाचपुते | जनता दल |
| १९९५ | बबनराव पाचपुते | काँग्रेस |
| १९९९ | शिवाजीराव नागवडे | काँग्रेस |

| | | |
|---|---|---|
| २००४ | बबनराव पाचपुते | अपक्ष |
| २००९ | बबनराव पाचपुते | राष्ट्रवादी काँग्रेस |

क्षेत्रीय पाहणी

**१४. कर्जत तालुका :-**

कर्जत तालुक्याचे वैभव आणि कामधेनू असलेला जगदंबा सहकारी साखर कारखाना राजकीय हस्तक्षेपामुळे बंद पडलेला आहे. साखर कारखाना सोडल्यास तालुक्यात एक ही खाजगी किंवा सार्वजनिक उद्योग नाही. खासगी दुध प्रकल्प आहेत परंतु तालुक्यामध्ये सहकारी दुध संघ नाहीत. सिंचन क्षेत्राचा विचार केल्यास भीमा नदी व कुकडी नदी प्रकल्पामुळे उसाची शेती केली जाते. कर्जतला दादा पाटील महाविद्यालय शिक्षणाची सोय झालेली आहे. मिरजगाव व राशीन येथे शिक्षण क्षेत्रात मागेच आहे.

**तक्ता क्र. १.२०**

| **वर्षे** | **आमदार** | **पक्ष** |
|---|---|---|
| १९६२ | आबासाहेब निंबाळकर | काँग्रेस |
| १९६७ | आबासाहेब निंबाळकर | काँग्रेस |
| १९७२ | रावसाहेब निंबाळकर | काँग्रेस |
| १९७८ | बाजीराव कांबळे | रिपब्लिकन पक्ष |
| १९८० | द. स. निकाळजे | आय काँग्रेस |
| १९८५ | द. स. निकाळजे | काँग्रेस |
| १९९० | विठ्ठल भैलूमे | काँग्रेस |
| १९९५ | सदाशिव लोखंडे | भाजप |
| १९९९ | सदाशिव लोखंडे | भाजप |

| | | |
|---|---|---|
| २००४ | सदाशिव लोखंडे | भाजप |
| २००९ | राम शिंदे | भाजप |

क्षेत्रीय पाहणी

कर्जत–जामखेड विधानसभा मतदारसंघ बराच काळ राखीव होता. मतदारसंघ राखीव होण्यापूर्वी कर्जत–जामखेड तालुक्यात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. या मतदारसंघाने आबासाहेब निंबाळकर यासारखे नेतृत्व उदयास आले. बापूसाहेब देशमुख यांचा तालुक्याच्या राजकारणात मोठा दबदबा होता. डॉ. कुमार सप्तर्षी यांनी युवक क्रांती दलाची चळवळ कर्जत मध्ये सुरू केली आहे. १९९० मध्ये काँग्रेसकडून कर्ज कर्जतमधील माध्यमिक शिक्षक विठ्ठल भैलूमे विजयी झाले. त्यानंतर काँग्रेस पक्षाचे राजकारण संपुष्टात आले असे म्हणता येईल. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत सदाशिव लोखंडे भाजप पक्षातून उमेदवारी मिळवली व सलग तीन पंचवार्षिक सदाशिव लोखंडे आमदार होते. स्वपक्षीयांशी घट्ट नाते विरोधी पक्षातील प्रस्थापितांशी जवळीक स्थानिक राजकारणात हस्तक्षेप न करण्याची वृत्ती कुकडी कालवा यामुळे भाजप पक्ष सत्तेवर राहिला आहे. २००९ मध्ये कर्जत जामखेड मतदारसंघ खुला झाला आहे. भाजपचे राम शिंदे यांच्या विरोधात बाळासाहेब थोरात यांचे व्याही बापूसाहेब देशमुख यांना काँग्रेसची उमेदवारी मिळाली परंतु राम शिंदे यांच्या विरोधात जगदंबा कारखाना, कर्जत तालुका दूध खरेदी संघ आदि संस्था बंद पडल्याचा मुद्दा प्रचारात आल्यामुळे राम शिंदे विजयी झाले. पूर्वीचा जगदंबा साखर कारखाना आता खाजगी मालकीचा होऊन अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अंबालिका साखर कारखाना नावाने सुरू झाल्याने ऊस उत्पादकांना आधार मिळाला आहे.[१२८]

**१५. जामखेड तालुका :–**

जामखेड हा तालुका भौगोलिकदृष्ट्या मराठवाड्यात व चार जिल्ह्यांच्या मध्यभाग आहे. त्यामुळे राजकीयदृष्ट्या मराठवाडा व गोपीनाथ मुंडे यांच्या प्रभावाखाली हा तालुका आहे. त्यामुळे साहजिकच सलग चार वेळा येथे भारतीय जनता पक्षाचे आमदार निवडून आले आहे. जामखेड तालुक्यात बारामाही पाटपाण्याची सोय नसल्याने हंगामी शेती केली जाते. तालुक्यात लहान–मोठे व्यवसाय आहेत. त्यामुळे रोजगार मिळतो. एकंदर परिस्थितीमुळे मतदारांनी नेहमीच सत्ताधाऱ्यांच्या विरोधात मतदान केलेले दिसते.

जामखेड तालुका ३५ वर्षे राखीव मतदारसंघाचा भाग राहिल्यामुळे द. स. निकाळजे यांनी २० वर्षे व त्यांच्यानंतर सदाशिव लोखंडे यांना १५ वर्षे विधानसभेवर संधी मिळाली आहे. बेरोजगार तरूणांना रोजगार मिळावा म्हणून सदाशिव लोखंडे यांच्या पुढाकारातून आणि गोपीनाथ मुंडे यांच्या माध्यमातून तालुक्यात लघुऔद्योगिक वसाहत झाली होती.[१२९] राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रयत्नातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून आमदार राम शिंदे यांच्या काळात राज्य शासनाने झिकी साकत व तरडगाव येथे ३३ के. व्ही. वीज उपकेंद्रे मंजूर केली. तसेच दुष्काळाच्या काळात गोपीनाथ मुंडे यांच्या पुढाकारातून जामखेड येथे पहिली दुष्काळी परिषद घेतली गेली होती. अशा रितीने कर्जत जामखेड तालुका हा सहकाराचा विकास अपवाद असलेला व नवीन नेतृत्वाला स्वीकारणारा तालुका आहे.

**क) लोकसभा :–**

| | **मतदारसंघ** | **विजयी उमेदवाराचे नाव** | **पक्ष** |
|---|---|---|---|
| १. | **१९५२ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर (उत्तर) | कानवडे पंढरीनाथ रामचंद्र | काँग्रेस |
| | अहमदनगर (दक्षिण) | बोगावत उत्तमचंद रामचंद्र | काँग्रेस |
| **२.** | **१९५८ ची लोकसभा निवडकणूक** | | |
| | नगर (दक्षिण) | श्री. र. के. खाडीकर | समिती |
| | कोपरगाव | बी. सी. कांबळे | समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | **१९६२ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | नगर (दक्षिण) | मोतिलाल फिरोदिया | काँग्रेस |
| | कोपरगाव | श्री. आण्णासाहेब शिंदे | काँग्रेस |
| ४. | **१९६७ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | नगर (दक्षिण) | अनंतराव पाटील | काँग्रेस |
| | कोपरगाव | श्री. आण्णासाहेब शिंदे | काँग्रेस |
| ५. | **१९७१ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | नगर (दक्षिण) | श्री. आण्णासाहेब शिंदे | नवकाँग्रेस |
| | कोपरगाव | **बाळासाहेब विखे** | नवकाँग्रेस |
| ६. | **१९७७ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | नगर (दक्षिण) | **बाळासाहेब विखे** | काँग्रेस |
| | कोपरगाव | श्री.आण्णासाहेब शिंदे | काँग्रेस |
| ७. | **१९८० ची लोकसभा निवडणूक** | | |
| | नगर (दक्षिण) | चंद्रभान आठरे | आय काँग्रेस |
| | कोपरगाव | **बाळासाहेब विखे** | आय काँग्रेस |
| ८. | **१९८४ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | नगर (दक्षिण) | **यशवंतराव गडाख** | भा. रा. काँग्रेस |
| | कोपरगाव | **बाळासाहेब विखे** | भा. रा. काँग्रेस |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | **१९८९ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर | **यशवंतराव गडाख** | काँग्रेस |
| | कोपरगाव | **बाळासाहेब विखे** | काँग्रेस |
| १०. | **१९९१–९६ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर | **यशवंतराव गडाख** | काँग्रेस |
| | कोपरगाव | **शंकरराव काळे** | काँग्रेस |
| ११. | **१९९५–९८ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर | मारूती शेळके | काँग्रेस |
| | कोपरगाव | भीमराव बडदे | भाजप |
| १२. | **१९९८–९९ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर | **बाळासाहेब विखे** | शिवसेना |
| | कोपरगाव | **प्रसाद तनपूरे** | काँग्रेस |
| १३. | **१९९९–२००४ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर | दिलीप गांधी | भाजप |
| | कोपरगाव | **बाळासाहेब विखे** | शिवेसेना |
| १४. | **२००४–२००९ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर | तुकाराम गडाख | राष्ट्रवादी काँग्रेस |
| | कोपरगाव | बाळासाहेब विखे | काँग्रेस |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | **२००९–२०१४ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर | दिलीप गांधी | भाजप |
| | शिर्डी | भाऊसाहेब वाकचौरे | शिवसेना |
| १६. | **२०१४ ची लोकसभा निवडणूक** | | |
| | अहमदनगर | दिलीप गांधी | भाजप |
| | शिर्डी | सदाशिव लोखंडे | शिवसेना |

क्षेत्रीय पाहणी

१९५० ते १९६० या दशकातील लोकसभेच्या दोन्ही जागा काँग्रेसलाच मिळाल्या होत्या. काँग्रेस पक्षाचे स्वातंत्र संग्रामातील योगदान हे निवडणूकीतील त्यांच्या यशाचे महत्वाचे कारण होते. १९५७ च्या लोकसभा निवडणूकीत काँग्रेस विरोधी पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या रूपाने काँग्रेसवर मात केलेली दिसते. १९५८ ला अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थापना झाली. याच दशकात सहकारी साखर कारखान्यांची संख्या वाढली. सामान्य जनतेचा राजकीय सहभाग वाढला. सहकाराचे राजकारणात शिरकाव केला. याचे कारण म्हणजे सहकारातील नेतृत्वानीच राजकारणात भाग घेतला. अहमदनगर जिल्ह्यात काँग्रेस नेतृत्व आघाडीवर होते. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व लाभल्याने नगर जिल्ह्यातील विरोधी पक्षातील अनेक नेत्यांनी पक्षांतर केले. यशवंतराव चव्हाणांच्या धोरणाचाच एक भाग म्हणून आण्णासाहेब शिंदे, शंकरराव काळे, भाऊसाहेब थोरात हे काँग्रेसमध्ये आले. बाळासाहेब भारदे या नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाची बांधणी भक्कमपणे झालेली दिसते. १९६२ लोकसभेच्या दोन्ही जागा जिंकून जिल्ह्याच्या राजकारणात आपले वर्चस्व निर्माण केले. १९६७ ला पंडित नेहरूंच्या निधनानंतर निवडणूका झाल्या. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव भारतीय राजकारणावर होता. पंडित नेहरूंची दुसरी पिढी इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली प्रथम निवडणूका झाल्या. नगर दक्षिण मधून अनंतराव पाटील व कोपरगाव मतदार संघातून पुन्हा एकदा आण्यासाहेब शिंदे विजयी झाले. १९७२ नंतर जिल्ह्याच्या राजकारणात राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील राजकीय बदलाचे प्रतिबिंब उमटले. सहकाराच्या माध्यमातून विकासाचे सकारात्मक राजकारण झाले. विधायक दृष्टीने आर्थिक व राजकीय विकास आराखडा

घडवला गेला. त्याला आता वळण लागले. सत्तेसाठी आणि सत्तेपुरते राजकारण करणाऱ्यांचे महत्व वाढले. नगर जिल्ह्यात राजकारणाला दृश्य परिणाम म्हणजे सहकार चळवळ आणि विशेषतः सहकारी साखर कारखानदारी यामधून उदयाला आलेल्या नेतृत्वाला आव्हान दिले जाऊ लागले. शुगर लॉबी एकसंघतेला हादरे देण्याचा आणि त्यात फूट पाडण्याचा प्रयत्न झाला. १९७१ च्या लोकसभा निवडणूकीत बाळासाहेब विखे पाटील यांना कोपरगाव मतदार संघातून काँग्रेसची उमेदवारी मिळाली. काँग्रेस विरोधात असणाऱ्या के. बी. रोहमारेंनी विखेंना पाठिंबा दिला. विखे–खताळ–रोहमारे यांचा एक बालिस्ट गट उत्तर नगर जिल्ह्यात निर्माण झाला. दुसरीकडे काळे–कोल्हे थोरात निंबाळकर हा एक कार्यशील होता. १९७७ च्या लोकसभा निवडणूकांचे हे चित्र एकंदर जिल्ह्यातील राजकारणात बदल झाले. याचा परिणाम जिल्ह्यातील सहकारी साखर संस्था सहकारी बँका व सहकारी साखर कारखाने यामधील मक्तेदारीला बऱ्याच प्रमाणात शह बसला. काँग्रेसच्या राजकारणामध्ये बरेच अस्थैर्य निर्माण झाले. पक्षापेक्षा नेत्यांच्या व्यक्तिगत बळाला अधिक महत्व प्राप्त झाले. हे नेते वारंवार आपले शत्रू व मित्र बदलत राहिले. त्यामुळे जिल्ह्यातील राजकारण कोणत्याही एका पक्षाच्या प्रभुत्वाखाली राहिले नाही. १९८४ च्या लोकसभा निवडणूकीतून राजकीय वारसा नसलेले मारूतराव घुले यांच्या मार्गदर्शनातून यशवंतराव गडाख नेतृत्व राजकारणात आले. बबनराव ढाकणे यांना पराभूत करून यशवंतराव गडाख भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे खासदार झाले. कोपरगाव मधून बाळासाहेब विखे चौथ्यांदा विजयी झाले.[१३०]

१९८० नंतर जिल्ह्यात कारखानदारी दुग्धसंस्था बरोबरच राजकीय नेत्यांनी शिक्षण संस्था उभारल्या. त्यात विना अनुदानित शिक्षण संस्था उभारण्यावर त्या काळातील प्रस्थापित पुढाऱ्यांनी लक्ष केंद्रित केले. अनुदानाशिवाय शिक्षण संस्था चालविताना निधी उभारण्याचे जे मार्ग त्यांना उपलब्ध झाले. त्यातून प्रचंड प्रमाणात पैसा जमा करण्याचेच शिक्षणसंसथा हे त्यांना एक साधन होते. घराण्यातून आलेले नवीन नेतृत्व स्वार्थी व सत्ताकांक्षी होते. त्यांच्याकडे ध्येयवाद नव्हता. शिक्षणसंस्थातूनच भ्रष्टाचार फार मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते.[१३१]

निवडणूकांचा राजकारणापासून अलिप्त राहूनही राजकारणावर अप्रत्यक्षरित्या परिणाम एक वेगळी शक्ती शेतकरी संघटनेच्या रूपात महाराष्ट्रात उदयाला आली. ज्या जिल्ह्यामध्ये शरद जोशींच्या या संघटनेला विशेष प्रतिसाद मिळाला त्यामध्ये नगर जिल्हा आघाडीवर होता. भास्करराव बोरावके यांसारख्या कार्यकर्त्यांमधून शेतकरी संघटनेचे नेतृत्व जिल्ह्यातून पुढे आले.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे राजकारणातील सत्तासमतोल बदलू लागला. मात्र संघटनेचा जिल्ह्यातील प्रभाव कमी होऊ लागला.[१३२]

महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्ष प्रबळ होता. त्याला शह देण्यासाठी शिवसेना ग्रामीण भागात दिसू लागली. शिवसेनेच्या मदतीने भारतीय जनता पक्षही ग्रामीण भागात दिसू लागला. संपूर्ण नगर जिल्ह्याच्या राजकारणात शिवसेना भाजपने प्रवेश केलेला आहे आणि तो आजही कायम आहे. याचे कारण म्हणजे बेकारी महागाई हे होय. तरूण वर्ग नोकरी उद्योग मिळेना म्हणून शिवसेना पक्षांकडे आकर्षिला आणि दुसरे म्हणजे बाळासाहेब ठाकरेंची वकृत्वशैली व आश्वासने यामुळे तरूण शिवसेनेकडे जाऊ लागले.

१९९९ च्या निवडणुकांतून शिवसेना भाजपला स्पष्ट बहुमत दिसून येते. त्यातून नवीन नेतृत्व उदयाला आले व आपली सत्ता टिकून ठेवू शकले. १९९९ च्या निवडणूक अहमदनगर मतदारसंघातून दिलीप गांधी विजयी झाले व पुढे २००९ व २०१४ मध्ये अहमदनगर मतदार संघावर वर्चस्व दिसून येत आहे. २००४ च्या निवडणुकांमध्ये अहमदनगर मतदार संघातून तुकाराम गडाख हे नवीन नेतृत्व लोकसभेवर निवडून आले. निवडणूकीच्या सहा महिने मारूतराव घुले व यशवंतराव गडाख यांच्या मध्यस्थीने तुकाराम गडाख राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आले व भाजपच्या ना. स. फरांदे यांचा पराभव केला होता. कोपरगाव मतदारसंघातून बाळासाहेब विखे विजयी झाले. २००४ च्या निवडणूकीमध्ये बाळासाहेब विखे हे शिवसेनेतून पुन्हा काँग्रेसमध्ये आलेले दिसते.

२००९ नंतर मतदार संघाच्या पुर्नरचनेमुळे शिर्डी मतदारसंघ हे मागसवर्गीय आरक्षित झाल्याने घराण्याचे वर्चस्व कमी झाले. २००९ च्या निवडणुकीत कोणतीही यंत्रणा नसताना भाऊसाहेब वाकचौरे व २०१४ मध्ये निवडणूकीत नरेंद्र मोदीच्या लाटेमुळे सदाशिव लोखंडे निवडून आले. अहमदनगर मतदार संघातून २००९ व २०१४ मध्ये दिलीप गांधी भाजपकडून दोनवेळा विजयी ठरले.[१३३]

जिल्ह्यातील नेतृत्व बाळासाहेब विखे कोपरगाव लोकसभा मतदार संघातून १९७१, १९७७, १९८०, १९९४ आणि १९९९ पाच वेळा निवडून आले होते. परंतू त्यांना राजीव गांधी विरूद्धचा कृतीशील विचारमंच नडला. त्यामुळे त्यांना १९९१ च्या निवडणुकीत काँग्रस पक्षाने तिकीट नाकारले म्हणून अहमदनगर मतदार संघातून ते अपक्ष म्हणून उभे राहिले. त्यांचा यशवंतराव गडाखाविरूद्ध निसटता पराभव झाला. परंतू त्यांनी गडाखांच्या निवडीला न्यायालयात

आव्हान दिले. या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. हा निकाल बाळासाहेब विखेंच्या बाजूने लागला. याचाच परिणाम म्हणून मुख्य निवडणूक आयुक्त टी.एन.शेषन यांच्यामुळे निवडणूक आचारसंहिता सामान्य माणसाला ही समजू लागली. यानंतर या मतदार संघात लोकसभेची पोट निवडणूक झाली.[१३४]

सत्तास्थाने नवीन पिढीच्या ताब्यात गेलेली दिसून येतात. परंतू यामध्ये स्वकर्तृत्वावर पुढे आलेले नेते जेवढे होते त्यापेक्षा घराणेशाहीचा वारसा म्हणून अधिकारपद मिळविणारे आधीच्या पुढाऱ्यांचे वारस अधिक होते. एका अर्थाने जिल्ह्याच्या राजकारणातला नव्या पिढीचा उदय या दुसऱ्या अर्थाने जिल्ह्याच्या राजाकरणातला व समाजकारणातील घराणेशाहीचा प्रारंभ होता. एकंदर लोकसभा निवडणुकीचा विचार करता राजकीय नेतृत्वापैकी आण्णासाहेब शिंदे ३ वेळा व दिलीप गांधी ३ असे लोकसभेचे प्रतिनिधीत्व केले व सत्तेमध्ये आपले स्थान कायम केले. आण्णासाहेब शिंदे, बाळासाहेब विखे यांनी केंद्रात मंत्रीपद भुषविले. मात्र यशवंतराव गडाख हे ३ वेळा लोकसभेवर निवडून आले परंतू मंत्रीपद मिळालेले दिसत नाही.[१३५]

सारांशरूपाने अहमदनगर जिल्हा व महाराष्ट्रात सर्वांत जास्त क्षेत्रातील असलेला जिल्हा आहे. दुष्काळग्रस्त जिल्हा हा सर्वाधिक सिंचन क्षेत्र बनलेला आहे. अहमदनगर जिल्हा चळवळीचा जिल्हा म्हणूनही ओळखला जातो. असा हा जिल्हा सहकारी साखर कारखाना सहकारी दुग्धोत्पादन अहमदनगर जिल्हा सहकारी बँक यामुळे नावारूपास आलेला आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची माहिती दर्शविली आहे. उद्योग क्षेत्रात अहमदनगर जिल्हा प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र राज्याच्या निम्याहून अधिक साखरेचे उत्पादनात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. एकंदरित अहमदनगर जिल्ह्यातील सहकार पुढारलेला दिसून येतो.

जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने हे पर्याय सत्ताकेंद्र म्हणून प्रसिद्ध आहेत. इतर सहकारी संस्था या ही स्थानिक पातळीवरील सत्तेच्या व्यवहारात महत्वाची भूमिका बजावतात. सहकारी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत आर्थिक विकास साधणारी एक व्यवस्था काँग्रेसच्या नेतृत्वाखाली राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात विकसित करण्यात आली. कृषी व कृषीआधारित व्यवसायांमार्फत ग्रामीण भागामध्ये एक मोठा बदल काँग्रेसच्या या राजकारणामुळे घडून आला. सहकारी संस्था आणि शासकीय यंत्रणा यांच्या समन्वयातून

सत्ताधारी पक्षाने राज्याच्या अर्थकारणावर एवढी जबर पकड बसवणे हे संपूर्ण देशाच्या राजकीय इतिहासातील विरळ उदाहरण आहे. साखर कारखाने, दूधसंघ सहकारी बँका विविध उत्पादक संघ यांच्यामार्फत जनतेच्या हितसंबधांशी जोडून घेणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत हितसंबधाचं राजकारण करणे असा उपक्रम काँग्रेस पक्षाने वर्षानुवर्षे यशस्वीपणे राबवला. १९९५ साली भारतीय जनता पक्ष शिवसेना युतीचं सरकार सत्तेवर येईपर्यंत ही व्यवस्था सुखाने चालत होती. १९९५ ते १९९९ या चार साडेचार वर्षात मात्र या व्यवस्थेला बाहेरून जोरदार धडका दिल्या गेल्या आणि काँग्रेसच्या एकछत्री अंमलाची सांगता होऊ लागली. दुसरीकडे काँग्रेसने तयार केलेल्या सत्तेवर कुणाचे नियंत्रण राहील याबाबतची जी स्पर्धा खुद्द पक्षात चालू होती तिला १९७८ आणि १९९९ मधील पक्षफुटीमुळे मोकळी वाट करून दिली गेली. महाराष्ट्रात पर्यायी राजकीय शक्ती तयार होणे आणि काँग्रेस एकसंध न राहणे यामुळे महाराष्ट्राची वैशिष्ट्यूपर्ण अर्थराजकीय व्यवस्था आज मोडकळीला आलेली दिसते. या प्रक्रियेची पाळंमुळे काँग्रेसची एकूण राजकारणावरील पकड निसटण्यात आणि महाराष्ट्रातील सर्वच पक्षांनी आर्थिक–सामाजिक हितसंबंधाचं राजकारण करण्यास नकार देण्यात दिसतात. त्यामुळे आर्थिक विकासातून राजकीय पकड मजबूत करण्याचे काँग्रेसचे वैशिष्ट्य जसे मागे पडले आहे. त्याचप्रमाणे स्पष्ट पर्यायी विचारव्यूह आणि आर्थिक कार्यक्रम देण्यात उर्वरित पक्ष अपयशी ठरल्यामुळे महाराष्ट्राचे आजचे राजकारण हे कोणत्याही अजेंड्याविना चालले आहे. राज्याच्या राजकारणातील स्पर्धा वाढल्यामुळेही सर्व पक्ष आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांत साधारणपणे एकसारखेच वर्तन करताना दिसतात. त्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण बिनचेहऱ्याचेही बनू पाहत आहे.

## १.१५ सहकाराच्या राजकीय नेतृत्वाचे भवितव्य :–

काँग्रेस वर्चस्वाचा एक आधार म्हणून सहकार क्षेत्राकडे पाहिले जाते. यशवंतराव चव्हाणांनी ग्रामीण विकास व शेतकऱ्यांचे निरीक्षण या हेतूंनी विविध प्रकारच्या संस्थांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले त्यामुळे सहकारी साखर कारखाने सहकारी बँका सूतगिरण्या अस्तित्वात आल्या. या यंत्रणेमुळे स्थानिक पातळीवर सत्तेची शासनबाह्य केंद्र अस्तित्वात आली आणि पक्ष काँग्रेसला शक्य झाले. सहकार क्षेत्रावरील नियंत्रणातून व उत्पादनाच्या साधनातून तालुका व जिल्ह्यातील

नेतृत्वाला निवडणूकीवर वर्चस्व निर्माण करणे सोपे झाले आहे.[१३६]

सहकारी संस्था एकत्रित भाग भांडवलातून विकसित झाल्या तरी सहकारी मदतीमुळे सहकारी संस्थांचा अधिक विकास झाला. परंतु त्यांचे दूरगामी अनिष्ट परिणाम झाल्याचे दिसतात. म्हणजेच सहकारी संस्था राजकारणाचाच एक भाग बनला. सहकारी संस्था म्हणजे आर्थिक लोकशाही त्याची जागा जनमान्य घराणेशाहीने घेतली. यात दिवसेंदिवस राजकारणाचा वाढता हस्तक्षेप दिसून येऊ लागला. स्वार्थापोटी चुकीचे अथवा कालबाह्य निर्णय घेतले जाऊ लागल्याचे दिसतात. ग्रामीण भागात श्रीमंत घराण्यांची सत्ता चालते. तर शहरी भागात भांडवलदार वर्गाची सत्ता चालते यातून जिल्ह्यांची आर्थिक व राजकीय सत्ता या मूठभर लोकांच्या हाती एकवटली असल्याचे दिसते. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या नावाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मार्फत काँग्रेस पक्षाने ग्रामीण भागात अशी पोलादी चौकट बसविलेली दिसते. शहरी व ग्रामीण राजकारणाला काँग्रेस पक्षाचे राजकारण म्हटले जाते. हे राजकारण जातीवर अवलंबलेले नसून विशेषत: पैशावर व सामाजिक स्तरावर अवलंबून असल्याचे दिसते. अहमदनगर जिल्ह्यात मराठा हाच बहुसंख्यांक जात असल्याने लोकशाही कारभारात प्राधान्याने राज्यसत्तेतील मोठा वाटा असणारे परंतू त्यातही श्रीमंत घराण्यांच्या हाती सर्व सत्ता केंद्रभूत झाल्याचे दिसते.[१३७]

साखर उत्पादकांचा मोठा प्रभाव अहमदनगर राजकारणावर आणि धोरणांवर आहे. त्याचा दबावगट (शुगर लॉबी) म्हणून ओळखला जातो. स्थानिक नेतृत्व हे साखरेच्या राजकारणाशीच निगडित आहे. शुगर लॉबी ही साखर सम्राटांची असून ती कोणाचीही राजकीय पक्षासारखी दिसून येणारी नसली तरी याचे अस्तित्व राजकारणातून वेळोवेळी जाणवत राहते कधी सत्तेच्या तर कधी दबावगटाच्या माध्यमातून ती आपले कार्य साधते. हा गट विशेषत: साखर कारखान्याच्या राजकारणातून उदयास आला आहे. साखर कारखान्यातूनच घराण्यांचे वर्चस्व कायम आहे. सहाजिकच साखर उद्योगांवर नव श्रीमंतांचे वर्चस्व निर्माण होऊन ते नव्या राजकीय नेत्यांच्या भरतीचे मुख्य स्त्रोत बनले आहेत. अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणात कायम मराठा समाजाचेच वर्चस्व राहिलेले आहे. परंतू त्यात अनेक कट निर्माण झाले आहे. विखे घराणे, थोरात घराणे, काळे–कोल्हे घराणे, राजळे घराणे, गडाख घराणे, घुले घराणे, पाचपुते घराणे ही सर्व घराणी मराठा समाजाची असून सहकारी संस्था वर पकड असणारी आहे. या घराण्याचीच दुसरी–तिसरी पिढी सहकाराच्या माध्यमातून जिल्ह्यावर राज्य करत आहे. नगर जिल्ह्यातील सुपीक जमिनी,

मुबलक सिंचन व सहकारी संस्थांचा मोठ्या प्रमाणात झालेला विकास त्यामुळे सगळीकडे ऊसाची शेती व दहा–वीस किमीच्या अंतरावर एक साखर कारखाना असे चित्र दिसते. जिल्हा सहकारी बँक, सहकारी सोसायट्या, कृषी उत्पन्न बाजार समित्या यामुळे आर्थिक समृद्धी मोठ्या प्रमाणात झालेली आहे. त्यामुळे ग्रापंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लोकसभा, विधानसभा, निवडणूकांसारखे महत्व वाढले आहे. तालुक्यातील वर्चस्व असणारी घराणी निवडणूकांवर खर्च करतात. त्यामुळे सहकारातील निवडणूका निव्वळ खरेदी–विक्री करताना दिसतात. निवडणूकीच्या काळात केलेल्या कार्याचे मूल्यमापन होत नाही. पक्षाची विचारधारेचा विचार केला जात नाही. तर किती पैसा खर्च केला यावर निवडणूकीचे निकाल अवलंबून असतात. दूसरीकडे सहकारी संस्थांच्या माध्यमातून आलेली घराण्याची पुढची पिढी ही कुटूंब प्रमुखाच्या कार्यावर सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य, कारखान्यावर डायरेक्टर किंवा थेट चेअरमन जिल्हा बँकेचे संचालक किंवा अध्यक्ष नगरसेवक नगर अध्यक्ष महापौर होताना दिसत आहे. त्यामुळे सहकारामध्ये चंगळवाद विकसित होताना दिसतो. यातूनच तालुक्या–तालुक्यामध्ये स्थानिक मातब्बर गब्बर पुढारी गुंडागर्दी आपसातील हेवे–दावे आणि सुडाचे राजकारण नगर जिल्ह्यात केले जात आहे. अशा राजकीय वर्चस्व वादातून निर्माण झालेल्या दोन घराण्यांचे वैमन्यास्यातून अहमदनगर शहरामध्ये हत्याकांड झालेला दिसून येत आहे. जिल्ह्यात राजकीय पक्षापेक्षा व्यक्तीला जास्त महत्व असल्याने याचे कारण अर्थातच प्रत्येकाची स्वतःची राजकीय आणि आर्थिक ताकद आहे. त्यामुळे घरण्यांच्या भवितव्याची चिंता वाटते. गावातील सत्ता ही सरपंच किंवा पक्षांच्या नावे ओळखली जात नाही तर तेथील सत्ता ही नेत्यांच्या नावाने ओळखली जाते. व्यक्तीच्या नावाने येथील पक्ष चालतात. प्रत्येक नेत्याने आपआपला गळ आणि तेथील विरोधाचे राजकारण तेवढ्याच शर्थीचे जपले आहे. काळे विरूद्ध कोल्हे, विखे विरूद्ध थोरात, राजळे विरूद्ध ढाकणे, पाचपूते विरूद्ध नागवडे आणि तनपुरे विरूद्ध कदम अशी काही राजकीय संघर्षाची प्रमुख उदाहरणे सांगता येतील. मात्र हा संघर्ष नात्यागोत्यात बदलताना दिसतो.[१३८]

अहमदनगर जिल्ह्यात सहकारी संस्था वाढल्या. परंतू सहकाराला केंद्रस्थानी ठेवून राजकीय पुढाऱ्यांनी नगर जिल्ह्याची विकासाची मोठ बांधण्याचा प्रयत्न केला नाही हे अहमदनगर राजकारणांचे अपयशच म्हणावे लागेल. कुरघोडीच्या राजकारणात जिल्हाचा विकास हरवत

चाललेला दिसतो. याचे भान प्रस्थापित पुढाऱ्यांना राहिले नाही. त्यामुळेच जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला अपयश पत्करावे लागले आहे. नगर जिल्ह्याचा विकास इतर जिल्ह्याच्या तुलनेने २५ वर्षे मागे पडल्याची खंत आहे. नगर शहरांचे नियोजन यशस्वी होऊ शकले नाही त्यामुळे नगरची खेडी ही प्रतिमा अद्यापही पुसली जात नाही.

जिल्ह्याच्या भविष्यासाठी दिशा देण्यासाठी सर्वच राजकीय घराण्यांनी पक्षभेद विसरून एकत्र येण्याची गरज आहे. राज्याला हा जिल्हा आतापर्यंत दिशादर्शन करत आला आहे. मात्र राजकारणाचे केंद्रीकरण झाले असून राजकीय सत्ता काही घराण्याभोवती गुरफुटत चालली आहे. त्यामुळे ही घराणी विकासाच्या मुद्यावर एकत्र येताना दिसत नाही. विकासाचे मुल्यमापन केले तर केवळ स्वार्थ आणि सोयरेशाहीच राजकारण यामुळे दोन्ही काँग्रेसच्या काळात विविध क्षेत्रात मक्तेदारी तयार झाली. सहकार क्षेत्र किंवा साखर कारखाने वाढले म्हणजे विकास होतोय असे नाही. खाऊ वृत्तीने सहकाराचा दर्जा खालावला.[१३९]

काही राजकीय घराण्यांनी त्यातही सहकाराचाच वापर करून आपली खाजगी साखर कारखान्याची लॉबी तयार केली आहे. म्हणजे स्वतःच मालक झाले आहे. सहकारी साखर कारखान्यावर कोट्यावधीचे कर्ज आहे. त्या कारखान्यात सर्व समाजातील गोरगरिबांना ठिकाणी स्थान नव्हते. अर्थात ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकारांना या साखर कारखान्यांनी सामावून घेतले. ग्रामीण अर्थव्यवस्था सशक्त बनली असली तरी सहकारातील भ्रष्ट कारभारामुळे अनेक कारखाने मोडित निघाले आहे. सहकारी दुधसंघ डबघाईला आले, बंद पडले. सहकारी पतपेढ्यामध्ये गैरव्यवहार आहे. यामुळे सहकारातून पुढे आलेल्या राजकीय नेतृत्वाचे भवितव्य धोक्यात आहे.[१४०]

दोन्ही काँग्रेसची २०१४ पासून सत्ता नसल्याने अस्वस्थ झालेल्या अनेक काँग्रेस नेत्यांनी भाजप पक्षाशी हातमिळवणी केली आहे. अनेक वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असणारे श्रीगोंद्याचे बबनराव पाचपुते या नेतृत्वाचे सत्तेसाठी भाजप मध्ये प्रवेश केला आहे. पाथर्डीचे राजळे घराण्यांनी सत्ता स्वतःच्या घरात ठेवण्यासाठी राजीव राजळे यांनी भाजपमध्ये प्रवेश करून पत्नी मोनिका राजळे यांना विधानसभा सदस्य केले. कोपरगाव येथे राष्ट्रवादी व दोन्ही काँग्रेसचे वर्चस्व जिल्ह्यात कमी होत आहे.[१४१]

कम्युनिष्टानंतर जिल्ह्यावर वर्चस्व मिळवलेल्या दोन्ही काँग्रेसला अस्तित्वासाठी आता

झगडावे लागत आहे. हे नव्याने येणाऱ्या राजकीय नेतृत्वासाठी आव्हान आहे. वास्तविक पाहता काँग्रेसचे आमदार राधाकृष्ण विखे यांच्याकडे विरोधी पक्षनेते पद असताना फारसा दरारा त्यांना सरकारमध्ये निर्माण करता आलेला दिसत नाही विखे घराण्याची भाऊबंदकी समोर येत आहे. अशोक विखे यांनी केलेल्या आरोपांमुळे राधाकृष्ण विखे यांना अडचणीशी सामना करावा लागत आहे. काँग्रेसचे मंत्री व आमदार बाळासाहेब थोरात यांच्यात काटशह सुरूच आहे. थोरात हे संगमनेरच्या बाहेर पडल्यास तयार नाही. त्यामुळे घराण्याच्या अस्तित्वाची चिंता आहे. घुले घराण्यांना आपल्या अस्तित्वासाठी झगडावे लागत आहे. गडाख घराणे विरूद्ध भाजपचे आमदार बाळासाहेब मुरकुटे असा संघर्ष अटळ आहे. यशवंतराव गडाख यांची राजकीय भूमिका अस्थिरच आहे.[१४२] आपल्या शिवाय दुसरे राजकीय नेतृत्व निर्माण होऊ द्यायचे नाही. या राजकीय घराण्यांच्या संकूचित वृत्तीमुळे इतरांच्या सत्तेच्या राजकारणाचा तिटकारा वाढतो आहे. कारण ग्रामीण भागात जिल्हा परिषद आणि शहरी भागात महानगर पालिकेच्या पुढची सत्ता या घराण्याव्यतिरिक्त इतर लोकांना मिळत नाही. परिणामी नव्याने राजकारणात येऊ इच्छिणाऱ्यांच्या पाठिशी एका मर्यादेपलीकडे उभे न राहता घराणेशाही पुढे येते.

अहमदनगर जिल्ह्यात नवीन नेतृत्व उदयास आले तरी त्या नेतृत्वाकडे सहकारी संस्था नसल्याने आर्थिक विकास मागे पडताना दिसतो. उदा. नेवाशातील आमदार बाळासाहेब मुरकुटे सर्वसामान्यातून विधानसभा सदस्य बनले परंतू सहकार साखर कारखाना सहकारी बँक सोसायट्या दुधसंघ ताब्यात नाही. ही सहकारी संस्था सहकारी घरण्यांच्या वर्चस्वाखाली असल्याने अर्थव्यवस्था पुर्णपणे घराण्यांच्या ताब्यात राहते. यामुळे तालुका पातळीवर नव्या राजकीय नेत्यांचीच भावी आमदार होण्याच्या टप्प्यावरच राजकीय घराण्यांकडून त्याचे एकतर खच्चीकरण केले जाते किंवा सत्तास्थानात दुय्यम पद देऊन त्याला स्थिर केले जाते. याला विरोध करून ते राजकीय नेतृत्व पुढे आले. त्यांनी केलेली कामे आणि अनुभव पाहता अशी उदाहरणे दुर्मिळच आहे.[१४३]

अहमदनगर जिल्हा महाराष्ट्राचे राजकारणातील एक अग्रगण्य जिल्हा म्हणून ओळखला जातो. अनेक नेत्यांनी त्यामागची भावना ठेवून भरीव कार्य मागील पिढीमध्ये केले आहे. त्याचे वारसदार प्राप्त स्थितीत राजकारणात आहे. त्यामुळे जिल्ह्यात घराणेशाही निर्माण झाली आहे. ज्या नेत्यांनी समाजाच्या तळागाळात जाऊन जुन्या पिढीमध्ये परंपरा चांगली निर्माण केली त्यांना विशेषत:

त्यांच्या मुलांना उज्ज्वल भवितव्य आहे. भवितव्याचा विचार करता काही पिढ्या राजकीय लाटेत संपणार आहेत. काही घराण्यात भाऊबंदकीचा आजार बळावत जाणार आहे. त्यामुळे त्यांचे भवितव्य संपणार आहे. तथापि डॉ. पद्मश्री विखे पाटील यांनी निर्माण केलेली चांगल्या कामाची परंपरा त्या घराण्याला सोनेरी भवितव्याकडे घेऊन जाताना आढळत आहे. स्व. डॉ. आण्णासाहेब शिंदे, माजी आ. संभाजीराव फाटके यांनी स्वतःच्या मुलांना राजकारणापासून हेतू पुरस्सर दूर ठेवून चांगला निर्णय घेऊन समाजात आदर्श निर्माण केले आहेत. काळे–कोल्हे घरण्याची पडझड सुरू झाली असली तरी त्यांचे अस्तित्व राहणार आहे. ज्या घराण्याची उत्तम आर्थिक स्थिती व समाजात कामे आहेत त्यांचे स्थान या पिढी पुरते राहिले तरी पुढे तरूण वर्ग क्रांती करून यांना संपवण्याचा निर्धार करतील. गडाख–राजळे यांचे अस्तित्व अधांतरीआहे. संगमनेरच्या थोरात घराण्यांची परंपरा पुढे चालु राहील. नागवडे यांनी स्पर्धा चालू ठेवल्यामुळे त्यांना एक–दोन पिढ्या राजकीय मरण नाही.

१. चांगले विचार

२. शुद्ध आचार

३. उत्तम संस्कार

४. समाज–दांडगा संपर्क

५. जनसेवेच कार्य इ.

डोळ्यासमोर ठेवून व भ्रष्टाचारापासून दूर राहिल्यास काही घराण्याला सोनेरी भवितव्य आहे. तथापि काळाच्या वेगवान परिवर्तनामुळे नेस्तनाबूत होती. तिसरी पिढी संपणार व चौथी पिढी लवलेश रूपात राहणार नाही हे निर्विवाद सत्य आहे.[१४४]

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सहकारी चळवळीपुढे खाजगी क्षेत्राचे जबरदस्त आव्हान असल्याची जाणीव सहकार सम्राटांना करून दिली आहे. खाजगी साखर कारखान्यांचे सहकारी कारखान्यात रूपांतर झाले. सहकारी साखर कारखान्यांची संख्या राज्यात प्रचंडवाढली. सहकारी कारखाने हे कार्य क्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून जमवलेल्या भाग–भांडवलातून उभारले गेले. या सहकारी साखर कारखाना उभारणीमध्ये सहकारी नेतृत्वाचे मोठे योगदान आहे. सहकारी क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करणाऱ्या नेतृत्वांनी सहकारी संस्था सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त ठेवल्या होत्या. नंतरच्या काळात मात्र सहकारी कारखान्यात राजकारण

आणले. सहकारी कारखान्यांचे अध्यक्षपद आणि लागोपाठ आमदारकी असे सत्तेच्या राजकारणाचे सुत्र झाले. सहकारी कारखानदारी आणि मोठ्या सहकारी संस्थात भ्रष्टाचार वाढला. अकार्यक्षम कारभार, राजकारण आणि उधळपट्टीमुळे साखर कारखाने मोडकळीस आले. राज्यातल्या सहा जिल्हा मध्यवर्ती बँका गैरव्यवहाराने आर्थिक संकटात सापडल्या. काही सहकारी साखर कारखाने कर्जामुळे बंद पडले. सहकारी संस्थांच्या निवडणुकात प्रचार करणारी काही नेते मंडळी झटपट श्रीमंत झालेली दिसतात. ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आजारी पडल्या. २२ तोडल्या गेल्या आहे. हे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. सहकाराच्या नावाखाली राज्याच्या ग्रामीण भागत सत्तेची नवी संस्थाने, कुरणे निर्माण झाली आहेत. राजकारणाप्रमाणेच सहकारी संस्थांमध्ये घराणेशाही सुरू झाली आहे. तीस, चाळीस वर्षे एकाच घराण्यात सहकारी कारखाने आणि संस्थांची सत्तेची मक्तेदारी निर्माण करणारे लोक लोकशाहीच्या निवडणूकीच्या मार्गानेच सत्तेवर आले आहेत. या समर्थनात काहीही अर्थ नाही. दुधाचा महापुर योजनेत जिल्हा सहकारी दुध संघाना शेकडो कोटी रूपयांचे अनुदान मिळते. तालुका पातळीवर सहकारी दुध संस्था भ्रष्टाचारामुळे बंद पडून खाजगी दुध संस्था नफ्यात चालायला लागल्या आहेत. सहकारी क्षेत्रातील नेत्यांनी सहकारी चळवळीसाठी सरकारकडून हजारो कोटी रूपयांची मदत मिळवली आहे. अशा स्थितीत सहकारी क्षेत्राचा विकास घडवून ती टिकवायचे मोठे आव्हान कसे पेलले आहे. जागतिकीकरणाच्या आव्हानात ती कमकुवत व्हायचा धोका अधिक आहे. हे पृथ्वीराज चव्हाण यांनी स्वच्छपणे सांगितले आहे.[१४५]

## १.१६ सहकार चळवळीतील काही प्रमुख दोष :–

सहकारी चळवळीच्या विकासाचा विचार करताना त्या चळवळीतील दोषस्थळांचा शोध घेणे आवश्यक आहे. सहकारी चळवळ अथवा संस्था मध्येच हे दोष आहेत आणि इतर प्रकारच्या उदाहरणार्थ खाजगी वा शासकीय संस्थात दोष नसतात असे म्हणणे चूकीचे आहे. परंतू फरक एवढाच आहे की सहकारी संस्थांची तत्वे व नीतीमूल्ये असे सांगतात की सहकार संस्थांचा कारभार स्वच्छ काटकसरीने आणि सभासद कल्याण जपणारा असला पाहिजे सहकारातील काही प्रमुख दोषांचा खाली उल्लेख केला आहे.[१४६]

**१. भ्रष्टाचार एक कलंक :–** कोणतीही संस्था तिचा कारभार स्वच्छ व पारदर्शी असला पाहिले.

खाजगी संस्थात भ्रष्टाचार अभावाने आढळतो. पण सार्वजनिक व सहकारी संस्थात तो अपवादात्मक नसतो. भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत जागतिक यादीत वरच्या क्रमांकावर आहे. गरीब राष्ट्रात असेच होत राहणार असाही विचार अनेकजण मांडतात. ज्या संस्था आपणास यशस्वी झालेल्या दिसतात त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे चोख कारभार राष्ट्रीय सहकारी दुध मंडळाच्या एका अधिकाऱ्यांने एक ड्रायव्हर कामावर १५ मिनीटे उशीरा आला म्हणून त्याला तीन महिने सेवा स्थगिती दिली व ती उच्च प्रशासनाने मान्य केली. यावरून सहकारी प्रशासनाचा दर्जा कसा असावा हे दिसून येते. आजच्या खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या रेट्यात जी व्यक्ती वाईट वर्तन करेल. तिला ताबडतोब कामावरून कमी केले पाहिजे. सहकारात आपण हे तत्व पाळत नाही. मग जागतिकीकरणात सहकार कसा बरे टिकून राहणार ? एका छोट्या संस्थेने सुद्धा त्याचे आचरण केले. तरच सहकार टिकून राहील. थोडक्यात प्रत्येक संस्थेने सभासद नोकर व संचालक यांचेसाठी एक आचारसंहिता ठरवून त्याचप्रमाणे काम केले पाहिजे.[१४७]

**२. सहकारी मूल्ये आणि तत्वे यांचे उल्लंघन :–** १९९५ मध्ये मॅचेस्टर आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने सहकाराची नवी सात तत्वे स्वीकारली. त्याचवेळी सहकाराची काही मूल्ये किंवा पथ्ये मान्य केली आहेत. ही १८४४ सालच्या रॉश्डेलची मूल्येच आहेत. ती म्हणजे स्वयंजबाबदारी लोकशाही, समानता, एकसंघपणा, प्रमाणिकपणा, पारदर्शीपणा, सामाजिक जबाबदारी इत्यादी खरे पाहिले तर संस्थेच्या आर्थिक विकासाचे गमक यातच आहे. सहकारी कायद्यातील तरतुदीप्रमाणे सहकारी मूल्ये व तत्वे यांचाही मान राखला पाहिजे. याबाबत सन १९१७ साली पुणे येथे झालेल्या प्रतीक सहकारी परिषदेत महात्मा गांधी यांनी एक निबंध वाचला होता त्यात त्यांनी सहकारी चळवळीत नैतिक अधिष्ठान आणि प्रचारक वृत्ती यांची एकरूपता असली पाहिजे आणि केवळ संख्यात्मक प्रगती म्हणजे यशस्वी सहकार नव्हे ते असेही म्हणत की या गुणांचा अभाव असेल तर गुंडसुद्धा सहकारी संस्था स्थापन करू शकतील.

**३. घराणेशाही :–** सहकारी चळवळ घराणेशाही आणि मुक्तहीन व्यवहारामुळे बदनाम होत चालली आहे. असे मत डॉ. पी. आर दुभाषी यांनी एका ठिकाणी म्हटले आहे. सहकारी बँका पतसंस्था साखर व सूतगिरण्या घराण्याने आपले वर्चस्व प्रस्थापित केल्यामुळे सहकारी तत्वांशी पिछेहाट होत आहे. ज्याला सहकारी तत्वे माहीत नाहीत असे लोक सहकारी नेते बनले आहेत. सन १९९१ नंतर सहकाराची पिछेहाट जोरदार चालू आहे. त्याचे कारण म्हणजे नेतृत्व सहकारी संस्थांतील

सामान्य सभासदांचा सहभाग व त्यांची निष्ठा या बलावरच सहकारी चळवळ जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकून राहील.[१४८]

### ४ उत्पादकांसाठी कंपनी कायदा २००२ ला अवलंब :–

भारतातील काही विचारवंत उदाहरणार्थ डॉ. वर्गीस धारिया यांनी नव्या आर्थिक धोरणात सहकारी संस्था टिकून रहाव्यात त्यांचे लोकशाही स्वरूप मजबूत बनविण्यासाठी कंपनी सुधारणा अधिनियम २००२ सहकारी संस्थांसाठी सुचविला होता. त्याचप्रमाणे भारत सरकारने सन २००२ मध्ये वाय. के. अलय समितीच्या शिफारशीवरून ज्या उत्पादक प्रक्रिया ग्राहक संस्थांना आपला कारभार कंपनी कायद्याप्रमाणे करावयाचा आहे. या कायद्यामुळे सहकारी संस्थांना आपले काम सहकारी तत्वाप्रमाणे करता येईल, मात्र त्यांचेवरचे नियंत्रण फक्त कंपनी रजिस्टारचे राहील, याचा फ ायदा सहकारी संस्थांना निश्चितच होणार आहे. थोडक्यात या कायद्यामुळे सहकारात निगम व्यवस्थापनाचा अवलंब होणार आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात कंपनी कायदा हा सहकारी संस्थांना तारक होणार आहे. आर्थिक तोट्यात चालणारे साखर कारखाने, सूतगिरण्या प्रक्रिया संस्था, पशुपालन, फलोद्यान, वस्त्र व्यवसाय, द्राक्षबायत, वृक्षलागवड, चहा–कॉफी उत्पादन व प्रक्रिया अशा उत्पादक संस्थांना याचा लाभ घेता येईल. या कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे सहकारी संस्थांशी प्रत्यक्ष व्यवहार किंवा कच्चा माल पुरविणारे उत्पादकच सभासद राहू शकतात. सध्याच्या सहकारी निम्म्यापेक्षा जास्त सभासद राहू शकतात. सध्याच्या सहकारी संस्थात निम्म्यापेक्षा जास्त सभासद हे संस्थेशी व्यवहार न करणारे किंवा क्रियाशून आहेत. मात्र असे सभासदत्व संचालक बनतात. त्यामुळे संस्था तोट्यात जातात. असे व्यवस्थापन कंपनी कायद्याचा अवलंब करणाऱ्या संस्थांत असणार नाही.

### ५ खाजगी क्षेत्रांशी समझोता :–

जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी आता सहकारी संस्थांना केवळ सहकारी क्षेत्राशी कंपनी सुद्धा सहभागी करून घ्यावे लागेल. अमूल सारख्या संस्थेने आपली उत्पादने विकण्यासाठी आपल्याच शाखा काढणे खर्चाचे होते त्यामुळे विविध स्तरांवरील खाजगी संस्थेद्वारे विक्री करणे किफायतशीर होणार आहे.

**६ नव्या पिढीतील संस्थांची निर्मिती :–**

महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या संख्या ३१ मार्च २००० अखेर १५२६१९ इतकी आहे. त्यात सामील सभासदांची संख्या ४.१४ लाख तर भागभांडवल ४९६० कोटी रूपयांचे होते. एकूण संस्थांची संख्या सन १९६१ ची तुलना करता ४ पटीने वाढली आहे. मात्र या संस्थात पतपुरवठा संस्था भरणा अधिक आहे. खरे पाहता समाजसेवा, वृक्षलागवड, मच्छीमार, उपसा जलसिंचन, फलउत्पादक व प्रक्रिया व कृषिप्रक्रिया व कमकुवत घटकांनी रोजगार देणाऱ्या संस्थांची संख्या फार कमी आहे. एकाच प्रकारच्या संस्था काढण्याची आपली कृती अद्यापही कमी झालेली नाही. एकाच प्रकारच्या अनेक संस्था झाल्यामुळे कोणालाच पुरेसे काम मिळत नाही. त्यामुळे त्या तोट्यात चालतात. म्हणून केवळ नवे आर्थिक धोरण त्यास जबाबदार नाही.

**व्यवहारवाढ आणि आर्थिक एकसंघपणा :–**

परकीय कंपन्यांकडे भांडवल जास्त प्रमाणात असते. त्यामुळे त्यांची तोटा सहन करण्याची ताकदही जास्त असते. उदा. आपण एक साखर कारखाना काढताना भांडवल २–३ कोटींचे तर बाहेरील भांडवल ३० कोटी आणि बाकीचे भांडवल सरकार व वित्त संस्थांचे असते. पण परकीय संस्थांचे मात्र १०० कोटी रूपयांचे भांडवल घेऊन येतात. त्यामुळे त्या ऊसास जास्त किंमत देतील व आपले कारखाने बंद पडले की मग उसाचा दर कमी करतील त्यानंतर आम्हास त्यांनाच ऊस घालण्याशिवाय पर्याय राहत नाही. सहकारी संस्थांनी व्यवहार वाढवून तसेच जिल्हा व राज्य पातळीवर संघ स्थापन करून खाजगी स्पर्धकांना तोंड दिले पाहिजे. नव्या मुक्त औद्योगिक धोरणांचा लाभ सहकारी चळवळीने घेतला पाहिजे. निर्यात क्षेत्रात सहकारी संस्थांनी पदार्पण केले पाहिजे. स्पर्धेशी टक्कर द्यावी लागणार आहे. याची जाणीव आता ठेवलीच पाहिजे. व्यावसायिक व्यवस्थापनाचा स्वीकार आता अटळ आहे. कामात विविधता आणून व्यवसाय वाढविला पाहिजे. सक्षम सहकारी संस्था निर्मितीसाठी शिवरामन समिती, खुस्तो समिती, नरसिंहमन समिती, मराठे समिती, गोईपोरिचा समिती इत्यादीचे धोरण आमंलात आणले पाहिजे. या समित्यांची नेमणूक व त्यांच्या शिफारशी कशासाठी करण्यात आल्या. त्याचे अवलोकन सहकारी विचारवंत कार्यकर्ते व प्रशासन यांनी केले पाहिजे. लोकशाही तत्वांची पायमल्ली होत आहे. ही बाब जागृत होणे गरजेचे आहे. प्रत्येक संस्थांना आपल्या सभासदांची कदर केली जाते त्या संस्था आदर्श आहेत असा अनुभव आहे.[१४९]

सारांशरूपाने सहकार ही महाराष्ट्राला लाभलेली शक्ती आहे. सहकारी चळवळ ही त्या शक्तीचा आत्मा आहे. समविचारी शेतकरी माणसांना एकत्र आणून त्यांच्या शक्तीतून काम उभे करणारी ही लोकशाही चळवळ आहे. त्यामुळेच शासनातर्फे करावयाच्या विकासाच्या कामांची गाठ या चळवळीशी घालण्याच्या हेतूने यशवंतराव चव्हाण यांनी औद्योगिक समाज असा शब्द प्रयोग केला आहे. शेती हा उद्योग आहे. त्याला सहकाराची साथ मिळायला हवी या शेती उद्योगाची नवे  तंत्रे, व्यवस्थापकीय कुशलता, आर्थिक साधने शेतकऱ्यांना उपलब्ध करावी आणि ग्रमीण जनतेची शहरांकडील धाव गर्दी रोखण्यासाठी शेती मालावर प्रक्रिया करणारी सहकारी उद्योग तेथेच सुरू करण्यास प्रोत्साहन द्यावे हा त्यामागचा यशवंतराव चव्हाण यांचा मुळ हेतु होता.

एकंदर सहकारी चळवळ ही आर्थिक लोकशाही तत्वाने चाललेली चळवळ. ही परदेशात उगम पावली. परंतु हिचा विकास महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात झालेला आहे. महाराष्ट्राने साखर कारखानदारीत अग्रेसर कामगिरी करून दाखविली आहे. या साखर उद्योगाबरोबर ग्रामीण भागात शेतीमालावर प्रक्रिया करणारे इतर सहकारी संस्था, सहकारी खरेदी विक्रीसंघ, बाजार समित्या, सहकारी सुतगिरण्या, सहकारी कुक्कुटपालन संस्था, सहकारी दुध उत्पादक संस्था इ. अनेक उद्योसमुह उभे राहिले. यशस्वी झाले आहेत. अशा सहकारी संस्था आणि त्यांच्या चळवळीच्या माध्यमातून पुढे सहकारी पतपेढ्या विविध कार्यकारी सोसायट्या व नागरी बँका उभारल्या गेल्या. ग्रामीण भागामध्ये शैक्षणिक संस्था दळणवळणाची साधने, पाणी, वीज, रस्ते अशा मुलभूत सोयी सुविधा सहकारामुळेच खेडोपाडी निर्माण केल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे. सहकार चळवळी या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या व सर्व सामान्यांच्या दारात विकासाची गंगा पोहचलेली आहे. हे अर्थात सहकारातील राजकीय नेतृत्वाच्या योगदानातून शक्य झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**


१. भोसले काटे, (सहकार) २००८, फडके प्रकाशन, कोल्हापूर पान नं. २०,२१,२२ संदर्भ क्र.१.२.

२. बायस प्र. दे., (सहकार व नियोजन) २०१०, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे पान नं. ३,१५,१६,६६,६७ संदर्भ क्र. ४,५,१४,१५,१६,३३,३४.

३. कामत गो. स. (सहकारतत्व व्यवहार व्यवस्थापन) १९०९, विद्या प्रकाशन, पुणे, स्नेहवर्धन पुणे, पान नं. ४०,२३ संदर्भ क्र. ६,७,८,१९.

४. जगदिश किलोळ (भारतातील सहकार चळवळ तत्वे व व्यवहार) २०१३, नचिहे त प्रकाशन, नागपूर पान नं. ६,१२ संदर्भ क्र. १०,११,१२,३७.

५. जितेंद्र अहिरराव, (सहकार) २००९, चिन्मय प्रकाशन, पुणे पान नं. १०,११,१२ संदर्भ क्र. १८,२०,२४.

६. सुधाकर मानकर, (सहकार) २०१०, निराली प्रकाशन, पुणे पान नं. २० संदर्भ क्र. १७,२१,२२,२३.

७. Bedi R. D. ‘Theory History, Practice of Cooperation’ 2002 International pub.Meerot reference २५,२६.

8. Bhtnagar K. P. ‘Cooperation in india’ 2009 Kishor Pub.Kanpur, Page No. 35,36,37 reference 27,28

९. Mathur B. S. ‘Cooperation in india’ 2009 Sabitya Bhavan Agra, page no. 23,24,25 reference २९,३०,३१,३२,३६

१०. कायंदे पाटील, (सहकार) २०१०, चैतन्य प्रकाशन, नाशिक पान नं. १६ संदर्भ क्र. ३,५,९

११. पाटील सु. भी., (सहकारी महाराष्ट्र) २०१६, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे पान नं. ७,८ संदर्भ क्र. ३८,३९,४०,४१.

१२. पुजारी बी. भा., (महाराष्ट्रातील सहकार चळवळ कथा आणि व्यथा) २००४–०५, सहकार सारथी पान नं. ११,१२ संदर्भ क्र. ४२,४३.

१३. शोभा कारेकर, (महाराष्ट्र शसन आणि राजकारण) २०१०, अंशुळ प्रकाशन नागपुर पान

नं. ४० संदर्भ क्र. ४५.

१४. जगन कराडे, (जागतिकीकरण आणि सहकारी चळवळ) २०१४, डायमंड प्रकाशन, पुणे पान नं. ६६ संदर्भ क्र. ४७,१४९.

१५. सुधाकर जोशी, (सत्याग्रही शेतकरी) २०१२, शंकरराव गेणुजी कोल्हे उत्कर्ष प्रकाशन, पुणे पान नं. ३४,३५ संदर्भ क्र. ४८,४९.

१६. कदम डी. बी., (सहकारी साखर कारखान्याची अर्थव्यवस्था), प्रकाशक यशवंतराव गडाख पान नं. ९२ संदर्भ क्र. ५१,५२.

१७. शंकरराव गडाख, (परिवर्तन) २००४, सहकारी बँक अहमदनगर स्मरणीका अहवाल पान नं. २८,७१,७२ संदर्भ क्र. ४९,५०,५३.

१८. यशवंतराव गडाख, (सहकार उद्धार) २००५, सकाळ पान नं. ५ संदर्भ क्र. ३४,५५,५६.

१९. महेंद्र कुलकर्णी (अहमदनगर जिल्ह्याची वाटचाल) २००७ लोकसत्तज्ञ पान नं. २६ संदर्भक्र. ५७.

२०. बाळ कांबळे, (अहमदनगर जिल्ह्यातील स्थानिक संस्था) महाराष्ट्रातील राजकारण : नवे संदर्भ नवता प्रकाशन मुंबई पान नं. २९९ संदर्भ क्र. ५८.

२१. भाऊसाहेब थोरात, (अमृतगाथा) १९९९, अमेय प्रकाशन, पुणे पा नं. २० संदर्भ क्र. ६१,६२.

२२. अशोक काळे, (विकास सुर्य: कर्मवीर शंकरराव काळे जीवन व कार्य) अशोक काळे प्रकाशन, कोपरगाव संदर्भ क्र. ६३,६४.

२३. अशोक सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल (वाटचाल) श्रीरामपूर संदर्भ क्र. ६५,७६.

२४. मुळा सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल भेंडा, नेवासा २०१५–१६ संदर्भ क्र.६८.

२५. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल सोनई, नेवासा २०१५–१६ संदर्भ क्र. ६८

२६. केदारेश्वर सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल, पाथर्डी २०१५–१६ संदर्भ क्र.६८,६९.

२७. वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना वर्षिक अहवाल, पाथर्डी २०१५–१६ संदर्भ क्र.७०

२८. पारनेर सहकारी साखर कारखाना वर्षिक अहवाल, पारनेर २०१५–१६ संदर्भ क्र. ७१
२९. कुकडी सहकारी साखर कारखाना वर्षिक अहवाल, श्रीगोंदा २०१५–१६ संदर्भ क्र. ७२
३०. बाळ, बोठे पाटील (साखर, दुध आणि पैसा बदलते अर्थकारण) नगर सकाळ आवृत्ती २७ एप्रिल २०१८ पान नं. २ संदर्भ क्र.७३,७४.
३१. सूर्यभान जायभाय (अमृतवेल) २०११ भाऊसाहेब थोरात युथ प्रेस क्लब, पुणे पान नं. १४ संदर्भ क्र. ७५.
३२. शंकरराव कोल्हे आणि सुधाकर जोशी (सत्याग्रही शेतकरी) २०१२ संजीवनी सहकारी साखर कारखाना लि. सहजानंदनगर, कोपरगाव पान नं. २० संदर्भ क्र. ७७
३३. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहमदनगर जिल्हा अर्थ व सांख्यिकीय संचालनालय महाराष्ट्र शासन अहमदनगर संदर्भ क्र. ७९.
३४. सागर गोखले (शिक्षणाच्या परिपुर्णतेकडे वाटचाल) लोकमंथन वर्धापनदिन पुरवणी १७ मार्च २०१८ पान नं. ६, संदर्भ क्र. ८०,८१,८७.
३५. अनिल लगड (बिजांकूर ते वटवृक्ष) रयत शिक्षण संस्था लोकमत वर्धापनदिन १५ ऑगस्ट २०१४ पा नं. १० संदर्भ क्र. ८२.
३६. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळ (वाटचाल) २०१४ पान नं. १२ संदर्भ क्र. ८३.
३७. सुदाम देशमुख (ज्ञानक्रांतीचा यज्ञ) अहमदनगर महाविद्यालय, लोकमत वर्धापनिदन १५ ऑगस्ट २०१४ पान नं. १० संदर्भ क्र. ८४,८५,८६.
३८. सुरेश वाडेकर (शेतकऱ्यांची कल्पतरू) अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, लोकमत समृद्धी १५ ऑगस्ट २०१५ पान नं. १ संदर्भ क्र. ८८
३९. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वार्षिक अहवाल २०१४–१५/२०१५–१६ संदर्भ क्र. ८९,९०,९१
४०. शंकरराव गडाख (परिवर्तन २००८) अहमदनगर डिस्ट्रिक्ट को. ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदनगर संदर्भ क्र. ९२,९३,९४.
४१. अशोक सोनवणे (अहमदनगर अग्रेसर जिल्हा) १७ मार्च २०१८ लोकमंथन परिवर्तन दशा आणि दिशा पान नं. २.४ संदर्भ क्र. ७०,९५,९६.

४२. गणेश देशमुख (स्वतांत्र्योत्तर अहमदनगर जिल्ह्यातील राजकारण) १९९८ ग्रामवेद स्मृतीग्रंथ प्रकाशन समिती, कोपरगाव पान नं. १४०,१४१. संदर्भ क्र. ९७,९८,१३४,१३५.

४३. जिल्हा परिषद अहमदनगर निवडणूक विशेष लेख सार्वमत १० नोव्हेंबर २०१७ संदर्भ क्र. ९९,१००,१०१.

४४. सुहास पळशीकर (महाराष्ट्राचे राजकारण स्थानिक संदर्भ) २००७ अहमदनगर जिल्ह्यातील स्थानिक संस्था प्रतिमा प्रकाशन, पुणे पान नं. ३०६ संदर्भ क्र. १०२,१०३.

४५. सुधीर लंके (सहकाराच्या पंढरीतही वारसदारच फडकरी) रणधुमाळी जिल्हा परिषद अहमदनगर, लोकमत पान नं. ४. संदर्भ क्र. १०४

४६. विश्वास पाटील (राजकीय घराणेशाही) प्रस्थापितांचे सतरा वारसदार मैदानात अर्थचक्र लोकमत १७ एप्रिल २०१४ पान नं. ७. संदर्भ क्र. १०५.

४७. शांताराम काळे (पिचड एके पिचड तरी संघर्ष अटळ) ४ जुलै २०१४ लोकसत्ता निवडणुक विशेष लेख संदर्भ क्र. १०६.

४८. प्रकाश टाकळकर (मळलेली वत की कलाटणी) (वेध विधानसभेचे अकोले) ६ जुलै २०१४ लोकसत्तझ पान नं. २ संदर्भ क्र. १०७.

४९. नंदकुमार सुर्वे (खताळ ते बाळासाहेब) संगमनेर तालुका ७ जुलै २०१४ संदर्भ क्र. १०८.

५०. योगेश आसोपा (संवाद) बाळासाहेब थोरात गौरव विशेषांक यश प्रकाशन संगमनेर पान नं. ३८ संदर्भ क्र. १०९.

५१. मनोज जोशी (दोघींची भांडणे अन् त्यांचाच लाभ (सकाळ) वर्धापनदिन विशेष ७ जुलै २०१४ संदर्भ क्र. ११०,१११.

५२. राधाकृष्ण विखे (अष्टपैलू व्यक्तिमत्व) सार्वमत १५ जून २०१६ पान नं. ६ संदर्भ क्र. ११२,११३.

५३. सतिश तुरकणे (समाजाचा विश्वासू सेवक) राधाकृष्ण विखे सार्वमत अभिष्टचिंतन पुरवणी विशेष १५ जून २०१६ पान नं. १ संदर्भ क्र. ११४.

५४. अशोक तुपे (राजकीय वातावरण निर्णायक ठरणार) वेध विधानसभेचे श्रीरामपूर लोकसत्ता अहमदनगर वर्धापन दिन ८ जुलै २०१४ पान नं. १ संदर्भ क्र. ११५,११६,११७.

५५. प्रशांत गडाख (कार्य अन् कर्तृत्वाचा गडाख पॅटर्न) सार्वमत निवडणूक विशेषांक १५ ऑगस्ट २०१५ पान नं. ४ संदर्भ क्र. ११८.

५६. सुहास पठाडे विरोधकांसमोर गडाख यांचे आव्हान (वेध विधानसभेचे नेवासा) लोकसत्ता वर्धापनदिन विशेष अहमदनगर ३० जून २०१४ पान नं. २ संदर्भ क्र. ११९.

५७. सुनिल आढाव लाट पुन्हा थोपवणार (वेध विधानसभेचे शेवगाव) लोकसत्ता ३० जून २०१४ पान नं. २ संदर्भ क्र. १२०,१२१.

५८. विठ्ठल लांडगे (तालुका तीन आमदाराचा) नगर तालुका वर्धापनदिन विशेष सकाळ ८ जुलै २०१४ संदर्भ क्र. १२२.

५९. सुहास देशपांडे (सीमारेषा लांबणाऱ्या मैदानात षटकार) नगर तालुका वर्धापनदिन विशेष सकाळ अहमदनगर आवृत्ती ८ जुलै २०१४. संदर्भ क्र. १२३.

६०. अनिल देशपांडे (काँग्रेसच्या वर्चस्वाला भाजपाचा शह) सकाळ वर्धापनदिन विशेष ७ जुलै २०१४, संदर्भ क्र. १२४

६१. मार्तंडराव बुचूडे (बालेकिल्ला कम्युनिष्टांचा भगवा हो झाला कधीचा) पारनेर तालुका ७ जुल, २०१४ संदर्भ क्र. १२५.

६२. संजय काटे (आमदारकीचे वादळ वारे पाचपूतेंच्या विरोधात सारे) श्रीगोंदा तालुका ३० जुन २०१४ पान नं. ४ संदर्भ क्र. १२६,१२७.

६३. दत्ता उकिरडे (काँग्रेसचा बालेकिल्ला भाजपच्या खिशात) वेध विधानसभेचे जामखेड तालुका ७ जुलै २०१४ संदर्भ क्र. १२८.

६४. गणेश शेवरे (ये रे माझ्या मागल्या) वेध विधानसभेचे कर्जत तालुका ७ जुलै २०१४ संदर्भ क्र. १२९.

६५. बाळासाहेब विखे (देह वेचावा कारणी) २०१६ राजहंस प्रकाशन पुणे पान नं. १४ संदर्भ क्र. १३०,१३१,१३२,१३३.

६६. यशवंतराव चव्हाण (शेतीनिष्ठ यशवंतराव) २०१३ कृषी औद्योगिकीकरण व सहकारी कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे पान नं. २५,२६ संदर्भ क्र. १३६,१३७.

६७. मुलाखत भानुदास मुरकुटे दि. १७/०५/२०१६ संदर्भ क्र. १३८.

६८. मुलाखत शंकरराव कोल्हे दि. २५/०५/२०१६ संदर्भ क्र. १३९,१४०,१४१.

६९. मुलाखत शिवाजीराव ढगे दि. २४/०६/२०१७ संदर्भ क्र. १४२,१४३,१४४.

७०. मुलाखत दूरदर्शन कार्यक्रम पृथ्वीराज चव्हाण दि. ३०/०८/२०१५ संदर्भ क्र. १४५.

71. Bhide ST. produces article unpublished page no. 35,147.

72. Shivshankaran T. S. Nabarad Consultancy Services Private Ltd. Mumbai paper presented in seminar organized by Dept. of Economics shivaji university Kolhapur dated 2005. reference 146,151.

73. NCVT 13th Indian co-operative congress background paper New Delhi 1997- Page No. 25,148.

# प्रकरण २

# उपलब्ध ऐतिहासिक साहित्याचा आढावा

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २.१ | विषयाशी संबधित पीएच. डी. प्रबंध | १२२ |
| २.२ | प्रकाशित व अप्रकाशित संदर्भ ग्रंथ | १४४ |
| २.३ | मासिके व साप्ताहिके | १५३ |
| | | |

## प्रकरण २

# उपलब्ध ऐतिहासिक साहित्याचा आढावा

## २.१ विषयाशी संबधित पीएच. डी. प्रबंध :–

कोणत्याही विषयात संशोधन करत असताना त्याविषयात पूर्वी झालेले संशोधन अथवा उपलब्ध असणाऱ्या प्रकाशित आणि अप्रकाशित लिखानाचा सांगोपांग अभ्यास हा एक महत्वपूर्ण घटक असतो. कारण या सर्व घटकांच्या अभ्यासाच्या साहाय्याने आपण करत असलेल्या संशोधनाला एक प्रकारची शास्त्रीय बैठक प्राप्त होणार असते. प्रस्तुत विषय हा एक आर्थिक आणि सामाजिक इतिहास असल्याने संशोधकाने याकामी आवश्यक असणारे प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्य शोधण्यासाठी अनेक शैक्षणिक संस्था प्रशासकीय संस्था प्रशिक्षण संस्था आणि बॅकिंग व्यवसायाशी निगडित असणाऱ्या संस्थाच्या ग्रंथालयांना भेटी द्याव्या लागल्या, यामध्ये काही महत्वाच्या संस्थाचा नामोल्लेख आवश्यक असल्याने आवर्जुन मांडल्या आहेत. त्या संस्था खालील प्रमाणे आहेत .

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन प्रबोधिनी पुणे, गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र प्रबोधिनी पुणे, जयकर ग्रंथालय पुणे विदयापीठ पुणे, राज्यशास्त्र विभाग ग्रंथालय पुणे विद्यापीठ पुणे, डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद, टिळक महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथालय पुणे, अहमदनगर कॉलेज ग्रंथालय़ अहमदनगर या सर्व संस्थाना भेटी देऊन त्यांच्या ग्रंथालयामधून माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे. यापैकी काही प्रकाशित साहित्यांची उदाहरणादाखल यादी येथे प्रस्तुत करणे संशोधकाला महत्वाचे वाटते. प्रस्तूत संशोधन राजकीय अभिजन या वर्गवारीत मोडणारे आहे.

गिरीश कुलकर्णी यांनी पुणे आणि अहमदनगर जिल्हयातील सहकार नेतृत्वाचा अभ्यास केला आहे. त्यांच्या अभ्यासातून सहकारातील घराणेशाहीचे स्वरूप पुढे आले आहे. या अभ्यासातून त्या एकूण मराठा वर्चस्वापैकी ३१% मराठा नेतृत्वाची पार्श्वभूमी राजकीय वारसदाराची असल्याचे दिसून आले. तसेच विधीमंडळातील एकूण आमदारापैकी ३१% आमदार सहकार क्षेत्रातून जातात. हे निष्कर्ष यांनी नोंदविले आहे. किशोर रक्ताटे यांनी 'महाराष्ट्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास' अहमदनगर जिल्हयाचा विशेष संदर्भासह या एम. फिल. प्रबंधात

त्यांनी भारत, महाराष्ट्र व अहमदनगर राजकीय घराण्यांचा अभ्यास केलेला आहे. सदर संशोधनासाठी या प्रबंधातील महाराष्ट्रातील राजकीय घराणेशाहीचा अभ्यास उपयोगी पडणार आहे.

**१. खंडागळे जनार्धन काशीनाथ यांनी 'बाळासाहेब विखे पाटील ग्रामीण नेतृत्व एक अभ्यास'** पीएच. डी. प्रबंध मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद सदर संशोधनात बाळासाहेब विखे पाटलांच्या नेतृत्व आणि ग्रामीण विषयक कार्याचा शोध घेण्यात आला आहे. बाळासाहेब विखे पाटलांच्या जीवनचरित्राचा आढावा, नेतृत्वातील उदयातील घटक, ग्रामीण विषय भूमिका व दृष्टीकोन समजून घेऊन ग्रामीण विकास विषयक कार्याचा आढावा तसेच बाळासाहेब विखे पाटलांचे राजकीय क्षेत्रातील कार्य व वाटचालींचा अभ्यास, सहकारी संस्थांच्या माध्यमातून विखे पाटलांनी ग्रामीण विकासासाठी केलेल्या कामगिरीचे मूल्याकंन अशा विविध मुद्दयांचा अभ्यास केला आहे. सदर संशोधनासाठी या प्रबंधातील बाळासाहेब विखे या राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास उपयोगी पडणार आहे.

**उदिष्टे :-**

१. खा. बाळासाहेब विखे पाटलांच्या जीवन चरित्राचा आढावा घेणे.

२. खा. विखे पाटलांच्या नेतृत्वाच्या उदयातील या घटकाचे महत्व अभ्यासणे.

३. खा. विखे पाटलांची ग्रामीण विकास विषयक भूमिका व दृष्टीकोन समजून घेऊन ग्रामीण विकास विषयक कार्याचा आढावा घेणे.

४. खा. विखे पाटलांचे राजकीय क्षेत्रातील कार्य व वाटचालीचा अभ्यास करणे.

५. सहकारी संस्थाच्या माध्यमातून खा. विखे पाटलांनी ग्रामीण विकासासाठी केलेल्या कामगिरीचे मूल्याकंन करणे.

**अभ्यासपध्दती :-**

चर्चा मुलाखती व दैनंदिन कार्यपध्दतीच्या निरीक्षणातून माहिती संकलित केली.

**२. बागले बी. एम. यांनी 'प्रवरानगर परिसरातील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे शैक्षणिक कार्य व त्यांची परिणामकारकता याचा अभ्यास करणे'** हा एम. फिलचा प्रबंध य. च. म. मु. वि.

नाशिक या प्रबंधातील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी ग्रामपातळीवर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील केलेल्या कार्याचा परिचय सदर संशोधनासाठी उपयोगी पडणार आहे.

**उदिष्टे :–**

१. पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जीवनाविषयक आणि शिक्षण विषयक जीवनाचा अभ्यास करणे.

२. पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या शैक्षणिक संस्थेच्या तत्वज्ञानासंबधी अभ्यास करणे.

३. शिक्षण संस्थेचे प्रशासक या नात्याने पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रशासक विषयक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

४. पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार यांचे आधुनिक शिक्षणातील स्थान समजावून घेणे.

**संशोधन पध्दती :–**

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला.

**निष्कर्ष :–**

१. प्रवरानगर परिसरामध्ये वास्तव्यास असलेल्या व्यक्तींपैकी शेकडा ९४ टक्के व्यक्तीची पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्याशी समक्ष भेट झाली आहे.

२. ग्रामीण भागात शैक्षणिक़ सांस्कृतिक़ सामाजिक व आर्थिक उन्नती झाली.

३. सामाजिक जीवनाचा स्तर उंचावला.

४. ग्रामीण भागात प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेमुळे नोकरीची व व्यवसायाची संधी उपलब्ध झाली.

**३. राठोड हेमलता अरविंद या संशोधिकेने 'सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात व्यक्ती वा कार्य राजकारणातील वा सहकारातील योगदान'** हा पीएच. डी. प्रबंध पुणे विदयापीठात २०११ मध्ये सादर केला आहे. या अभ्यासामध्ये भाऊसाहेब थोरात यांच्या राजकीय व सहकार योगदानाचा अभ्यास केला आहे. सदर संशोधनासाठी भाऊसोब थोरात यांच्या सहकारातील योगदानातील अभ्यासाचा उपयोग होणार आहे.

**४. रविंद्र कोंडीराम काळे यांनी 'महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरूप' हा पीएच. डी. शोध प्रबंध मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद** येथे सादर केला आहे. या संशोधनामध्ये महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती व राजकीय नेतृवाच्या बदलाचे स्वरूप याचा अभ्यास केला आहे. राजकीय नेतृत्वाची ही संकल्पना संयुक्त महाराष्ट्र चळवळ व महाराष्ट्रातील तत्कालीन नेतत्वाचा अभ्यास करण्यात आला असून सदर संशोधनासाठी अहमदनगर जिल्हयातील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास उपयोगी पडणार आहे.

**उदिष्टे :-**

१. 'राजकीय नेतृत्व' ही मुळ संकल्पना सैध्दांतिक स्वरूपात जाणुन घेणे.

२. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेतृत्वांच्या कार्याचा परामर्श जाणून घेणे.

३. महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचे स्वरूप कसे कसे बदलत गेले यांचा शोध घेऊन नेतृत्वाच्या बदलत्या स्वरूपाची कारणमीमांसा तपासणे.

४. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर झालेले स्थित्यंतरे नेतृत्व यांच्या परस्पर संबधाचा आढावा घेणे.

५. राजकीय नेतृत्वामध्ये पक्षांतर वाढीची (पक्ष बदलांची) कारणमीमांसा तपासून राजकीय भ्रष्टाचार व नेतृत्वांचा घोडेबाजार वृध्दीगंत का झाला हे तपासणे.

६. जातीवादी शक्तींचा महाराष्ट्रातील राजकारणावर व राजकीय नेतृत्वावर कसा प्रभाव पडला धर्मनिरपेक्षता हे तत्व बाजूला पडून जातीवादी नेतृत्व कसे निर्माण झाले व जातीवादी राजकारणाच्या अंतरंगाचा अभ्यास करणे.

७. आजच्या नेतृत्वाचा ढासळता दर्जा व विचारसरणी यांचा शोध घेणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या शास्त्रीय अध्ययनासाठी संख्यात्मक आणि गुणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे. यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक, आगमनात्मक, विवेचनात्मक, विश्लेषनात्मक आणि टिकात्मक पध्दतीचाही वापर करण्यात आला आहे. तद्वतः या संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी ग्रंथालय संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलन करण्यासाठी ग्रंथालय संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला असून, तथ्ये संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :–**

१. राजकीय नेतृत्व या दोन संकल्पनेचा वेगवेगळा विचार केल्यास राजकीय या व्यापक संकल्पनेमुळे नेतृत्व या संकल्पनेला एक वेगळी दिशा प्राप्त झाली.

२. महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी भाषावार प्रांतरचनेची पूर्वपिठीका, संयुक्तमहाराष्टॅ परिषदेची रचना, उद्देश या बाबीचा उल्लेख करण्यात आला आहे. संविधान सभेतील तरतुदी, अकोला करार, नागपूर करार पुर्नरचना उपयोग, दार आयोग, जे. व्ही. पी. समिती, फजल अली आयोग या वेगवेगळया आयोगांनी केलेल्या शिफारशीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

३. संयुक्त महाराष्ट्र चळचळीतील राजकीय नेत्यात सामाजिक जाणीव मोठया प्रमाणात होती. समान भाषा. भौगोलिक संलग्नता विचारात घेऊन राज्यांची पुर्नरचना करणे अपेक्षित होते. बहुभाष्अिक राज्य तशीच राहिली त्यामुळे भिन्न भाषिकांची एकाच राज्यात घुसमट होऊ लागली. त्यामुळे लढा देण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही. यातुनच संयुक्त महाराष्ट्र चळचळीची स्थापना झाली.

४. १९५६ ते १९६० या काळातील संयुक्त महाराष्ट्र समितीने दिलेल्या लढयाची फलश्रुती होऊन भारताच्या नकाशावर १ मे १९६० रोजी नाव झळकले. महाराष्ट्राच्या स्थापनेचा भव्यदिव्य दैदिप्यमान सोहळा अनेक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. परंतु संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन ६२ वर्षे पुर्ण झालेले आहे. कर्नाटक सिमेवरील १० लाख मराठी भाषिक लोक आजही महाराष्ट्रात यावयास आसुलले दिसतात व आपला समावेश आज–ना उदया महाराष्ट्रात होईल या आशेने केंद्र सरकार व राज्य शासनाकडे आशाळभूत नजरेने पाहताना दिसतात.

**५. शेवाळे सिमा दिंगबर या संशोधिकेने 'महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्व आणि सहकार चळवळ : आण्णासाहेब मगर विशेष अभ्यास (१९१९ ते १९७९)'** हा पीएच. डी. प्रबंध २०१५ सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठात सादर केला आहे. या शोधनिंबधामध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नेत्यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून आप–आपल्या जिल्हयाचा विकास साधला आहे.

यामध्ये ज्या नेत्यांनी महाराष्ट्राच्या विकासास हातभार लावला त्यातील काही निवडक नेत्यांची सविस्तर माहिती घेतली आहे. सदर संशोधनासाठी या प्रबंधातील महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्व आणि सहकार चळवळीविषयी फायदेशीर ठरली आहे.

**उदिष्टे :–**

१. महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्वाच्या उदयाची प्रक्रिया अभ्यासणे.

२. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा विकास अभ्यासणे.

३. महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्व व सहकार चळवळ परस्पर संबंधांचा अभ्यास करणे.

४. आण्णासाहेब मगर यांचे जीवन व कार्य यांचा सहकार चळवळीच्या विशेष संदर्भात अभ्यास करणे.

५. आण्णासाहेब मगर यांचे सहकार क्षेत्रातील कार्य अभ्यासणे.

६. आण्णासाहेब मगर यांच्या राजकीय़ सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांतील कार्याचा अभ्यास करणे.

७. भावी पिढीतील आण्णासाहेब मगर यांच्या कार्याची जाणीव करून देणे.

**पध्दती :–**

प्रस्तुत संशोधनासाठी 'ऐतिहासिक संशोधन पध्दती' आणि 'वर्णात्मक संशोधन पध्दती' या दोन पध्दतीचा उपयोग केलेला आहे. साधनशोध, साधर्नचिकित्सा, मुलाखती व त्यांचे विश्लेषण, तथ्यांची सुसंगत मांडणी व अर्थान्वेषण इ. सर्व प्रक्रियांमधून प्रस्तुत संशोधन सिध्द झालेले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी माहिती मिळविण्यासाठी विविध प्रकारच्या प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. या साधनांव्यतिरिक्त काही व्यक्तीकडून मुलाखतीद्वारे माहिती मिळवून मौखिक इतिहास पध्दतीचा वापर केलेला आहे.

**निष्कर्ष :–**

१. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील नेत्यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून आप–आपल्या जिल्हयांचा विकास साधला. यामध्ये ज्या नेत्यांनी महाराष्ट्राच्या विकासास हातभार लावला त्यातील काही निवडक नेत्यांची सविस्तर माहिती घेतली. या नेतृत्वाने सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागात विकास केला पर्यायाने महाराष्ट्राचा विकास झाला.

२. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात ग्रामीण व बहुजन नेतृत्व पुढे येऊ लागले. त्यावेळी महाराष्ट्रात प्रथमच सहकारी तत्वांचा आणि सहकारी मार्गाचा विचार पुढे येऊ लागला.

३. लोकांचा सहकार चळवळीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आणि तिच्याविषयी अपेक्षा वाढल्या त्यानूसार मुंबई सरकारने १९२५ साली पहिला प्रांतिक सहकार कायदा केला. यामुळे सहकार चळवळीची नैतिक पातळी उंचावली. सहकार चळवळ ही सामान्यांची असामान्य चळवळ झाली.

४. वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, वि. म. दांडेकर यांसारख्या विचारवंतानी सहकार चळवळीची पाळेमुळे घट्ट केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात सहकार चळवळ विकसीत झाली.

५. आण्णासाहेब मगर यांनी सामाजिक, राजकीय आणि सहकारी क्षेत्रांबरोबर शैक्षणिक क्षेत्रातही बहुमोल कामगिरी केली. पुणे जिल्हयातील हवेली तालुक्याच्या ग्रामीण भागात आण्णासाहेबांनी शैक्षणिक संधी उपलब्ध करून दिल्या.

**६. दे. अ. इथापे 'यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व एक राजकीय चित्किासा'** हा पीएच. डी. प्रबंध १९९६ नागपूर विदयापीठात सादर केला आहे. या संशोधनात महाराष्ट्र राजकारणात नेतृत्व परिवर्तनाचे टप्पे पाडण्यात आले आहे. अहमदनगर जिल्हयातील राजकीय नेतृत्व जडणघडणी व उभारणी यासाठी यशवंतराव चव्हाण यांचे मोठे योगदान आहे. सदर संशोधनामध्ये राजकीय व सहकार नेतृत्वासाठी या संशोधनाचा अभ्यास केला आहे.

**७. कुरूमकर रघुराज मुकुटराव यांनी 'अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय़ सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास (१९९० ते २०००)'** हा पीएच. डी. प्रबंध २०१४ मध्ये टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे येथे सादर केला आहे. या संशोधनासाठी खालील काही उद्दिष्टे नोंदविले आहे.

**उदिष्टे** :–

१. अहमदानगर जिल्हयातील ऐतिहासिक, भौगोलिक आणि धार्मिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

२. जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय स्थितीचा १९९० ते २००० या १० वर्षातील अभ्यास करणे.

३. जिल्हयाच्या दक्षिण भागातील सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४. दक्षिण भागातील शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याचा आढावा घेणे.

५. शेतकरी, कामगार, मागास व उपेक्षित यांच्या उन्नतीसाठी सहकार क्षेत्राने घडवून आणलेला बदल अभ्यासणे.

६. दक्षिण भागातील तालुक्यांचा विकास कामाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

७. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील इ. स. १९९० ते २००० या कालखंडातील वाटचालीची विखुरलेली माहिती एकत्रित करणे.

**संशोधन पध्दती :–**

अभ्यासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत पुढील तंत्र वापरण्यात आला आहे. जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय नेत्यांची प्रदिर्घ प्रश्नावलीच्या आधारे मुलाखत आला आहे. तसेच जिल्हयातील बूजूर्गनेते, स्वातंत्रयसैनिक, राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक संस्थातील अधिकारी तसेच पदाधिकारी यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. तसेच संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून शास्त्रीय पध्दतीने मांडणी केली आहे.

**निष्कर्ष :–**

१. अहमदनगर जिल्हयाला आणि दक्षिण भागातील तालुक्यांना ऐतिहासिक धार्मिक वारसा मोठया प्रमाणावर असल्याने त्यांच्यात सामंजस्यता जोपासून समरसता वाढीस लागली.

२. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात भौगोलिक व धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. त्यामुळे तेथील आर्थिक उलाढालीत भर पडून लोकांना रोजगार मिळाला.

३. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात राजकीय चळवळ घडून आली व या चळवळीतून नेत्यांनी राजकीय सामाजिक कार्यातून विविध संस्था स्थापन केल्या व यातून ग्रामीण जनतेच्या विकासाला मदत झाल्याचे दिसून येते. यातूनच सहकारी चळवळीचा उदय झाला.

४. दक्षिण भागातील १९९० ते २००० या काळात नेत्यांना राजकीय अपयश आले तरी खचून न जाता नव्या जोमाने आपले सामाजिक कार्य सुरू ठेवले आहे.

५. दक्षिणेतील नेत्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत पक्षांशी एकनिष्ठ वेळप्रसंगी पक्ष बदल करून समाजविकास साधण्याचा प्रयत्न केला. राजकारणात मोठमोठी पदे भूषवूनही राजकीय शिंतोडा उडाला तरीसुध्दा आपले कार्य एकनिष्ठेने केले आहे. थोडक्यात पक्षनिष्ठेपेक्षाही सामाजिक विकासाला प्राधान्य दिले.

६. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात राजकीय चळवळ घडून आली व या चळवळीतून नेत्यांनी राजकीय सामाजिक कार्यातून विविध संस्था स्थापन केल्या व यातून ग्रामीण जनतेच्या विकासाला मदत झाल्याचे दिसून येते यातूनच सहकारी चळवळीचा उदय झाला.

७. जिल्हयाच्या दक्षिण भागातील नेत्यांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सहकार व शेतीविषयक योगदान निश्चितच मोठे प्रेरणादायी असले तरी समाजाच्या सर्व स्तरापर्यत त्यांना शक्य न झाल्यामुळे जनसामान्याच पुर्णतः विकास झालेला दिसून येत नाही.

सदर संशोधनासाठी अहमदनगर जिल्हयाचा अभ्यास करण्यासाठी निष्कर्ष उपयोगी ठरणार आहे.

**८. पाटील संभाजी नारायण यांनी 'महाराष्ट्रातील सहकारी साखरकारखानदारी आणि ग्रामीण विकास यातील अंतर संबधाचा अभ्यास'** श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यष्टी अध्ययन हा पीएच. डी. प्रबंध २०११ टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे येथे सादर केला आहे. या संशोधनासाठी संशोधन कार्यामध्ये महाराष्ट्रातील सहकारी साखर उदयोगाचे मूल्यमापन केले आहे. ग्रामीण विकासातील सहकारी साखर कारखान्याचे योगदान स्पष्ट केले आहे.

**उदिष्टे :–**

१. सहकार आणि ग्रामीण विकास यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीच्या कामगिरीचा अभ्यास करणे.

३. महाराष्ट्रातील ग्रामीण विकास प्रक्रियेत सहकारी साखर उदयोगाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

४. २१ व्या शतकात साखर उदयोगात उद्भवलेल्या त्रूटींचे निवारण करण्यासाठी उयाययोजना सूचविणे.

**संशोधन पध्दती :–**

सदर संशोधन महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचा अभ्यास आहे. त्यासाठी संपूर्ण गणना किंवा राशी पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. सूक्ष्मस्तरीय अभ्यासासाठी सदर संशोधन प्रबंधाच्या अंतर्गत भोगावती सहकारी साखर कारखाना या सहकारी संस्थेचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याने संशोधन पध्दतीच्या परिभाषेत सदर संशोधन अभ्यास संस्थात्मक स्वरूपाचा आहे.

**निष्कर्ष :–**

१. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तेव्हा महाराष्ट्र राज्यात सहकारी क्षेत्रात १३ आणि खाजगी क्षेत्रात १३ असे एकुण २६ कारखाने कार्यरत होते. विसाव्य शतकाच्या अखेर म्हणजेच १९९९ ते २००० साली राज्यात १२३ सहकारी आणि १० खाजगी असे एकूण १३३ साखर कारखाने कार्यरत होते. याचाच अर्थ १९६० ते २००० या चार दशकात राज्यात ११० सहकारी साखर कारखान्यांची भर पडली आहे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात म्हणजेच २००९ ते १० अखेर राज्यात १६६ सहकारी आणि ३२ खाजगी साखर कारखान्यांची उभारणी पूर्ण झाली आहे. म्हणजेच या कालखंडात ५५ साखर कारखान्यांची भर पडली आहे. ही संख्यात्मक प्रगती कौतुकास्पद असली तरी त्याच बरोबर राज्यात जवळजवळ ५६ कारखाने आजारी १४ कारखाने आर्थिक अडचणीत आहेत. राज्य शासनाने २२ कारखान्यांची नोंदणी रद्द केलेली आहे. उभारणीतील नव्या कारखान्यांना आर्थिक अडचणींना तोंड दयावे लागत आहे. या सर्व चिंताजनक बाबी आहेत.

२. सामूहिक विकास या अमेरिकेतील फोर्ड फांऊडेशनद्वारा पुरस्कृत दृष्टीकोनात शासनाने ग्रामीण विकासात पुढाकार घेणे अपेक्षित होते. कै. धनजंयराव गाडगीळ व अन्य भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उदयोगांची सहकारी क्षेत्रात स्थापना करणे आणि त्याद्वारे आर्थिकदृष्या दुर्बल घटकांना संघटित करून ग्रामीण विकास साध्य करणे हा दृष्टीकोन मांडला होता. कै. गाडगीळांच्या मार्गदर्शनाखाली भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना महाराष्ट्र (तत्कालीन मुंबई) राज्यात स्थापन करण्यात आला. प्रवरा सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्रातील एक दुष्काळी म्हणून प्रसिध्द असलेल्या भागातील लहानात लहान ऊस उत्पादन करणात्या शेतकत्यास साखर कारखानदार बनविले. सहकारी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाचा मोबदला जास्तीत जास्त मिळवून देण्यासाठी तर प्रयत्न केलेच त्याचबरोबर या कारखान्याच्या परिसरातील शेती विकासास व ग्रामीण विकासास अनेक प्रकारे हातभार लावला आहे.

३. शेती विकासाबरोबरच सहकारी साखर कारखान्यांनी औदयोगिक विकास साधण्यासाठी पुष्कळ प्रमाणात यशस्वी प्रयत्न केलेले आहेत. तसेच अनेक ठिकाणी त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. साखर कारखान्यांच्या सौजन्याने इतर उदयोग तसेच मदयार्क उदयोग सुरू केलेले आहे. काही

ठिकाणी कागद कारखाने निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ऊसाच्या प्रोडपासून वॅक्स तसेच मदर्याकाच्या कारखान्यातून निघालेल्या स्प्रेटवॉशपासून पोटॅश बनविण्यात तज्ञ आणि सहकारी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

४. राज्यातील रोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी मोठा हातभार लावला असून मध्यम आकाराचा एक सहकारी साखर कारखाना सुमारे पाच–सहा हजार व्यक्तींना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रोजगार मिळून देतो. शासनाच्या वीस कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील व पर्यायाने राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासातील सहकारी साखर कारखान्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

५. ग्रामीण विकासातील सहकारी साखर कारखान्यांचे योगदान

१. व्यवस्थापनातील कौशल्य २. अभूतपूर्व शैक्षणिक प्रगती ३. लहान शेतकऱ्यांची पत वाढली

४. पिकाखालील जमीन वाढली. ५. शेतीला पाणी पुरवठा ६. खेडयात सुबत्ता निर्माण झाली.

७. उसाखालील क्षेत्र वाढले. ८. महाराष्ट्रातील रोजगार वाढला.

सदर संशोधन कार्यासाठी अहमदनगर जिल्हयातील साखर कारखानदारीचा अभ्यास करताना वरील निष्कर्षाचा विचार केला जाणार आहे.

**९. बोठे पाटील बाळासाहेब जगन्नाथ यांनी 'अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास'१९९३ ते २०१०** हा पीएच. डी. प्रबंध २०१६ मध्ये सादर केला आहे. या कार्यासाठी जिल्हातील सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्हयातील सहकारी दूध संघ, जिल्हा मध्यवर्ती सहकारी कृषी उत्पन्न बाजार समिती आणि विविध तालुका पातळीवरील तालुके सहकारी कृषी उत्पन्न बाजार समिती या माध्यमातून सहकारी क्षेत्राचा खूप मोठया प्रमाणावर विकास झालेला आहे. या सहकार क्षेत्र विकासासाठी अहमदनगर जिल्हयातील नेतृत्वाचे मोठे योगदान आहे. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून जनतेची संस्थात्मक मांडणी नेतृत्वाने केली आहे. त्याचप्रमाणे सहकाराचे साधन हे नेतृत्व विकासासाठी वापरले आहे.सहकाराच्या माध्यमातून सहकार साखर कारखान्याच्या माध्यमातून प्रत्येक मतदार संघातून राजकीय घराण्यांचा उदय झालेला पाहण्यास मिळतो

सहकाराच्या माध्यमातून नेतृत्व केलेले अनेक नेतृत्व पुढच्या काळात अंसतुष्ट नेतृत्वाला सहकार क्षेत्रात स्थान देत शांत करत ठेवण्यास राजकीय नेतृत्वाला सोईचे असल्याचे पुढे आहे. चौथे असे की सहकार क्षेत्राने राजकीय अभिजनांना सहकारी साखर कारखाने. सहकारी बँक आणि कृषी उत्पन्न बाजार समिती अशा संस्था मध्ये स्थान देत राजकीय क्षेत्राची मोठी व्याप्ती वाढवलेली आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राने राजकीय विकासासाठी योगदान दिलेले दिसून येते हे निष्कर्ष नोंदविले आहे. सदर संशोधनासाठी हे निष्कर्ष उपयोगी ठरणार आहे.

**उदिष्टे :–**

१. महाराष्ट्राचे राजकारण आणि स्थानिक राजकारण यांचा संबंध आहे. त्यात राजकीय नेतृत्वाची भूमिका ही मध्यवर्ती भूमिकेचा समीक्षात्मक अभ्यास करणे.

२. जिल्हा पातळीवरील आर्थिक क्षेत्रातील विकासाच्या माध्यमातून राजकीय विकासाची वाटचाल घडून येत आहे. या वाटचालीचा आढावा घेणे.

३. जिल्हा राजकारण या दोन प्रकारे राजकीय नेतृत्वाची भूमिका पुढे येते. एक म्हणजे शहरी भागातील राजकारण आणि दुसरे म्हणजे ग्रामीण भागातील राजकारण या दोन्ही भागात सत्ता संपत्ती आणि अधिकार प्रभावक्षेत्रे या वरून संघर्ष आणि स्पर्धा असताना दिसून येते. या स्पर्धेचे संघर्षाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे हे अभ्यासणे.

४. ग्रामीण निमशहरी आणि शहरी अशा तिन्हीही भागातील राजकारणात जात घटक हा महत्वाची भूमिका बजावत असताना दिसून येतो. त्यामुळे जातींची नेमकीण कोणत्या प्रकारची भूमिका आहे हे अभ्यासातून तपासता येईल.

५. ग्रामीण भागातील राजकारणामध्ये विविध पक्षांतर्गत गट तयार झालेले आहेत. एका गटाकडे आर्थिक सधनता आणि दुसऱ्या गटाकडे नसताना दिसून येते. यापैकी ज्या गटाकडे आर्थिक सधनता आहे, तो बागायती परिसरातील आहे. त्यामुळे शेतीतून विविध प्रकाराचे नगदी पिकांचे उत्पादन घेताना दिसून येतो. या पिकांच्या उत्पादनाच्या आधारे तो जिल्हयाच्या राजकारणावर प्रभाव वर्चस्व निर्माण करून आहे. दुसरा गट कोरडवाहू परिसरातील आहे. या गटाला उत्पादनाचे साधने फारशी मिळत नसल्यामुळे मजूरी करणारा आहे. परिणामी सधन गटाच्या मागे जावे लागत

आहे. यातून पुढे येणारे राजकारण नव्याने पुढे येत आहे त्यामुळे या राजकारणाचे विविध आयाम तपासता येतील.

६. शहरी राजकारणात नव्याने होणारे आर्थिक विकास आणि नवीन राजकीय समीकरणांचा उदय याचा अभ्यास करता येईल.

७. १९९० नंतर महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये स्थित्यंतर झाले. ग्रामीण भागाचे रूपांतर निमशहरी आणि निमशहरी भागाचे रूपांतर शहरी भागात होत चालले आहे. नव्याने विविध उदयोग पुढे येत आहेत. शहरी आणि निमशहरी भागात नव्याने विविध सेवा आणि औदयोगिक विकास करणारे घटक पुढे येत आहेत. त्यातून राजकारण समीकरण पुढे येत आहे. अशा प्रकारे पुढे येणारी समीकरणे तपासण्यात येतील.

८. राजकीय पक्ष, नेतृत्व, विविध प्रश्नसमस्या, प्रभावक्षेत्र, नव अभिजनांचे उदयाची पार्श्वभूमी, बदलती सत्ताकेंद्र, विविध पक्षातील नेतृत्वाचे सहसंबध, संस्थात्मक संघटन बांधणी अशा विविध घटकांच्या माध्यमातून राजकीय नेतृत्व घडून येत आहे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या शास्त्रीय अध्ययनासाठी संख्यात्मक आणि गुणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे. यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक आगमनात्मक, विवेचनात्मक, विश्लेषणात्मक आणि टिकात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तव्दतः या संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी ग्रंथालय संशोधन करण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष :–**

१. राजकीय नेतृत्वाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी जगभरातून अतिशय कमी प्रयत्न आहे. त्यामुळे नेतृत्व संकल्पनेबद्दल मतभेद असल्याचे निष्पन्न होते.

२. नेतृत्व संकल्पनेचा उदय व विकास आतिप्राचीन काळापासून झालेला आहे.

३. नेतृत्चाशिवाय राजकारण करणे ही क्रिया प्रत्यक्षात आस्तित्वात येऊ शकत नाही.

४. राजकीय यशापयश हे अनुयांयाशिवाय पुर्णत्वास जाऊ शकत नाही व अनुयायांचे ध्येय उद्देशपूर्ती नेतृत्वाशिवाय स्पष्ट होऊ शकत नाही हे निष्पन्न झाले.

५. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून पुढे आलेले राजकीय नेतृत्व हे तत्वनिष्ठ ,ध्येयनिष्ठ व सर्वपक्षीय होते हे स्पष्ट होते.

६. संयुक्त महाराष्ट्र चळवळीपासून ते स्वतंत्र महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर दशका पर्यंत (१९७८ पर्यत) महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व पक्षाशी एकनिष्ठ असल्याचे दिसून येते.

७. १९८० च्या दशकानंतर महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वात स्वकेंद्री वृत्ती वाढत गेल्याने राजकारण झाले.

**१०. खिलारी सुनिल प्रभाकरराव यांनी 'अहमदनगर जिल्हा परिषद एक ऐतिहासिक अभ्यास' सन (१९६ ते ९१)** हा पीएच. डी. प्रबंध २००९ मध्ये टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे येथे सादर केला आहे. या संशोधन कार्यात अहमदनगर जिल्हयाचा सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक घटकांचा आढावा घेण्यात आलेला आहे. अहमदनगर जिल्हयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राजकारण पक्षीय पातळीवरील नेतृत्वाचा आढावा अहमदनगर जिल्हयातील आर्थिक विकास आणि नेतृत्वाचा आढावा घेतलेला आहे. सदर संशोधनामध्ये अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांच्या अभ्यासासाठी फायदेशीर ठरणार आहे.

**उदिष्टे** :–

१. अहमदनगर जिल्हयाचा स्थानिक स्वराज्य संस्थाचा त्रोटक इतिहास मांडणे.

२. भौतिक विकासाचा मागोवा घेणे.

३. लोकशाही प्रक्रियेची अंमलबजावणी तपासणे.

४. लोकसहभाग वरिष्ठवर्गाकडून कनिष्ठ स्तरांपर्यत कसा वाढला ते पाहणे.

५. ग्रामीण नव्या नेतृत्वाचा उदय तपासणे.

६. शिक्षक, कृषी, अर्थ, समाजकल्याण, बांधकाम, पेयजल, पशुपालन इ. विभागात झालेल्या सुधारणाचा आढावा घेणे.

**निष्कर्ष** :–

१. महात्मा गांधीजी व पंचायत राजः जवाहरलाल नेहरू यशवंतराव चव्हाण इ. चे विचार

२. नोकरशाही प्रधान रचनाः विकासातील विषमता.शहरी विकासाला प्राधान्य

३. पंचायत राज्यातील स्त्रीयांचे स्थानः घराणेशाहीचा उदय व वाढते शहरीकरण सारे काही सरकारकडे.

४. लोकशाही आणि पंचायत राजः साकार झालेले स्वप्न विकेंद्रीकरण, जलसिंचन योजना, जगातील कृषी पध्दतीचे अनुकरण.

५. सहकार व पंचायत राज

६. जीवन शिक्षण

७. राजकीय पक्षांचे स्थानःवाटचाल व संकटे

८. जिल्हा परिषदेच्या कारभारातील त्रूटी व उपाययोजना

९. पंचायत राज्यातून सामुहिक विकास

१० जिल्हा परिषदेकडून कार्यकत्यांच्या अपेक्षा व अपेक्षाभंग

११. अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुल्यमापन

१२. संशोधनातून दिसलेली निरिक्षणेःविपुल साधने, अभ्यासकांना उपयुक्त, पारंपारिकता, उत्क्रांतीचा पुरस्कार अध्यात्म व विकासाचा समतोल, नेतृत्व निर्माण, भौतिक प्रगती, ग्रामीण रोजगार शोषण मुक्ती, पाझर तलावांचा जिल्हा, वनीकरण चळवळ, कृषी पाण्याची बचत, पशुपालन व दुग्धोत्पादन प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, आरोग्य, स्त्रिया व दलित विषयक कामगिरी, पेयजल, बांधकाम, समाजकल्याण, केंद्र व राज्य सरकारचे वाहक राजकीय हस्तक्षेप, उपयुक्त अभ्यास.

**११. निलेश रा. दांगट (२००३) 'ग्रामीण विकासात सहकारी साखर कारखान्यांचा सहभाग' (पुणे जिल्हयाचा विशेष अभ्यास)** हा पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे येथे सादर केला आहे. याचाही अभ्यासासाठी उपयोग होणार आहे.

**उदिष्टे :-**

१. पुणे जिल्हयातील सहकारी साखर कारखान्यांचा विकास कसा होत गेला याचा अभ्यास तसेच त्यांची सभासद संख्या, ऊसउत्पादक शेतकरी, साखरेचे उत्पादन व उपवस्तू निर्मिती इत्यादीचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण रोजगार निर्मिती मधील साखर कारखान्याची भूमिका या उद्दिष्टामध्ये ग्रामीण भागातील शेती व सेवा क्षेत्रात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हंगामी कायमस्वरूपी रोजगार निर्मिती विषय अभ्यास करणे.

३. साखर कारखान्याकडून चालविल्या जाणाऱ्या विविध ग्रामीण विकासाच्या योजना व इतर सामाजिक आर्थिक योजनांचा अभ्यास करणे.

४. पुणे जिल्हयातील सहकारी साखर कारखान्यांची शैक्षणिक विकासातील भूमिका अभ्यासणे.

५. साखर कारखान्यांनी ग्रामीण विकासासाठी चालविलेल्या योजनांमुळे जिल्हयातील ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात उत्पन्नात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

६. शहरी भागाकडे होणारे स्थलांतर थांबविण्यात साखर कारखान्यांची भूमिका अभ्यासणे.

७. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीकोनातून साखर कारखान्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :–**

सदर संशोधन पध्दतीत प्रश्नावली व मुलाखतीचा अवलंब केलेला आहे. संख्याशास्त्रीय पध्दतीचा उपयोग करून विस्कळीत स्वरूपाची मिळालेली माहिती संकलित करून त्या माहितीचे व आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी काही संख्याशास्त्रीय साधनांचा अवलंब केलेला आहे. गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण, सारणीकरण व विश्लेषण केले विश्लेषण करण्यासाठी अनुपात, प्रतिशत, प्रमाण, आलेख या सर्व घटकांचा उपयोग शोध प्रबंध अहवाल तयार करण्यासाठी केला आहे.

**निष्कर्ष :–**

१. जगात १३२ देश साखरेचे उत्पादन करतात. त्यात भारताचा सध्या पहिला क्रमांक लागतो. जगातील १८१९ साखर कारखान्यांपैकी ४६ ते २५.५० टक्के साखर कारखाने भारतात आहेत तर १५.४४ टक्के भारतात होते. भारतात साखर उदयोगाचा शेती आधारित उदयोगामध्ये दुसरा क्रमांक लागतो. हा उदयोग देशांतर्गत ऊस उत्पादनावर अवलंबून आहे.

२. आशिया खंडातील पहिला सहकारी क्षेत्रातील साखर कारखाना महाराष्ट्रात सन १९४८ साली लोणी प्रवरा येथे 'प्रवरा सहकारी साखर कारखाना' स्थापन झाला. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेला व यशस्वीतेला भौगोलिक परिस्थिती, पाणीपुरवठयाच्या सोई. ऊस उत्पादक वर्गाचे सहआस्तित्व व उत्साहपूर्ण सहकारी नेतृत्व आणि अनूकूल सरकारी धोरण हे घटक जबाबदार आहेत.

३. भारतात पहिला साखर कारखाना क्रॉप्टस यानी शुकसागर येथे १७८४ साली खाजगी स्वरूपात सुरू केला होता. नंतर एल. टी. पॅटरसन या इंग्रज व्यक्तीने १७९१ मध्ये ऊसाची लागवड करून बिहारमध्ये साखर कारखाना सुरू केला.

४. भारतातील एकूण नोंदणीकृत साखर कारखाने ६९५ आहेत. त्यापैकी ४९७ साखर कारखान्यांची उभारणी झालेली आहे. सार्वजनिक क्षेत्रात ६७ साखर कारखाने तर खाजगी क्षेत्रात २७४ साखर कारखान्यांची स्थापना झालेली आहे.

**१२. दिगंबर आप्पासाहेब खेडेकर (२०१२) 'यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील योगदान'** हा पीएच. डी. प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद येथे सादर केला आहे.

**उदिष्टे :–**

१. यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तीमत्व व वैचारिक जडण–घडणीस प्रभावित करणाऱ्या विविध घटकांचा शोध घेणे.

२. संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी झालेल्या चळवळीत यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रीयऐक्य व राष्ट्राच्या राजकीय मुख्य प्रवाह दृष्टीसमोर ठेवून कॉंग्रेसपक्षाच्या चौकटीत राहून संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेणे.

३. संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात समाविष्ट झालेल्या विविध प्रादेशिक व सामाजिक घटकात भावनात्मक ऐक्य निर्मितीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

४. यशवंतराव चव्हाण यांनी एक कुशल प्रशासक या भूमिकेतून मुख्यमंत्री या नात्याने केलेल्या यशस्वी प्रशासनाचा मागोवा घेणे व लोकशाही प्रशासनाबाबत त्यांच्या विचारांचा परामर्श घेणे.

५. लोकशाही विकेंद्रीकरणातील यशवंतराव चव्हाण यांच्या भूमिकेचा आढावा घेवून महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्वाच्या उभारणीतील त्यांचे योगदान विशद करणे.

६. महाराष्ट्रातील कॉंग्रेसपक्ष बळकट करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कार्याचा आढावा घेवून महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्ष व कॉंग्रेस कार्यकर्ते यांचे वैचारिक भरणपोषण करण्यासाठी त्यांचा वैचारिक वारसा स्पष्ट करणे.

७. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाबाबत यशवंतरावांच्या विचार व कार्याचा आढावा घेवून महाराष्ट्राच्या औद्योगिकीरणातील त्यांची भूमिका स्पष्ट करणे.

८. महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील यशवंतरावांच्या विचार व कार्याचा आढावा घेवून कृषी–औदयोगिक समाजाच्या निर्मितीतील भूमिका स्पष्ट करणे. आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळीतील त्यांचे योगदान विशद करणे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या शास्त्रीय अध्ययनासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक व ग्रंथालयीन अभ्यास पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :–**

१. यशवंतराव चव्हाणांच्या मते सहकार चळवळ ही जनतेच्या प्रयत्नावर आधारित असली तरी शासन तिचे काळजीपूर्वक संगोपन करीत आहे.

२. सहकार चळवळ ही सामान्य माणसाची चळवळ असल्यामुळे तिचा विस्तार करण्यासाठी झटले पाहिजे. सहकार चळवळीतील कार्यकर्त्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी शासनाची मदत व आशीर्वादाची गरज असते. सहकार चळवळीच्या विकासात शासनाने अडसर निर्माण करू नये. असे त्यांचे मत होते.

३. भारतातील सहकारी चळवळीच्या स्वरूपात महत्वाचा बदल करणारा कायदा प्रथम महाराष्ट्रात पास झाला. त्याचे श्रेय प्रामुख्याने यशवंतरावांच्या दृष्टेपणाला दयावे लागेल.

४. यशवंतरावांनाी सहकारी चळवळीच्या प्रारंभीच्या काळात काही पथ्ये काळजीपूर्वक पाळली. सहकारी चळवळीची स्वायत्तता जपली पाहिजे. अशी त्याची भूमिका होती.

५. १९६१ मध्ये महाराष्ट्रात जिल्हा परिषद कायदा झाला तेव्हा काही जणांनी सरकारी सोसायटया जिल्हा परिषदांच्या नियंत्रणाखाली द्याव्यात. अशा सूचना केल्या होत्या परंतू यशवंतरावांनी सहकारी चळवळ जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्राबाहेर ठेवली. त्यांच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची वाढ चांगल्या प्रकारे होऊ शकली.

६. साखर कारखाने, सुतगिरण्या, दूधसंस्था आणि प्रक्रिया संस्था यामुळे महाराष्ट्राचा कायापालट झाला. या सर्व संक्रमणातील मुळ प्रेरणा यशवंतरावांची होती. यशवंतरावांनी नवा सहकारी कायदा करून याबाबत शासनाचे धोरण बदलून महाराष्ट्रातील अलिकडच्या सहकारी चळवळीला विशेषतः

सहकारी साखर कारखान्यांना फार मोठे उत्तेजन दिले. त्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचे चित्र बदलून गेले.

**१३. एस. डी. तुपे :– यांनी १९८० मध्ये** (Impact Of Sugar Factories On the Rural Economy - A Case Study) अहमदनगर जिल्हातील संजिवनी सहकारी साखर कारखान्याचा अभ्यास केला.त्यांनी आपल्या प्रबंधात महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या विकासाचा आढावा घेतला आहे. सहकारी साखर कारखान्यांनी पुरविलेल्या विविध सुविधामुळे शेतीच्या मालकी साधनात कसा बदल होत गेला आहे. संजीवनी सहकारी साखर कारखान्यांच्या विकासाचा व या कारखान्यांच्या स्थापनेमुळे शेतीवर, शेतकर्‍यांवर, शेतमजूराच्या जीवनावर व कारखान्यातील कामगारांच्या आर्थिक परिस्थितीवर काय परिणाम झाला आहे याचा व गुणक परिणामाचा अभ्यास केला आहे. कारखान्यामुळे शेतीमध्ये शेतकरी आधुनिक साधनांचा वापर करू लागला. कारखाना परिसरातील शेतकऱ्यांच्या खर्च प्रवृत्तीत ही बदल झाला आहे. साखर कारखाने हे ग्रामीण भागातील विकास केंद्र आहेत. ऊस हे नगदी पीक आहे. साखर कारखान्यामुळे बागायती क्षेत्रात वाढ झाली. ऊसाचे क्षेत्र वाढले. पीक पध्दतीत बदल झाला.शेती आधारित उदयोगावर शेतीचा विकास अवलंबून असतो. शेतकऱ्याचे वास्तव उत्पन्न वाढले. परंतु शेतमजुराचे वास्तव उत्पन्न घटले. अशा शेतमजूराच्या समस्या जर कमीत कमी करावयाच्या असतील तर साखर कारखान्याच्या विकासाशिवाय दुसरा पर्याय नाही. साखर कारखाने फक्त सभासदांच्या आर्थिक विकासाभोवती केंद्रीत झालेले नसतात तर ते संपूर्ण सभोवतालच्या परिसराचाही विकास घडवून आणतात.साखर कारखाने, पोल्ट्री, डेअरी इत्यादी उदयोगाच्या विकासासाठी मदत करतात.

**१४. डॉ. सुहास आव्हाडयांचा साखर कारखानदारी आणि ऊस शेतीचे अर्थशास्त्र** या पीएच. डी. प्रबंधात जगातील सहकार चळवळीचा उगम आणि विकासाचा मागोवा घेतला आहे. या प्रबंधात भारतदेश महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्हा यांचेही विवेचन दिलेले असल्याने अर्थशास्त्रात पदवी संपादन करता करता इतिहासाचा ठेवा सुध्दा निर्माण करताना झालेला दिसून येतो. यामध्ये त्यांनी आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेचा व अहमदनगर

जिल्हयांतील सहकारी चळवळीचा इतिहास नोंदविलेला आहे. त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखानदारीचे जाळे निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमध्ये झालेल्या बदलांचा व २० व्या शतकाच्या उत्तरार्धातील सहकारी चळवळीचा (१९४९ नंतर) इतिहास या प्रबंधामध्ये आपणास वाचावयास मिळतो.

अहमदनगर जिल्हयामध्ये तर सहकारी साखर कारखानदारी ग्रामीण जीवनमान बदलून टाकण्याच्या कामी अमुलाग्र स्वरूपाचे काम केले आहे. त्यामुळे भारतीय सहकाराचा इतिहास अभ्यासताना साखर कारखानदारी आणि त्या अनुषंगाने स्थापन झालेल्या इतर संस्था याचा इतिहास अभ्यासल्याशिवाय कोणालाही पुढे जाणे शक्य नाही. आशिया खंडातील सहकारी तत्वावरील पहिला साखर कारखाना गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक प्रोफेसर धनंजयराव गाडगीळ आणि पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील या व्यक्तीने इ. स. १९४९ साली लोणीप्रवरानगर येथे स्थापन केला. त्यानंरए नगर जिल्हयामध्ये एका पाठोपाठ एक असे अनेक सहकारी साखर कारखाने स्थापन होऊन गेल्या ५० वर्षात जीवनामध्ये आमुलाग्र बदल झाला. अहमदनगर जिल्हयातील सहकारी साखर कारखानदारीचे शिक्षण क्षेत्राला मिळालेले वरदान पाहताना एका महत्वपुर्ण घटकांचा उल्लेख करावा लागेल. तो म्हणजे रयत शिक्षण संस्थेची उभारणी आणि विकास करताना कर्मवीर भाऊराव पाटलांना कारखान्यांच्या माध्यमातून झालेली मदत होय.

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा इतिहासात सामाजिक चळवळीचा अर्ध्वायू मानला जातो. सहकार क्षेत्रामध्ये सुध्दा या जिल्हयाची अहमदनगर जिल्हयाप्रमाणेच अतिशय मोठया प्रमाणात प्रगती झाल्याचे गेल्या ५० वर्षात दिसून येते या प्रगतीचा सुध्दा सहकारी साखर कारखानदारी हाच मापदंड असल्याचे आपल्या लक्षात येईल. त्यामुळे सहकारावरील संशोधन प्रबंध पहावयास मिळाले आणि अग्रक्रमाने उल्लेख करावा असे काही पीएच. डी. प्रबंध मिळाले.

**१५. डॉ. शिरोडकर यांनी 'Co-Operative Mobement In Kolhapur District'** हा इ. स. १९६७ सालचा प्रबंध कोल्हापूर जिल्हयातील सहकार चळवळीचा इतिहास अभ्यासताना महत्वपूर्ण वाटतो. यामध्ये त्यांनी जिल्हयातील सहकार चळवळीचा विकास कसा होत गेला आणि सहकार चळवळीने ग्रामीण लोकजीवन समाज जीवन आणि ग्रामीण अर्थकारणात आमुलाग्र बदल घडविण्यात कसे योगदान दिले यांचा समर्थपणे ऐतिहासिक मागोवा घेतल्याचे दिसून येते.

**१६. कदम पराग प्रमोद यांनी Role Of Co-operative movement in susstaing rural economy in the context of economics reforms. A study of Ahamednagar District.**

**Objectives :-**

1. To study the role played by co-opertaive movement in changing overall socioeconomic stuts of the society in india in genral and that of ahamednagar district in particular.

2. To evaluate the relative effectiveness of co-operative movement in generating and sustaining the employment, education, processing finance (credit) etc. Opportunitiesin rural parts of the country viz a viz; in ahamednagar district and its impact in changing socio-economic status of the people in the study area.

3. To Study the functioning and impact of various socio-economic activities those are operated under co-operation and their impact on rural society in the context of changing socio-economic order.

4. Assessment of the strength and ability of co-operative institutions in manitatining the economic status of rural economy in the context of economic reforms.

5. Evaluating the erlative strength of co-operative institutions in transforming and maintaining the life index of rural society in the study area.

6. Assessment of the relative strength of co-operative movement in incompatision with public and private sector during the period of economic reforms.

**Research Methodology :-**

Methodology trus ot the propose study on collection of aunthentic relative & secondaryt primary data :- The sources that used for the purposed of secondary data is the research reports, various committee reports, the reports of studyu groups and proceddings of various conferences, seminars and symposi. Other Method of collection of secodary data is discussions and dialoues and informal interviews with the people who are academically expert and those who have the practical experinence in the filed of co-operative of various forms.

**Conclusion :-**

१. As per 2001 cencus the total population of the ahmednagar district was 4040642, of which 3236945 i.e.80.1 % People Lived in in rural areas (in 1556 vilages) the average of living population per villege is 2047 people. in urban area 803697 i.e. 199% people lived.

2. There are at present 9285 co-operative societies of diffenett types with a membership of 2989 thousands covered 100 percent rural area and near about 70 percent or rural househoIdes in Ahmednagar district.

3. Membership is the factor which leads to increase in business practices, share capital and overall progress of co-opratives. Co-oprative grants nominal membership for depoitors who take loans against deposits as well as share granted to those persons who take loans against gold-silver ornagments, education loan etc.

4. Share capital of co-operative socities during the study period increased in numbers though the growth rate showed a fluctuating trend in it.

5. Credit socities raised funds by the different sources which have been invested in the business undertaken by them i.e. shares, entrance fees,

subscription, deposits, loans, cash credit, overdraft, advances, donations, grants, subsidies, net profit from operating a business etc.

6. Deposits are collected from public under various schemes such as, current, savings, fixed, recurring and cimulative and under any other special schemes.

## २.२ प्रकाशित व अप्रकाशित संदर्भ ग्रंथ

१. प्रोफेसर आर. डी. बेदीयांनी भारत आणि जगातील अनेक देशांमधील सहकाराची सुरूवात विकास आणि वृध्दी या सर्वाचा अतिशय सांगोपांग अशा स्वरूपाचा ऐतिहासिक आढावा घेण्याचा प्रयत्न त्यांच्या **'Theory, History And Practice Of Co-Operation'** या पुस्तकामध्ये घेतला आहे. प्रा. बेदी यांनी सहकार क्षेत्राने गेल्या अनेक वर्षामध्ये जगाच्या सामाजिक आणि आर्थिक उत्थानासाठी केलेल्या कामगिरीचा सुचक असा इतिहास मांडला आहे. यामध्ये त्यांनी वेगवेगळया उद्दिष्टांसाठी कर्जपुरवठा, शिक्षण, प्रशिक्षण, प्रक्रिया उदयोग, व्यवस्थापन, बाजारपेठ आणि विक्रीव्यवस्था, हस्तकला, सहकारी शेती, गृहबांधणी, साठवणूक सुविधा, श्रमिकांच्या सोसायटया, समाजविकास, दुग्धव्यवसाय इत्यादी घटकांच्या बाबतीत सहकार चळवळीने दिलेल्या योगदानाचा अतिशय व्यवस्थित अशा स्वरूपात इतिहास मागोवा घेताना भारत, जर्मनी, इंग्लंड, आयर्लंड, सेव्हिएत, रशिया, इस्त्राईल, डेन्मार्क, इटाली, चीन, स्विडन, जपान इत्यादी देशांच्या संदर्भात आढावा घेतल्याचे दिसून येते. भारतामधील सहकार चळवळीचा इतिहास मांडताना प्रा. बेदी यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर अशी दोन कालखंडात विभागणी केली आहे. प्रा. बेदी यांच्या ग्रंथाचा अभ्यास करताना एक गोष्ट आपणास जाणवते ती म्हणजे सहकार चळवळीने मानव संस्कृतीच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांना स्पर्श केल्याचे दिसून येते.

२. एस. पी. मेहतायांनी आपल्या **'Consumer Co-Opertaion In India'** या ग्रंथात रॉशडेल आरंभ कर्त्यापासून सुरूवात करून एक प्रकारे सहकार चळवीच्या शोधाचा इतिहासच मांडला आहे. आपल्या ग्रंथात त्यानी उपभोक्ता सहकारी चळवळीच्या इतिहासापासून सुरूवात करून

जगातील अनेक देशांमध्ये सहकाराची सुरूवात आणि विकास कसा होत गेला याचा ऐतिहासिक आलेख मांडला आहे. त्याचप्रमाणे ब्रिटन, स्विडन, अमेरिका, नॉर्वे, सेव्हिएत, रशिया, कॅनडा, इग्लंड बेल्जियम, डेन्मार्क, चीन, जर्मनी, नेदरलँड, फ्रान्स, स्वित्झलँड, इटली इत्यादी अनेक देशांमधील सहकार चळवळीचा इतिहास मांडल्याचे दिसून येते. मेहता यांनी आपल्या पुस्तकामध्ये भारतातील सहकार चळवळीच्या इतिहासाचा मागोवा संपूर्णपणे वेगळया स्वरूपात घेतला असून त्यामध्ये त्यांनी राज्यनिहाय इतिहास लिहिल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी ग्रामीण शहरी भागातील सहकार चळवळ या घटकांचा सुध्दा वेगवेगळया स्वरूपात प्राधान्य दिलेले आहे.

३. ए. एस. के. अय्यंगार यांनी 'A Study In the Co-Operative Mobement In India' हे आपले छोटेखानी पुस्तक इ. स.१९६१ मध्ये प्रकाशित केले असून प्रस्तुत पुस्तकात त्यांनी सहकाराची संकल्पना सहकाराला स्पर्श केल्याचे दिसून येते. या पुस्तकामध्ये आपल्याला भारतातील सर्व क्षेत्रामधील सहकारी चळवळीचा इतिहास सापडतो. उदाहरणार्थ बँकींग़ विक्री व्यवस्था, हातमाग धारकांच्या सहकारी संस्था, गृहबांधणी, एकत्रित शेती, शिक्षण इत्यादी अय्यंगार यांनी सहकारी क्षेत्राकडून नियोजन काळात विकास कामासाठी तसेच अगोदरच्या वाक्यात उल्लेख केल्याप्रमाणे इतर सर्व क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी जी महत्वपूर्ण ऐतिहासिक भुमिका पार पाडली आहे. त्याबद्दलचा आलेख आपणास सापडतो.

भारतातील सहकारी शेतीविषयक माहिती देताना अय्यंगार यांनी मुंबई, मद्रास, पंजाब, उत्तरप्रदेश, आंध्रपद्रेश, केरळ असा अतिशय व्यवस्थितपणे राज्यनिहाय आर्थिक इतिहास मांडल्याचे दिसून येते.

सहकारी चळवळ सहकारी बँकींग विषयक माहिती देताना अय्यंगार यांनी दिनांक ८ ऑक्टोबर १९१४ रोजी ब्रिटीश सरकारने सर मॅकलॅगन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीपासून विषयांचा उल्लेख करण्यास सुरूवात केली आहे. तसेच इ. स.१८९२ मध्ये मद्रास सरकारने जर्मनीच्या धर्तीवर ग्रामीण कर्ज पुरवठयाच्या बांधणीसाठी सर फेडरिक निकोल्सन यांच्या केलेल्या नेमणूकीचा उल्लेख सुध्दा सापडतो. त्याचप्रमाणे इ. स. १९०४ च्या कायदयात वेळोवेळी केलेल्या दुरूस्त्या आणि इतर घटकांविषयी अतिशय सुचक अशी माहिती या पुस्तकात सापडू शकते. त्याचप्रमाणे सरकारी गृहरचनेचा राज्यनिहाय इतिहास, औदयोगिक सहकारी संस्था,

हस्तमाग धारकांच्या सहकारी संस्था इत्यादी बाबींचा ऐतिहासिक मागोवा आपल्याला या पुस्तकांच्या सहाय्याने घेता येऊ शकेल.

४. **'वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन प्रबोधिनी** या संस्थेने ऑक्टोबर १९७५ मध्ये' हे पुस्तक प्रकाशित करून सहकार क्षेत्रामध्ये झालेल्या सर्व महत्वपूर्ण संशोधनाचा मागोवा घेतला आहे. या पुस्तकामुळे सहकाराच्या संशोधनाची एक मोठी यादी आपणास उपलब्ध होते. सहकारावर संशोधन करताना उपलब्ध सहित्याचा मागोवा घेण्यासाठी हे पुस्तक महत्वपुर्ण ठेवा समजावा लागेल. या पुस्तकामध्ये सहकारी अल्पकालीन कर्जपुरवठा, दीर्घकालीन कर्जपुरवठा, सहकारी विक्री व्यवस्था, सहकारी परकीय व्यापार, औदयागिक सहकारी गृहनिर्माण इत्यादी क्षेत्रामध्ये सहकारावर झालेल्या सर्व संशोधनांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या पुस्तकाने केला आहे. त्यामुळे या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्याला भारताचा आर्थिक इतिहास समजण्यास मदत होते.

भारत सरकारच्या समाज विकास पंचायती राज आणि सहकार मंत्रालयाने सहकारी समाज या विषयावर इ. स. १९६० च्या दरम्यान एक चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रांचा मागोवा घेऊन तो ऑगस्ट १९६२ मध्ये पुस्तकरूपाने प्रकाशित करण्यात आला. या प्रकाशनाच्या संपादनाच्या कामी प्रोफेसर एम. आर. पाळंदे आणि प्रोफेसर पी. एम. चेंगाप्पा यांनी योगदान दिलेले आहे. या पुस्तकामध्ये अगदी सुरूवातीच्या काळात मद्रास आणि केरळ राज्यामधील सहकाराची सुरूवात डेक्कन कमिशन (१९७५), फॅमिन कमिशन (१९८०), वेगवेगळे तगाई कायदे इ. स. १८७१, इ .स. १८७६ मधील आणि इ. स. १८७९ इत्यादीपासून सुरूवात करून नंतरच्या काळातील विकास आणि योगदानाचा मागोवा घेतलेला आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुध्दाचे सहाकरी चळवळीवर झालेले परिणाम आणि महायुध्दानंतरची परिस्थिती यांचा आढावा घेऊन सर्वोदय चळवळीचा आणि सहकाराचा संबंध सुध्दा आपल्याला या पुस्तकात सापडतो. सहकारी समाज या नावाने प्रकाशीत केलेल्या पुस्तकात आपआपल्या सहकार क्षेत्राने कृषी, विक्री प्रक्रिया, शिक्षण प्रशिक्षण इत्यादी क्षेत्रांना दिलेल्या योगदानांचा इतिहास सापडतो. त्याचप्रमाणे हातमाग आणि इतर घरगुती उदयोगातील सहकाराचे योगदान आपल्याला या पुस्तकात पहावयास मिळते.

पंचायती राज आणि सहकार यांचा सुध्दा संबंध कशाप्रकारे जवळकीतेचा असू शकतो. आणि ग्रामीण लोकशाहीप्रमाणे सहकाराच्या माध्यमातून कशी भक्कम होत गेली. याविषयीचे मत नोंदविल्याचे दिसून येते. अशा प्रकारे भारताच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने प्रकाशित केलेला हा एकमेव द्वितीय ग्रंथ मानला पाहिजे.

**५. मनोज आवाळे यांनी ' महाराष्ट्रातील राजकीय घराणे'** आदिश्रेय प्रकाशन पुणे या पुस्तकामध्ये महाराष्ट्र राज्याच्या राजकाराणावर दीर्घकाळ ठसा उमटविणारे राजकीय घराणे व त्यांचे वारस याविषयी माहिती दिली आहे.या पुस्तकांत त्यांच्या कारकीर्दचा आढावा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्राचे सर्व राजकारणच घराणेभोवती फिरत आहे. या घराण्यांचे जनमाणसात असणारे स्थान त्यांच्या ताब्यात असलेल्या सहकारी व शिक्षणसंस्था उदयोजकांचे त्यांना असणारे पाठबल त्यांनी केलेले कार्य यामुळे घराण्यांचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.यास काही टिकाकार राजकीय घराणेशाही असेही म्हणतात. या पुस्तकात घराण्यांच्या कारकिर्दीचा धावता आढावा घेण्यात आला आहे. राजकीय घराणी त्यांचे वारसदार त्यांनी केलेले ठळक कार्य याची माहिती या पुस्तकामध्ये आहे. सदर संशोधनासाठी अहमदनगर जिल्हयातील राजकीय घराण्यांच्या अभ्यासासाठी महत्वपूर्ण आहे.

**६. गणेश देशमुख यांच्या 'ग्रामवेद महाराष्ट्रीय ग्रामजीवनाचे सर्वांगीण चिंतन'** या पुस्तकात सहकार या प्रकरणामध्ये बाळासाहेब विखे यांनी सहकार चळवळीतील संघटन याविषयी आपले मत नोंदविले आहे. प्रा. राजेंद्र व्होरा यांनी सहकारी सरंमजाशाही या घटकांची सविस्तर माहिती दिली आहे. यामध्ये सहकारा क्षेत्राचे विकासाचे चार टप्पे मांडण्यात आले आहे. पहिला टप्पा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती पर्यंतचा कालखंड हा प्राथमिक टप्पा होता. १९६० पर्यत सहकारी संस्थाची निर्मिती झाली. १९७५ नंतर सहकारी चळवळीतून साखर कारखानदारी यावर श्रीमंत मराठयांचे वर्चस्व व काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व हा टप्पा सहकार क्षेत्रातील दुसरा मानण्यात आला. या टप्प्यामध्ये जिल्हा व तालुका पातळीवर जिल्हा परिषदा पंचायत समित्या एकंदरच राजकारणात सहकारी संस्थाची सरमिसळ झाली यातून राजघराण्यांची निर्मिती झाली या घराण्यांनी या संस्थाकडे आपले वतन म्हणून पाहिले आहे. सहकाराचा तिसरा टप्पा उदारीकरण जागतिकीकरण

म्हणता येईल यामुळे सहकारी संस्था ऱ्हासाकडे गेलेल्या दिसतात. सहकाराच्या चौथ्या टप्प्यात प्राप्त परिस्थितीत या क्षेत्राला अधिक भक्कम व कायापालट करण्यासाठी येणाऱ्या नवीन पिढीला आव्हान ठरले आहे. के. ई. हरिदास या लेखकाने सहकारी साखर उदयोगाविषयी महत्वपूर्ण नोंदी स्पष्ट केल्या आहेत तसेच राजकारण या प्रकरणात प्रा. विलास आवारी यांनी स्वातंत्र्योत्तर अहमदनगर जिल्हयातील राजकारण या घटकांचा सविस्तर अभ्यास सदर संशोधनासाठी उपयोगी ठरणार आहे.

**७. 'महाराष्ट्र वार्षिकी २००८ ते ०९ 'युनिक ॲकडमी पुणे** श्याम जाधव यांनी महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचा विषयामध्ये सहकरी चळवळीचा उदय व विकास, सहकारी साखर कारखाने, साखर उदयोगाचे अर्थकारण आणि समाजकारण, साखर उदयोगाचे राजकारण, सहकार क्षेत्रातील राजकीय अभिजन निवडणूक काळात सहकारी कारखान्यांची भूमिका, सहकारी क्षेत्रासमोरील समस्या, सहकारी क्षेत्रातील समस्यांवरील उपाय हे मुद्दे सदर संशोधनासाठी अभ्यासासाठी उपयुक्त आहे. या पुस्तकात खालील गोष्टी नमूद केल्या आहेत. महाराष्ट्रातील सहकार चळवळ सहकारी चळवळीचा उदय आणि विकास भारतातील सहकारी चळवळीची पार्श्वभूमी सहकारी कायदयाची स्थापना, सहकार क्षेत्राची वाटचाल, सहकारी साखर कारखाने, सहकार साखर उदयोगाचे अर्थकारण आणि समाजकारण, साखर उदयोगाचे राजकारण, आर्थिक हितसंबधातून राजकारण आणि राजकारणातून आर्थिक बांधणी, शुगर लॉबीचे राजकारण, सहकारी क्षेत्रातील राजकीय अभिजन, निवडणूक काळात सहकारी साखर कारखान्यांची भूमिका, नव्या सत्ता केंद्राचा उदय, १९९० नंतर सहकारी क्षेत्राचे बदलते स्वरूप, सहकार क्षेत्रासमोरील समस्या, सहकारी क्षेत्रातील समस्यावरील उपाय अशा विविध मुद्दयांचा सखोल अभ्यास केलेलाा आहे. तसेच सहकार आणि महाराष्ट्राच्या राजकारणातून ३ गोष्टीचा उल्लेख केला आहे.

१. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून स्थानिक राजकारण बळकट केले जात आणि यातून राजकीय नेतृत्वाचा उदय होताना दिसतो.

२. या सहकारी क्षेत्रावर सधन बागयतदार म्हणजे नव–श्रीमंत वर्गाचे वर्चस्व आहे.

३. सहकार क्षेत्रावर मराठा जातीचे वर्चस्व असून त्या खालोखाल लेवा पाटील, लिंगायत यांचे वर्चस्व आहे. विशेषतः बागायतदार वर्गात याच लोकांचे अधिक प्रमाण आहे.

८. **सुहास पळशीकर यांनी 'महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ'** प्रतिभा प्रकाशन या विभाग चौथा बाळ कांबळे आणि गिरीश कुलकर्णी या लेखकाने अहमदनगर जिल्हयातील स्थानिक संस्था जिल्हयाचे अर्थकारण राजकारण जिल्हा परिषद निवडणूक २००२ अहमदनगर जिल्हयातील घराणेशाही व गटबाजी व नगरपालिका निवडणूका २००१ विषयी सविस्तर माहिती नोंदविली आहे. सदर संशोधनासाठी माहिती संकलन सोईस्कर होणार आहे. राजकारणाच्या स्थानिक संदर्भाच्या चित्किसा या पुस्तकात केलेली दिसते. १९९० पूर्वीचा कालखंड आणि १९९० नंतरचा कालखंड याचा तुलनात्मक विचार केलेला आहे. प्रस्तुत पुस्तकात एका वेगळया पध्दतीने महाराष्ट्राच्या राजकारणाची मांडणी केली आहे. राज्यपातळी विभागीय पातळी आणि स्थानिक पातळी अशा तीन पातळयावर नव्वदीच्या अखेरच्या महाराष्ट्राच्या राजकारणाचे विश्लेषण केले आहे. एक म्हणजे २००१ ते २००२ मध्ये झालेल्या स्थानिक शासनाच्या निवडणूकांचे तपशीलवार विवेचन केले आहे. दुसरे म्हणजे जिल्हयात किंवा विभागात विशेषतः १९९५–९६ नंतरचे राजकीय प्रवाह व स्थानिक शक्तींचा उदय याचे वर्णन केलेले आहे. तिसरे राजकीय अर्थव्यवस्थेचाही राजेंद्र व्होरा यांनी मराठा वर्चस्व स्वरूप व मर्यादा या लेखात महाराष्ट्रातील १९६२ पासूनच्या विधानभा निवडणूकात निवडून आलेल्या आमदारांचे जातीनूसार व पक्षानूसार विश्लेषण केले आहे. त्यातून त्यांनी खालील निष्कर्ष मांडले .

१. मराठा जातीच्या आमदाराचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

२. मराठा जातीचा प्रभाव ग्रामीण भागामुळे दिसतो. महाराष्ट्रातील ग्रामीण अभिजनांचा १९६७ मध्ये जे अभ्यास झालेला आहे. त्यानूसार तीन विभागातील तीन जिल्हयात मराठा जातीतील अभिजनांचे प्रमाण ७७ टक्के होते.

३. मराठयांची शेतजमिनीवरील मालकी हा त्यांच्या प्रभावाचा मुख्य घटक आहे. १९६७–६८ मध्ये केलेल्या एका अभ्यासानूसार पाच जिल्हयातील ५० गावातील राजकीय नेत्यांपैकी ६५ टक्के मराठा जाती मधील पाटील व देशमुख घराण्यातील होते. ८५ टक्के मराठा नेत्यांचा आर्थिक उत्पन्न गट उच्च होता.

४. मराठा नेते जमीन मालकीवर प्रभुत्व असणाऱ्या इतर जातीबरोबर समांतर युती करून आपला प्रभाव टिकवतात.

अ) मराठा जातीच्या प्रभुत्वाच्या मर्यादा लेखकाने नमुद केले आहे. मराठा जातीचा प्रभुत्वाचा पाया शेती अर्थव्यवस्थेत आहे. शेती क्षेत्रातील कमी होत जाणारे नफ्याचे प्रमाण मराठा जातीच्या प्रभुत्वावर मर्यादा आणते.

ब) मराठा जातीचा मुख्य घटक सहकारी क्षेत्र आहे. सहकारी क्षेत्रात कमी उत्पादन, जास्त खर्च, जगतिकीकरणामुळे स्पर्धा, कर्जबाजारीपणा, सहकारी साखर कारखाने तोटयात, बँका दिवाळखोरीत, ग्रामीण भागातील पतपुरवठा संस्था व शेतमालाच्या उत्पादन संस्था तोटयात असल्यामुळे मराठा प्रभुत्वाला मर्यादा आल्या आहेत. वरील विश्लेषणात्मक अभ्यास सदर संशोधनासाठी मराठा राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करताना फायदेशीर ठरणार आहे.

**९. सुधाकर जोशी यांनी 'सत्याग्रही शेतकरी शंकरराव गेणूजी कोल्हे'** या पुस्तकात सहकार चळवळीची सदयस्थिती सहकार चळवळीतील चिंतन केलेले आहे. तसेच सहकाराचे भवितव्य या विषयावर परखडपणे आपले मत व्यक्त केले आहे. सहकाराचे भवितव्य खालील गोष्टीतून नमूद केले आहे.

१. सहकारी साखर कारखाने.जिल्हा सहकारी बँका, ग्रामीण विकास सोसायटया व नागरी सहकारी बँका यांचा सहकारातील असलेला सहभाग प्रधान स्वरूपाचा आहे. राज्यात या चारही घटकातील असंख्य संस्थामध्ये मागील दशकापासून मोठया प्रमाणावर अकार्यक्षमतेच्या जोडीला आर्थिक गैरव्यवहाराचे बुजबजाट होत आहे. सहकारी संस्था बद्दल जनतेच्या मनात सभ्रंम निर्माण होत आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील १७७ सहकारी साखर कारखान्यातील अनेक कारखाने दिवाळखोरीस निघाले व आजारी सहकारी साखर कारखान्यांची संख्या ५६ वर पोहचली आहे. सहकारी साखर कारखान्यात कच्च्या मालाची उपलब्धता नसणे बेफिकीर किंवा उदासीन व्यवस्थापन हे या कारखान्यासाठी जबाबदार आहे.

३. जिथे ऊस पिकत नाही तिथे ऊसाचे कारखाने निर्माण झाले. जिथे कापूस पिकत नाही स्पिनींग मिल्स निघाल्या. या राजकाराणामुळे सहकारी साखर कारखाने अयशस्वी झाले आहे. १९९१ मध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण झाल्यामुळे सहकार क्षेत्र मागे पडू लागले आहे. यातून खाजगी साखर कारखान्यांची निर्मिती सुरू झाली. जिथे एकही कारखाना नव्हता चार वर्षाच्या

काळात  आज महाराष्ट्रात २२ खाजगी साखर कारखाने सुरू झाले आहे. सध्याच्या मुक्त अर्थव्यवस्थेतील स्पर्धेला सहकारा क्षेत्राला तोंड देणे मुश्किल झाले आहे.

**१०. शंकरराव गडाख यांनी 'परिवर्तन अहमदनगर डिस्टिॅक्ट सेंट्रल को-ऑप. बॅंक लि. अहमदनगर १९५८ ते २००८'** या पुस्तकात सहकाराचा उदय अहमदनगर जिल्हा सहकारी बॅंकेची स्थापना, साखर कारखाना उभारणे, दूधसंस्था, सहकारी पतपुरवठा विषयी विविध राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा परिचय केला आहे. भाऊसाहेब थोरात यांनी या पुरस्कात सहकाराने आणली समृद्वधता या लेखात सहकार कायदा राज्य सहकारी बॅंकांची निर्मिती, दुष्काळ व फार्मर्स् बॅंक यांचे वर्णऩ मुंबई प्रांतिक सहकारी बॅंकेची निर्मिती, वैकुंठभाई मेहता यांचे जीवनपट तसेच शाखा वृद्वी सहकार उदयोग मंडळ गोरवाल समिती पीककर्ज व ठेव विमा व वस्त्र उदयोग अशा विविध मुद्दयांची चर्चा करून सहकार चळवळीची वेगाने वाटचाल झाली हे नमूद केले आहे. अहमदनगर सहकारी बॅंकेचे प्रगतीचा दशकवार आढावा खालील कालखंडाद्वारे घेतला आहे.

१. दशकोत्तर प्रगतीचा कालखंड  सन १९५८ ते १९७०

२. दुसरे दशक सन १९७१ ते १९८०

३. तिसरे दशक सन १९८१ ते १९९०

४. चौथे दशक सन १९९१ ते २०००

५. पाचवे दशक २००१ नंतरचे अशा विविध कालखंडाचा अभ्यास या पुस्तकात केला आहे.तो सदर संशोधनासाठी सहकार क्षेत्रात सहकार संस्थाच्या अभ्यासासाठी दिशा दर्शक ठरणार आहे.

**११. योगेंद्र यादव यांनी 'लोकशाही जिंदाबाद'** या पुस्तकात दक्षिण आशिया क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास केला आहे. त्यातून त्यांनी खालील काही मुद्दयांचा समावेश केला आहे.

१. एखादया विशिष्ट घराण्यांचे प्रभुत्व मोठया प्रमाणात दिसते.

२. पक्ष स्थापनेपासून दैनंदिन व्यवहारापर्यंत एका विशिष्ट घराण्यांचे वर्चस्व असते.

३. पक्षाच्या नेतृत्वाचा वारसाही याच कुंटूंबातल्या एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे जाताना दिसतो. विशेष म्हणजे या क्षेत्रातील अनेक छोटयाछोटया पक्षांनी या घराणेशाहीचे अनुकरण केलेले दिसते. राजकीय घराणेशाहीचे काही उदाहरणे स्पष्ट केले आहे. श्रीलंकेतील श्रीलंका फ्रिडम पार्टी

बंदरनायके घराणे, बांगलादेश मधील बांगला देश नॅशनल पार्टी, झिर्या उर्र रेहमान घराणे, पाकिस्तानातील पाकिस्तान पिपल्स् पार्टी भुटट्रो घराणे, नेपाळ मधील नेपाळी काँग्रेस कोईराला घराणे, तसेच भारतातला काँग्रेस पक्ष, नेहरू घराणे या संदर्भातील ठळक उदाहरणे देत घराणेशाही स्पष्ट केली आहे.

**१२. बाळ ज. बोठे पाटील 'कारभारी अहमदनगर जिल्हयाचे'** या पुस्तकात नगर जिल्हा राजकीय दृष्टा अत्यंत जागरूक आणि सजग आहे. सहकारी संस्थाचे येथे व्यापक जाळे आहे. येथील नेतृत्वाच्या नाना तत्हा आहेत. सतत पक्ष आणि धोरणे बदलणारी नेते आहे. आणि वर्षानुवर्ष पक्षाशी एकनिष्ठ राहिले नेतेही आहेत. पारंपारिक मतदारांना टिकून ठेवण्यासाठी मतांचे राजकारण करणारे विकास विधायक कामातून मतदारांना जोडणारे केवल दुसत्यावर टिका टिप्पणी करून धन्यता मानणारे तर कोणी मतभेदाचे भांडवल करणारे असे विविध विचांराचे नेते जिल्हयात पाहायला मिळतात जिल्हयाच्या जडणघडणीत केवल राजकीयच नव्हे तर इतर क्षेत्रातील नेत्यांचा मोठा वाटा आहे.साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, कामगार, क्रिडा आदि विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. ३१ मे २००७ पासून नगर जिल्हयातील दिवगंत जेष्ठ नेते बाळासाहेब विखे यांच्या पासून या मालिकेला प्रारंभ होवून ३१ ऑगस्ट २००९ रोजी जेष्ठ समाजसेवक आणा हाजारे यांच्यावरील आलेखमय शब्दपट साकारलेला आहे. १०० भागाची ही मालिका साकारण्यासाठी नगर जिल्हयाच्या अंतरंगात सुप्त पणाने दडून असलेली राजकीय व इतर क्षेत्रातील अनेक व्यक्तीमत्वे त्यांनी आदबलेला संघर्ष ग्रामीण भागात त्या निमित्ताने निर्माण झालेले समोचित समाजकारण लोककारण समाजा पुढे आणले गेले आहे. अशा या पुस्तकात मालिकेतील विविध लेखांचा संग्रह आहे. सदर संशोधनासाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे.

**१३. जगन कराडे 'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने २००८'** या पुस्तकात जागतिकीकरण व सहकार चळवळीसमोरील आव्हाने या लेखामध्ये डॉ. पी. ए. कोळी यांनी सहकार चळवळीची व्याप्ती भारतातील सहकारी चळवळ विषयी सविस्तर माहिती नमूद केली आहे. सहाकार चळवळ आणि शासनाचा पाठिंबा यावर प्रखर भाष्य केले. जागतिकीकरणाच्या प्रवाहात सहकारी

संस्थेबाबतचे काही समज गैरसमज नमूद केले आहे. सहकार चळवळीचे प्रमुख दोष खालीलप्रमाणे सांगितले आहे.

१. भ्रष्टाचार एक कलंक

२. सहकारी मूल्ये आणि तत्वे यांचे उल्लघंन

३. घराणेशाही

नव्या आर्थिक धोरणामुळे केवळ सहकार क्षेत्रालाच नव्हे खाजगी क्षेत्राला फटका बसला आहे. नवे आर्थिक धोरण खालील बाबीसाठी अवलंबले जाते.

१. कार्यक्षमतेत वाढ करणे.

२. उत्पादन खार्च कमी करणे.

३. स्वयं निर्धारित वातावरण निर्माण करणे.

४. सक्षम व्यवस्थापन निर्माण स्पर्धेला तोंड देणे.

जागतिकरणाच्या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थाच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना

१. उत्पादकांसाठी कंपनी कायदा २००२ चा अवलंब करणे.

२. खाजगी क्षेत्राशी समझोता

३. नव्या पिढीतील संस्थाची निर्मिती

४. व्यवहार वाढ आर्थिक एकसंघपणा

अशा रितीने जागतिकीकरणात सहकाराचे आस्तित्व टिकून ठेवण्यासाठी उपाययोजना सदर संशोधनासाठी अभ्यासपूर्वक ठरणार आहे.

## २.३ मासिके व साप्ताहिके

**१. 'सहकार शताब्दी विशेषांक सहकार सारथी २००४-०५'** या साप्ताहिकामध्ये श्री बा. भा. पुजारी या लेखकाने महाराष्ट्रातील सहकार चळवळ कथा आणि व्यथा या लेखामध्ये १९९१ ते २००२ या १२ वर्षातील खुल्या अर्थव्यवस्थेचा थोडक्यात आढावा घेतला आहे. त्यामागे या देशातील सहकारी चळवळ व सहकारी बँकींग व्यवसाय यामधील सर्व दोष निघून जावे व सर्वसामान्य माणसाच्या विकासाची निकोप चळवळ म्हणून सहकारी चळवळीला मानाचे स्थान

प्राप्त व्हावे हा मूलभूत दृष्टीकोन आहे.त्यासाठी सहकार क्षेत्रातील नेत्यांनी व शासनाने पुढील मुद्दयांचा विचार करावा.

१. सहकार चळवळ हे व्यापारी व खाजगी संघटनांही तर सर्वसामान्य माणसाला विकासाची संधी निर्माण करून देणारी सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे.

२. शेती व ग्रामीण पतपुरवठयाच्या सर्व योजना सहकारी बँकींग व्यवसाायाच्या कक्षतेतच ठेवण्यात याव्यात. केंद्रसरकारचा मल्टीस्टेट को–ऑफ. ॲक्ट व राज्यसरकारचे सहकारी कायदे ताबडतोब बदलण्यात येऊन नवीन कायदयामध्ये सहकारी चळवळीला पूर्ण स्वायतत्ता देण्यात यावी भारत सरकारच्या ब्रम्हप्रकाश चौधरी कमिटीने तयार केलेला आदर्श सहकारी कायदयाचा मसूदा यासाठी आधार धरण्यात यावा .

महाराष्ट्र राज्याच्या दृषीकोनातून या बदलांच्या संदर्भात दोन महत्वाचे परिणाम महाराष्ट्रातल्या राजकीय नेत्यांनी लक्षात घ्यावेत.

१. सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्र समृध्द झालेला आहे ही कारखानदारी उदया बंद पडली अगर मोडली तर उदयाच्या ग्रामीण महाराष्ट्राचे भवितव्य काय?

२. सहकारी चळवळीतून महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वात आजच्या ग्रामीण नेतृत्वाला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे त्यामुळे सहकारी संस्थाचा प्रभाव राज्यातून नाहीसा झाला तर राजकारणात स्थिर झालेले आजचे ग्रामीण नेतृत्व संपुष्टात येईल याची दखल सहकारी क्षेत्राबरोबर राजकीय नेत्यांनी घेण्याची आवश्यकता आहे.

**२**. महाराष्ट्राच्या राजकीय घराण्याचा आढावा पूर्णपणे आजवर घेण्यात आला नाही मात्र **'महाराष्ट्र माझा'** या **सन २०११** च्या दिवाळी अंकातून एकूण घराणेशाहीचा आढावा घेण्यात आला आहे. घराणेशाहीच्या उगमापासून विस्तारापर्यतचा आढावा यात घेण्यात आला आहे.

सारांशरूपाने या प्रकरणात उपलब्ध साहित्याचा परामर्श घेतला आहे. संशोधन कार्याला दिशा मिळावी हा हेतू समोर ठेवून विविध विदयापीठातील पीएच. डी. व एम. फिल प्रबंधाचा आढावा घेण्यात आलेला आहे. या शोध प्रबंधातील संशोधन पध्दती उद्दिष्टे निष्कर्ष यांची माहिती मिळविली आहे. जेने करून ही माहिती प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी सुकर होईल. या प्रकरणातील सहकारी राजकीय घराण्यांच्या अभ्यास राजकीय नेतृत्वाची अभ्यास तसेच सहकार

चळवळीचा परामर्श हे घटक प्रस्तुत संशोधन अभ्यासणारी उपयोगी ठरणार आहेत. तसेच महाराष्ट्राचे राजकारण व स्थानिक प्रक्रियेतील संदर्भ सत्याग्रही शेतकरी परिवर्तन लोकशाही जिंदाबाद अशा पुस्तकातील माहिती ही प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी उपयुक्त ठरली आहे. आशाप्रकारे विविध अहवाल, शोधप्रबंध, संदर्भग्रंथ यांच्या आढाव्यातून अभ्यासातून मिळविलेली माहिती प्रस्तुत अभ्यासास नक्कीच उपयोगी ठरली आहे. त्याचबरोबर या संदर्भ साहित्याचा आढावा व अभ्यासामुळे प्रस्तुत अभ्यासाची उद्दिष्टे व गृहितके निर्धारित करणे सोईचे झाले आहे. वरील माहितीच्या अभ्यासामुळे प्रस्तुत अभ्यास वेगळा व काळ सुसंगत आहे.सत्यकालीन परिस्थितीत त्याची उचित प्रस्तुता असुन राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासाच्या विश्वासात भर घालणारी आहे.

## संदर्भ ग्रंथ :-

### विषयाशी संबधित पीएच. डी. प्रबंध


१. खंडागळे जनार्धन काशीनाथ (२००४)' बाळासाहेब विखे पाटील ग्रामीण नेतृत्व एक अभ्यास' पीएच. डी. प्रबंध मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद.

२. राठोड हेमलता अरविंद (२०११) 'सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात व्यक्ती वा कार्य राजकारणातील वा सहकारातील योगदान' पीएच. डी. प्रबंध पुणे विदयापीठ.

३. रविंद कोंडीराम काळे 'महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरूप' पीएच. डी. शोध प्रबंध मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद.

४. शेवाळे सिमा दिंगबर (२०१५) महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्व आणि सहकार चळवळ : आण्णासाहेब मगर विशेष अभ्यास (१९१९ ते १९७९) पीएच. डी. प्रबंध सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ.

५. दे. अ. इथापे (१९९६) 'यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व एक राजकीय चित्किासा' पीएच. डी. प्रबंध नागपूर विदयापीठ.

६. कुरूमकर रघुराज मुकुटराव (२०१४)' अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागातील राजकीय़ सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास (१९९० ते २०००)' पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे.

७. पाटील संभाजी नारायण (२०११)' महाराष्टॅातील सहकारी साखरकारखानदारी आणि ग्रामीण विकास यातील अंतर संबधाचा अभ्यास' श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याचे व्यष्टी अध्ययन पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे.

८. बोठे पाटील बाळासाहेब जगन्नाथ (२०१६)' अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक ़आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास' १९९३ ते २०१० पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे.

९. खिलारी सुनिल प्रभाकरराव (२००९)' अहमदनगर जिल्हा परिषद एक ऐतिहासिक अभ्यास' सन (१९६१-९१) पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे.

१०. सुरेश पंढरीनाथ काळे (२०१५) 'अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीचा इतिहास : विशेष संदर्भ 'शंकरराव काळे यांचे सहकार व शिक्षण विषयक कार्य' पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.

११. निलेश रा. दांगट (२००३)' ग्रामीण विकासात सहकारी साखर कारखान्यांचा सहभाग' (पुणे जिल्हयाचा विशेष अभ्यास) पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.

१२. दिगंबर आप्पासाहेब खेडेकर (२०१२)' यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील योगदान' पीएच. डी. प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

१३. कुलकर्णी गिरीश 'महाराष्टॅातील सहकारी नेतृत्व सहकारी कारखान्याच्या संदर्भात नगर व पुणे जिल्हयाच्या संदर्भात नगर व पुणे जिल्हाध्यक्ष विशेष संदर्भासह' पुणे विद्यापीठात पीएच. डी साठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध (१९९६).

१४. Kadam Parag Pramodv (2010) Role of co-operative movement in susstaing rural economy in the context of economics reforms. A case Sudy of Ahmednagar district. Ph. D. thesis Tilak Maharashtra Vidyapeeth Pune.

**विषयाशी संबधित एम.फील.प्रबंध**

१. किशोर रक्ताटे 'महाराष्ट्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास' अहमदनगर जिल्हयाचा विशेष संदर्भासह या एम. फिल. प्रबंध पुणे विद्यापीठ.

२. बागले बी.एम. (२००६)' प्रवरानगर परिसरातील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे शैक्षणिक कार्य व त्यांची परिणामकारकता याचा अभ्यास करणे' एम. फिल प्रबंध य. च. म. मु. वि. नाशिक.

३. दराडे संभाजी 'जनतेचे स्वर्गीय बाबुराव आव्हाड यांचे पाथर्डी परिसरातील कार्य व कर्तुत्वाचा चिकित्सक अभ्यास' नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ एम. फिल पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध (२०१२).

४. प्रा. सोनवणे दिंगबर 'अहमदनगर जिल्हयातील थोर स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान' अमरावती विद्यापीठाच्या एम. फिल पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध (२००८).

## प्रकरण ३

# संशोधन कार्यपध्दती

## विभाग १ संशोधन पद्धती

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३.१ | प्रास्ताविक | १५९ |
| ३.२ | समाजशास्त्रीय संकल्पना | १६५ |
| ३.३ | संशोधन समस्या | १७१ |
| ३.४ | संशोधनाचे निवड | १७२ |
| ३.५ | संशोधनाचे महत्त्व | १७४ |
| ३.६ | संशोधनाची उद्दिष्टे | १७६ |
| ३.७ | संशोधनाची गृहितके | १७६ |
| ३.८ | गृहितकांची सत्यासत्यता | |
| ३.९ | संशोधन पद्धती | १७६ |
| | ३.८.१ प्राथमिक स्त्रोत | १७९ |
| | ३.८.२ द्वितीय स्त्रोत | १८५ |
| | ३.८.३ सांख्यिकी साधने | १८५ |
| ३.१० | संशोधनाचा कालावधी | १८६ |
| ३.११ | संशोधन अभ्यासाची मर्यादा | १८६ |
| ३.१२ | संशोधन आराखडा | १८६ |

# प्रकरण ३

# विभाग १ संशोधन पद्धती :–

## ३.१ प्रास्ताविक :–

सामाजिक संशोधन हे सामाजिक घटनांचे अध्ययन आहे. सत्याचे संशोधन केल्यामुळे ज्ञानप्राप्ती होते. आणि त्याचा समाजाला अत्यंत उपयोग होतो. सामाजिक संशोधन हे ज्ञान, बुद्धी जुन्या ज्ञानाचे परिक्षण करणे या उद्देशाने केले जाते. त्यामुळे सामाजिक घटना, सामाजिक प्रक्रिया, सामाजिक व्यवस्था इ. संबधीचे आपले ज्ञान विकसीत होते. त्यातून पद्धतशीर शास्त्रीय विचाराला चालना मिळते. सामाजिक संशोधनामुळे सामाजिक जीवनातील अनेक रहस्याचा उलगडा होतो आणि सामाजिक वास्तविकतेसंबंधीचे आपले ज्ञान विकसीत होत जाते.[१]

संशोधन हे जेव्हा सामाजिक तथ्य घटना सिद्धांत आणि नवीन ज्ञानाच्या संबंधीत असेल तेव्हा त्यास सामाजिक संशोधन म्हणता येईल. सामाजिक संशोधन ही एक प्रक्रिया अथवा पद्धत आहे. तिला वैज्ञानिक अधिष्ठान आहे. शास्त्रीय संशोधनाची दोन आवश्यक तत्त्वे आहेत. पहिले तत्त्व म्हणजे निरीक्षण व दुसरे तत्त्व म्हणजे कार्यकारण संबध होय. पहिल्या तत्त्वाप्रमाणे कोणत्याही अध्ययनविषयाच्या संदर्भात आपण प्रत्यक्ष निरीक्षण करून ज्ञान प्राप्त करू शकतो व दुसऱ्या ततत्त्वाप्रमाणे कार्यकारणभावाच्या संबंधातून तथ्यांचा अर्थ, त्यांचा संबंध निश्चित केला जातो. या दृष्टीने कोणतीही सामाजिक समस्या सोडविण्याकरिता प्रकल्पाचे परीक्षण करणे, नवीन घटनांचा शोध घेणे. विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे हा सामाजिक संशोधनाचा अर्थ आहे.[२]

संशोधनामुळे समाजातील दुष्टप्रवृत्तींची आणि त्यांच्या दुष्परिणामांची जाणीव होते. विद्यमान ज्ञानात भर घालणे हे सामाजिक संशोधनाचे कार्य आहे. त्या सोबतच परंपरावर आधारित साचेबंध ज्ञानाची मळकटे झुगारुन व्यावहारीकतेवर आधारित नवीन सिद्धांताची मांडणी करणे तितकेच महत्त्वपूर्ण कार्य आहे. लोकशाही देशातील सरकारी धोरणे ही सतत चालणाऱ्या संशोधनावर आधारित असतात. वाढत्या लोकसंख्येला आळा घालायचा असल्यास सर्वप्रथम त्याच्या वाढीची कारणे शोधावी लागतात. मगच उपाययोजनेचे धोरण आखावे लागते. अंदाजे उपाययोजना केल्यास नुकसान अधिक होण्याची शक्यता असते. मोठमोठ्या उद्योगांना आपल्या उत्पादनाचे उद्दिष्ट बाजारपेठेच्या संशोधनानंतरच ठरविता येते. लोकांच्या आवडी–निवडी,

क्रयशक्ती सतत बदलत असतात. यावर लक्ष नसेल तर उदयोग डबघाईस येतात. सामाजिक शास्त्राच्या दृष्टीने सामाजिक संबंधाचे संशोधन महत्त्वाचे ठरते. संशोधन ही एक संचयी प्रक्रिया आहे. तसेच सामाजिक संबंधाचे शास्त्राच्या संदर्भात ती एक विसर्जन प्रक्रियासुद्धा आहे. केवळ ज्ञानात भर पडल्यानेच आकलन वाढते असे नाही तर प्रस्थापित गैरसमजूतीच्या त्याग केल्यानेही आकलनात वाढ होत असते. ज्ञानाचा शोध हा जनतेच्या गरजा आणि कल्याण यांच्याशी संबंधित आहे. आणि सर्वच ज्ञान हे शेवटी उपयुक्त ठरणारेच आहे.[३]

विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतातील सहकारी चळवळ उदयास आली ब्रिटिश, आमदानीत सहकारी चळवळीचे बिजारोपण झाले परंतु परकीय सत्तेमुळे व पारतंत्र्यामुळे ह्या चळवळीची व्हावी तेवढी प्रगती झाली नाही. महापूर, दुष्काळ या कारणांमुळे आणि अस्थिर अर्थिक धोरणामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती फारच खालावली. आणि याची परिणती म्हणजेच १८७९ माधील सरकारविरूद्ध झालेले बंड होय. या बंडाचा परिणाम म्हणूनच सन १९८३–८४ मध्ये लॅण्ड इंम्पुव्हमेंट लोन्स अॅक्ट व अॅग्रीकल्चरल लोन्स अॅक्ट हे दोन कायदे पास होऊन शेतकऱ्यांना कर्ज पुरविण्याची सोय करण्याचा प्रयत्न सुरू झाला.

महाराष्ट्र राज्यात १८७६–७८ या दोन वर्षात प्रचंड दुष्काळ पडला होता. एकदंर या दुष्काळाला व सावकारीला कंटाळून मुंबई येथे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन मराठा लॅण्ड लीगची स्थापना केली. यांच्या माध्यमातून सावकारावर बहिष्कार टाकला गेला. सावकारांची दुकाने जाळणे, कर्जाची कागदपत्रे नष्ट करणे, आदी प्रकारे शेतकऱ्यांनी अंसतोष व्यक्त केला. ज्यावर ब्रिटिश शासनाने एक चौकशी आयोग नेमला आयोगाच्या शिफारशीनुसार 'डेक्कन अॅग्रीकल्चरिस्ट अॅक्ट १८७९ मध्ये पारित केला. १८९८–१९०० चा दोन वर्षात पडलेल्या दुष्काळाला प्रति उत्तर देण्यासाठी लॉर्ड कर्झन यांने श्री. निकाल्सन (मद्रास मधील अधिकारी) व श्री डयुपरमेक्स (उत्तरप्रदेश मधील अधिकारी) यांची त्यांचा जर्मनी, फ्रान्स व इटली येथील सहकारी बँकाचा अभ्यास असल्याने कलकत्ता पतसंस्था कायदा मंजुर करण्यात आला या कायद्याद्वारे स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रासह संपूर्ण भारतभर सहकारी चळवळीची सुरूवात झाल्याचे दिसून येते.[४]

अहमदनगर जिल्ह्यात सहकारी चळवळीची परंपरा जुनीच आहे. जिल्ह्यातील पहिली सहकारी संस्था स्थापन करण्याचा मान कर्जत तालुक्याच्या मिळाल्याने १९९० रोजी कर्जत येथे पहिली सहकारी पतपेढी स्थापन करण्यात आली अशा तऱ्हेने सहकारी चळवळीची प्रगती होत

गेलेली दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळी शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून मुक्त करून त्यांच्या प्राथमिक व मुलभूत गरजा भागविण्यासाठी त्याना पुरेसे व वेळेवर अर्थसहाय्य मिळावे हा या सहकार चळवळीचा मुख्य हेतु होता. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाणाच्या नेतृत्त्वाखालील सरकारने या चळवळीला आर्थिक बळ प्राप्त करून दिले या चळवळीला खऱ्या अर्थाने उर्जितावस्था मिळवुन दिली. त्यासाठी त्यांनी जुना सहकार कायदा बदलुन त्या जागी बदलत्या धोरणाप्रमाणे नवीन सुधारणा आणल्या. महाराष्ट्र संस्थाचा कायदा १९६० साली आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ हा कायदा आस्तित्त्वात आला व २६ जानेवारी १९६२ पासून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाली.[५]

सहकारी संस्थाना शासनाकडून भागभांडवलाच्या रूपाने अर्थसाहाय्य, शासकीय अनुदानाच्या योजना शासन बँक हमी अशा विविध माध्यमातुन यशवंतराव चव्हाणांनी सहकार क्षेत्र जोपासले होते. ग्रामीण राज्य बँका अशी त्रिस्तरीय संरचना निर्माण केली. त्यामुळे शेती कर्ज पुरवठ्यावर पुरेसे नियंत्रण आणि देखदेख ठेवणे शक्य झाले. महाराष्ट्राची सहकारातील ओळख साखर कारखानदारीच्या रूपाने झाली आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात ऊसपीक क्षेत्रात खाजगी साखर कारखाने होते. १९४१ पर्यंत आपल्या राज्यात १२ खाजगी साखर कारखाने कार्यरत होते. अशा परिस्थितीत १९४५ साली डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या बागायतदार शेतकऱ्यांच्या परिषदेमध्ये एकमताने झालेल्या ठरावापासून सहकार तत्वावर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी साखर कारखाना उभारला. सहकार चळवळीतील ही क्रांतीकारी घटना समजली जाते. या निर्णयानंतर राज्याने सातत्याने साखर कारखानदारीत अग्रेसर कामगिरी करून दाखविली आहे. याच दरम्यान साखर उद्योगाबरोबर ग्रामीण भागात शेती मालावर प्रक्रिया करणारे इतर सहकारी संस्था, सहकारी खरेदी विक्री संघ, बाजार समित्या, सहकारी सुत गिरण्या, सहकारी कुक्कुटपालन संस्था, सहकारी दुध उत्पादक संस्था इत्यादीमुळे अनेक उद्योगसमूह उभे राहिले. अशा सहकारी संस्था आणि त्यांच्या चळवळीच्या माध्यमातून पुढे सहकारी पतपेढ्या, विविध कार्यकारी सोसाट्या व नागरी बँकाचे जाळे विणले गेले. ग्रामीण भागामध्ये शैक्षणिक संस्था, दळवळणाची साधने, पाणी, वीज, रस्ते अशा मुलभूत सोयी सुविधा सहकारामुळे खेडोपाडी निर्माण होत गेल्या आणि एकदंरच ग्रामीण विकासाला चालना मिळाली. या सहकारी चळवळीच्या वाढीला डॉ. धनंजयराव गाडगीळ, पदमश्री डॉ. विखे पाटील, वसंतदादा पाटील, तात्या पाटील कोरे,

यशवंतराव मोहिते, रत्नाप्पा कुंभार, बाळासाहेब विखे, भाऊसाहेब थोरात, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे. आदींनी आपापल्या भागात सहकाराचे जाळे अधिक पक्के केले. अनेक धाडसी प्रयोग केले सहकार ही महाराष्ट्राला लाभलेली शक्ती आहे. सहकारी चळवळ ही त्या शक्तीचा आत्मा आहे. समविचारी शेतकरी माणसांना एकत्र आणून त्यांच्या शक्तीतून काम उभे करणारी ही चळवळ सुद्धा एका अर्थाने लोकशाही चळवळ म्हणावी लागेल.[६]

१९५० नंतर खाजगीकरण, उदारीकरण, आणि जागतिकीकरण यांच्या वादळी उन्मादात हितसंबंधीय गट सरकारीकरण व सहकारी करण्याची गरजच नाही असे सांगू लागले आहेत. चीनच्या विकासासारख्या मॉडेलचे अनुकरण करण्यासाठी एसईझेडचे वारे देशभर वावरत आहे. चीनने एसईझेडसाठी जमिनी लीजने दिलेल्या आहेत मालकी हक्काने नव्हे त्याकडे दुर्लक्ष करीत हजारो एकर एसईझेडसाठी परवानगी मिळत आहे. विकासाच्या नावाने खाजगी उद्योगांना शेतकऱ्यांची जमीन द्यायची व तेथे उद्योगीकरण करत नफा मिळवायचा या मॉडेलसाठी शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनीचे दान दिले जात आहे. प्रत्यक्षात या एसईझेडमध्ये ७० टक्के जमिनीवर उद्योगांऐवजी रियल इस्टेटचे काम सुरू आहे हे भयावह चित्र आहे. आपण पुन्हा एकदा त्याच १९३० च्या वळणावर आलो आहोत. तेव्हा ८५ हजार एकरांच्या जमिन हिसकावल्या गेल्या आणि शेतकरी देशोधडीला लागला. पदमश्री विखे पाटलांनी सहकाराचे हत्याराचा उपयोग करून भांडवलदारी अत्याचाराला पराभूत केले होते. सहकाराच्या माध्यमातून प्रचंड औद्योगिक, सामाजिक सांस्कृतिक विश्वाची उभारणी केली व हजारो–लाखो कोटी रूपयांची अपौरूषेय सामाजिक संपत्ती निर्माण करून ग्रामीण समाजाला स्थैर्य व स्वास्थ्य दिले आहे.[७]

जागतिकीकरणाचा प्रभाव सर्वच क्षेत्रावर पडत असून शेतीक्षेत्र त्याला अपवाद नाही. त्या झंझावतात परंपरागत पीकपद्धती व बियाणे नष्ट होत आहे. विशिष्ट भौगोलिक परिस्थिती, विशिष्ट पर्जन्यमान व हवामानात पिकणारी शेती अधिक संवेदनशील पिकांच्या वाणासाठी वापरली जात आहे. अतिपाण्यावर येणारे बियाणे कोरडवाहू किंवा अल्पजल क्षेत्रावर वापरले जात आहे. यातून शेतीची सुपीकता खराब होत आहे. त्यामुळे वाढीव उत्पादन देणारी शेती तोटयात गेल्याने शेतकऱ्याला मनस्ताप होत आहे. बलाढय देश आपल्या देशात जे विपुल पिकते ते इतर देशांनी न पिकवता आपल्याकडूनच आयात करावे ही रणनीती चालवत आहेत. विशिष्ट बीयाणे, खते, औषधे आदी माध्यमातून आपली उत्पादने नष्ट करून आपल्याला या दृष्टचक्रात घेरणे जाणार

नाही. यासाठी कोणतेच संरक्षक कवच आपल्याजवळ नाही. या संकटाना तोंडदेण्यासाठी आपल्या सहकार मॉडेलचे पुनर्ज्जीवन करण्याची वेळ आली आहे हे सरकाराचे मॉडेल चीनला देखील स्वीकारावासे वाटले पाहिजे. चीनी माणसे वा सरकार सतत प्रवाह पतित होणार नाही जगातील जे चांगले आहे ते नीट पारखून आपल्या योग्य बनवून ते स्वीकारण्याच्या वृत्तीचे आहेत. वाढत्या लोकसंख्येची भीती चीनला वाटत नाही. आपल्याला योग्य बनवून ते स्वीकारण्याच्या वृत्तीचे आहेत. वाढत्या लोकसंख्येची भीती चीनला वाटत नाही. आपल्याला वाटते कारण आपल्याला आपलेच विकासाचे मॉडेल नीट कळाले नाही. इंदिरा गांधीनी स्टॉकहोम येथील भाषणात हा विचार मांडला होता. आपल्याला आपले स्वतःचे विकासाचे आर्थिक मॉडेल तयार करावे लागेल. विश्व व्यापार संघटनेने हे मोठे आव्हान आपल्यापुढे विशेषतः शेती व शेतकऱ्यापुढे उभे केले आहे. त्याचे उत्तर सहकाराच्या मॉडेलमध्ये सापडू शकेल. शेतकऱ्यांच्या पतपेढ्यांमार्फत त्यांच्या शेतीला कुटुंबांच्या गरजा भागविण्यासाठी भांडवल उपलब्ध करून देणे. त्यांच्या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपातर करणारे उद्योग शेतकऱ्यांच्या मालकीचे असणे आणि कोणत्याही कृषी–उद्योगाच्या उभारणीसाठी शेतकऱ्यांची जमीन ताब्यात न घेणे होय. हे सरकाराचे तत्त्व लागू पडतात.[८]

बाळासाहेब विखे म्हणतात ज्या संकटाच्या खाईत शेतकरी कोसळत आहे त्याचे स्वरूप अधिक भयावह आहे विविध स्तरावर विविध पद्धतीने शोषण व फसणवणूक करणाऱ्या लुटारू मनोवृत्तीच्या व्यवस्थेने शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेला घेरले आहे. शेतकरी व ग्रामीण समाज मदतीच्या आशेवर आहे. शेतकऱ्याला जरूर मदत मिळेल आणि ती सहकारी क्षेत्राकडूनच असा माझा ठाम विश्वास आहे. गरज आहे. ती चळवळीतील प्रामाणिक कार्यकर्त्यांनी नाउमेद न होता सहकारावर श्रद्धा ठेवण्याची जागतिकीकरणाच्या आव्हानांना तोंड देण्याची ताकद असलेले सहकार हे सक्षम क्षेत्र आहे. अनावश्यक सरकारी हस्तक्षेप टाळून सहकारी संस्थाना मोकळा श्वास घेऊ दिला पाहिजे. व्यापारी मापदंड लावुन सहकारी संस्थाचे मुल्यमापन करू नये. प्रामाणिक सभासदांनी जागरूक राहुन स्वार्थी हेतूने सहकारात सामील झालेल्या लबाडांना खडयासारखे बाजुला काढले पाहिजे.[९]

सहकारी चळवळीला बळकटी देण्यासाठी त्यामध्ये सर्वसामान्य सभासदांना त्यांचे मत व्यक्त करण्यासाठी स्वातंत्र्य असावे. सहकारी संस्थामध्ये सभासदांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला पाहिजे व संस्थाचा कारभार लोकशाही पद्धतीने चालला पाहिजे यासाठी यशवंतराव चव्हाण

हे नेहमीच आग्रही होते. सहकारी संस्था ह्या लोकशाही संस्था आहेत. शेतकरी अडचणीत न येण्यास सहकारी संस्थानी प्राधान्यक्रम दिला पाहिजे. भविष्यामध्ये राजकीय नेतृत्त्व घडविण्याची शाळा, आदर्श प्रतिनिधी निर्माण करण्याचे शक्तीपीठ व सार्वजनिक क्षेत्रामध्ये आपल्या अंगभूत गुणांनी देशहित घडविणाऱ्या नेतृत्त्वाची फळी सहकार चळवळीच्या माध्यमातून निर्माण झाली पाहिजे. असे यशवंतराव चव्हाणांचे मत होते.

१९५८ साली आशिया खंडातील पहिल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना झाली आहे. जिल्ह्यातील सहकारी नेतृत्त्वामुळे बँक आज प्रगती पथावर आहे. जिल्ह्यात १३५१ प्राथमिक कृषी सहकारी संस्था आहेत. अकोले तालुक्यात ३८ आदिवासी सहकारी संस्था आहेत. अहमदनगर कर्जत कोपरगाव बाभळेश्वर संगमनेर इ. ठिकाणी दूध शितकरण केंद्रे आहेत. आयुवेदिक देशी औषधे तयार करण्याचा कारखाना अहमदनगर येथे आहे. अहमदनगर, संगमनेर, पाथर्डी, शेवगाव येथे जिनिंग प्रेसिंग कंपन्या आहेत. २०१५–१६ च्या आर्थिक सामाजिक पाहणीनुसार जिल्ह्यात सहकारी सुत गिरण्या नाहीत उपसा जलसिंचन संस्था २४५ इतक्या आहेत.[१०]

जिल्ह्यात औद्योगिक वसाहती अहमदनगर श्रीरामपूर जामखेड राहुरी येथे आहेत एकूण ७ औद्योगिक वसाहती आहेत. संगमनेरला शासनाची एमआयडीसी नाही परंतु व्यापारी वर्गाने एकत्र येऊन येथे एक सहकारी औद्योगिक वसाहत सुरू केली आहे. येथे ७६ उद्योग उभे आहेत या उद्योगांना शासनाचे कोणतेही साह्य मिळत नाही येथील औद्योगिकीकरणाला चालना मिळून रोजगारातही वाढ होत आहे. अकोले तालुक्यात हातसडीचे तांदुळ तयार करणे औषधी वनस्पती तयार करणे हातमागावर व यंत्रमागावर कापड विणण्याचा उद्योग अहमदनगर, भिंगार, पाथर्डी येथे आहेत. अहमदनगर जिल्ह्यात मेंढीच्या लोकरीपासून घोंगड्या विणण्याचा उद्योग चालतो. शिवाय श्रीरामपूर, संगमनेर, अहमदनगर, वांबोरी येथे तेल गिरण्या आहेत.[११]

जिल्ह्यात ७९ इतक्या मत्स्यव्यवसाय संस्था आहेत. जिल्ह्यात एकूण ४७ पणन संस्था आहेत. १. जिल्हा पणनसंस्था आहेत. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सर्वसामान्य तालुका खरेदी विक्री संघ आहे. कोपरगाव, श्रीरामपूर, अहमदनगर, पारनेर, राहुरी, शेवगाव पाथर्डी, श्रीगोंदे येथे कृषी उत्पादनाच्या प्रमुख बाजारपेठा आहेत. जिल्ह्यात एकूण १०७५ बिगर कृषी पतसंस्था आहेत.

सर्वात जास्त नागरी पतसंस्था आहेत. ८५५ इतक्या आहेत. तर २०२ कर्मचारी पतसंस्था आहे. तसेच सामाजिक सेवा सहकारी संख्या १२१८ एवढ्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणात संशोधिकेने विषय निवडीची कारणे दिली आहेत त्यानंतर साहित्याचा परामर्श घेवून हा संशोधनाचा विषय कसा महत्त्वाचा आहे ते सांगितले संशोधनाची उद्दिष्टे व गृहितके दिली आहेत. प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी नेतृत्त्वापैकी निवडक नेतृत्त्वांच्या घराण्यांचा अभ्यास केला आहे

## ३.२ समाजशास्त्रीय संकल्पना :–

### राजकीय नेतृत्व (अभिजन) :–

प्रत्येक समाजात लोकांच्या आदरास पात्र ठरलेल्या अनेक महान व्यक्ती जगाच्या इतिहासात निर्माण झालेल्या असतात. त्यांनी आपआपल्या क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केलेली दिसते. समाज कोणत्याही स्वरूपाचा वा विचाराचा असो त्यात काही लोकांचे स्थान श्रेष्ठ व उच्च असे मानले जतो. अशा लोकांना ज्या समाजातील श्रेष्ठजन अभिजन म्हणून ओळखले जाते. असे लोक संस्थेत अल्प असतात. उच्च कुळात जन्म, बुद्धिमत्ता, संपत्ती, गुणवत्ता, शारीरिक सामर्थ्य असे हे आधार होता. समाजाच्या निरनिराळ्या क्षेत्रात अशा श्रेष्ठजनांचा वर्ग आढळून येतो. राजकीय जीवनात ज्यांना स्थान प्राप्त झालेले असते. त्यांना राजकीय श्रेष्ठजन असे म्हणतात. राजकीय समानता असूनही राजकीय जीवनात क्षमतापूर्वक सर्वच लोक भाग घेतात असे नाही. राज्यकारभार चालविण्याची पात्रता, गुणवत्ता, क्षमता व सामर्थ्य हे ज्या लोकास असते असे लोक त्या राजकीय व्यवस्थेतील राज्यकर्ते म्हणून मानले जातात. राज्यकर्त्यांचा वर्ग हा राजकीय श्रेष्ठजनांचा वर्ग होय. पूर्वी श्रेष्ठजन हे श्रेष्ठजाती व कुलीन घराणे ह्यातून निर्माण होत असत. पण लोकशाही स्वरूपाच्या समाजव्यवस्थेत समाजातील सर्वच लोकांना श्रेष्ठजन वर्गात प्रवेश मिळविण्याची संधी प्राप्त झालेली आहे. समाजातील वरिष्ठ नेते व जनता ह्यातील श्रेष्ठजन हा एक दुवा असतो.

**नेतृत्व व्याख्या :–** नेतृत्व ही संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली तरी तिचे संकल्पनीकरण करणे अत्यंत कठीण कार्य आहे.

१. **चेस्टर बर्नाडे :–** नेतृत्व म्हणजे व्यक्तीच्या वर्तणुकीतील असे गुण की ज्यामुळे संघटितपणे कार्य करणाऱ्या लोकांना आणि त्यांच्या कार्याला मार्गदर्शन मिळते.

२. **जॉर्ज टेरी :–** लोकांना प्रभावित करून ज्यांची संबंधित उद्दिष्ट साध्य करणारी कृती म्हणजे नेतृत्व होय.

३. **कुंटझ आणि आडोनेल :–** नेतृत्व म्हणजे समान उद्दिष्ट सामूहिकरित्या साध्य करण्यासाठी लोकांचे मन वळविणारी कृती होय.

४. एखाद्या गटाचे विशिष्ट ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचे संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतूने प्रेरित झालेले वर्तन म्हणजे नेतृत्व. [१२]

समाजामध्ये संख्येन लहान आकार असलेला वर्चस्व प्रस्थापित प्रभावी गट अभिजन असतो. हा वर्ग बुद्धिमान कार्यकुशल, नेतृत्वाचे गुण असलेला असतो. अभिजन वर्गात कोणाचा समावेश होतो. याबाबत कालपरत्वे वेगवेगळे स्वरूप दिसून येतात. समाजामध्ये सर्व क्षेत्रात अभिजनांचे वर्चस्व असते. आजच्या काळात राजकीय नेतृत्व, भांडवलदार, उद्योगपती, सनदी नोकर, उच्च पदस्थ आढळतात. नेतृत्व गुण, सामाजिक स्थान याद्वारे अभिजनांची भरती होते. सत्तास्थानांजवळ हा वर्ग राहत असतो. यामुळे अधिकार व सत्ताधारी लोकांची मान्यता असते. समाज व्यवस्थेत सर्व क्षेत्रांत विशिष्ट लोकच निर्णयप्रक्रियेत वर्चस्व प्रस्थापित करीत असतात. त्याचप्रमाणे राजकीय व्यवस्थेत अशा पद्धतीचे निर्णयात्मक वर्चस्व प्रस्थापित करीत असतात. हे अभिजन राजकारणात महत्वाची भूमिका पार पाडतात. समाजगटात अथवा समाजव्यवस्थेत वर्ग, जातींच्या आधारे अभिजन आपले स्थान निर्माण करून वर्चस्व प्रस्थापित करतात. पॅरेटो, मोस्का, रॉबर्ट डाल, जी. डी. एच. कोल हे विचारवंत अभिजन वर्गाचे अस्तित्व अणि महत्व विशद करतात. समाजाच्या प्रत्येक स्तरावर अधिसत्ता निर्माण करणारा आणि ती बाळगणारा असा एक समूह म्हणजे राजकीय भिजन असे मत जी. डी. एच. कोल यांनी मांडले आहे. श्रेष्ठीजन अथवा अभिजनांची निर्मिती अनुवंशिकतेतून अर्जित घटकांतून निवडणूकीच्या माध्यमातून तसेच स्व–कर्तबगारीने व विशिष्ट तत्वप्रणालीचा अंगिकार अशा विविध अवस्थांमधून राजकीय अभिजन अवलंब करताना दिसून येतात. नंतर युजिन मिहान, शुम्पीटर, लॉवेल, जॉर्ज ओटेगा इ.नी याबाबत विचार मांडले. या सिद्धांताच्या मते प्रत्येक समाजात अल्पसंख्य असलेल्या अभिजन / श्रमीक हातात सत्ता सामावलेली असते. शासनप्रकार कोणताही असला तरी सत्ता त्यांच्याच हाती असते. लोकप्रतिनिधी सुध्दा त्यांच्याच इच्छेनुसार कार्य करतात. बुद्धीमत्ता, कौशल्य, विचारसरणी इत्यादीच्या आधारावर या वर्गाची निर्मिती होते. सर्व क्षेत्रात जे नेहमी बिनीवर असतात. वैचारिक

आणि कृतीच्या दुपटीने जे सर्वात पुढे असतात ते त्या क्षेत्रातील अभिजन असतात. समाजातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय इ. सर्व क्षेत्रात अभिजन असतात. त्यांना समाजात संपत्ती, स्थान किंवा पद, प्रतिष्ठा, प्रभाव प्राप्त झालेले असतात.हा अभिजन वर्ग एकसंघ, एकत्र आणि आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत यांची सतत जाणीव बाळगून असतो. मोस्का आणि मिचेत्स यांनी अशा श्रेष्ठीजन वर्गाला शासनवर्ग म्हटले आहे. जे प्रामुख्याने संघटन शक्तीवर अवलंबुन असतात. संघटनामुळे ते समाजावर नियंत्रण ठेवु शकतात. मनोवैज्ञानिक तत्वांच्या आधारे पॅरोटोन सार्वत्रिक आणि सार्वकालीन सामाजिक प्रकियांवर भर दिला. त्यांच्या मते प्रत्येक समाजात एक राज्यकर्ता अल्पजनांचा समूह असतो की जो राज करण्यची क्षमता असल्याने सामाजिक व राजकी सत्ता धारण करतो असे जे अत्युच्यपदी जातात ते उत्तम असतात व त्यांनाच श्रेष्ठीजन असे म्हणतात.

श्रेष्ठीजनांचा आर्थक दृष्टिकोनातुन विचार बर्नहमने केला आहे. पुर्वापार रुढ भांडवलशाहीचा हळूहळू विलय होत असून त्यांच्या जागी व्यवस्थापक, प्रबंधक येत आहेत. उदा.जुन्या सावकारांच्या जागी भारतात को–ऑपरेटिव्ह बंका आल्या आणि कर्ज देऊ लागल्या. त्यांचे पदाधिकारी हे नव – श्रेष्ठीजन झालेत) हे तज्ञ, कुशल व्यवस्थापक उद्योगधद्याचे नियंत्रण तसेच संचालनही करतात. परिणामतः शासनकार्यात व्यवस्थापनाचे महत्व आणि नियंत्रण राहते

नेतृत्व हे समाजात परिस्थितीनुसार घडत असते. कारण व्यवहारात आपल्यला असे दिसून येते. एखादी व्यक्ती प्रसंगावधान वर्चस्व गाजविते. त्याचा व्यक्ती दुसऱ्या प्रसंगात अधिनता स्वीकारले. अशा प्रकारच्या व्यक्तित्व व सामाजिक परिस्थितीत आंतरक्रिया सुरू असतात. लोक समुहाच्या उद्दिष्टांच्या परिपूर्ततेसाठी केलेली प्रभावी क्रिया म्हणजे नेतृत्व. संघटनवादी गुणदृष्टिकोनातून व्याख्या करताना चेस्टर बर्नाड म्हणतो की, नेतृत्व अशी कला आहे की, जी समुहाला संघटित कार्य करण्यासाठी मार्गदर्शन करते. [१३]

**राजकीय प्रक्रिया :–**

समाज व्यवस्थेतील राजकीय व्यवहारांचा अभ्यास करताना राजकीय प्रक्रियेचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अभ्यास करणे, समाजातील व्यक्तींनी केलेला व्यवहार, कृती याद्वारे त्याचे राजकीय प्रक्रिया स्पष्ट होत असते. कारण व्यक्तींची कृती व व्यवहार यांचे परस्परांशी संबंध असते. राजकीय संबंधावर समाजातील इतर समाजिक संस्थांचा प्रभाव पडत असतो. याचाच अर्थ राजकीय

कृतीतील परस्पर संबंध व बाह्य घटकांचा प्रभाव ही दोन्ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून व्यक्तींचे व्यवहार, कृतींचे निश्चितीकरण करून शास्त्रीय पद्धतीने याचा अभ्यास करता येणे शक्य होतो. राजकीय प्रक्रियेसाठी सहभागाची पातळी व्यक्तींच्या कृतीच्या आधारे निश्चित केली जाते. यामध्ये एखाद्या घटनेवर भाष्य करणे अथवा या विषयक आपली भूमिका मांडणे अथवा एखाद्या निर्णयावर प्रभाव टाकणारी घटना असू शकते. सहभागाच्या प्रमाणावरूनच व्यवस्थेविषयक प्रक्रिया सुरू असते. त्याचा परिणाम त्याद्वारेच दिसून येतो. म्हणजेच सार्वजनिक स्वरूपाचे निर्णय घेणे यातील सहभाग विशेष दिसून येतो. म्हणून लोकशाही व्यवस्थेत राजकीय सहभागाला महत्वाचे घटक मानले जाते.[१४]

**राजकीय विकास** (Political Development) :–

राजकीय अभिजनांनी विकास विषयक प्रतिक्रिया यामध्ये प्रामुख्याने विशिष्ट राजकीय परिस्थिती निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे राजकीय विकास न मानता सतत वृद्धिंगत होणाऱ्या राजकीय समस्या सोडविण्यासाठी संस्था व रचनांची उभारणी करणे म्हणजे राजकीय विकास होय असे आल्फ्रेड डायमंडचे मत आहे तर एस. एन. एजेनल्टेढच्या मते राजकीय विकासांतर्गत विविध अणि परिवर्तनशील राजकिय मार्गानी आत्मज्ञान करण्याची योग्यता म्हणजे विकास होय. विकास म्हणजे विविध समस्या सोडविण्याची क्षमता होय. विकास हा परिवर्तनाशी निगडीत असतो. विकासात आर्थिक, सामाजिक, राजकीय, लोकसहभाग, राजकीय पक्ष, नेतृत्व व व्यवस्थेची समर्थता अशा घटकांचा अंतर्भात असतो. म्हणजेच विकास व परिवर्तन हा दोन्ही भिन्न संकल्पना असल्या तरी परस्पर पूरक असतात. यातूनच एखाद्या संस्थेचा, समाजाचा अथवा व्यक्तीचा विकास साधता येत असतो. अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय अभिजनांनी आपल्या कार्या किंवा विकास विषयक सुरूवात कशा पद्धतीने केली यांचा आढावा होय.[१५]

**निवडणूक कार्यपद्धती** :–

लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधी मतदानाच्या कार्यपद्धतीने निवडून देणे अभिप्रेत असते. निवडणूकीचे स्वरूप प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत बदलत असल्याचे दिसून येते. भारतात गणराज्याच्या काळात सभा आणि समितीच्याद्वारे कामकाज चालायचे. इंग्लंडमध्ये प्रातिनिधिक लोकशाहीने जागा घेतली. केवळ वाढत्या लोकसंख्येवर व विशाल राज्याच्या संकल्पनेद्वारे तर अमेरिकेत अध्यक्षीय शासनपद्धतीचा स्वीकार करून अध्यक्षाची निवड

अप्रत्यक्षपणे मतदार करू लागले. संसदीय पद्धतीत एक प्रतिनिधी मतदारसंघ, बहुप्रतिनिधी, मतदारसंघ असे प्रकार होते, नंतर बहुप्रतिनिधी मतदारसंघाची कल्पना मागे पडली व प्रादेशिक मतदार संघाद्वारे एक प्रतिनिधी मतदार निवडणूक देण्याची पद्धत सर्वत्र सुरू झाली यातून बहूमत प्राप्त प्रतिनिधी कायदेमंडळात निवडले जातात. यामध्ये जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व हे स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा या निवडणूकीतून प्रतिनिधीत्व करतात.[१६]

**निवडणुकांचे राजकारण :–**

समाजामध्ये राजकारण हा शब्द सहज या अर्थाने देखील वापरला जातो. म्हणजेच दैनंदिन व्यवहारांमधील घडामोडी विषयक घेतले जाणारे निर्णय याबाबतीत येणारे राजकारण हा शब्द प्रयोग नेहमीच केला जातो. व्यक्तीचे वर्तन, संस्थांचे व्यवहार संबंध त्यांचे स्वरूप, राजकीय पक्ष, दबाव गट अथवा एकमेकांतील होणारा संवाद इत्यादी बाबत अधिमान्य होणाऱ्या निर्णयाचा संबंध येतो.

**राजकीय भरती :–**

राजकारण राजकीय व्यवस्थेच्या अंगभूत कार्यातूनच राजकीय भरती महत्वाचे केंद्रस्थान आहे. कोणत्याही कार्याचे संपोषण आणि सातत्य हे कार्यावर अवलंबून असते. व्यवस्था कार्यरत राहावयाची असेल तर राजकीय भरतीचे कार्य अभिजनाच्या अपेक्षेप्रमाणे चालू असते. राजकीय भरती असो अथवा राजकीय समाजिकरणाचे घटक हे परस्परांशी पुरक असतात. या भरती प्रक्रियेतून अभिजन आपले अपेक्षित कार्य पार पाडून घेत असतात. या भुमिकेतून व्यवस्था चालविताना दिसून येतात. याचाच एक अहमदनगर जिल्ह्यातील अभिजन आपले उद्दिष्ट्य साध्य करताना दिसतात. मग ते उद्दिष्ट हे निवडणुकीच्या माध्यमातून सत्ता स्थापन करावयाचे असो अथवा मिळालेली सत्ता टिकविण्यासाठी प्रयत्न करतात. प्रत्येक व्यवस्थेमध्ये सत्तेची उतरंड असते. राष्ट्रीय पातळीवरून ते स्थानिक पातळीवर विविध पदे असतात. ती पदे भरण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला जातो. मग सहकारी सोसायटी, संस्था ते प्रत्यक्ष राजकीय सत्ता केंद्र वाटपाचे सरपंच ते खासदार पर्यंत येणारे सर्वच पद हे प्रत्यक्ष निवडणूकीच्या माध्यमातून किंवा अप्रत्यक्ष निवडणूकीद्वारे देण्यात येतात. म्हणजेच ही राजकीय भरती प्रक्रिया सातत्याने चालू असते.[१७]

**आधुनिकीकरण :–**

आधुनिकीकरण ही एक संदिग्ध कल्पना असून ती सतत चालणारी प्रक्रिया सामाजिक व राजकीय, आर्थिक व्यवहारात दिसून येते. या प्रक्रियेद्वारे उपलब्ध साधन–सामग्रीचा बुद्धिनिष्ठ उपयोग करून त्याद्वारे नवसमाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये समाजिक, गतिमानता, शहरीकरण, शिक्षणप्रसार या गोष्टींचा समावेश असतो. यानुसार आवश्यक बदलाचा प्रयत्न करीत असतो, हा सतत होत असणारा प्रयत्न म्हणजेच राज्यशास्त्रात राजकीय आधुनिकीकरण होय. आधुनिकीकरण औद्योगिक क्रांतीच्या प्रभावातून सुरू झालेली प्रक्रिया आहे. रॉबर्ट वार्डच्या मते, आधुनिक समाज निर्माण करण्याच्या दृष्टिने उपलब्ध साधन–सामग्रीचे विचारपुर्वक नियोजन आणि यासंबंधीची प्रक्रिया असते. म्हणजेच राजकीय आधुनिकीकरण होय. ही प्रक्रिया एकाकी स्वरूपाची नसून वेगवेगळ्या क्षेत्रात जी स्थित्यंतरे घडून येतात, त्यावर राजकीय सामाजिकरण अवलंबून असते. आधुनिकीकरण राजकीय व्यवस्था, परंपरागत मूल्यांऐवजी नवीन मूल्यांवर भर देणे, लोकांचा सहभाग वाढविणे इत्यादी घटक महत्वाचे ठरतात. यातूनच सहकारी साखर कारखानीने आपली काम काढून आकण्यासाठी साखरेबरोबर अन्य उत्पादनांचा स्वीकार केला आहे. या खेरीज साखर कारखानदारीबरोबर सामाजिक संस्थेशी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष येणारे संबंध लक्षात घेता.

एखाद्या सहकारी संस्थेच्या यश अपयशात त्यातील सत्ताधारी नेतृत्वाचा सिंहाचा वाटा असतो. नेतृत्व घविण्याच्या प्रक्रियेवर जात, धर्म, लिंग, शिक्षण, वय, व्यवसाय, राजकीय पक्षांशी असलेले हितसंबंध, राजकीय परिस्थिती व सामाजिक परिस्थिती इ. घटकांचा अपरिहार्य प्रभाव होत असतो. अशाप्रकारे अभिजनांच्या भोवतालचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वातावरण किंवा अभिजनांची व्यक्तीगत परिस्थितीतून प्रभावित करताना नेतृत्व दिसते.[१८]

थोडक्यात अहमदनगर जिल्ह्यातील सहकारातील राजकीय अभिजनांची चिकित्सा करीत असताना या घटकांचा कोणकोणत्या बाबींचा प्रभाव स्पष्टतेने जाणवतो ? अभिजनांसाठी कोणते गुण असावे ? अभिजनांस पोशक कोणते वातावरण असते ? अभिजन निर्मिती प्रक्रियेचे स्वरूप विचारशैली निश्चित कोणत्या स्वरूपाची आहे याचा शोध या शोधबंधासाठी केलेली प्रत्यक्ष पाहणी व संबंधित विषयाचे अहवाल इ. च्या आधारे या प्रश्नांची उकल करण्यात आली आहे.

सर्वसामान्य समाजापेक्षा निराळे अल्पसंख्य पण स्वत:च्या कर्तृत्वामुळे समाज

जीवनातील एक व अधिक क्षेत्रात अग्रगण्य ठरलेल्या व्यक्ती म्हणजे अभिजन होय. यातील राजकीय अभिजन कोणत्या घटकांतून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करतात त्याचा शोध घेणे. कारण सत्ता हे प्रत्येक समाजातील प्राथमिक व सर्वांत महत्वाचे मूल्य आहे. यातूनच राजकीय अभिजन, राजकीय नेतृत्व, राजकीय भरती, अभिसरण या संकल्पना उदयास आल्या आहेत. भारतीय समाजात प्रादेशिक अभिजनांचे महत्व अनन्यसाधारण असून त्याला प्रथम दर्जाचे स्थान सामाजिक सत्तेत दिलेले आहे. कारण या अभिजनांचा नाश झाला तर समाजाचे विघटन होण्याचा धोका आहे. राजकीय अभिजनांचा अभ्यास हा राज्यशास्त्रात संशोधनपर करणे फार महत्वाचे आहे. अशी भूमिका अभिजनवादी अभ्यासकांनी घेतली. मोसका आणि चिल्स यांच्या संघटनात्मक, पॅरोटोचा मनोविश्लेषणात्मक, बर्नहॅम यांचा आर्थिक दृष्टीकोनातून अभिजन वर्गाचे संकल्पनात्मक स्वरूप दिसून येते.[१९]

## ३.३ संशोधन समस्या :–

प्रस्तुत संशोधन राजकीय अभिजन या वर्गवारीत मोडणारे आहे. राजकीय घराणी हे राजकीय प्रकियेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. किंबहुना काही निवडक घराणेच देश चालवत असतात. असे म्हटले तर वावगे ठरणारे नाही. एकशे दहा कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात गेल्या ७० वर्षात केवळ १०–१५ वर्षे वगळली तर एकाच कुंटुबाच्या हाती सत्ता राहते याचा अर्थ दुसऱ्या कुणाकडेच देशाची नेतृत्त्व करण्याची क्षमता नाही असा घ्यायचा का असा प्रश्न पडल्याशिवाय राहत आहे.

घराणेशाहीची पूर्वपिठीका प्राचीन काळापासूनच अस्तित्वात असलेली दिसते. परंतु राज्यसंस्थेच्या उदयानंतर राजकीय घराणेशाहीला खऱ्या अर्थानं एक अवास्तव महत्त्व प्राप्त झालेले दिसते. ‘जागतिक पातळीपासून ते स्थानिक पातळीपर्यत घराणेशाही आहे. परंतु यातून उपस्थित होणारा एक प्रश्न म्हणजे घराणेशाही चांगली की वाईट? या प्रश्नाचा गांभिर्याने विचार करण्याची गरज भासते अर्थात आपण घराणेशाहीची कारणे आपल्या सांस्कृतिक धार्मिक इतिहासात सापडतात. घराणेशाहीचे प्रत्येक क्षेत्रात स्वरूप वेगळे आहे. प्रत्येक क्षेत्रातील घराणेशाहीचा इतिहासही वेगळा आहे. तरी राजकीय अभ्यासकांना राजकीय घराण्यांनी लोकशाहीला कुंडीत अवस्था आणली असे वाटते. तर काहींना ही अपरिहार्यता वाटते तर काहींना नेतृत्त्व ही सर्वांनी

करावयाची बाब नाही असं वाटते. राजकीय घराणी हा मुख्य विषय कल्पून मिळालेली साधन सामुग्री तपासून त्यातून विषयाची मांडणी केली आहे. ही मांडणी अधिकाधिक सुगम होण्यासाठी विविध विधानांच्या मतांचा ही आधार घेतला आहे. या पार्श्वभूमीवर पुढील संशोधन प्रश्न उभे केले आहेत.

१. घराणेशाही निर्माण होण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली आहेत?

२. विशिष्ट कुंटुंबातील सदस्य निवडणुकीच्या राजकारणात वारंवार का निवडून आले?

३. सहकारी संस्थेवर वर्चस्व निर्माण करण्यात नियंत्रण ठेवण्यास विशिष्ट घराणी कशी यशस्वी झाली आहेत?

४. घराणेशाहीमुळे जिल्ह्याच्या आर्थिक सामाजिक व शैक्षणिक विकास घडून आला का?

५. अहमदनगर जिल्ह्यात सहकारी संस्था मोठ्या प्रमाणात कशा विकसित झाल्या?

६. जिल्ह्याच्या उत्तर भागात घराणेशाहीसाठी पोषक वातावरण कसे मिळाले?

७. जिल्ह्याचे राजकारण व्यक्तीकेंद्रीत कसे बनले आहे?

८. सहकारी चळवळीत प्रवेशासाठी कुणाची मदत कारणीभूत ठरली?

९. स्वगुणांमुळे नेतृत्त्वपद मिळाल की अन्य कुण्या हितसंबधितामुळे?

१०. विद्यमान परिस्थितीत नेतृत्त्व प्राप्तीचे कुठले निकष आहेत?

अशा समस्या जाणवत असल्या तरी विषयाची शेकडा मांडणी व या विषयाचा विचार करणाऱ्यांना पुरेशी माहिती देणारा साधन ग्रंथ तयार व्हावा हा दृष्टिकोन ठेवलेला आहे. राजकीय घराणे हा राजकीय प्रक्रियेचे वळण देणारा महत्त्वाचा घटक असल्याने प्रस्तुत घटकाचा अभ्यास अधिक महत्त्वाचा मानून हा विषय अभ्यासासाठी घेतला आहे.

## ३.४ संशोधनाची निवडः–

'एकमेकांना साह्य करू अवघे धरू सुपंथ' असे ब्रीदवाक्य घेऊन राज्याच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणारा सहकार पहिल्यांदा रोवला गेला तो नगर जिल्ह्यात. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी आशियातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगरला सुरू केला. आणि आजपर्यंतच्या ७० वर्षाच्या वाटचालीत सहकार क्षेत्राने नगर जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलून टाकला. तळागळातील व नेहमी दुष्काळाचे चटके सहन करणाऱ्या सामान्य माणसाला

उर्जितावस्थेत आणले. सहकार क्षेत्राने जिल्ह्याचे अर्थ कारण व समाजकारण प्रगतीकडे गेले असता सहकाराने आणखी एक महत्त्वाचे काम केले ते म्हणजे राजकारणाचा प्रगतीचे जिल्ह्यातील राजकारण सहकारावर टिकून आहे असे म्हटले तर वावगे ठरणारे नाही.

**सहकार :–**

सहकाराचा पाया घालणारा नगर जिल्हा देशाला दिशादर्शक ठरला आहे. शेतीविकास सिंचनव्यवस्था, दुग्धव्यवसाय, साखरनिर्मिती, अर्थपुरवठा, पाणीपुरवठा, उद्योग विकास, मजुरी अशा बहुतांश सर्वच क्षेत्रात सहकाराने पाय रोवले आहेत. या सर्व क्षेत्रात आता खाजगी संस्थाचाही सहभाग वाढत असला तरी नवे बदलते तंत्रज्ञान स्विकारत सहकाराने आपली ताकद कायम राखली आहे.

**बँका :–**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक ही आशिया खंडातील सहकारी क्षेत्रातील सर्वात मोठी बॅक म्हणून प्रसिद्ध आहे. जिल्ह्यात १३७ शहर व गावांत बॅकेची सुविधा उपलब्ध आहे. २४ वर्गीकृत बॅकाची २१४ बॅक कार्यालये व २२१ सहकारी बॅका व त्यांच्या ४२४ शाखा जिल्ह्यात आहे. २८२ शाखांसह १३०४ विविध कार्यकारी सोसायट्यांच्या माध्यमातून शेतीसाठी मध्यम व दीर्घ मुदत कर्जपुरवठा करणाऱ्या जिल्हा बॅकेने रू. ४ हजार ३१२ कोटींवर ठेवी संकलन व रू. २ हजार ७०२ कोटीवर कर्जे वितरण केले आहे. पद्मश्री विठ्ठलराव विखे, भाऊसाहेब थोरात, आबासाहेब निंबाळकर, मारूतराव घुले, बाळासाहेब विखे, यशवंतराव गडाख, डॉ. बाबूराव तनपुरे, शंकरराव कोल्हे अशा दिग्गज सहकार महर्षींनी आखून दिलेल्या वाटेवर पुढची पिढी बॅकेला पुढे घेऊन जात आहे.

**दुग्धोउत्पादन :–**

दुग्धोत्पादनात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. १९७०–७१ मध्ये जिल्ह्यात केवळ १२ सहकारी दुग्ध संस्था होत्या व त्याद्वारे प्रतिदिनी सरासरी फक्त ४१६ लिटर दूध संकलित केले जात होते. आज जिल्ह्यात २७९९ सहकार दुग्धसंस्था कार्यरत आहेत. त्यातील सभासदांची संस्था १४२७४९ इतकी होती. वर्षात एकूण २५८१.०५ लाख लिटर दूध संकलित केले आहे. या वर्षात दररोज सरासरी दुग्ध संकलन ८.२४ लाख लिटर इतकी आहे. जिल्ह्यात

एकूण १९ दूध बहुतांशी मुंबईस पाठविले जाते. दुध संकलन प्रक्रिया व वाहतुक या व्यवसायांत सुमारे प्रती दिन ५ हजार व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

**साखर कारखाने :–**

जिल्ह्यात १८ कारखाने कार्यान्वित आहेत. या कारखान्यांनी १०५.६१ लाख मे. टन ऊसाचे गाळप करून १२.४६ लाख मे. टन साखरेचे उत्पादन केले. काही कारखान्यातून साखर उत्पादन केले काही कारखान्यातून साखर उत्पादनाव्यतिरिक्त देशी दारू, कागद, औद्योगिक मदयार्क वगैरे उत्पादने केली आहेत. जिल्ह्यातील साखर कारखान्यामुळे अनेक छोट्या ग्रामीण भागात अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला आहे.दहा हजार प्रकारच्या सहकारी संस्थाचे संपूर्ण जिल्ह्यात पसरलेले जाळे त्या–त्या परिसराचे अर्थ कारण जसे बदलते तसेच सहकारी संस्थावरील सत्ता टिकविण्याची राजकीय लढाई जिल्ह्यात सर्वाधिक गाजते. साखर कारखान्यांच्या निवडणुकांना चक्क लोकसभा व विधानसभा निवडणुकांसारखे महत्त्व येते. सहकाराचे सत्ता व सत्तेतून सहकार असे चित्र टिकविताना दुसरीकडे सहकारातून मिळालेल्या सत्तेतून आमदारकी खासदारकी ही भूमिका बजावतो त्यामुळे तालुका व जिल्हा पातळीवरील निवडणुकांत सहकाराचे सत्ताकारण व अर्थकारण प्रभावी भूमिका बजावणार नसेल तर नावीन्य ठरेल. विविध प्रकारच्या सहकारी संस्थाच्या व त्यातील अर्थकारणाच्या माध्यमातून सामान्य जनता नेत्यांशी निगडीत असल्याने राजकारणही विकसीत होत आहे. सहकारातून आलेल्या सत्तेने अंगिकारलेल्या राजकारणाने अनेकदा सहकार व समाजकारण विकासाला महत्त्व दिले. त्यामुळे त्याचा फायदा समाजाच्या सर्वागीण विकासालाच झाला आहे. सहकार क्षेत्राने प्रामाणिकपणे जिल्ह्यात राजकीय विकासात मोलाची भूमिका नक्कीच बजावली हे मात्र स्पष्ट आहे म्हणूनच सदरील सामाजिक संशोधनाला एक वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे.

## ३.५ संशोधनाचे महत्त्व :–

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सहकार चळवळीला महत्त्वाचे स्थान दिले. शेती क्षेत्रातील उपयक्त सेवा सहकारी संस्था स्थापन करून ग्रामीण भागात सहकाराचे जाळे त्यांनी तयार केले. गावातील सहकारी सोसायट्या सहकार चळवळीचा पायाभूत घटक म्हणून काम करतील व त्यातून ग्रामीण भागात कर्तुत्त्ववान कार्येकर्ते निर्माण होतील असे चव्हाण

साहेबांचे मत होते. १९६२ साली महाराष्ट्रात पंचायत राज्यव्यवस्था अस्तित्त्वात आली. या पंचायत राज व्यवस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले आणि ग्रामीण भागात अनेक कार्येकर्ते निर्माण झाले. अशा अनेक कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले.

ही सर्व मंडळी आपापल्या गुणांनी कर्तबगारीने आणि हिंमतीने व सहकारांनीच पुढे आली आहेत. अशा पद्धतीने नगर जिल्ह्यातील राजकीय वर्तुळ तयार झालेले आहे. या वर्तुळाच्या हातात राजकीय सत्ता आहे. चौदा व पंधरा साखर कारखाने काही डिस्टिलरीज, चार दुग्धसंघ, आशियातील सर्वात मोठी जिल्हा बँक मोठमोठ्या शिक्षणसंस्था या अहमदनगर जिल्ह्यात आपणास सहकारातूनच दिसतात. सध्या नगरच्या राजकारणात असणारी भानुदास मुरकुटे, बबनराव पाचपुते, नंदकुमार झावरे, दादा पाटील शेळके, रामराव आदिक, खासदार शंकरराव काळे, यशवंतराव गडाख, ये. वु. निंबाळकर अशी असंख्य मंडळी ही सहकारातून पुढे आलेली आहे. नगर जिल्ह्यात जे घडते तेच पंधरा–वीस वर्षांनंतर महाराष्ट्रात घडते. सर्व क्षेत्रांमध्ये नगरचे अनुकरण होते. सहकारी साखर कारखाने प्रथम नगर जिल्हात सुरू झाले. त्याच धर्तीवर नाशिक, पुणे, सोलापूर, सातारा येथे साखर कारखाने सुरू झाले. महाराष्ट्रात एकशे आठ कारखाने उभे राहिले आहे.

काँग्रेसला पहिले आव्हान नगर जिल्ह्यात दिले गेले. आव्हान देणाऱ्यांनीच काँग्रेस ताब्यात घेण्याचा प्रकार नगरमध्ये घडला. राजकीय आर्थिक आणि शैक्षणिक सत्तेचे विकेंद्रीकरण नगर मध्ये झाले आहे. नगर मॉडेलचे सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात जोरदार अनुकरण होताना दिसते. अलीकडे झालेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत २९ पैकी २१ जिल्हा परिषदांचे अध्यक्ष मोठ्या पुढाऱ्याची मुले, पुतणे, भाऊ, जावई आशापैकी आहेत. यासाठी सहकार क्षेत्रातील नामवंत घराणी लक्षात घेऊन त्यांचा साकाल्याने अभ्यास झाल्याचे दिसत नाही म्हणून या अभ्यासास वेगळे व वैशिष्टयपूर्ण असे महत्त्व आहे.

## ३.६. संशोधनाची उद्दिष्टे :-

या संशोधनात पुढील उद्दिष्टये ठरवली आहेत.

१. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या विकासाच्या आढावा घेणे.

२. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील नेतृत्त्वाचा अभ्यास करणे.

३. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील नेतृत्त्वा संदर्भातील घराणेशाहीचा अभ्यास करणे.

४. घराण्यातून विकसीत झालेले राजकीय नेतृत्त्व व घराणेशाही व्यक्तिरिक्त विकसित झालेले नेतृत्त्व यांचा समाजावर झालेला राजकीय, सामाजिक, आर्थिक परिणाम अभ्यासणे.

५. राजकीय घराण्यांच्या अभ्यासातील उणिवा शोधणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

## ३.७. संशोधनाची गृहितके :-

या संशोधनात पुढील गृहीतकांची सत्यासत्यता पडताळून पाहिली आहे.

१. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्र महाराष्ट्रात अग्रगण्य आहे.

२. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार नेतृत्त्व स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये विकसित झाले आहे.

३. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार नेतृत्त्वाने महाराष्ट्राच्या मंत्री मंडळात उष्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

४. लोकशाहीमध्ये नेतृत्त्वाला आवश्यक असलेले गुण या सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य नेत्याच्या वारसदारामध्ये आढळतात.

५. अहमदनगर जिल्ह्याचा राजकीय सामाजिक व आर्थिक विकास झालेला दिसून येतो.

## ३.८. गृहितकांची सत्यासत्यता

प्रकरण ५ निष्कर्ष व शिफारशी मध्ये या गृहितकांची सत्यासत्यता पडताळून पाहिली आहे.

## ३.९. संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी प्रमुख राजकीय नेत्यांच्या मुलाखती व सहकारी साखर कारखाने, सहकारी

दुधसंघ, बाजारसमिती, सहकारी बॅक, विविध शिक्षणसंस्था यांच्या पदाधिकारी कडून प्रश्नावली भरून घेण्यात आली आहे. तसेच या सहकारी संस्थांचे वार्षिक विशेषांकाच्या आधारे माहिती एकत्रित केलेली आहे. तसेच निवडक लाभधारक म्हणजे महिला, राजकीय प्रतिनिधी, पत्रकार, शेतकरी, व्यावसायिक व कार्यकर्त्यांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे. या अनुषंगाने सहकारी चळवळीवर आधारित वृत्तपत्रातील लेख, व्यक्तीचित्र, स्मरणीला लेख ,अमृतवाणी सहकारी डायरी अनेक ग्रंथालयामधून सहकार चळवळीवर व सहकारी क्षेत्रावर आधारित व त्याचबरोबर अहमदनगर जिल्हयातील सहकारी साखर कारखान्यांना भेटी देउन माहिती संकलित करण्यात आली आहे. व त्या आधारे संशोधन करण्यात आले आहे.

१. प्रत्यक्ष निरिक्षण – माहिती संकलनासाठी संशोधकाने संशोधन क्षेत्रात प्रत्यक्ष जावून स्वतः निरिक्षण केलेले आहे. प्रत्यक्ष निरिक्षण या माहिती संकलन करण्याच्या निरिक्षण पध्दतीने संशोधकाने निश्चित केलेल्या संशोधन विषयाशी संबंधीत क्षेत्रात स्वतः जाउन तेथील व्यक्ती, घटना वस्तु आणि व्यवहार इ. शी. प्रत्यक्ष संपर्क प्रस्थापित करून त्याचे प्रत्यक्ष निरिक्षण करून माहिती संकलीत केली आहे.

२. प्रश्नावली –प्रश्नावलीद्वारे विस्तृत क्षेत्रातून माहिती संकलित केली जाते. माहितीची गुप्तता राखता येते. तसेच वस्तुनिष्ठ माहिती संकलित होते म्हणून संशोधकाने माहिती संकलनासाठी प्रशवलीची निवड केली आहे.

३. मुलाखत – मुलाखतीद्वारे सखोल माहिती प्राप्त होते. गृहितकृत्य निर्मितीस मदत होते. गुणात्मक तसेच माहिती संकलित होते.अतिरिक्त माहिती सुध्दा सहज प्राप्त होते, खाजगी व गोपनीय माहिती प्राप्त होते व निरिक्षणाला संधी मिळते. यामुळे संशोधकाने मुलाखतीद्वारे प्रश्नावली भरून घेतली आहे.

**१. प्राथमिक स्त्रोत :–**

अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास या विषयाचा अभ्यास करताना नमूना निवडीसाठी संशोधकाने संभाव्य नमुना पद्धतीच्या आधारे स्तरीय यादृच्छिक नमुना पद्धतीने अप्रमाणबद्ध नमूना निवड पद्धतीचा वापर करून नमून्याची निवड केली

आहे. या साठी संशोधिकेने प्रथम अहमदनगर जिल्ह्याची निवड केली. नंतर तालुक्यांची निवड केली नंतर अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी घराणी व त्यातून अभ्यासासाठी पाच प्रमुख घराण्यांची निवड केली आहे.

**अ) महाराष्ट्र राज्याची निवड :–**

संशोधनासाठी पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र राज्याची निवड केली. कारण ते राज्य भारतात सहकार क्षेत्रात अग्रेसर आहे. महाराष्ट्र राज्याचा नकाशा दिला आहे.



नकाशा क्र. ३.१

**ब) अहमदनगर जिल्ह्याची निवड :–**


देशात सहकारी संस्थांची मुहूर्तमेढ अहमदनगर जिल्ह्यात रोवली गेली. हा संशोधिकेचा मूळ जिल्हा आहे. म्हणून अहमदनगर जिल्ह्याची सहेतूक किंवा उद्देशपूर्ण (Purposive Sampling) निवड केली आहे. अहमदनगर जिल्ह्याचा नकाशा सोबत दिला आहे.




नकाशा क्र. ३.२

**क) तालुक्याची निवड :-**

अहमदनगर जिल्ह्यात १५ सहकारी घराणी आहेत. त्यातील सर्वात जुनी/ नवी घराणी हा निकष लावला पाच सहकारी घराणी निवडली. ती एकूण घराण्यांच्या ३३ टक्के आहे. त्यांचे तालुके निवडले ते असे. पाथर्डी, शेवगाव, नेवासा, राहाता व संगमनेर हे तालुके अहमदनगर जिल्ह्याचे नकाशात दाखविले आहेत.




नकाशा क्र. ३.२

**ड) निवडक सहकारी घराण्यांची निवड :–**

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी घराण्यांनी सहकारी अधिक बळकट केली. या जिल्ह्यात अशी १५ सहकारी घराणी आहेत. त्याचा तपशील तक्ता क्र. ३.१ मध्ये दिला आहे. संशोधीकेने यापैकी सर्वात जुनी ५ घराणी सहेतुक पद्धतीने निवडली आहेत. निवडलेली पाच सहकारी घराणे ही मराठा समाजाची आहे. हे घराणे त्यांचे नातेसंबंधाने जोडलेली आहे.निवडक सहकारी घराणे जिल्हयाच्या राजकारणात सक्रीय आहेत.निवडक घराणे सहकारी संस्थाच्या उभारणीसाठी अग्रेसर आहेत.ही घराणी केवळ सहकारी वित्तपुरवठा संस्था बँका पुरत्या मर्यादित नाहीत तर ती कृषी उत्पादन प्रक्रिया संस्था (साखर कापूस तेलगिरण्या इ.) शिक्षण संस्था स्थानिक स्वराज्य संस्था इ. क्षेत्रात अग्रभागी आहेत. त्या क्षेत्रातील या घराण्यांची कामगिरी प्रश्नावली मुलाखती चर्चा व निरीक्षणाद्वारे माहिती मिळवली आहे. तक्ता ३.१ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी घराणी दिली आहेत.

**तक्ता ३.१ अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी घराणी :–**

| उपविभाग | त्यात समाविष्ट तालुका | राष्ट्रीय / राज्य पातळीवर राजकीय नेते घराणे /घराणे | निवडलेली घराणे |
|---|---|---|---|
| अहमदनगर | अहमदनगर | अनिल राठोड, दादापाटील शेळके | |
| | पारनेर | – | |
| | पाथर्डी | अप्पासाहेब राजळे, राजीव राजळे, मोनिका राजळे, बबनराव ढाकणे | दादा पाटील राजळे |
| | शेवगाव | मारूतराव घुले, नरेंद्र घुले | मारुतराव घुले |

| | | | |
|---|---|---|---|
| कर्जत | कर्जत | – | |
| | श्रीगोंदा | बबनराव पाचपुते | |
| | जामखेड | - | |
| श्रीरामपुर | श्रीरामपुर | गोविंदराव आदिक | |
| | नेवासा | यशवंतराव गडाख, शंकरराव गडाख | यशवंतराव गडाख |
| | राहुरी | प्रसाद तनपुरे | |
| | राहाता | बाळासाहेब विखे, राधाकृष्ण विखे, शालीनीताई विखे | विखे पाटील |
| संगमनेर | अकोले | मधुकरराव पिचड | |
| | संगमनेर | भाऊसाहेब थोरात, बाळासाहेब थोरात, | भाऊसाहेब थोरात |
| | कोपरगाव | शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे | |

**संदर्भ :– क्षेत्रिय पाहणी**

**इ) निवडक घराण्यांचे सहकार क्षेत्रातील योगदान :–**

या पाच घराण्यांची पुढील सहकारी संस्था स्थापन केल्या व वाढविल्या त्याचा तपशील तक्ता क्र. ३.२ मध्ये दिलेला आहे.

**तक्ता ३.२ निवडक घराण्यांचे सहकार क्षेत्रातील योगदान :–**

| अ. नं | निवडलेली घराणी | गाव | सहकार क्षेत्रातील योगदान |
|---|---|---|---|
| १ | विखे पाटील | प्रवरानगर राहाता | साखरउद्योग, बँका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, बाजार समिती, विधानसभा मंत्री शिक्षण |
| २ | भाऊसाहेब थोरात | संगमनेर | अहमदनगर जिल्हा सहकारी बँक, मंत्री, दुग्धव्यवसाय, साखर उद्योग |
| ३ | दादा पाटील राजळे | पाथर्डी | साखर उद्योग, सहकारी सोसायट्या, जिल्हा परिषद |
| ४ | यशवंतराव पाटील गडाख | नेवासा | पंचायत समिती, जिल्हा परिषद, बाजारसमिती, शैक्षणिक संस्था |
| ५ | मारुतराव घुले पाटील | शेवगाव | अहमदनगर जि. स. बॅक, खरेदी विक्री, संघ, शिक्षणसंस्था |

**संदर्भः क्षेत्रीय पाहणी**

तक्ता क्र. ३.१ आधारे अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी घराण्यातील सदस्य यादी तक्ता क्र. ३.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ३.३ मुलाखतीसाठी निवडलेल्या सहकारी घराण्यांतील सदस्य यादी :–**

| अ.न | घराणे | तालुका | सदस्य |
|---|---|---|---|
| १ | विखे पाटील | राहाता | बाळासाहेब विखे<br>राधाकृष्ण विखे<br>शालीनीताई विखे |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | दादा पाटील राजळे | पाथर्डी | आप्पासाहेब राजळे<br>राजीव राजळे<br>मोनिका राजळे<br>बबनराव ढाकणे |
| ३ | भाऊसाहेब थोरात | संगमनेर | भाऊसाहेब थोरात<br>बाळासाहेब थोरात |
| ४ | यशवंतराव गडाख | नेवासा | यशवंतराव गडाख<br>शंकरराव गडाख<br>प्रशांत गडाख |
| ५ | मारुतराव घुले | शेवगाव | नरेंद्र घुले<br>चंद्रशेखर घुले<br>क्षितीज घुले |
| | | | |

**संदर्भ :– क्षेत्रीय पाहणी**

**ई) निवडक सहकारी संस्थांचे निवडक पदाधिकारी :–**

या निवडक सहकारी घराण्यांचा संबंध असलेल्या पुढील ६ संस्थांतील निवडक पदाधिकाऱ्याच्या प्रश्नावली घेतल्या आहेत. त्याचा तपशिल तक्ता ३.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ३.३ निवडक सहकारी उद्योगसंस्था :-**

| **अ. क्र.** | **सहकारी संस्था** | **निवड केलेल्या ३ तालुक्यातील सहकारी उद्योग** | **पदाधिकारी** |
|---|---|---|---|
| १ | साखर कारखाने | २५ | अध्यक्ष /उपाध्यक्ष / संचालक /कर्मचारी |
| २ | बँक | २५ | अध्यक्ष /उपाध्यक्ष / संचालक/कर्मचारी |
| ३ | शिक्षण | २५ | अध्यक्ष /उपाध्यक्ष / शिक्षणसंस्थाप्रमुख/कर्मचारी |
| ४ | जिल्हा परिषद | २५ | अध्यक्ष /उपाध्यक्ष / उ.ए.ज/कर्मचारी |
| ५ | बाजार समिती | २५ | अध्यक्ष /उपाध्यक्ष / सचिव/कर्मचारी |
| ६ | दुग्ध व्यवसाय | २५ | अध्यक्ष /उपाध्यक्ष / सचिव /कर्मचारी |
| | **एकूण** | **१५०** | |

**संदर्भ : - क्षेत्रिय पाहणी**

तक्ता ३.३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण ३० सहकारी उद्योग संस्थांमध्ये प्रत्येकी ५ पदाधिकारी यांची प्रश्नावली क्र. १ घेण्यात आली आहे. अशी एकूण १५० प्रश्नावली भरुन घेण्यात आले आहे

**उ) निवडक लाभधारक:-**

संशोधनासाठी माहिती संकलनासाठी निवडलेल्या पाच तालुक्यातील खालील लाभधारकाची प्रश्नावली भरुन घेण्यात आली आहे. त्यामध्ये प्रत्येकी महिला १२, राजकीय प्रतिनिधी १२ शेतकरी १२, राजकीय कार्यकर्ते १२, पत्रकार १२, व्यावसायिक १२ यांची समावेश आहे. प्रत्येक तालुक्यातील ६, लाभधारक ७२ व ५ निवडक घराणी अशी एकूण ३६० प्रश्नावली भरुन घेण्यात आले आहे. संबंधित प्रश्नावली क्र. २ मध्ये भरण्यात येत आहे.

**२. दुय्यम स्त्रोत :-**

१. आजपर्यंत झालेले संशोधनाचे एम. फिल. व. पीएच. डी. चे प्रकाशित / अप्रकाशित प्रबंध / शोध निबंध.

२. ब्रिटीश ग्रंथालय, पुणे.

३. मुंबई ग्रंथालय, मुंबई विद्यापीठ मुंबई.

४. जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे.

५. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

६. वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके

७. याविषयावरिल जर्नल्स / नियतकालिके

८. इंटरनेट वरील सर्व सर्च इंजिन साईटस्

**३) सांख्यिकी साधने :-**

प्राथमिक माहिती व दुय्यम माहिती यावरून संचलित माहितीचे वर्गीकरणात्मक तक्ते तयार करुन त्यानुसार विश्लेषणात्मक आकडेवारी काढण्यात येणार आहे. सदरील सामाजिक संशोधनाचे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास विषयाचा सामाजिक संशोधनानुसार विश्लेषण करण्यात येईल. आवश्यक येथे आलेख व नकाशे तयार केले आहेत.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या शास्त्रीय अध्ययनासाठी संख्यात्मक (Quntiative) व गुणात्मक (Quntiative) संशोधन पद्धती उपयोग करण्यात येणार आहे. ऐतिहासिक आगमनात्मक, विवेचनात्मक, विश्लेषणात्मक पद्धतीचा व या संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी ग्रंथालय संशोधन याचाही वापर करणार आहे.

## ३.१०. संशोधनाचा कालावधी :-

राजकीय कार्याची व्याप्ती एकूण मोठी आहे. म्हणून काही मर्यादा लक्षात घेता संशोधकाने अहमदनगर जिल्ह्यातील निवडक राजकीय घराण्यांचा अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे.

## ३.११. संशोधन अभ्यासाची मर्यादा :-

प्रस्तूत संशोधनामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी घराण्यांसाठी राजकीय नेतृत्वांचा अभ्यास केलेला आहे. मुलाखत व प्रश्नावलीच्या माहितीचे विष्लेषण केलेले राजकीय नेतृत्वाविषयी लिखित स्वरूपात जी माहिती मिळाली तिचाच अभ्यास केला आहे. प्रश्नावली भरून देताना माहिती संकलनात टाळाटाळ केलेली मर्यादा दिसून आली. अहमदनगर जिल्ह्यात अनेक चळवळी कार्यरत आहे. पण अभ्यासासाठी सहकार चळवळीतील सहकारी नेतृत्वाचा कार्याचा वेध घेतलेला आहे. इतर चळवळीचा आढावा घेतलेला नाही. सहकारी राजकीय घराण्यांचा अभ्यास करताना राजकीय पक्षाचा सखोल अभ्यास केलेला नाही. संशोधनात लोकसभा विधानसभा व जिल्हा परिषदेचा स्वतंत्र आढावा घेण्याऐवजी मतदार संघातील राजकीय नेतृत्वाच्या उदयाचा अभ्यास केला आहे. सहकारातील घराण्यांचा कार्याचा आढावा घेतला परंतु विशिष्ट जातीच्या नेतृत्वाचा अभ्यास केलेला नाही. तसेच अहमदनगर जिल्ह्यामध्ये विविध प्रकारच्या सहकारी संस्था सक्रिय आहेत पण अभ्यासासाठी सहकारी साखर कारखाना दुग्धव्यवसाय शैक्षणिक संस्था व सहकारी बँक याची संस्थाचा स्थापनेतील राजकीय नेतृत्वाचे योगदान दर्शविलेले आहे. अहमदनगर जिल्ह्यातील तालुक्यानुसार मतदार संघातील राजकीय नेतृत्वाच्या जडणघडणीचा अभ्यास केला आहे. पण तालुक्यातील इतर मुद्देचा अभ्यास केलेला नाही. अशा मर्यादा अभ्यासातून पुढे आल्या आहेत.

## ३.१२. संशोधन आराखडा :-

कोणत्याही संशोधकापुढे संशोधन करताना निश्चित स्वरूपाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संशोधकाला आपल्या संपूर्ण संशोधनाची आखणी किंवा मांडणी करावी लागते ही मांडणी अतिशय आवश्यक व महत्वाची असते. जीवनातील कोणतेही कार्य असो ते व्यवस्थित पार पाडण्यासाठी प्रथम त्या कार्याचा आराखडा तयार करावा लागतो. अशा आराखडयामुळे त्या कार्याला सुसूत्रपणा

येतो. म्हणजेच त्या कार्याचे पध्दतशीर नियोजन व त्याची रचना अथवा मांडणी ठरवावी लागते यालाच संशोधन आराखडा असे म्हणतात.

श्रम, वेळ आणि पैसा यांचा महत्तम उपयोग करून संशोधनाच्या उद्दिंष्टाच्या पुर्ततेसाठी तथ्यांचे संकलन, विश्लेषण आणि निर्वचन करून सिंध्दांताची मांडणी करून निर्णय घेण्याचा नियोजन प्रकियेला संशोधन आराखडा म्हणतात. संशोधनास प्रारंभ करण्यापूर्वी प्रथम संशोधनाचा उद्देश तयार करावा लागतो. संशोधन अध्ययन करण्याची गरज का निर्माण झाली संशोधन समस्येचे कार्यक्षेत्र आणि कार्यमर्यादा निश्चित करणे. तथ्य स्त्रोतांची नोंद ठेवणे, संशोधनासाठी मिळाविलेल्या तथ्य सामग्रींचे आणि माहितीचे विश्लेषण करणे, खर्चाचा अंदाज, तसेच भविष्यात कोणकोणत्या अडचणी येणार यांचाही विचार करावा लागतो. वरील सर्व घटक विचारात घेवून संशोधकांने संशोधन आराखडा तयार केल्यास तो संशोधनाचा आदर्श आराखडा होईल. आदर्श आराखडा तयार केल्यामुळे संशोधनाचे निर्णय अचूक निघतात म्हणून संशोधनासाठी आदर्श आराखडा तयार करणे हे अत्यंत महत्वाचे कार्य आहे. यावेळी एखाद्या घटनेचे स्वरूप किंवा त्या घटनेसंबंधीची वस्तुस्थिती: तिच्या मुळाशी असणारी कारणे, त्या घटनेचे परिणाम इ. बाबी वस्तुचिन्ह दुप्टीने शोधून काढण्यासाठी अध्ययन केले जाते. त्यावेळी त्या संशोधन अध्ययनासाठी तयार केल्या जाणाऱ्या आराखड्याला अन्वेषणात्मक किवा परिचयात्मक संशोधन आराखडा असे म्हणतात. म्हणूनच संशोधकाने अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास याचे अध्ययन करण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा प्रकार निवडला आहे. संशोधन समस्येचे निवड केल्यानंतर गृहितकृत्य निर्माण करण्यासाठी हा आराखडा अतिशय उपयुक्त ठरतो. या आराखडयामुळे कार्यकारण संबंध स्पष्ट होण्यासाठी सहकार्य होते. या अध्ययनामुळे संशोधकाला त्या विषयाशी संबंधीत असणा–या विविध पैलंचे ज्ञान होते. तसेच अन्वेषनात्मक पध्दतीत संशोधनाद्वारे विशिष्ट व्यक्तीने भिन्न भिन्न स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात येतात. त्याचे शास्त्रीय निरिक्षण केले जाते. त्यासाठी तो विविध तंत्रांचा व साधणांचा अवलंब करीत असतो.त्या विषयासंबंधी उपलब्ध अहवालांचे परिक्षण आणि अध्ययन करतो. त्या सर्वामुळे त्याला समस्या निवारन करणे सुलभ जाते. आणि त्याला पर्यायी स्वरूपाच्या गृहीकत्यांची निर्मिती करता येते.

अन्वेषानात्मक संशोधन आराखडयाची दोन कार्ये आहेत.

१. त्या विषयाचे अध्ययन संशोधक करू इच्छितो. त्या विषयासाठी संरचनात्मक स्वरूप देण्यासाठी, त्या विषयासंबंधीच्या निरनिराळ्या पैलुंचे वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करून घेणे. हे या आराखडयाचे पहिले कार्य आहे.

२. संशोधन विषयाचे अध्ययन ज्या स्थितीत करण्याचा संशोधकाचा विचार असतो त्या स्थितीची योग्य माहिती प्राप्त करून घेणे हे या आराखडयाचे दुसरे कार्य आहे.

प्रस्तुत संशोधन प्रबंधाचा आराखडा पुढीलप्रमाणे आहे.

**१) प्रकरण पहिले– संशोधन कार्याची ओळख :–**

प्रास्ताविक, सहकाराचा अर्थ व व्याख्या, सहकारी वैशिष्ट्ये, सहकाराचे स्वरूप व व्याप्ती, सहकाराची आवश्यकता, सहकाराचे मूलतत्त्वे भारतातील सहकार चळवळ, अहमदनगर, जिल्ह्यातील सहकार चळवळ. या प्रकरणामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय नेतृत्व, सहकारी संस्थेचा आढावा, शैक्षणिक संस्था, शेतीविषयक प्रगती, सहकारी बँकेचा आढावा, राजकीय विकासाचा आढावा, सहकारी साखर कारखाने दुग्धव्यवसाय इत्यादींचा आढावा घेतला आहे.

**२) प्रकरण दुसरे– संशोधनाची कार्यपद्धती :–**

विषयाशी संबंधित पीएच. डी. प्रबंध, प्रकाशित व अप्रकाशित संदर्भ ग्रंथ, मासिके व साप्ताहिके आणि पुस्तके

**३)प्रकरण तिसरे – संशोधनाची कार्यपद्धती :–**

भाग – १. संशोधन पद्धती

प्रस्तावना, संशोधन, साहित्याचा परामर्ष, अहमदनगर जिल्हा निवडीचे कारण संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाचे महत्व, संशोधन मर्यादा या बाबतच्या तपशील दिलेला आहे.

भाग –२. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास

अहमदनगर जिल्हातील राजकीय घराण्यांची परंपरा व्यक्ती विकास व व्यक्तीविकासातून समाज विकास साधणारी आहे. सहकाराच्या माध्यमातून जिल्ह्यात व प्रत्येक तालुक्यात नेतृत्व

तयार झाले आहे. जिल्ह्यातील १४ तालुक्यात विविध १५ राजकीय घराणे तयार झाले आहे. त्यापैकी संशोधक ०५ नामांकित राजकीय घराण्यांाचा अभ्यास करणार आहे. त्या घराण्यांमुळे झालेल्या राजकीय व सहकार क्षेत्रातील विकासाचा आढावा घेणार आहे. या प्रकरणात घराण्यांची सविस्तर माहिती देताना त्याचे कर्तुत्वाची क्षेत्रे कार्याचे यशापयशाचा तौलनिक अभ्यास करणार आहे.

**४) प्रकरण चौथे :– माहिती संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन :–**

प्रस्तावना, ग्रामपंचायती ते जिल्हा परिषद कर्मचारी प्रश्नावली, प्रशासकीय स्त्रोतांचे विश्लेषण करण्यात येईल. तसेच दुय्यम स्त्रोतांच्या आधारे मिळवलेल्या माहितीचे विश्लेषण केले जाईल योग्य ती सांख्यिकी तंत्रे वापरली जातील.

**५.) प्रकरण पाचवे – माहितीचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

प्रस्तावना, गृहीतकांची पडताळणी निष्कर्ष व शिफारशी यांचा या प्रकरणात समावेश आहे.

## संदर्भ :–


१. बी. एम. कऱ्हाडे शास्त्रीय संशोधन पद्धती २०११ पिंपळापुरे, नागपुर संदर्भ क्र.१,२.

२. प्रदीप आगलावे 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे' २००० विद्या प्रकाशन, नागपूर संदर्भ क्र. ३.

३. संतोष दास्ताने 'महाराष्ट्र वार्षिकी' २०१२ सहकार निराली प्रकाशन पुणे संदर्भ क्र ४.

४. यशवंतराव चव्हाण 'शेतीनिष्ठ यशवंतराव' २०१३ कृषी औद्योगिकीकरण व सहकार क्राटिनिटंल प्रकाशन, पुणे पान नं. ५६ संदर्भ क्र ५,६.

५. अरुण साधू 'सहकार धूरिण' २०१४ डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा स्टडी सर्कल रोहन प्रकाशन, पुणे पान नं. ६,७ संदर्भ क्र. ७,८,९.

६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 'अहमदनगर' जिल्हा २०१५–१६ संदर्भ क्र. १०,११.

७. भास्कर भोळे राजकीय विश्लेषण २०१० राजकीय नेतृत्व पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स नागपुर पान नं. १३५ संदर्भ क्र.१२

८. प्रकाश पवार भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल २०१४ राजकीय धुरिणत्व व वर्चस्व डायमंड पब्लिकेशन्स पुणे पान नं. २४ संदर्भ क्र.१३,१४

९. प्राचार्य ठाकरे आधुनिक राजकीय विश्लेषण २०१० राजकीय बदल आधुनिकीकरण अणि राजकीय विकास विद्या प्रकाशन, नागपुर पान नं. १४०, ते १५२ संदर्भ क्र.१५

१०. एम. जी. देवगावकर राजकीय सिद्धांत २००९ विकास आणि कल्याणकारी राज्य श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर पान नं. २३० ते २४९ संदर्भ क्र. १६,१७

११. भास्कर लक्ष्मण भोळे राजकीय सिद्धांत २००८ राजकीय नेतृत्व पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स नागपुर. संदर्भ क्र.१८,१९

१२. विजय चोरमारे 'महाराष्ट्राचे राजकारणःनवे संदर्भ' २०१४,नवता, मुंबई

१३. यशवंतराव गडाख अर्धविराम २००३ ऋतुरंग प्रकाशन.

१४. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज अहमदनगर 'स्मरणिका झेप' १९९४ अमृत महोत्सवी वर्ष सन (१९५७ ते१९८२)

१५. शंकरराव गडाख पाटील 'परिवर्तन' दि. अहनदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप बँक लि. अहमदनगर (१९५८–२००८)

१६. शंकर चव्हाण ‘कामगार चळवळ एक राजकीय विश्लेषण’ २००८ शब्दगंध प्रकाशन, पुणे.
१७. भीमराव पाटील ‘मनामनातील मारूतराव घुले पाटील’ १९९५ पृथ्वीराज प्रकाशन, पुणे
१८. अशोक जैन ’महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण’ १९९८ शेठ पब्लिकेशन, मुंबई.
१९. भास्कर जोधळे ‘एक विश्वस्त’ २००३ प्रकाशक चंद्रशेखर घुले पाटील.
२०. सुधारक शेरकर ‘योगदान’ २००७ अनिल प्रिंटर्स अहमदनगर.
२१. मधुकर भावे ‘यशवंतराव ते विलासराव’ मनोविकास प्रकाशन, ६७२, नारायण पेठ, पुणे.
२२. गो. स. कामत ‘सहकार तत्व व व्यवहार व्यवस्थापन’ १९९३ स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
२३. शोभा कारेकर ‘महाराष्ट्र शासन आणि राजकारण’ अंशुल प्रकाशन, नागपूर.
२४. अशोक चौसाळकर ‘महाराष्ट्राचे राजकारण’ २०१० नवभारत प्रकाशन, नागपूर.
२५. Sushila Ramswamy “political Theory “Maclillam ideas & Concepts Publication (२०१०).
२६. कुलकर्णी गिरीश ‘महाराष्ट्रातील सहकारी नेतृत्व सहकारी कारखान्याच्या संदर्भात नगर व पुणे जिल्ह्याच्या संदर्भात नगर व पुणे जिल्हाध्यक्ष विशेष संदर्भासह’ १९९६ पुणे विद्यापीठात पी.एच.डी साठी सादर केलेल्या अप्रकाशित शोधनिबंध.
२७. दराडे संभाजी ‘जनतेचे स्वर्गीय बाबुराव आव्हाड यांचे पाथर्डी परिसरातील कार्य व कर्तुत्वाचा चिकित्सक अभ्यास’ २०१२ नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ एम. फिल पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध.
२८. प्रा. सोनवणे दिंगबर ‘अहमदनगर’ जिल्ह्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान’ २००८ अमरावती विद्यापीठाच्या एम. फिल पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिंबध.
२९. प्रा. सोनवणे राजाराम ‘डॉ. बाबूराव बापूजी तनपूरे’ यांचे राहुरी तालुका विकासातील योगदान एक संप्रेषणट्टशास्त्रीय अभ्यास’ २००४ नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठास एम. फिल साठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिंबध.
३०. कावरे एन. एम. ‘महाराष्ट्रातील सहकारी चळवळ’ २०१२ इंडियन स्ट्रीम्स सर्च जर्नल्स–व्हल्युम–२.
३१. http://maharashtratimes.indiatimes.com/

३२. http://en.wikipedia. org/wiki/Main_Page

३३. http://www. maayboli.com/node/44759

३४. गिरीश कुलकर्णी 'महाराष्ट्रातील सहकारी नेतृत्त्व' १९९६ अहमदनगर व पुणे जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या संदर्भात पुणे विद्यापीठास सादर केलेला अप्रकाशित प्रबंध.

३५. रक्ताटे किशोर 'महाराष्ट्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास' १९९६ विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा पुणे विद्यापीटास सादर केलेला एम. फिल शोध निंबध.

३६. 'महाराष्ट्र माझा' २०११ दिवाली अंक संपादक.

## प्रकरण ३

# संशोधन कार्यपध्दती

## विभाग ३.२

## अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३.२.१ | प्रास्ताविक | १९५ |
| ३.२.२ | अहमदनगर जिल्हयातील सहकारी चळवळीची सदयस्थिती | १९९ |
| ३.२.३ | अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा उदय | २०५ |
| ३.२.४ | अहमदनगर जिल्हयातील राजकीय नेतृत्वाचे योगदान व राजकीय घराणी | २०७ |
| | **अ) अहमदनगर जिल्हयातील सहकारी राजकीय नेतृत्व** | |
| | १. दादा पाटील राजळे – पाथर्डी | २०८ |
| | २. शंकरराव काळे – कोपरगाव | २१२ |
| | ३. बबनरावजी ढाकणे – पाथर्डी | २१८ |
| | ४. मधुकरराव पिचड – अकोले | २२२ |
| | ५. बबनरावजी तनपुरे – राहुरी | २२५ |
| | ६. भानुदास काशीनाथ मुरकुटे – श्रीरामपुर | २२६ |
| | ७. शंकरराव कोल्हे – कोपरगाव | २२९ |
| | ८. यशवंतराव गडाख – नेवासा | २३२ |
| | ९. मारूतराव घुले – शेवगाव | २३९ |
| | १०. भाऊसाहेब थोरात – संगमनेर | २४५ |
| | ११. विठ्ठलराव विखे – राहाता | २५३ |

| | | |
|---|---|---|
| | १२. कुंडलिकराव जगताप – पारनेर | २७० |
| | १३. शिवाजीराव नागवडे – कर्जत | २७२ |
| | १४. बबनराव पाचपुते – श्रीगोंदा | २७३ |
| | १५. दादापाटील शेळके – अहमदनगर | २७४ |
| | **ब) बिगर सहकारी राजकीय नेतृत्व** | |
| | १. गोविंदराव आदिक – श्रीरामपुर | २७६ |
| | २. सदाशिव लोंखंडे – राहाता | २७७ |
| | ३. दिलीप गांधी – अहमदनगर | २७९ |
| | ४. तुकाराम गडाख – नेवासा | २८१ |
| | ५. सूर्यभान वहाडणे – कोपरगाव | २८३ |
| | ६. बी. जे. खताळ – संगमनेर | २८५ |
| | ७. रावसाहेब शिंदे – श्रीरामपुर | २८८ |
| ३.२.५ | महिला सहकार चळवळीतील योगदान | २९१ |
| ३.२.६ | सहकारातील राजकीय घराण्यांचे नातेसंबध | २९८ |
| | | |

# विभाग ३.२

# अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास

## ३.२.१. प्रास्ताविक :–

सहकारी चळवळ ही आजच्या स्वांतत्र्योत्तर महाराष्ट्राच्या जडण–घडणीत महत्वाचा वाटा असणारी चळवळ आहे. स्वांतत्र्योत्तर मराठी ग्रामीणच नव्हे तर नागरी जीवनही या चळवळीमूळे प्रभावित झालेले दिसते. १९०४ साली बीजारोपण झालेल्या सहकारी क्षेत्राचा आढावा घेतला तर असे दिसते की स्वांतत्र्यपूर्व कालखंडात या क्षेत्राचा संबध फक्त आर्थिक पतपुरवठयापर्यंत मर्यादित होता. त्याचा लाभधारक अतिसामान्य माणूस कधीही नव्हता. त्याचबरोबर या संस्थाच्या आर्थिक क्षमतेला व आर्थिक दृष्टीकोनालाही मर्यादा असल्याने सावकारशाही पूर्वीच्याच जोमाने पिळवणूक करत होती. या क्षेत्राच्या क्षमतेची व कार्याची कक्षा विस्तारली ती डॉ. धनजंय गाडगीळांनी जाणलेल्या अर्थतत्वाची वैकुंठभाई मेहतांच्या अर्थप्रशासनाची आणि पद्मश्री विखे पाटलांच्या आत्मविश्वास गमविलेल्या शेतकऱ्यांच्या संघटन कौशल्याची क्षमतेची सांगड घालून उभ्या राहिलेल्या पहिल्या सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीनंतर त्यानंतर सहकाराला व्यापक स्वरूप आले आणि सहकारी क्षेत्र ग्रामीण विकासाला समर्थ पर्याय ठरू शकेल. शेतकऱ्यांचे जीवन संपलेल्या दिशेने नेण्यात सहाय्यभूत ठरू शकेल याची जाणीव सर्वानाच झाली ग्रामीण नेतृत्व विकासाला कार्याची एक परिणामकारक दिशा व गती मिळाली त्यानंतर ही चळवळ झपाटयाने विस्तारत गेली पुढे वाढत गेली वेगवेगळया क्षेत्रामध्ये सहकाराने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. एवढेच नव्हे तर सहकारी साखर कारखानदारी सारख्या उदयोगांनी प्रस्थापित धनदांडग्याची खासगी साखर कारखानदारी मोडित काढली. सुतगिरणी, दूधसंघ, सहकारी पतसंस्था व बँका गृहानिर्माण संस्था, पाणी पुरवठा संस्था, उपसा जलसिंचन संस्था या बरोबरच पददलितांच्या व मजुरांच्या सहकारी संस्था इ. अनेक क्षेत्रांमध्ये सहकाराने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.[१]

ज्या सहजतेने एखादी सहकारी तत्वावरील संस्था उभी करता येते सभासद संघटित करता येतात. भागभांडवल उभे करता येते इतक्या सहजतेने या बाबी ४०–५० वर्षापूर्वी होत नव्हत्या. मुळात ग्रामीण भागातील माणसे गतिमान झालेली वर्षानुवर्षे पिळवणूकीशिवाय त्यांनी काही अनुभवलेले नव्हते. आपले प्रश्नही त्यांना नीटपणे उमगलेले नव्हते. वर्षानुवर्षे ज्यांनी

फसवणूक सोसलेली अशी माणसे सहजासहजी कुणावरही विश्वास ठेवण्यास तयार होत नाहीत. आपली दयनीयवस्था आपल्या पूर्व जन्माचे फळ आहे. व आपल्या कमाचे फळ आपण भोगत आहोत त्यामुळे त्यातून सुटकाा कठिण आहे. या अंधश्रध्देमुळे बहुतेक अडकलेली पिळवणूक अन्याय विषयी कोडे निर्माण होण्याऐवजी हा आपल्या नशिबाचा फेरा आहे. असे मानून त्यांचे समर्थन करीत म्हणूनच अशा विकसीत पिडीत समुहाचे संघटन करणे आजही अवघड व जिकरीचे आहे. सहकारी चळवळ ही मुळातच सामान्य माणसासाठी व सामान्य माणसांच्या आत्मविश्वासाच्या जिद्दीतून उभी राहिलेली चळवळ आहे.[२]

सहकारी संस्था फक्त उभ्या करून भागत नाही तर त्या टिकल्या पाहिजेत वाढल्या पाहिजेत स्वयंपूर्णतेच्या दिशेने त्यांची वाटचाल केली पाहिजे काळानुरूप योग्य असणारे बदलही स्वीकारले पाहिजेत कार्य करत असताना सहकाराचा आत्मा व मुल तत्वाला बाधा येणार नाही याची काळजी नेतृत्वाने घ्यावी लागते त्यासाठी सभासद कार्यकर्ते आणि प्रमुख यांच्यामध्ये सुसंवाद आणि बरोबरीचे नाते असले पाहिजे त्याचबरोबर समाजहित व संस्थेची बांधिलकी मानणाऱ्या निःस्पृह समर्थ कार्यकर्त्यांची फळी उभी केली तरच ही संघटना निकोपपणे टिकते समूहशक्ती व सामूहिक समान संधी उपलब्ध करून देणे हे सहकाराचे सुत्र आहे.सहकारी चळवळीला असे समर्थ नेतृत्व सुरूवातीच्या काळात लाभले आहे.त्यांना जनतेने उत्स्फूर्त साथ दिली त्यामुळेच अल्पावधीत सहकार चळवळ सर्वत्र पसरली.सहकार क्षेत्रात महाराष्ट्राने देशासाठी दिलेले योगदान लक्षणीय आहे सावकारशाहीच्या शोषण व्यवस्थेतून शेतकऱ्याला सोडण्याचे कार्य या क्षेत्राने केले आहे.समृध्दीकडे जाण्यासाठी सहकार हा मार्ग आहे म्हणून सहकार टिकून आहे.[३]

भारतातील सहकार चळवळ जगभर वाखाणली गेली आहे.या चळवळीला बळ आणि गती देण्याचे काम महाराष्ट्राने केले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेल्या या चळवळीला पंडित नेहरू आणि यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे राजाश्रय मिळाला. सावकारशाहीच्या शोषण व्यवस्थेला पर्याय म्हणून सुरूवातीच्या काळात कृषी पतपुरवठयाची मर्यादीत असलेली ही व्यवस्था पुढे चळवळ म्हणून विस्तारत गेली. नंतरच्या काळात सहकार चळवळ शेतीमाल प्रक्रिया, पणन, ग्रामीण उदयोग, ग्राहक भांडारे आदि सारख्या क्षेत्रांत वेगाने पसरली. बिगर कृषी प्राथमिक पतसंस्थाही वाढल्या यामुळे महाराष्ट्रात सामाजिक व आर्थिक परिवर्तन करणे शक्य झाले.[४]

महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळ सर्वत्र पसरलेली आहे. राज्यात तब्बल २.१८ लाख सहकारी संस्था असून राज्यातील ५०% लोकसंख्या सहकाराशी संबधित आहे. या खेरीज सहकाराचा अप्रत्यक्ष लाभ उठविणाराही मोठा स्तर आहे. २.१८ लाखांपैकी १०% संस्था या शेतीला पतपुरवठा करणाऱ्या तर ११% बिगर कृषी पतपुरवठा करणाऱ्या आहेत. उर्वरित ७९% संस्था या पणन उत्पादन उपसा जलसिंचन पाणीपुरवठा वाहतूक सामाजिक आदि विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत सहकार क्षेत्र हे सर्वस्पर्शी असल्याने यावरून स्पष्ट होते. स्वाभाविकच राज्यातील गावागावांत सहकारी संस्था आहेत आणि त्या तेथील दैनंदिन जीवनाचा एक भाग बनल्या आहेत. गुणदोषाच्या आधारावर तिला तोलण्याचा प्रयत्न केला तरी सामाजिक न्याय आणि बांधलिकीमुळे तिचे वजन कमी झाल्याचे जाणवत नाही.[५]

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ हा लोकांच्या पुढाकाराचा प्रत्यय आहे. त्यांना संघटित करून आणि भांडवल उभारून आर्थिक व सामाजिक कार्य एकत्रितरित्या करण्याचा प्रयत्न राहिला आहे. त्यामुळे उत्पादनात वाढ होऊन रोजगाराची निर्मिती झाली आहे. या चळवळीमुळे शेती, दुध, मत्स्य व्यवसाय, कृषी प्रक्रिया, साठवणूक, विक्री, पणन, पतपुरवठा, बँकिंग आणि गृहनिर्माण क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे.

ग्रामीण महाराष्ट्रातील आर्थिक व्यवस्था शेतीप्रधान आहे. ५० वर्षात शेतीला कर्ज पुरवणाऱ्या प्राथमिक कृषी पतसंस्थाची संख्या २१ हाजारांवर गेली आहे. राज्याची शिखर या त्रिस्तरीय यंत्रणेतून राज्यात दरवर्षी पतपुरवठयाचे हे प्रमाण शेकडा ७० ते ७५ टक्के इतके असते. राज्यातील १७५ पैकी १४१ साखर कारखाने सहकारी आहेत. गळित हंगामात रोज साडेचार लाख टन ऊस गळित करण्याची क्षमता आहे. हंगामात जवळपास ८०० लाख टन ऊस गाळप राज्यातील कारखाने करतात. ऊसाच्या पेमेंटच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरवर्षी जवळपास १० ते १२ हजार कोटी मिळतात. प्रत्येक कारखान्याला त्यांच्या क्षमतेनुसार १२ ते ३० हजार शेतकरी ऊसाचा पुरवठा करतात दीड लाखांवर कर्मचाऱ्यांना आणि ८ ते १० लाख मजुरांना ऊसतोडणी वाहतुकीचे काम मिळते. राज्य सरकारला दरवर्षी २५०० कोटी तर केंद्र सरकारला १५०० कोटी महसूल या कारखानदारीतून मिळतो. ५० वर्षात जवळपास ७० हजार कोटींचा महसूल राज्य व केंद्र सरकारला दिला आहे.[६]

२०१६–१७ या वर्षात जागतिक साखर उत्पादन १७०० लाख टन अपेक्षित आहे. यापैकी २४० ते २४५ लाख टन उत्पादन भारतात होण्याचा अंदाज आहे त्यात महाराष्ट्राचा वाटा ९० लाख टनाचा आहे. त्यात सर्वात मोठा वाटा हा सहकारी कारखानदारीचा आहे. साखर उत्पादनातील या यशात सहकाराचा वाटा आहे. साखर कारखाान्याप्रमाणेच राज्यात ७३ अर्कशाळा आहेत त्यात ६३ सहकारी क्षेत्रात आहेत. ८ रासायानिक प्रकल्पही कार्यरत आहेत सहकाराच्या माध्यमातून वीजनिर्मिती क्षमता प्रतितास २३४ मेगावॅट इतकी आहे. सहकारी संस्था मोठया प्रमाणात आहेत. सूत गिरण्या, कापूस पिंजणी, हातमाग, यंत्रमाग संस्था, दुग्ध संस्था, मत्स्य संस्था इ. आहेत. राज्यात ३१ हजार सरकारी दुध संस्था व १०६ दुध संघ आहेत. या सर्वा कृषी प्रक्रिया सहकारी संस्था मध्ये व दुध संकलनामध्ये नगर जिल्हा अग्रेसर आहे. जिल्हयात दरवर्षी ६०० कोटींचे दुध उत्पादन होते राज्यात बिगर शेती पतपुरवठयातही सहकारी चळवळीने आघाडी केली आाहे. ५५३ नागरी सहकारी बँका १६ हजार नागरी सहकारी पतसंस्था व ७ हजार पगारदार नाोकरांच्या सहकारी संस्था कार्यरत आहे. २ कोटी ४० लाख साभासद असून ६० हजार कोटींच्या ठेवी आहे. या सर्वाचे श्रेय हे सहकारचा चळवळीला जाते चळवळीला पुढे नेण्याचे कार्य हे राजकीय नेतृत्व्वाने केलेले दिसते.[७]

स्वांतत्र्योत्तर काळात अर्थिक स्थैर्य महत्वाचे त्यासाठी ग्रामीण भागाची सर्वांगीण प्रगती हवी प्रादेशिक नेतृत्वाने महत्वाची कामगिरी बजावली. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर या जिल्हयामध्ये अनेक स्थानिक नेते जन्माला आले. ग्रामीण विकासात सहकारी चळवळीचे स्थान महत्वाचे आहे.७०% लोक खेडयात राहून शेतीवर जगतात. ५० वर्षात पश्चिम महाराष्ट्रात सहकारी चळवळ वाढली या चळवळीला राजकीय, सामाजिक, सांस्कतिक पार्श्वभूमी आहे. जनतेचे प्रतिनिधीत्व हे १९५० च्या पद्मश्री विखे पाटील यांच्या सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत भागीदार होते. अनुकूल वातावरण कॅनाल इरिकेशन यामुळे ऊस उत्पादन वाढले ते सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेस उपयोगी पडले. १९२० चे दरम्यान सासवड भागात निरा कालवा, कोपरगाव भागातून गोदवरी कालवा, श्रीरामपुर भागात प्रवरा कालवा झाला, त्यामुळे ऊस शेतीस चालना मिळाली, यशवंतराव चव्हाणांनी साखर उदयोगास प्रोत्साहन दिले.[८]

सहकारी साखर कारखान्यामुळे रोजगार वाढला वाहतुक़, दळणवळण, बांधकाम, बँक व्यवसाय वाढले, शैक्षणिक सोयी वाढल्या त्या प्रगतीतून नवीन नेतृत्व निर्माण झाले. महाराष्ट्रात सर्वच सहकारी कारखाने यशस्वी झाले नाही. नेतृत्वातील शत्रुत्व कनिष्ठ व्यवस्थापन उपपदार्थ उत्पादनात अयोग्य गुतंवणूक अपूरे भांडवल वारंवार पडणारा दुष्काळ यागोष्टी कारणीभूत ठरल्या.[९]

राज्याच्या विशेषःत ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला सहकारी चळवळीचे हातभार लावला आहे. राज्याच्या आर्थिक जीवनाची अनेक धागेदोरे सहकारी चळवळीने व्यापली आहेत. कृषि पतपुरवठा क्षेत्रापुरती मर्यादीत असलेली ही चळवळ विस्तारली असून त्यात कृषि पतपुरवठा. ग्रामीण व नागरी विगर कृषी पुरवठा.साखर उदयोग, सूत गिरण्या, दुग्ध व्यवसाय, गृहबांधणी, शेतमालप्रक्रिया, ग्राहकभांडार, हातमाग, भातगिरण्या तेल इ. अनेक क्षेत्रे या चळवळीने व्यापली आहेत..[१०]

## ३.२.२ अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळीची सदयस्थिती :-

अहमदनगर जिल्हा सहकारी बँक ही सहकारी संस्था तसेच सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनातील कामधेनू मानली जाते. ५५ वर्ष पूर्ण केलेल्या या संस्थेने राज्यातील मोजक्या जिल्हा सहकारी बँकामध्ये अग्रस्थान टिकवले आहे. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून काम करणारी सर्वपक्षीय राजकीय नेतेमंडळी तसेच शेतकरी पुत्र आधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा बँकेला व तिच्या माध्यमातून जिल्हाभरातील सामान्य शेतकऱ्यांना व विविध सहकारी संस्थांना प्रगतीच्या वाटेवर नेले आहे.[११]

साखरेचे आगार समजला जाणारा नगर जिल्हा आज १८ सहकारी कारखाने व चार खासगी कारखान्यांच्या माध्यमातून साखरेचा सव्वा लाखांवर पोत्यांचे उत्पादन करतो आहे. कारखाना कार्यस्थळांवर कामगार-कर्मचाऱ्यांच्या वसाहती व तेथे सर्व सुविधा पुरविणारे साखर कारखाने त्यांच्या परिसरातील प्रत्येक घटकाला आपल्या परिवारातीलच मानतात. परिसराच्या सर्वांगीण विकासात साखर कारखान्याचे योगदान सर्वात मोठे आहे. सहकारी साखर कारखानदारी बदलत्या काळानूसार को-जनरेशनच्या माध्यमातून वीजनिर्मितीच्या क्षेत्रात उतरली आहे. कारखान्यांचे जनरेशन प्लांट आता वीज निर्माण करून महावितरणला विकत आहेत. उत्पन्नाचे नवे साधन शोधले गेले आहे. याआधी डिस्टिलरीच्या माध्यमातून दारूनिर्मिती उत्पन्नवाढीचा

स्त्रोत काहीनी स्वीकारला. आता कोजनरेशनची साथ घेतली जात आहे. या मागचा उद्देश एकच संस्थेचा व त्यावर अवलंबून प्रत्येक घटकाचा सर्वागीण विकास यात साखर कारखानदारी बहुतांश यशस्वी ठरली आहे.

नागरी सहकारी बँका हा नगर जिल्हयाच्या विकासातील आणखी एक घटक मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीयांना उदयोग व्यवसायांसाठी आर्थिक मदतीचा हात देण्यात नागरी सहकारी बँकांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. राष्ट्रीयकृत बँकाचे नियमांचे जंजाळ अडचणीचे ठरत असताना नागरी सहकारी बँकानी व्यक्तीची गरज ओळखून तिला दिलेले प्राधान्य महत्वाचे ठरले यातूनच आज जिल्हयातील विकासाच्या भागीदार ठरल्या आहेत. दोन हजार कोटींवर उलाढाल नागरी बँकांनी गाठली आहे. आज राष्ट्रीयकृत बँकांसह खासगी बँकांचे आव्हानही उभे असतानाही नागरी बँकानी इंटरनेट बॅकिंगचा अंगिकार करून व अत्याधुनिक सोयीसुविधा देऊन सहकारावरील विश्वास टिकविण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. आता तर नागरी बँका मल्टिस्टेटच्या माध्यमातून अन्य राज्यातही आपले नाव पोहचवू लागल्या आहेत.

शेती उत्पन्न व दूध उपन्न यातून आलेल्या संपन्नतेवर सामान्य माणसांच्या जीवनात झालेला बदल त्यांच्या पुढच्या विकासाचा पााया ठरला आहे. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची गोडी वाढल्याने आता प्राथमिक व माध्यमिक मराठी, इंग्रजीसह, अभियांत्रिकी, वैदयकीय व्यवस्थापन व अन्य शिक्षणाच्या संधी जिल्हयात सर्वत्र निर्माण झाल्या आहेत.[१२]

पगारदार पतसंस्था व नागरी पतसंस्था मिळून १११७ संस्थांनी पत नसलेल्यांची पत निर्माण करण्यास प्राधान्य दिल्याने छोटा कष्टकरी वर्ग विकासाच्या प्रवाहात आला आहे. छोट्या–मोठ्या व्यवसायाची गरज भागवताना प्रसंगी त्या गरजेचे गांभीर्य लक्षात घेऊन मदतीची भावना ठेवली गेल्याने हातगाडीवाले वा तत्सम छोटे व्यवसाय करणारे आपल्या व्यवसायात विविध सुविधा निर्माण करू शकले. यातून त्यांचे उत्पन्न वाढले व पतसंस्थासारख्या छोट्या आर्थिक संस्थांची ताकदही वाढली. बदलत्या काळानूसार पतसंस्थाही इंटरनेट बँकिंगसारख्या सुविधांचा अंगिकार करू लागल्या आहेत. बाराशे कोटींवर पतसंस्थाची उलाढाल पोचली आहे. काही पतसंस्थांनी आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार केला असून महाराष्ट्रासह, गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश यासह अन्य राज्यामध्ये प्रवेश केला आहे. मल्टिस्टेट परवान्याच्या माध्यमातून अन्य राज्यांत ठेवीसंकलन व कर्जविवरणाद्वारे उत्पन्नवाढीचे नवनवे मार्ग शोधले आहेत.[१३]

आता सर्वच ठिकाणी खाजगीकरण होत आहे. त्यामुळे बऱ्याच सहकारी संस्था मोडकळीस आल्याचे जाणवते आहे. सहकारी संस्थामध्ये होणाऱ्या निष्कृष्ट राजकारणामुळे अनेक संस्था कर्जबाजारी झाल्या आहेत. काही राजकारणी लोक तर स्वतःच्या फायदयासाठीच या सहकारी संस्था काढत असतात सहकारी संस्थावर ठाराविक लोकांचीच मक्तेदारी संपुष्टात येत नाही तोपर्यंत सहकारी संस्थांचा विकास होणार नाही. यामधून फक्त राजकीय लोकांचाच फायदा होणार आहे.[१४]

सहकारात उदयोगाला संधी मिळावी म्हणून प्रयत्न करण्यात वैकुंठभाई मेहतांनी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रात भांडवलदार, व्यापारी, उदयोजक कमी होते, त्यांना एकत्रित आणले तर ताकद उभी राहू शकते अशी वैकुंठभाई मेहतांनी कल्पना मांडली. त्यावेळी डॉ. धनजंयराव गाडगीळ हे प्लॅनिंग कमिशनचे व्हाईस चेअरमन होते. त्यांची प्रेरणा सहकारी उदयोगाला मिळाली होती. पंडित नेहरूंनी पायाभूत मालाच्या निर्मितीसाठी देशाच्या कारखानदारीला चालना देणारे अर्थकारण सुरू केले व देशात प्रगतीला सुरूवात झाली. रशियन उदयोगपध्दती वापरून अमेरिकेचे समृध्दीचे ध्येय गाठण्याचा पंडित नेहरू यांनी स्वीकारलेला मार्ग वापरला. खेडेगावात कच्या मालावर प्रक्रिया करून पक्का माल तयार केला तर शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील. या कल्पनेने डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी विठ्ठलराव विखे यांना पाठिंबा दिला. सहकारी क्षेत्राला देशाच्या अर्थव्यवस्थेत एक आगळे वेगळे स्थान प्राप्त झाले होते. शेतकऱ्यांच्या भल्यासाठी ही पध्दती अतिशय निकडीची आहे. आपण सहकार्याने काम करीत राहीलो तर ही पध्दत मोठी फळे देत राहील असे महात्मा गांधींनी म्हटले होते. त्यामुळे सहकार क्षेत्राला वाव मिळाला व त्याची वेगवान प्रगती झालेली दिसते सर्वसामान्य माणसाचा सहभाग असणाऱ्या कृषी ग्राहक वितरण ग्रामीण जीवनाशी संबधित उदयोगाने सहकार चळवळ प्रवेश केला सहकारी चळवळीच्या माध्यमातून देशाने विकासाचे स्वप्न पाहिले होते शेतकऱ्यांना भाव कमी मिळाला तरी सहकारी कारखानदारी वाढली पाहिजे अशी जाणीव निर्माण झाली होती नेमके हेच तत्वज्ञान वैकुंठभाई मेहतांनी मांडले होते आणि ते पुर्ण झाले असे म्हणता येईल.[१५]

सहकारी साखर कारखाने जिल्हा सहकारी बँका ग्रामीण विकास सोसायटया व नागरी सहकारी बँका यांच्या सहकारातील सहभाग प्रधान स्वरूपाचा ठरतो. आज ज्या ठिकाणी शासकीय यंत्रणा लवकर पोहचू शकत नाही अशा ठिकाणी सर्वप्रथम सहकाराच्या माध्यमातून मदतीला

धावून जाण्याचे काम होत आहे. ग्रामीण भागातील रस्ते, शैक्षणिक सुविधा, सामाजिकहित लोकसहभागातून राबविण्यात येणारे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा, महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना, लोकवर्गणीतून पिण्याच्या पाण्याच्या योजना, नैसर्गिक मानवनिर्मित संकटे, दुष्काळ, रोगराई, सिंचन पाटपाण्याच्या सुविधा, दगडी साठवण बंधारे, मातीचे बंधारे कोल्हापूर पध्दतीचे मोठे बंधारे, शेतकऱ्यांच्या बांधावर शेती विकासाचे तंत्रज्ञान, भुकंपासाठी मोठी आपत्ती, गोरगरिब, सभासद, शेतकरी, रूग्णांना आजारपणासाठी वैदयकीय मदत, दुष्काळात जनावरांसाठी चारा छावण्या, कुपोषित भागात सकस आहाराचे वाटप इ. समाजविकासाच्या निकडीच्या बाबींमध्ये सहकारी संस्थांचे खुपच मोठे योगदान आहे. हे सत्य कुणीही नाकरू शकत नाही.

राजकारणामुळे सहकाराला आर्थिक बळ मिळाले. सहकाराला भागभांडवलासाठी शासकीय मदत मिळाली होती. त्यामुळे सहकारी साखर कारखाने अल्प मुदतीत उभारले होते. सहकारी सुतगिरण्या उभारल्या होत्या अशा तऱ्हेने सहकार विस्तारत गेलेले दिसते. सहकाराच्या सुरूवातीच्या या यशाबरोबर सहकारामध्ये राजकारण आणले गेले आणि जो प्रश्न शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीशी निगडीत होता.त्यांचे रूपातंर सहकारातील पक्षीय राजकारणाचा प्रश्नात करण्यात आले.[१६]पुढे राजकारणाने सहकारावर मात केली हल्ला केला सहकाराचे काही का होईना अभय राजकारण झाले पाहिजे असे स्वरूप झाले. १९९१ मध्ये खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरण झाल्यानंतर सहकारी क्षेत्र मागे पडू लागले आणि खासगी क्षेत्र पुढे जाऊ लागले असे दिसते सहकारी बँकामध्ये राजकारण आणले गेले त्याचे विपरीत परिणाम सहकार चळवळीवर व सहकारी संस्था कारखाने बँका यावर झाला. राजकीय नेतृत्वाचा दबाव तंत्रज्ञानाचा अभाव, अकार्यक्षम व्यवस्थापन, आर्थिक बेशिस्त आणि अभाव, नोकर भरती काही प्रमाणात शासन मुख्यतः राजकारण या परिस्थितीला कारणीभूत आहे. सध्याच्या मुक्त अर्थव्यवस्थेतील स्पर्धेला सहकार क्षेत्राला तीव्र तोंड दयावे लागत आहे. सहकार क्षेत्रातील विविध उत्पादन करण्याचा संस्थांना पर्यायी संस्था खाजगी उदयोजक केवळ नफा मिळविण्याच्या इच्छेने घुसखोरी करत आहेत. हे मोठे आव्हान सहकारापुढे आहे.[१७]

सहकार भविष्यात टिकेल की टिकणार नाही सहकाराचा मुळ गाभाच नेते विसरले आहेत. आता सहकारात भ्रष्टाचार घुसला आहे. घोटाळे जास्त वाढले पाच वर्षात काहीही करून घ्या

अशी परिस्थती निर्माण झाले आहे. ते पैसे सभासदांना वाटून घ्या सहकारात स्पर्धा होणे आवश्यक आहे. सहकारी साखर कारखाने टिकवायचे असतील तर त्यांना उत्पादन क्षमता वाढवावी लागेल आधुनिकिकरण करावे लागेल. त्यासाठी स्वभांडवल वाढवावे लागेल गाळप क्षमता २५०० टनांवरून ५००० टनांपर्यंत किंवा ५००० टनांवरून २५००० टनांपर्यंत वाढवायची असेल तर स्वभांडवल उभारणीसाठी शेतकऱ्यांना डॉ. धनंजयराव गाडगीळांनी मांडलेल्या व शासनाने मान्य केलेल्या सुत्रानुसार सहकारी कारखान्याच्या सभासदांना भांडवल खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करू दिले तर सहकारी साखर कारखाने खाजगी कारखान्यांबरोबर स्पर्धा करू शकतील व टिकाव धरू शकतील.[१८]

जिल्हयातील साखर कारखान्यांची अवस्था दयनीय झाली आहे.आर्थिक संकटात असलेले हे कारखाने जिल्हयाच्या अर्थकारणाला साथ देण्याच्या स्थितीत नाहीत अनेक साखर कारखान्यातील कामगारांवर बेरोजगाराची समस्या सुरू झाली आहे. सहकारी तत्वावर चालणाऱ्या या कारखान्यांपैकी काही कारखाने विक्रिस काढण्यात आले आहे.कारखान्यांवर सत्ता आमाप खर्च करून जंग जंग पछाडणारे राजकारणी तोच कारखाना आता दुसऱ्याने चालवावा असा प्रयत्न करू लागले आहेत. कर्ज वेळेत फेडले जात नसल्याने बँकाही अडचणीत येत आहेत. नोकरभरती करताना सगे-सोयरे जवळचा समर्थक हेच क्लालिफिकेशन ठेवले, त्यामुळे दर्जेदार काम संबधिताकडून होत नाही सहकारी बँकाच्या बाबतीत हीच परिस्थिती निर्माण झाली आहे. आशिया खंडात अग्रगण्य असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या विश्वासर्हतेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

सहकारी संस्था स्वतंत्रपणे कार्यरत फक्त विकासाच्या प्राथमिक टप्प्यात होत्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात यशवंतराव चव्हाण यांनी सहकारी संस्था जिल्हा व तालुका पातळीवरील जिल्हा परिषदा पंचायत समित्या यांच्या आधारे उभ्या राहिल्या आहेत. काँग्रेस संघटनेतील स्थान जिल्हा परिषदेमधील पद व सहकारातील नेतृत्व यांची सरमिसळ झालेली आढळते त्यामुळे ग्रामीण भागातील राजकीय व सामाजिक सत्ता या तीनही रचनांमध्ये उच्च स्थानी मुठभर मंडळीच्या हाती एकवटली गेली आहे. स्वतःच्या गावातील जमिनीची मालकी याच शेतकरी कुटुंबाकडे केंद्रीत झाली होती यातून राजकीय घराण्यांची निर्मिती झाली आहे. ठिकठिकाणी तालुक्यांच्या जिल्हयांच्या व गावच्या पातळीवर या घराण्यांचे वर्चस्व निर्माण झालेले दिसते.

यातील बहुसंख्य घराणी जातीने मराठा आहेत. या घराण्यांची सहकारी संस्थावर वर्चस्व होते.

सहकारातील कार्यपध्दती सक्रीय राजकारणापासून दूर ठेवली पाहिजे. त्यासाठी सहकारातील संघटन प्रक्रिया निकोप असली पाहिजे व काही आवश्यक धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाहीत आणले पाहिजेत. त्यासाठी खालील काही उपाय करण्याची नितांत गरज आहे.

१. सहकारी क्षेत्रातील निकोपपणा टिकावा वाढीस लागावा यासाठी सततचे समाज प्रबोधन केले पाहिजे व त्याला सामुदायिक नेतृत्वांचे स्वरूप विनाविलंब दयावे.

२. या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या नेत्यांमध्ये आपआपसात सहकार्याची भावना असलीच पाहिजे आपआपसातील सत्ता स्पर्धेसाठी सहकार शक्तीचा शक्तीपात कुणी करू नये होत असेल तर तरूणांनी व संबधितांनी रोखणे आवश्यक आहे.

३. सभासदांनी कार्यकर्त्यांनी व सरकारने सहकारी संस्था राजकारणापासून मुक्त ठेवाव्यात ज्यांना राजकारण करावयाचे त्यांनी सहकारापासून दूर रहावे असा अलिखित नियम पुढाऱ्यांनी अनुकरणाने सिध्द करावा

४. उच्च नैतिक व वैचारिक पातळी असणारे समाजहिताशी बांधिलकी असणारे नेतृत्व या संस्थांच्या केंद्रस्थानी यावे यासाठी सभासदांनी व समाजाने सतर्क रहावे.

५. आजच्या नेतृत्वानं भविष्याचा विचार करून ध्येयाबरोबरच कौशल्य असणारे व उच्च नैतिक मुल्यांचा आदर करणाऱ्या कार्यकर्त्याचे संच सातत्याने सांभाळले पाहिजेत.

६. सहकारी चळवळ ही सामन्यांच्या सर्वागींण विकासाचे माध्यम आहे. हे लक्षात घेऊन फक्त आर्थिक अपेक्षा न ठेवता लोकशाही व निकोप पारदर्शी व्यवस्थापनाची अपेक्षा व आग्रह सभासदांनी तसेच समाजाने ठेवला पाहिजे यासाठी त्यागाचीही तयारी हवी आहे.

७. यातील कार्यकर्ते व प्रमुख नेतृत्वाने सहकारी संस्था आपल्यासाठी राबविण्याच्या उद्देशाने सहकारी संस्था चळवळ व संघटन यात पक्षाच्या स्वार्थासाठी दुरूपयोग करण्याचा दोष निर्माण होत आहे. अशी हेकाटी पेटवून ती चळवळ मोडित काढण्याचा दृष्ट हेतूने अप्रत्यक्ष प्रयत्न करीत आहेत अशीच ते प्रयत्न सर्व शक्तीनिशी मोडून काढले पाहिजेत. अगदी वेळ आलीच तर त्यासाठी स्वकीयांशी आणि राजकीय नेतृत्वशाही संघर्ष करण्यास सज्ज रहावे लागेल.[१९]

### ३.२.३. अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा उदय :–

**घराणे :–**

घराणेशाही हा माणसाचा आदिम काळापासून गुणधर्म आहे. तो प्रत्येक माणसात कोणत्या ना कोणत्या रूपाने असतोच माणसाच्या जगण्यात जगण्याच्या हक्काचे अधिकाराचे मालकीचे मुद्दे जिथे जिथे येतात तिथे तिथे घराणेशाहीचा प्रादुर्भाव होतोच. घराणेशाहीपासून जगातला कोणताही इसम परका नसतो. जगण्याच्या प्रत्येक उद्योगात आणि व्यवसायात घराणेशाही असतेच. घराणेशाहीचा अगदी प्राथमिक अर्थ आहे तो माझी सत्ता, माझी मालकी, माझे वर्चस्व आणि जगण्यात जे मिळेल ते एक तर सर्वच्या सर्व मलाच मिळायला हवे आणि नाइलाजाच्या वेळी मला इतरांपेक्षा जास्त मिळायला हवे हा आहे

कुटूंबव्यवस्था ही समाजातल्या एक प्रकारच्या घराणेशाहीची वाहक झाली. एका वांशिक कुटूंबाला घराणे म्हणायची पद्धत सुरू झाली ती आजतागायत आहे. माणसाच्या समाजात एकमेकांशी एकमेकांवर मालकी मिळवण्याची दुसऱ्यांना आपल्यासाठी वापरून घेण्याची म्हणजेच घराणेशाहीची स्पर्धा चालू असते ही स्पर्धा जगातल्या प्रत्येक माणसाला जीवनभर खेळावी लागते ती खेळण्यासाठी त्यांच्या मेंदुत चातुर्य लागते. तो माणूस ज्याला जमेल तो असामान्य माणूस जो अधिकाधिक लोकांच्या मेंदूवर ताबा बसवू शकला तो त्यांच्या हृदयातील महान माणूस ज्यांच्या ताब्यात जितकी माणस तितका तो महान आणि समजा तो माणूस शरीराने मेला पण मरणानंतरही त्याचा प्रभाव कोणत्या ना कोणत्या रूपाने टिकून राहिला तर तो जास्तच महान हा घराणेशाहीचाच एक प्रकार आहे. आपल्या कुटुंबातही कुणी तरी एक व्यक्ती प्रमुख असते. हे प्रमुखपणे कुटुंबातल्या कुटुंबातसुद्धा तिच्याकडे सहजपणे येत नाही. त्यासाठी त्या व्यक्तीला कुटुंबातल्या निकषांच्या अनेक परीक्षा द्याव्या लागतात. हे त्या व्यक्तीचं घराणे आणि घराणेशाही हीच गोष्ट मोठ्या मानवी समूहाच्या बाबतीत कुटुंबाच्या बाहेर चालू असते तिला म्हणायंच सामाजिक घराणेशाही. पृथ्वीच्या ज्या भागावर व्यक्तिगत माणसाची मालकी नसेल तिथ आता देशाची मालकी आहे. हा सामूहिक घराणेशाहीचा प्रकार अनाथ असतो. प्रत्येक माणूस आणि अनाथ असलेला प्रत्येक माणूस जगण्याची धडपड करतोच तो मग कोणत्याही प्रकाराची कोणत्याही क्षेत्रातली मानसिक बौद्धिक, शारीरिक, सामुदायिक धडपड करो. त्या धडपडीचा वारसा त्याला मानवी समाजाकडूनच मिळालेला असतो. त्या वारशावरच तो जगणे पार करत राहतो. मागच्या पिढ्यांकडून मिळालेले

जगणे पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवत राहतो. वारसाशिवाय माणूस नाही माणसाच जगणे नाही याचाच अर्थ घराणेशाहीशिवाय माणसाच जगणे नाही.[२०]

इतिहासातल्या कोणत्याही क्षेत्रातल्या कोणत्याही महापुरूषाचा वर्तमानातला गौरव किंवा अभिमान हा पोटार्थीच असतो, हे लक्षात ठेवलं पाहिजे आणि हा पोटार्थीपणा हा घराणेशाहीचाच अविष्कार असतो. हेही माणसं आता समूहानं राहत असली तरी शरीर, मन आणि मेंदूनी एकटीच असतात. एकमेकापासून दुरच असतात. अलगअलग असतात. ज्यात दुसरा कोणताही माणूस कोणत्याही प्रकारे ज्या वेदनामध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊ शकत नाही आणि त्या वेदना स्वत:वर ओढून घेऊ शकत नाही. त्या अर्थान तो एकटाच असतो पण हेच एकटेपण त्याला घराणेशाहीला प्रवृत्त करत.

माणसाने माणसांच्या समूहात राहणे म्हणजेच एक प्रकारे घराणेशाहीच आहे. स्वत:च्या अनाथपणाला माणूस घाबरतो. तो निसर्गत: एकटा, अनाथ असला तरी हे एकटेपण, अनाथपण त्याला असह्य असत त्याला जगण्यासाठी, जगणे निभावण्यासाठी इतरांचा आधार लागतो. माणूस आमिबासारख्या एका अंशातून जन्माला आला, विकसित होत त्याची प्रजाती जगभर फैलावतो. एक प्रकारे माणसाच्या जातीची पृथ्वीवरची घराणेशाही असली तरी आणि माणूस जात ही वंशाची आणि एकमेकांसाठीच आहे. जगणे आणि मृत्यू हा प्रवास त्याच्या वेदना-संवेदनासह त्याला एकट्यालाच करावा लागतो. तो माणसांत असतो तरी एकटाच असतो, ही जाणीव त्याला आतल्या आत पोखरत असते. हीच जाणीव त्याला घराणेशाहीच्या प्रक्रियेत सामील व्हायला भाग पाडते. तो मनाच्या अनाथपणाच्या भीतीला आधार म्हणून समाजात समाजाच्या उपक्रमामध्ये सहभागी होतो. त्या उपक्रमांचा वारसा चालवत राहतो. त्याच्यातला अनाथपणाची भावना ज्याला सामाजिक प्रथा पाळायला भाग पाडते. कित्येकदा तो नको असतानाही त्या प्रथांचा अंमल करत राहतो. कित्येकदा तर त्याला या प्रथा आपल्याला हव्यात की नकोत हेही कळत नाही, तरीही डोके न चालवता, प्रथा तो पाळत राहतो. याला माणसाचा वारसा चालवणे म्हणता येईल आणि माणूस एका आयुष्यात अशा अनेक मुद्यांचा, गोष्टींचा, प्रकारांचा वारसा चालवत राहतो. माणसाच्या जातीने वारसा चालवणे म्हणजे घराणेशाही.

माणसाच्या अंगात असे अनेक वारसे असतात. मानवी जगण्यातल्या अनेक प्रथा-पद्धती असतात. माणसाचे शरीरही माणसाला वारशात मिळालेले असत. शरीरानेही तो अनेक वारसे

जोपासतो, मनाने–मेंदुनेही अनेक वारसे जोपसतो. याशिवाय मानवी समूहात जगण्या–वागण्याच्या अनेक प्रथा–पद्धती असतात. त्यांचे सामुदायिक वारसेही तो जोपासतो. पिढ्यांच्या प्रवासात सामुदायिकपणे वारशात काही बदल झाला तर तोही स्वीकारतो. उदाहरणार्थ माणसाने अन्न खावे हाही एक वारसाच आहे. एकूण  माणसाच्या जगण्यातली प्रत्येक कृती. जगण्यातलं प्रत्येक क्षेत्र हे वारशातले असते. माणसाने लावलेले शोध, संशोधन आणि विकासही मागच्या वारशातूनच जन्माला येतात. त्यांचा नवीन वारसा निर्माण होत जातो. हा वारसा म्हणजेही घराणेशाही आणि घराणेशाहीपासून जगातला कोणताही माणूस परका नसतो. माणसाचे जग म्हणजेच घराणेशाहीचा अखंड चालणारा प्रवास होय. थोडक्यात अहमदनगर जिल्ह्यात घराणेशाहीसाठी पोषक वातावरण तयार झालेले आहे. जिल्ह्यातील सहकारी संस्था कुटुंबातील मुळ पुरुषाने स्थापन केल्या. या संस्थांचा विस्तार व कार्य पुढे वारसदाराने नेले. वरील मुद्यांचा अभ्यास संशोधकाने केला आहे. घराणे म्हणजे एकाच घरात कालंतराने राजकीय सत्ता उपभोगात आणणे होय. बेबर ने म्हटल्याप्रमाणे, पारंपारिकरित्या अथवा साखर उदयोगाच्या मार्फत साध्य साधनाच्या एकत्रितकरणातून करिश्माचा वापर करून ही सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. ही कायदयाद्वारे व्यक्तीला वैधानिक सत्ता प्राप्त होते तर साखर उदयोगांमार्फत राजकारण घडून अर्थकारण करताना या सत्तेचा वापर केला जातो. या घराणेशाहीला लोकशाहीत जनमान्य घराणेशाही असे म्हणतात. साखर उदयोगाने निर्माण केलेल्या आर्थिक स्त्रोतावर विशिष्ट गटाचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याचे दिसते. या आर्थिक स्त्रोताद्वारे एकाच गटाचे वर्चस्व असण्याने घराण्यांचा उदय झालेला दिसते. महाराष्ट्रात मराठा ही वर्चस्व गाजवणारी जात असून एकूण ‘महाराष्ट्राच्या लोकसंख्येत त्यांचे प्रमाण ४० टक्के आहे. पश्चिम महाराष्ट्रात त्यांचा प्रभाव आढळतो.[२१]

## ३.२.४.अहमदनगर जिल्हयातील राजकीय नेतृत्वाचे योगदान व राजकीय घराणी :–

### अ) अहमदनगर जिल्हयातील राजकीय नेतृत्वाचे योगदान :–

सहकारी संस्था विशेषतः सहकारी साखर कारखाने लोकशाही तत्वावर निवडलेल्या संचालक मंडळाकडून चालवले जातात. ते संचालक ठराविक काळासाठी भागधारक निवडतात तथापि असे निवडले गेलेले संचालक एकमेकांशी रक्ताच्या नात्यांनी संबधित असतात. संस्थेला

कारभारात सहभाग घेणाऱ्या व संस्थेच्या उपविधीमध्ये नमूद केलेल्या विशिष्ट मर्यादेपर्यतच्या सेवांचा उपभोग घेणाऱ्या सभासदालाच क्रियाशील सदस्य असे समजले जाते. संस्थाचे काही सदस्य संस्थेवर आपले वर्चस्व रहावे संस्थेचा सत्ता म्हणून उपयोग करता यावा म्हणूनच सदस्य झालेले असतात तसेच संस्थेतील पुढारपण करणारे सदस्य निवडणुकीचा विचार करून नातलगांना जवळच्या व्यक्तीला सभासद करून घेतात. सहकार चळवळीला भ्रष्टाचाराची लागण झाली आहे. त्यात घराणेशाहीचा उदय झाला आहे. त्याचा परिणाम म्हणून आजच्या स्थितीला सहकार म्हणजे स्वाहाकार अशी परिस्थिती उद्भवली आहे. या पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हयातील राजकीय घराणी अभ्यासण्यासाठी संशोधिकेने पुढील राजकीय पुढाऱ्यांची निवड केली आहे.

**अहमदनगर जिल्हयातील अभ्यासासाठी निवड केलेली राजकीय घराणी पुढीलप्रमाणे आहेत.**

**१. दादा पाटील राजळे – पाथर्डी :–**

कासार पिंपळगाव हे पूर्वीच्या काळी तेल्याची कासार वस्ती म्हणूनही प्रसिध्द होते. १९४० च्या दरम्यान गावात उत्खनन करतेवेळी दादापाटील राजळेचे वडील शंकरराव पाटलांना तेलाच्या घाण्याचे साहित्यभांडी सापडली, तर काही ठिकाणी बांगडयांच्या काचाभरलेले रांजणजुनी नाणी सापडली हे सर्व त्यांनी गावालाच दिले. गावात कासार लोक जास्त असल्याने कासार पिंपळगाव हे नाव रूढ झाले. सातशे लोकवस्ती व दीडशे घरांचे गाव आहे. गावाच्या जवळच वाहणाऱ्या 'वृध्दा' नदीचा उगम श्री वृध्देश्वर कानिफनाथांची मढी. या पुण्यभूमीतून होऊन ती शिरापूर–घाटशिर–तीसगाव–कासार–पिंपळगावच्या पश्चिम दिशेने वाहत जाऊन पुढे 'ढोरा' या उपनदीला मिळते.[२२]

गावची परिस्थिती सर्वसामान्य होती गावचे शिवार हा एकूण जिरायतच असला तरी थोडेफार विहिर बागायतीही होते. अशा या गावात साडे चारशे ते पाचशे वर्षापूर्वीपासून 'राजळे पाटील' घराणे येथे सामाजिक कार्य करत आहे. राजळे यांच्याकडे कासार पिंपळगावची पाटीलकी होती दादापाटील राजळेच्या आजोबांचे नावच पाटीलबा होते. दादापाटील राजळे यांच्या प्रयत्नांतून या भागांत पाटपाणी, पाझर तलाव, मृदासंधारण प्रकल्प व श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना उभा राहिला. परिणामी शेतकऱ्यांनी जिरायती पिकाबरोबर बागायती पिक विशेषतः उसाचे पीक

मोठया प्रमाणावर घेण्यास सुरूवात केल्यामुळे या भागाचा कायापालट झालेला दिसतो. गावामध्ये प्राथमिक़ माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ कला आणि विज्ञान महाविदयालय सुरू केले. गरिब व होतकरू विदयार्थ्यासाठी आदिनाथ वसतिगृह काढले, सहकारी सोसायटी, ग्रामपंचायतदुध संस्था, भजनीमंडऴ, वाचनालय या संस्था निर्माण केल्या पाणी पुरवठा, वीज़, दळणवळणासाठी रस्ते अशा सोयी सुविधा दादापाटील राजळेनी पुढाकाराने केल्या आहेत.[२३]

शेतकरी कर्जातच जन्मतो कर्जातच मरतो. अशी शेतकऱ्यांची परिस्थिती होती त्यातूनच शेतकऱ्यांची सुटका व्हावी व शेतकऱ्यांच्या यातना शेतकऱ्यांनांच कळतात या जाणिवेने दादापाटील राजळेंनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी वडील शंकरराव राजळे व सहकारी पर्वतराव राजळे, साहेबराव राजळे, गजाबापू नेव्हल, विठ्ठलराव म्हस्के, बापू बाबर यांच्या सहकार्यानेच २८ एप्रिल १९४६ रोजी कासार–पिंपळगाव सोसायटी सुरू केली. नांगऱशेतीची औजारे त्यासाठी कर्जपुरवठा. लग्नसमारंभ व शेतकत्यांना इलेक्ट्रिकमोटाऱ, पी. व्ही. सी. पाईप पुरवठा, मशिनरी विभाग शेतीसाठी लागणारे सर्व प्रकाराचे पीक कर्ज वाटप ट्रॅक्टरसाठी कर्जपुरवठा व गावातील सर्व नागरिकांना स्वस्त धान्य दुकानामार्फत जीवनयोगी वस्तूंचा पुरवठा अशी विविध उपक्रमाने लोकांचा सर्वांगीण विकास होऊन गाव स्वावलंबी व्हावे, शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या तळमळीने दादापाटील राजळेनी स्थापन केलेल्या सोसायटीची वाटचाल दिसून येते.

१९५२ साली झालेल्या पहिल्या विधानसभेच्या निवडणूकीत श्री बाबूजी आव्हाडांना निवडून आणण्यासाठी राजळेंनी खुप प्रयत्न केले. या काळात राजळेनी गावात शेतकरी वाचनालय सुरू केले. गावाच्या सर्वांगीण विकासाठी १३ मार्च १९५६ रोजी कासार–पिंपळगाव ग्रामपंचायतीची स्थापना केली. १९५६ ते १९८४ अशी एकूण ३२ वर्षे दादापाटील राजळे सरपंच पदाची यशस्वी कारकीर्द पुर्ण केली. या काळात गावातील मुला–मुलींच्या शिक्षणासाठी प्राथमिक शाळा सुरू केली. लोकवर्गणीच्या माध्यमातून शाळेसाठी आठ खोल्या बांधून दिल्या गावाच्या विकासासाठी गावाजवळच गावतळे, पाझर तलाव केले, दाट ओढयाचा नाला दुरूस्त केला. १९६२ ते ७० या कालखंडात दुष्काळी परिस्थितीत लोकांना काम उपलब्ध करून दिले त्यात मुख्यतः कासार–पिंपळगावापासून तीसगाव, निवडुंगे, पाथर्डी, जवखेडे या गावांना जोडणारे सर्व रस्ते श्रमदानातून करून घेतले.

दादा पाटील राजळे हे वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९३१ साली शाळेत जाऊ लागले त्यावेळी पहिल्यांदा पहिली ते चवथी इयत्तेपर्यंत मराठी शाळा कासार पिंपळगाव येथे सुरू झाली. वडिलांची खुप इच्छा होती की मुलाने शिकावे परंतु दादा पाटील राजळे यांनी शाळा अर्ध्यावर सोडली. हे त्यांना आवडले नाही म्हणून त्यांनी दादा पाटील राजळे यांना गुरे सांभाळणे, मोटा हाकणे अशी कष्टाची शेतीकामे करण्यास सांगितली उद्देश हाच होता की काबाडकष्टाची कामे करण्यापेक्षा त्यांनी पुन्हा शाळेत जावे. परंतु दादा पाटील राजळे मात्र पुन्हा शाळेत जाऊ शकले नाहीत. शाळेतील चार भिंतीच्या आतील शिक्षणापेक्षा बिनभिंतीच्या शाळेचे अनुभवाचे पुष्कळ शिक्षण त्यांनी घेतले. यात तिळमात्र शंका नाही, शाळा बंद झाली तरी त्यांनी आपले मन डोळे, कान ही ज्ञानेंद्रिये सतत उघडी ठेवली.[२४]

पाथर्डी तालुक्यातील मजूर मोठया प्रमाणात इतर साखर कारखान्यांवर ऊस तोडणी व वाहतुकीसाठी जात असत. त्यांच्याही मनात आपल्या भागात साखर कारखाना सुरू झाल्यामुळे कुतूहूल निर्माण झाले महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना ऊस तोडणी कामगार पुरवणारा पाथर्डी तालुका आपल्याच भागात ऊसाचे उत्पादन करून साखर निर्माण करू शकतो हे भाऊंनी आपल्या अथक परिश्रमाने उभ्या महाराष्ट्राला दाखवून दिले. १३ मार्च १९५६ रोजी कासार पिंपळगाव ग्रामपंचायतीचे पहिले सरपंच झाल्यानंतर दादा पाटील राजळे पहिल्यांदा सातवी वर्गापर्यंत प्राथमिक शाळा सुरू केली. लोकवर्गणी व श्रमदानातून प्रथम शाळेसाठी चार खोल्या व १९६२ साली परत चार अशा एकूण आठ खोल्या बांधून दिल्या. यामागे उद्देश एकच होता की गावातील लहान मुलामुलींना चांगल्या शिक्षणाची संधी मिळून प्राथमिक शाळेतून गुणवान हुशार सुसंस्कृत मुले घडावीत त्यासाठी आदर्श शिक्षक हरि नारायण कन्हेरकर व बा. मा. पाटील यांना मुद्दाम गावी आणले. त्यांनीही उत्कृष्ट निकालाची परंपरा निर्माण केली ती आजही टिकून आहे.

९ जून १९५९ रोजी अहमदनगर जिल्हा मराठा विदया प्रसारक संस्थेचे तीसगाव येथे श्री वृध्देश्वर माध्यमिक विदयालय स्थापन करण्यात आठरे पाटील रावसाहेब म्हस्के यांच्या सोबत दादा पाटील राजळे यांनी प्रयत्न केले. गावागावांत जाऊन शाळेच्या मदतीसाठी धान्य रोख रक्कम जमा करण्यात पुढाकार घेतला दादा पाटील राजळे हे आजही अहमदनगर जिल्हा मराठा विदया प्रसारक संस्थेचे विश्वस्त सदस्य आहेत. १९६४६५ साली दादा पाटील राजळे पंचायत समितीत उपसभापती असताना काही अनुदान खर्च न झाल्यामुळे परत जात होते. म्हणून दादा पाटील

राजळे यांनी पुढाकार घेऊन पाथर्डी तालुक्याच्या सर्वांगींण विकासासाठी उच्च शिक्षणाची संधी बहुजन समाजातील मुलामुलींना उपलब्ध व्हावी या हेतूने रावसाहेब म्हस्के, किसनराव कुटे, लक्ष्मणराव पालवे, रामभाऊ अकोलकर यांच्याशी चर्चा विचारविनिमय करून महत्वाचा निर्णय घेतला व त्यासाठी एक लाख रूपयांच्या देणगीतून 'पार्थ विदया प्रसारक' मंडळाची स्थापना करून जनता महाविदयालय सुरू केले. तालुक्याच्या ठिकाणी या महाविदयालयातून कला आणि वाणिज्य अशा दोन शाखा कार्यरत आहेत.

अहमदनगर जिल्हा मराठा विदया प्रसारक संस्थेने सामान्य जनतेत शिक्षण प्रसाराचे कार्य सुरू केले. या संस्थेचे १९६९ साली रावसाहेब म्हस्के सेक्रेटरी असताना कासार पिंपळगाव, चितळी, पाडळी, हवाऴ, निवडुंगे, जवखेड़े हनुमान टाकळी अशा परिसरातील गावच्या मुलामुलींना माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून 'छत्रपती विदया विकास मंडळाची स्थापना करून या मंडळामार्फत माध्यमिक विदयालयासाठी सतरा खोल्या बांधून दिल्या गावकऱ्यांच्या सहकार्याने सामूहिकपणे दहा हाजार रूपयांची मदतही केली.[२५]

दादा पाटील राजळे यांनी १९७६ साली 'शिवाजी विदया विकास मंडळा' मार्फत केवळ पाथर्डी तालुक्यातीलच नव्हे तर अहमदनगर जिल्हाच्या विविध भागांतील अनुसूचित जाती जमाती व मागासवर्गीयांच्या विकासासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुलांसाठी कासार पिंपळगाव येथे 'आदिनाथ वसतिगृह'सुरू केले. या वसतिगृहाच्या माध्यमातून मुलांना मोफत निवास, भोजऩ, कपडे आणि वहया पुस्तकांची सोय केली जाते. १ जुलै १९९१ पासून दादा पाटील राजळे यांनी 'दादा पाटील राजळे कला.विज्ञान व वाणिज्य महाविदयालय आदिनाथनगर' सुरू केले. दादा पाटील म्हणायचे शिक्षणामुळे माणूस हा केवळ सुशिक्षित नव्हे, तर सुसंस्कृत आणि विचारी बनला पाहिजे!

१९९२ साली 'आदिनाथ कृषि विकास प्रतिष्ठान'या संस्थेमार्फत कारखाना कार्यस्थळावर 'न्यू इंग्लिश स्कूल' सुरू करण्यासाठी व परिसरातील मुला मुलींची कासार पिंपळगाव येथील विदयालयाप्रमाणेच सोय व्हावी म्हणून दादा पाटलांनी स्थापना केली. पाथर्डीसारख्या दुर्गम आणि दुष्काळी भागात दादा पाटलांनी मोठया जिद्दीने व आत्मविश्वासाने सहकारी चळवळीला चालना देऊन ग्रामीण अर्थकारणाबरोबरच सांस्कृतिक़ सामाजिक़ शैक्षणिक कार्याचाही पाया भक्कम केला व संख्यात्मक विकासाबरोबर गुणात्मक विकासालाही महत्व दिले. २२ जुलै २००२ रोजी 'श्रीकृष्ण

बालक्रीडा व संस्कार केंद्र कासार पिंपळगाव येथे स्थापना केले. या केंद्रात ७० विद्यार्थी कार्यरत झाले.

**२. शंकरराव काळे – कोपरगाव :–**

शंकरराव काळे यांचा जन्म दिंनाक ६ एप्रिल १९२१ रोजी माहेगांव देशमुख येथे झाला. छोटयाशा खेडेगावी जन्म होऊनही त्यांनी राष्ट्रीय पातळीपर्यत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला. महाविद्यालयीन शिक्षणानंतर २ वर्षे राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये त्यांनी सब डिव्हिजनल इंजिनिअर म्हणून नोकरी केली. सामाजिक कार्याची आवड असल्याने नोकरीचा राजीनामा देऊन सामाजिक कार्यास सुरूवात केली. सन १९५३ मध्ये कोपरगाव तालुक्यात माहेगाव देशमुख विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना केली. शंकरराव काळे यांनी स्वामी सहजानंद भारती यांच्या प्रेरणेने काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काळेंचे जीवन दोन टप्यात विभागलेले दिसते. पहिल्या टप्यात खडतर बालपण शिक्षण ते कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची उभारणी. यामध्ये त्यांच्यातील कार्यकर्ता व कुशल संघटक घडला. विकासाच्या नव्या कल्पना त्यांनी या काळात साकारल्या तर दुसऱ्या टप्यात त्यांच्यातल्या संघटकाची जागा कुशल नेतृत्वाने घेतली. या कल्पनांना व्यवहाराची जोड मिळत गेल्याने ते जिल्हयाचे नेते बनले. शंकरराव काळेंच्या जीवन प्रवासात सहकार क्षेत्रात धनंजय गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, पद्मश्री विखे पाटील यांनी पायाभरणी केली. शिक्षण क्षेत्रात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी तर राजकीय क्षेत्रात स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांनी भक्कम पायभरणी केली. महाराष्ट्र राज्यात प्रथम पंचायत राज निर्मितीनंतर सन १९६२ मध्ये अहमदनगर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष होण्याचा बहुमान कर्मवीर काळे यांना मिळाला. सन १९६२ ते १९७२ सलग दहा वर्षे अध्यक्षपदाचे माध्यमातून प्रभावी काम करून जिल्हा परिषदेला उल्लेखनीय कार्याबद्दल शासनाकडून प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवून दिला. सन १९७२ ते १९८० पर्यंत अहमदनगर जिल्हा कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून संघटनात्मक कार्य केले.[२६]

कर्मवीर काळे सिव्हिल इंजिनिअरिंग मधील पदवीधर असल्याने धनजंयराव गाडगीळ व पद्मश्री विखे पाटील यांनी त्यांना प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत प्रवर्तकीय संचालक मंडळात घेतले. कर्मवीर काळे यांनी सन १९५३ मध्ये कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि. या आशिया खंडातील सहकारी तत्वावरील दुसऱ्या सहकारी साखर

कारखान्याच्या स्थापनेत पुढाकार घेतला. कोपरगाव साखर कारखाना उदयोग समूहाच्या स्थापनेपासूनच विकास व संवर्धनासाठी त्यांनी आयुष्यभर अपरिमित कष्ट घेतले केवळ साखर उत्पादनावर विसंबून न राहता पेपर उदयोग़ अल्कोहोल उत्पादऩ बायोगॅस उर्पपदार्थ निर्मिती इ. प्रकल्प सुरू केले. कोपरगाव सहकारी कारख्यान्याचे माध्यामातून कोपरगाव तसेच नाशिक जिल्हयातील येवला, निफाड़ सिन्नर व नांदगाव तालुक्यात ऊस पीक लागवड व सर्वागीण विकासाठी भरीव प्रयत्न केले. कर्मवीर काळे यांच्यामुळे साखर कामगार युनियऩ ऊस तोडणी मजूर व वाहतूक संघटना आणि कारखाना व्यवस्थापन यांचे कायमचे सलोख्याचे संबध राहिले.२७

पारनेर विधानसभा मतदार संघातून सन १९७२ व १९७८ असे दोन वेळा ते महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले. पारनेर सारख्या सतत दुष्काळी भागासाठी विकासाची कामे केली पाझर तलाव, ग्रामीण रस्ते, दवाखाने, हायस्कूल, सहकारी संस्थाची स्थापना करून ग्रामीण भागाला संजीवनी प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र राज्याचे मंत्रिमंडळात सन १९७८ साली शिक्षण व सहकार खात्याचे राज्यमंत्री असताना खाजगी व विना अनुदानित प्राथमिक शाळांना अनुदानित करून तंत्रशिक्षण व महिला–मुलींच्या शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिले. राजकीय क्षेत्रात कार्य करण्याची मिळालेली संधी हे समाजसेवेचे व्रत आहे असे मानून ते कार्यरत आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्याचे वारसदार कर्मवीर शंकरराव काळेच होते सन १९७५–१९९० या १५ वर्षाच्या चेअरमनपदाच्या काळात रयत शिक्षण संस्थेचा राज्यव्यापी विस्तार करण्याचे मोठे काम कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नंतर कर्मवीर काळे पाटील यांनी केले. त्यांचा शैक्षणिक कार्याचा वारसा मोठया जिद्दीने पुढे नेला. वडील कै. ह. भ. प. देवराम बाबा आई कै. राधाबाई काळे व पत्नी कै. सुशिलाबाई काळे यांच्या प्रेरणेमुळे त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मुलींच्या शिक्षणाला विशेष प्राधान्य देत १५ स्वतंत्र कन्या विदयालयाचे तसेच ५ महिला महाविदयालये स्थापन करून स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. तर आईची स्मृती चिरंतर रहावी म्हणून कारखाना कार्यस्थळावर रयत शिक्षण संस्थेचे 'राधाबाई काळे कन्या विदयालय' हे तिचे स्मारक उभे केले. त्याचबरोबर रयत शिक्षण संस्थेचे अहमदनगर सारख्या जिल्हयाच्या ठिकाणी मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणुन स्वतंत्ररित्या महिला महाविदयालय सुरू केले.

सन १९६२ पासून रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तसेच सन १९७५ ते १९९० चेअरमन व मे २०११ पर्यत संस्थेचे उपाध्यक्ष भूषविले काळे पाटीलांनी खऱ्या अर्थाने कर्मवीर आण्णांचा 'कमवा व शिका' हा व्यापक दृष्टीकोन समाजापुढे मांडला होता. शंकरराव काळे यांनी दूरदृष्टी ठेवून कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना पूरक तसेच व्यावसायिक, सुशिक्षित, बेरोजगार, कारागीर व गरजूनां कर्जपुरवठा करण्यासाठी गौतम सहकारी बँक लि. गौतमनगर या बँकेची सन १९७६ मध्ये स्थापना केली. सन १९८० ते ९० तसेच २00३ ते २०११ अखरे गौतम सहकारी बँकेचे चेअरमनपदाचे माध्यमातून बँकिंग क्षेत्रात प्रतिकूल परिस्थितीतही उल्लेखनीय काम केले. कोपरगाव येथे महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल टॅस्ट या संस्थेचे ४२ वर्षे अध्यक्ष पदाचे माध्यमातून श्री. साईबाबा तपोभूमी व्यवस्थापन समिती व श्री साईबाबा मंदिराची उभारणी करून धार्मिक कार्यात कर्मवीर काळे यांनी वयाचा विचार न करता हिरीरीने सहभाग घेतला.[२८]

शंकरराव काळे यांनी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळावर तीन वर्षे संचालक पद भुषविले. त्याचप्रमाणे वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, पुणे या संस्थेचे ते २२ वर्षे गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य होते. कर्मवीर शंकरराव काळे यांनी ३५ वर्षे महाराष्ट राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे संचालक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन या संस्थेचे २ वर्षे प्रेसिडेंट पद भुषविले तसेच महाराष्ट्र डिस्टिलर्स असोसिएशनचे १० वर्षे संचालक सन १९९१ ते ९६ झोनल रेल्वे युजर्स सल्लागार समिती व राज्य ग्राहक संरक्षण समितीचे सदस्य अशा विविध समित्यांवर काम करून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला. काळे पाटील १० व्या लोकसभेसाठी कोपरगाव लोकसभा मतदारसंघातून १९९१ मध्ये विक्रमी मतांनी विजयी झाले. त्यांनी या मतदारसंघाचे सन १९९१ ते १९९६ अखेर प्रतिनिधित्व केले होते. कोपरगाव लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी या नात्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्नाला प्रथम प्राधान्य दिले. बेरोजगारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले. पाझर तलाव, साठवण तलावासाठी आर्थिक मदत, पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधितून गरजुंना ऑपरेशन व उपचारासाठी रूग्णांना लक्षावधी रूपयांचे अर्थसहाय्य मिळवून दिलेपाटबंधारे प्रकल्पशेतकत्यांचे शेतीविषयक प्रश्न मार्गी लावण्याचा व अडचणी सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले केंद्र शासनाच्या असलेल्या

विविध योजना कोपरगाव लोकसभा मतदारसंघात राबविल्या. केवल कोळपेवाडी, कोपरगाव हा विकासाच्या केंद्रबिदू न ठेवता सर्वाना लाभ देण्याचा प्रयत्न केला.[२९]

कार्मवीर काळे यांचा जलसंधारण व जलसिंचन विषयांचा अभ्यास होता. म्हणून दिंनाक २६ मे १९८६ रोजी महाराष्ट्र शासनाने त्यांचे अध्यक्षतेखाली निळवंडे धरणाच्या भूसंपादन व विस्थापितांचे पुर्नवसन याचा विचार करण्यासाठी 'काळे समिती' नेमण्यात आली. १९८५ ते १९९५ या कालावधीत गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेती पाण्याअभावी संपुष्टात येत असताना महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अभ्यासपूर्ण लेखन करून 'अंतरलेले पाणी' या शीर्षकाचे पुस्तक लिहिले. दारणा व गंगापूर धरणातील गोदावरी कालव्यांचे हक्काचे ११ टी. एम. सी पाणी नांदूर मधमेश्वर पिकअप वेअर मधून मोजून दयावे. यासाठी महाराष्ट्र शासनाकडे आग्रह धरला कै. चंद्रकांत लोणकर यांचे समवेत दिंनाक १७ एप्रिल १९८९ रोजी कोपरगाव ते मुंबई पायी पाणी दिंडीचे आयोजन केले. तसेच १६ ऑक्टोबर १९८९ रोजी हिवाळी अधिवेशनाच्या वेळी नागपूरला उपोषण केले. १५ मे १९९२ रोजी कोपरगाव येथे दुष्काळी पाणी परिषद घेतली.

धरणातील पाणी वापराचा प्राधान्यक्रम प्रथम पिण्यासाठी द्वितीय शेतीसाठी व नंतर औदयोगिक वापरासाठी असावा. तसेच वॉटर ऑडिट व्हावे हे मुद्दे प्रथम शंकरराव काळे यांनी मांडले. गोदावरी कालव्याचे लाभक्षेत्रातील ब्लॉकधारक शेतकऱ्यांना पाटबंधारे खाते १४ दिवसांनी पिकांना पाणी देत असे. परंतु गोदावरी कालव्यावरील पाण्याचे जसजसे बिगर सिंचनाचे आरक्षण वाढत गेले तसतसे कॅनॉलला पाणी कमी प्रमाणात मिळू लागले. सन १९८५ मध्ये तर ८० दिवसांनी कालव्याचे रोटेशनचे पाणी मिळाले होते. त्यामुळे काळे यांचे नेतृत्वाखाली कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रतिनिधीक स्वरूपात मे. सिव्हिल जज्ञ सिनियर डिव्हिजन कोपरगाव यांचे कोर्टात महाराष्ट्र शासनाच्या विरूध्द पुर्वीप्रमाणे पिकाना पाणी मिळावे यासाठी सन १९९३ मध्ये दावा दाखल केलेला होता. सदर दाव्यामध्ये माननीय नामदार कोर्टाने ब्लॉकधारक शेतकऱ्यांची विनंती मान्य केली. व ब्लॉकधारक शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे पाणी पूर्ववत दयावे अशा आशयाचा आदेश दिला.

एक लाख एकर शेतीचे भवितव्य अवलंबून असलेल्या गोदावरी कालव्याचे हक्काचे व वाहिवाटीने ११ टी. एम. सी. पाणी पुन्हा मिळविण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष नव्या पिढीला दिशादर्शक आहे. गोदावरी नदीवर धारणगाव-कुंभारी येथे पुल बांधावा यासाठी महाराष्ट्र शासनाकडे

काळे यांनी खुप पाठपुरावा केला. केंद्र शासनाच्या सेंट्रल रोड फंड योजना सन २००५–२००६ अंतर्गत कोपरगाव नगरपरिषद हद्दीत गोदावरी नदीवर पुल बांधकामास केंद्र शासनाने मान्यता दिली. तसेच सेंट्रल रोड फंड स्कीम सन २००७–२००८ अंतर्गत गोदावरी नदीवर धारणगाव–कुंभारी व सावळीविहीर राज्य मार्गावरील चास येथील पुलाचे बांधकाम सेंट्रल रोड फंडामधून (सी. आर.एफ.) करण्यास मंजुरी दिली. हे गोदावरी नदीवरील दोन्ही पुल काळे च्या भगिरथ प्रयत्नामुळे पुर्ण झाले. जिद्द, कठोर परिश्रम, संघर्ष आणि चिकाटीच्या बळावर ग्रामीण भागातील सर्व सामान्य माणूस असंभाव्य असं कर्तृत्व उभे करू शकतो याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे शंकरराव काळे पाटील आहे.[३०]

जिल्हा परिषदेच्या निवडणूकीतही ५८ जागांपैकी ३४ जागा जिंकत तिथेही आपला झेंडा रोवला साहेबराव पाटील, शंकरराव काळे, एकनाथराव विखे, वसंतराव खंडागळे, पी. बी. कडू पाटील, रंगनाथ पंदरकर यांचा विजयी उमेदवारांत समावेश होता निवडणूकीनंतर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावर शंकरराव काळेची तर उपाध्यक्षपदासाठी एकनाथराव विखेंची बिनविरोध निवड झाली. १९६२ मध्ये श्री. काळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी कामाला जोर धरला संपुर्ण जिल्हयात सहकाराचं वारं वाहत होतंच कार्यकर्ते नेते शेतकरी यांच्यात उत्साह निर्माण झाला. सहकारातून वेगवेगळया संस्था उभा राहिल्या शेती सोबतचं ग्रामविकासाचं दालनही खुलं झालं. १९६२ ते १९७२ अशी सलग दहा वर्षे श्री. काळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते या कालावधीत त्यांनी अहमदनगर जिल्हयात अनेक विकास कामं केली त्यांनी सर्वात महत्वाचं काम केलं ते शिक्षण क्षेत्रात आणि जलसंवर्धनात केले. जिल्हा परिषदेच्या यशस्वी कामगिरीमुळे शंकरराव काळे जिल्हा पातळीवरून राज्यपातळीवर राजकारण करण्यास सज्ज झाले.[३१]

१९६९ साली राष्ट्रीय पातळीवर कॉंग्रेसमध्ये फुट पडली होती तरी नगर जिल्हयातील कॉंग्रेसपक्ष एकसंधपणे यशवंतराव चव्हाण व इंदिरा गांधी यांच्या पाठीशी उभा राहिला. पण या सगळयाचा परिणाम १९७२ च्या निवडणूकीवर झाला. सहकार चळवळ आणि विशेषतः सहकारी साखर कारखानदारी यामधून उदयाला आलेल्या नेतृत्वाला आव्हान दिलं जाऊ लागले पण शंकरराव काळेचा आपल्या कामावर विश्वास होता. त्यांच राजकारण सरळ साधं उघड आणि स्पष्ट होतं कपट कारस्थान करणं त्यांच्या स्वभावातच नसल्याने निवडणूकीत त्यांचा विजय अटळ होता. बंडखोर कॉंग्रेस उमेदवार म्हणून उभे असलेले बाळासाहेब भगत यांचा पराभव करून

शंकरराव काळे काँग्रेसतर्फे आमदार झाले. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष म्हणून शंकरराव काळेची कारकीर्द गाजली ती त्यांनी केलेल्या विकासकामांमुळेच याच काळात शंकरराव काळेनी जिल्हा काँग्रेसचा अध्यक्ष या नात्याने काँग्रेस पक्षाला जिल्हयात मजबूती दिली.

पुलोद च्या मंत्रीमंडळात श्री काळे यांना शिक्षण व सहकार खात्याचं राज्यमंत्रीपद चालून आलं. पुलोद सरकार फार काळ टिकले नाही पण त्या अल्पमुदतीतही श्री काळे यांनी शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य केले. पारनेर सारख्या दुष्काळी तालुक्यात विकासाची अनेक कामं केली तिथल्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. या सगळया प्रवासात त्याचं व्यक्तीमत्व सर्व बाजूंनी प्रगल्भ होतं गेलं. सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत गाव तालुका जिल्हा राज्य आणि पुढे देशपातळीवर कसा विचार करायचा एखादया प्रश्नाकडे व्यापकतेने कसं बघायचं याबाबतीतले त्यांचे विचार खुप स्पष्ट होत गेले. एकच व्यक्ती अनेक पातळयावर किती कुशलतेने काम करू शकते याचा परिपाठ ते आपल्या कामाने घालून देत होते याचं उत्तम उदाहारण म्हणजे कोसाका उदयोग समुहाची भरभराटी होय.[३२]

शंकरराव काळे कुशल राजकारणी होतेच सहकारी चळवळीत रमणारे होते. म्हणूनच कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा विकास होत असताना केवळ साखरेच्या उत्पादनावर अवलंबून न राहता काळाच्या ओघात बदल करून उपपदार्थ निर्मिती करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. १९७६ साली त्यांनी कोसाकाच्या आवारात आसवनी प्रकल्प डिस्टिलरी उभारला हा प्रकल्प अत्यंत चांगल्या तत्हेने सुरू असून त्याचा कारखान्याला फायदाच होतोय साखर कारखान्याला एकही पदार्थ वाया जाऊ नये याकडे त्यांचा कटाक्ष होता आणि आजही आहे. आसवनी विभाग सुरू केल्यावर पुढे उसाच्या बगॅसपासून क्राफ्ट पेपर म्हणजे कागदनिर्मितीचा प्रकल्प सुरू झाला. हा प्रकल्प समाजासाठी उपयोगी ठरला कारण कागदनिर्मितीसाठी मोठया प्रमाणावर जंगलतोड करावी लागते. पर्यायाने राष्ट्रीय संपत्तीचं नुकसानच होतं पर्यावरणाचा तोलही बिघडतो बॅगसपासून कागदनिर्मिती सुरू झाल्याने पर्यावरणाचा तोल संभाळला गेलाच पण रोज २५ मेट्रिक टन कागदाचं उत्पादन होऊ लागलं कागदनिर्मितीच्या संदर्भात कोसाका उदयोगसमूहाला राष्टीयपातळीवची अनेक पारितोषिके तसेच प्रमाणपत्र ही मिळाली आहेत. साखर कारखान्यामुळे त्या परिसराचा जसा विकास होतो त्याचप्रमाणे प्रदुषणाचे काही गंभीर प्रश्न उभे राहू शकतात आणि कारखान्याच्या प्रगतीला मारक ठरू शकतात याची अनुभवाने जाणीव त्यांना

होती कोसाका उदयोग यात अडकू नये म्हणून शंकरराव काळे यांनी पुढाकार घेऊन बायोगॅस प्लॅन्टमधून शेवटच्या टप्यात बोहर पडणारा स्पेंटवॉश प्रेसमडमध्ये मिसळून कम्पोस्टिंग फर्टिलाझर बनविण्याचा प्रकल्प सुरू करण्यात आला. सर्वात महत्वाचं म्हणजे कारखान्याच्या कार्यक्षमतेत आणि फायदयात लक्षणीय वाढ झाली.कर्मवीर शंकरराव काळे यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न व शैक्षणिक आणि सामाजिक काम कर्मवीर शंकरराव काळे यांचे चिरंजीव आमदार अशोकराव काळे पुर्ण करत आहे. शैक्षणिक़ सामाजिक़ सहकार आदी क्षेत्रात बहुमोल कार्य अहोरात्र चालू आहे. या कार्यामध्ये शंकरराव काळे यांचे नातू माननीय आशुतोष काळे हे साथ देत आहे.[३३]

**३. बबनरावजी ढाकणे – पाथर्डी :–**

शेतकरी कुटूंबामध्ये वाढलेल्या श्री ढाकणे इ. ९ वी पर्यत शिक्षण घेतले स्वतःच्या मालकीचे साप्ताहिक 'गणराज्य' सुरू केले राजकीय क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी केली. सुशिक्षित बेकाऱ़ऊस तोडणी कामगाऱ़शेतमजूर व जिरायती भागातील शेतकरी वर्गाचे संघटन केले ढाकणे यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात प्रथम पासून मोर्चे, धरणे, सत्याग्रह, बैठा सत्याग्रह, रास्तारोको, कामबंद, ऑफिस बंद, ताला लगाओ अशी आंदोलने पाणी प्रश्ऩ, रस्त्याचे प्रश्ऩ, खडी करणाचे प्रश्ऩ, डांबरीकरणाचे प्रश्ऩ, साखर कारखान्याचे प्रश्ऩ, रोजगार हमी, महागाई. दुष्काऴ, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न असे प्रश्नच प्रश्न होते.

१९६२ साली पाथर्डी तालुका सुपरवायजिंग युनियनचे त्यांनी अध्यक्षपद भुषविले व कृषी उत्पन्न बाजार समितीवर त्यांची निवड झाली. खरेदी विक्री संघाचे संचालक तर कापूस जिनिंग प्रेसिंग सोसायटीचे ते चेअरमन झाले. शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांनी यशस्वीरित्या कामगिरी करून पाथर्डी येथे एम. एम. निऱ्हाळी विदयालय सुरू केले. १९६५ साली ते गणराज्य या वर्तमानपत्राचे संपादक व मालक झाले. त्यानंतर १९६५ मध्ये हिंद वसतिगृह पाथर्डी या वसतिगृहाचे संचालक झाले. १९६५ मध्ये जनता महाविदयालयाचे उपाध्यक्ष झाले. १९७२ ते १९७५ पाथर्डी पंचायत समितीचे सभापती झाले. सन १९७५ ते १९७६ या कालवधीत जिल्हा सहकारी बोर्ड संचालक म्हणून निवड झाली. तसेच पाथर्डी तालुका जमीन वाटप समितीवर सदस्य झाले. दुष्काळ निमुर्लन समिती, विदयार्थी संघटना व धरणग्रस्तांचे प्रश्न अशा विविध तालुका व जिल्हा समितीवर सदस्य म्हणून काम केले. १९७१ ते १९७४ या काळात मोठया प्रमाणात दुष्काळ पडला, दुष्काळी कामामध्ये नालाबडींग़, पाझर तलाव, मोठी धरणे, सामुदायिक विहिरी ही कामे मोठया संख्येने

करून घेण्यास त्यांनी विशेष दक्षता घेतली १ ऑगस्ट १९७७ रोजी महाराष्ट्रातील सुशिक्षीत बेकारांचे पहिले आंदोलन डी. एड्. विद्यार्थी व त्यांची निघालेली पदयात्रा असा एकूण एका दिवसामध्ये ५४ कि. मी. प्रवास केला. व ही पदययात्रा यशस्वी झाली याच काळामध्ये ते जनता पक्ष जिल्हा सरचिटणीस झाले.[३४]

१९७८ साली पाथर्डी विधानसभा मतदार संघातून त्यांची निवड झाली व ते आमदार झाले. पंचायत–राज समितीवर सदस्य म्हणून काम केले. २ ऑगस्ट १९७८ साली बांधकाम खात्याचे राज्यमंत्री म्हणून त्यांचा मंत्रिमंडळामध्ये समावेश करण्यात आला. मार्च १९७९ मध्ये ते महाराष्ट्र राज्य जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून दोन वर्षासाठी त्यांची निवड झाली. २१ डिंसेबर १९७९ रोजी कॅबिनेट मंत्री, ग्रामविकास खाते म्हणून बढती मिळाली. १९७९ पासून जनता पक्षाचे राष्ट्रीय कार्यकरणीचे सदस्य व विधीमंडळातील कामकाज सल्लागार समिती व इतर अनेक समित्यांवर काम केले. महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण बोर्डाचे ते सदस्य होते. १९८० साली विधानसभेवर त्यांची दुसत्यांदा निवड झाली. १९८१ साली महाराष्ट्र राज्य विधान सभेतील जनता पक्षाच्या नेतेपदी निवड व १७ डिंसेबर १९८१ महाराष्ट्र राज्य विधानसभा विरोधी पक्ष नेता म्हणून निवड करण्यात आली. १९८५ साली विधानसभेवर पाथर्डी मतदार संघातून तिसत्यांदा निवड करण्यात आली. २९ जुलै १९८८ रोजी महाराष्ट्र विधान सभेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. ३० ऑगस्ट १९७२ रोजी मुख्यमंत्री यांची पाथर्डी येथे दुष्काळी पाहणी करण्यासाठी भेट झाली. त्यानंतर पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी अकोला ता. पाथर्डी येथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून त्यांच्या उपस्थितीत जाहिर सभा घेतली. १९७३ साली मंडला कमिशन चर्चेला नकार म्हणून विधानसभेतील राजदंड पळविला. १९८६ साली ऊस कामगार दरवाढीसाठी १ महिना राज्यातील सर्व साखर कारखाने बंद करून संप शेवटी ६२% अंतरिम वाढ करार होऊन संप मागे घेण्यास आला. १९८७ साली आमदार निवास सुधार समिती या पदावर अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली त्यानंतर मुळा योजना वांबोरी चारी उद्घाटन समारंभ पाथर्डी तालुक्यातील मिरी येथे त्यावेळेस मुख्यमंत्री कै. श्री. शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

१९८८ मध्ये विधानसभा महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव उपाध्यक्ष या पदावर त्यांनी काम केले. १९८९ मध्ये केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून ते संस्थापक व चेअरमन

झाले. १९८९ साली बीड जिल्हयातून लोकसभा निवडणूक लढवून जिंकली व खासदार झाले. सप्टेंबर १९९४ मध्ये श्री. ढाकणे दुग्धविकास व पशुसंवर्धन राज्यमंत्री झाले. २००१ साली शेतकरी विचारदल पक्षाची स्थापना केली शैक्षणिक क्षेत्रामध्ये पुणे येथे त्यांनी पॉलिटेक्निक कॉलेज काढले. त्यानंतर पाथर्डी, चिंचपूर, पांगुळ, भिलवडे, घाटशिरस व अकोले येथे माध्यमिक विदयालय सुरू केली. ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी मोफत वसतिगृह सुरू केले.[३५]

सामाजिक संस्थेमध्ये काम करताना दारूबंदी, जाती निर्मुलन, सामूहिक व आंतरजातीय विवाह, साक्षरता मोहिम राबविली सुमनबाई ढाकणे प्रतिष्ठाण प्रभूपिंप्री या ठिकाणी अधात्म व संस्कार केंद्र उभारले. पाथर्डी तालुक्यामध्ये पाझर तलाव. मध्यम व मोठे तलाव यांची संख्या मोठी आहे. यामध्ये नालाबंडिंग, गाव तलाव, रस्ते, गाव, वाडया येथे विदयुतकरणाची सोय करण्यात आली.

वडिलांचा संघर्षमय जीवनाचा वारसा रोमांरोमांत भिनलेला अन्यायविरूध्द आवाज उठविण्याची मानसिकता शालेय जीवनापासून मनात रूजलेली होती. राजकारणात असावं आणि राजकीय स्पर्धा विधायक असावी त्यातूनच समाजाचा विकास व्हावा असा आग्रही विचार मांडणारे प्रताप ढाकणे माणसांच्या जीवनात मुल्य असावीत आणि मुल्य असतील तरच मुल्यावर्धित राजकारण घडून येते व समाजही घडत जातो याचं साक्षात व ज्वलंत स्वरूप म्हणजे आपला अहमदनगर जिल्हा होय. प्रस्थापित विरूध्द विस्थापित, साखर विरूध्द भाकर, साखर सम्राट विरूध्द साखर कामगार, श्रीमंती विरूध्द गरिबी, परिट घडीची पांढरीशुभ्र खादी विरूध्द मळक्या फाटक्या तुटक्या कपडयात लपवलेले मन, दक्षिण विरूध्द उत्तर, सर्वात महत्वाचे म्हणजे अन्याय विरूध्द न्याय, ही परंपरा प्रताप ढाकणेंच्या राजकारणात करताना मोठया जिद्दीने व जिगरबाजपणे लढवय्या वृत्तीने यास ढाकणेंनी तोंड दिलेले आहे. त्यांच्या पुढच्या पिढीलाही यापेक्षा वेगळे ते काय वाटयाला येणार. परंतु राजकारण समाजभिमुख झाले पाहिजे विकासाचे सुत्र एका दिवसात कार्यान्वित होत नाही त्यास फार काळ जावा लागतो. श्री. प्रतापराव ढाकणेंनी राजकारण करताना बऱ्याच बाबींचा विचार सर्वार्थाने आणि सातत्याने केला आहे. याच विचाराने प्रेरित होऊन सर्व सामान्याचा विचार करून कार्यकत्याची संघटना निर्माण करून शेतकऱ्यांचे, कामकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, सुशिक्षित बेरोजगारांचे, दलितांचे पिडीतांचे, वंचितांचे, वीजटंचाई, पाण्याचे प्रश्न, बियाणांचा तुटवडा, खतांचा तुटवडा, इंधन भाववाढ, टोलनाक्याचा प्रश्न, दुधभाव, अधिकाऱ्यांची

मनमानी, शिकले त्यांचे प्रश्न, शिकणाऱ्यांचे प्रश्न, छावणीचे प्रश्न, माणूस घडत असताना त्यांच्या जीवनात कोणाचे संस्कार झाले हे महत्वाचे असते. अनेक नामांकित गुरूजनांनी संस्कार केले त्यामुळे प्रतापराव ढाकणे शैक्षणिक जीवन प्रगत व प्रगल्भ झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना व तरूणांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करीत असतात. श्री. शरदराव पवार यांनी काँग्रेस मध्ये असताना प्रतापराव ढाकणे हे तसेच गोपीनाथ मुंढे यांनी अहमदनगर जिल्हा भारतीय जनता पार्टीची सुत्रे प्रतापराव ढाकणे यांच्याकडे सुपूर्त केले होते. प्रतापराव ढाकणे यांनी जिथे असेल तेथे प्रामाणिकपणे काम केले. हे करित असताना एकलव्य शिक्षण संस्थेच्या सचिवपदी ते कार्यरत आहेत. तसेच श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे ते विदयमान चेअरमन आहे. त्यांच्या खालील प्रमाणे विविध शाखा व विदयालय संस्थेच्या आहेत २२ जून १९४५ रोजी हिंद वसतिगृहाची पाथर्डी येथे स्थापना केली. समाजातील गरजू, गरिब विदयार्थी, निवासाची सुविधा व्हावी या हेतूने आठ दहा विदयार्थी प्रविष्ठ करून सुरू केलेले हिंद वसतिगृह आज अतिशय भव्य दिव्य सर्व सोयींनी समृध्द असलेल्या स्वमालकीच्या इमारतीत सुरू आहे. हिंद वसतिगृहात शासकीय नियमांचे तंतोतंत पालन करून सर्व सुविधा दिल्या जातात. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने २००३ ते २००४ या वर्षात महत्वाचा असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार वसतिगृहास बहाल केला. रू २००,००० देवून राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या शुभहस्ते संस्थेचे सचिव व अधिक्षक यांचा गौरव केला. पाथर्डी तालुक्यात शिक्षणासाठी माध्यमिक विदयालय असावे या संकल्पनेतून सन १९६४ साली बबनराव ढाकणे यांनी एम. एम. निऱ्हाळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय सुरू केले. यातून विदयार्थ्यांना शिक्षण व कर्मचाऱ्यांना रोजगार प्राप्त करून दिला. कोणत्याही राष्ट्राचा दर्जा लोकांना दिल्या जाणात्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते जर समाज चांगला असेल तर राष्ट्र चांगले निर्माण होते. शिक्षणाची गुणवत्ता त्यासाठी चांगली असावी या उदात्त हेतूने विदयार्थी विदयार्थीनींना शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी बबनराव ढाकणे यांनी सप्टेंबर १९८३ मध्ये कै. सुमनताई ढाकणे अध्यापक विदयालय पाथर्डी हे सुरू केले. समाजातील बालकांना अत्याधुनिक सुखसोईंनी युक्त अशा प्रकारचे अनुभूतीपुर्वक खेळीमेळीच्या वातावरणात केल्यास स्वतःचा विकास घडवू शकतात. या कल्पनेतून बालविकास केंद्र संस्थेने सन १९८८ मध्ये सुरू केले आहे.[३६]

सन १९८३ साली श्री वामनभाऊ विदयालय चिंचपूर तसेच संस्थेने संत तुकाराम विदयालय घाटशिरस येथे १९९४ साली सुरू केले. त्यावेळी पाथर्डी तालुक्यातील भिलवडे या छोटयाशा गावात कोणतेही सुविधा नसताना सन १९९४ साली श्री दामुआण्णा माध्यमिक विदयालय भिलवडे हे सुरू केले. अकोले या गावी शिक्षणाचा मोठा बिकट प्रश्न पालकांपुढे उभा असल्याने विदयार्थी शिक्षण सुविधा अभावी शिक्षणच सोडून देत असत त्यामुळे संस्थेने सन २००० साली दादा पाटील विदयालय अकोले येथे सुरू केले.

काळाची पाऊले ओळखून जो कार्यरत राहातो तसेच जी संस्था कार्यरत राहते त्यांचा भविष्यकाळ चांगला असतो. या उद्देशाने सन १९८६ साली पाथर्डी येथे पॉलिटेक्निक कॉलेज सुरू करण्यात आले. पाथर्डी येथे काही अडचणी असल्यामुळे विदयानगरी पुणे येथे कोथरूडला हे कॉलेज हलविण्यात आले. पुण्यासारख्या सर्वदृष्टीने भरभराटीस असणाऱ्या ठिकाणी सिव्हील इंजिनिअरींग, कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल इंजिनिअरींग, इलेटॉनिक्स या विभागात विदयार्थी आधुनिक शिक्षण घेत आहेत. एम. एम. निऱ्हाळी माध्यमिक विदयालयाच्या आवारात संस्थेतील सर्व विदयार्थ्यासाठी व्यायामशाळा सुरू करण्यात आलेली आहे. या इमारतीत व्यायाम शाळेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत तसेच विदयार्थी व्यायामासाठी लागणारी अत्याधुनिक यंत्र सामुग्री संस्थेने उपलब्ध करून दिलेली आहे.[३७]

**४. मधुकरराव पिचड – अकोले :–**

अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यातील राजुर येथे १ जुन १९४१ रोजी मधुकरराव पिचड यांचा जन्म झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संगमनेर येथे पूर्ण केले. मधुकरराव पिचड यांचे वडील प्राथमिक शिक्षक होते. घराची कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना अनेक विविध राजकीय पदावर मधुकरराव पिचडांनी कार्य केले आहे. फर्ग्युसन महाविदयालय पुणे येथे बी. ए. पूर्ण केले व तिथेच एल. एल. बी. चे दोन वर्षे केले. पिचड यांचा राष्ट्रसेवा दलाशी संपर्क आला. महाविदयालयीन निवडणुकांत सहभाग घेतला. थोर विचारवंत व स्वातंत्र्य सैनिक प्रा. ग. प्र. प्रधान यांच्याशी मधुकर पिचड यांचा संपर्क आला. त्यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करावे म्हणून प्रोत्साहन मिळाले या प्रेरणेने नोकरी न करता त्यांनी  सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. पुढे काँग्रेस मध्ये प्रवेश केला. मधुकर पिचडांनी महाविदयालयात असताना आदिवासी शेतकऱ्यांच्या शोषणाविरूध्द आंदोलनात सक्रीय सहभाग

घेतला १९६१ ला पहिला लढा पुकारला सहकारी तत्वावर पहिली दूध संस्था राजूर येथे काढली. पहिल्या दिवशी २५ ते ३० लीटर गोळा झाले पुढे हाच धंदा तालुक्याचा प्रमुख बनला आहे. आज तालुक्यात २ लाख लिटर दुधाचे संकलन होत आहे. आदिवासी उन्नती सेवा मंडळाची स्थापना केली याच संस्थेच्या अनेक आश्रमशाळा, माध्यमिक शाळा, वसतीगृहे आहेत अकोले तालुक्यात कम्युनिष्ठांचे वर्चस्व होते. अशा पार्श्वभूमीवर कॉँग्रेसची पाळेमुळे रोवण्यात महत्वाची भूमिका बजावली मधुकरराव पिचड यांनी कॉँग्रेस हा व्यापारी धनिकांचा पक्ष आहे. ही प्रतिमा नाहीशी केली व सर्वसामान्य माणसाला कॉग्रेसच्या प्रवाहात आणले. पिचड हे १९७२ ला जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले.[३८]

१९७२ ते १९८० पर्यत अकोले पंचायत समितीचे सभापती म्हणून काम केले. मेडिकल कॅम्पचे आयोजन केले. गाव तेथे रस्ता, तलाव या योजना राबविल्या १९८० ला विधानसभेवर निवडून गेले व आमदार झाले. १९९० ते १९८५ विधानसभा अनुसूचित जमाती कल्याण समिती प्रमुख म्हणून काम केले. आमदार नामदार तसेच विरोधी पक्ष नेता राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाचे काम असे अनेक पदांवर मधुकर पिचड यांनी कार्य केले. पंचायत समितीच्या सभापती पदापासून राज्यपातळीवर पर्यतचे काम केले. निळवंडे धरणासारखे मोठे प्रकल्प करण्याची संधी मिळाली धरणग्रस्तांचे आदर्श पुर्नवर्सन केले. महाराष्ट्राला लाभधारक ठरणारा घाटघर उदनचंद जलविद्युत प्रकल्प आणि बुडणाऱ्यांचे आदर्श पुर्नवर्सन केले. २७ जून १९८८ ते १२ मार्च १९९० मध्ये कृषी, रोहयो, आदिवासी विकास, दुग्ध विकास, पशुसंवर्धन खात्याचे राज्यमंत्री अशी विविध खात्याचे काम पाहिले.

२८ जून १९९१ ते नोव्हेंबर १९९६ आदिवासी विकास वन व पर्यावरण मंत्री, याच दरम्यान मार्च १९९३ ते सप्टेंबर १९९४ अदिवासी विकास सहपशुसंवर्धन व दुग्ध.मत्स विकास मंत्री, सप्टेंबर १९९४ ते नोव्हेंबर १९९४ आदिवासी विकास परिवहन व पुनर्वसन मंत्री अशी जबाबदारीची खाती चोखपणे संभाळली. १९९४ रोजी गोवारी हत्याकांडची नैतिक जबाबदारी स्वीकारून नागपूर अधिवेशनात मंत्रीपदाचा राजीनामा दिला.[३९]

कामगारांचे शेकडो कुटूंब त्यामुळे उभी राहिली शेतकत्यांच्या ऊसाला जास्तीत जास्त भाव देणासाठी प्रयत्न केले. अमृतसर दुग्ध संघ, बाजारसमिती यांचीही निर्मिती केली. या शिखर संस्था आज शेतकऱ्यांच्या विकासाचे केंद्र आहे. पाणी आडवा, पाणी जिरवा चा मोठा कार्यक्रम

तालुक्यात राबविला १७ छोटी धरणे त्याचबरोबर गावागावात बंधारे तसेच मुळा नदीवर बंधाऱ्यांची साखळी निर्माण केली. तालुक्यातील जास्तीत जास्त क्षेत्र भिजावे यासाठी प्रयत्नशील राहिले मुळा खोत्यातील पिंपळगाव खांड हे अशक्य कोटीतील धरण मार्गी लावले. रेंगाळलेले पळसुंदे धरणही मार्गी लागले, आढळा धरण भरत नाही परंतु घाटमाथ्यावर पडणारे पाणी आढळा खोत्यांत वळण बंधाऱ्याद्वारे वळवण्याचा महत्वकांक्षी प्रकल्प यावर्षी काही प्रमाणात यशस्वी झाल्याने आढळा धरण भरले. सुमारे ४५० दलघफू पाणी वळविता आले. तसेच घाटघर उदनचंद जलविद्युत प्रकल्पाच्या माध्यमातुन चौंडे धरणातून अतिरिक्त पाणी भंडारदरा धराणात वळविले यामुळे जवळपास ३५० दलघफू पाणी नव्याने निर्माण झाले पश्चिमवाहिनी नदंयाचे पाणी वळविण्याचा प्रकल्प यशस्वी करण्याच्या दृष्टीने दीड–दोन वर्षापासून प्रयत्न सुरू आहेत. यासाठी शासनाकडे पाठपुरावाही सुरू आहे. ही योजना सरकारला सादर केली आहे. यामुळे जवळपास साडेपाच टी. एम. सी. पाणी नव्याने निर्माण कोकणात जाणारे पाणी याचा लाभ गोदावरी खोऱ्यात वळविल्याने गोदावरी खोऱ्याची तुट भरून निघणार आहे. निळवंडे धरणाचे पाणी याचा लाभ अकोले तालुक्याला जास्तीत जास्त कसा होईल यासाठी प्रयत्न केले. मुख्य कालव्यांसह उच्चस्तरीय कालव्यांना विशेष बाब म्हणून मंजूरी आणली आहे. धरणग्रस्तांच्या उर्वरित जमिनीला पाणी मिळावे म्हणून ४५ कोटी रूपयांच्या उपसासिंचन योजना उभारण्यात आल्या त्याचबरोबर धरण जलाशयावरचा देशातला सर्वात मोठा उड्डाणपुल पिंपरकणे येथे उभारला जात आहे.

तालुक्यात तीर्थक्षेत्र विकासाला गती देण्यात आली यासाठी गावागावात सभामंडप, अंगणवाडया, ग्रामपंचायत कार्यालय़, इमारती, गावांना जोडणारे पुल, घाट, रस्ते गाव अंतर्गत रस्ते यांचे डांबरीकरण, खडीकरण, कॉंक्रीटीकरण करण्यात आले. यासाठी पाच वर्षात सुमारे २५० कोटी रूपयांचा निधी आणला आहे. २०१४ च्या अर्थसंकल्पात तालुक्यातील विविध विकास कामांसाठी ८६ कोटी रूपये मंजूर केले आहे. तसेच पाणी पुरवठा योजना बंधारे यांची निर्मिती करण्यात आली. आश्रमशाळा इमारतींना कार्यक्रम पंचायत समिती व तहसील कार्यालाची इमारत. याबरोबरच मुस्लिम समाजासाठी मौलाना आझाद सभागृह, दलित वस्ती सुधारयोजना अशी कामे मोठया प्रमाणावर केली ती सहकाराच्या माध्यमातून केलेली दिसून येते.

मधुकरराव पिचड यांनी २५ मार्च १९९५ ते २५ जुलै १९९९ विधानसभा विरोधी पक्ष नेते म्हणून जबाबदारी यशस्वी पेलली आहे. पुन्हा कॅबीनेट मंत्री म्हणून १९ ऑगस्ट १९९९ ते

ऑगस्ट २००४ अदिवासी विकास व विशेष सहाय्य मंत्री हे पद भुषविले. तसेच आखिल भारतीय आदिवासी विकास परिषेदेवर ७ ऑक्टोंबर २००१ रोजी निवड झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष व ११ जुन २०१३ रोजी अदिवासी विकास मंत्री निवड झाली.[४०]

**५. बाबूरावजी तनपुरे – राहुरी :–**

डॉ. बाबूरावजी तनपुरे हे नगर जिल्हातील सहकार क्षेत्रातील चळवळीतील एक थोर नेते. डॉ. बाबूरावजी तनपुरे यांच्या अविरत धडपडीतून राहुरी तालुका आणि नगर जिल्हा एक निराळाच आकार धारण केलेले दिसते. साखर कारखान्याच्या उभारणीतून परिसराचा कायापालट झाला आहे. युवक कॉग्रेसचे तालुका अध्यक्ष या पदापासून बाबूराव तनपुरे यांचे चिरंजीव प्रसाद तनपुरे यांच्या राजकीय कारकीर्दीचा प्रारंभ झाला. त्यांच्यामुळे बराच मोठा युवकवर्ग काँग्रेसकडे ओढला गेला त्यामुळे त्यांच्यातील राजकीय नेतृत्वाची भक्कम पायाभरणी झाली. १९८० ते ८५ .१९८५ ते ९० १९९० ते १९९५ व पुन्हा १९९५ ची विधानसभा निवडणुक ते सतत जिंकत गेले. आमदार पदाच्या या प्रदिर्घ कारकीर्दीत त्यांनी केलेली जनहिताची कामे आणि तळागाळापर्यत पोहचवलेल्या सरकारी योजनांचा लाभ यामुळे त्याची मतदारसंघातील लोकप्रियता प्रचंड वाढली.[४१]

राहुरी साखर कारखान्याचे चेअरमन मुळा–प्रवरा इले.को–ऑप. सोसायटीचे संचालक़, जिल्हा मध्यवर्ती सह.बँकेचे संचालक़, महात्मा फुले विदयापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य़, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन मुंबईचे संचालक़, मुळा सहकारी सूतगिरणीचे संस्थापक़, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमऩ, डॉ. बाबूराव बापूजी तनपुरे ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशा विविध नामांकित आणि प्रतिष्ठित संस्थासाठी काम करताना त्यांनी त्या–त्या स्थानावर आपला वेगळा ठसा उमटवला. त्या–त्या संस्थाच्या कार्याला योग्य ती दिशा दिली या सर्वच संस्था यशस्वीपणे आपले पाय रोखून प्रगती पथावर वाटचाल करीत आहेत. प्रवरा उजवा तट कालवा नूतनीकरणाचे ९०४ लक्ष रूपयांचे काम पुर्ण करण्यात आले आहे. मुळा डावा कालवा तसेच उजवा कालवा परिक्षण व दुरूस्ती योजनेवर ४५० लक्ष खर्च करण्यात आलेला असून मुळा उजवा कालवा वितरण व्यवस्था विशेष दुरूस्तीचे २४१५ लक्ष रूपयांचे काम पूर्ण झाले आहे.

वनविभागाकडून नवीन वृक्षारोपणाची कामे तसेच वनतळी लहान साठवण तलाव इ. कामे पुर्ण. या कामासाठी २ कोती ४६ लाख ११ हजार रूपये खर्च केले. अहमदनगर जिल्हा रूग्णालय समिती व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष म्हणून या रूग्णालयासाठी सी. टी. स्कॅन मशिन उपल्बध

करून दिले डायलिसीस मशिन मंजूर केले. हदय शस्त्रक्रिया कर्करोग तसेच किडनी शस्त्रक्रियांसाठी शासकीय तसेच धर्मदाय संस्थाकडून १६१ रूग्णांना एकूण ७१ लाख ११ हजार रूपयांची मदत मिळविली. बाबूराव बापूजी तनपुरे ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने तालुक्यात १२ माध्यमिक शाळा चालविण्यात येत आहेत. एकूण विदयार्थी संख्या ५१८० इतकी आहे. २००३-०४ पासून या संस्थेस कला विदयालयाला शासनाने मान्यता दिलेली आहे. कोहीनुर टेक्नीकल इन्स्टिटयुट व डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे ग्रामीण शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विदयमाने विविध कोर्सेस सुरू करण्यात आलेले आहे. तालुक्यात नवीन ६४ वस्ती शाळा सुरू केल्या.[४२]

### ६. भानुदास काशीनाथ मुरकूटे - श्रीरामपुर :-

भानुदास मुरकूटे हे मुळचे श्रीरामपूर तालूक्यातील कमलपूर येथील असून सन १९८० ते १९८५ मध्ये राजकारणाची कारकीर्द सुरू झाली. या काळात श्रीरामपूर विधानसभा सदस्य म्हणून २५ हजारांच्या मताधिक्काने विजयी झाले. सन १९८५ मध्ये श्रीरामपूर विधानसभा निवडणूकीची इंदिरा कॉग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे निवडणूक न लढविता समाजवादी कॉग्रेसचे उमेदवार श्री. दौलतराव पवार यांना पाठिंबा दिला. या भुमिकेमुळे इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव झाला आणि श्री पवार विजयी झाले. १९९० मध्ये जनता दलात प्रवेश केला. तसेच सन १९९० मधील विधानसभेची निवडणूकीत जनता दलाचे उमेदवार म्हणून विजयी झाले. महाराष्ट्र विधानसभेच्या सभापती अध्यक्ष पदाच्या निवडणूकीसाठी विरोधी पक्षाची उमेदवारी आणि यानिमित्ताने राज्य पातळीवर राजकीय पटलावर उतरण्याची संधी मिळाली. १९९२-९३ मध्ये जनता दलातून राज्यातील अन्य ९ आमदारांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला. सन १९९५ मध्ये विधानसभा निवडणूकीतील इंदिरा काँग्रेसची उमेदवारी मिळाली तीन वेळा विधानसभा निवडणूकीत विजयी झाले. श्रीरामपूर विधानसभा मतदार संघाचे तीन वेळा आमदार म्हणून प्रतिनिधित्व करण्याचा विक्रम मिळाला.

भानुदास मुरकुटे यांनी सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले अशोक सहकारी साखर कारखान्यात सन १९८७ पासून ते आजतागयत सलग २२ वर्षापासून सत्ता मुरकुटे यांच्या हाती आहे. १९८७ ते १९९२, १९९७, २००३ व २००८ अशा सलग पाच निवडणुकीत विजय मिळाला. १९८० सालापासून आजतागयत मुळा प्रवरा वीज सहकारी संस्थेचे संचालक तसेच सन २००० पासून सत्ता ताब्यात आहे. या संस्थेचे दि. ६ नोव्हेंबर १९८० ते २० मे १९८२ आणि १३ डिसेंबर

२००० ते ९ जुलै २००४ पर्यत दोन वेळा चेअरमनपदाची धुरा सांभाळली. नोव्हेंबर २००६ मध्ये पुन्हा संचालक म्हणून निवड झाली अशा प्रकारे सहकारात मोठे योगदान आहे.

अशोक सहकारी साखर कारखानातून विविध विकास कामे झाली आहेत कारखाना हा साखर उदयोगासह. अल्कोहोल प्रकल्प, इथेनॉल प्रकल्प, सह वीजनिर्मिती प्रकल्प अशा उदयोगांना अशोक उदयोग समूह बनला आहे. तसेच अशोक बंधारे प्रकल्पाची स्थापना केली. यांच्या अंतर्गत कार्यक्षेतात अशोक बंधारे, अशोक तलाव. अशोक शेततळे, गॅबीयन बंधारे, दगडी साठवण बंधारे अशा जलसंवर्धनाची कामे केली अशोक बंधारे प्रकल्पामुळे पावसाळयात १०२५ द. ल. घ. फू. पाणी साठविण्याची क्षमता निर्माण केली आहे. श्री मुरकूटे यांनी त्यांच्या आमदारकीच्या माध्यमातून प्रवरा नदीवर वळदगांव, पढेगाव, लाडगाव, वांगी, पाचेगांव व पुनतगाव तर गोदावरी नदीवर कमालपूर, नाऊर, खानापूर अशी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची मालिका पुर्णत्वास नेली. याचप्रमाणे नाला बडिंग, गाव तेथ तळे, पाझर तलाव अशी जलसंवर्धनाची कामे केली. यामुळे तालुक्यातील भूगर्भातील पाणी पातळीत भरीव वाढ झाली. परिणामतः सन १९८७ साली केवळ ३५ हजार टनावर आलेली ऊस उपलब्धता ७ लाख टनापर्यत वाढून अशोक कारखाना ऊस उपलब्धेबाबत स्वावलंबी बनला श्री. मुरकुटे यांनी पाटबंधारे विभागाने रद्द केलेले २ हजार एकराचे ब्लॉक पुन्हा मिळवून त्याचे शेतकऱ्यांना फेरवाटप केले. त्यामुळे तालुक्याचे हक्काचे पाणी संरक्षित राहिले.[४३]

कारखाना कार्यस्थळावर सन १९९० पासून भास्करराव गलांडे पाटील औदयोगिक प्रशिक्षण संस्था आय. टी. आय कार्यान्वित आहेत. या संस्थेत फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशियन ट्रेड सुरू आहेत. मोटार मॅकेनिकल व टू व्हिलर मॅकेनिकल या ट्रेडला नव्याने मंजूरी मिळाली आहे. सन १९९३ मध्ये अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. प्रगतीनगर (शिरसगाव) येथे सन २००८–१० पासून अशोक इंग्लिश मेडियम स्कुल व सन २०१२ पासुन अशोक आयडियल स्कूल सुरू केले आहे. सन २००१ पासून कारखाना कार्यस्थळावर अशोक कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविदयालय सुरू आहे.

सन २०११ पासून अशोक पॉलिटेक्निक तंत्रनिकेतन सुरू करण्यात आले. संस्थेत मॅकेनिकल, सिव्हिल, केमिकल, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन्स व कॉम्प्युटर या इंजिनिअरिंग ट्रेड उपलब्ध आहेत. सहकार कायदयान्वये एका तालुक्यात एक तालुका दुध संघ

अस्तित्वात असल्याने अन्य सहकारी दुध संघाची स्थापना करता येत नसल्याने तालुक्यातील दुध उत्पादकांना न्याय देण्यासाठी अशोक मिल्क प्रोसेसिंग ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज या पब्लिक लिमिटेड कंपनीची सन १९९६ मध्ये स्थापना केली.[४४]

सन १९९६ मध्ये श्रीरामपुर शहरात अशोक बँकेची स्थापना केली. बँकेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. बँकेचे मुख्यालय श्रीरामपुर येथून अहमदनगर येथे जिल्हा पातळीवर स्थलांतर केले. सन २००८ मध्ये अशोक बँकेस दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक असोसिएशन, कै. पदमभूषण वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्करा मिळाला. बँकेच्या पुणे जिल्हयातील चाकण, आळेफाटा, वाघोली तसेच नेरूळ, नवी मुंबई याठिकाणी शाखा आहे. सहकारामध्ये मोठे कार्य करत असताना श्री. भानुदास मुरकुटे यांनी सामाजिक क्षेत्रातही भरीव कामगिरी केलेली दिसते. १७ ऑक्टो २००९ राजी ऑल इंडिया डिस्टीलर्स असोसिएशन नवी दिल्ली या डिस्टीलर्स शिखर संस्थेच्या उपाध्यक्षपदी निवड झाली. तसेच अहमदनगर जिल्हा नियोजन समितीवर सदस्य म्हणून काम पाहिले आहे. 'पाणी आडवा पाणी जिरवा' हा जलसंधारणाच्या कार्यक्रमाची सन १९८० पासून अंमलबजावणी चालू आहे. गोदावरी व प्रवरा नदीवर कोल्हापूर बंधाऱ्याची मालिकाच तयार केली आहे. अशोक बंधारे, गावतळे, पाझर तलाव, नालाबंडिंग, सिमेंट बंधारे अशा विविध प्रकारच्या जलसंधारणाच्या योजना तालुक्यात प्रभावीपणे राबविल्या आहेत.

भानुदास मूरकुटे यांनी आमदार कारकीर्दमध्ये तालुक्यातील प्रत्येक गाव हे तालुक्याला डांबरी रस्त्याने जोडण्याचा कार्यक्रम १०० टक्के यशस्वीपणे राबविला. भंडारदरा धरणाच्या हक्काच्या पाण्यासाठी सातत्याने राजकीय संघर्ष करून पाण्याचे फेरवाटप करण्यात यशस्वी प्रयत्न केला. प्रसंगी अनेकदा आंदोलने, जेलभरो व पाणी प्रश्नावर कारावास भोगलेला आहे. भंडारदरा धराणावरील पाटपाण्याचे ब्लॉकचे पुर्नगठण करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. तसेच खंडकरी शेतकत्यांच्या प्रश्नावर वेळोवेळी आंदोलने कब्जा आंदोलन केवळ श्रीरामपूर तालुक्यात यशस्वी केला व खंडकऱ्यांचा अभूतपूर्व बैलगाडी मोर्चाचे आयोजन केले. अशा प्रकारे भानुदास मुरकुटे यांचे सहकाराच्या माध्यमातून राजकीय, शैक्षणिक, सामाजिक तसेच सांस्कतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी दिसून येते यांचे हे कार्य त्यांची पुढील पिढी अविरतपणे पुढे नेण्याचे कार्य चालू आहे.[४५]

**७. शंकरराव कोल्हे – कोपरगाव :–**

शंकरराव कोल्हे यांचा जन्म शेतकरी कुंटूबात २४ मार्च १९२९ रोजी येसगाव ता. कोपरगाव येथे झाला. हे जिल्हयातील कायम दुष्काळी असणारे गाव आहे. १९५० मध्ये शेतकी पदवी घेतल्यावर २० वर्ष शंकरराव कोल्हे यांनी शेती केली. ते शेतावर अगदी रात्रीपर्यंत काम करीत असे. कोणते पीक घ्यायचे कुठे काय लावायचे त्यांची योजना कशी करायची प्रयोग कोणता करायचा ते ठरवित असे. त्यामुळे शेतकऱ्यांची दुःख त्याचे प्रश्न यांची जाण आली. शंकरराव कोल्हे शेती करीत असताना केंद्रही त्यांनी चालविले. त्याचप्रमाणे गावच्या लोकांच्या सहकार्याने आणि श्रमदानाने येसगावातल्या पहिल्या शाळेची निर्मिती केली.[४६] गावामध्ये सुधारणा करण्याची त्यानुसार त्यांनी येसगावात ११ सदस्य जमा केले सोसायटी रजिस्टर केली सभासद गोळा केले. परंतु एकही सभासद कर्ज घ्यायला तयार होईना वर्षभर सोसायटीत कोणीच कर्ज घेण्यासाठी आले नाही त्यामुळे सोसायटी बंद करावी लागली. परंतु शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शंकररावांनी सोसायटीचे महत्व आणि उपयोग शेतकऱ्यांना पटवित असे. ४ ते ५ वर्ष निघुन गेल्यावर कोल्हे सरपंच झाले गावच्या सोसायटीतून पुढे खरेदी विक्री संघ चालू झाला.

गावात कर्ज मिळण्याची बँकेच्या कर्ज वाटपाची सोय नव्हती गावात विविध कार्यकारी सोसायटी नव्हती जिल्हयात बँक नव्हती. मुंबईला प्रॉव्हिन्शियल को–ऑप. ही फक्त एकच बँक होती. तेथे सी. डी. पारेख, वैकुंठभाई मेहता मंडळी काम करत होती. पण या बँकेची क्षमता अगदीच कमी होती त्यामुळे फक्त बागयती भागतच कर्जवाटप होत असे, व ते ५ ते १०% शेतकत्यांना होत असे. यासर्व विचारांतून आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सहकाराचा मार्ग शंकरराव कोल्हेंनी स्विकारला. सहकाराच्या विकासासाठी १९६० ते ९० या काळामध्ये अनेक ध्येयवादी माणसे पुढे आली यशवंतराव चव्हाणांनी पाठिंबा दिला वसंतराव यांनी फार जोरदार पुरस्कार केला. शरद पवार यांनीही त्याला मार्गदर्शन केले त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येक जिल्हयात ४५ साखर कारखाने उभे राहिले व तिथले जीवनमान बदलून गेले. नवीन रस्ते झाले, धरणे झाली पाण्याच्या योजना झाल्या, नविन हॉस्पिटल झाली, नवीन घरं झाली, शेतकऱ्यांची क्रमशक्ती वाढली आणि शेतकरी माणसाला गरिब माणसाला वर नेण्याचा सहकार हा खरोखरच एक चांगला मार्ग निर्माण झाला, यशवंतराव चव्हाणांनी सहकार निती सहकाराच्या वाढीला अतिशय

उपयोगी ठरली. १९५९ साली संजीवनी सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. १९६२ ते आजपर्यंत शंकरराव कोल्हे हे संस्थापक अध्यक्ष विदयमान संचालक म्हणून काम पाहत आहे.[४७]

नेहरूंनी पायाभूत मालाच्या निमिर्तीसाठी देशाच्या कारखानदारीला चालना देणारे अर्थकारण सुरू केले व देशात मोठमोठे कारखाने आणि धरणे बांधली व देशाच्या प्रगतीला सुरूवात झाली. रशियन उद्योग पद्धती वापरून अमेरीकेचे समृद्धीचे ध्येय गाठण्याचा स्व. पंडीत जवाहारलाल नेहरू यांनी स्वीकारलेला मार्ग याच दुप्पटिने वापरला असावा. खेडेगावात कच्या मालावर प्रक्रिया करून पक्का माल तयार केला तर शेतकयांना चांगले दिवस येतील या कल्पनेने डॉ. धनंजयराव यांनी पद्यमश्री विखे पाटील यांना पाठिंबा दिला. आधुनिक भारताने या मार्गाने यश मिळविले आहे. यातूनच शंकरराव कोल्हे यांना सहकाराच्या मार्गाने आकर्षण वाढले. .[४८]

१९८३–८४ मध्ये संजिवनी एज्यकेशन सोसायटी सहजानंदनगर कोपरगाव येथे संस्थापक अध्यक्ष होते. तसेच १९८३–८४ मध्ये महाराष्ट्र राज्य लोकनाटय समिती मुंबई येथील अध्यक्ष म्हणून कार्य केले. त्यानंतर १९८६ साली यशवंत कुक्कुटपालन सहकारी व्यावसायिक संस्था मर्यादित वसंतनगर कोपरगाव येथे संस्थापक व अध्यक्ष म्हणून बेरोजगरांना न्याय दिला.

२००६ ते २०१२ पर्यत नॅशनल फेडरेशन को–ऑप शुगर फॅक्टरीज नवी दिल्लीचे व्हाईस चेअरमन होते. महाराष्ट्र राज्य विधानसभा नियम समिती व महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम समितीचे २००० ते २००४ मध्ये सदस्य होते. तसेच महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन विपनन सुधारणा विधेयक संयुक्त समिती मुंबई येथे २००१ ते २००४ साली सदस्य म्हणून काम पहिले आहे. याचवर्षी महाराष्ट्र विधानसभेचे ऊर्जा व उदयोग रोजगार हमी विभागाच्या स्थायी समितीचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र शासनाच्या शासकीय व अशासकिय विधेयक समितीचे सदस्य म्हणून २००३ मध्ये काम पाहिले. २००३–०४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वजनिक उपक्रम समितीचे सदस्य होते. व वीजमंडळ एक्सपर्ट कमितीचे सदस्य ही होते. [४९] इंटरनॅशनल फोरम फॉर इंडियन ॲग्रीकल्चर य संस्थेच्या माध्यमांतून भारतीय शेतकऱ्यांना आंतराष्ट्रीय शेती व्यापार (गॅट) करारात संरक्षण मिळावे म्हणून २००३ मध्ये मॅक्सोकोतील कॅनकून येथे पार पडलेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या (World Trade Organasation) पाचव्या बैठकीत प्रतिनिधींचा सहभाग व सादरीकरण केले. राज्यातील शेतकयांचे फळे, भाजीपाला फलोत्पादन वाढ व निर्यातीसाठी सन १९८९ मध्ये कोल्हे समितीचा अहवाल शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाकडे सादर केले व त्यातील

महत्वपूर्ण बाबीवर अंमलबजावणी सुरू करण्यात आली. कोपरगाव शहर व तालुक्यातील गोर गरीब रूग्णांना वैदयकीय सेवेसाठी ६ कोटी ५० लाख रूपये खर्च करून ५० खाटांचे अदयावत सुसज्ज ग्रामीण रूग्णालयाची निर्मिती केली.[५०]

संजीवनी कारखाना कोपरगाव या यशस्वी सहकारी कारखान्याच्या विकासातील सॅपकॉम म्हणजे एक नवे दालन होते. ३० वर्षाहुन जस्त काळ यशस्वी वाटचाल करणारा भारतातील एक अत्याधुनिक प्रगतीशील आदर्श उदयोग म्हणून संजीवनी सहकारी कारखान्याची प्रतिमा होती. साखर कारखाना चालविण्याचा अनुभव असलेला हा कारखाना या संस्थेचा मुख्य प्रवर्तक म्हणून सॅपकॉम हा सहकारी उदयोगही याच कारखान्याने प्रवर्तित केलेला एक उदयोग होता. दुध आंदोलनामुळे कोल्हे यांना मंत्रीपद देण्यात आले होते. १९९० ते १९९३ पर्यंत कोल्हे यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून सहकार, परिवहन, महसुल, कृषी व फलोत्पादन इ. खात्यांना कारभार सांभाळला. आजपर्यत जीवनात राजकीय कृषी सहकार शिक्षण व सामाजिक सेवा इ. अनेकविध क्षेत्रात शंकरराव कोल्हेनी काम केले.[५१]

संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे विश्वस्त म्हणून नितीन कोल्हे कार्यरत आहेत. संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेसाठी संजीवनी कारख्यान्याजवळ ४० एकर जमीन घेतली. २००३ मध्ये डी. फार्मसी, २००४ मध्ये बी. फार्मसी महाविदयालयाची स्थापना केली. बी. एड. महाविदयालयाची स्थापना, २००४ मध्ये तर डी. एड महाविदयालायाची स्थापना २००७ मध्ये केली. ग्रामीण भाागातील नवोदित तरूणांना भारतीय सैन्य दलामध्ये नोकरीसाठी प्रवेश मिळावा म्हणून १९९२ मध्ये संजीवनी प्रि कॅडेट सेंटर फॉर सिव्हिल ॲड डिफेन्स सर्व्हिसेस या सेवाभावी संस्थेची स्थापना केली. आज या प्रशिक्षण केंद्रामार्फत सुमारे १५०० युवकांना सैन्यदलामध्ये नोकरी करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. पुणे सन २००१ मध्ये 'संजीवनी सैनिकी स्कुल ॲड ज्युनिअर कॉलेज' ची स्थापना केली. त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुलं–मुली शिक्षणापासून नेहमीच वंचित असतात त्यांच्यासाठी एकलव्य आदिवासी आश्रमशाळा स्थापन केली आहे. संजीवनी शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातुन केजी टू पिजी पर्यतचे शिक्षण येथे उपलब्ध आहे. २०१२ पासून संजीवनी ॲकडमी सुरू केली आहे.संजीवनी ग्रामीण शिक्षणसंस्था नावाप्रमाणे सहकार क्षेत्राबरोबरच शिक्षण क्षेत्रातही धीरोदात्तप्रमाणे उभी आहे.[५२]

**८. यशवंतराव गडाख – नेवासा :–**

यशवंतराव गडाख यांना अगदी उमेदीच्या काळात सक्रीय राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली. कॉलेजचे शिक्षण क्षेत्रात अल्पकाळ नोकरी करण्याचा अनुभवही त्यांनी घेतला. पोलिस खात्यात निवड व्हावी म्हणून स्पर्धा परिक्षाही दिल्या. भावी जीवनाची दिशा ठरविण्याचा त्या काळातच १९६७ या वर्षी जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत ते अपक्ष म्हणून उभे राहिले आणि निवडून आल्यावर १९६७ ते १९७१ या काळात नेवासा तालुक्याचे सभापती म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यानंतर पोलिस खात्यात अधिकारी म्हणून सरकारी नोकरी करण्याची संधी चालून आली असतानाही व्यक्तिगत जीवनापेक्षा सामाजिक कार्याला प्राधान्य देऊन त्यांनी राजकीय क्षेत्रात राहण्याचं ठरवले.

सोनई सारख्या ग्रामीण भागात राहून वडिलोपार्जित शेतीचा अनुषंगाने शेतकऱ्यांच्या जीवनात पंचायत राजच्या माध्यमातून सत्ता हाती आल्यानंतर या प्रश्नाकडे वेगळया दृष्टीकोनातून पाहण्याची संधी त्यांना मिळाली शेतकऱ्यांचे प्रश्न सर्वार्थाने समजून घेण्यासाठी त्यांनी संपूर्ण तालुकाभर दौरे केले. त्या संबधीच्या योजना तयार केल्या १९७२ ते १९७८ जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष आणि अध्यक्ष झाल्यावर अशा योजनांची व्याप्ती वाढली. शेतीला जोडधंदा असल्याशिवाय ती किफायतशीर ठरणार नाही हे ओळखून जिल्हयात दुध धंदा वाढावा यासाठी जिल्हा परिषदेमार्फत राज्यात प्रथमच कृत्रिम रेतन प्रकल्प राबविला त्यामुळे जिल्हयात ४२ हजार गायी व दररोज ३ लाख लिटर दुध वाढले. जर्सी गायीबद्दल लोकांच्या मनात सुरूवातीला असलेला गैरसमज दुर व्हावा म्हणून त्यांनी स्वतःला प्रथम खरेदी केल्या आणि इतरांची मन वळवली दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगर जिल्हयात ८७२ पाझरतलावांची कामे त्यावेळी त्यांनी केली. अशा पद्धतीने शेतीचा विकास आणि समृध्दकरणासाठीचे विविध निर्णय त्यांनी घेतले. १९८४ ते १९९३ पर्यत अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदार संघातून सलग तीन वेळेस लोकप्रतिनिधी म्हणन निवड कॉंग्रेस पक्षाचे संसद सदस्य व दुसऱ्यांदा विधान परिषद सदस्य म्हणून काम करण्याची त्यांना संधी मिळाली. १९९७ ते २००९ मध्ये अहमदनगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून निवड झाली.[५३]

१९९१ पासून यशवंतराव गडाख हे अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आहेत. १९९३ ते १९९५ व नंतर १९९९ ते २००४ पर्यत अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी

बँकेचे अध्यक्ष पद म्हणून काम केले. तसेच १९९८ पासून २०११ पर्यत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई संचालक म्हणून काम पाहिले जिल्हा सहकारी बँकेचे संचालक आणि अध्यक्ष असताना त्यांनी पुढाकार घेऊन शेतीच्या विकासासाठी ठोस पावलं उचलली. लिफ्ट इरिगेशन भोगाचे संगणकीकरण, दुध धंदयासाठी गायी आदीसाठी अर्थसहाय्य मिळवून दिल्याशिवाय एकरकमी कर्जफेड योजना, पुर्नपुरवठा अशा विविध योजना राबविल्या जिल्हयातील इतर सहकारी संस्थांची मातृसंस्था असलेल्या जिल्हा बँकेचा कामकाजावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून संचालक मंडळाची निवड गट तट पक्ष विरहीत व्हावी यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले. मुळा सहकारी बँकेच्या १८ वर्षाच्या यशस्वी वाटचालीत १० हजार तरूणांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य दिलेले आहे.

ग्रामीण भागात सर्वार्थाने विकास व्हायचा असेल तर फक्त शेतीच्या उत्पादनावर अवलंबून न राहता शेती मालावर आधारित उदयोगधंदे आणि पुरक व्यवसायाकडे लक्ष केंद्रीत केलं पाहिजे, अशा जाणिवेतून त्यांनी अनेक अडचणींना विरोधाला तोंड देत सोनई येथे १९७९ मध्ये मुळा सहकारी साखर कारखाना लि. ची स्थापना केली. कारखान्याच्या ३८ वा गाळप हंगाम २०१५ ऑक्टोबर अखेर झाला. अपेक्षित गाळप ६.५० लक्ष मे. टन सुरूवातीला १९७९ मध्ये गाळप क्षमता १२.५० मे. टन होती. सध्याचे दैनंदिन गाळप प्रतिदिन ५००० मे. टन झाली. आतापर्यत एकूण ३२१६.०६ कोटी रूपयाची साखर तयार केली. एक वर्षात परिसरातील शेतकऱ्यांचा विविध अनुदानासह ऊस पेमेंटसाठी २०१८.११ कोटी वाटप केले एक हजार कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष रोजगार व दरवर्षी ७ ते ८ हजार ऊस तोडणी मजुरांना काम मिळाले आतापर्यत एकूण ४३९.५० कोटींचे पेमेंट दिले गेले ऊस वाहतुकीसाठी परिसरातील टँक ट्रॅक्टर मिळून ४५० वाहनांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. ट्रक ट्रॅक्टर मालकांना ऊस वाहतूकीसाठी पेमेंट १२१.२२ कोटी इतके केलेले आहे. कामगारांना नवीन वेतनवाढ लागू करून साडेचार कोटी फरक रक्कमेचे पेमेंट नुकतेच अदा केले. कारखान्याची उभारणी विस्तारीकरण आधुनिकीरण डिस्टीलरी व वीज प्रकल्पासाठी गेल्या ३७ वर्षात एकूण १४५ कोटी रूपयांचे कर्ज घेतले त्यांपैकी व्याजासह १७१ कोटीची परतफेड केली. त्यात कर्ज १८ कोटी कोणतीही थकबाकी नाही अल्कोहोल तयार केले त्यातून ४९१५ कोटीचा नफा मिळाला मल्टीप्रेशन टेक्नॉलॉजीवर आधारित प्रतिदिन ४५००० लीटर क्षमतेची आधूनिक डिस्टलरी इथेनॉल प्रकल्पासाठी प्रयत्नशील आहे.[५४]

जानेवारी २००६ मध्ये जिल्हयातला पहिला मोठा वीज प्रकल्प कार्यान्वित आहे. त्याची क्षमता १६ मे. वॅट आतापर्यत १५३४१ कोटींची वीज वापरली. १४ मेगावॅट क्षमतेची दुसऱ्या टप्प्याची उभारणी पूर्ण झाली आहे. त्याच वर्षी विस्तारीत ३० मेगावॅट क्षमतेचा सर्वात मोठा वीजप्रकल्प कार्यान्वित होत आहे. पहिल्या टप्प्यातून आतापर्यत १६० कोटींची वीज निर्मिती त्यांपैकी ८८ कोटीची वीज विकली गेली. कारखान्याची सुरूवातीची प्रोपर्टी ७ कोटीची होती ती २२५५ कोटी झाली आहे. यापूर्वी सन २००१–०२ व २००२–०३ मध्ये सलग २ वर्षे कारखान्याला सर्वाकृष्ट आर्थिक व्यवस्थापनाचे पुरस्कार मिळाले. सुरूवातीपासून ऑडीटचा अ दर्जा प्राप्त कारखान्यामुळे सभासद व बिगर सभासद मिळून दरवर्षी ३५ ते ४० हजार शेतकऱ्यांना ऊस पुरवठयाचे आर्थिक साधन उपलब्ध झालेले आहे. कारखान्यापर्यत ऊसविकासासाठी कार्यक्षेत्रात २०१३ चा दुष्काळात लोकसहभागातून ३४० बंधाऱ्याची दुरूस्ती व १५ वर्षे बंद पडलेल्या लिफ्ट योजना ७१ लाख रू. खर्च करून पुनः कार्यान्वित केला आहे.[५५]

यशवंतराव गडाख हे नेवासा तालुका सहकारी दुध उत्पादक संघाचे संस्थापक आहेत. तालूका दुध संघाच्या माध्यमातून तालुक्यात ३० हजार कुटुबांना दुध धंदयातून स्वयंरोजगार उपलब्थ झालेला आहे. १५ वर्षात दुध संघामार्फत दुध व वाहतुक पेमेंटसाठी ३८० कोटी रूपयाचे वाटप झाले आहे. तालुक्यात दुध धंदा वाढविल्याने दुधाची एकूण प्रतिदिन उपलब्धता सुमारे ४० हजार लिटर्स त्यांची दैनंदिन विक्रीची किंमत ९ लाख रूपये इतकी आहे. मुळा एज्युकेशन सोसायटी सोनई या संस्थेचे गडाख हे संस्थापक व अध्यक्ष १९७८ पासून २०११ पर्यत होते. ही शिक्षण संस्थेची स्थापना करून ग्रामीण मुला–मुलींसाठी शिक्षण सुलभ केले, त्यामुळे ग्रामीण भागातील मुलीच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले. सहाजिकच पुढची पिढी शैक्षणिकदृष्टया प्रगत झाली. मुळा एज्युकेशन सोसायटीचे ४१ युनीट कार्यरत आहेत आतापर्यत एकूण ९० हजार विदयार्थ्यानी शिक्षण घेतले. त्यात ४३ टक्के लाभार्थी मुलींचा सहभाग आहे सध्याची दरवर्षी विदयार्थीसंख्या १८ हाजार इतकी आहे. तसेच १९८९ पासून यशवंतराव चव्हाण मेमो. मेडी. ॲण्ड रूरल डेव्हलपमेंट फौंडेशन अहमदनगरचे संस्थापक आहेत. २००३ पासून ताईसाहेब कदम सेवाभावी फौडेशन व संशोधन केंद्र यशस्वीपणे कार्यरत आहे. सन २००६ ते २००९ मध्ये महात्मा फुले कृषी विदयापीठाच्या कार्यकारी परिषदेवर सदस्य म्हणून कार्य केले. २०१२ मध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे सदस्य होते. तसेच गव्हर्निंग कौन्सिल वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट मांजरी

बु. ता. हवेली जि. पुणे येथे सदस्य म्हणून कार्यरत होते. २०१३ पासून नवी दिल्ली येथे सदस्य आहे.

१९९६ मध्ये नेवासा येथे ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी महोत्सवाचे आयोजन व संयोजक होते. १९९६ मध्ये ज्ञानेश्वर सांस्कतिक प्रतिष्ठानचे संस्थापक होते. यशवंतराव गडाखांचे सहकार क्षेत्रामध्ये योगदान आहे. त्याचप्रमाणे त्याचे वाङ्मयीन हे कार्य खुप मोठे आहे. ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अहमदनगर येथे १९९७ मध्ये झाले त्याचे गडाख हे स्वागताध्यक्ष होते. १९७२ मध्ये चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन नेवासा येथे झाले त्याचे स्वागताध्यक्ष व संयोजक होते. त्याचवर्षी म्हणजे १९७२ ला मराठी दलित साहित्य संमेलन झाले त्याचेही संयोजक म्हणून राहिले. २००४ मध्ये नवोदित राष्ट्रीय मराठी कोकणी साहित्य संमेलन पुणे येथे पार पडले त्याचे गडाख हे उद्धाटक होते. तसेच २००४ पासून जागतिक मराठी साहित्य अकादमीचे उपाध्यक्ष आहेत. १ व २ जाने २००५ मध्ये जागतिक मराठी ॲकडमी शोध मराठी मनाचा संमेलन अहमदनगर येथे झाले त्याचे स्वागताध्यक्ष पद हे यशस्वीरीत्या पार पाडले.[५६]

यशवंतराव गडाख यांनी उत्कृष्ट लेखन केलेले आहे. त्यासाठी त्या लेखनाला असंख्य पुरस्कार मिळालेली आहेत. त्यापैकी अनुक्रमे २००३ मध्ये ‘अर्धविराम’ २००७ मध्ये अर्धविरामाची हिंदी आवृत्ती २००९ मध्ये ‘सहवास’ या पुस्तकाचे प्रकाशन केले. व २०१२ मध्ये ‘अंर्तवेध’ या तिसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे. १९६९ ते १९७७ या कालावधीमध्ये अहमदनगर जिल्हा युवक काँग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणून संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या. पुढे अहमदनगर जिल्हा काँग्रेस आय कमिटी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय कमिटीचे आजपर्यंत सदस्य म्हणून काम पाहत आहेत.

यशवंतराव गडाखांनी सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अनेक समस्यांना वाचा फोडली आहे. शेतकऱ्यांच्या वाढत जाणाऱ्या आत्महत्यांनी त्यांना अस्वस्थ केल राजकीय आणि वृत्तपत्रीय व्यासपीठावरून त्यांनी वेळोवेळी आपले विचार तळमळीने मांडले. शेतकऱ्यांच्या पायाभूत प्रश्नांबाबत सर्वकष चर्चा व्हावी आणि शासनाने त्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा म्हणून यशवंतराव गडाख यांनी वेळोवेळी मुंबई आणि नागपूर येथे झालेल्या अधिवेशनात या विषयाला वाचा फोडली अणि त्यावर प्रदिर्घ चर्चा घडवून आणली. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी पुढील कर्ज ६ टक्के दराने देण्यात यावे आणि शेतकत्यांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाययोजना

सुचविण्यासाठी एक अभ्यासगट नेमावा अशा विविध सुचना केल्या त्यानूसार महाराष्ट्र शासनाने सहकार व पणन राज्यमंत्री जयप्रकाश वांडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्य असलेल्या उच्चस्तरीय अभ्यास गटाची नियुक्ती केली. त्यात गडाख यांचा समावेश होता, या अभ्यासगटाने शासनाला बहुमोल सुचना केल्या त्या अंशतः स्वीकारल्या गेल्या त्यातूनच शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि शेतीसाठी ६ टक्के दराने कर्ज हे महत्वपूर्ण निर्णय घेतले गेले. ही बाब निश्वितच दिलासा देणारी आहे. अशा रितीने सहकाराच्या जोडीने अनेक प्रकल्प हाती घेतले व यशस्वी राबविले कारखान्याच्या माध्यमातून तालुका दुध संघ मुळा बाजार मुळा बँक व मुळा एज्युकेशन या संस्थाची अथक व यशस्वी वाटचाल पुढे नेण्याचे कार्य यशवंतराव गडाखाची पुढील वारसदार शंकरराव गडाख व प्रशांतराव गडाख अतिशय अथक प्रयत्नातून करत आहेत.

यशवंतराव गडाख यांचे ज्येष्ठ चिरंजीव हे नेवासा तालुक्यातील विकासाचा धुरा संभाळत आहेत. मुळा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून सध्या पदावर आहेत. मुळा कारखान्याचे १० वर्षे अध्यक्षपद व त्यानंतरही नियुक्त संचालक पदांच्या माध्यमातून कारखान्याच्या उत्तोत्तर प्रगतीचा शंकररावांना मोलाचा हातभार आहे. जिल्हयात पहिल्या व मोठया वीज प्रकल्पाची मुहुर्तमेढ रोवलेली आहे व आज अग्रेसर वीज प्रकल्पांत नामांकन मिळविलेली आहेत. शंकररावांना त्याच्या अध्यक्षपदाच्या कार्याबद्दल उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनाचे सलग दोनवेळा पुरस्कार मिळालेले आहेत. तसेच ऊस विकास व मशिनरी आधुनिकीकरण योजनामुळे हंगामात ८ ते ९ लाख टन गाळप क्षमतेपर्यंत वाढ झालेली आहे. ऊस व इतर उभ्या पिकांना सिंचनासाठी पाणी मिळवून देण्यात संघर्ष केला व यशवंत बंधाऱ्यांचा प्रकल्प यशस्वी केला.[५७]

शंकरराव गडाख यांनी १४ वर्षापूर्वी स्थापन केलेल्या नेवासा तालुका सहकारी दूध संघाच्या माध्यमातून आतापर्यंत दुध उत्पादकांना ३२०.३१ कोटी रुपये पेमेंट अदा करण्यात आले. त्याचप्रमाणे अंतर्गत व बहिर्गत दुध वाहतुक यंत्रणेला केलेले एकूण पेमेंट रुपये ४७.७५ कोटी दिले. अशा प्रकारे सहकाराच्या माध्यमातून खुप मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. संस्थेच्या माध्यमातून तालुक्यात दूध उत्पादन वाढीसाठी विविध योजनांचा अवलंब केला व त्यामुळे तालुक्यात दुध उत्पादन प्रतिदिन ३ लाख लिटर पर्यंत वाढ झालेली आहे. तालुका संघाचे दुध संकलन ७०००० लिटर व त्यातून दरवर्षी ९ ते १० हजार कुटुबांना स्वयं

रोजगाराचे किंवा जोडधंदयातून उत्पन्नाचे साधन उपलब्ध झालेले आहे. १९९७ मध्ये स्थापन केलेला मुळा सहकारी बँकेमुळे तालुक्यात घरबांधणी, घरदुरुस्ती, वाहन खरेदी, बेरोजगारांसाठी उदयोग व्यवसाय त्याचबरोबर इतर अडीअडचणी सोडविण्यासाठी महत्वाची जबाबदारी बजावली. बँकेचे सभासद भाग-भांडवल ७४ लाख, ठेवी ५०.२२ कोटी, गुंतवणूक २२.०८ कोटी व आतापर्यत एकूण कर्ज वाटप १६२ कोटी केलेले आहे.[५८]

शंकरराव गडाख यांनी सन १९९९ मध्ये स्थापन केलेल्या पाच हजार सभासदांच्या सहकारी संस्थेने आतापर्यंत १२० कोटींची विक्रमी विक्रीने संस्था तालुक्यातील जनतेच्या विश्वासास सार्थ ठरली आहे. लग्न, सण, उत्सव, व दैनंदिन उपयोगासाठी लागणाऱ्या घरगुती वस्तूपासून इतर शेती उपयोगी मालासह एकूण २२ हजार प्रकारच्या वस्तू एकाच दालनाखाली विक्रीस उपलब्ध आहेच सहकारातून मोठया प्रमाणात रोजगार प्राप्ती दिसून येते. मुळा उदयोग समूहातील १५०० कामगांराना क्रेडीट कार्ड सुविधा आहेत. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती ग्राहक सेवा महासंस्थेतर्फे संस्थेला 'ग्राहक सेवा गौरव पुरस्कार' प्राप्त झालेला आहे.

नेवासा तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत २००३ मध्ये घोडेगाव येथील कांदा मार्केट संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर परराज्यातही प्रसिद्ध व अग्रेसर ठरले आहे. इथे आलेल्या कांदयाची परदेशातही निर्यात झालेली आहे. शंकरराव गडाख यांचे मार्गदर्शन व व्यवहारातील पारदर्शकता यामुळे शेतकऱ्यांना जीवनदान मिळाले असून वार्षिक उलाढाल १०० ते १५० कोटी पर्यंत केली आहे. तर जवळपास १००० बेरोजगार तरुणांना रोजगार मिळाला आहे. गाई, म्हशींच्या खरेदी विक्रीसाठी परराज्यातून येणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्याही वाढली आहे. विविध अनुदानांचा लाभ मिळून सुविधा वाढल्याने गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढीची बाजारातील वार्षिक उलाढाल १०० ते १२० कोटी पर्यंत पोहचली आहे.[५९]

महाराष्ट्र कृषी स्पर्धाश्रय प्रकल्पांमध्ये या अग्रगण्य बाजार समितीची पहिल्या टप्प्यात निवड झाली असून त्यासाठी विविध फायदे व सवलती मिळाल्या आहेत. शंकरराव गडाख यांनी यशवंत सामाजिक प्रतिष्ठान सोनई यांच्या तर्फे महिला सक्षमीकरणासाठी खालीलप्रमाणे कार्य केलेले आहेत. एकूण १६६० स्वयं सहाय्य्यता महिला बचतगट आहेत. नेवासा तालुक्यातील १२० गावांत महिला स्वयं सहाय्यता बचत गटांची स्थापना केलेली आहे व त्यातून २५०० महिलांचे संगठन झाले आहेत. १२ कोटी रुपये इतके कर्ज महिला बचत गटांना बँकेमार्फत मिळवून

दिले आहे. याचा तालुक्यातील ४.३३ बी. पी. एल. गटांना लाभ मिळालेला आहे. स्वयं सहाय्यता महिला बचत गटाच्या माध्यमातून २५००० महिलांचे आर्थिक सक्षमीकरण झाले आहे. त्यातून लघुउदयोगाला चालना मिळालेली आहे. शंकरराव गडाख यांनी नेवासा तालुक्यातील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ व हक्काचे व्यासपीठ मिळावे म्हणून बचत गट भवन, प्रदर्शन व विक्री केंद्र उभारले आहे. नेवासा तालुक्यातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात महिला सक्षमीकरणासाठी सुनिता गडाख यांनी केलेल्या भरीव कार्याबद्दल क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार दिला गेला आहे. सुनिता गडाख यांनी नेवासा तालुक्यामध्ये महिलांचे संघटन व उत्कर्षासाठी विविध उपक्रम राबविले आहेत आणि आजही त्याच कार्यात यशस्वी कामगिरी करत आहे.[६०]

शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली २४४ हेक्टर विकसित केलेल्या क्षेत्रावर साकारत असलेल्या व बेरोजगारांचे आशास्थान बनलेल्या आणि तालुक्याच्या आर्थिक परिवर्तनात भर घालणारा हा मोठा प्रकल्प आहे. पायाभूत सुविधांची उपलब्धी व वीजेचे मोठे सबस्टेशन कार्यान्वित होत असल्याने येथे २३ नियोजित प्रकल्पांनी आघाडी घेतली आहे. वीजेचा मोठा प्रकल्प पुर्णत्वास येत आहे. नेवासा तालुक्याच्या ठिकाणी विदयार्थी व तरुणांना विविध खेळांसाठी वाव व प्रोत्साहन देणारे १ कोटीचे क्रीडा संकुल मंजुर करुन आणले आहे. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त निधितून पंचायत युवा क्रिडा व खेळ अभियान योजनेतून गावपातळीवर १ लाख अर्थसहाय देण्यात येणार आहे. शंकरराव गडाख यांनी आपल्या आमदार पदाच्या माध्यमातून विधानसभेत अनेक प्रश्न मांडले.त्यापैकी पांढरीपुल व अन्य प्रस्तावित फुडपार्क अंगणवाडी सेविकांच्या मानधनांचा प्रश्न, सुक्ष्मसिंचनाच्या अनुदानात ९१६ जायकवाडी धरणग्रस्तांचे पुनर्वसन व मुळा धरणाची उंची वाढविणे असे विविध प्रश्न मांडून शासनाचे लक्ष वेधले आहेत.

यशवंतराव गडाख यांचे कनिष्ठ तृतीय चिरंजीव हे पुणे विदयापिठाचे सिनेट सदस्य आहेत. यशवंत सामाजिक प्रतिष्ठान सोनईचे अध्यक्ष आहेत. तसेच मुळा एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. १९७९ साली यशवंतराव गडाख यांनी स्थापन केलेल्या मुळा एज्युकेशन सोसायटीचे आज विस्तृत वाढ झालेली आहे. प्रशांत गडाख यांनी सामाजिक उपक्रमांतर्गत राबविले आहेत. त्यापैकी नेत्रदान संकल्प कार्यक्रम २०१० मध्ये १०,००० दानशुरांचा स्वच्छेने नेत्रदान संकल्प पत्राचे संकलन ६० जणांनी आतापर्यंत नेत्रदान केले आहे. १२० अंधाना दृष्टी प्राप्त झाली

आहे. ५० गरीब मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्विकारुन त्यांचे पुढील शिक्षणास संधी प्राप्त केली आहेत. कै. ताईसाहेब कदम यांचे पुण्यस्मरणानिमित्त प्रतिवर्षी ११ निराधार विधवा महिलांना आर्थिक सहाय केले जाते. मातापिता नसणाऱ्या निराधार मुलांचे संगोपनासाठी आपुलकी, आधार केंद्रामार्फत मदत देण्यात येते. तसेच मोरेचिंचोरे गाव दत्तक घेवून तेथे ग्रामीण रुग्णालय रस्ते, विज, पाणी, पुरवठा इ. सुविधा देण्यात आल्या तसेच १ लाख वृक्षांची लागवड करुन त्याचे संगोपन सुरु केले.[६१]

### ९. मारुतराव घुले – शेवगाव :–

नेवासा व शेवगाव तालुक्याच्या भूमीमध्ये राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार आणि धार्मिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा अनेक व्यक्तींनी उमवठविला आहे. त्यापैकी बाळासाहेब भारदे, एकनाथराव भागावत, आर. एस. पाटील, नानाभाऊ सुकाळकर, वसंतराव होंडे या नेत्यांनी तालुक्यांचा विकास केलेला दिसून येतो. त्याचबरोबर सहकार क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी मारुतराव घुले यांनी केलेली दिसून येते. १९/१५/१९३० साली पढेगाव ता. राहुरी या ठिकाणी मारुतराव घुले यांचा जन्म झाला. घुले यांना बालवयापासून राष्ट्रसेवा दलाचा प्रभाव पडलेला होता. त्यामुळे महात्मा गाधींना आदर्श मानत त्यांनी आपले समाजकार्य बालपणापासून सुरु केले होते. शालेय जीवनापासून काँग्रेस सेवादलात काम करित असल्यामुळे काँग्रेसच्या सर्व संग्राहक व समन्वयवादी विचाराने घुले प्रभावित झाले. ते कायम महात्मा गांधी, पंडित नेहरु, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी यांच्या सर्वोदयवादी विचारांनी झपाटले होते. कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, महर्षि कर्वे, प्रभूती पुरोगामी विचारवंताच्या साहित्याचाही त्यांच्या सेवा कार्यावर विशेष प्रभाव पडला आहे. त्यामुळे राजकारण, अर्थकारण, समाजकारण, सहकार क्षेत्र यांना सेवेची जोड देउन त्यांचे कार्य पूर्ण केले.[६२]

मारुतराव घुले यांनी बालवयातच शिवजंयतीच्या मुहुर्तावर गावात धनिक शेतकऱ्यांकडून धान्य गोळा करुन ग्रेन डेपो स्थापन केला. तेथे जमविण्यात आलेले धान्य गोरगरिबांना बिगर व्याजी दिले जात असे. इंटर आर्टसपर्यत शिक्षण झालेल्या मारुतरावांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आणि संघटन कौशल्यावर माणसांचा चांगला संघ उभा केला. संपुर्ण तालुक्याची घडी बसविणाऱ्या मारुतरावांनी कारकिर्द सुरु केली. अगदी ग्रामपंचायती पासून ते आमदारकी आणि

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या चेअरमन पदी नियुक्त झाल्यानंतर आपल्या उमेदीचा काळ सहकार क्षेत्रात व तालुक्याच्या विकासासाठी खर्च केला. १९५४ मध्ये दहिगाव येथे सहकारी सोसायटीची स्थापना केली. १९५७ – १९५८ मध्ये अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निर्मिती प्रक्रियेत घुलेंच्या सहकार्यातून उभारण्यात आलेला आहे. अहमदनगर जिल्हा बँकेने आज भारतात नव्हे तर संपूर्ण आशिया खंडात क्रमांक एकचे स्थान मिळवलेले आहे. त्याचा पाया मारुतरांवाच्या कारकिर्दीत रोवला गेला आहे. त्यानंतर शेवगाव तालुका सहकारी खरेदी – विक्री संघाचे संचालक तसेच मार्केट कमिटीचे संचालक म्हणून कामे पाहिली. गोरगरिबांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून १९५९ मध्ये दहिगाव – ने येथे जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना व नवजीवन विदयालयाची स्थापना केली व वसतिगृह सुरु केले. आज त्याच्या विविध शाखा आहेत. वसतिगृहामुळे शैक्षणिक सुविधा या गोरगरिब मुला–मुलींना घेता आल्या. बोर्डिंगसाठी धान्य जमा करायला मारुतराव घुले स्वत: फिरत दरवर्षी धान्याची खळे झाल्यावर स्वत:चे पंधरा पोती धान्य मारुतराव घुले पहिल्यांदा बोर्डिंग मध्ये देत असे. त्यामुळे इतर लोकही स्वत: आणून देत.

१९६२ ते१९७२ पर्यत विधानसभेवर आणि १९७२ ते १९७८ विधानसभेवर आमदार म्हणून काम करुन जनकल्याणाच्या उत्पादक कामाची त्यांनी रचना केली. शेवगाव येथे औदयोगिक प्रशिक्षण केंद्रांची स्थापना, शेवगाव तालुका सहकारी जिनिंग व प्रेसिंग प्रकल्पाची उभारणी, शेवगाव तालुका मार्केट कमिटी स्थापना, श्री ज्ञानेश्वर महाविदयालयाची स्थापना, ताजनापूर उपसा जलसिंचन योजना या प्रकल्पाची मंजूरी आणून त्याची प्रत्याक्षात अमंलबजावणी कार्य मारुतरावजी घुलेंनी आमदार असतानी केले.[६३]

महाराष्ट्रातील सहकारी चळवळींचे ज्येष्ट नेते ज्यांनी सहकारी बँकेला नेतृत्व देऊन नवीन दिशा दिली. भाऊसाहेब थोरात व मारुतराव घुले यांच्या नेतृत्वाचा व मार्गदर्शनाचा लाभ प्रथम पासूनच बँकेला लाभला. त्यांनी बॅकेत क्रांतीकारी निर्णय घेऊन जनसामान्यांच्या विकासासाठी राबविले. मारुतराव घुले हे बँकेच्या स्थापनेपासून ते आपल्या स्वत:च्या मृत्यूपर्यत संस्थापक होते. म्हणजेच स्थापनेपासुन ते संचालक या पदावर होते. १९५८ ते २००२ या कालखंडामध्ये एकूण ४४ वर्षे बँकेमार्फत जनसेवेचे कार्य करत होते. या दरम्यान अनेक महत्वाचे निर्णय घुलेंनी घेतले. ५ वेळा ५ वर्ष (१९७७ – ७८, १९७८ – ७९, १९८७ – ८८, १९८९ – ९०, १९९० – ९१) या वर्षी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष स्थान भुषविले आहे.

मारुतराव घुलेंचे राजकीय व सामाजिक जीवनात सर्वात मोठा संकटाचा काळ म्हणजे जायकवाडी धरण उभारणीचा काळ होता. नगर जिल्हयातील नव्हे तर महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाची जमीन पाण्याखाली बुडण्याचा प्रश्न निर्माण झाला. एका बाजूला मराठवाडयातील जनतेच्या विकासाच्या आकांक्षा व दुसऱ्या बाजूला हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली बुडणार असल्यामुळे ते जीवनातून उठण्याचा धोका या परिस्थितीमुळे मारुतरावांचा जबरदस्त कोंडमारा झाला. मराठवाडयातील शेती बागायती बनावी तेथील शेतकऱ्यांना पाणी मिळावे त्यांचे जीवन सुधारुन त्यांना माणूस म्हणून जगता यावे या विचारांना मारुतराव घुलेंचा विरोध कधीच नव्हता आणि असण्याचे कारण नव्हते.[६४]

धरणाला पर्यायी जागा शोधण्याचा प्रयत्न करावा आणि शेवगाव तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचे जीवन उध्वस्त होऊ नये हा मारुतरावांचा आग्रह होता. धरणग्रस्तांच्या चळवळी शेतकरी व गोदावरी धरण परिषदेमार्फत होत होत्या. मारुतराव घुले त्यावेळी सत्ताधारी पक्षाचे आमदार होते. आणि धरणात जाणारी गावे ही शेवगाव – नेवासा तालुक्यातील होती. अशा परिस्थितीत धरणग्रस्तांचे प्रश्न हाताळताना मारुतरावांचे अतिशय मोलाचे कार्य होते. त्यांनी सरकारशी सहकार्याचे धोरण ठेवीत विरोधकांशीही असेच सामांजस्य राखून चळवळीला मदत केली. अशा प्रकारे जनता व सरकार यांच्यात शिष्टाई करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून जनतेने त्यांच्यावर कधीही रोष व्यक्त केला नाही. जनता व सरकार या दोघात समन्वय साधण्यात ते पूर्ण यशस्वी झाले.

प्रत्येक धरणग्रस्त कुटुंबाला प्लॉट, घरे बांधण्यासाठी कर्ज मिळवून दिले. नवीन गावठाणांची निर्मिती करुन पुर्नवसनासाठी सामाजिक व शासकिय पातळीवर सर्व सहाय्य केले. सर्वानाच कमांडच्या जमिनी मिळवून दिल्या. नवीन गावठाण, घरे, रस्ता, शाळा, मंदिर, पाणी पुरवठा इ. सर्व सुविधा देण्यासाठी मारुतरावांनी खुप प्रयत्न केले. नेवासा – शेवगाव तालुक्यातील अनेक गावे या धरणाच्या इमारती, चावडया, समाजमंदिरे, मारुतीची मंदिरे, लोकांना घरासाठी जागा, पिण्याचे पाणी, रस्ते, वीज इ. सुविधा धरणग्रस्तांना पर्यायी जमीन त्यांच्या मुलांना नोकऱ्या हे सर्व प्रश्न मारुतरावांनी विधानभवनात समर्थपणे मांडले. धरणग्रस्तांना या सर्व सुविधा मिळवून देण्यासाठी रात्रदिवस मेहनत घेतली. धरणग्रस्तांना ताजनापूर कोपरे योजना मंजूर करुन घेतल्या. धरणग्रस्तांना हक्काचे पाणी उचलण्याचे परवाने मिळून दिली.[६५]

अहमदनगर जिल्हयातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये परिवर्तनाची लाट निर्माण झाली होती. जिल्हा सहकारी बँकेच्या योगदानातून आणि मारुतराव घुले यांच्या स्थापनपासून ते शेवटपर्यंत संचालक पदापर्यंत आर्थिकदृष्टया कमकुवत असलेला शेतकरी सावकारी पाशात अडकलेला होता. सततच्या दुष्काळामुळे पिळलेला होता. हाताची तोंडाशी गाठ घालण्याची विवंचना असणारे या जिल्हयातील सामान्य माणसाला विवंचना होती. परंतु जिल्हा सहकारी बॅकेने शेतीसाठी कर्ज पुरवठा सुरु केला. आणि हळूहळू हा लहान शेतकरी सामान्य माणूस सावकारी पाशातून मुक्त होत गेला. गत ५० वर्षात शेतक–यांसाठी विविध योजना राबवून अल्पदराने कर्जपुरवठा करुन अहमदनगर जिल्हयातील शेतकरी सबळ बनला. जिल्हा सहकारी बँकेच्या साहाय्याने जिल्हयात साखर उदयोगउभा राहिला. अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संस्थाना मदत दिली गेली. याचे मोठे योगदान हे मारुतराव घुले यांचे आहे.[६६]

जायकवाडी धरणाखाली गेलेल्या शेतकऱ्यांना जमिनी मिळविण्याबाबत योग्य न्याय मिळावा यासाठी मारुतराव घुलेंनी मोठे कष्ट घेतले. धरणग्रस्तांना पर्यायी जमीन मिळवून देण्यासाठी त्यावेळी मराठवाडयात जमीन खरेदी करण्यासाठी शासनाची मंजूरी लागत असे परंतु मारुतराव घुलेंनी धरणग्रस्तांसाठी परवानगीची गरज नसावी, त्यांचा त्याग लक्षात घ्यावा. हे शासनासमोर मांडले व धरणग्रंस्तांना स्थलांतरासाठी परवानगीची आवश्यकता राहिली नाही. धरणग्रस्तांच्या प्रश्नांसाठी लोकप्रतिनीधी या नात्याने त्यांनी प्रचंड प्रयत्न केलेले दिसून आले. धरणात गेलेल्या जमीनी शासनातर्फे दिली गेलेली नुकसान भरपाई पुर्नवसनासाठी दिली गेलेली गावठाणे धरणग्रस्तांच्या अडी अडचणी या सर्वाचा वेळ काढून शासनविरोधी दावे दाखल करण्यासाठी नाशिक येथील कुंडलिक कंपनीकडे ते काम सोपविण्यात आले. यासाठी घुलेंनी एक प्रचंड मेळावा आयोजित केला.

विकास कामासाठी घुलेंचा विरोध नव्हता परंतु विकासासाठी धरणग्रस्तांचे पुर्नवसन करावे अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. वेळ प्रसंगी स्वपक्षीयांशी जाहिर संघर्ष करुन धरणग्रस्तांसाठी शासनाकडून सुविधा प्राप्त करुन घेतल्या. त्यामध्ये ताजनापूर लिफट योजना असेल, बॅक वॉटर मधील ३ टक्के पाणी परवाना असेल, रस्ते, पाणी, वीज, यासारख्या नागरी सुविधा आणि आप्तग्रस्तांच्या मुलांसाठी शासकीय नोकऱ्या मिळाव्या म्हणून शेवगाव शहरामध्ये १९६६ साली सुशिक्षित बेरोजगार मुलांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून औदयोगिक प्रशिक्षण संस्था सुरु

केले.या परिसरातील शेतकरी खऱ्या अर्थाने सुखी व्हावा त्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन व्हावे. तसेच दोन्ही तालुक्यातील उस गळतीचा प्रश्न निर्माण झाला होता. म्हणून १९७० या वर्षी यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, आण्णसाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जायकवाडी प्रकल्पग्रस्तांसाठी श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली.[६७]

श्री ज्ञानेश्वर सहकारी कारखाना कार्यस्थळावर १९९० रोजी मारुतरव घुले यांनी श्री ज्ञानेश्वर कृषी विज्ञान फार्म ची स्थापना केली. या योजनेंतर्गत १४ एकर क्षेत्रामध्ये विविध प्रकारचे फळ झाडांची लागवड केलेली आहे. सदर कार्याद्वारा शेतकऱ्यांना प्रशिक्षण व शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची सोय उपलब्ध केलेली आहे. कृषी विज्ञान फार्मला यशवंराव चव्हाण मुक्त विदयापीठाची अभ्यास केंद्र म्हणून मान्यता मिळालेली आहे. कारखान्याच्या कार्यस्थळावर मारुतराव घुले पाटील नागरी पतसंस्थेची १९९२ रोजी स्थापना करण्यात आली आहे. त्याद्वारे सभासदांना व्यवसायाची कर्ज पुरवठा केला जातो. महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत साखर शाळा चालविली जात. १९८४ मध्ये साखर शाळेची स्थापना केली आहे. शासनाचे कोणतेही धोरण नसताना साखर शाळा स्वत: आर्थिक पाठबळावर चालवली जाते. एकूण १० साखर शाळा आहेत.

शेतकऱ्यांना आपल्या मालाच्या विक्रीसाठी दलालावर अवलंबून रहावे लागत होते व त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात शोषण होत होते. दलालापासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे यासाठी शेवगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती व खरेदी विक्री संघाची स्थापना केली. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य किंमत देवून सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी जिल्हयात पहिली जिंनिग व प्रेसिंग सोसायटी शेवगाव येथे घुले पाटलांनी स्थापन केले व नावारुपास आणले.[६८]

श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यासाठी धरणग्रस्त विभागात उपसा जलसिंचन योजना करण्यासाठी कारखान्याच्या हमीवर कर्ज उपलब्ध करुन दिले. त्यासाठी १० वीज भांडवल कारखान्यामार्फत भरण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यामुळे या कार्यक्षेत्रात सामुहिक व वैयक्तिक अशा २०० पेक्षा जास्त उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित आहे. कारखान्याच्या पाच हजार मी. विस्तारापर्यंतची वाटचाल, डिस्टलरी, ई. एन. ई. प्लॅट कंपोस्ट प्रोजक्ट इ. प्रकल्पाची उभारणी अत्यंत दूरदृष्टीने व काटकसरीने चालविले. त्यामुळे ते कर्जमुक्त राहू शकले होते. तसेच

सभासद व बिगर सभासदांना सारखाच भाव देण्याचा निर्णय हा शेतकऱ्यांचा हिताचा घुले पाटलांनी घेतला आहे. घुलेंनी श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यामार्फत अनेक पुरक उदयोगाला चालना दिली. त्यामुळे डिस्टलरी विभाग तसेच विभागात अल्कोहोल पासून दारू तयार केली गेली नाही. यातून नैतिक मुल्यांची जपवणूक केलेली दिसून येते. एक्टाम्यूटाल अल्कोहोल, मिथेन जनरेशन, गॅस प्रकल्प, कॅटिन्युअस फर्मीन्टेशन, फर्मीन्टेशन सिस्टिम, ज्ञानामृत दुध शितकरण केंद्र, फलोदयान रेशीम उदयोग इ. प्रकल्पाची उभारणी केली. गाळप क्षमतेत वाढ कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी मशिनरीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नामुळे कारखान्याची प्रगती दिवसेंदिवस वाढत गेली व आज राज्यात हा कारखाना आदर्श ठरला आहे.

थोडक्यात मारुतराव घुले यांनी नेवासा शेवगाव तालुक्याच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिले.सहकार क्षेत्र तालुक्याचे प्रतिनिधित्व करता, ग्रामीण विकासाचा धास घेतला. जन सामान्यांच्या विकासासाठी सतत कार्य करणे हे जीवनातील ध्येय त्यांनी मानले. म्हणून मारुतराव घुले यांचे कार्य भावी पिढीला दीपस्तंभासारखे आहे. श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून मारुतराव घुले यांच्या कार्याला पुढे नेण्याचे कार्य करत आहे. शेवगाव नेवासा तालुका म्हणजे धरणग्रस्ताचे पुर्नवसनाचे तालुके या धरणग्रस्तासाठी जायकवाडी जलशयातील १४ उपसा जलसिंचन योजना व मुळा कॅनॉलवरील उपसा जलसिंचन योजना राबविण्याचे धोरण स्वीकारुन तसेच वैयक्तिक शेतक–यांच्या उपसा सिंचन योजनेस कारखान्याच्या विज भांडवलाची मदत करुन ३१३ शेतकऱ्यांना लाभ मिळून २४०० क्षेत्र ओलिताखाली येउन सामुहिक उपसा सिंचन योजनेद्वारे १४०० एकराचे क्षेत्र ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न कारखान्याने केला आहे. खालील योजना चंद्रशेखर घुले हे कारखान्यामार्फत राबवित आहे.[६९]

श्री मारुतराव घुले पाटील गृहनिर्माण संस्था, कृषी विज्ञान फार्म व विविध योजना. कारखान्याची अर्कशाळा शुध्द् व निरोगी देणे, ऊस बेणे मळा योजना.माती परिक्षण योजना, ऊस पिकासाठी प्रेसमड व ताग बी योजना, वीज पंपाना इलेक्ट्रीक कनेक्शन साठी ॲडव्हान्स योजना, उसतोड व वाहतूक योजना, बुलडोझर योजना, रस्ते व बांधकाम विकास योजना, मागसवर्गीय अल्पभूधारक शेतकऱ्यांना अनुदान बंधारे गोबर बायोगॅस योजना, वृक्षारोपण, घरकुले उपक्रम, दुष्काळामध्ये गुरांची छावणी व दुष्काळ निधी, कुटूंबनियोजन शस्त्रक्रीया, रेशीम उदयोग, सभासदांसाठी जनता अपघात विमा योजना, अग्निशामक दल, श्री मारुतराव घुले पाटील नागरी

पतसंस्था, साखर शाळा अशा विविध योजनामार्फत कारखान्याचे कामकाज पाहत आहे. पाथर्डी मतदार संघातून एकदा आमदार पद भुषविले आहे. अहमदनगर जिल्हा काँग्रसेचे अध्यक्ष म्हणून सध्या कार्यरत आहेत.

नरेंद्र घुले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. ग्रामीण भागातील सर्व सामान्यांची पददलितांची मुले शिक्षण घेवून सुसंस्कृत बनून त्यांचा ग्रामीण विकासाला कसा हातभार लागेल, त्यासाठी प्रयत्न केले. ७ डिसेंबर १९७९ रोजी घुलेंनी शैक्षणिक कार्य वृध्दिंगत करण्याकरिता मारुतराव घुलेंनी शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेचे एकुण १० माध्यमिक विदयालये, चार ज्युनिअर कॉलेज, १ सिनिअर कॉलेज आहे. हेच कार्य पुढे नेण्याचे कार्य नरेंद्र घुले करित आहेत. मारुतराव घुले पा. शिक्षण संस्था संचलित जिजामाता औदयोगिक प्रशिक्षण केंद्र चालविले जाते. तसेच श्री ज्ञानेश्वर कृषी विज्ञान केंद्र, भेंडे बु. संचलित यशवंतराव चव्हाण महाराष्ट मुक्त विदयापीठ नाशिक अंतर्गत विविध कोर्सेस चालू आहेत. व्यवसायाच्या दृष्टीने अंत्यंत उपयुक्त असे कामकाज केले जातात. नेवासा – शेवगाव मतदार संघात दोन वेळा आमदार पद भुषविलेले आहे. शेवगाव दुध संघाचे कार्यभार हे नरेंद्र घुले करत आहे.[७०]

**१०. भाऊसाहेब थोरात – संगमनेर :–**

थोर स्वातंत्र्यसैनिक जेष्ठ गांधीवादी आणि सहकार व ग्रामीण विकासाच्या चळवळीतील नेते भाऊसाहेब थोरात यांचा जन्म १२ जानेवारी १९२४ रोजी संगमनेर तालुक्यातील जोर्वे या गावी एका मध्यम स्थितीतील शेतकरी कुंटूबात झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९३७ साली विदयालयीन शिक्षण बेलापूर नाशिक आणि संगमनेर येथे पुर्ण केले. १९४० साली भाऊसाहेब थोरात यांनी राष्ट्रीय सेवादलात सहभाग घेतला इंग्रज राजवटीतील जुलूमशाही विरोधात भाऊसाहेब थोरात यांच्या मनात लहानपणापासूनच असंतोष सुरू होता. १९४२ मध्ये महात्मा गांधीजींनी 'चले जाव' आणि 'करेंगे या मरेंगे' अशी घोषणा दिली आणि भाऊसाहेब थोरातांनी स्वातंत्र्य लढयात सहभाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात भाऊसाहेब थोरांताचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी इंग्रज राजवटीविरूध्द अनेक बंड करून इंग्रजांना सळो की पळो करून जानेवारी १९४३ मध्ये स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यामुळे भाऊसाहेब थोरात यांना अटक होऊन नाशिक सेंट्रल जेल मध्ये १५ महिन्यांची 'तुरूंगवासाची' शिक्षा झाली.[७१]

१ एप्रिल १९४४ रोजी नाशिक सेंट्रल जेलमधून सुटका झाल्यानंतर भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर आणि अकोले तालुक्यातील विडी कामगारांच्या युनियनची स्थापना केली. आणि युनिअनचे सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. १९४५ साली विडी कामगारांच्या वेतनासाठी लढा पुकारून एक महिन्याचा लक्षणिक संप केला आणि विडी कामगारांना न्याय मिळवून दिला. १९४६ मध्ये शेतकऱ्यांप्रमाणे जागृती निर्माण करण्याचा दृष्टीने सावकारशाही विरूध्द चळवळ उभारून १९४८ पर्यंतच्या कालावधीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अनेक लढे दिले आणि त्यामध्ये अटकही झाली.

१९५३ मध्ये जोर्वे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदावर भाऊसाहेब थोरात यांची निवड झाली. १९५६ मध्ये संगमनेर तालुका सहकारी सुपरवायझिंग युनियनचे अध्यक्षपद मिळाल्यानंतर त्यांनी संगमनेर तालुक्यात अनेक सहकारी संस्थाची स्थापना केली. सुपरवायझिंग युनियनच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामसहकारी संस्थाच्या प्रत्येक सभासदाच्या शेती विकासाचा पंचवार्षिक कालबध्द नियोजनाचा प्रकल्प आराखडा भाऊसाहेब थोरात यांनी तयार केला १९५७ मध्ये अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. १९६९ मध्ये अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे संचालक म्हणून भाऊसाहेब थोरात यांची निवड झाली. जून १९६० मध्ये जोर्वे येथे अहमदनगर जिल्हा मराठा विदया प्रसारक समाज या संस्थेमार्फत त्यांना समता विदयामंदीर या माध्यमिक विदयालयाची सुरूवात केली. १९६५ मध्ये भाऊसाहेब थोरात यांची अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे चेअरमन म्हणून पहिल्यांदा निवड झाली. महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचे संचालक म्हणूनही त्यांची १९६५ मध्ये निवड झाली. १९६६ मध्ये त्यांनी संगमनेर येथे सहयाद्री बहुजन विदया प्रसारक समाज या संस्थेची स्थापना करून सहयाद्री विदयालय सुरू केले.[७२]

१९७८ मध्ये संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांची 'मीटर हटाव मोहिम' त्यांनी सुरू केली. या मोहिमेअंतर्गत कार्यकर्त्यांनी ५००० मीटर काढून आणले आणि मिरवणुकीने विज मंडळाच्या कार्यालयात जमा केले. १९७८ मध्ये डॉ. आण्णासाहेब शिंदे यांचे मार्गदर्शन आणि सहकार्याने भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर तालुका सहकारी दुध उत्पादक संघाची स्थापना केली आणि संगमनेर तालुक्यामध्ये गावोगावी दुध संकलन केंद्रे सुरू करण्यात आली. १९७२–१९८३ मध्ये भाऊसाहेब थोरात यांच्या अथक परिश्रमामुळे अमृतवाहिनी नागरी सहकारी बॅंकेस रिझर्व्ह

बँकेकडून परवानगी मिळाली आणि संगमनेर कारखाना कार्यस्थळावर अमृतवाहिनी नागरी सहकारी बँक सुरू करण्यात आली. सौ. मथुराबाई भाऊसाहेब थोरात सेवाभावी ट्रस्टमार्फत अमृतवाहिनी रूरल हॉस्पीटलची १९९३ मध्ये निर्मिती करण्यात आली. याशिवाय अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेमार्फत अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेज़, अमृतवाहिनी पॉलिटेक्नीक कॉलेज आणि औदयोगिक प्रशिक्षण संस्था कॉलेज सुरू करण्यात आले. अमृतवाहिनी मॉडेल स्कुल या इंग्रजी माध्यमाच्या वसतीगृहात्मक विदयालयाचीही स्थापना करण्यात आली. १९८४ मध्ये भाऊसाहेब थोरात यांची भारतीय औदयोगिक वित्तीय महामंडळ नवी दिल्ली या वित्त संस्थेवर संचालक म्हणून निवड झाली. संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याचा पुरक उदयोग म्हणून आसवानी (डिस्टलरी) प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पात कुठल्याही परिस्थिती दारू बनविण्याचा नाही हा ठाम निर्धारही करण्यात आला ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दराला आधिकाआधिक भाव दयायचा असेल तर साखर कारखान्याबरोबर पुरक उदयोगाचे जाळे निर्माण केले पाहिजे हे सुत्र पकडून भाऊसाहेब थोरात यांनी अर्कशाळा प्रकल्पाची उभारणी केली. १९८६ मध्ये बगॅसवर आधारित कागद कारखाना सुरू करण्यात आला. १९८७ मध्ये संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याची दैनंदिन जाळप क्षमता २००० मे. टनावरून्न ३५०० मे. टनांपर्यत वाढविण्यासाठी विस्तारीकरण करण्यात आले.[७३]

भाऊसाहेब थोरात यांनी ग्रामीण जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने अमृतवाहिनी ग्रामीण रूग्णालय घुलेवाडी येथे १९८८ मथ्ये सुरू केले अत्यंत अल्प दरात रूग्णांवर या रूग्णालयांमध्ये उपचार केले जातात. अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेची स्थापना १९८३ मध्ये झाली असून अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविदयालय तंत्रनिकेतन एम. बी. ए. आणि इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्यात आली. अभियांत्रिकी महाविदयालयामध्ये ७ डिग्री कोर्सेस तसेच एम. बी. ए. व कॉम्प्युटर संबधांचे ४ कोर्सेस सुरू आहेत. अमृतवाहिनी तंत्रनिकेतन या विभागास राष्ट्रीय मानंकन परिषद यांच्याकडून मानांकन मिळालेले असून दंत महाविदयालय, औषधनिर्मिती शास्त्र महाविदयालय सदर महाविदयालयात शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना अदयावत सर्व सोयीने परिपुर्ण वसतीगृहाची सोय करण्यात आलेली आहे.या संस्थेमध्ये सुमारे ३ हजार विदयार्थी शिक्षण घेत आहेत. या संस्थेमुळे ग्रामीण भागातील हुशार विदयार्थ्याची तांत्रिक शिक्षण घेण्याची सोय झालेली आहे. संगमनेर तालुक्यामध्ये शिक्षणाचे मोठे जाळे निर्माण केलेले आहेत.

यामध्ये २ प्राथमिक शाळा, २५ माध्यमिक विदयालये, ४ ज्युनिअर कॉलेजेस व २ सिनीअर कॉलेज अशा विविध शाखा कार्यरत असून त्यामधून दरवर्षी सुमारे १८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून ७०० कर्मचारी कार्यरत आहेत. अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे विश्वस्त म्हणून सहकार सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अखेरपर्यत काम पाहिले सध्या थोरात घराण्यांचे वारसदार संस्थेचे विश्वस्त बाळासाहेब थोरात काम पाहत आहे. तसेच भाऊसाहेबांचे जावई हे संस्थेचे अध्यक्ष म्हणून डॉ. सुधीर तांबे कार्यरत आहे.

भाऊसाहेब थोरातांनी दि.१२/११/१९७७ राजी संगमनेर तालुका दुध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या. संगमनेर या दुध संघाची सहकारी तत्वावर स्थापना केली. अमृत उदयोग समूह उभारला भाऊसाहेब थोरातांनी उभारलेल्या या उदयोगाला आज त्यांचे चिरंजीव बाळासाहेब थोरात कुशलपणे कारभार करत आहेत संगमनेर तालुक्यात संगमनेर दुध संघाने २ लाख ७२ हजार १४४ लिटर्स दुध संकलन केले जाते. जिल्हयाचे सहकारी दुध संघाचा संकलनापैकी ४७% दुध संकलन संगमनेर दुध संघाने केलेले आहे. [७४]

१९७६–७७ मध्ये भाऊसाहेब थोरात यांनी सर्वप्रथम लोकांना एकत्र करून भाग भांडवल गोळा करण्यास सुरूवात केली आणि बँकेची रितसर नोंदणी करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. भाऊसाहेब थोरात यांच्या प्रत्यनांना यश येऊन २८/७/१९८३ रोजी बँकेस रिझर्व्ह बँकेची मान्यताा मिळाली आणि अमृतवाहिनी अर्बन को–ऑप बँक लिमिटेड या बँकेची स्थापना झाली. या बँकेने यशस्वी वाटचाल केलेली आहे. आपल्या पारदर्शी कारभारामुळे बँकेने २८ वर्षाची यशस्वी वाटचाल पुर्ण केलेली आहे. श्री भाऊसाहेब थोरात अमृतवहिनी सहकारी बँक लिमिटेड या बँकेची इमारत भव्य स्वरूपाची असून कारखाना कार्यस्थळावर बँक स्थित आहे. या बँकेने २९ वर्ष पुर्ण केले असून आपले रौप्य महोत्सवी वर्षे साजरे केलेले आहेत ३१ मार्च २००६ रोजी बँकेच्या ठेवी ३० कोटी रूपये आणि कर्जे वाटप २१ कोटी रूपये इतकी होती. ३० सप्टेंबर २००८ अखेर बँकेच्या ठेवी ५५ कोटी व कर्जे वाटप ३२ कोटी इतकी वाढली असून बँकेच्या ३ वर्षाच्या कालावधीतील व्यवसायात ७०% वाढ झालेली दिसून येते. २००८–०९ च्या काळात श्री. भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेकडून कर्ज घेतलेल्या ११७ शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली असून ती रक्कम ८० लाखांपर्यत होती.

भाऊसाहेब संतुजी थोरात हे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, बँकींग, शैक्षणिक, सहकार अणि पर्यावरण क्षेत्रातील कार्य सहकाराच्या माध्यमातून जनसामान्यांच्या सर्वांगीण उन्नतीला दिशा, आधार आणि बळ देता येते या विचारांवर दृढ श्रध्दा ठेऊन १०/०४/१९८१ रोजी संगमनेर ॲग्रीकल्चर प्रोडयुस ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि. अमृतनगर (शॅम्प्रो) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा स्थापनेचा उद्देश हा या कारखान्याच्या ऊस उत्पादक सभासदांच्या वतीने ऊसतोडणी अणि वाहतुक कामाचे नियोजन आणि व्यवस्थापन करणे हा होता. नामांकीत अल्ट्राटेक कंपनीचे सिमेंट, महावीर सरस्वती कंपनीचे अँगल, चॅनल व स्टिल मटेरियल, राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलाइसर्स लिमिटेडची सर्व प्रकारची रासायनिक खते, यश कंपनीचे पन्हाळी पत्रे, चारमिनार कंपनीचे सिमेंट पत्रे, वाहनांसाठी एम. आर. एफ, सीएट कंपनीचे टायर, शेतीसाठी टेक्स्मो कंपनीची इलेक्ट्रिक मोटार यासारख्या अनेक वस्तूंची विक्री संस्थेमार्फत करण्यात येते.

देशातील सहकार क्षेत्राची उलाढाल पाहता एकूण ठेवीत महाराष्ट्राचा वाटा सरासरी ३६ असुन दिलेल्या कर्जाच्या बाबतीत राज्याचा वाटा सुमारे २८ आहे. ही महाराष्ट्राची कामगिरी निश्चितच लक्षणीय आहे. कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी नेतृत्वास अतिशय महत्व असते सामान्य व्यक्ती या नेतृत्त्वाच्या दिशा दर्शनावरच काम करीत असतात म्हणून खुल्या अर्थव्यवस्थेत सहकारी नेतृत्वावर खुप मोठी जबाबदारी असते. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचे दूरदर्शी मार्गदर्शन व त्यांचे चिरंजीव माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांचे नेतृत्व यामुळे संगमनेर तालुक्यात सहकार चांगला रूजला अणि विकसीत झाले. स्पष्ट दिशा असणारे नेतृत्व असेल तर शेतकऱ्यांना काय दिले पाहिजे व ते टिकेल कसे याचा राजमार्ग म्हणजे सहकार आहे. स्थिर विचार व दमदार वाटचाल यामुळे संगमनेर तालुक्यात सहकारामुळे सर्वस्तरावर विकास झाला. कोणत्याही शाश्वत पाटपाण्याची व्यवस्था नसलेल्या संगमनेर तालुक्यात उपसा जलसिंचन योजना हीच शेती विकासाच्या रक्त वाहिन्या आहेत जुनाट व नादुरूस्त पााईपलाईन्सच्या दुरूस्तीसाठी साखर कारखाना सहकार्य करतो. भंडारदरा धरणासाठी पाणी पुरवठयामुळे आजपर्यंत सहकारी संस्था टिकून आहेत भविष्यात भंडारदरा आणि निळवंडेच्या उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा काटकसरीने वापर केल्यास बऱ्यापैकी पाणी संगमनेर तालुक्यास मिळू शकेल.[७५]

अनेक आंदोलने मोर्चे काढून बाळासाहेब थोरात यांनी प्रवेरच्या पाण्यावरचा संगमनेर तालुक्याचा हक्क मिळविला म्हणूनच तालुक्याचा विकास होऊ शकला आहे. ग्रामीण भागातील

शेतकऱ्यांना विविध कार्यकारी सोसायटयांच्या माध्यमांतून कर्ज उपलब्ध होते या संस्था आहेत म्हणून ग्रामीण भागात शेतकऱ्यांना ग्रामीण भागात कर्ज मिळू शकते राज्यात शेतीसाठी जो अर्थपुरवठा होतो त्यामध्ये जवळजवळ ६७% ते ७०% सहकारी सोसायटयांमार्फत होतो. ग्रामीण शेती पतसंस्थेच्या माध्यमातूनही चांगला कर्जपुरठा होत आहे.

संगमनेर तालुक्यात विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करून सहकारी संस्थांचे जाळे निर्माण झाले संगमनेर तालुक्यात एक हजारांपेक्षा जास्त सहकारी संस्थांची नोंदणी झालेली आहे. तालुका पातळीवर संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना, संगमनेर तालुका सहकारी दुध उत्पादक व प्रक्रिया संघ, संगमनेर तालुका सहकारी ॲग्रीकल्चर प्रोडयुस प्रोसेसिंग मार्केटिंग को–ऑप सोसायटी, कुक्कुटपालन, सहकारी व्यावसायिक संस्था कार्यरत आहेत.[७६]

बाळासाहेब थोरातने गावातच अमृतवाहिनी दुध उत्पादक सहकारी संस्था स्थापन केली. १९७८ सालीच संगमनेर तालुका सहकारी दुध संघाची स्थापना झाली होती. पुढे या संस्थेवर संचालक म्हणून बाळासाहेब थोरातांची निवड झाली. संगमनेर तालुका दुष्काळी टापूत मोडणारा शेती मुख्यत्वे कोरडवाहू विडी बांधण्याच्या व्यवसायात लोक मोठया संख्येने या विडी कामगारांचे प्रश्न शेतकऱ्यांचे विविध प्रश्न यावर तालुक्यात सभा, मोर्चे, संघर्ष, आंदोलने नेहमीच चालू असत. या आंदोलनामध्ये बाळासाहेब थोरातांचा प्रमुख सहभाग राहु लागला. संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघावर बाळासाहेब संचालक म्हणून निवडून आला होताच. पुढे संघाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. १९९३ सालापर्यत त्यांनी दूध संघाचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली. १९९९ ची निवडणूक जिंकल्यानंतर पक्षाने त्याला महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे खात्याचे राज्यमंत्रीपद देऊन कार्याची संधी दिली संघटनात्मक कार्यातही प्रदेश काँगेस कमिटीचे सरचिटणीसपद त्यांनी उत्तम प्रकारे सांभाळले. महाविदयालयीन जीवनात पाणी पंचायत चळवळीच्या कार्यातून आलेल्या अनुभवांचा अत्यंत चांगला उपयोग बाळासाहेब थोरातांनी संगमनेर भाग साखर कारखान्याच्या अध्यपदाच्या काळात केला पर्जन्य छायेच्या प्रदेशात मोडणाऱ्या म्हणून त्याने जिल्हा परिषद पंचायत समिती आणि संगमनेर भाग साखर कारखाना यांच्या संयुक्त प्रयत्नांतून कार्यक्षेत्रातील ओढे, नाले अडवून बंधाऱ्यांची मालिकाच निर्माण केली आहे. चांगला पाऊस पाणी झाला तर या भरलेल्या बंधाऱ्याच्या पाण्यातून एक दोन वर्षाच्या पिकाची तरी व्यवस्था लागली शेतजमीन पाणलोट क्षेत्र विकास संस्थेच्या सहकार्याने फादर बाखर आणि फादर

रॉबर्ट यांच्या साथीने तालुक्यातील अनेक गावांमध्ये वृक्षारोपण राबविला आणि त्या खेडयांचे संपुर्ण चित्रच बदलून टाकले पाटबंधारे खात्यांचे राज्यमंत्रीपद भूषवित असताना संपुर्ण महाराष्ट्रात पाणलोट क्षेत्र विकासाला बाळासाहेब थोरातांनी गती दिली संगमनेर पॅटर्न अन्यत्र सर्वत्र कसा राबविता येईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. बाळासाहेब थोरात आज महसुल मंत्री आहे याआधी त्याच्याकडे कृषी खात्याचे कॅबिनेट मंत्री पद होते.[७७]

राज्यातील विविध समस्यांच्या सोडवणूकीकडे लक्ष पुर्ण केंद्रीत करीत असताना व दोन जिल्हयाचे संपर्क मंत्रीपद सांभाळीत असतानाही मतदार संघातील विकासाकडे त्याचे सतत लक्ष असते. गावोगाव लोकांना पिण्यासाठी पाणी पुरविणे, रोजगार पुरविणे, जनावरांचा चारा पुरविणे इत्यादी बाबतीत अधिकाऱ्यांना सजग व सतर्क ठेवण्यातच तो नेहमी दक्ष असतो. निळवंडे धरणाची निर्मिती हा आमच्या विभागातील विकासाचा कळीचा मुद्दा दूष्काळी भागातील शेतीला पाटपाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून बाळासाहेब थोरातांनी निळवंडे धरण झालेच पाहिजे असा शासनाकडे प्रशासकीय मंजुरी मिळविली. धरणाचे काम सुरू केले, कालव्यांचे काम सुरू केले, पुर्नवसनाचा प्रश्न मार्गी लागला आज निळवंडे धरणाचे ५० टक्के पेक्षा जास्त काम पुर्ण झाले आहे. पुढील काम निधीच्या उपलब्धतेनुसार चालूच आहे. याच निळवंडे धरणातुन संगमनेर शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा योजना मजुंर करवून घेतली आहे. या धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणी वाहू लागले व शेतकऱ्यांच्या शेतात पोहोचवून पिके तरारतील आणि संगमनेरच्या नागरिकांना मुबलक शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा त्यासाठीच्या योजनेतून यशस्वीपणे होऊ लागले. [७८]

महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात सलग पाचव्यांदा मंत्री म्हणून शपथ घेवुन काम करण्याचा सन्मान बाळासाहेब थोरात यांना मिळाला यंदा तर त्यांना महसुल व खार जमीन सारखे महत्वाच्या खात्याची जबाबदारी देवून त्यांच्या कामावर शिक्कामोर्तब केले आहे. नामदार बाळासाहेब थोरात यांनी यापुर्वी अनेक महत्वाच्या खात्याची जबाबदारी पार पाडली आहे. सुरूवातीला त्यांनी पाटबंधारे राज्यमंत्री म्हणून काम करताना पाट पाण्याच्या प्रश्नांत दाखविलेली तत्परता आजही अनेकांच्या स्मरणात आहे. लासलगावकरांनी तर नामदार थोरात यांनी त्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडविल्याने त्यांचा भव्य सत्कार करून पदवी बहाल केली पुढे राज्यांच्या मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली कृषीमंत्री म्हणून काम करताना शेतकऱ्यांचे प्रश्न

सोडविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. कृषीखात्यात अनेक महत्वाचे बदल घडवुन आणले याच बरोबर जलसंधारणच्या अनेक कामांत त्यांनी हिरहिरीने भाग घेतला. पाणी आडवा, पाणी जिरवाचा महत्वाचा उपक्रम यशस्वी केला. शिक्षण खात्याचे अतिरिक्त कार्यभार सांभाळताना नवीन धोरणाची अमंलबजावणी करताना सुप्रिम कोर्टापर्यत आपली बाजू समर्थपणे मांडुन विजय मिळविला राजशिष्टाचार मंत्री खार जमीन मंत्रीचे काम केले सध्या महसुल खात्याचे काम त्यांच्याकडे आहे.मंत्री म्हणुन काम करताना अनेक नेतेमंडळीना आपले काम दाखविण्याची संधी मिळाली. विधी महाविद्यालयात असताना पाणी पंचायतीच्या चळवळीमध्ये बाळासाहेबांनी सहभाग घेतलेला आहे. त्यावेळी कै. विलासराव साळुंके यांनी पाण्यावर सर्वाचा समान हक्क आहे हा विचार सर्व राज्यांपुढे आणला आणि पंचायत चळवळ उभी केली त्यानंतर बाळासाहेब विडी कामगार आणि शेतकऱ्यांच्या चळवळीमध्ये सहभागी झाले त्यासाठी कारावास सुध्दा त्यांनी सहन केला. सामाजिक आणि पुरोगामी विचारावर श्रध्दा असल्यामुळे मराठवाडा विदयापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे म्हणून त्यांनी कारावासही सहन केला आहे. तरूण वयातच त्यांनी सहकारी क्षेत्राकडे लक्ष दयायला सुरूवात केली. १९८० साली अमृत सहकारी संघाचे ते अध्यक्ष झाले त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच शिक्षण क्षेत्रामध्येही मोठे योगदान आहे. श्री बाळासाहेब थोरात हे संगमनेर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन झाले आणि निरनिराळ्या शासकीय समित्यामध्ये काम करण्याची संधी त्यांना मिळाली सहकारी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे ते संस्थापक व अध्यक्ष होते. नॅशनल हेवी इंजिनिअरिंग सहकारी संस्थेवर ते संचालक होते आणि काँग्रेस पक्षामध्ये त्यांनी महत्वाचे काम केले असून सरचिटणीस सहकारी संस्थेवर ते संचालक होते आणि काँग्रेस पक्षामध्ये त्यांनी महत्वाचे काम केले असून सरचिटणीस म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्य केले आहे. सतत १९७५ पासून २००४ पर्यत महाराष्ट्र विधानसभेवर ते निवडून येत आहेत. आणि त्यांच्याकडे १९९९ नंतर राज्यमंत्री पदाची आणि आता कॅबिनेट दर्जाच्या मंत्रीपदाची जबाबदारी आलेली आहे. सध्या महसुल खात्याचा कारभार बाळासाहेब थोरात हे पाहत असून त्यांनी आपल्या सर्व कार्यालयाला एक नवी दिशा आणि गती दिलेली आहे. श्री बाळासाहेब यांनी वारंवार इस्त्राईल, युरोप, जपान, कोरिया, अमेरिका आदी देशांचा अभ्यास केला आहे.[७९]

**११. विठ्ठलराव विखे – राहाता :-**

महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातील एक आघाडीचे नाव म्हणजे विठ्ठलराव एकनाथ पाटील सहकारी या तत्वाच्या क्षमता लक्षात घेऊन विठ्ठलराव विखेंनी हे तत्व आचरणात आणले शेतकऱ्यांपर्यत हे तत्व नेले. अनेक संस्था स्थापन करून सहकाराचा परिचय त्यांनी ग्रामीण महाराष्ट्र करून दिला विखेंनी १९२३ मध्ये लोणी बुद्रक सहकारी पतपेढी स्थापन केली. सहकारी तत्वावर स्थापन झालेली ही आशियातील पहिली पतपेढी मानली जाते यानंतर गावोगावी सहकारी पतपेढया स्थापन केल्या व त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली . १९२९ मध्ये विठ्ठलराव विखेंनी राजुरी या गावी आदिवासी समाजासाठी सहकारी सोसायटीची स्थापना केली. गोदावरी, प्रवरा कॅनॉल खरेदी विक्री संघाच्या स्थापनेतही त्यांनी पुढाकार घेतला होता. १९४४ मध्ये सहकारी तत्वावरील शेतीसंस्था स्थापन केली. दि.१७ जून १९५० रोजी अहमदनगर जिल्हयातील प्रवरानगर लोणी येथे आशिया खंडातील सहकारी तत्वावरील पहिला साखर कारखाना विठ्ठलराव विखेनी उभा केला. या कारखान्यासाठी शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून त्यांना सहकारी तत्वावरील कारखान्याचे महत्व पटवून देणे, शेतकऱ्यांकडून कारखान्याच्या भागभांडवलाची उभारणी करण्याचा प्रयत्न करणे, कारखान्याच्या मंजूरीसाठी शासकीय पातळीवर पाठपुरावा करणे आदी कामांमध्ये विठ्ठलराव विखेंनी कार्य केले. या काखान्याच्या आर्थिक सामाजिक राजकीय व शासकीय अशा सर्व क्षेत्रामध्ये विखेंनी कार्य केले. या सहाकार क्रांती घडवणात्या कारखान्याच्या स्थापनेत त्यांना अर्थतज्ञ धनंजयराव गाडगीळ यांचे सहकार्य लाभले य कारखान्याचे पहिले अध्यक्ष धनजंयराव गाडगीळ होते. शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी विखे यांनी लोणी बुद्रक सेवा सहकारी सोसायटीचे पुनरूजीवन केले. विखे पाटलांनी सहकार चळवळीचा मंत्र शेतकऱ्यांसमोर मांडला आणि बुडणाऱ्या य पतपेढयांना उर्जितावस्था निर्माण केली.[८०]

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने या देशातील शेतकरी आणि शेतमजूर देशाच्या अर्थकारणाचा कणा समजला जातो. इंग्रजांनी भारतावर दिडशे वर्षे राज्य केले. या काळात ग्रामीण समाज पूर्णपणे भरडून निघाला होता. इंग्रजाांच्या बरोबरीने देशातील सावकार आणि भांडवलदात त्यांच्या परीने समाजाचे शोषण करीत आहे. अहामदनगर हा जिल्हा सुरूवातीपासून दुष्काळी असल्यामुळे या शेती पिकत नव्हती त्यातच सावकारशाहीच्या वर्चस्वामुळे या भागातील शेतकरी

गुलामगिरीने जीवन जगत होते. जिल्हयाच्या उत्तरेत भंडारदरा धरणामुळे शेतीसाठी पाण्याची सोय असली तरी अति पाणी वापरामुळे जमिनी क्षारपड झाल्यामुळे शेतकऱ्यांना ऊसाशिवाय दुसरे पीक घेणे शक्य नव्हते. म्हणून खासगी कारखाने या भागात मोठया प्रमाणावर उभे राहु लागले परंतु त्यांच्याकडून शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू झाली म्हणून गुऱ्हाळ चालवून गुळ तयार करण्यापलीकडे शेतकऱ्यांकडे पर्याय उरला नव्हता अशा परिस्थतीत शेतकऱ्यांनी तयार केलेल्या गुळालाही बाजारात मंदीमुळे किंमत नव्हती अशा परिस्थितीत अज्ञान द्रारिद्रय आणि रोगराईच्या चक्रात या भागातील पुर्णपणे समाज भरडून निघत होता.[८१]

विठ्ठलराव विखे पाटिल हे स्वतः शेतकरी असल्याने शेतकऱ्यांचे दुःख आणि वेदना त्यांनी जवळून अनुभवल्या होत्या ग्रामीण समाजाच्या विविध समस्यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला होता. शेतकरी आणि शेतमजुराला आर्थिक स्थैर्य लाभल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत हे विठ्ठलराव यांनी जाणले तेव्हापासूनच शेतकरी व सर्वमान्य जनता द्रारिद्रय आणि सावकारी पेशातून मुक्त करण्याची ठाम भूमिका स्विकारली विखेंनी व्यावहाारिक अर्थशास्त्राची उत्तम जाण असल्याने आर्थिक स्थिरता लाभल्याशिवाय ग्रामीण भागाचे प्रश्न सुटू शकत नाही. विठ्ठलराव विखेचं लक्ष शेतकऱ्यांच्या विकासाकडे होते तसंच उदयाची पिढी म्हणून येणाऱ्या बालकाच्या विकासाकडे लक्ष होत ही पिढीच देशाच्या भवितव्याची खारी आधारस्तंभ होती ही दूरदृष्टी समोर ठेवून विखेंनी ५ ऑगस्ट १९५८ रोजी लोणी येथे 'बालशिक्षण मंदिराची'स्थापना केली.

नगर जिल्हयात शेतकी कॉलेज काढण्यासाठी विठ्ठलराव विखेंनी धडपड सुरू केली होती. त्यासाठी स्वतःच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. बापुसाहेब भापकऱ शंकरराव काळे आदी तेरा सभासद या समितीत होते. या समितीच्या वतीने जिल्हयातील ग्रामपंचायती सोसायटया वगैरे संस्थाकडून ठराव पास करण्यात आला व महात्मा फुले कृषी विदयापीठ स्थापना झाली. विठ्ठलरावांच्या एकुणच शिक्षणाविषयक उपक्रमात 'प्रवरा पब्लिक स्कूल' ही ग्रामीण भागातील एक अत्यंत उपयुक्त अशी योजना होती. पब्लिक स्कुलसारख्या संस्था केवळ मोठया शहरातच निघू शकतात. असा जो लोकसमज होतो तो विठ्ठलराव विखेंनी जुलै १९६४ रोजी प्रवरा पब्लिक स्कूलची स्थापना करून भ्रममुलक ठरविला.[८२]

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कर्मवीरांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेला मदत केली व या संस्थेच्या विकासाचा एक मोठा आधारस्तंभ होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी,

सात्रळ, कोल्हार येथे माध्यमिक विदयालयांची व आश्वी बुद्रकला 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. श्रीरामपुर जवळच्या वडाळा महादेव येथे 'छत्रपती शिवाजी विदयालय'साठी शिंदे वसतिगृह सुरू करण्यात आले. श्रीरामपुर येथील रा. ब. ज. बोरावके व सी. आर. डाकले कॉमर्स ही दोन महाविदयालये सुरू करण्यातही विठ्ठलराव विखेंचा सक्रिय सहभाग होता. हा महाविदयालयात शिकणाऱ्या मुलांसाठी वसतिगृह बांधण्यासाठी मार्गदर्शन केले. देणगी गोळा करण्यासाठी पुढाकार घेतला. या प्रयत्नांमुळे वडाळा महादेव येथे दीडशे एकर ऊसशेती संस्थेसाठी देणगी म्हणून मिळाली होती. विठ्ठलरावांच्या ध्येयनिष्टेमुळे नगर जिल्हात रयत संस्थेची भरभराटी झाली आहे.

ग्रामीण जनतेची सर्वांगीण उन्नती व्हावी या विठ्ठलराव विखेंनी प्रवरा कारखान्यामार्फत अनेक विधायक योजना व उपक्रम सुरू केले. मुलींच्या शिक्षणाचे विठ्ठलराव विखे पुरस्कर्ते होते. ग्रामीण भागातील मुलींच्या बौधिक, शारिरीक व नैतिक शिक्षणाकडे लक्ष पुरवून या मुलींना सर्वांगीण विकास साक्षरता येईल अशी संधी या साधने उपलब्ध करून दिली. हिंगणे येथे जावून आण्णासाहेब कर्वे यांचा आश्रम आणि मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था कशी आहे ती पाहिली एक मुलगी शिकली तर दोन कुटूबांना शिकवते ही त्यांची धारणा होती. या दुर्दम्य इच्छेतून सन १९६९ मध्ये वसतिगृहात्मक प्रवरा कन्या विदयामंदीर यांची स्थापना केली. या संस्थेची आणि गरिब व होतकरू मुलींना आर्थिक मदत करणाऱ्या 'कै. गंगूबाई एकनाथराव विखे पाटील' ट्रस्टची स्थापना केली. या ट्रस्टसाठी विठ्ठलरावांनी बारा एकर जमीन व तीस हजार रूपयांचा निधीही तत्काळ उपलब्ध करून दिला.

विठ्ठलराव विखेंनी केवळ मुलींच्याच शिक्षणाच्या दृष्टीने प्रयत्न केले असे नाही तर प्रवरा परिसरातील कष्टाळू व घरखर्चाला हातभार लावू शकणाऱ्या माताभगिंनीसाठी त्यांनी शिवणकामाचे वर्ग चालू केले होते. यातूनच पुढे प्रवरा कन्या विदयामंदिराशी संलग्न असलेल्या 'वनिता विकास मंडळाची स्थापना झाली. या संस्थेमार्फत प्रौढ स्त्रियांना शिक्षणाबरोबरच गृहशास्त्र पाकशास्त्र बागकाम भाजीपाला लागवड व आधुनिक शेतीशास्त्र तसेच कुटूंबनियोजन स्त्रीयांचे आरोग्य आदर्श आहार अन्नधान्य व खादयपदार्थाची जपणूक भरतकाम औषधोपचार इ. विषयांचे अभ्यासवर्ग सुरू करण्यात आले.[८३]

ग्रामीण समाजाच्या सर्वागीण शिक्षणाचे केंद्र ही संस्था बनली आहे. सन १९६२ मध्ये पुणे विदयापीठाचे कार्यक्षेत्र पुण्यापुरते मर्यादित राहावे असा विचार पुढे आला होता, त्यावेळी

अहमदनगर येथे श्री ज्ञानेश्वर विदयापीठ व्हावे यासाठी भाऊसाहेब फिरोदिया यांच्या समावेश विठ्ठलराव विखे जी पुढाकार घेतला. शिक्षणाचे हे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी १९६४ साली प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था व प्रवरा एज्युकेशन सोसायटी ची स्थापना केली. यांच्या स्थापनेपासून गरिब व होतकरू मुला मुलींसाठी 'कमवा व शिका' ही योजना राबविणारी आणि 'प्रवरा शिक्षणोत्तजक पतपेढी च्या मार्फत कर्जाऊ शिष्यवृत्त्या देणारी ग्रामीण भागातील ही पहिली शिक्षण संस्था होती. संस्थेचा वाढता व्याप आर्थिक दृष्टया सुदृढ व्हावा म्हणून विठ्ठलरावांनी त्यांच्या वैयक्तिक स्वरूपात मिळालेले १२०००० रूपयांचे विमा कमिशनही या संस्थेसाठी दान दिले. आर्थिक निधी जमा करण्यासाठी गावदेव म्हसोबाच्या नावाने म्हसोबा फंड ट्रस्टही स्थापन केला.

शिक्षणाप्रमाणेच ग्रामीण जनतेच्या आरोग्याकडेही विठ्ठलराव विखेंचे लक्ष होते. जी माणसे शाररीक व्याधींनी ग्रस्त होती त्यांच्यासाठी माझ्या शेती बांधवाना योग्य ते औषध माफक दरातच दया. अशी ठिकठिकाणच्या डॉक्टरांना विठ्ठलराव विखेची नम्र विनंती होती. श्रीरामपुर येथे कामगार सभेच्या वतीने 'कामगार हॉस्पीटल ची योजना पुढे आली. तेव्हा विखे यांनी तीस हजार रूपयांची देणगी देऊन या सत्कार्याचा पाठपुरावा केला होता. कामगार हॉस्पीटलचे विश्वस्त आणि अध्यक्ष म्हणून विठ्ठलराव विखे कार्यरत होते. लोणी बुद्रक येथे ग्रामीण भागातील जनतेस आरोग्यविषयक सेवा सुविधा व औषधोपचार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने १९७६ साली प्रवरा मेडीकल ट्रस्टची स्थापना केली.[८४]

नगर जिल्हाच्या सर्वांगीण विकासासाठी विठ्ठलरावांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची मुहर्तमेढ रोवली होती. बँकेच्या स्थापनेसंदर्भात पुढाकार घेऊन हालचाली सुरू केल्यामुळे रेंगाळत पडलेला बँकेचा प्रस्ताव सरकार पर्यत दाखल केला व लवकरच त्याला कायदेशीर परवानगी मिळाली. दि.२८ फेब्रुवारी १९५८ रोजी राज्य सरकारने घोषित केलेल्या नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदी विठ्ठलराव विखेची निवड झाली. नगरचे भाऊ फिरोदिया हे बँकेचे पहिले अध्यक्ष झाले. सहकारी साखर कारखानदारीचा नवा मार्ग दाखवून विठ्ठलराव विखेंनी शेतकऱ्यांसाठी आर्थिक विकासाचा मार्ग खुला करून दिला होता. जिल्हा सहकारी बँक ही त्याचीच पुढची वाढ होती. शेतकऱ्यांच्या हितासाठीच स्थापना झालेली ही एक अभिनव संस्था होती, यामुळे अहमदनगर जिल्हयातील सहकाराला व आर्थिक विकासाला उजाला मिळाला.

शेती सहकार शिक्षण व उदयोग या क्षेत्रात नवनवीन विठ्ठलराव विखे पाटलांनी सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी अनेक नवनवीन योजना राबविल्या या योजनाद्वारे कारखाना क्षेत्रातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात लक्षणीय सुधारणा झाली. उपसासिंचन योजना पाझर तलाव नदीवरील बंधारे अशा अनेक छोटया छोटया सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना त्यांनी मिळवून दिला.[८५]

१९८५ साली प्रवरा सहकारी बँकेचे स्थापना करून सर्वसामान्यांना पैसे ठेवण्याची आणि कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. ग्रामीण अर्थकारणाची दुर्बल स्थिती बदलून ती भक्कम झाली त्यामुळे राज्याची आणि देशाची अर्थव्यवस्था भक्कम होण्यास मदत झाली. विठ्ठलराव विखे यांनी ग्रामीण भागातील आर्थिक परिवर्तन घटविताना कष्टकरी समाजाच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली ६० वर्षाच्या या काळात आज ग्रामीण अर्थकारण सहकारी साखर कारखानदारीमुळे भक्कमपणे टिकून आहे. विठ्ठलराव विखे यांच्या कार्यामुळे भारत सरकारने १९६१ मध्ये पद्मश्री हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. शैक्षणिक व सांस्कतिक क्षेत्रात भरीव योगदान दिल्याबद्दल पुणे विदयापीठाने १९७८ साली डीलीट ही सन्मानीय पदवी बहाल केली. तर १९८९ मध्ये महात्मा फुले कृषी विदयापीठाने डॉक्टरेट देऊन विठ्ठलराव विखे यांच्या कृषी व उदयोग क्षेत्रातील कामगिरीचा सन्मान केला.

एकनाथराव विठ्ठलराव तथा बाळासाहेब विखे पाटील यांचा जन्म १० एप्रिल १९३२ रोजी अहमदनगर जिल्हयातील लोणी बुद्रुक या गावी झाला. त्यांचे शिक्षण एस. एस. सी. पर्यत झाले असून वडिल विठ्ठलराव विखे यांच्याकडून मिळालेला वारसा बाळासाहेब विखेंनी समर्थपणे पुढे नेला आहे. बाळासाहेब विखे राजकारणात येण्यापूर्वी शेतात काम करत असत. शेतातील डिझेल इंजिन ते चालवायचे पण नंतर राजकारणात ओढले गेले. १९६२ मध्ये जिल्हा परिषदेसाठी उभे राहिले ते उपाध्यक्ष झाले तेव्हा पासून त्याचा राजकीय प्रवास सुरू झाला. १९६२ ते १९७१ या काळात ते जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष होते. त्यांचा राजकीय जीवनप्रवास हा संघर्षाचा होता. त्यावेळी आबासाहेब निंबाळकर, शंकरराव काळे हे जिल्हयात नेते होते. काँग्रेसमध्ये यशवंतराव चव्हाण व शंकराराव चव्हाण यांच्याबरोबर गेले, चव्हाणांबरोबर जिल्हयांतून ते एकटेच होते. १९६२ ते १९७१ बाळासाहेब विखे हे शिक्षण व सार्वजनिक बांधकाम समिती जिल्हा परिषदेचे चेअरमन होते.तसेच १९६४ ते १९६६ या दोन वर्षी यांनी श्रीगोंदा पंचायत समितींचे सचिव पद बाळासाहेब

विखेकडे होते तसेच १९६६ ते १९८८ पर्यत महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. मुंबई येथे संचालक पद भुषविले.

सहकारी साखर कारखानदारीतील बाळासाहेब विखे पहिले वारसदार होते. प्रवरा सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर चे १९६६ ते १९७७ १९७८ ते १९८१ व १९८२ ते १९८७ चेअरमन म्हणून सहकारावर दृढ विश्वासाने कार्य केले. अनेक संस्था कारखान्याच्या माध्यमातून उभ्या केल्या आणि त्या सर्व संस्था अतिशय प्रभावीपणे आजही चालू आहे. १९६७ ते १९७१ मध्ये विखे हे कृषी व सार्वजनिक बांधकाम समिती जिल्हा परिषद अहमदनगर चे चेअरमन होते. १९७५ ते १९८० मध्ये भारत सेवियत मैत्री संघ महाराष्ट्र राज्य या संघाचे उपाध्यक्ष म्हणून निवड झाली होती. १९६४ ते १९७७ मध्ये संचालक म्हणून महाराष्ट्र राज्य शेती महामंडळवर काम केले. तसेच भारतीय साखर निर्यात महामंडळावरही १९७९ ते १९८८ या कालावधीसाठी संचालक पदावर होते. १९६६ ते १९७१ मध्ये राज्य साखर वेतन मंडळ व राज्य कृषीमुल्य निर्धारण समितीवर सदस्य होते. तसेच डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट आसोशिएशन पुणे येथे सदस्य म्हणून १९७६ पासून कार्यकारणीवर होते.[८६]

बाळासाहेब विखेंनी गेल्या ७० वर्षाहून अधिक काळ संघर्ष करताना त्यांनी कार्यकर्ते तयार केले व सांभाळले. ते काही काळ शिवसेनेतही गेले पुन्हा कॉंग्रेसमध्ये आले. नगर जिल्हयात कर्तृत्ववान पुढारी निर्माण झाले. राजकीय समज असलेला हा जिल्हा आहे. बाळासाहेब विखे, गोविंदराव आदिक, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे अशी नेतृत्व उदयायास आले मुख्यमंत्री पदाला पात्र होतील असे अनेक नेते जिल्हयाच्या राजकारणात तयार झाले सहकारी संस्थांची उभारणी हे त्यांचे कर्तृत्व होते. समाजउभारणीत त्यांनी योगदान दिले. सात वेळा खासदार राहिलेल्या व केंद्रात मंत्रीपद भुषविलेल्या विखे पाटील यांचा नगर जिल्हयासह राज्याच्या राजकारणात आणि सहकार क्षेत्रात मोठा दबदबा होता. बाळासाहेब विखे यांच्या वडिलांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्था व सहकार चळवळ पुढे वाढविण्यासाठी काम केले. प्रवरा ग्रामीण भागातील सामन्यांसाठी प्रवरा अभिमत विदयापीठाची स्थापना केली. व २००४ पासून प्रवरा इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस या अभिमत विदयापीठाचे कुलपती होते. १९६६ ते १९८२ व १९७४ ते १९७९ या वर्षी बाळासाहेब विखे हे विधिसभा सदस्य होते. १९७५ ते १९७६ व १९८५ ते १९८६ वर्षी सिनेट मेंबर पुणे विदयापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त

विदयापीठात १९७९ पासून विधिसभा सदस्य म्हणून कार्य केले. सन १९७३ पासून प्रवरा ग्रामीण वैदयकीय ट्रस्ट लोणी, प्रवरा ग्रामीण वैदयकीय महाविदयालय प्रवरा, ग्रामीण दंतमहाविदयालय लोणी आणि अदयावत प्रवरा ग्रामीण रूग्णालय येथे कार्यकारी विश्वस्त होते.

केंद्रीय अवजड उदयोगमंत्री व केंद्रीय अर्थ खात्यांचे राज्यमंत्री म्हणून काम करताना विखे पाटील यांनी जिल्हयातील विविध संस्थाच्या स्थापनेत त्यांचा सहभाग होता. १९७१ ते १९९१ मध्ये कोपरगाव मतदार संघातून लोकसभा सदस्य व १९९८ ते १९९९ मध्ये अहमदनगर मतदार संघातून लोकसभा सदस्य म्हणून कार्य केले. कोपरगाव मतदार संघातून सप्टेंबर १९९९ ते फेब्रुवारी २००४ पर्यत अर्थ राज्यमंत्री पद भुषविले. १९९९ ते २००२ मध्ये लोकसभेवर निवडून केंद्रीय उदयोग मंत्री पदावर काम केले. २००४ मध्ये पुन्हा कोपरगाव मतदार संघातून निवडून आले आहेत. कार्यकर्त्याला ताकद देणारा नेता म्हणून त्यांची ख्याती होती. खालील विविध संस्थावर बाळासाहेब विखे अध्यक्ष होते. १९९१ ते १९८४ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना, १९७७ ते १९८४ महाराष्ट्र राज्य मदयार्क निर्मिती संघावर, १९८० ते १९९१ मध्ये भारत सेविएत मैत्री संघ महाराष्ट्र राज्य तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा ग्रंथपाल महासंघ मुंबई, १९८२ ते २००१ व महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस कमिटीवर, १९७७ ते १९७९ मध्ये अध्यक्ष होते, १९९५ पासून महाराष्ट्र पाणी परिषद लोणी येथे संस्थापक कार्याध्यक्ष होते. पुढे २००३ पासून इंडिया वॉटरशिप नवी दिल्ली व जगदगुरू संत तुकाराम महाराज जन्म चतुःशताब्दी सोहळा महासमितीवर २००८ यावर्षी अध्यक्ष होते.[८७]

राज्यातील विविध पक्षांच्या नेत्यांशी विखे पाटील यांचे सलोख्याचे संबध होते नगर जिल्हयाच्या राजकारणात विखे पाटील विरूध्द सर्व असे समीकरण कित्येक वर्षे होते. निवडणुकीच्या काळात विखे यांच्या कल्पनेतून साकारलेल्या 'विखे पॅटर्न' ची किमया वेगळी होती. पाणी दुष्काळ संदर्भात विखे पाटील यांचा अभ्यास होता. सरकारमधील मंडळीही त्यांचे अनेकवेळा मार्गदर्शन होत असत. राजीव गांधी पंतप्रधान असताना विखे पाटील यांनी देशभरातील ४५ खासदारांना एकत्र करून 'कॉग्रेस फोरम फॉर ऍक्शन' स्थापन करून आपले वेगळेपण सिध्द केले होते. त्यातूनच पुढे १९९१ च्या निवडणुकीत पक्षाने उमेद्वारी नाकारल्यावर त्यांनी अहमदनगर मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढविली त्या निवडणूकीमुळे गाजेलला विखे–गडाख खटला जिल्हयाच्या राजकारणावर मोठा परिणाम करून गेला. या खटल्याच्या निकालामुळे

आदर्श आचरसंहितेची अंमलबजावणी सुरू झाली. वादग्रस्त व्यक्तिमत्व म्हणून विखे पाटील यांच्या नावाची सतत चर्चा होत असे महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील, शरद पवार यांच्या विरोधात शंकरराव चव्हाणासोबत आयुष्यभर राहिले. शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर नांदेडमध्ये झालेल्या लोकसभेच्या पोटनिवडणुकीत अशोक चव्हाण यांना विजयी करण्याकरिता बाळासाहेब विखे यांनी प्रचार केला होता. शंकरराव चव्हाण आणि बाळासाहेब विखे या दोन घराण्यांचा संबंध राजकारणाच्या पलीकडचा होता. आणि आजही अशोक चव्हाण आणि राधाकृष्ण विखे या पुढच्या पिढीने हे संबंध जपले आहेत.

बाळासाहेब विखे यांनी आपल्या वडिलांचा सहकार चळवळीचा वसा पुढे चालविताना विखे पाटील हे खालील साखर कारखानदारांचे प्रवर्तक आहेत पारनेर सहकारी साखर कारखाना पारनेर जगदंबा सहकारी साखर कारखाना लि.पारनेर वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि. पाथर्डी या कारखानाच्या उभारणीमध्ये मोलाचे कार्य आहे. पुढे ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि. भेंडा उभारणीमध्ये ही मोलाचे मार्गदर्शन बाळासाहेब विखेचे आहेत. शेती, अर्थपुरवठा, सहकारी संस्था करीत असलेला कर्जपुरवठा उत्पादन वाढ तसेच भूविकास बँका, सहकारी कारखाने, क्रेडीट सोसायटया, दुधसंघ या सगळया विषयांवर सुचना करण्यासाठी राज्य सरकारनं समित्या नेमल्या होत्या.या विविध समित्यावर बाळासाहेब विखे हे अध्यक्ष होते. त्यापैकी काही समित्यांचे नावे भारतीय कृषी अनुसंधान केंद्र. कार्यकारी समिती नवी दिल्लीराष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था, हैद्राबाद १९७५ ते १९८५ कार्यकारी समिती. डेक्कन शुगर इन्स्टिट्युट पुणे येथे सदस्य होते. १९७८ ते १९८९ मध्ये कार्यकारी समिती आखिल भारतीय मदयार्क उत्पादन प्रकल्प संघ नवी दिल्ली, राज्य पाटबंधारे समिती १९७५ ते १९७८ मध्ये ऊर्जा व पाटबंधारे सल्लागार समितीचे सदस्य होते. सल्लागार समिती कृषी, उदयोग, पाटबंधारे, नागरी अन्न पुरवठा, सहकार, मंत्रालय लोकसभा नवी दिल्ली तसेच १९९० ते १९८२ दुय्यम कायदे सल्लागार समिती लोकसभा नवी दिल्ली १९८२ ते १९९० मध्ये तांत्रिक शिक्षण सल्लागार समिती महाराष्ट्र आर्थिक विकास समिती तसेच १९९६ ते १९९७ मध्ये महाराष्ट्र राज्य रोजगार व स्वयं रोजगार उच्चस्तरीय कमिती चे सदस्य होते. १९९४ पासून प्रवरा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष होते. १९९८ मध्ये दूरसंचार स्थायी समिती लोकसभा १९९८ मध्ये सल्लागार समिती मानव विकास संशोधन मंत्रालय नवी दिल्ली व

पुढे २००४ पासून अविरत या समितीवर सदस्य होते. तसेच भारतीय कृषी अनुसंधान केंद्र नवी दिल्ली येथे १९८५ ते १९८८ पर्यत सदस्य होते. सन २००६ पासून सल्लागार समिती सदस्य इंडियन कौन्सिल ऑफ फॉरेस्ट्री रिसर्च ॲण्ड एज्युकेशन नवी दिल्ली होते.[८८]

बाळासाहेब विखे यांनी कृषी सहकार शिक्षण आर्थिक क्षेत्र ग्रामविकास सिंचन या क्षेत्रात भरीव व दिशादर्शक कार्य केलेले दिसते. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामविकासाचे आदर्श मॉडेल सादर केले होते वरील क्षेत्रात त्यांनी पथदर्शी उपक्रम राबविले बाळासाहेब विखेंनी ग्रामीण भागातील जनतेला प्रगतीचे नवनवे पर्याय उपलब्ध केले व ग्रामीण अर्थकारणाला सक्षमीकरणासाठी प्रवरा सहकारी बँकेची स्थापना केली. ४५ गावांसाठी प्रवरा दुध सोसायटया स्थापन केल्या प्रवरा ग्रामीण नैसर्गिक शिक्षण आणि सामाजिक संशोधन संस्थेची स्थापना केली. प्रवरा मेडीकल टॅस्ट लोणी येथे उभारले पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड इंजिनिअरिंग प्रवरानगर येथे स्थापन केले. पद्मश्री डॉ. विखे पाटील फाऊंडेशन पुणे, पद्मश्री डॉ. विखे पाटील फाऊंडेशन अहमदनगर व पद्मश्री डॉ. विखे पाटील फाऊंडेशन नाशिक सेंटर हे तीनही सेंटर आज लाखों विदयार्थ्यांना जीवनमुल्ये व कौशल्याधिष्ठित शिक्षण देत आहे. पंडित जवाहरलाल नेहरू ललित कला अकादमी प्रवरानगर येथे कार्यरत आहे. १९९८ पासून शिर्डी साई रूरल इन्स्टिटयुट केले आहे.

राजकारणातील बाळासाहेब विखे यांची कारकीर्द काहीशी वादग्रस्त होती कॉंग्रेस पक्ष सोडून ते शिवसेनेत सामील झाले होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी केंद्रीय राज्यमंत्रीपद आणि त्यानंतर मंत्रालयात अवजड केंद्रीय मंत्रीपद भुषविले होते. पुन्हा कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला कॉंग्रेसकडून मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत बाळासाहेब विखे यांचे नाव नेहमीच आघाडीवर होते पण त्यांना कधी मुख्यमंत्री होता आले नाही. पण एक अभ्यासू खासदार म्हणून त्यांची ओळख कायम होती. सारांशरूपाने बाळासाहेब विखे यांनी प्रत्येक क्षेत्रामध्ये आपले मोलाचे योगदान दिले आहे

शिक्षणक्षेत्राचा विचार केला तर ग्रामीण जनता महिला भूमिहीन मजूर आणि सामाजिक दृष्टया उपेक्षित वर्गाला विविध प्रकारच्या शैक्षणिक संधी उपलब्ध करून दिल्या प्राथमिक माध्यमिक आणि उच्च शिक्षण देणात्या शिक्षणसंस्थाची ग्रामीण भागात उभारणी केली तंत्रशिक्षण वैदयकीय शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण देणाचा संस्थाची उभारणी केली त्याद्वारे ग्रामीण औदयोगिक

विकास आरोग्यविषयक जाण आणि स्वयंरोजगारला मौलिक हातभार लागला आहे. विविध शिक्षणसंस्थामध्ये अध्यापन आणि व्यवस्थापन विभागात मिळून हजारो पदांची रोजगार निर्मिती प्राप्त केली विविध शाखांमधून ८०००० हून अधिक विदयार्थ्यांना शिक्षणसुविधा मिळाली अभिनव उपक्रमांमधून ५००० विदयार्थ्यांना विशेष शिक्षणसंधी मिळाली 'प्रवरा पब्लिक स्कूल' ग्रामीण भारतातील पहिले पब्लिक स्कूल आहे. हे पब्लिक स्कूल इंडियन पब्लिक स्कूल कॉन्फरन्स् (नवी दिल्ली) या संस्थेचे सदस्य आहे मुलींची तंत्रकौशल्ये आत्मसात करावे यासाठी महाराष्ट्रातील पहिल्या 'मुलींसाठी तंत्रशिक्षण संस्थेची'स्थापना केली.[९]

सहकारक्षेत्र आणि ग्रामीण विकास क्षेत्रामध्ये स्वयंसहाय्य आणि परस्पर सहकार्य याद्वारे विकासकार्याच्या सर्व क्षेत्रांमध्ये शेतकऱ्यांना भरीव प्रोत्साहन दिले आहेत. नव्या जागतिकीकरणाच्या काळात बेरोजगारी दारिद्रय अज्ञान आणि निरक्षरता या समस्यांवरील उपयांचा विचार केला महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये अनेक सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीस प्रोत्साहन दिले. शेतकरी सहकारी पतपेढया, ग्रामीण सहकारी बँका, सहकारी ऊस उत्पादनविषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती करून देणाऱ्या आंतरराष्ट्रीय साखर तंत्रज्ञानाच्या परिषदांमध्ये ब्राझील आणि क्युबामध्ये सहभाग घेतला. ग्रामीण विकास निरक्षरता निर्मुलन आरोग्यविषयक सुविधा अशा योजनामध्ये सहभाग दर्शविला सहकारातून कृषीतंत्रज्ञान आणि कृषीविपणन विषयक महत्वपूर्ण गोष्टीची सुरूवात केली.

कृषीक्षेत्रातील कार्य पाहून द इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च (ICAR) दिल्ली या संस्थेतर्फे १९९२ मध्ये 'कृषीविज्ञान केंद्र' सुरू करण्यास मान्यता दिली गेली. या केंद्राच्या पुढाकाराने दहा लाख छोटया आणि मध्यम शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळवून दिला. प्रवरा प्रगती आयटी नेट वर्कच्या माध्यमातून २० गावांमधील १२ प्रवरा संस्थांची जोडणी त्याद्वारे ८५००० ग्रामीण कुंटुबे संपर्क क्षेत्रात आणली ग्रामीण जनतेला VSAT तंत्राद्वारे आधुनिक तंत्रज्ञान पुरवणारे पहिले यशस्वी प्रारूप आहे. कृषीक्षेत्रात आधुनिक तंत्र पुरविणारे विविध प्रशिक्षण उपक्रम राबवित आहेत.[१०]

बाळासाहेब विखे केंद्रीय अर्थराज्यमंत्री असतान कृषीक्षेत्र शेतकरी आणि शेतमजूर यांच्यासाठी विमासंरक्षणाच्या योजनांना बळ दिलेले दिसते. 'महाराष्ट्र पाणी परिषद' या स्वयंसेवी संस्थेच्या स्थापनेतून पाण्याचे दुर्भिक्ष्य दुष्काळ अशा पाणीविषयक समस्यांचा अभ्यास केला व

उपाययोजना सुचविल्या व प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली दिसते. अर्थक्षेत्रामध्ये १९७५ मध्ये प्रवरा सहकारी बँकेची स्थापना केली. ४०० सदस्यांनी प्रत्येकी रू ५००० ठेवीतून उभारलेल्या रू २० लाखाच्या भांडवलातून ही बँक उभी केली २००३ साली रिझर्व्ह बँकेने 'शेडयुल बँक' म्हणून घोषित केली आज बँकेचे भागभांडवल रू. २९९ लाख तर ठेवी रू. २४७१६ लाख इतक्या आहेत.

मर्यादीत उत्पन्नगटास शैक्षणिक अर्थसहाय्य अनुसूचित जाती जमातींना गृहकर्जसहाय्य ग्रामीण विकास ग्रामीण उदयोग आणि सहकारास उत्तेजन होतकरू तरूणांना स्वतःच्या उदयोग व्यवसाय सुरू करण्यास सहाय्य आणि डेअरी व्यवसायास उत्तेजन अशा उपक्रमांना बँकेतर्फे अर्थसहाय्य मिळवून दिले. आरोग्य क्षेत्रामध्ये 'प्रवरा ग्रामीण रूग्णालयाची १९७२ मध्ये स्थापना केली आज १५०० बेडचे आत्याधुनिक विविध सोयींनीयुक्त रूग्णालय आहे. वैदयकीय तज्ञ कार्यरत आहेत. रूग्णालयातर्फे ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण आरोग्याची काळजी घेतली जाते. आणि जनतेला परवडणाऱ्या दरात वैदयकीय सेवा उपलब्ध केली जाते.

स्त्री आरोग्य स्वयंसेविकांमार्फत ५०० खेडयामधील आदिवासी जनतेला घरपोच वैदयकीय सेवा दिली जाते. प्रवरा ग्रामीण वैदयकीय महाविदयालयाची स्थापना केलेली आहे. मास्ट्रिद, नेदरलँड विदयापीठ (लिंबर्ग) पेक्स विदयापीठ (हंगेरी). आणि लिंकोपिंग विदयापीठ (स्वीडन) यांच्या सहकार्याने प्राध्यापर्क विदयार्थीसंशोधक यांच्या देवाघेवाणीतून आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन कार्यात या महाविदयालयाचा सहभाग आहे. या महाविदयालयास 'अभिमत विदयापीठ' म्हणून मान्यता मिळाली आहे. 'प्रवरा इन्स्टिटयुट ॲण्ड रिसर्च ॲण्ड एज्युकेशन इन नॅचरल अँड सोशल सायन्सेस' (PIRENS) या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयातील सामजिक आणि आर्थिक विकासकार्यास चालना मिळाली आहे. यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मितीत वाढ झालेली दिसते विविध आरोग्य शिबिरांमार्फत लाखो लोकांना लाभ मिळत आहेत.[११]

महाराष्ट्रात पाण्याचे योग्य नियोजन होऊन संपन्नता येण्यासाठी महाराष्ट्रास वरदान ठरणारा नदयाजोड प्रकल्प तयार करून महाराष्ट्र शासनास सन २००२ मध्ये सादर केला. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सहकार चळवळीचा वारसा पुढे नेण्याचे कार्य त्यांचे चिरंजीव बाळासाहेब विखे यांनी केले विठ्ठलराव विखे यांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्था यशस्वीपणे चालवताना विखे घराण्यांचे मोठे योगदान आहे. सहकार चळवळीची मुहर्तमेढ रोवलेल्या विठ्ठलराव विखेंची चौथी

पिढी घराण्याचा नावलौकिक व दबदबा कायम ठेवत आहे. बाळासाहेब विखे यांना तीन मुले व दोन मुली आहेत. पहिली मुलगी ही शेवगाव तालुक्यातील राजकारणी माधवराव नरोडे यांना आहे. तर दुसरी मुलगी सासवड येथील संभाजीराव झेंडे यांना आहे. बाळासाहेब विखे यांचा थोरला मुलगा अशोक विखे हे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे चेअरमन आहेत. अशोक विखे यांच्या कन्येचे नाव नीला आहे.

बाळासाहेब विखे यांचे दुसरे चिरंजीव राधाकृष्ण विखे हे महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्ष नेता म्हणून कार्यरत आहेत राधाकृष्ण विखे अनेक वर्षापासून राजकीय सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत शिर्डी विधानसभेचा लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभेमध्ये आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. राज्याच्या मंत्रीपदाच्या काळात वेगवेगळया खात्यांमध्ये त्यांनी कार्य उल्लेखनीय आहे विशेषतः कृषीमंत्री असताना शेती व शेतकरी यांच्यासाठी अनेक चांगले उपक्रम राबवून राज्याच्या कृषीक्षेत्राला नवी दिशा देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.राधाकृष्ण विखे यांच्या पत्नी शालिनीताई विखे याही अहमदनगर जिल्हा परिषदेच्या दुसऱ्यांदा अध्यक्ष पदाचा धुरा संभाळत आहे. शालिनीताई विखे या सामाजिक राजकीय स्त्री विकासासाठी कार्यरत आहेत. राधाकृष्ण विखे यांचे चिरंजीव सुजय विखे हे वैदयकीय क्षेत्रातील पदवीधर आहेत परंतु ते आज सहकार क्षेत्रामध्ये मोठे कार्ये करताना दिसत आहेत.

बाळासाहेब विखे यांचा धाकटा मुलगा राजेंद्र विखे हे प्रवरा मेडिकल ट्रस्टचे चेअरमन आहे. या ट्रस्टचा संपुर्ण कारभार ते पाहत आहे. ग्रामीण भागातील समाजाला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आरोग्यसुविधा पुरविल्या पाहिजे यासाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. अशा पदधतीने राज्यातील अत्यंत शिस्तबध्द घराणे म्हणून विखे घराण्याकडे पाहिले जाते. अहमदनगरच्या राजकारणात बाळासाहेब विखेचा शब्द म्हणजे अंतिम राजकारण असे समीकरण बनले होते. राजकारणात जेवढे करता येईल तेवढे प्रयोग त्यांनी केलेत आणि प्रत्येक राजकीय प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला आहे. अहमदनगरच्य राजकारणात मुलगा सुन नातू अशी सगळी राजकीय सत्तास्थाने ताब्यात आहे. शिवाय कॉंग्रेस पक्षात बाळासाहेब विखेंचा शब्द चालत होता. पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदारही ते ठरले होत.राजकारणात आणि पक्षात असा प्रचंड दबदबा असल्याने घरातही त्यांचाच शब्द अंतिम होता.

सामाजिक कार्यातील योगदानासाठी केंद्र सरकारने २०१० मध्ये बाळासाहेब विखे यांना प्रतिष्ठेच्या पद्मभुषण पुरस्काराने सन्मानित केले होते. पुरस्कार मिळाला म्हणून मी मोठा होत नाही मी तुमच्यातलाच आहे असे भावूक विधान त्यांनी प्रवरानगर येथे एका कार्यक्रमात केले होते. या विधानांतून त्यांची शेतकऱ्यांप्रती असलेली आत्मियता दिसून येते. आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखाना उभारून विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकार क्षेत्राला नवी दिशा दिली होती.यासाठी विठ्ठलराव विखेंनी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्यानंतर बाळासाहेब विखेंनी ही वडिलांचा वारसा पुढे नेला सहकार आणि ग्रामीण विकासाला चालना देण्यात त्यांनी महत्वाचे योगदान दिले यासाठी त्यांना पद्मभूषण पुरस्कार मिळाला होता. दोन पद्म पुरस्कार मिळणारे विखे घराणे हे राज्यातील एकमेव उदाहरण आहे.[१२]

राधाकृष्ण विखे यांचा जन्म १५ जून १९५५ साली झाला बी. एस्सी. ॲग्री. शिक्षण पूर्ण केले. मार्च १९९५ पासून विधानसभा सदस्य महाराष्ट्र राज्य १९९७ ते १९९९ महाराष्ट्राचे कृषी जलसंधारण दुग्धव्यवसाय पशुसंवर्धन मत्स्यव्यवसाय अशा क्षेत्रांचे मंत्री पद भूषविले १९ फेब्रुवारी २००९ पासून शालेय शिक्षण विधी व न्याय तथा पालकमंत्री औरंगाबाद जिल्हा अशा विभागाचे मंत्री पद भूषविले. ऑक्टोबर २००९ मध्ये शिर्डी विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर फेरनिवड झाली. ७ ऑक्टोबर २००९ पासून राज्याचे परिवहन बंदर आणि विधी व न्याय खालच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाली. तसेच १९ नोव्हेंबर २०१० पासून राज्याच्या कृषी व पणन खात्याच्या कॅबीनेट मंत्रीपदी निवड तथा पालकमंत्री अमरावती हे जिल्हा कार्य पाहत आहेत.

राधाकृष्ण विखे हे १९८५ ते १९९० मध्ये अहमदनगर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९८८–९० मध्ये महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस होते. काँग्रेस शताब्दी वर्षात स्वातंत्र्य सैनिक सत्कार सोहळ्याचे आयोजन केले व भारत बचाओ कार्यक्रमाचे आयोजन राधाकृष्ण विखेंनी केले. [१३]

राधाकृष्ण विखे हे १९८७ ते ९५ पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर येथे अध्यक्ष पद संभाळले तसेच प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्या. प्रवरानगर संस्थापक चेअरमन म्हणून काम पाहत आहे. सहकार क्षेत्रात राधाकृष्ण विखे यांचे मोठे योगदान आहे. दि. मुळा प्रवरा इले. को.

ऑप. सोसायटी लि. श्रीरामपूर या संस्थेचे १९९५ ते आजपर्यंत संचालक व सन १९९५ ते २००० मध्ये चेअरमन म्हणून काम पाहिले.[१४]

अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑप. बँक लि. अहमदनगर या बँकेचे १९९७ ते आजपर्यंत संचालक जून २००२ ते ऑगस्ट २००३ पर्यंत व्हा. चेअरमन सप्टेंबर २००५ ते डिसेंबर २००७ पर्यंत चेअरमन होत. त्यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना ६ टक्के व्याजदराने कृषी कर्ज देण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयाची राज्यात सर्वप्रथम अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला तसेच सन २००६ पर्यत प्रवरा सहकारी बँक लि. लोणी या बँकेचे माजी संचालक म्हणून काम केले. राधाकृष्ण विखे हे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे संचालक आहे. पुणे विदयापीठ कार्यकारी परिषदेचे माजी सदस्य व पद्मश्री डॉ. विखे पाटील फाऊंडेशनचे विळद घाट कार्यकारी अध्यक्ष आहेत. खालील संस्थाचे राधाकृष्ण विखे हे विश्वस्त म्हणून काम पाहत आहेत. श्री साईबाबा संस्थान शिर्डी, प्रवरा ग्रामीण नैसर्गिक सामाजिक अध्ययन संस्था, प्रवरानगर रूरल मेडीकल टॅस्ट लोणी बु. इ.[१५]

खाजगीकणाच्या जोखडातून शेतकरी बाहेर काढण्याचा प्रयत्न डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याची प्रवरानगर येथे सुरू केले. देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिल्या गेलेल्या या घटनेला ६७ वर्ष झाली आहेत. मात्र या काळात ज्या सहकारी साखर कारखान्याच्या जीवावर सर्वांगिण विकासाचे महाराष्ट्राचे स्वप्न बहुतांशी साकार झाले त्यातील काही बंद पडून त्यांची विक्री झाली तर काहींना पुन्हा खाजगी पैशावाल्यांनी विकत घेऊन इतिहासात पुनरावृत्ती केली. दुःख या गोष्टीचे आहे की जे सहकारी साखर कारखानदारीवर मोठे झाले त्यातील काहींनी मागच्या दाराने नव्या नावाने ती विकत घेतली पण ती सहकारी तत्वावर पुन्हा चालू करण्यासाठी राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली नाही. मागील दहा वर्षात मोठया प्रमाणात कारखाने विकले गेले असून त्या व्यवहाराची चौकशी करण्यात आली नाही. पद्मश्री विखे पाटील यांचे नातू व सध्या विधानसभेचे विरोधी पक्षनेते असलेले राधाकृष्ण विखे यांनी आघाडी सरकारच्या काळात हा मुद्दा उपस्थित करून सहकारी साखर कारखाने खाजगी लोकांना विकण्यास प्रतिबंध करणारा निर्णय राज्यसरकारला घेण्यास भाग पाडले. त्यानंतर मात्र एकही कारखान्याला व्यवहार होऊ शकला नाही. अहमदनगर जिल्हयाने संपुर्ण देशाला सहकारी साखर कारखाना चळवळ दाखवली याच जिल्हयातील राहाता तालुक्यातील गणेश व

राहुरी तालुक्यातील तनपुरे हे दोन सहकारी साखर कारखाने नैसर्गिक आणि मानवी संकटामुळे बंद पडले. परिणामी ऊस उत्पादक शेतकरी कामगार व्यावसायिक आणि कारखानदारीवर अवलंबून असलेले घटक अडचणीत सापडले पद्मश्री विखे पाटील त्यांचा समाज उत्थानाचा वारसा चौथ्या पिढीतील रूपाने डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सकारात्मक आणि लोकाभिमुख विचारधारे मुळे हे दोन्ही कारखाने आता सुरू झाले असुन प्रवरानगरचा विखे पाटील गणेश आणि राहुरी तनपुरे या तीनही कारखान्यामध्ये डॉ. सुजय विखे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापन उत्तम प्रकारचा कारभार करून शेतकरी हिताची जोपासना करीत आहे.[१६]

राहाता तालुक्याचे निर्मितीपुर्वी हा तालुका कोपरगाव आणि श्रीरामपुर या दोन तालुक्यांमध्ये विभागलेला होता शिर्डी विधानसभा मतदार संघ म्हणून पूर्वी याची ओळख होती. कोपरगाव तालुक्यातील गणेश परिसर आणि श्रीरामपुर तालुक्यातील प्रवरा परिसर असे दोन भाग या तालुक्याचे होते. गणेश कारखाना कोपरगाव तर प्रवरा कारखाना श्रीरामपुर तालुक्यात होता.राजकारणातही या दोन्ही कारखान्यामुळे नेहमीच संघर्ष होत असे साखर कारखान्याच्या जोरावर राज्यात अनेकांना खासदारकी आमदारकी मंत्रीपदे मिळवता आली स्वतःच्या राजकीय फायदयासाठी अनेकांनी साखर कारखान्याच्या सत्तेचा वापर केल्याचे लपून राहिले नाही परंतु त्याचा अतिवापर झाल्यानंतर काय होते याचे ताजे उदाहरण म्हणजे गणेश आणि तनपुरे या कारखान्याची झालेली दुरावस्था आहे. असे बोलले जाते अर्थात नैसर्गिक आपत्तीही त्यासाठी बत्याच प्रमाणात कारणीभूत होती उसाची टंचाई आणि वाढलेला खर्च यामुळे कारखान्यांचे बंद पडण्याचे कारण झाले.[१७]

गणेश सहरकारी साखर कारखान्याच्या बाबतीत तर हा कारखाना फार थोडा काळ विखे समर्थकांच्या ताब्यात राहिला व बहुतांशी सत्ता ही जेष्ठ नेते शंकरराव कोल्हे कडे होते. तेच सत्तेवर असताना कारखाना बंद पडला राजकारणात विरोधकांच्या ताब्यातील मोठी संस्था बंद पडणे विखे पाटीलांच्या दृष्टीने लाभदायक गोष्ट होती पण त्यांनी राजकारणापेक्षा समाज हिताचा प्राधान्याने विचार केला राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुजय विखे यांनी शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान कामगारांवर आलेली उपासमारीची वेळ, ठप्प झालेला परिसरातील व्यवसाय व्यापार आणिं कारखान्यांवर अवलंबून असलेल्या घटकांची दुरावस्था बघून राजकारण दूर ठेवत लोकांचा विचार गांभिर्याने केला बँका व्यापार शेतकरी कामगार यांची थकलेली

देणी मंजुर केलेली कारखान्यांची यंत्रसामुग्री कारखाना व कामगार वसाहतीची थकलेली वीजबिले परिसरात निर्माण झालेली उसाची टंचाई इतर कारखान्याकडून उसाची होणारी पळवापळवी अशा एक ना अनेक समस्या असताना कारखाना सुरू करण्याची भूमिका सुजय विखेंनी घेतली. पद्मश्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कारखाने उभे राहिले अनेकांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन आपआपल्या भागात कारखाना उभा केला. कारखाना म्हणजे ऊस उत्पादक आणि कामगार यांच्या स्वावलंबनापुरता मर्यादीत नसतो हजारो कुटुंबातील लाखो लोक त्याचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष लाभधारक असतात विठ्ठलराव विखे यांनी उभी केलेली सहकारी साखर कारखान्यांची चळवळ टिकली पाहिजे म्हणून बाळासाहेब विखे पाटील यांनी या चळवळी बद्दल नेहमी प्रयत्नशील राहिले. डॉ. सुजय विखे यांना त्यांच्याकडूनच राजकीय सामाजिक कार्याची दिशा मिळाल्याने ते सहकारी संस्था वाचवण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. डॉ. सुजय विखे यांच्या प्रयत्नांमुळे राहुरी तालुक्यातील गावातील बाजारपेठ फुलू लागली आहे कामगारांच्या कामाला गती मिळाली तरूणांच्या हाताला रोजगार मिळू लागला. मुलांच्या शिक्षणाला मदत मिळाली. महिलांच्या हाताला काम मिळाले. तालुक्यात उसाच्या लागवडी वाढल्या असून शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले गेली. काही वर्ष तालुक्यातील मंदावलेली आर्थिक गती ला वेग मिळाला हे सर्व विखे घराण्याच्या चौथ्या पिढीतील सुजय विखे यांच्या नेतृत्वामुळे व त्यांच्या कृतीतून जोपासलेली दिसून येते.[९८]

गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रासह आणि देशाच्या अनेक राज्यात लाखो शेतकऱ्यांनी नापिक आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्या आहेत जिल्हयात २०८ शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या हा एक अंगावर शहारे आणणारा आहे. २०१४ मध्ये त्यांनी सुरूवातील प्रत्येक कुटुंबाला आर्थिक मदत देण्याचा विचार केला परंतु परिस्थितीचा पुर्ण अभ्यास केल्यानंतर हा प्रश्न फक्त मदतीने सुटणार नाही त्यासाठी योजनेचा विस्तार करण्याची त्यांना गरज वाटली काही कुटुंबात तर असे दिसून आल्याने ते अधिकच अस्वस्थ झाले. त्यांनी शेतकरी कुटुंबालाच दत्तक घेण्याचा मोठा निर्णय घेतला जिल्हयात शासकीय नोंदीनुसार शेतकरी कुटुंबाची भेट घेऊन मिळवली शिक्षण आरोग्य नोकरी आणि चरितार्थ चालण्यासाठी तातडीने हाताला काम पिठाची गिरणी, शिलाई मशिन यांचा समावेश योजनेत केला. बाळासाहेब विखे पाटील आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंब सहाय्य योजना असे नाव देऊन राधाकृष्ण विखे पा. यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांनी २०८ कुटुंबाना दत्तक घेतले त्यांचे शिक्षण आरोग्य नोकरी आणि विवाहाची

जबाबदारी सुजय विखे यांनी घेतली. अशा प्रकारची देशातील पहिलीच योजना ठरली असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्याबरोबर त्यांच्या कुटुंबाना पुन्हा विश्वासाने उभे करण्याचे काम यातून होत आहे. सुजय विखे यांची ही योजना पथदर्शी असून अनेक सामाजिक संघटना आणि संस्थांनी पुढाकार घेऊन याचे अनुकरण करण्याची नितांत आवश्यकता आहे.

विखे पाटील परिवाराने जसा सहकाराच्या माध्यमातून कष्टकरी समाजाच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवला. तसा बदलत्या काळाची गरज ओळखून या परिवारातील सर्वच पिढयांना सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करताना ग्रामीण भागात आणि आरोग्य क्षेत्रात मोठे काम उभे करून सर्व घटकांना सोयी सुविधा निर्माण करून देताना गरीब अदिवासी अल्पसंख्यांक दलित यांना अल्पदरात सेवा उपलब्ध करून दिली आहे. बाळासाहेब विखे पा. यांच्या दूरदृष्टीतून आणि कर्तृत्वाने अहमदनगर जवळच्या डोंगराळ भाग विळदघाट येथे डॉ. विठ्ठलराव विखे यांच्या नावाने शिक्षणसंस्था सुरू केली तांत्रिक शिक्षणाची खेडयातील मुलं मुलींना सोयी करण्याचा त्यांचा हेतू होता. तो साध्य करण्यासाठी तंत्रनिकेतन अभियांत्रिकी.औदयोगक प्रशिक्षण संस्था.एम. बी. बी. एस. औषधनिर्माण संस्था अशी महाविदयालये सुरू झाली नगर शहराबरोबरच कर्जत, जामखेड, श्रीगोंदा, पारनेर, शेवगाव, पाथर्डी, राहुरी, नेवासा या तालुक्याबरोबरच पुणे, औरंगाबाद, बीड, सोलापुर जिल्हयातील गरिब कुटुंबातील विदयार्थ्यांनी गेली अनेक वर्षे अल्पदरात शिक्षण घेऊन रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.[९९]

विळदघाट येथे वैदकिय महाविदयालय सुरू करताना विखे परिवाराचा फक्त वैदयकिय शिक्षण देणे एवढाच उद्देश नव्हता त्यामाध्यमातून गरिब आणि गरजूंना आरोग्य सेवा देण्याचाही हेतू डोळ्यासमोर ठेवला होता. वैदयकीय डेटंल या महाविदयलयांसाठी अनेक तज्ञ डॉक्टरांची गरज असते. त्याचा उपयोग आरोग्य सेवेसाठी कसा होईल याचा विचार बाळासाहेब विखे व राधाकृष्ण विखे यांना जसा केला तसा स्वतः डॉक्टर असलेले सुजय विखे यांनी आणखी पुढे जात सेवा अत्यल्प दरात व मोफत देण्याचाही विचार केला. याच विचारातून येथे भव्य व सर्व उपकरणांची सुविधा असलेले रूग्णालय त्यांनी उभारले. अत्याधुनिक मशिनरी आणि तज्ञ डॉक्टर यांच्या माध्यमातून नगर जिल्हयाच्या खेडयातही आरोग्य सेव पोहचवली शिक्षण आणि आरोग्य य महत्वपूर्ण सेवा डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून समाज हिताची कामे केलेली दिसून येते.

राहाता तालुक्यातील तब्बल दीड लाख लोकांचा अपघाती विमा उतरवून योजना यशस्वीपणे राबविली संपुर्ण तालुक्यातील नागरिकांचा अपघाती विमा योजना राबविणारे हे देशातील एकमेव उदाहरण आहे. संजय गांधी निराधार योजनेमध्ये शिर्डी मतदारसंघात सर्वाधिक ११ हजार लाभार्थींना लाभ मिळवून दिला. शिर्डी मतदारसंघात त्यांच्या संकल्पनेतून साकारलेले जलक्रांती अभियान म्हणजे त्यांच्या नेतृत्वाची कुशलताच आहे. संपुर्ण मतदार संघात प्रत्येक गावात त्यांनी ओढे नाले रस्त्यांच्या साईड गटार हे उकरून पाण्याची साठवण होण्यासाठी जे जे अभियान राबविले त्यांचे चांगले परिणाम दिसत आहेत दुष्काळी परिस्थितीत हे जलक्रांती अभियान राबविले आहे. जायकवाडीच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांबरोबर आंदोलनातही सुजय विखे यांनी सहभाग घेतला. गोदावरी कालव्यांचा पाणी प्रश्न रस्ते स्वच्छता अभियानात यशस्वी कामे केली.[१००]

**१२. कुंडलिकराव जगताप – पारनेर :–**

श्रीगोंदा तालुक्यातील पिंपळगाव पिसा येथील शेतकरी कुटूंबात कुंडकिराव जगताप यांचा जन्म १४ मे १९४८ रोजी झाला. प्राथमिक शिक्षणातून महाविदयालयीन शिक्षण जगतापांनी अहमदनगर येथे पूर्ण केले शिक्षण घेत असताना त्यांनी विदयार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या अहमदनगर शहरात ग्रामीण भागातील असंख्य विदयार्थी शिक्षणासाठी आलेले होते. त्यांना जेवणाचे डब्बे वेगवेगळया गावातून एस. टी. बसने येत होते. पण या जेवणाच्या डब्यासाठी पालकांना बसचालकाला ठराविक रक्कम दयावी लागत असे. अशा लाचखोरी प्रवृत्ती विरूध्द सर्व युवकांना संघटित करून त्या विरोधात आंदोलन केले आंदोलन यशस्वी झाल्यानंतर त्यातून त्यांना समाजकार्याविषयी आस्था निर्माण झाली आणि युवकांचे नेतृत्व संधी मिळाली. पुणे विदयापीठाची वाढीव शुल्क माफ करण्यात आले. १९७२ साली संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ असल्याने फी भरणे विदयार्थ्यांना शक्य नाही ही समस्या ओळखून त्यांनी सदस्य म्हणून १९७२ ते १९७५ असे दोन वर्षे कार्य केले कुंडलिकराव जगताप यांनी १९७५ ते २००१ या कालखंडात स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्य केले अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुका पंचायत समितीच्या माध्यातून ग्रामीण भागाचा विकास केला. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी केली ग्रामीण जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी जगताप यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेबरोबरच सहकार क्षेत्राला प्राधान्य दिल्याचे दिसते. कुंडलिकराव जगताप यांनी १५० एकर जमिनीवर अडीच हजार टन क्षमतेचा ४०

कोटी रूपयाचा कुकडी सहकारी साखर कारखान्यात १६ मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प पूर्ण तत्वाला येत आहे. कुकडी सहकारी साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे चांगल्या कंपनीचे खते उपलब्ध करून दिली जात आहेत. कुकडी सहकारी साखर कारखान्याने २००० हजार रोपाची लागवड करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. कुकडी सहकारी साखर कारखाना तालुक्यातील ८०० लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या माध्यमातून अनेक युवकांना कर्ज उपलब्ध करून देवून उदयोगधंदे उभारणीस अर्थसहाय्य केले. सध्या महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघात सदस्य म्हणून कार्य करीत आहेत. कुकडी शिक्षण संस्थेची १९८२ साली स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा उच्च माध्यमिक शाळा वरिष्ठ महाविदयालय औदयागिक प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या. सदर संस्थातून हजारो विदयार्थी प्रत्येक वर्षी शिक्षण सहकाराच्या माध्यमातून घेत आहे.[१०१]

कुंडलिकराव जगताप यांनी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जेष्ठ संचालक म्हणून १० वर्षापासून कार्य करीत आहेत बँकेचे भाग भांडवल २००० मध्ये ३७५६ वरून ९१७६ वर नेण्यात यश आले. शेतकरी लाभार्थी त्यांच्याकडून जास्तीत जास्त ठेवी वाढविण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. त्यांनी आपल्या कार्यकाळात सभासद सहकारी संस्थाची संख्या वाढवलेली आहे. श्रीगोंदा तालुक्यात कुकडी आणि घोड यांच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी प्रत्येक भागाला त्यांच्या हक्काचे पाणी मिळावे यासाठी श्रीगोंदा तालुका सहकारी पाणीपुरवठा कृषी समितीची स्थापना केली पाणी वाटप कृषी समितीच्या निर्मितीमुळे पाणी वाटपाचे नियोजन झाले आहे. परिणामी तालुक्यातील सर्व शेतकत्यांना शेतीसाठी वेळेवर पाणी मिळाले. श्रीगोंदा तालुक्यात कुंडलिकराव जगताप यांनी ५० च्या वर विविध कार्यकारी सोसायटयांची स्थापना केली. यातून तालुक्यात सहकार क्षेत्राला चालना दिली गेली.

श्रीगोंदा तालुक्यात दूध उत्पादक संघाची निर्मिती जगतापांनी सुरू केली. दूधाला योग्य भाव देण्यात यावा. दूधापासून वेगवेगळे पदार्थ तयार केले जावेत आणि उत्पादक संघ नफ्यात राहावा यासाठी कुंडलिकराव जगताप हे प्रयत्न करत आहे. सहकाराच्या माध्यमातून तालुका दूध उत्पादक संघ खरेदी विक्री संघ विविध सहकारी सोसायटी सहकारी बँक सहकारी पतपुरवठा इ. च्या माध्यमातून बेकारी कमी केलेली दिसते.[१०२]

**१३. शिवाजीराव नागवडे – कर्जत :–**

शिवाजीराव नारायणराव नागवडे हे रूईगव्हाण ता. कर्जत जि. अहमदनगर येथील आखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे जेष्ठ कार्यकर्ता आहे. १९ जानेवारी १९३४ साली जन्म झालेल्या शिवाजीराव नागवडे हे १५ वर्ष वांगदरी गावचे सरपंच होते. १० वर्षे वांगदरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन होते. १० वर्षे पंचायत समिती सदस्य होते. १९७८ ते १९८० व १९९९ ते २००४ विधानसभा सदस्य म्हणून काम पाहिले तसेच ४५ वर्षापासून श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे संचालक व ३० वर्षे चेअरमन म्हणून कार्यभार पाहत आहेत. ९ वर्षे अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक व १० वर्षे व्हा. चेअरमन म्हणून कार्यभार पाहिला वसंतदादा शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन पुणे एक वर्षे उपाध्यक्ष व एक वर्षे अध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळित आहे. तसेच ३ वर्ष महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे संचालक म्हणून काम पाहिले.

सन १९८० पासून श्री. छत्रपती शिवाजी शिक्षणसंस्था श्रीगोंदा येथे स्थापन केली. सन १९८६ पासून ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्था काष्टी येथे स्थापन केली. ३ वर्षे राष्ट्रीय साखर कारखाना संघ नवी दिल्ली संचालक पद कार्यभार सांभाळला. घोड घाटपाणी परिषद घेवून घोड चरण निर्मिती व सिंचनक्षेत्र वाढविण्याकरिता सातत्याने लढा व प्रकल्प यशस्वीतेत मोलाची कामगिरी केली. महाराष्ट्र साखर संघाचे उपाध्यक्ष व सध्या महाराष्ट्र साखर संघाचे अध्यक्ष आहेत. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पहिले पॉलिटेनिक बेलवंडी भगुर येथे स्थापन करून यशस्वीपणे आजतागाजत सुरू आहे. कला विज्ञान व वाणिज्य महाविदयालय पॉलिटेनिक कॉलेज बी. एड. कॉलेज २५ माध्यमिक विदयालये इंग्लिश मेडियम स्कुल इ. शैक्षणिक संस्थापासून आज १५००० हजार विदयार्थी शिक्षण घेत आहेत. या माध्यमातून तालुक्यत शैक्षणिक क्रांती घडवून आणली.[१०३]

दक्षिण अहमदनगर मध्ये पहिला सहकारी साखर कारखाना उभा करून त्याची यशस्वी वाटचाल करीत आहेत घोड व कुकडी धरणांच्या निर्मितीमध्ये सातत्याने लढा देवून दोन्ही प्रकल्प यशस्वीतेमध्ये सिंहाचा वाटा उचलून तालूक्यात हरितक्रांती घडवून आणली. श्रीगोंदा तालुका दूध उत्पादक संघाची निर्मिती करून तालुक्यातील शेतकरी व दूध उत्पादकांना रोजगाराची संधी तसेच तालुक्यात धवलक्रांती घडवून आणली. इंटरनॅशनल फ्रेंडशिप असोसिएशन नवी दिल्ली

यांचेकडून विजयरत्न पुरस्कार माननीय राज्यपाल माताप्रसाद यांचे हस्ते सन्मानित करून प्रदान केला. तसेच महाराष्ट्र जर्नालिस्ट फाऊंडेशन मुंबई यांच्या वतीने विदयाभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

**१४. बबनराव पाचपुते – श्रीगोंदा :–**

काष्टी (ता. श्रीगोंदे) येथे एका साध्या शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म. 'मुलानं शिकवून मोठं व्हावं' ही आई वडिलांची इच्छा होती. अहमदनगर येथील महाविद्यालयात शिकत असताना ग्रामीण भागातील मुलांचे संघटन करून त्यांनी आयुष्यातील पहिली निवडणूक जिंकली ती 'जी. एस.' पदाची निवडणुका कशा जिंकायच्या याचं बाळकडू त्यांना नगरमध्येच मिळाले.

पदवी घेऊन गावी परतल्यानंतरही गावातील परिस्थिती स्वस्थ बसू देत नव्हती. १९७८ मध्ये काष्टी गणातून पंचायत समितीची निवडणुक लढवली व जिंकली. सभा जिंकणारं वक्तृत्व ही पाचपुतेंना मिळालेली निसर्गदत्त देणगीच होती. डॉ. कुमार सप्तर्षी व संभाजीराव काकडे यांनी या तरूणाला अचूक हेरले. १९८० च्या विधानसभा निवडणुकीसाठी जनता पक्षाची उमेदवारी जाहीर केली. देशभर इंदिरा गांधीची लाट असताना श्रीगोंदे मतदारसंघाने मात्र जनता पक्षाचा उमेदवार निवडून आश्चर्यांचा धक्का दिला. तेथून सुरू झालेली विजयी घोडदौड अजून थंडावली नाही. त्यानंतर श्रीगोंदे साखर कारखाना निवडणूक जिंकून पाचपुतेंनी राजकारणातील पाया आणखी मजबूत केला. त्यानंतर झालेल्या १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत १९००० मतांनी विजय मिळवला. विरोधी पक्षात असताना त्यांनी विधानसभा दणाणून सोडली. १९९० च्या निवडणुकीत तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या शेवटच्या प्रचारसभेने त्यांना तारले, निसटत्या फरकाने विजय मिळवला. नंतर जनता दलाचे ११ आमदार सोबत घेत पाचपुते काँग्रसवासी झाले व सुधाकर नाईक मंत्रिमंडळात गृहराज्यमंत्री बनले.[१०४]

१९९५ मध्ये ते चौथ्या वेळेस आमदार झाले. २००० मध्ये मात्र ही विजय परंपरा खंडीत झाली. २००५ च्या निवडणुकीत त्यांना पाच वेळा आमदारपद मिळाले. पाचपुतेंचे भाषण म्हणजे कानाला मेजवानीच. राजकारणात प्रचंड यश मिळवून देखील साधेपणा, जमिनीवर पाय व सामान्यांच्या सुखदुःखाशी सतत समरस होणे पाचपुतेंनी कधी सोडले नाही. हेच त्यांच्या यशाचे गमक असावे. प्रत्येक निवडणुकीत वेगळे चिन्ह ही तर पाचपुतेंची खासीयत होती. १९८० मध्ये तांत्रिक अडचणीमुळे त्यांना छत्री चिन्ह घ्यावे लागले. नंतरच्या निवडणुकीत जनता पक्षाचे

नांगरधारी शेतकरी, त्यानंतर जनता दलाचे चक्र, त्यानंतर काँग्रेसचा पंजा, नंतर राष्ट्रवादीचे घडयाळ व मागील निवडणुकीत अपक्ष म्हणून मिळालेले प्रेशर कुकर प्रत्येक वेळा नवे चिन्ह घेऊन यश मिळवणे कितीजणांना जमू शकले नाही ते पाचपुतेंनी ते केले आहे. या विक्रमाबरोवरच पाचपुतेंच्या नावे अजून दोन विक्रम अबाधित आहे. सर्वात कमी वयात (वयाच्या २५ व्या वर्षी) विधानसभा निवडणूक जिंकण्याचा. तसेच घोड नदीच्या महापुरात उडी घेऊन बुडत्या नौकेतील प्रवाशांना वाचवण्याचा यावद्दल त्यांना राष्ट्रपतींचे जीवरक्षा पदक देखील मिळाले आहे.

राजकारणाचे कुरूक्षेत्र गाजवत असताना पन्नाशी ओलांडलेल्या पाचुतेंना आता धर्मक्षेत्राने भुरळ घातली आहे. धर्मपरायण व परांपरागत महाराजाप्रमाणे ते प्रवचने करतात. न चुकता आषाढी वारीला जातात. शाकाहाराचा व व्यसनमुक्तीचा प्रचार करतात. महाराजांत राजकारणी असतात की नाही माहीत नाही, मात्र राजकारण्यांमधील महाराज म्हणून पाचपुतेंनी नवी प्रतिमा उदयाला आली हे मात्र खरे. राज्य पातळीवरील नेता अशी ओळख निर्माण करणाऱ्या पाचपुतेंना मात्र नगर जिल्हयात काही बस्तान बसवता आले नाही किंवा पाचपुतेंनी स्वतःदेखील तसे प्रयत्न कधी केले नाहीत. [१०५]

**१५. दादापाटील शेळके – अहमदनगर :–**

साधी राहणी असलेले दादा पाटील चार वेळा आमदार व दोनदा खासदार होऊनही त्यांच्या वागणुकीत कोणताही डामडौल नाही. जिल्हयातील इतर बहुतांश नेत्यांचा अनुभव पाहता त्यांनी स्थापन केलेली संस्था आपल्याच अधिपत्याखाली राहण्यासाठी त्यांचा सतत अटापिटा असतो. दादा पाटील मात्र याला अपवाद ठरावेत. एखादी संस्था स्थापन करून ती कार्यकर्त्याच्या ताब्यात दयायची त्याला निर्णयाचे स्वांतत्र्य दयायचे मध्ये कोणतीही लुडबुड न करता फक्त धोरणात्मक निर्णयांबाबत मागदर्शन करायचे असा त्यांचा पवित्रा असतो. परिणामी या अनुभवातून कार्यकर्ता घडत जातो. असा त्यांचा अनुभव आहे. कार्यकर्त्यांना जाणीवपूर्वक ताकद दयाची त्यांच्या सुखःदुखाची समरस व्हायचे कार्यकर्त्यांवरील संकटाच्या निवारणासाठी वरून एक व आतून एक अशी भूमिका घ्यायची नाही एखादा कार्यकर्ता मार्ग चुकला तर त्याला ओळख न देता अधिक जपायचे कार्यकर्त्याचा हुरूप पाहून त्याच्यांवर जबाबदारी सोपवायची ही दादा पाटलांची पंचसूत्री आहे. त्यांच्या ४५ वर्षातील राजकारणाच्या यशाचे ते गमक आहे.

वयाच्या २१ व्या वर्षीच दादा पाटलांच्या राजकारणात सक्रिय प्रवेश झाला. त्याच दरम्यान पंचायत राज व्यवस्था सुरू झाली व १९६२ पर्यत ते सलग जिल्हा परिषदेचे सदस्य झाले १९७८ पर्यत ते सलग जिल्हा परिषदेवर निवडून गेले. दरम्यानच्या काळात नगर तालुका पंचायत समितीचे सभापती व उपसभापती पदही त्यांनी भूषवले. सन १९७८ मध्ये विधानसभेची निवडणूक आली तत्कालीन 'पॉवरफुल'आमदार कि. बा. म्हस्के यांच्याविरूध्द दादा पाटलांनी अपक्ष निवडणूक लढवून त्यांना पराभूत केले. तेव्हापासून १९९४ पर्यत दादा पाटलांनी मागे पाहिलेच नाही पुढे १९९४ व १९९६ अशा दोन वेळा ते खासदारही झाले. गाव तेथे पाझर तलाव विविध कार्यकारी सेवा संस्था शिवार तेथे रोहित्रे व विहीर तेथे वीज या योजनांसह पीकवीमा, नालाबंडिंग, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, साठवण बंधारे, गावतळे या जलसंधारण कामांसाठी दादा पाटलांनी पीक वीमा योजनेचा विशेष लाभ मतदार संघातील शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी जंगजंग पछाडले विशेष म्हणजे त्यांच्या प्रयत्नातून नगर तालुक्याला मिळालेल्या पीक विम्याच्या भरपाईची रक्कम जिल्हयाच्या एकूण भरपाईच्या एक तृतीयांश असे. या बाबींची दखल घेत जिल्हा बँकेने इतर तालुक्यातही पीक विम्याचा अधिकाधिक लाभ मिळविण्यासाठी दादा पाटलांवर विशेष जबाबदारी सोपवली. त्यामुळे जुजबी शिक्षण झालेला हा नेता विम्यासारख्या क्लिष्ट विषयातही बँकेसह सरकारी अधिकाऱ्यांचाही मार्गदर्शक बनला.[१०६]

दूध दरवाढ मिळावी रोजगार हमीचे दर वाढवावेत केंद्राच्या योजनांमधून अंगणवाडया सुशिक्षित बेरोजगारांना एसटीडी बूथ, नगरच्या रेल्वे स्थानकावरील वाढीव आरक्षण कोटा व संगणकाद्वारे आरक्षण मुंबई ते विशाखाट्टणम राष्ट्रीय महामार्ग बीड परळी रेल्वेमार्ग आदींबाबत दादा पाटलांची भूमिका आग्रही होती. मोडकळीस आलेल्या जिल्हा दूध संघात दादा पाटलांनी 'जान'आणली. जिल्हा दूध संघाच्या विभाजनानंतर दादा पाटलांनी नगर तालुका दूध संघ स्थापन करून तो चांगल्या प्रकारे चालवला. नगर तालुक्यात सुमारे ३० माध्यमिक विदयालये स्थापन करून स्थानिक संस्थाकडे सुपुर्द केली हीच महाविदयालये स्वतःच्या संस्थेमार्फत सुरू केली असती तर दादा पाटील आज तालुक्याचे शिक्षणसम्राट असते विक्री संघ व तालुका देखरेख संघ या संस्थांना दादा पाटलांनी संजीवनी दिली.

पिण्याच्या पाण्याचीच भ्रांत असलेल्या नगर तालुक्यातील वाळकी येथे सहकारी साखर कारखाना स्थापन करून दादा पाटलांनी आपल्या राजकीय विरोधकांना चांगलीच चपराक दिली.

सन १९९६ मध्ये केवळ आपल्याच कारखान्याचा नव्हे तर श्रीगोंदयातील कुकडी सहकारी साखर कारखान्याच्या प्रस्तावालाही दादा पाटलांनी मान्यता मिळवली आठ महिन्यांत दादा पाटलांनी कारखाना उभा करून २००१ मध्ये पहिला गळित हंगाम सुरू केला. मधल्या काळात कारखान्याचा कार्यकाळ कसोटीचा गेला परंतु यावर्षी तालुक्यात फारसा ऊस नसतानाही चार लाखांचे गाळप करण्याची किमया दादा पाटलांनी करून दाखवली शेती व ऊसाच्या प्रश्नाबाबतचा त्यांचा अभ्यास वाखाणण्याजोगा आहे. त्याची दखल घेऊन प्रदेश काँग्रेसने त्यांची वर्णी काँग्रेसच्या अतिरिक्त ऊस व कारखानदारी समोरील समस्यांचा अभ्यास करून अहवाल सादर करणाऱ्या त्रिसदस्यीय समितीवर लावली. दादा पाटलांनी ही जबाबदारी समर्थपणे पार पाडून श्रेष्ठींना राज्यातील ऊस प्रश्नाबाबतचा अहवाल सादर केला. साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्याचा दादा पाटलांचा मानस आहे. त्यामुळेच आपण कधीही फोन केला तर दादा पाटलांचा पत्ता साखर कारखान्यावर म्हणजे वाळकीचा असतो.[१०७]

## ब) बिगर सहकारी राजकीय नेतृत्व :-

### १. गोविंदराव आदिक – श्रीरामपुर :-

गोविंदराव आदिक यांनी खानापुर (ता. श्रीरामपुर) सारख्या छोटया गावात जन्माला येऊनही पाच वेळा आमदार दोन वेळा खासदार, एसटी महामंडळाचे अध्यक्ष व दोन वेळा मंत्रिपद अशी राजकीय पदे भूषवली आहे. कामगार क्षेत्रातही त्यांचा मोठा दबदबा असून, मिल मजदूर संघ, 'इंटक'पासून ते ऊसतोडणी कामगारांपर्यंतच्या विविध कामगार संघटनेचे नेतृत्व त्यांनी केले. विद्यार्थीदशेपासूनच ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या संपर्कात आलेले आदिक श्री. पवार यांच्या शेतकरी दिंडीपासून ते 'पुलोद' च्या प्रयोगापर्यंतचे खरे सूत्रधार होते. शरद पवार यांचे अत्यंत जवळचे सहकारी म्हणून ते राज्यात परिचित होते. शरद पवार व गोविंदराव आदिक यांची राजकीय कारकीर्द जवळपास एकाच वेळी सुरू झाली. यशवंतराव चव्हाणांच्या महाराष्ट्र नवनिर्माणाच्या काळात जे युवा नेतृत्व उदयाला आले, त्यामध्ये श्री शरद पवार व गोविंदराव आदिक यांचा समावेश होता. अनेक अवघड गोष्टी व विषय कार्यकर्त्यांना सोप्या करून सांगण्यात आदिकांच्या हातखंडा होता. कृषीमंत्री झाल्यानंतर २००३ पासून त्यांनी शेतकऱ्यांसाठी त्यांनी तयार केलेला मेळावा राज्यभर गाजला. शेतकऱ्यांसाठी त्यांनी तयार केलेली ११ कलमी सनदही दिल्लीपर्यंत

गेली परिणामी त्यांची केंद्र व राज्य सरकारच्या कृषी खात्यांशी समन्वय ठेवण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षपदी वर्णी लागली. सध्याच्या काळात ते एका अर्थाने राजकारणातील 'डार्कहॉर्स' मानले जातात.

राज्यात गोविंदराव आदिक कोणत्या क्षणी कोणती जबाबदारी येईल, हे सांगता येत नाही. अनुयायी निवडताना मात्र आदिकांची बऱ्याच वेळा गल्लत झाली. ज्यांना त्यानी मोठे केले त्यापैकी काहीजण त्यांच्याविरोधात दंड थोपटतात. राज्यातील कोणत्याही जिल्हयात त्यांचे अनुयायी आहेत, ही त्यांची जमेची बाजू इतर नेत्यांच्या तुलनेत जिल्हयात त्यांचे राजकीय बस्तान कमी असतानाही कॉग्रेसचे जिल्हाध्याक्षपद त्यांनी गेली तीन वर्षे ताब्यात ठेवून खासदार बाळासाहेब विखे व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात गटाला शह दिला. त्यावरून त्यांचे प्रदेश व देश पातळीवरच्या पक्षीय राजकारणातील महत्व लक्षात येते. इंदिरा गांधी यांचे विश्वासू सहकारी व राज्याचे उपमुख्यमंत्री बॅ. रामराव आदिक यांची साथही त्यांना जीवनप्रवासात लाभली.

सन १९९० च्या सुमारास जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीत तिकिटवाटपावरून मतभेद झाल्याने श्री. आदिक यांनी राजीव कॉँग्रेसची स्थापना श्रीरामपूरला वकिली करत असतानाच कम्युनिस्ट पक्षाकडे आकर्षित झाले. पुढे १९७० च्या सुमारास श्रीरामपूर तालुका कॉँग्रेसकडे सरचिटणीस म्हणून कॉँग्रसमध्ये ते सक्रिय झाले. वकिली करताना 'श्रीरामपूर टाइम्स' हे साप्तहिकही त्यांनी चालवले. शिवाय विशाल सहयाद्रीचे बातमीदार म्हणूनही काम केले. पुण्यात शिकत असताना आचार्य अत्रे यांनी लढविलेल्या निवडणुकीच्या कार्यात त्यांनी विशेष सहभाग घेतला. राजकारण, कामगार, पत्रकारितेसह विविध क्षेत्रात ठसा उमटवलेल्या आदिकांची 'इमेज' राज्यपातळीवरचे नेते म्हणून आहे. मुख्यमंत्रिपदाचा विषय सुरू झाला, की गोविंदराव आदिक यांचे नाव नेहमीच चर्चेत येते.[१०८]

**२. सदाशिव लोखंडे – राहाता :–**

मूळचे जामखेड तालुक्यातील असले, तरी व्यवसायानिमित्त मुंबईस वास्तव्यास असलेले सदाशिव लोखंडे तीन वेळा कर्जत–जामखेड विधानसभा मतदार संघात आमदार झाले आहेत. या १५ ते २० वर्षांत विरोधकांना त्यांच्यासमोर सक्षम झाले आहेत. मतदार संघातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे स्थानिक व जिल्हास्तरीय नेतेमंडळींची साथ घेत

असतानच विरोधातील नेत्यांनाही या प्रक्रियेत सहभागी करवून घेण्याची अनोखी कला त्यांना साधली आहे. सकारात्मक भूमिका घेऊन राजकारणात हिरारीने सहभागी होऊन आमदार सदाशिव लोखंडे यांनी संघटनात्मक स्तरापासून विविध पातळीवरील निवडणुका लढवून ध्येयपूर्तीच्या दृष्टीने यशस्वी वाटचाल केली.सलग चार वेळा कर्जत–जामखेड विधानसभा मतदारसंघातून भाजप–शिवसेना युतीच्या माध्यमातून निवडणूक लढवली. सदाशिव लोखंडे यांना पिढीजात राजकीय वारसा लाभलेला नाही. दिघोळ (ता. जामखेड) येथून आईवडिलांसमवेत लोखंडे मुंबईला गेले. त्यांनी तेथेच बारावीपर्यंतचे शिक्षण घेतले. पुढील शिक्षणात अडथळे निर्माण झाल्याने त्यांनी व्यवसायाला प्राधान्य देऊन व्यवसायास प्रारंभ केला. संघटनात्मक स्तरावर भाजप व युवा मोर्चा या दोन्ही ठिकाणी पदाधिकारी म्हणून काम पाहिले. एवढेच नाही, तर मुंबई महानगरपालिकेची निवडणूकही लढवली.यश मिळाले नाही. मात्र पराभवाने खचून न जाता सक्रिय राजकारणात ते टिकून राहिले. पुढे १९९० च्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आणि हशु अडवाणी व भाजपाचे दिवंगत नेते प्रमोदजी महाजन यांचा आदेशानुसार सदाशिव लोखंडे यांनी कर्जत–जामखेड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवलीलृ पण यश मिळाले नाही. पराभवाने खचून न जाता मतदारसंघातील जनतेशी जवळचे संबंध निर्माण झाले. पुढे १९९५ मध्ये विधानसभा लढवली आणि विजय मिळाला.[१०९]

१९९५ मध्ये राज्यात युतीचे सरकार आले आणि कर्जत–जामखेडच्या जनतेला विकासाची गंगाजळी मिळाली. दोन्ही तालुक्यात सिंचन प्रकल्पाच्या कामांना प्राधान्य दिले. कर्जत तालुक्यातील जनतेचा २५ ते ३० वर्षापासून कुकडीचे पाणी मिळणार, अशा आश्वासनामुळे भ्रमनिरस झाला होता. मात्र भाजप–शिवसेना युतीच्या काळात सदाशिव लोखंडे यांच्या प्रयत्नांना यश आले आणि साडेचारशे कोटी खर्च करून कर्जत तालुक्याला पाणी आणले. जामखेड तालुक्यातही अमृतलिंग, भुतवडा लिंक व मुंजेवाडी या तीन लघु पाटबंधारे तलावांना लोखंडे यांनी मंजुरी मिळवली. दोन्ही तालुक्यांमध्ये कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधण्यातही उच्चांक झाला. पुढे १९९९ च्या विधानसभा निवडणुकीतील सत्तांतराचा फटका मतदारसंघातील सिंचन प्रकल्पाच्या कामांना बसल्याची खंत श्री. सदाशिव लोखंडे यांना वाटते. कर्जत, दूरगाव, जामखेड, खर्डा, दिघोळ या गावांसाठी नळ, पाणीपुरवठा योजनांसाठी निधी मिळू शकला. उर्वरित वैधानिक विकास महामंडळाच्या माध्यमातून जामखेड व खर्डा अंतर्गत सिमेंटचे रस्ते तसेच दोन्ही तालुक्यात

ग्रामपंचायत कार्यालय उभारणीसाठी निधी उपलब्ध करून दिला. स्थानिक निधीतून समाजमंदीर, सभामंडप, नळयोजना हातपंप, रस्ते, पूल दिल्याचे सदाशिव लोखंडेनी सांगितले. तालुक्यातील शेतकत्यांच्या सोयीसाठी खेमानंद दूध संघाची निर्मिती करून दोन्ही तालुक्यात शीतकरण केंद्र संघाची निर्मिती करून दोन्ही तालुक्यात शीतकरण केंद्र उभारली. संघाचे चाळीस संकलन केंद्र असून, मतदारसंघात ४०० महिला बचतगटही श्री. सदाशिव लोखंडे यांच्या पुढाकारातून उभारण्यात आले. ऊस उत्पादकांसाठी दुरगाव (ता. कर्जत) येथे प्रतिदिनी ५०० मेट्रीक टन गाळप क्षमतेचा खासगी साखर कारखाना उभारण्याचा श्री.सदाशिव लोखंडे यांचा प्रयत्न आहे. खर्डा (ता. जामखेड) येथे सूतगिरणी, दूधभुकटी प्रकल्प व इतर दुग्धजन्य पदार्थांवर प्रक्रिया उभारण्यासाठी सदाशिव लोखंडे प्रयत्नशील आहेत. सदाशिव लोखंडे हे भाजपाचे नगर दक्षिण जिल्ह्यातील एकमेव आमदार असून, राज्यात विरोधी पक्षाची सत्ता असतानाही कर्जत–जामखेड विधानसभा मतदासंघावर भाजपचे वर्चस्व टिकून आहे.[११०]

### ३. दिलीप गांधी – अहमदनगर :–

राजकारणात जैन समाजातील दिलीप गांधी यांनी आपल्या कर्तृत्वाचा व कष्टाच्या जोरावर स्वतःची वेगळी 'इमेज'तयार केली. संघर्षमय जीवनप्रवास असलेल्या दिलीप गांधी यांनी दहावीनंतर १९६८ ते ७२ दरम्यान रामचंद्र अँण्ड सन्स या ऑटोमोबाईल दुकानात काम केले. त्यानंतर नगरमध्ये ज्यूसची गाडी चालवली. सन १९७५ पासून ते जनसंघात सक्रिय झाले. भाजपच्या स्थापनेपासून ते पक्षात दाखल झाले. त्याच वेळी भारतीय जनता युवा मोर्चाच्या शहराध्यक्षपदाची धुरा त्यांनी सांभाळली. पाच वर्षांनी, म्हणजे १९८५ मध्ये नगरच्या नगरपालिकेची निवडणूक झाली. त्या वेळी राज्यात प्रथमच भाजपने कमळाच्या चिन्हावर ही निवडणूक लढवली. त्यात त्यांना नऊ जागा मिळाल्या. त्यात दिलीप गांधी यांचाही समावेश होता. पुढे दिलीप गांधी यांना उपनगराध्यक्षपदही त्यांना मिळाले. त्याच कालावधीत सध्याच्या विकसित सावेडी परिसरात रस्ते व पथदीपांद्वारे विकासाचा मुळ पाया मजबूत करण्यासाठी दिलीप गांधी यांनी विशेष पुढाकार घेतला. दिलीप गांधी यांनी भाजपचे शहराध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस व जिल्हाध्यक्ष अशी पदे भूषवत जिल्हाभर भ्रमंती केली. नगर शहरासह जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर त्यांनी आंदोलने करून तुरूंगवासही भोगला. याच कालावधीत जिल्ह्यातील बारीकसारीक प्रश्नांचा त्यांचा अभ्यास झाला.

तीन वेळा नगरसेवक झाल्यानंतर दिलीप गांधी यांना १९९९ मध्ये पक्षाने नगर मतदारसंघातून लोकसभेची उमेदवारी दिली. श्री. दिलीप गांधी भाजप कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या साथीने अथक परीश्रम करून दिलीप गांधीना निवडून आणले. या निवडणुकीत त्यांनी दादा पाटील–शेळके यांचा पराभव केला. नगरसेवक ते थेट खासदार, असा त्यांचा राजकीय प्रवास झाल्याने राजकीय जाणकरांना मोठा धक्का बसला. खासदार झाल्यानंतर शहरातील पिण्याच्या पाण्यापासून ते थेट ग्रामीण भागातील पाटपाण्यापर्यंत, एमआयडीसीच्या झोन प्रश्नापासून थेट गावातील टँकरपर्यंतचे प्रश्न दिलीप गांधी यांनी हाताळले. पंतप्रधान सडक योजनेअंतर्गत नेवासे तालुक्यातील वडाळा ते पिंपळगाव या रस्त्याचे काम सुरू करण्याचा मान त्यांनी मिळवला. दक्षिण नगर जिल्ह्यातील बंधारे बांधण्यासाठीही त्यांनी मोहीम राबवली. ग्रामीण भागातील दुरध्वनी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी कंबर कसली होती. ग्रामीण भागातील बस थांबा च्या शेड, सांस्कृतिक भवन आदी सार्वजनिक उपक्रमामुळे दिलीप गांधी यांचे नाव आजही खेडयापाडयांत मोठया आदराने घेतले जाते. पंतप्रधान व मुख्यमंत्री निधीतून त्यांच्या पुढाकाराने अनेकांना वैद्यकीय मदत मिळाली. त्याचाही उल्लेख नेहमी होतो. अहमदनगरचे रणगाडा संग्रहालय अद्ययावत करण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला होता. अनेक केंद्रीय मंत्र्यांना शिंर्डी व शिंगणापूरला दर्शनानिमित्त आमंत्रण देऊन त्यांच्या माध्यमातून जिल्हयाचे विविध प्रश्न मार्गी लावले.[१११]

दिलीप गांधी यांनी गावोगावी सांस्कृतिक भवने उभारल्याने तेथे आता गोरगरिबांच्या मुलामुलींची लग्ने होतात. त्यातीन सामान्यांचा मंडपांचा खर्च वाचतो, ही आपल्या समाधानाची बाब असल्याचे ते आर्वजुन नमूद करतात. अहमदनगरला केंद्रीय उड्डाणमंत्री शाहनवाज खान यांना आणून विमानतळाचा प्रश्न अंतिम टप्प्यात आणला. दौड–मनमाड लोहमार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरणाचे सर्वेक्षण आपल्या पुढाकारने पूर्ण झाले. ब्रिटीशांच्या काळातील, म्हणजे १९१० च्या सुमारास बेलापूर, नेवासे, शेवगाव व गेवराई या लोहमार्गाचे सर्वेक्षण दिलीप गांधी यांनी केले. तथापि, पुढे हा विषय मात्र फारसा गांभीयाने घेतला गेला नाही.

प्रथम खासदार झाले असतानाच दिलीप गांधी यांची अचानक अटलबिहारी वाजपेयींच्या केंद्रीय मंत्रिमंडळात वर्णी लागून, त्यांच्याकडे जहाजबांधणी खात्याच्या राज्यमंत्रिपदाचा कार्यभार आला. या मंत्रिपदाच्या काळात त्यांनी झंझावती दौरे व विकासकामांची रास घालणे सुरू केले. त्याच काळात, म्हणजे २००४ मध्ये नगरला अखिल भारतीय मराठी नाटयसंमेलन झाले. त्याचे

स्वागताध्यक्ष दिलीप गांधी यांनी भूषवले. नटश्रेष्ठांच्या वादाने हे संमेलन गाजले असले, तरी मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय नाटयसंमेलनाचे शिवधनुष्य पेलण्याची हिंमत त्यांनी दाखवली. याच संमेलनाच्या आठवणींसाठी आतापर्यंत दरवर्षी स्वागताध्यक्ष करंडक एकांकिका स्पर्धा भरविण्याचा उपक्रम त्यांनी सतत चालू ठेवला आहे.[११२]

**४. तुकाराम गडाख – नेवासा :–**

१९८९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत तुकाराम गडाख नेवासे–शेवगाव विधानसभा मतदारसंघातील तत्कालीन ज्येष्ठ नेते मारूतराव घुले यांच्याविरूद्ध अपक्ष उभे राहिले. तुकाराम गडाख यांनी नेवासे–शेवगाव मतदारसंघात कामे सुरू केली. जायकवाडी धरणातून मतदारसंघातील एक हजार २५० सिंचन योजनांना मंजुरी मिळवली. मतदारसंघातील विविध कामांचा झपाटाही चालूच होता. त्यानंतर झालेल्या १९९५ च्या विधानसभेच्या निवडणुकीत तुकाराम गडाख यांचा सामना काँग्रेसच्या पांडूरंग अभंग यांच्याशी झाला. त्यामध्ये अवघ्या १२ मतांनी तुकाराम गडाख यांचा पराभव झाला. त्यानंतर तुकाराम गडाख भाजपमध्ये गेले. १९९९ ची विधानसभा निवडणूक त्यांनी भाजतर्फे लढवली. त्यावेळी घुले यांचे चिरंजीव नरेंद्र घुले यांच्याकडून तुकाराम गडाख यांना पराभव पत्कारावा लागला. पुढे जिल्हयाची व विशेषतः दक्षिण नगर जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलत गेली. गडाख यांनी भाजपला पक्षाला सोडले. प्रताप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या शेतकरी विचार दलाची कास धरली. २००२ मध्ये झालेल्या शेतकरी जिल्हापरिषदेच्या निवडणुकीत या पक्षाच्या सात जागा आल्या.परिणामी जिल्हा परिषदेच्या सत्ता स्थापनेत शेतकरी विचार दलाने महत्वाची भूमिका बजावत जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे सभापतिपद पटकावले.[११३]

ऑगस्ट २००२ मध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत सोनईत झालेल्या मेळाव्यात श्री.तुकाराम गडाख यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्याच वेळी शरद पवार यांनी लोकसभेच्या आगामी निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रसच्या उमेदवारीसाठी तुकाराम गडाख यांचे नाव जाहीर केले.सन २००४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत नगर मतदारसंघातून तुकाराम गडाख यांनी भाजपाचे प्रा. ना. स. फरांदे याच्याविरूद्ध पाऊण लाख मतांनी विजय मिळवला.

खासदार झाल्यानंतर तुकाराम गडाख यांनी दक्षिण नगर जिल्ह्यातील तालुक्यांाध्ये वेगाने घोडदौड सुरू केली. त्यातच श्रीगोंदे तालुक्यातील वनमंत्री बबनराव पाचपुते व तुकाराम गडाख यांच्या समर्थकांत न पटल्याने तुकाराम गडाख व बबनराव पाचपुते यांच्या शाब्दिक चकमकही झालीलृ परंतु पुढे ती वरकरणी मिटली. सहज फाउंडेशच्या माध्यमातून व केंद्राच्या निधीतून तुकाराम गडाख यांनी साडेसात हजार अपंगांना साडेचार कोटी रूपयांचे साहित्य वाटण्याचा उपक्रम राबविला. आषाढी व कार्तिकी एकादशीला नगर–औरंगाबाद रस्त्याने जाणाऱ्या ४५ दिंडयातील वारकऱ्यांना अन्नदान करण्याची मोहीम तसेच नाताळामध्ये ख्रिश्चनांना भेटकार्डे, इतर रमजानमध्ये मुस्लिमांना नमाजाचे वेळापत्रक पाठवण्याचा उपक्रमही त्यांनी चालवला आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून जिल्ह्याच्या तीर्थक्षत्र विकासाला चालना देण्यासाठी त्यांनी विशेष पुढाकार घेतला आहे.त्याअंतर्गत शनिशिंगणापूर, नेवासे, देवगड व पैठण या देवस्थानांना जोडण्यासाठी १४ कोटी रूपयांचा निधी मिळवल्याचा दावा तुकाराम गडाख करत आहेत.

राजकीय क्षेत्रात घोडदौड चालू असतानाच तुकाराम गडाख यांनी शिक्षण व धार्मिक क्षेत्रातही भरीव कार्य केले. हनुमान ग्रामीण विकास व संशोधन मंडळ या शिक्षण संस्थेमार्फत त्यांनी सोनईला प्राथमिक व माध्यमिक शाळा काढली. शेवगावला मुलींसाठी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय सुरू केले. नेवासे येथेही आदर्श कन्या विद्यामंदीर सुरू केले. १९९२ पासून तरूण मंडळामार्फत नेत्र, रक्त व कॅन्सर शिबिरांसह वृक्षारोपणाचे कार्यक्रम त्यांनी राबविले. ग्रामीण भागातील जनतेमध्ये व विशेषतः तरूणांमध्ये धार्मिकता वाढीस लागावी या उद्देशाने तुकाराम गडाख यांनी पुढाकार घेऊन पानसवाडीला बाल वारकरी शिक्षण संस्था स्थापन करून त्याद्वारे बाल वारकरी घडवण्याचे कार्य सुरू केले.[११४]

काही वर्षांपासून तुकाराम गडाख यांनी सुरू केलेल्या सामूहिक पारायण हजारोंचा प्रतिसाद मिळत आहे. सन २००२ मध्ये त्यांनी ९०३३ वाचक पारायण सोळयासाठी बसवण्याचा संकल्प केला होता. प्रत्यक्षात ११०५१ वाचकांनी सहभाग घेतला. २००३ मध्ये आकडा २२ हजारावर गेला, २००४ मध्ये ५१ हजार जन ज्ञानेश्वरी पारायण सोहळयत सहभागी झाले. २००५ व ०६ मध्ये अनुक्रमे ७० व ६३ हजार आबालवृद्ध पारायण सोहळयाला बसले. चालू वर्षी हा आकडा पाऊण लाखावर गेला. यामुळे तुकाराम गडाख यांचे जनमानसात आगळेवेगळे स्थान निर्माण झाले. पारायणासाठी येणात्या लाखो भाविकांची निवास व भोजनाची व्यवस्था करण्याचे दिव्य

तुकाराम गडाख व त्याचे सहकारी दरवर्षी पार पाडतात. शेतकरी, कामगार, व्यापारी, पाणी, नियोजन, वीज, उद्योग आदी क्षेत्रातील विविध प्रश्न लोकसभेत मांडून त्याची सोडवणुक करण्यासाठी यांनी विशेष प्रयत्न केले. नंतर स्थापन केलेले शेतकरी विचारदलही 'राष्ट्रवादी' बरोबर गेल्याने राजकीय पेच-डावपेचातून काही काळ अलिप्त होऊन त्यांनी भक्तीमार्ग चोखळला. गावागावात प्रवचने व व्याख्यानांच्या माध्यमातून त्यांनी संघटन सुरू केले. ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यातून वारकरी संप्रदाय आपलासा केला. दरम्यानच्या काळात शरद पवारांशी पुन्हा दिलजमाई झाली आणि गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत यशाने त्यांना लोकसभेची दारे उघडली गेली. अलीकडच्या काळात तुकाराम गडाख यांना त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील जिल्ह्यातील काही नेत्यांच्याच विरोध असल्याचे जाणवते. विशेष म्हणजे तुकाराम गडाख यांचा मतदारसंघातील संपर्कही कमी झाला.त्यामुळे त्यांच्या विरोधकांनी अधिक उचल खाल्ली आहे. वीज भारनियमनप्रश्नी त्यांनी स्वपक्षीय पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्यावर शरसंधान केले. खासदार निधिच्या वाटपावरून बबनराव पाचपुते व जिल्हाध्यक्ष दादा कळमकर यांच्याशी वाद झाले. जिल्हा परिषद निवडणुकीत चिरंजीव रविराज याला यश न मिळाल्याने पक्षकार्यातून ते काहीसे अलिप्त झाले आहेत.[११५]

**५. सूर्यभान वहाडणे - कोपरगाव :-**

जिल्ह्यात वा कोपरगावातच नव्हे, तर राज्यात 'आण्णा' या नावाने परिचित असणाऱ्या सूर्यभान वहाडणे यांनी राज्यसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य व विधानपरिषदेचे उपसभापती म्हणून काम केले. सूर्यभान वहाडणे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असताना राज्यात युतीचे सरकार आले, पण या सर्व 'माहोल' मध्ये सूर्यभान वहाडणे यांनी आपले वेगळेपण जपले. कष्टकरी व सर्वसामान्यांचे प्रतिनिधी म्हणूनच ते मुंबई व दिल्लीत वावरले. कोपरगावला काळे-कोल्हेंच्या राजकारणात कार्यकर्ते व पक्ष टिकवण्यात त्यांनी बऱ्याचपैकी यश मिळवले असले, तरी 'खंडकरी शेतकऱ्यांचे नेते' म्हणूनच त्यांचे कर्तृत्व खऱ्या अर्थाने खुलले. पक्षाच्या संघटन कौशल्यात आपल्या निश्चित विचारसरणीने त्यांनी वेगळी छाप पाडली.

कोपरगाव तालुक्यातील पुणतांबे येथे ५ मार्च १९३० रोजी शेतकरी कुटुंबात जन्म झालेल्या सूर्यभान वहाडणेवर बालपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार झालेले. भारतीय जनसंघाचे पूर्णवेळ काम करताना संघाच्या शाखाही ते चालवायचे. कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार

समितीत नोकरी व संघाचे काम असा दिनक्रम सुरू असताना १९६३-६४ पासून त्यांच्या नेतृत्वगुणाचा परिचय सर्वांना येऊ लागला. सिलिंगच्या कायद्यामुळे शेतकऱ्यांकडील जादा जमिनी भूमिहिनांना गेल्या. भांडवलदारांकडील हजारो एकर जमिनी काढून घेऊन त्या ज्या गोरगरीब शेतकऱ्यांच्या मालकीच्या होत्या, त्यांना परत मिळतील, अशी आशा वत होती. पण जमीन मालकाला न विचारताच त्यांच्या जमिनींचे शेती महामंडळ तयार केले गेले.[११६]

राज्यभर खंडकऱ्यांचे आंदोलन ऊभे करण्यात त्यांनी जीवाचे रान केले. सायकलवर गावोगावी फिरून त्यांनी शेतकऱ्यांना संघटीत केले. १९६४ मध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली श्रीरामपूर तालुक्यातील जळगाव येथे खंडकरी शेतकऱ्यांनी 'जमीन बळकाव'आंदोलन केले व शेतकऱ्यांसमवेत विसापूर तुरूंगाची तरीही केली. त्यानंतर सूर्यभान वहाडणे यांनी कधी मागे वळून पाहिलेच नाही. मोटरसायकलवरून राज्यभर दौरा करून राज्यभरातील खंडकरी शेतकऱ्यांना एकत्र केले. खंडकरी शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष म्हणूनही हा प्रश्न कडेला लावण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.याच दरम्यान जनसंघाचे तालुका व जिल्हा नेते पदाधिकारी झाले. या पदाच्या माध्यमातून सर्वसामान्यांशी व त्यांच्या प्रश्नांशी त्यांची नाळ जोडली गेली. लढाऊ कार्यकर्ता म्हणून त्यांचे नाव झाले.सन १९६७ मध्ये विधानसभेच्या निवडणुकीत श्रीरामपुरमधून त्यांनी जनसंघातर्फे भाग घेतला. या पहिल्या लढाईत यश मिळाले नसले, तरी पाणी योजना, अल्पभूधारकांचे प्रश्न, शेतीमालाचा भाव, वीज दरवाढ, पाझर तलाव, एसटी दरवाढ, वाढती महागाई आदी प्रश्नावरील आंदोलने सूर्यभान वहाडणे सतत चर्चेत राहिले. लोकांच्या तोंडी त्यांचे नाव आदराने यायचे. आंदोलन व तुरूंगवास ठरलेला असायचा. दरम्यानच्या काळात १९७५ मध्ये आणीबाणी काळात त्यांना तब्बल १९ महीने तुरूंगवास भोगावा लागला.

पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या आचार व विचारप्रणालीला मानणारे व शिस्तप्रिय स्वयंसेवक म्हणून प्रसिद्ध असलेल्या सूर्यभान वहाडणे यांच्या लोकाभिमुख कार्याची दखल राज्यपातळीवर घेण्यात आली. विधानसभा सदस्यांतून त्यांची विधानपरिषदेवर आमदार म्हणून त्यांची दोन वेळा नियुक्ती झाली. बारा वर्षे विधानपरिषदेवर काम करताना त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला आपला मतदारसंघ मानले. शेतकरी, कर्जमुक्ती, राज्यभरातील विविध प्रकल्पग्रस्तांचे विविध प्रश्न, अपूर्ण जलसिंचन योजना, रोजगार हमी योजनेवरील मजुरांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम त्यांनी केले. रोहयो तसेच पाटबंधारे व सहकारी संस्थांमधील गैरव्यवहारालाही त्यांनी वाचा

फोडली. राज्याच्या विविध प्रश्नांवर हक्कभंग प्रस्ताव वा लक्षावेधी सूचनेच्या माध्यमातून अभ्यासपूर्ण मते मांडणार कर्तव्यदक्ष व जागरूक आमदार म्हणून त्यांची ख्याती होती. १९८२ मध्ये ते विधानपरिषदेचे उपसभापती झाले. पीठासन अधिकारी म्हणून काम करताना निष्पक्ष भावनेने सभागृहाचे कामकाज करण्याचा आदर्श पायंडा त्यांनी समोर ठेवला. विरोधी पक्षाला झुकते माप देण्यासारखे प्रकार त्यांच्याकडून झाले नाहीत. यामुळे बऱ्याचदा स्वपक्षीय भाजप सदस्यांबरोबर त्यांच्या शाब्दिक चकमकही झडत.एकदा तर ते अध्यक्षस्थानी असताना भाजप सदस्यांना सभात्यागही करावा लागला.

एकीकडे राजकीय पटलावर सूर्यभान वहाडणे यांच्या कार्याचा ठसा उमटत असताना दुसरीकडे पक्षीय वाटचालीतही त्यांचे योगदान मोलाचे राहिले. भाजपाचे राज्यस्तरीय सचिव व उपाध्यक्ष म्हणून कामाचा अनुभव असल्याने त्यांना प्रदेशाध्यक्षपद देण्यात आले. या पदावर काम करताना नियोजनद्ध पक्ष बांधणी त्यांनी केली. विधानसभेच्या १९९५ च्या निवडणुकीत संघटन कौशल्य पणाला लावून व राज्यभर झंझावती दौरे करून त्यांनी राज्यात पहीली भाजप–शिवसेना युतीची सत्ता आणण्यात मोलाची कामगिरी बजावली. त्यानंतर त्यांना मंत्रिपदी काम करण्याची संधी देऊ करण्यात आली होती. पण पक्षसंघटना महत्वाची मानत त्यांनी ती नम्रपणे नाकारली. स्वतःसाठी काही न मागता इतरांना भरभरून मिळण्यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले. राज्यात युतीची सत्ता असतानाही प्रदेशाध्यक्ष असलेले सूर्यभान वहाडणे कधीही विशेष बैठकी व्यतिरिक्त मंत्रालयात गेले नाहीत. मंत्रीच त्यांना भेटण्यासाठी येत असत. सत्ताधारी पक्षाच्या मंत्र्यामागे पक्ष मोठा असे समीकरण रूजवून सत्तेच्या राजकारणात पक्षाचे स्थान उंचच असल्याचे दाखवुन दिले. त्यानंतर त्यांनी राज्यसभेवर खासदार म्हणूनही काम केले. दिल्लीच्या वातावरणातही सूर्यभान वहाडणे यांनी आपले वेगळेपण जपले. माजी पंतप्रधान अटलविहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील शेतकरी, मजूर, कामगार व सर्वसामान्यांच्या प्रश्नांना त्यांनी राज्यसभेत चर्चेला आणले.[११७]

### ६. बी. जे. खताळ पाटील – संगमनेर :–

स्वातंत्र्यचळवळीत संगमनेरचा मोठा दबदबा होता. आदिवासी व कष्टकऱ्यांनी ब्रिटिशांविरूद्ध जोरदार संघर्ष केल्याने हा तालुका देशभर गाजत असे. याच तालुक्यातील धांदरफळ या छोटयाशा गावाचा सुपुत्र भिकाजी खताळ हा तालुक्यातील वातावरणाने भारावून

जाऊन ब्रिटिशांविरोधी लढयात सहभागी झाला. फक्त त्याने भूमिगत राहून स्वातंत्र्यसैनिकांना मदत करण्याचे काम केले. एकीकडे शिक्षण सुरू असतानाच स्वातंत्र्यसैनिकांना मदत करून सामाजिक कामही सुरू होते. पुढे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विडी कामगार चळवळीच्या माध्यमातून आधी कम्युनिष्ठ विचारसणीने व नंतर काँग्रसचे काम करता करता विधी शिक्षण पूर्ण केलेल्या बी. जे. खताळ यांनी वकिली सुरू केली. फौजदारी वकिलीनंतर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीस म्हणूनही काम केलेल, पण पक्षाने त्यांना विधानसभा निवडणुकीची उमेदवारी दिली अन् तळागाळातील समाजाचे प्रतिनिधी बी. जे. खताळ पाटील १९६२ मध्ये आमदार झाले.

प्राथमिक शिक्षण धांदरफळ येथे, माध्यमिक संगमनेरला व पदवी, तसेच विधी (लॉ) शिक्षण पुण्याला झालेल्या बी. जे. खताळ पाटील यांना संगमनेर तालुक्यात स्वातंत्र्यचळवळीनंतर विडी कामगार व कम्युनिस्ट विचार चळवळ जोमात सुरू असताना या चळवळीत ते सहभागी झाले. कालांतराने काँग्रेस विचारधारा त्यांनी स्वीकारली. १९४५ पासून १९५१ पर्यंत त्यांनी वकिली केली. त्यांची फौजदारी वकिली जिल्ह्यात प्रसिद्ध होती. एवढेच नव्हे तर, औरंगावाद, सोलापूर, विजापूर, पुणे न्यायालयांतही त्यांनी वकील म्हणून काम केले. त्यानंतर त्यांना प्रथमवर्ग न्यायाधीश म्हणून धुळे येथे काम करण्याची १९५२ मध्ये संधी मिळाली. अवघे वर्षभर या पदावर काम केल्यानंतर पक्षकार्यासाठी बोलावून घेतलेगेल्याने त्यांनी नोकरी सोडली. संगमनेरमध्ये काँग्रेस पक्षाचे काम करत असतानाच १९५७ मध्ये त्यांना पक्षाने उमेदवारी देऊ केली होती, पण त्यांनी पक्षकार्याला महत्व देऊन ती नाकारली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी सुरू असलेल्या प्रचारकार्यात त्यांनी सहभाग घेतला. त्यानंतर १९६२ मध्ये पुन्हा एकदा पक्षाने त्यांना विधानसभेची उमेदवारी देऊ केली अन् १९६२ बरोबरच नंतरही तीन वेळा १९६७, १९७२ व १९८० मध्ये ते आमदार झाले. गांधी विचारांचा पगडा असल्याने राजकारणात आल्यावर श्रमदानातून गावातील रस्ते तयार करण्याच्या कामाला त्यांनी चालना दिली. माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधींनी १९७५ मध्ये २० कलमी कार्यक्रमाद्वारे आदिवासी, तसेच भटक्या जमातींसाठी वसाहती उभारण्याचा निर्णय घेतला होता, पण त्याच्या कितीतरी आधी, म्हणजे चक्क १२–१३ वर्षे आधी १९६२ मध्ये संगमनेरला पहिली भटक्यांची वसाहत त्यांनी उभी केली. त्यानंतर श्रमिकनगरच्या माध्यमातून दुसरी वसाहतही निर्माण केली.

राजकारणात उतरलेल्या बी. जे खताळ पाटील यांनी त्यानंतर तब्बल दीड वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणात वावरताना आपल्या कार्याचा, अभ्यासू वृत्तीचा व सडेतोड वक्तृत्त्वाचा ठसा उमटवला. संगमनेर तालुक्यात त्यांना 'पाटील' म्हणून ओळखले जाते. बालपणापासून महात्मा गांधीच्या विचारांचा पगडा असलेल्या या व्यक्तिमत्त्वाने गांधीजींचे, तसेच महात्मा गांधीवरील सर्व साहित्य वाचले आहे. स्वातंत्र्यानंतर देश उभारणीच्या कार्यात सहभागी होताना गांधीजीच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याच्या कामात त्यांनी आपल्या परीने योगदान दिले. यशवंतराव चव्हाण, कन्नमवार, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले आदींसह तत्कालीन दिग्गज नेत्यांसमवेत काम केलेल्या बी. जे. खताळ–पाटील यांनी उपमुख्यमंत्रिपदापासून कॅबिनेट मंत्रिपदार्यंतच्या आपल्या तब्बल १८ वर्षाच्या मंत्रिपदाच्या कारकिर्दीत पाटबंधारे, सहकार, अन्न व नागरी पुरवठा, महसूल, कृषी, विधी व न्याय, कृषी नियोजन व परिवहन, पाटबंधारे व सिंचन क्षेत्र विकास आदी बहुतांश महत्त्वाच्या खात्यांवर काम केले आहे. स्वतःच्या संगमनेर तालुक्यातील विकासकामांबरोबरच राज्याच्या विविध भागातील पाझर तलाव, छोटे–मोठे बंधारे, शिधापत्रिकेद्वारे धान्यवाटप, दरडोई धान्य व अन्य जीवानावश्यक वस्तूंच्या प्रमाणात वाढ, शेतमलाला उत्पादन खर्चाचा विचार करून हमी भावांसह अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावले. मंत्रिपदी असताना दिग्गज राजकीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली केलेली कामे कर्तव्यभावनेने केल्याचे ते आवर्जुन सांगतात. त्या काळात मी फार काही वेगळे केले नाही. मंत्रिपद हे काही एका माणसासाठी नसते, तर तो व्यवस्थेचा भाग असतो, असे सांगून महात्मा गांधींजीचा अनुयायी म्हणून तळागाळातील समाजाच्या विकासात थोडाफार हातभार लागल्याचे समाधान व्यक्त करतात. सहकारमंत्री असताना राज्यभर सहकाराचे सक्षम जाळे उभारण्यावर त्यांनी भर दिला. सहकारातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा व सर्वसामान्यांचा विकास सहजसाध्य होत असल्याने, या चळवळीसमोरील अडचणी दूर करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक असणात्या बी.जे.खताळ–पाटील यांनी हा १२५० टनी कारखाना सुरू करण्यास मंजुरी मिळवली होती. हातगाडी चालवणारे, तसेच भाजीपाला विकणात्या सर्वसामान्यांना पत मिळावी, यासरख्या छोटया–मोठया व्यावसायिकांना आर्थिक मदत करून त्यांच्या व्यवसायात वृद्धी व्हावी, यासाठी बँकेची स्थापनाही त्यांनी केली.[११८]

समृद्ध व समाधानी राजकीय, तसेच सामाजिक आयुष्य व्यतीत केलेल्या खताळ पाटलांनी कणखरपणा मात्र सोडलेला नाही. परिस्थितीशी झुंज देण्याची मानसिकता आजही ते दाखवतात. समाज नेत्यांकडे विश्वासाने पाहत असतो, हा विश्वास जपण्याचे कर्तव्य नेत्यांनी पार पाडले पाहिजे. युवकांनी अभ्यासू वृत्तीतून सामाजिक कार्य रूजवण्याचा सल्लाही ते देतात. असे हे सेवाव्रती व्यक्तिमत्व राजकारण व समाजकारणात काम करणाऱ्यांसाठी आदर्शवत ठरले आहे.

**७. रावसाहेब शिंदे – श्रीरामपुर :–**

जिल्ह्याच्या राजकीय, सांस्कृतिक आाणि शैक्षणिक वाटचालीत आयुष्य वेचणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये रावसाहेब शिंदे यांचे नाव अग्रस्थानी आहे. समाजजीवनाच्या बहुतांश विषयांत रस घेऊन उत्तुंग कार्य उभे करणारे. अॅड. शिंदे आज वयाच्या ८१ व्या वर्षीही सळसळत्या उत्साहाने कार्यरत आहेत. वकिली व्यवसायाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्यय मिळवून देता देता नवनवे प्रयोग राबवून शेती विकासाचा त्यांनी उभा केलेला आदर्श भावी पिढीला प्रेरणादायी आहे. साहित्य–संस्कृतीच्या माध्यमातून गरीब मुलांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले आहे. निर्भीड व अभ्यासू वक्ता, अशी ख्याती लाभलेल्या रावसाहेब शिंदे यांनी राज्यात व देशाच्या विविध भागांत फिरताना सामाजिक कार्याचा जोमाने देशाच्या विविध भागांत फिरताना सामाजिक कार्याचा जोमाने प्रसार केला. एवढेच नव्हे तर युरोप व अमेरिकेतही व्याख्यानाच्या वा चर्चासत्राच्या निमित्ताने संधी मिळेल तेथे भारतीय संस्कृती व सामाजिक कार्याचा लौकिक तेथील नागरिकांपर्यंत पोहोचवला. त्यामुळेच रावसाहेब शिंदे यांचे जीवन म्हणजे सामाजिक व राजकीय क्षैह्यात नेतृत्व करू इच्छिणाऱ्या युवा नेतृत्वासमोर आदर्शवत ठरले आहे.[११९]

पाडळी व देवठाण (नाशिक) येथे प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर रावसाहेब शिंदे यांचे माध्यमिक शिक्षण सिन्नर व नाशिकच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व संगमनेरच्या पेटिट विद्यालयात झाले.नगर, कोल्हापूर, व पुणे येथे त्यांचे महाविद्यालयीन व विधी शिक्षण झाले. विद्यार्थिदशेत त्यांना शिष्यवृत्ती होती. याशिवाय त्यांनी वादस्पर्धा व निंबध स्पर्धांमध्ये बक्षिसेही मिळवली. शिक्षण सुरू असताना देशात स्वातंत्र्य चळवळ जोरात सुरू होती. 'करेंगे या मरेंगे' या महात्मा गांधी यांनी सुरू केलेल्या आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला. नाशिकला राष्ट्रसेवा दलात काम करताना साने गुरूजींच्या गुप्त बैठका आयोजित करणे,प्रणात फेत्या, मोर्चे तसेच नाशिक, संगमनेर, अकोले परिसरात रस्ते अडवणे, पूल तोडणे, तारा तोडणे अशा भूमिगत चळवळीत ते होते. मोठे

बंधू (स्व) अण्णासाहेब शिंदेसह सर्व शिंदे परिवार स्वातंत्र्यचळवळीत सहभागी झाल्याने ब्रिटीशांनी त्यांचे पाटील वतन रद्द केले. बंदूकही जप्त केली. मात्र, या परिवाराचे कार्य थांबले नाही. या दरम्यान रावसाहेब शिंदे यांना दोन वेळा अटकही झाली. १९४० ते ४४ पर्यंतचे ते स्वातंत्र्याच्या ओढीने मंतरलेले दिवस आजही त्यांना आठवतात.[१२०]

स्वातंत्र्यानंतर परकीयांची सत्ता जाऊन स्वकीयांचे राज्य देशात आले. मात्र, शेतकरी, अदिवासी व गरीब जनतेच्या अज्ञानाचा गैरफायदा घेण्याचे प्रकार वाढू लागले. सावकारशाहीच्या विळख्यात अडकलेल्या जनतेला मुक्त करण्यासाठी रावसाहेब शिंदे यांनी सत्ताधारी स्वकीयांच्या अन्याय–अत्याचाराविरूद्ध दंड थोपटले. साम्यवादी चळवळ व किसान सभेच्या माध्यमातून शेतकरी व आदिवासींच्या संघटना तयार केल्या. शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत करणाऱ्या अन्यायकारक दस्तावेजांची होळी व सरकारी गोदामे फोडून चालणाऱ्या त्यांच्या आंदोलनामुळे सरकार वैतागले होते.त्यामुळे रावसाहेब शिंदे यांना फरार घोषीत करून पकडून देणारास चक्क दहा हजारांचे बक्षीसी जाहीर केले होते. १९४५ ते ५१ पर्यंतच्या या काळातील त्यांचे कार्य दीनदलितांना व गरीबांना न्याय देऊन गेले, तसेच स्वकीय सत्ताधात्यांनाही स्वातंत्र्य कशासाठी मिळवले, याचे आत्मभान देऊन गेले.

स्वराज्य मिळवल्यानंतर त्याचे सुराज्यात रूपांतर व्हावे, यासाठी रावसाहेब शिंदे यांनी आपल्यापरीने आयुष्यभर प्रयत्न केले. १९५४ पासून १९९१ पर्यंतच्या तब्बल ३७ वर्षांच्या काळात वकिली, सहकार विकास, शेतीमध्ये प्रयोगशिलता, आमटेंसमवेत कुष्ठरूग्णांच्या सेवालकार्यात त्यांनी सहभाग घेतला. वकिली करताना दरवर्षी ६५ खटले मोफत व २३५ खटले माफक शुल्क घेऊन लढवले. गरीब कुळांना स्वखर्चाने खटले लढवून जमिनी मिळवून दिल्या. श्रीरामपूर बार असोसिएशनचे अध्यक्षपदी भूषवले. सहकारी साखर कारखाने, कंपन्या रेल्वे, विमा कंपन्या, खरेदी –विक्री संघ, बँका आदींचे कायदेशीर सल्लागार म्हणून काम करताना या संस्थांच्या विकासात योगदान दिले. सहकार कायदा दुरूस्ती समितीवरही त्यांनी काम केले. भोकर व ऐनतपूर यथील स्वतःच्या शेतीचा विकास करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब तसेच सुधारित वाण, औषधी वनस्पती लागवड, फळझाडांची लागवड असे विविध प्रयोग केले. अधिक दूध देणाऱ्या गाईंची जोपसना केली. श्रीरामपूर सहकारी दुध सोसायटी स्थापन केली. राष्ट्रीय जलआयोगाच्या माध्यमातून पाणी वापर व बचत यावर देश–विदेशात व्याख्याने दिली.[१२१]

बाबा आमटे यांनी आनंदवन (वरोरा, जि. चंद्रपूर) येथे सुरू केलेल्या कुष्ठरोग्यांच्या पुनवर्सन उपक्रमात रावसाहेब शिंदे यांनी सक्रिय सहभाग घेतला. तेथील अपंगांनी तयार केलेल्या वस्तूंची प्रदर्शने, अंध कलावंतांच्या ऑर्केस्ट्राचे आयेजन, आनंदवनच्या शुभेच्छा कार्डांची विक्री असे उपक्रम राबवतानाच श्रीरामपूर परिसरातील विवाह समारंभ, वाढदिवस, पदोन्नती नेमणूक, घरभरणी वा दशक्रिया विधीसारख्या कार्यक्रमांतून आनंदवनसाठी देणगी देण्याची प्रथा रूजवली. यातून समारे दहा लाखांचा निधी त्यांनी आनंदवनला पाठवला. याशिवाय श्रीरामपूरच्या संत लूक रूग्णालयात, अंधशाळा व अन्य संस्थांनाही निधी मिळवून देण्यात त्यांचा पुढाकार होता.[१२२]

रावसाहेब शिंदे यांनी विद्यार्थी दशेत शिक्षणानिमित्त संगमनेरला असताना तिथे शिंदे बोर्डिंगची स्थापना केली. गरीब मुलांना एकत्र करून सहभोजन, सहनिवास व सहशिक्षण असा एकात्म सहजीवनाचा पायंडा निर्माण केला. याच काळात विदयार्थ्यांची चळवळही चालवून विदयार्थ्यांचे छोटे मोठे प्रस्न सोडवले पुढे रयत शिक्षण संस्थेत काम करताना याच कार्याचा वारसा होता. रयत च्या माध्यमातून गरीव मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात मोलाचा वाटा त्यांनी उचलला कर्मवीर भाऊरावाव पाटलांची 'कमवा व शिका' ही स्वावलंबी शिक्षणाची योजना विदयार्थ्यांमध्ये रूजवली रयत साठी भरभराटीचे काम सुरू असतानाच दुसरीकडे श्रीरामपुर एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून संस्कार केंद्र व प्राथमिक शाळा त्यांनी सुरू केली. अभ्यासूपणा प्रश्न मुळापासून समजावून घेण्याची हातोटी श्रमिकांच्या श्रमाचे मोळ जपण्याची वृत्ती व उत्कृष्ठ वक्तृत्वपणा. नेमकेपणाने प्रश्न मांडण्याचे कसब यामुळे रावसाहेब शिंदे यांचे नाव महाराष्ट्रातच नव्हे, तर देशविदेशात पोहोचले आहे. त्यामुळेच युरोप, अमेरिका, बन, व्हॅटिकन सिटी यांसह परदेशातील अन्य काही ठिकाणी त्यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली. चर्चासत्रांतून सहभाग घेतला व शोधनिबंधही सादर केले. महाराष्ट्रातही फिरताना सामाजिक व स्वयंसेवी संस्थाच्या तसेच महाविद्यालयांच्या उपक्रमात सहभाग व व्याख्यानांतून सामाजिक कार्याचे मार्गदर्शन त्यांनी केले. श्रीरामपूरला साहित्य परिषदेच्या माध्यमातून वाचन संस्कृती रूजवली. ग्रंथालय चळवळ, ग्रंथ प्रदर्शने, कथाकथन, कवी संमेलने असे उपक्रम राबवून युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण केली. 'शिक्षण आणि समाज', 'चरित्र आणि चारित्र्य', 'एज्युकेशन अँड सोसायटी', 'ध्यासपर्व', 'भावलेली माणसं', अशी काही पुस्तके त्यांनी लिहिली असून, वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिकांतून शेती, शिक्षण, समाज, सहकार, संस्कृती अशा

विविध विषयांवरही विपूल लेखन केले आहे. महात्मा गांधी, अब्राहम लिंकन, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्त्वांचा आयुष्यभर प्रसार करताना व ज्येष्ठ बंधू (स्व.) आण्णासाहेब शिंदे यांच्या देशाप्रेमाचा वारसा पुढे नेताना आजच्या बदललेल्या सामाजिक जीवनाबद्दल रावसाहेब शिंदे खंत व्यक्त करताना ते भीडभाड ठेवत नाहीत. विविध क्षेत्रांत कर्तृत्व व समर्पित योगदानाने आपल्या कार्याचा आदर्श निर्माण करताना शैक्षणिक, सामाजिक, कृषी, सहकार, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांतील त्यांचे योगदान निश्चित ध्यासाने प्रेरित आहे. समाजकार्यात अडथळा ठरू नये म्हणून मंत्रिपद नाकारणारे त्यांचे जीवन म्हणजे समर्पित सेवाभावाचे प्रतिक आहे व म्हणूनच आदर्शवत आहे.

## ३.२.५ महिला सहकार चळवळीतील योगदान :–

जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने हक्क व अधिकार मिळाले पाहिजेत. ही मागणी करणारा आवाज अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात उमटू लागला होता. मात्र खऱ्या अर्थाने स्त्रीवादी चळवळीची पायाभरणी व्हायला जवळजवळ एक शतक लागले. १८४८ साली एलिझाबेथ कॅडी स्टॅन्टन व सुजान ॲथनी या दोन महिलांनी अमेरिकेत ही चळवळ सुरू केली. त्याच काळात युरोपमध्ये सुरूवात झाली. महिलांचे राजकारणातील स्थान कोणते स्टुअर्स मिल यांनी ब्रिटनमध्ये या विषयावर एक चळवळ सुरू केली. समाजवादी व मार्क्सवादी विचारांचे वारे वाहू लागल्यानंतर या चळवळीला एक सशक्त वैचारिक अधिष्ठान लाभले. यातून स्त्रीवादी चळवळ सुरू झाली. अमेरिका व युरोपमधून आलेला विचार तिसऱ्या जगातील आशियाई व आफ्रिकन देशात पसरला व तिथेही चळवळीची बीजे रूजली. १९७५ साली संयुक्त राष्ट्रसंघाने हे वर्षे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्षे'म्हणून घोषित केले. १९७५ ते १९८५ हे दशक 'महिला दशक' म्हणून गणण्यात आले. याचाच परिपाक म्हणून भारतात राजीव गांधी यांच्या कारकीर्दित महिला सबलीकरण व सत्ता विकेंद्रीकरण हे विषय अग्रस्थानी ठेवून काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. १९९३ ते १९९४ साली केलेल्या ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्ती कायदयान्वये पंचायतराज व्यवस्थेत महिलांसाठी आरक्षण घोषित करण्यात आले.[१२३]

महाराष्ट्र हे सहकार चळवळीचे मोठे क्षेत्र महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सहकारी तत्वांचा पाया घातला गेला होता. विविध कार्यकारी सोसायटया, शेती, पाणीपुरवठा, भांडवल,

गृहनिर्माण कमी नफा घेऊन वस्तू विनिमय कर्जपुरवठा शिक्षण गरजेच्या वस्तू इत्यादी अनेक क्षेत्रांत सहकाराचे महत्व लक्षात घेऊन ग्रामीण तसेच शहरी भागात सहकार चळवळ जोमाने पसरली सहकारी तत्वावर अनेक उदयोग निर्माण झाले. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, आण्णा नायकवाडी, लक्ष्मीबाई नायकवाडी, वैकुंठभाई मेहता इत्यादींनी सहकारी साखर कारखान्याचे यशस्वी मॉडेल सिद्र केले. अनेक स्त्रियांना त्यांनी बँकेपर्यत नेले. खाजगी सावकाराच्या आर्थिक शोषणातून स्त्रियांना सुटकेचा मार्ग दाखविला. खादयपदार्थाची विक्री प्रशिक्षण कर्जसहाय्य या मार्गांनी महिलांना सहकारी तत्वांचा अवलंब करण्यास उपयुक्त केले. मेधाताईं सामंत यांनी अत्यंत जाणीवपूर्वक सहकाराचा पर्याय निवडला सहकाराशी मायक्रो फायनान्स जोडणारी आमची पहिली संस्था मेधाताई सामंत सांगत होत्या. आम्ही मोठी कर्जे देतच नाही तारण जमीन नसलेल्या महिलांनाच इथे कर्ज मिळते. अन्नपूर्णाचा मुख्य हेतू तळागाळातल्या महिला आणि पुरूष यांचे अर्थसाहाय्य शिक्षण आरोग्यविमा इत्यादी अनेक मार्गांनी सबलीकरण करणे हा आहे. त्यासाठी त्यांनी मल्टिस्टेट को–ऑप क्रेडिट सोसायटी अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन अशा अनेक संस्था स्थापन केल्या आहेत. तसेच अन्नपूर्णाचे मुख्य काम पुणे मुंबईहून असले तरी फ्रॅंचायझी पार्टनरच्या माध्यमातून त्या बीड इचलकरंजी अशा ग्रामीण भागातही पोहोचल्या आहेत. ना नफा–ना तोटा या तत्वावर सुरू असलेले हे काम सर्वानुमते चालते विशेष म्हणजे त्याचा एनपीए शून्य टक्के आहे. महिलांच्या सचोटीवर हा टप्पा त्यांनी गाठला आहे. मेधाताई सामंत याचे श्रेत्र सहकाराच्या तत्वांना आणि ती राबविणाऱ्या १९९३ पासूनच्या सहकाऱ्यांना देतात.[१२४]

सुधा कोठारी या खेड राजगुरूनगर हे आपले कार्यक्षेत्र मानून १९९३ पासून चैतन्य या संस्थेद्वारे ग्रामीण भागात छोटया उदयोगांना प्रोत्साहन देण्याचे मोलाचे काम करीत आहेत. तर वसुधा सरदार यांनी दौडजवळ पारनेर येथे आसपासच्या शेतकऱ्यांना सहकारी पध्दतीने शेती उत्पादन थेट विक्रीसाठी ग्राहक सेतू शेतीसाठी पूरक व्यवसाय इत्यादी साठी संघटित केले आहे. यापैकी अनेक संघटनांचे काम सहकार आणि बचतगट यांच्या सीमारेषेवर आहे. सहकारी बँकींग या क्षेत्रातदेखील महिलांचा दबदबा आहे. सहकारी तत्वांवर चालणाऱ्या अनेक बँकामध्ये महिला लहान मोठया पदांवर समक्षपणे काम करून सहकारी चळवळ बळकट करत आहेत. माणदेशसारख्या भागात देशातील पहिली महिला ग्रामीण बँक चेतना सिन्हा यांनी काढली.

आत्महत्यांच्या प्रश्नाने पिडीत छोटया शेतकऱ्यांच्या बायकांच्या डोळयामधील वेदनेने ही ठिणगी पेटली. भगिनी निवेदिता सहकारी बँक हेही एक उत्तम उदाहरण आहे.[१२५]

सहकारी क्षेत्रात देखील ज्या ठिकाणी महिलांना प्रोत्साहन व सहकार्य मिळाले त्या ठिकाणी महिलांच्या सहकारी संस्था दिसून येतात. पुणे येथील भगिनी निवेदिता महिला सहकारी बँकेने आज पुण्यातील औदयोगिक महत्वपूर्ण शहरात आपले वेगळे असे स्थान निर्माण केलेले दिसून येते. इतकेच नव्हे तर सहकारी साखर कारखाना सहकारी सुतगिरणी यासारखे औदयोगिक उपक्रम देखील महिला समर्थपणे चालवू शकतात. महिला सहकारी चळवळ पहिल्या टप्प्यात शहरी भागात पसरली. आता दुसऱ्या टप्प्यात तिने ग्रामीण भागात पदार्पण केले आहे. हे सूत्र घेऊन ग्रामीण भागातील सहकारी चळवळ मजबूत करण्याचा विचार केला पाहिजे. हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. तसेच महिलांच्या नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, दूध उत्पादक सहकारी संस्था किंवा तत्सम इतर अनेक सहकारी संस्थाही त्यांनी समर्थपणे यशस्वी करून दाखविलेल्या आहेत.

महिलांनी खंबीरपणे पुढे येणे गरजेचे असून सहकारी चळवळीतील त्यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. कारण बेरोजगारी दारिद्र्य सामाजिक व आर्थिक विषयांना सहकारातून दूर करता येणे शक्य आहे असे धनजंय गाडगीळ यांनी म्हटले आहे. महिलांसाठी सहकारी संस्था या फार मोठा आधार बनू शकतात असे मत यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या 'सहयाद्रीचे वारे'या भाषण संग्रहात म्हटले आहे. स्त्रियांना जागृत करण्यासाठी त्यांना एकत्र महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या वाटवालीत महिला नागरी सहकारी बॅकेचा वाटा अत्यंत महत्वाचा आहे. भारतात पहिली महिला नागरी सहकारी बँक होण्याचा बहुमान हा इचलकरंजी येथील महिला नागरी सहकारी बँकेला जातो. त्यानंतर प्रतिभाताई पाटील यांनी जळगाव येथे अशी दुसरी बँक स्थापन केली. महिला नागरी सहकारी बँकेची महाराष्ट्रातील ही वाटचाल खरोखर लक्षणीय असून या बँकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रगतीचा दूरचा पल्ला गाठला आहे. जिद्द प्रगतीचा निर्धार आणि संकल्प असेल तर नागरी सहकारी क्षेत्रात महिला बँका या निश्चितच महत्वाची कामगिरी पार पाडू शकतात. हे इचलकरंजी व जळगाव येथील प्रयोगांनी सिद्ध केले. या प्रकारचे संकल्प हे भावी काळात महिला नागरी सहकारी बँकाच्या वाटचालीसाठी दिशादर्शक व पोषक ठरत आहेत.[१२६]

स्त्रिया ग्रामीण भागातील असो किंवा शहरी त्यांच्या आर्थिक विकासाच्या संधी भारतीय परंपरेत अगदी कमी असतात. भारतीय परंपरेने स्त्रीचे क्षेत्र चूल आणि मूल एवढेच सिमित केले आहे. परंतु भारतातील पुरोगामी चळवळ ही फुले शाहू आंबेडकर विचार परंपरेने स्त्रियांना समानतेकडे वाटचाल करण्याचे बळ देते. डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखालील घटना समितीने स्त्रियांचे पुरूषांच्या बरोबरीने स्थान कायदेशीररित्या मान्य केले. त्यामुळे देशाच्या विकास प्रक्रियेत स्त्रियांच्या भूमिकेचा विचार करण्यात सुरूवात झाली. यातून स्त्रियांसाठी रोजगार स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना तयार करण्यात आल्या.

सहकार क्षेत्रातील महिला राजकीय नेतृत्वामध्ये भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे नाव उच्च स्थानावर आहेत. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर झालेल्या पहिल्या निवडणूकीत १९६२ मध्ये त्या प्रथम जळगाव मतदारसंघातून निवडून आल्या. ऐदलाबाद मतदार संघातून १९८५ पर्यत त्या विधानसभेवर निवडून आल्या महिला आरक्षणाचा कुठलाही टेकू नसतानाही त्यांनी राजकाराणात मारलेली भरारी कौतुकास्पद अशीच आहे. १९६७-७२ पर्यंत त्यांनी राज्यमंत्री मंडळात राज्यमंत्री १९७२ ते ८५ मध्ये विविध खात्याचे कॅबीनेट पद १९७९-८० मध्ये विधानसभेच्या विरोधी पक्ष नेत्या होत्या आणि उपाध्यक्षाही होत्या. वयाच्या २७ व्या वर्षापासून सक्रीय राजकारणात असलेल्या प्रतिभाताई पाटील यांचे सहकार क्षेत्रात कार्य केले. मुक्ताबाई सहकारी साखर कारखाना प्रतिभा महिला सहकारी बँकेची स्थापना केली. विदयाभारती शिक्षण प्रसारक मंडळाची विविध शाखा महाविदयालय उत्तमरित्या कार्यरत आहेत. शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे या राजकारणात आल्या आहेत. २००९ च्या लोकसभा निवडणूकीत बारामती मतदार संघातून निवडून आल्या 'जाणीव जागरांचा' राष्ट्रवादी युक्ती कॉंग्रेस यशस्विनी बचत गटांचे संघटन यातून राजकीय वाटचाल सुरू आहे. २००४ च्या लोकसभा निवडणूकीत सुशीलकुमार शिंदे यांच्या पत्नी उज्वला शिंदे सोलापूर मतदारसंघातून पुढे आल्या. तसेच २००९ मध्ये त्यांच्याच कन्या प्रणिती शिंदे सहकार क्षेत्रातून राजकारणात प्रभाव दाखवित आहेत.[१२७]

बैजनाथ सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पंकजा मुंडे या सहकारी संस्था माध्यमातून राजकारणात आपले स्थान निर्माण केले आहे. २०१४ पासून बीड मतदारसंघातून आमदार झाल्या व विधीमंडळात ग्रामविकास मंत्री आहेत. २००९ च्या विधानसभा निवडणूकीत वर्षा गायकवाड या धारावी मतदारसंघातून निवडून आल्या व राज्यमंत्री मंडळात त्यांना महिला व

बालविकास मंत्री म्हणून होत्या. अशा रितीने महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सहकारी तत्वांचा पाया घातला गेला होता. सहकारी तत्वावर अनेक उदयोग निर्माण झाले. राजकारण, समाजकारण, सहकार, शैक्षणिक, सहकारी बँकिंग या क्षेत्रात महिलांचा दबदबा आहे. सहकारी तत्वावर चालणाऱ्या अनेक बँकामध्ये स्त्रीया लहान मोठया पदावर समक्षपणे काम करून सहकारी चळवळ बळकट करत आहेत. सहकाराचे विश्व त्यातील महिलांच्या योगदानामुळे विस्तारले आहे.[१२८]

अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातून तालुक्याचे नेतृत्व करताना शालिनीताई विखे, दुगाताई तांबे, हेमलता काळे, उषाताई तनपुरे, सुनिता गडाख, राजश्री घुले, मोनिका राजळे, प्रतिभा पाचपूते, आशा शिंदे, हेमलता पिचड या महिला राजकीय नेतृत्व आज जिल्हयामध्ये विविध क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. या महिला राजकीय नेतृत्व आपआपल्या कार्यक्षेत्रामध्ये प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी खालील सहकारी घराण्यातील महिला राजकीय नेतृत्व पुढीप्रमाणे आहे.

**१. दुर्गाताई तांबे :–** सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या कन्या दुगाताई तांबे या सहकारी क्षेत्रातून राजकारणात सक्रीय आहेत. जयहिंद महिला मंचची स्थापना केलेली आहे. या माध्यमातून तालुक्यात खेडोपाडी बचतगटांचे जाळे निर्माण केले आहे. त्यातून महिलांचे संघटन करत महिला सबलिकरणाची चळवळ यशस्वीपणे राबविली आहे. महिलांसाठी आरोग्य शिबीरे चर्चासत्रे सहली याशिवाय दंडकारण्य अभियान महिलांचा सहभाग मिळविलेला आहे. संगमनेर तालुक्यात महिला ११०० हून अधिक बचतगटाची निर्मिती केलेली आहे. संग्राम संस्थेची स्थापना करून अपंग व मतिमंद मुलासाठी शाळा सुरू केलेली आहे. राष्ट्रीय महिला कॉंग्रेसच्या महिलांचे संघटन करून कॉंग्रेस पक्षाच्या बळकटीसाठी सदैव प्रयत्नशील आहेत. संगमनेर नगरपालिकेत राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाकडून २०१३ पासून नगरसेविका आहेत. व नगरपालिकेच्या १५० वर्षाच्या इतिहासात प्रथम महिला नगरध्याक्षा म्हणून निवड झालेली आहे. तसेच तिसऱ्यांदा नगराध्यक्षपदी म्हणून नियुक्त आहेत. २०१६ मध्ये पार पाडलेल्या लोकनियुक्त नगराध्यक्षा पदाच्या निवडणुकीत विक्रमी मतांनी निवड झालेली आहे.[१२९]

**२. स्नेहलता कोल्हे :–** कोपरगाव तालुक्यातील संजिवनी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बिपीन कोल्हे यांच्या पत्नी. कोपरगाव विधानसभेचे २०१४ पासून प्रतिनिधीत्व करत आहेत.

आमदार म्हणून कार्य करताना स्नेहलताा कोल्हे या भरीव कार्याची परंपरा पुढे चालवित आहेत.कोपरगाव तालुक्यात सामाजिक शैक्षणिक सहकार आर्थिक क्षेत्रामध्ये स्नेहलता कोल्हे यांनी सहकारी माध्यमातून कायापालट केलेले आहे. महिला बचतगटासाठी मतदारसंघात ३ हजार २०० बचतगट स्थापन करून त्याबाबतचे संपूर्ण मार्गदर्शन देऊन जिल्हा व राष्ट्रीयकृत बॅकाच्या माध्यमातून सुमारे ३० कोटी रूपयांचे कर्ज वितरण केले आहे.[१३०]

**३. उषाताई तनपूरे :–** प्रसाद शुगर मिल्क समुहाचे अधक्ष प्रसाद तनपूरे यांच्या पत्नी उषाताई तनपूरे. या २०१६ पासून राहूरी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आहेत. राज्यस्तरीय संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाअंतर्गत नगरपरिषदेला प्रथम पारितोषिक मिळवून दिला आहे. महिला सबलीकरण योजनेअंतर्गत महिला बचत गटांना व्यक्तिगत कार्य मिळवून दिले आहे.[१३१]

**४. प्रतिभा पाचपूते :–** साईकृपा उदयोग समूहाचे अध्यक्ष बबनराव पाचपूते यांच्या पत्नी प्रतिभा पाचपूते या जिल्हा परिषदेच्या सदस्य पदी कार्यरत आहेत. जीवनधारा बहुउद्देशीय महिला बचतगटाच्या फेडरेशनच्या माध्यमातून भरीव कार्य करत आहेत. २५० बचत गटांची स्थापना केलेली आहे. २००९मध्ये परिक्रमा शैक्षणिक संकुल उभे करून तालुक्यातील सामाजिक आर्थिक व शैक्षणिक कार्यात सक्रीय आहेत.[१३२]

**५. हेमलता पिचड :–** आदिवासी विकासमंत्री मधुररावजी पिचड यांच्या पत्नी आहेत. हेमलता पिचड यांनी तालुक्यात व्यसनमुक्ती शिबीरे आयोजित करून दारूबंदीची चळवळ हाती घेतली आहे. २००५ मध्ये दारूबंदीचा ऐतिहासिक ठराव मंजूर केला आहे. तालुक्यातील १४१ ग्रामपंचायतीचा दारूबंदीचा ठराव २०११ मध्ये मंत्री आर. आर. पाटील यांच्यापर्यंत पोहचविले आहे. पर्यावरण संतुलित ग्रामसमृध्द योजना उत्कृष्ठ राबवित आहे. ४० हजार झाडे लावली आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्च्यता अभियांनात गावाला तिसऱ्या क्रमाकांचे पारितोषिक मिळवून दिले आहे.[१३३]

**६. सुनिता गडाख :–** नेवासा तालुक्यातील यशवंतराव गडाख यांच्या सून. सुनिताई गडाख या २०१७ पासून नेवास पंचायत समितीच्या सभापती म्हणून कार्यरत आहेत. सहकाराच्या माध्यमातून महिला सबलीकरणाचे मोठे कार्य सुनिता गडाख करत आहेत. एकुण १६६० बचत गटाची स्थापना केली १२० गावांत महिला स्वयं सहाय्यता बचत गटांची स्थापना करून २५००० महिलांचे संघटन केले आहे. जिल्हा बँकेमार्फत १२ कोटी रूपयांचे कार्य या बचत गटांना मिळवून

दिले आहे. अशा रीतीने महिलांच्या सामाजिक आर्थिक शैक्षणिक क्षेत्रात महिला सक्षमीकरणाबरोबरच तालुक्यात ७५००० झाडे लावण्याचा प्रकल्प सध्या गावोगावी जावून राबवित आहेत.[१३४]

**७. शालीनीताई विखे :–** पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील खासदार बाळासाहेब विखे व आमदार राधाकृष्ण विखे यांच्या घराण्यांतील पहिली महिला शालिनी विखे या २००७ व २०१४ या दोनवेळा जिल्हा परिषदेच्या म्हणून कार्यरत आहेत. तळागाळातील गरिब जनता व शाळकरी मुलामुलीबाबतची संवेदनशीलता या बळावर वर्षभरात तब्बल ३३० कोटीच्या विविध योजनांचे राजकारण विरहीत नियोजन केले. १९९० मध्ये प्रवरा परिसरातील गावोगावी महिला मंडळे स्थापन करून महिलांना एकत्र केले महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची संकल्पना जिल्हयात सर्वप्रथम सुरू केली. पहिला बचत गट प्रवरा परिसरात स्थापन झाला. बचत गटातील महिलांना कृषी विज्ञान संस्था स्थापन करून महिलांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. खालील विविध पदे शालीनी विखे यांनी भुषविले आहेत. अध्यक्षा प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळ, अध्यक्षा प्रियदर्शनी महिला बिगरशेती सहकारी पतसंस्था लोणी, अध्यक्षा भोजनसमिती प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था लोणी, अध्यक्षा जिल्हा परिषद अहमदनगर, विश्वस्त पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौडेशन.[१३५]

सहकारी साखर कारखाने दुग्धसंस्था सहकारी पतसंस्था सहकारी व नागरी बँका बाजारसमिती विविध कार्यकारी सोसायटया शिक्षण संस्था या सहकारी संस्थाच्या माध्यमातून महिला राजकीय नेतृत्व हे पुरूषांच्या बरोबरीने राजकारणात सक्रीय आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांमध्ये महिला नेतृत्वाचा सहभाग मोठया प्रमाणात या जिल्हयात दिसून येतो. महिला आरक्षणामुळे जिल्हयामध्ये महिला नेतृत्वाकरण्यांसाठी पुढाकार घेताना दिसत आहेत. एकंदरीत असे म्हणता येईल की सहकार क्षेत्रामध्ये महिला राजकीय नेतृत्वाचे योगदान आहे. स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिला राजकीय नेतृत्वाचे भरीव कामगिरी आहे. राजकीय वारसा असणाऱ्या महिला राजकीय नेतृत्व जिल्हयाच्या राजकारणात सक्रीय आहेत. तसेच महिला राखीव आरक्षणामुळे महिला सरपंच सभापती अध्यक्ष या पदावर विराजमान झाल्या आहेत. महिला स्थानिक स्वराज्य संस्थावरच निवडणूक लढविताना दिसतात परंतू विधानसभा व लोकसभा या निवडणूकांमध्ये महिला राजकीय नेतृत्वामध्ये उदासिनता दिसून आली.

## ३.२.६ सहकारातील राजकीय घराण्यांचे नातेसंबध :–

अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणातील स्वातंत्र्यानंतरची पहिले एक दशक घराणेशाही बाबत वगळावे लागेल. जसे राष्टीय पातळीवरील नेहरू–गांधी घराण्यांच्या बाबतीत नेहरूची कारकीर्द वगळावी लागते तशीच ती सहकारी साखर कारखान्याच्या संस्थापकांची पहिली कारकीर्द वगळावी लागते. मात्र या सर्व नेत्यांनी आपल्या हयातीमध्ये आणि सत्तेत असताना आपल्या आप्त स्वकीयांना सहकाराच्या माध्यमातून किंवा थेट निवडणूकीच्या राजकारणातून पुढे आणलेले आहे.

सहकारी संस्था नेमक्या कोणत्या पध्दतीने घराणेशाहीला आधारभूत ठरतात हे पाहणे अधिक महत्वाचे ठरणार आहे. नगर जिल्हयाच्या बाबतीत प्रामुख्याने १९८० नंतर संस्थाचे जाळे वाढले नेत्यांची मुळे करिअरच्या वयात आली वाढत्या कौटूंबिक विस्ताराबरोबरच राजकीय महत्वकांक्षा वाढल्या या सहकारातील नेतृत्वाने बदलत्या काळात स्वतःमध्ये ही बदल केले. साखरेचे महत्व कमी झाल्यावरच सहकारी नेतृत्व करणारी मंडळी शिक्षणाकडे वळली. स्वतःच्या किंवा परिसराच्या नावाने त्यांनी पब्लिक ट्रस्टच्या नावाखाली शिक्षणसंस्था काढल्या.

यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या विकासात मोठे योगदान आहे. यशवंतराव चव्हाण याचा वारसा त्यांचे मानसपुत्र शरद पवार यांनी पुढे चालविला आहे. महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्रीपद, देशाचे संरक्षण मंत्रीपद, कृषीमंत्रीपद तसेच आंतरराष्टीय क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या घराण्याची तिसरी पिढी अजित पवार, सुप्रिया सुळे यांच्या रूपाने राजकारणात स्थिरस्थावर झाले आहेत. अजित पवार हे माजी उपमुख्यमंत्री तर सुप्रिया सुळे या बारामतीच्या खासदार आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणावर सर्वाधिक काळ प्रभावी ठरलेले नेतृत्व वसंतदादा पाटील आहेत. सलग तीस वर्षे सांगलीची खासदारकी ही दादा घराण्यात आहे. दादा घराण्याची दुसरी पिढी प्रकाश बापू पाटील, प्रतिक पाटील, विष्णू आण्णा पाटील व मदन पाटील व विशाल पाटील हे सहकार व राजकारणात सक्रिय आहेत. कलेचा पिढीजात वारसा लाभलेल्या ठाकरे घराण्यातील चौथी पिढी आज राजकारणात आली आहे. प्रबोधनकार ठाकरे यांच्यापासून सुरू झालेला सामाजिक़ राजकीय चळवळीचा वारसा बाळासाहेब ठाकरे नंतर त्यांचे चिरंजीव उध्द्व ठाकरे यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे यांच्या रूपाने ठाकरे घराण्याची चौथी पिढी राजकारणात आली आहे. आदित्य हे युवा सेनेचे प्रमुख आहेत.[१३६]

कुठलीही राजकीय पार्श्वभुमी नसलेले प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडे मेहुण्याचे नाते संबध आहे. महाजन मुंडे परिवारातील गोपीनाथ मुंडे हे खासदार त्यांची कन्या पंकजा मुंडे आमदार व पुतण्या धनजंय मुंडे विधानपरिषद सदस्य आहेत. प्रमोद महाजन यांची कन्या पुनम महाजन राजकारणात आहेत. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज असलेल्या भोसले घराण्याची सत्ता सातारा जिल्हयावर आहे. छत्रपती उदयनराजे आणि शिवेंद्रराजे भोसले या भोसले घराण्याच्या पुढील पिढीनेही याचा वारसा पुढे चालविला आहे. उदययनराजेंकडे वशपरंपरागत राजकीय वारसा आहे. तर सहकारी साखर कारखान्यासहीत विविध सहकारी संस्थावर शिवेंद्र भोसले यांचे वर्चस्व आहे. राजारामबापू पाटील यांच्या घराण्याचा वारसा त्यांचे सुपुत्र जयंत पाटील हे समर्थपणे चालवित आहेत. सोलापूर जिल्हयाच्या राजकारणावर मोहिते पाटील घराण्यांची पकड आहे. शंकरराव मोहिते राज्यपातळीवर प्रतापसिंह जिल्हा स्तरावर जयसिंह मोहिते तालूका पातळीवर कार्यरत होते. विजयसिंहाचे बंधू राजसिंह हे शिवामृत दुधसंघ उदयसिंह हे व्यवसायात तर मदनसिंह मोहिते हे शेतीमध्ये कार्यरत होते. शंकरराव चव्हाण व त्यांचे पुत्र अशोक चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद सांभाळले आहे.[१३७]

सरपंच ते केंद्रीय अवजड उदयोगमंत्री अशी झेप घेणाऱ्या विलासराव देशमुख यांची पुढील पिढी राजकारणात आली आहे. विलासराव देशमुख यांचे बंधू दिलीप देशमुख यांच्याप्रमाणेच त्यांचे जेष्ठ पुत्र अमित देशमुख विधानसभेत पोहचले आहेत. छगन भुजबळ राज्याचे बांधकाम मंत्री व त्यांचे पुत्र पंकज भुजबळ विधानसभा सदस्य तर पुतण्या समीर भुजबळ नाशिकचा खासदार आहे. काँग्रेसचे मुख्यमंत्री नारायण राणे यांची दोन्ही मुले राजकारणात आहेत. निलेश राणे हे रत्नागिरीचा खासदार आहे. तर नितेश राणे हे स्वाभिमान संघटनेच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय चळवळीत सक्रीय आहेत. शैक्षणिक सहकार आणि सामजिक कार्यात अग्रेसर असलेले डॉ. पतंगराव कदम यांचे पुत्र विश्वजीत कदम हे युवक कॉग्रेसच्या अध्यक्षपदी आहेत. नाशिक जिल्हयाच्या राजकारणावर मालेगावच्या हिरे घराण्याचे वर्चस्व राहिले आहे. भाऊसाहेब हिरे यांच्यानंतर त्यांचे पुत्र व्यकंटराव हिरे राजकारणात सक्रीय आहेत.[१३८]

अहमदनगर जिल्हयामध्ये हा घराण्याचा उगमस्थान म्हटले तरी वावगे होणार नाही नगर जिल्हा हा राजकारणाचा अड्डा समजला जातो. राजकीय घराणेशाहीत हा जिल्हा सर्वाधिक अग्रेसर आहे. सहकार क्षेत्राच्या जोडीला शैक्षणिक क्षेत्राची उभारणी करणारे विखे घराण्याची चौथी पिढी

सहकारातून राजकारणात सक्रिय आहे. त्यांच्या पाठोपाठ थोरात घराण्याचे वैशिष्टय म्हणजे त्यांचे सर्व सोयरे हे राजकारणात आहेत. थोरात घराण्याची तिसरी पिढी राजकारणात येत आहे. साखर सम्राटांचा जिल्हा म्हणून परिचित असलेल्या नगर जिल्हयात यशवंतराव गडाख यांची दुसरी पिढी मारूतराव घुले यांची तिसरी पिढी शंकराव काळे आणि शंकरराव कोल्हे यांची दुसरी पिढी तनपूरे घराण्यातील तिसरी पिढी प्राजक्त तनपुरे यांच्या रूपाने राजकारणात स्थिरावू पहात आहे. रामराव आदिक व गोविंदराव आदिक या बंधुंचे राज्याच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे.[१३९]

एकदंर घराणी ही सहकार क्षेत्रातून विकसीत झालेली आहे. या घराण्याचा राजकारणावर अर्थकारणावर समाजकारणावर मोठया प्रमाणावर पकड असल्याचे दिसून येते दुसरे सहकार चळवळ ही गावोगावी पसरलेल्या सहकारी बँक जिल्हा मध्यवर्ती बँक खरेदी–विक्री संघ व सेवा सहकारी सोसायटया यांचे जाळे पसरलेले होते या सर्व संस्थावर काँग्रेस पक्षाचे व मराठा अभिजनांचे वर्चस्व होते वरील घराण्यावरून लक्षात येते की सर्व सहकारी संस्था या घराण्याच्या ताब्यात आहेत. पुणे विदयापीठाच्या राज्यशास्त्र विभागाने १९९० पासून ग्रामीण भागातील सहकारी व राजकीय संस्थामधील पदाधिकात्यांची माहिती संकलित केली आहे. त्यावरून मराठा जातीचा ग्रामीण भागातील प्रभाव दिसून येतो. १९९२ मध्ये वीस जिल्हा परिषदांचे अध्यक्ष मराठा होते. १९९५–९६ मध्ये २३ वर्गीय जातींमधील होते १०५ सहकारी साखर कारखान्यांपैकी ८६ कारखान्यांचे अध्यक्ष मराठा होत तर सात इतर मागासवर्गीय जातींचे होते.[१४०]

मराठा जातीसमुहाच्या ग्रामीण भागातील प्रभावाखाली दोन वैशिष्टे लक्षात घेण्यासारखी आहेत. एक म्हणजे संख्या बळाइतकाच या प्रभावाचा संबध जमीन मालकाशी आहे म्हणून ग्रामीण राजकारणात स्थानिक पातळीवर जेव्हा कोणत्या जातीचा प्रभाव असतो. तेव्हा ती जातही स्थानिक पातळीवर जमीनजुमला बाळगून असते. असेही अभ्यासामध्ये आढळते दुसरे म्हणजे अशा जमीन मालकीतून येणारी सत्ता खरे तर काही थोडया घराण्याकडेच असते. जमीन बाळगणारी ही घराणी गावावर प्रभुत्व गाजवतात समान जातीच्या धाग्याने अशी संपन्न घराणी व इतर सामान्य कुंटुंबे राजकीय दृष्टया एक होतात ग्रामपंचायत ते मंत्रीमंडळ या रचनेत मराठा जातीचा वाटा ठरून गेल्यासारखा दिसतो मराठा जातीच्या प्रभुत्वाचा मुख्य घटक म्हणजे सहाकारी क्षेत्र होय ते मुळात शासनसंस्थेच्या पाठिंब्यावर उभे राहिले आहे. साखर कारखाने दुधसंघ सहकारी बँका हितसंबधाशी जोडून घेणं आणि स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत हितसंबधाचं

राजकारण करणं असा उपक्रम काँग्रेस पक्षाने वर्षानुवर्ष यशस्वीपणे राबवला आहे. त्यामुळे ही सहकारी घराणी क्राँग्रेस पक्षातून मोठी झाली व पुढे आलेली आहे. त्यामुळे स्थानिक ते राष्ट्रीय राजकारणात घराण्यांचे किंवा वारसांचे राजकारण हे प्रमुख अंग राहिले आहे.[१४१] काँग्रेसची पक्षातून निर्माण झालेले घराणे एका बाजूला गांधी कुटुंबाच्या निष्टेवर आधारित आहे. तर दुसऱ्या बाजुला ती पक्षाने निर्माण केलेल्या संस्थात्मक यंत्रणेमुळे आहे. ग्रामीण अर्थकारणाच्या प्रक्रियेत सामील झालेल्या एक नवी पिढी नवनेतृत्व म्हणून उदयाला आली. त्यापैकी अनेकांना सत्तेची कौटूंबिक पार्श्वभूमी नव्हती सहकारी संस्था स्थापन करणाऱ्याकडे मुख्य नेतृत्व राहिले सहकारी साखर कारखाना उभारणीतून नेतृत्व पुढे आले या नेतृत्वाने राजकारणाचा आधार घेऊन कारखान्याच्या माध्यमातून तालुक्यात विकास साधला पुढे विधानसभेसाठी पुरक वातावरण तयार करण्यात आले. अंगभुत नेतृत्वगुणांनी अर्थकारण व राजकारण करताना घराण्यांनी भावनेतून समाजकारण घडवून आणले त्यामुळे राजकीय घराणी आज टिकून आहे. साखर कारखान्याच्या पायाभरणीतून हक्काचा मतदार तयार केला सहकारी बँकावर मतदार तयार केला सहकारी बँकावर सत्ता निर्माण केली कारखान्याच्या परिसरातील मोठया प्रमाणात शाळा महाविदयालय तसेच व्यावसायिक शिक्षण आले त्यामुळे सहाजिकच सहकारी साखर कारखाना सहकारी बँका शिक्षणसंस्था या विधानसभा व लोकसभा निवडणुकांच्या पायाभरणीसाठी अधिक प्रमाणात वापरल्या गेल्या परिणामी तालुका स्तरावर सर्व क्षेत्रांवर राजकीय घराण्यांचे वर्चस्व निर्माण झाले त्यामुळे सहकारी संस्थावर एकाच कुटुंबाची सत्ता दोन तीन पिढयापर्यंत कायम टिकून आहेत. स्थानिक राजकारण कुंटुंब केंद्रित ठेवल्यामुळे तालुक्यावर हुकुमत ही कायम एकाच घराण्याची राहिली घरातील मुख्य नेतृत्व सहकार साखर कारखान्याचा चेअरमन दुसरे नेतृत्व जिल्हा परिषद सांभाळते तर तिसरे नेतृत्व हे शिक्षणसंस्था दुध संस्थेचे चेअरमन आहेत. [१४२] यातून सहकारी घराणी मजबूत व आर्थिक दृष्टया बळकट बनली त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वास सक्षम बनली आहे. मुख्यत्वे महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारीमुळे राज्यातील ग्रामीण व होतकरू नेतृत्वाला विधायक कार्य करण्याची संधी मिळाली आहे. १९६० च्या दशकानंतर महाराष्ट्रामध्ये जे सशक्त नेतृत्व उदयास आले ते मुख्यवे सहकारी कारखानदारीच्या व पंचायतराजच्या पाठबळावर हे एक वास्तव आहे. सहकारी साखर कारखानदारीतून वाढलेला जनसंपर्क आणि जेष्ठ नेत्यांशी निर्माण होणार जवळकीच नात या बळावर सहकारी नेतृत्व स्वतःच सत्तेच केंद्र बनत

गेले सहकारी कारखानदारी व पंचायतराज या दोन संस्थांनी असंख्य जाणकार कार्येकर्ते पुढारी लोकप्रतिनिधी महाराष्ट्रात तयार केले हे मोठ योगदान आहे.

राष्ट्रीय पातळीवर पंडित जवाहरलाल नेहरू यांची कन्या इंदिरा गांधी या घराण्याचे वर्चस्व तसेच राज्यापातळीवर अहमदनगर जिल्हयातील विखे घराणे यांना सामाजिक राजकीय आर्थिक व सहकारावर वर्चस्व निर्माण केलेले दिसते अहमदनगर जिल्हा सहकारातील घराण्यासाठी प्रसिध्द आहे. जिल्हयाच्या प्रत्येक तालुक्यामध्ये राजकीय घराणी उदयास आलेले आहे.

शरद पवार यांचे मेहुणे प्रा. एन. डी. पाटील आहेत. शंकरराव मोहिते पाटील यांचे मेहुणे बाळासाहेब देसाई आहेत. दिलीपराव देशमुख हे माजी राज्यमंत्री अनिल घोरपडे हे परस्परांचे साडू बंधू अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा पवार या खासदार पदम्सिंह पाटील यांची धाकटी बहिण आहेत. जयंत पाटील हे शिरोळयाचे सत्यजित देशमुख परस्परांचे साडू बंधू तर आमदार शिवाजीराव नाईक यांची पत्नी सांगलीचे मंत्री मदन पाटील यांच्या मातोश्री हया सख्या बहिण शिवाजीराव देशमुख (सभापती) यांची पत्नी आहे.

शरद पवार व बाळासाहेब ठाकरे हे व्याही आहेत. शरद पवारांची कन्या सुप्रिया सुळे बाळासाहेब ठाकरेंच्या सख्या बहिणीचे सूनबाई आहेत. केंद्रीय मंत्री सचिन पायलट जम्मू काश्मिरचे फारूख अब्दुला यांचे जावई तर विलासराव देशमुख यांच्या तीनही सुनबाई ३ वेगवेगळया धर्माच्या आहेत. जेनेलिया डिसुझा ख्रिस्तिअन, दुसरी मुस्लिम कम हिंदू आणि तिसरी सुनबाई हिंदू मारवाडी फिल्म डिरेक्टर वासू आगवानी यांची मुलगी आहे. राष्ट्रवादी काँग्रसचे नेते रामराजे नाईक निंबाळकर घराण्याची मुलगी सुरेश कलमाडी यांच्या घराची सुन आहेत. शरद पवार यांची मेहुणी ना. म. जोशीच्या घरात दिली असून त्याचे घरात रामराजेंची बहिणही दिली आहे.[१४३]

पृथ्वीराज चव्हाणांची मावशी ही दादाराजे खर्डेकर यांची पत्नी दादाराजे खर्डेकर यांची बहिण ही दिवंगत माजी मंत्री अभयसिंहराजे भोसले यांची पत्नी आहे. दादाराजेंचे भाऊ बंटीराजे यांची मुलगी ही सातारचे शिवेंद्रराजे यांची पत्नी आहे. कोल्हापूरचे सदाशिवराव मंडलिक यांची बहिण चंदागडचे आमदार नरसिंह गुरूनाथ पाटील यांची पत्नी असल्याने दोघेही मेहुणे लागतात. कर्जत जामखेडचे बापूसाहेब देशमुक व उदयोगमंत्री नारायण राणे हे दोघे व्याही आहेत. जालन्याचे अंकुशराव टोपे यांचे चिरंजीव व विदयमान मंत्री राजेश टोपे आणि कर्जतचे आबासाहेब निंबाळकर

याचे नातेसंबध असल्याने टोपे व राणे हे सोयरे आहेत. भोकरदन भाजपाचे खासदार रावसाहेब दानवे यांची मुलगी शिवसेना आमदार हर्षवर्धन जाधव यांना दिलेली आहे.

पुणे जिल्हयात शरद पवार आणि संभाजीराव हे परस्परांचे मोठे विरोधक होते काकडेंचे भाऊ बाबालाल यांची मुलगी बाळासाहेब देसाई यांच्या घरात दिल्याने काकडे मोहिते यांचे नाते झाले हे सर्व महाराष्ट्रातील घराणे एकमेकांशी नातेसंबध जोडत आहेत. सत्तेसाठी पक्षाचा विचार न करता राजकारणासाठी नातेसंबध जोडलेले दिसतात. त्यामुळे सत्ता जरी कुणाकडे गेली तरी त्याचा फायदा आपल्यालाच झाला पाहिजे ही मानसिकता या घराण्याची असते दुसरे असे की विरोधक कमी होतात घराण्यांच्या नातेसंबधामुळे सत्ततेतील विरोधक कमी होतात. यासाठी अहमदनगर जिल्हयाचे उदाहरण उत्तम आहे. सारांशरूपाने सहकार चळवळ ही महाराष्ट्रात मोठया प्रमाणात वाढलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला तर विदर्भ व कोकणात सहकार चळवळ अल्प प्रमाणात विकसीत झालेली दिसते मराठवाडयात सहकार क्षेत्राने प्रगती पथावर आहे.अहमदनगर सांगली सातारा कोल्हापूर या जिल्हयात मोठया प्रमाणात सहकारी साखर कारखाने सहकारी बँका सहकारी दुधसंस्था मोठया प्रमाणात सहकारी खरेदी विक्री संघ वाढलेल्या आहेत. [१४४]

नगर जिल्हयातील लोकसभा सदस्य पंढरीनाथ कानवडे हे नाशिक जिल्हयातील राजकीय नेतृत्व काकासाहेब वाघ दादांचे व्याही आहे. चंद्रभान आठरे हे कानवडयांचे जावई आहे. कानवडयांचे दुसरे जावई बाळासाहेब विखेंचे भाऊ आहेत. बाळासाहेब विखेंचे मावसभाऊ विधानसभा सदस्य आप्पासाहेब म्हस्के त्यांच्या मेहुण्यांचे भाऊ आप्पासाहेब राजळे आहे. भाऊसाहेब थोरात यांचे तीनही जावई राजकाराणात सक्रिय आहे. भाऊसाहेब थोरांताचे नातेवाईक असलेले गुलाबराव शेळके पारनेर तालुका साखर कारखाना, महानगर बँक, मुंबई जिल्हा बॅकेचे अध्यक्ष होते. त्याच्या पत्नी दुर्गाताई तांबे संगमनेरच्या नगराध्याक्षा होत्या त्यांचे पुत्र सत्यजित तांबे हे नगर जिल्हा परिषद सदस्य आहे. आप्पासाहेब राजळे यांची कन्या यशवंतराव गडाख यांच्या पत्नी आहे. राजीव राजळे यांच्या पत्नी मोनिका राजळे या शेवगाव पाथर्डी मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. या मंत्री डोणगावकर यांची कन्या आहे. नरेंद्र घुले यांचे सुपूत्र क्षितिज घुले राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष आहे. दुसरी कन्या चैताली घुले अशोक काळे यांचे चिरंजीव आशुतोष काळे यांना दिलेली आहे. कुंडलिकराव जगताप हे यशवंतराव गडाख यांचे जवळचे

नातेवाईक आहेत. एक जावई आप्पासाहेब राजळे दुसरे जावई नगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अरूण कडू तिसरे जावई संगमनेरचे नगराध्यक्ष सुधीर तांबे अरूण कडूंचे भाऊ विजय कडू आण्णासाहेब म्हस्के यांचे साडू भाऊसाहेब थोरातांचे मेहुणे केंद्रीय मंत्री आण्णासाहेब शिंदे आहेत.आण्णासाहेब शिंदे यांचे व्याही दौंडचे बाळासाहेब जगदाळे आणि विहिणबाई उषादेवी जगदाळे हे दोघेही विधानसभा सदस्य आहेत. दुसरे व्याही व्यकंटराव हिरे आणि दुसत्या विहिणबाई पुष्पाताई हिरे तसेच व्यकंटराव हिरे यांचे वडिल भाऊसाहेब हिरे आणि चुलतभाऊ बळीराम हिरे हे सर्व मंत्री आहेत.[१४५]

सांगली जिल्हयातील राजारामबापू पाटील यांची एक कन्या शेवगाव तालुक्यातील मारूतराव घुले यांचे चिरंजीव नरेंद्र घुले यांची पत्नी तर दुसरी कन्या राहुरीचे बाबूराव पाटील यांचे सुपुत्र प्रसाद तनपुरे यांना आहे. बापूंचे चिरंजीव जयंत पाटील आहे. काकासाहेब वाघ यांचे चिरंजीव प्रताप वाघ नाशिक लोकसभा सदस्य होते याचे जावई शंकरराव कोल्हे आहे. दुसरे जावई नाशिकचे भाजपचे नेते दौलतराव आहेर होय. न्यामूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांचे चुलते मा. पाटील हे मराठा समाजातील पहिले मंत्री होते. कोळसे पाटलांचे मावस चुलते हे कॉंग्रेस पी. बी. कडू असून त्याचे चिरंजी जि. प. सदस्य अरूण कडू आहेत.[१४६]

प्रस्तुत प्रकरणात अहमदानगर जिल्हयाची सहकारी क्षेत्रातील राजकीय घराण्यांच्या योगदानाचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. यशवंतराव चव्हाण संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना साखर उदयोगाला मोठया प्रमाणात चालना दिली. त्यामुळे सहकारी तत्वावर मोठया प्रमाणात सहकारी साखर कारखानदारी उभा राहिली या कारखानदारीतून ग्रामीण भागामध्ये रोजगार प्राप्त झाली. अहमदनगर जिल्हा हा दुष्काळ ग्रस्त असल्याने सहकार क्षेत्राने मोठी चालना मिळाली.स्थानिक नेतृत्वाने सहकारी संस्था स्थापन केल्या व सहकारी संस्थेवर वर्चस्व ठेवले. व त्यातून राजकारणातून खंबीर व गतीमान राजकीय नेतृत्वाचे वर्तुळ तयार झालेले दिसते. या प्रकरणात सहकारी संस्थातून कसे सहकारी राजकीय घराणे उदयास आले. याचा आढावा घेण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्हयाच्या प्रत्येक तालुक्यामध्ये १ सहकारी साखर कारखाना स्थापन झाला त्यातून राजकीय नेतृत्व उदयास आले आहे. जिल्हयाच्या उत्तर भागात भंडादरा या धरणामुळे पाणलोट क्षेत्र वाढले व त्यामुळे खाजगी कारखाने उभारले गेले परंतु हे खाजगी कारखाने

शेतकऱ्यांची पिळवणूक करत असत यातूनच सहकारी साखर कारखान्यांची स्थापना झाली. व या भागाचा मोठया प्रमाणात विकास झाला.अकोले कोपरगाव संगमनेर रहाता श्रीरामपूर हा भाग शेती क्षेत्र बनले व राजकीय नेतृत्वाच्या योगदाना पुढारलेला दिसतो. विखे घराणे काळे कोल्हे घराणे पिचड घराणे थोरात घराणे यांनी आपआपल्या परिसराचा सामजिक राजकीय आर्थिक शैक्षणिक विकास साधला आहे. त्या तुलनेत जिल्हयाच्या दक्षिण भागामध्ये सहकारी संस्था कमी विस्तारल्या आहेत. पारनेर कर्जत जामखेड श्रीगोंदा या तालुक्यात पाणलोट क्षेत्र कमी आहे. कुकडी धरणामुळे आधार मिळुन श्रीगोंदा तालुक्यात जगताप घराण्याने सहकारी साखर कारखाना उभारून रोजगार प्राप्ती केली आहे. कर्जत तालुक्यात नागवडे घराण्याने सहकारी संस्थातून प्रकल्प दुध संस्था उभारल्या आहेत. तालुक्यांमध्ये सहकारी कारखानदारी विकसीत झाली आहे. जामखेड तालुक्यात राजकीय नेतृत्वाला चालना मिळालेली दिसत नाही अहमदनगर जिल्हयात एकुण १५ सहकारी घराणे दिसतात. या घराण्यानी मुळ पुरूषाने सहकारी संस्था स्थापन केल्या त्यांच्या वारसदारांनी त्या वाढविल्या व विकसीत केल्या जिल्हयातील घराण्याव्यतिरिक्त काही राजकीय नेतृत्व उदयास आले.त्याचा आढावा घेतलेला आहे.

## संदर्भग्रंथ


१. गणेश देशमुख 'ग्रामवेद', १९९८ सहकार चळवळीचे संघटनस्मृतीग्रंथ प्रकाशन समिती, कोपरगाव, पान नं १०९,११० संदर्भ क्र. १,२,३,११९.

२. यशवंतराव गडाख 'सहकाराचा विकासमार्ग', महाराष्ट्र टाईम्स मुंबई, १ मे २०११. संदर्भ क्र. ४,५,६,७.

३. शंकरराव गडाख 'परिवर्तन', २००८ अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अहमदनगर पान नं., १२ ते २०, संदर्भ क्र. ८,९.

४. अरूण साधू 'सहकार धुरीण', २०१४ डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, रोहन प्रकाशन पुणे, संदर्भ क्र. १०.

५. सुधाकर शेरकर 'योगदान', २००७ अनिल प्रिंटर्स, अहमदनगर संदर्भ क्र. १०,११,१२.

६. यशवंतराव गडाख 'सहकारी चळवळः दशा आणि दिशा', सार्वमत वर्धापन दिन ०४/०६/२००४ संदर्भ क्र. १३,१४,१५.

७. यशवंतराव चव्हाण 'शेतीनिष्ट यशवंतराव', कृषी औदयोगिकीकरण व सहकाराचे उद्गाते कॉन्टिनेंटल प्रकाशन, २०१३ संदर्भ क्र. १६.

८. सुधाकर जोशी 'सत्याग्रही शेतकरी', २०१२ शंकरराव गेणूजी कोल्हे सहकाराचे भवितव्य संजीवनी सहकारी साखर कारखाना लि. सहजानंदनगर कोपरगाव पान नं २५. संदर्भ क्र. १७,१८,१९.

९. 'मी महाराष्ट्राचा महाराष्ट्र माझा, घराणेशाही दिपावली विशेषांक, २०१९. संदर्भ क्र. २०.

१०. संतोष दास्ताने 'महाराष्ट्रात वार्षिकी', २००८सहकार निराली प्रकाशन पुणे, पान नं ३४ संदर्भ क्र. २१,२३.

११. विजय चोरमारे', महाराष्ट्राचे राजकारणःनवे संदर्भ', २०१४ नवता प्रकाशन, मुंबई पान नं. २३ संदर्भ क्र. २२.

१२. 'दादापाटील राजळे राजधर टेमकर पार्श्वभूमी भूषण दादा पाटील राजळे', अमेय प्रकाशन पुणे, पान नं. ७८ संदर्भ क्र. २४, २५.

१३. अशोक काळे 'विकास सुर्यः कर्मवीर शंकरराव काळे जीवन व कार्य' अशोक काळे प्रकाशन कोपरगाव संदर्भ क्र. २६,२७,२८,२९.

१४. कोळपेवाडी सहकारी साखर कारखाना लि. कोपरगाव वार्षिक अहवाल २०१६ ते २०१७ संदर्भ क्र. ३०,३१,३२,३३.

१५. प्रतापराव बबनराव ढाकणे 'एकलव्य संस्थेची जीवनगाथा'१९४५–२०१२ अहमदनगर, संदर्भ क्र. ३४,३५.

१६. बबनराव ढाकणे 'कार्य अहवाल', २०१४–१५ एकलव्य शिक्षण संस्था संदर्भ, क्र. ३६.

१७. प्रतापराव ढाकणे 'आदर्श विचारसरणीचे नेतृत्व', एकलव्य शिक्षण संस्था कार्य अहवाल, पानं नं. ४२,४३,४४.संदर्भ क्र. ३७.

१८. यशवंत आभाळे 'श्वास विकासाचा सर्वांगीण प्रगतीचा', २०१४ मधुकर पिचड समर्थ मिडिया व्हिजन अकोले, पानं नं. ४,५,३५ संदर्भ क्र. ३८,३९,४०.

१९. अमृता खाकुर्डीकर 'परिसरस्पर्शी', मा. आमदार प्रसादराव तनपुरे यांनी जनहितासाठी केलेल्या कामांचा अल्प परिचय १५ ऑगस्ट २००४ पान नं. १० संदर्भ क्र. ४१,४२.

२०. 'अशोक सहकारी साखर कारखाना श्रीरामपुर वार्षिक अहवाल', २०१५–१६ संदर्भ क्र. ४३, ४४.

२१. मुलाखत चेअरमन अशोक सहकारी बँक आण्णासाहेब पटारे, दि.१७ मे २०१६ संदर्भ क्र. ४५.

२२. बिपीन कोल्हे 'सामान्यांचा आधारवड', सहकार महर्षी शंकरराव कोल्हे अभिष्टचिंतन विशेष सार्वमत, २४ मार्च २०१६ पानं नं. २ संदर्भ क्र. ४६,४७,४८.

२३. सुधाकर जोशी 'सत्याग्रही शेतकरी', २०१२ शंकरराव गेणूजी कोल्हे सहकाराचे भवितव्य संजीवनी सहकारी साखर कारखाना लि.सहजानंदनगर कोपरगाव, पान नं. २७ संदर्भ क्र. ४९,५०.

२४. संजीवनी सहकारी साखर कारखाना कोपरगाव, 'वार्षिक अहवाल', २०१३–१४ संदर्भ क्र. ५१,५२.

२५. यशवंतराव गडाख, 'अर्धविराम', २००६ ऋतूरंग प्रकाशन मुबंई, पान नं. १२,१३ संदर्भ क्र. ५३,५४.

२६. शंकरराव गडाख, 'परिवर्तन २००८', अहमदनगर डिस्टिॅक्ट कॉ. ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदनगर, संदर्भ क्र. ५७, ५८, ६०.

२७. मुळा सहकारी साखर कारखाना सोनई 'वार्षिक अहवाल', २०१३–१४ पान नं. ५ संदर्भ क्र. ५५.

२८. यशवंतराव गडाख 'माझे संचित', २०१७ ऋतूरंग प्रकाशन मुंबई, पान नं. ४८ संदर्भ क्र. ५६.

२९. मुलाखत चेअरमन मुळा एज्युकेशन सोसायटी, प्रशांतराव गडाख, २५ जुन २०१७ संदर्भ क्र. ६१.

३०. शंकरराव गडाख, 'संघर्ष पाण्यासाठी', २०१४ प्रकाशक नानासाहेब तुवर, नेवासा पॅटर्न नेवासा पान नं. १२,१३,१४, संदर्भ क्र. ५९.

३१. यशवंतराव गडाख 'सहवास', ऋतूरंग प्रकाशन मुंबई, पान नं. ११२.

३२. भीमराव पाटील, 'मनामनातील घुले पाटील', १९९५ पृथ्वीराज प्रकाशन पुणे, पान नं. २५ संदर्भ क्र. ६२, ६३.

३३. मारूतराव घुले पाटील 'दिपस्तंभ', २००२ गौरव विशेषांक साप्ताहिक नेवासा, टाईम्स नेवासा पुणे, पान नं. २१ संदर्भ क्र. ६४,६५,६६.

३४. मुलाखत काकासाहेब शिंदे, सचिव श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि.ज्ञानेश्वरनगर नेवासा, दि.१७ मे २०१७ संदर्भ क्र. ६७,७०.

३५. सुधाकर शेरकर, 'योगदान', २००७ अनिल प्रिटंर्स अहमदनगर, पान नं. ३७ संदर्भ क्र. ६८.

३६. भास्कर जोंधळे, 'एक विश्वस्त',२००३, प्रकाशक, चंद्रशेखर घुले पाटील, पानं २० संदर्भ क्र. ६९.

३७. भाऊसाहेब थोरात 'अमृतगाथा',१९९९ अमेय प्रकाशन पुणे, संदर्भ क्र. ७१,७७.

३८. भाऊसाहेब थोरात 'जीवनपरिचय' २०११ अमृतवेल सुर्यभान जायभाये युथ प्रेस क्लब पुणे पानं नं. १२ संदर्भ क्र. ७२,७३,७४.

३९. सागर जोंधळे, 'आधारस्तंभ', बाळासाहेब थोरात महाराष्ट्र राज्य गौरव विशेषाकं, पान नं. ७९ संदर्भ क्र. ७५.

४०. भाऊसाहेब थोरात 'अमृतमंथन',२००८ अमेय प्रकाशन पुणे, पान नं. १२संदर्भ क्र. ७६,७७.

४१. सुशिलकुमार शिंदे एक अभ्यासू व संयमी नेता 'संवाद' बाळासाहेब थोरात गौरव विशेषांक, पान नं. २८ संदर्भ क्र. ७८,७९.

४२. शिवाजी सावंत 'लढत'१९८०, संदर्भ क्र. ८०.

४३. रविंद्र काकडे, 'प्रवरेचा वटवृक्ष', प्रवरा औदयोगिक शैक्षणिक सांस्कृतिक समूह प्रवरानगर, पान नं. ८६ संदर्भ क्र. ८१.

४४. अरूण साधू, 'सहकार धुरिण', २०१४ रोहन प्रकाशन पुणे, पान नं. २७७ संदर्भ क्र. ८२, ८३, ८४.

४५. राजेंद्र वडमारे, 'महामेरू', २०११ पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची चरित्रकहाणी, पान न. २१ संदर्भ क्र. ८५,८६.

४६. राजेंद्र वडमारे, 'पद्मश्रींचा संपन्न वारसा', २०१२ लोकमहर्षी गौरव विशेषांक, पान नं. १३ संदर्भ क्र. ८७.

४७. बाळासाहेब विखे पाटील, 'देह वेचावा कारणी', २०१६ राजहंस प्रकाशन, पान नं. २०१,२१५,२१६ संदर्भ क्र. ८८,८९,९०.

४८. निशिकांत भालेराव, 'शेतकरी नेता', बाळासाहेब विखे लोकमहर्षी गौरव, पान नं. १६ संदर्भ क्र. ९१.

४९. दत्ता कानडे, 'पदमश्रींचा कर्तृत्व संपन्न वारसा', २०१२ लोकमहर्षी गौरव विशेषांक पान, नं ५१ संदर्भ क्र. ९२.

५०. कैलास कोते, 'लिडर' राधाकृष्ण विखे सार्वमत, १५ जून २०१२ पान नं. १३ संदर्भ क्र.९३.

५१. ज्ञानदेव चोळके, 'विकासाची एक्सप्रेस', सार्वमत १५ जून २०१२ पान नं. १६ संदर्भ क्र. ९४.

५२. भारत लोखंडे, 'विकासाभिमूख नेतृत्व', सार्वमत १५ जून २०१२ पान पान नं. १५ संदर्भ क्र. ९५.

५३. 'सुजय विखे युवा आयकॉन अभिष्टचिंतन विशेष सार्वमत', २४/०९/२०१७ पान नं. ८ संदर्भ क्र. ९६,९७.

५४. दादासाहेब म्हस्के युवा चैतन्याचा ऊर्जास्त्रोत सुजय विखे अभिष्टचिंतन विशेष सार्वमत २४/०९/२०१७ पान नं. २ संदर्भ क्र. ९८,९९,१००.

५५. कुकडी सहकारी साखर कारखाना लि. श्रीगोंदा वार्षिक अहवाल, २०१५-१६ पान नं. १५ संदर्भ क्र. १०१.

५६. मुलाखत काकासाहेब शिंदे संचालक, कु.स.सा.का.लि.श्रीगोंदा, २१ मे२०१६ संदर्भ क्र. १०२.
५७. नंदकुमार कुरूमकर, 'शुध्द चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी शिवाजीराव नागवडे', सकाळ ३० मार्च २०१८ संदर्भ क्र. १०३,१०४.
५८. साईकृपा नं १ सहकारी साखर कारखाना लि. वार्षिक अहवाल, २०१५–१६पान नं १३ संदर्भ क्र. १०५.
५९. मुलाखतदादा पाटील शेळके, २६ जून २०१५ संदर्भ क्र. १०६.
६०. मुलाखत पाटीलबा बेल्हेकर ०३/०५/२०१६संदर्भ क्र. १०७,१०८.
६१. बाळ बोठे कारभारी अहमदनगर जिल्हयाचे २०१७ संदर्भ क्र. १०९,१११,११६,११७,११८.
६२. मुलाखतसदाशिव लोखंडे, ०७/०६/२०१७ संदर्भ क्र. ११०.
६३. मुलाखतदिलीप गांधी, ०८/०६/२०१७ संदर्भ क्र. १११,११२,११३.
६४. मुलाखततुकाराम गडाख, १७/०५/२०१५ संदर्भ क्र. ११४.
६५.मुलाखत ह.भ.प.शिवाजी महाराज देशमुख, २४/१०/२०१७ संदर्भ क्र. ११५.
६६. रावसाहेब शिंदे, 'ध्यासपर्व', २००५ अमेय प्रकाशन पुणे, पान नं. ७० संदर्भ क्र. १२०,१२१.
६७. रावसाहेब शिंदे, 'भावलेली माणसे', २००७ अमेय प्रकाशन पुणे,. पान नं. १६७ संदर्भ क्र. १२२.
६८. स्मिता आवचार, 'स्त्रिया आणि सहकार चळवळ', २००३ महाराष्ट्र सहकारी संघ विशेषांक, पान न. २३७ संदर्भ क्र. १२३,१२४.
६९. प्रतिम सेन रूलर मराठी बँक इंडिया दुगेदर, १ सप्टेंबर २००७ पान नं. ४ संदर्भ क्र. १२५,१२६.
७०. क्षेत्रीय पाहणी, संदर्भ क्र १२९ ते १३५.
७१. मनोज आवाळे, 'महाराष्ट्रातील राजकीय घराणी', २०१४ आदिश्रेत्र प्रकाशन पुणे, पान नं. ७,१०,२०,२५,३३,१३०,४०,५० संदर्भ क्र. १२७,१२८,१३६,१३७,१३८,१३९,१४३,१४४.
७२. विजय चोरमारे, 'महाराष्ट्राचे राजकारणःनवे संदर्भ', २०१४ राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ नवता, मुंबई पान नं. ७०,७१,७२ संदर्भ क्र. १४०,१४१,१४२,१४५,१४६

## प्रकरण ४

# माहिती संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन

### १. प्रास्ताविक :–

सामाजिक संशोधनात नमूना निवड पध्दती हा वैज्ञानिक अध्ययनाचा एक भागच झाला आहे. अध्ययन विषय व अध्ययनाचा एक भाग झाला आहे. अध्ययन विषय व अध्ययनाचा हेतू लक्षात घेऊन अध्ययनासाठी नमुना निवड केली जाते. अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास या विषयाचा अभ्यास करतांना नमूना निवडीसाठी संशोधकाने संभाव्यता नमुना निवड केली आहे. या पध्दतीमध्ये संग्रहातील प्रत्येक एकेकाला नमुना निवड होण्याची संधी असते. ही प्रणाली संशोधकांच्या इच्छेने किंवा पक्षपाताने प्रभावित होत नाही. या पध्दतीच्या आधारे स्तरीय यादृच्छिक नमुना पध्दतीने नमुना निवड पध्दतीलाच वर्गीय नमुना निवड पध्दती असेही म्हणतात ही पध्दती यादृच्छिक नमूना निवड व सहेतूक नमुना यांचे मिश्रण आहे. या पध्दतीमध्ये संशोधकाने सर्वप्रथम संग्रहाच्या सर्व वैशिष्टयांच्या संदर्भात महिती प्राप्त केली आहे. संग्रहातील विविध गटांच्या गुणधर्मात जेव्हा भिन्नता असते तेव्हा या पध्दतीचा उपयोग केला जातो. प्राप्त केलेल्या माहितीच्या आधारावर संग्रहाचे वर्गीकरण केले आहे. म्हणजेच समान गुणधर्माच्या आधारात संग्रहाच्याएकेकांना विविध उपविभाग किंवा वर्गात विभाजित करून संग्रहात एकरूपता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तूत संशोधनासाठी पहिल्या टप्यात महाराष्ट्र राज्याची निवड केली कारण ते राज्य भारतात सहकार क्षेत्रात अग्रेसर आहे. अहमदनगर जिल्हयाची सहेतूक किंवा उद्देशपूर्ण निवड केली आहे. स्तरीय यादृच्छिक नमुना पध्दतीने तालुक्याची निवड केली आहे. राहता, संगमनेर, नेवासा, शेवगाव व पाथर्डी या तालुक्याची निवड ही करून अप्रमाणबध्द स्तरीय यादृच्छिक नमुन्याने अहमदनगर जिल्हयातील सहकारी घराणी व यातुन अभ्यासासाठी पाच प्रमुख घराण्यांची निवड केली आहे. या पध्दतीमध्ये कोणत्या गटाच्या एककाची किती संख्या आहे हे लक्षात न घेता सर्वच गट सारखेच आहेत हे गृहीत धरून एककाची निवड कैलेली आहे. तसेच निवडलेल्या घराण्यापैंकी विखे घराणे चौथी पिढी सहकार चळवळीत यशस्वी कार्य करत आहे. सहकारी साखर उदयोगाला राहता तालूक्यातुन सुरूवात झाली आहे. संगमनेर तालुक्यातील थोरात घराण्यानी सहकाराच्या माध्यमातून संपुर्ण महाराष्ट्रात राजकीय,

सामाजिक, आर्थिक वलय तयार केलेले आहे. शेवगाव, पाथर्डी तालुक्यातील घुले व राजळे घराण्यानी दुष्काळी भागांमध्ये सहकारी साखर कारखाना, दुग्ध संघ, सहकारी बँक या माध्यमातून उत्पन्नाची साघने उपलब्ध केलेली आहे. जिल्हयाच्या मध्यस्थानी असणार नेवासा तालुक्यातील गडाख घराणे हे सहकारात सक्रीय आहेत. ही पाच ही घराणी मराठे आहेत तसेच ही घराणी नातेसंबंधाने एकत्रित गुंफलेली आहेत.

प्रकरण ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत संशोधनासाठी अहमदनगर जिल्हयातील चार उपविभाग एक तालुका निवडला आहे. तसेच निवडलेल्या रहाता, पाथर्डी, संगमनेर, नेवासा आणि शेवगाव यातील प्रमुख घराणी अभ्यासासाठी आहेत. या निवडक तालुक्यापैंकी प्रत्येक तालुक्यातील सहकार दुधसंघ, बाजार समिती, बँक, तालुका पंचायती, जलसिंचन या संस्थातील अध्यक्ष, संचालक आणि सभासद सदस्य तसेच पत्रकार, महिला शेतकरी आणि सभासद, सदस्य तसेच पत्रकार, महिला शेतकरी या मुलाखती प्रश्नावलीच्या साहाय्याने घेतल्या आहेत, सहकारी घराणी, पदाधिकारी आणि निवडक लाभधारक यांच्यासाठी २ वेगवेगळी प्रश्नावली तयार केल्या नमुना पाहणीमध्ये या प्रश्नावलीची चाचणी घेतली त्यानूसार आवश्यक ते बदल प्रश्नावलीत केले. सहकार क्षेत्रातील राजकीय घराणी अभ्यासण्यासाठी त्या घराण्याशी निगडीत अशा ५० सदस्यांची मुलाखतीसाठी निवड केली तसेच सहकारी साखर कारखाने, बँका, शिक्षण, दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद व बाजारसमिती या संस्थातील अधक्ष, उपाध्यक्ष, संचालक अशा १५०  सदस्यांच्या प्रश्नावली घेतल्या याशिवाय दुसरी प्रश्नावली महिला, राजकीय प्रतिनिधी, शेतकरी, राजकीय कार्यकर्ते, पत्रकार आणि व्यावसायिक यांच्या ३६० प्रश्नावली भरून घेतल्या अशा रितीने अभ्यासासाठी प्राथमिक स्तरावरील माहिती संकलित करण्यासाठी एकुण ५१० प्रश्नावल्या भरून घेतल्या व त्यांचे योग्य विश्लेषण या प्रकरणात केले आहे. त्याचप्रमाणे संशोधनासाठी नामवंत शिक्षणसंस्था, ग्रंथालय,  संबधित विषयाची मासिके, साप्ताहिक तसेच इंटरनेट वरील सर्च इंजिन साईट आणि राज्यशास्त्र विषयीची संदर्भ ग्रंथ इ. यथायोग्य उपयोग केला आहे.

**तक्ता क्र. ४.१**

**घराणेशाहीनुसार वर्गीकरण :–**

| अ.नं. | तपशील | राहाता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिली पिढी कालावधी | विठ्ठलराव विखे पाटील १९२३ ते १९८० | भाऊसाहेब संतुजी थोरात १९५३ ते २००५ | मारूतीराव शंकरराव घुले १९५४ ते २००१ | यशवंतराव कंकराव गडाख १९६७ ते २०१० | दादा पाटील राजळे १९४६ ते २००३ |
| २ | दुसरी पिढी कालावधी | बाळासाहेब विठ्ठलराव विखे १९६० ते २०१० | बाळासाहेब भाऊसाहेब थोरात १९८० पासून ते पुढे | १. नरेंद्र मारुतराव घुले १९९० ते २०१७<br>२. चंद्रशेखर मारूतीराव घुले २००५ ते २०१७ | १. शंकरराव यशवंतराव गडाख २००२ ते २०१७ पासून ते पुढे<br>२. प्रशांत यशवंतराव गडाख २०१० ते २०१७ | आप्पासाहेब भाऊसाहेब राजळे १९७० ते २०१० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | तिसरी पिढी कालावधी | राधाकृष्ण बाळासाहेब विखे १९८७ पासून ते पुढे<br><br>शालिनीताई राधाकृष्ण विखे २००७ पासून ते पुढे | डॉ. सुधिर तांबे<br><br>दुर्गाताई तांबे<br><br>जयवर्धन थोरात सत्यजीत तांबे २००९ पासून ते पुढे | क्षितिज नरेंद्र घुले २०१६<br>राजश्री घुले | सुनिताताई शंकरराव गडाख उदयन शंकरराव गडाख २०१७<br><br>पासून ते पुढे | राजीव आप्पासाहेब राजळे २००१ ते २०१६ राहुल राजळे २०१० ते पुढे मोनिकाताई राजळे |
| ४ | चौथी पिढी कालावधी | सुजय राधाकृष्ण विखे२०१२ पासून ते पुढे | | | | |

**घराणेशाहीनूसार वर्गीकरण :–**

अभ्यासासाठी निवडलेल्या पाच राजकीय घराण्यांचा गेल्या चार पिढया मधील राजकीय नेतृत्वाचा कालावधी तक्ता ४.१ मध्ये दिला आहे.

राहाता तालुक्यातील विठ्ठलराव विखे हे विखे घराण्यातील मुळ पुरूष आहेत. १९२३ ते १९८० कालावधीत त्यांनी सहकारी संस्थाची कालावधीत त्यांनी सहकारी संस्थाची उभारणी केली. बाळासाहेब विखे यांनी आपल्या वडिलांचा सहकार चळवळीचा वारसदार १९६० ते २०१० पर्यतचा कालावधी मध्ये पुढे चालविला. विखे घराण्यांची तिसरी पिढी राधाकृष्ण विखे हे १९८७ ते १९९५ पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर यांचे अध्यक्ष होते. एकंदर १९८७ ते आजपर्यत विविध सहकारी संस्थांवर कार्यरत आहेत. राधाकृष्ण विखे यांच्या पत्नी शालीनीताई विखे या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा आहेत. तसेच विखे घराण्याची चौथी पिढी सुजय विखे हे २०१२ पासून डॉ. विठ्ठलराव विखे पा. सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आहेत.

संगमनेर तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक व सहकार व ग्रामीण विकासाच्या चळवळीचे राजकीय नेतृत्व भाऊसाहेब थोरात यांची तिसरी पिढी सहकारात कार्यरत आहेत. भाऊसाहेब थोरात यांनी जोर्वे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदापासून सहकारी कार्याला सुरूवात केली. १९५३ ते २००५ या कालावधीमध्ये थोरात यांनी विविध सहकारी संस्थाची स्थापन केली आहे.त्यांचे हे कार्य पुढे नेण्याचे काम त्यांचे चिरंजीव बाळासाहेब थोरात करत आहे. १९८१ ते आजपर्यत स्व. भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक व मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. थोरात घराण्यांनी अमृतवाहिनी या नावाने विविध सहकारी संस्था स्थापन केल्या व यशस्वीपणे राबवित आहेत. भाऊसाहेब थोरात यांच्या कन्या दुगाताई तांबे या संगमनेर शहरातील दुसऱ्यांदा आदर्श नगराध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत. थोरात व सत्यजीत तांबे यांच्या रूपाने सहकार चळवळीत सक्रीय कार्य करत आहेत.

शेवगाव तालुक्यातील सहकार कार्यामध्ये मारूतराव घुले या राजकीय नेतृत्वाचे मोठे योगदान आहे. १९५४ ते २००२ या कालावधीमध्ये मारूतराव घुले यांनी सहकारी सोसायटीची स्थापनेपासून शैक्षणिक संस्था पर्यत सहकारी चळवळी वाढवली. १९५८ ते २००२ या कालखंडामध्ये एकुण ४४ वर्षे अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत जनसेवेची कार्ये

केले. घुले घराण्याची दुसरी पिढी नरेंद्र घुले १९९० ते २०१७ या कालावधीत सहकारी संस्था वाढविल्या २००५ ते २०१७ या कालखंडात चंद्रशेखर घुले यांनी आपले कार्य सिध्द केले व आजही हे सहकारी कार्यात सक्रीय आहेत. घुले घराण्यांची तिसरी पिढी क्षितीज घुले हे घराण्यांचा वारसा पुढे नेत आहेत. अहमदनगर जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष या पदावर २०१४ पासून राजश्री घुले कार्यरत आहेत.

नेवासा तालुक्यातील सहकार चळवळ उभा करणारे राजकीय नेतृत्व यशवंतराव गडाख हे आहेत. १९६७ ते २०१० या कालखंडात यशवंतराव गडाख यांनी मुळा सहकारी साखर कारखाना मुळा एज्युकेशन सोसायटी, मुळा बँक, मुळा उदयोग समुह या सहकारी संस्थाची स्थापना केली. त्यांचा हा वारसा गडाख घराण्याची दुसरी पिढी शंकरराव गडाख हे २००२ पासून सहकारी संस्था विकसीत करत आहेत. त्यांचे बंधू प्रशांत गडाख हे ही त्यांना साथ देत आहे. तसेच शंकरराव गडाख यांची पत्नी सुनिताताई गडाख नेवासा पंचायत समितीच्या सभापती असून गडाख घराण्यांची तिसरी पिढी उदयन गडाख यांच्या रूपाने सहकारात सक्रीय झाली आहे.


पाथर्डी तालुक्यात दुष्काळी भागात दादा पाटील राजळे यांनी सहकार रूजविला म्हणून रोजगार निर्मिती झाली आहे. सहकारी साखर कारखाना दुग्ध संघ, सहकारी बँक, सहकारी सोसायटया, पतसंस्था या माध्यमातून राजळे घराण्याचे कार्य दिसून येते. १९४६ ते २००३ हा दादा पाटील राजळे यांचा विकास कालखंड आहे. दुसरी पिढीने आप्पासाहेब राजळे यांनी १९७० ते २०१० या कालावधीमध्ये सहकारी संस्था पुढे चालविल्या आहेत. राजळे घराण्यांची तिसरी पिढी राजीव राजळे यांनी २००१ ते २०१६ हा कालावधी आहे. राजीव राजळे यांच्या पत्नी मोनिकाताई राजळे २०१४ पासून पाथर्डी विधानसभा मतदार संघात आमदार म्हणून कार्यरत आहेत. तसेच राहुल राजळे हे २०१४ पासून वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून कार्य करत आहेत.

**तक्ता क्र. ४.२ (पदाधिकारी)**

**अहमदनगर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची शिक्षणानुसार वर्गवारी :-**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| निरक्षर | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| प्राथमिक | ० | २ | ० | ० | ० | २ | १.३३ |
| माध्यमिक | ६ | ६ | २ | ० | ० | १४ | ९.३३ |
| पदवीधर | १४ | १४ | १४ | १० | १८ | ७० | ४६.६७ |
| पदव्युत्तर | १० | ८ | १४ | २० | १२ | ६४ | ४२.६७ |
| **एकूण** | **३०** | **३०** | **३०** | **३०** | **३०** | **१५०** | **१००.००** |

**संदर्भ :- क्षेत्रीय पाहणी**




सदर संशोधनात अहमदनगर जिल्हयातील राजकीय घराण्यांचा अभ्यास करीत असताना नमुना निवड पध्दतीनूसार वरील तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील ३० पदाधिकारी या प्रमाणे ५ तालुक्यातील १५० व्यक्तिची प्रश्नावली माध्यमाच्या सहाय्याने निवड करण्यात आली आहे. त्यानूसार त्यांची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे मिळाली आहे.

१. निवडलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये कुणीही निरक्षर नाहीत म्हणजेच सर्वजण साक्षर आहेत.

२. जिल्हयातील संगमनेर तालुक्यात ०४ पदाधिकारी प्राथमिक शिक्षण पूर्ण झालेले आहेत.

३. माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये राहाता ०६ ,संगमनेर ०६, शेवगाव ०२, असे एकूण १४ संस्था आहे.

४. पदवीधर शैक्षणिक अर्हता असणारे राहाता १४, संगमनेर १४, शेवगाव १४, नेवासा १०, पाथर्डी १८ असे एकूण ७० व्यक्ती असून त्यांची टक्केवारी सर्वात जास्त आहे.

५. पदव्यूत्तर शैक्षणिक महितीमध्ये राहाता ५, संगमनेर ०८, शेवगाव १४, नेवासा २०, पाथर्डी १२ अशी एकूण ६४ संस्था असून त्यांची टक्केवारी ४३ आहे.


यात बदलत्या कालावधीनूसार शैक्षणिक अर्हता स्थितीत प्रगती होत असून आता उच्च शिक्षित व्यक्ती राजकारणात येत आहेत.

**तक्ता क्र. ४.३**

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांचा सहकारी क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांचे संस्थेनुसार वर्गीकरण :–**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| साखर कारखाना | ६ | ६ | ८ | ६ | १२ | ३८ | २५.३३ |
| दुग्धसंस्था | ४ | ६ | ६ | ६ | ४ | २६ | १७.३३ |
| पंचायत समिती | ४ | २ | २ | ४ | २ | १४ | ९.३३ |
| बँक | ६ | ४ | ४ | ६ | ६ | २६ | १७.३३ |
| वि. का. सोसायटी | ४ | ४ | ४ | ४ | २ | १८ | १२.०० |
| शिक्षण | ६ | ८ | ६ | ४ | ४ | २८ | १८.६७ |
| **एकूण** | **३०** | **३०** | **३०** | **३०** | **३०** | **१५०** | **१००.००** |

संदर्भ :– क्षेत्रीय पाहणी




अहमदनगर जिल्हयातील या ०५ तालुक्यातील राजकीय घराणी आपआपल्या तालुक्यातील सामाजिक आर्थिक सहकारी शिक्षण क्षेत्रातील प्रगतीसाठी संबधित व्यक्तींची सभासद सदस्य पदाधिकारी इ. पदावर निवड करून सहकार क्षेत्रातून समाजउन्नतीचे काम करतात.

१. सहकारी साखर कारखाना सदस्य सभासद संचालक इ.मध्ये राहाता ०६ संगमनेर ०६ शेवगाव ०८ नेवासा ०६ पाथर्डी १२ अशा एकूण ३८ पदाधिकाऱ्यांचा समावेश असून तो २५.३३% आहे.

२. दुग्धोत्पादन विकासासाठी राहाता ०४, संगमनेर ०६, शेवगाव ०३, नेवासा ०६, पाथर्डी ०६ असे एकूण २६ पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.

३. पंचायत समिती सदस्य या राहाता ०४, संगमनेर ०२, शेवगाव ०२, नेवासा ०४, पाथर्डी ०२ असे एकूण १४ पदाधिकात्यांनी पंचायत समिती समाजपयोगी योजनाद्वारे रस्ते विकास शिक्षण कृषी व दुग्धविकास लघुउदयोग इ. द्वारे सामाजिक आर्थिक शैक्षणिक वाहतूक व दळणवळण इ. च सार्वजनिक विकास केला व करीत आहेत.

४. बँक पदाधिकारी अहमदनगर जिल्हा सहकारी बॅक ही व्यवहाराने व विस्ताराने महाराष्ट्रातील सर्वात मोठी बँक आहे. येथील राजकीय घराण्यांनी ही स्थापन केली प्रामाणिकपणे जोपासली व वाढवली त्यात प्रत्येक घराण्याचा हातभार आहे. या बँकेच्या अर्थसहाय्याने येथे साखर कारखानदारी दुधसंस्था कृषिविकास व विविध कार्यकारी सोसायटया पतपुरवठा संदर्भात या बँकेवर अवलंबून आहेत. राहता तालुका ०६, संगमनेर ०६, शेवगाव ०४, नेवासा ०६, पाथर्डी

०६ असे एकूण २६ पदाधिकारी बँकेच्या माध्यमातून आर्थिक विकासासाठी वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून पतपूरवठा करतात.

५. विविध कार्यकारी सोसायटी पतपुरवठा संदर्भात अहमदनगर जिल्हा सहकारी बॅकेवर अवलंबून असणाऱ्या सर्व वि. का. सोसायटी संस्था या जिल्हयात शेती विकास कर्ज प्रकरणासाठी कार्यरत आहेत. या संस्था देखील राजकीय घराण्याच्या अधिपत्याखाली व स्थानिक अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्यांच्या मदतीने शेतकऱ्यांना पतपुरवठा करतात त्यात राहाता तालुका ०४, संगमनेर ०४, शेवगाव ०४, नेवासा ०४ व पाथर्डी ०२ असे एकूण १८ पदाधिकारी कार्यरत आहेत.

शैक्षणिक विकास सहभाग अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रविकास बरोबरच हा जिल्हा शिक्षण क्षेत्रातही अग्रेसर आहे. या जिल्हयात राजकीय घराणी समाज सर्वागीन विकासासाठी व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी येथे शासनमान्य हायस्कूल कला वाणिज्य व विज्ञान महाविदयालये, शेतकी महाविदयालये, अध्यापक महाविदयालये, अभियांत्रिकी महाविदयालये, वैदयकीय महाविदयालये, दंतमहाविदयालय इ.ची स्थापना वेगवेगळया शिक्षण संस्थामार्फत सुरू करण्यात आली आहेत.त्यात राहाता ०६, संगमनेर ०८, शेवगाव ०६, नेवासा ०४ पाथर्डी ०४ असे एकुण २८ पदाधिकारी सदस्य म्हणून शैक्षणिक संस्थामध्ये कार्यरत आहेत.तक्ता क्र.४.३

अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातील पदाधिकारी खालील संस्था कार्यक्षेत्रा नूसार आपले योगदान व मार्गदर्शक भूमिका बजावताना दिसतात.

१. सहकारी साखर कारखानदारीत राहाता संगमनेर नेवासा तालुक्यात प्रत्येकी ०६ ,शेवगाव ०८, व पाथर्डी तालुक्यात सर्वात जास्त १२ असे एकूण ३८ पदाधिकारी कार्यरत आहेत. यांची टक्केवारी एकूण कार्यक्षेत्राच्या २५.३३% इतकी आहे.

२. सहकार संस्थावरील दूधसंस्थेत संगमनेर शेवगाव नेवासा तालुक्यात प्रत्येकी ०६ व राहाता आणि पाथर्डी तालुक्यात प्रत्येकी ०४ असे एकूण २६ सदस्य कार्यरत आहेत.

३. पंचायत समिती कार्यक्षेत्रात सभापती उपसभापती व निविदा खात्याचे सदस्यांमध्ये राहाता व नेवासा प्रत्येकी ०४ व संगमनेर शेवगाव व पाथर्डी तालुका मधून प्रत्येकी ०२ असे एकूण १४ पदाधिकारी कार्यरत असलेले दिसून येतात.

४. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही सर्वात जुनी व मोठी बँक असून आता तिच्या जोडीस इतर स्थानिक सहकारी बँका उभ्या राहिल्या आहेत. त्यात राहाता, नेवासा, पाथर्डी, तालुक्यात प्रत्येकी ०६ व संगमनेर शेवगाव तालुक्यात प्रत्येकी ०४ असे एकूण २६ पदाधिकारी कार्यरत आहेत.

५. विविध कार्यकारी सोसायटी या ग्रामपातळीवरील संस्था शेतकरी सहकारी बँक यांची मध्यस्थ भूमिका व अंमलबजावणी करून कृषीविकास व विस्ताराचे काम करतात. त्यात स्थानिक पदाधिकाऱ्यामध्ये राहाता ,संगमनेर, शेवगाव, नेवासा प्रत्येकी ०४ व पाथर्डी तालुक्यात ०२ असे एकूण १८ पदाधिकारी कार्यरत आहेत.


६. अहमदनगर जिल्हा हा शिक्षणक्षेत्रात एक जागृत जिल्हा मानला जातो.येथील सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या घराण्यांनी व पदाधिकाऱ्यांनी सहकारी संस्थाबरोबरच शैक्षणिक संस्थाची स्थापना करून आपआपल्या कार्यक्षेत्रात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचे काम करित आहेत.त्यात संगमनेर ०८ राहाता व शेवगाव प्रत्येकी ०६ आणि नेवासा व पाथर्डी प्रत्येकी ०४ असे एकूण २८ पदाधिकारी कार्यरत आहेत.ही संस्था एकूण टक्केवारीच्या जवळपास १९% आहे.

**तक्ता क्र. ४.४**

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांची पदाधिकाऱ्यांच्या पदानुसार वर्गवारी :-**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष/चेअरमन | ८ | १६ | ६ | १० | ६ | ४६ | ३०.६७ |
| मॅनेजर | ८ | ८ | ८ | १० | १८ | ५२ | ३४.६७ |
| कर्मचारी | १४ | ६ | १६ | १० | ६ | ५२ | ३४.६७ |
| **एकूण** | **३०** | **३०** | **३०** | **३०** | **३०** | **१५०** | **१००.००** |

संदर्भ :- क्षेत्रीय पाहणी




अहमदनगर जिल्हयातील वरील ०५ तालुक्यातील राजकीय घराण्यांनी आपल्या राजकीय सामाजिक कायकर्ते पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या सहकार्याने बॅका पतसंस्था सहकारी सोसायटया, साखर कारखाने, जिनिंग मिल, दुधसंस्था, पाणीवापर संस्था, शिक्षणसंस्था स्थापन केल्या आहेत.त्यात तालुक्यातील पदाधिकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा खालील प्रकारे समावेश होतो.

१. पदाधिकारी अध्यक्ष चेअरमन यात विविध कार्यकारी संस्थाच्या प्रमुखपदी राहाता तालुक्यात ०८, संगमनेर १६, शेवगाव ०६, नेवासा १०, पाथर्डी ०३ असे एकुण ४६ (३०.६७) पदाधिकारी वेगवेगळया संस्थाचे कारभार पाहत आहेत.

२. मॅनेजर वरील ०५ तालुक्यातील वेगवेगळ्या सहकारी संस्था कार्यालयात मॅनेजर य प्रमुख अधिकारी पदावर काम करणाऱ्या राहाता तालुक्यात ०८, संगमनेर ०८, शेवगाव ०८, नेवासा १०, पाथर्डी १८ असे एकूण ३२ (३४.६७) अधिकारी यशस्वीपणे तालुका विकासासाठी कार्यरत आहेत.

३. कर्मचारी वरिष्ठ वेगवेगळ्या कार्यालयात व साखर कारखान्यात वेगवेगळ्या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यात राहाता तालुका १४, संगमनेर ०६, शेवगाव १६, नेवासा१०, पाथर्डी ०६ असे एकूण ३२ (३४.६६) कर्मचारी कार्यरत आहेत.


वरील सर्व पदाधिकारी अधिकारी व कर्मचारी आपआपल्या पदानूसार समाजोपयोगी काम करताना दिसतात.

तक्ता क्र. ४.५

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांच्या सेवा कालावधीनुसार वर्गवारी :–**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९५–२००० | ४ | ६ | १४ | १२ | २० | ५६ | ३७.३३ |
| २०००–२००५ | १० | ६ | १० | ८ | ४ | ३८ | २५.३३ |
| २००५–२०१० | २ | ८ | २ | ६ | ६ | २४ | १६.०० |
| २०१०–२०१५ | ८ | ८ | ४ | ४ | – | २४ | १६.०० |
| २०१५–२०१७ | ६ | २ | – | – | – | ८ | ५.३३ |
| एकूण | ३० | ३० | ३० | ३० | ३० | १५० | १००.०० |

संदर्भ :– क्षेत्रीय पाहणी




अहमदनगर जिल्हयातील वरील ०५ तालुक्यातील सहकार क्षेत्रात १९९५ ते २०१७ या कालावधीत प्रत्येक तालुक्यातील ३० या प्रमाणे निवडलेल्या नमुना सर्वेक्षण प्रश्नावली नूसार वेगवेगळया पदांवर त्यांनी काम केलेले आहे व करीत आहेत.

१. १९९५–२००० या पाच वर्षाच्या कालावधीत राहाता ०४, संगमनेर ०६, शेवगाव १४, नेवासा १६ पाथर्डी २० अशा एकूण ३६ (३७.३३%) व्यक्तींनी सहकार क्षेत्र संबधित अध्यक्ष ,उपाध्यक्ष, सदस्य, सभासद इ. पदांवर आर्थिक सामाजिक व राजकीय विस्तारासाठी व विकासासाठी संघटिपणे काम केले आहे.

२. २०००–२००५ या कालावधीत राहाता १०, संगमनेर ०६, शेवगाव १०, नेवासा ०८, पाथर्डी ०४ अशा ३८ (२५.३३) व्यक्तींनी वेगवेगळ्या पदांवर काम केले.

३. २००५–२०१० या कालावधीत राहाता ०२, संगमनेर ०६, शेवगाव ०२, नेवासा ०६, पाथर्डी ०६ अशा एकूण २४ (१६%) कर्मचारी पदांवर कार्य केले आहे.

४. २०१०–२०१५ या कालावधीत राहाता ०८, संगमनेर ०८, शेवगाव ०४, नेवासा ०४ अशा एकुण २४ (१६%) पदांवर काही जण अजूनही कार्यरत आहेत.


५ २०१५–२०१७ या सदयस्थितीत राहाता ०६, संगमनेर ०२ असे ०८ (१६%) व्यक्ती सध्या पदावर आहेत.

**तक्ता क्र. ४.६**

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांचे सामाजिक / आर्थिक बदलाविषयी असलेल्या मतानुसार वर्गीकरण :–**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सामाजिक बदल झालेला आहे | ३० | ३० | २४ | २० | २६ | १३० | ८६.६७ |
| नाही | ० | ० | ६ | १० | ४ | २० | १३.३३ |
| एकूण | ३० | ३० | ३० | ३० | ३० | १५० | १००.०० |
| आर्थिक बदल झालेला आहे | ३० | ३० | २२ | २५ | २० | १२७ | ८४.६७ |
| नाही | ० | ० | ८ | ५ | १० | २३ | १५.३३ |
| **एकूण** | **३०** | **३०** | **३०** | **३०** | **३०** | **१५०** | **१००.००** |

संदर्भ :– क्षेत्रीय पाहणी




अहमदनगर जिल्हयातील वरील ०५ तालुक्यातील प्रत्येकी ३० पदाधिकाऱ्यांना दिलेल्या मुलाखतीनुसार व प्रश्नावलीनुसार प्रत्येक तालुक्यात सामाजिक बदल ८६.६७% झालेला आहे. व आर्थिक बदल देखील ८४.६७% झालेला आहे. असे आपले मत व्यक्त केले आहे.

**सामाजिक बदल** – समाजमंदीर, सभा मंडप, नळ योजना हात पंप, रस्ते, पुल, ग्रामीण भागातील बस थांबाच्या शेड, सांस्कृतिक भवन, गोरगरिबाच्या मुलामुलींची लग्ने, धार्मिक कार्यकमाचे आयोजन, अनेक गावांमध्ये वृक्षारोपन राबवून खेडयाचे संपूर्ण चित्र बदललेले दिसते. अंगणवाडया, ग्रामपंचायत कार्यालय, इमारती, घाट, रस्ते, गांव अंतर्गत रस्ते यांचे डांबरीकरण, खडीकरण, कॉंकिटीकरण, दलित वस्ती सुधार योजना, वाहतुक दळणवळण, बाजारपेठा, शिक्षणसंस्था, पाणीपुरवठा आरोग्य इ. सुविधा.आदिवासी जनतेसाठी विविध योजना राबविणे, आत्महत्याग्रस्त कुटूंबांना दत्तक घेणे. जनतेसाठी अपघातीविमा योजना राबविणे, दुष्काळी भागात जलक्रांती अभियान विविध अनुदानातील विविध खरेदी –विक्री बाजार समितीची स्थापना तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती उभारणे, किडा संकुल उभारणे, शैक्षणिक संस्थामार्फत सामाजिक उपकमांतर्गत नेत्रदान, देहदान, गरिब मुलांचे शैक्षणिक पालकत्व, विधवा महिलांना आधार, गाव दत्तक योजना असे अनेक कार्य सामाजिक क्षेत्रामध्ये केलेली दिसून येतात. त्या कार्यकमासंबंधी प्रत्येक सहकारी राजकीय घराण्यांचा प्रकरण ३.२ मध्ये संक्षिप्त आढावा घेण्यात आलेला आहे.

**आर्थिक बदल**–सहकारी साखर कारखाना उभारणे व तो सुरळीत चालविणे यातूनच हजारो कामगारांना आर्थिक लाभ होतो. सर्वात जास्त लाभ हा शेतक–यांना होतो. शेतकऱ्यांची आर्थिक

बाजु भक्कम होते. उसाला योग्य भाव मिळाला तर तो स्थिरावतो. शेतीला पुरक व्यवसाय म्हणुन शेतकरी दुग्ध व्यवसाय करतो, दुध संकलन केंद्रातून अर्थसहाय मिळते. अनेक सहकारी दुध संकलन केंद्रामुळे आर्थिक बदल झालेला आहे. हजारो कुटूंबाना स्वयं रोजगार व जोड्धंद्यातून उत्पन्नाचे साधन मिळालेले आहे.अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेचे संचालक पद हे सहकारी घराण्यांकडे असते त्यामुळे संचालक आणि उपाध्यक्ष असताना त्यांनी पुढाकार घेवुन शेतीच्या विकासासाठी ठोस पावले उचललेली दिसतात. दुध धंद्यांसाठी गायी, गुरांसाठी अर्थसहाय, शेतीसाठी अवजारांना कर्जपुरवठा, बॅकेमुळे तालुक्यात घर बांधणे, घरदुरूस्ती, वाहन खरेदी, बेरोजगांरासाठी उद्योगव्यवसाय, महिली सबलीकरणासाठी कर्ज, बचतगटासाठी उत्कृष्ठ कामगिरी, पायाभुत सुविधांसाठी उपलब्धी तसेच बॅकेत क्रांतिकारी निर्णय घेवून जनसामान्यांच्या विकासासाठी राबविले. अशा रितीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवून अल्प दराने कर्जपुरवठा करून अहमदनगर जिल्हयातील शेतकरी व सर्वसामान्य आर्थिक दुप्टीने सबळ बनलेला दिसतो. सहकारातून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मोठे परिवर्तन झालेले दिसून येत आहे. त्यादृष्टिकोनातून सविस्तर विश्लेषण प्रकरण– १. ३.१ मध्ये देण्यात आलेले आहे. या वरून असे स्पष्ट होते की या तालुक्यातील राजकीय घराणी आपल्या मतदार संघातील समाजासाठी सार्वजनिक सामाजिक बदल व आर्थिक बदलांसाठी सतत प्रयत्नशील असतात. त्यामुळे ते समाजात लोकप्रिय ठरले आहेत. याच कारणामुळे त्यांची राजकारणातील वंशपरंपरा टिकून आहे यात संदेह नाही.

**तक्ता क्र. ४.८ (लाभधारक)**

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांची प्रनिनिधीत्वानुसार वर्गवारी :–**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ६० | १६.६७ |
| राजकीय प्रतिनिधी | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ६० | १६.६७ |
| शेतकरी | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ६० | १६.६७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| राजकीय कार्यकर्ते | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ६० | १६.६७ |
| पत्रकार | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ६० | १६.६७ |
| व्यावसायिक | १२ | १२ | १२ | १२ | १२ | ६० | १६.६७ |
| **एकूण** | **७२** | **७२** | **७२** | **७२** | **७२** | **३६०** | **१००.००** |


अहमदनगर जिल्हयातील वरिल ०५ तालुक्यातील प्रत्येकी १२ लाभधारक प्रतिनिधींची म्हणजे प्रत्येक तालुक्यातून ०५ प्रमाणे ०५ तालुक्यातील ७२ लाभधारकांची निवड करण्यात आली आहे. त्यात महिला लाभधारक १२, राजकीय प्रतिनिधी १२, शेतकरी १२, राजकीय कार्यकर्ते १२ पत्रकार १२ व्यावसायिक १२ अशाप्रकारे एकुण ३६० लाभधारक प्रतिनिधींची निवड करण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ४.९**

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांची सहकारी संस्थांशी संबंधानुसार वर्गवारी :-**

| **तपशील** | **राहता** | **संगमनेर** | **शेवगाव** | **नेवासा** | **पाथर्डी** | **एकूण** | **टक्के** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संचालक/चेअरमन | १३ | ५ | ५ | ७ | ६ | ३६ | १०.०० |
| सभासद | ३५ | ४१ | ३० | ४५ | ३६ | १८७ | ५१.९४ |
| सदस्य | १२ | २१ | २५ | १५ | २७ | १०० | २७.७८ |
| काही संबध नाही | १२ | ५ | १२ | ५ | ३ | ३७ | १०.२८ |
| **एकूण** | **७२** | **७२** | **७२** | **७२** | **७२** | **३६०** | **१००.००** |

संदर्भ :- क्षेत्रीय पाहणी




अहमदनगर जिल्हयातील वरील ०५ तालुक्यातील प्रत्येकी ७२ याप्रमाणे ३६० सदस्यांची सहकार क्षेत्रातील वेगवेगळया संस्थामध्ये खालील काम केले आहेत व काही जण करीत आहेत.

१. संचालक अध्यक्ष पदासंबधित काम करणारे राहाता १३, संगमनेर ०५, शेवगाव ०५, नेवासा ०७, पाथर्डी ०६ अशा एकूण ३६ (१०%) सभासदांनी वेगवेगळया सहकार संस्थावर संचालक व अध्यक्ष पदावरुन समाजाचे नेतृत्व केले आहे.

२. सभासद वरील ०५ तालुक्यातील वेगवेगळया सहकार संस्थाचे आपआपल्या गरजेनूसार नोंदणी सभासदांमध्ये राहाता ३५, संगमनेर ४१, शेवगाव ३०, नेवासा ४५, पाथर्डी ३६ असे एकुण १८७ (५१.९४%) नोंदणीकृत सभासद आहेत. संबधित संस्थाच्या सहाय्याने ते आपली कौटुंबिक व सामाजिक स्तरावर तालुकानिहाय या संस्थामध्ये सभासद म्हणून त्यांनी आपला सहभाग नोंदवला आहे. त्यात सहकारी साखर कारखाना सभासद, दुधसंघ सहकारी सोसायटया इ. समावेश होतो.

३. सदस्य वेगवेगळया सहाकरी संस्थामध्ये सदस्य म्हणून निवड झालेल्या मध्ये राहाता १२, संगमनेर २१, शेवगाव २५, नेवासा १५, पाथर्डी २७ असे एकुण १०० (२७.७८%) सदस्य आहेत.


४. कोणत्याही सहकारी संस्थाचे सदस्य किंवा सभासद संबध नसणाऱ्या व्यक्तीपैंकी राहाता १२, संगमनेर ०५, शेवगाव १२, नेवासा ०५, पाथर्डी ०३, अशा ३७ (१०.६६%) व्यक्ती आहेत. त्याचा प्रत्यक्ष सभासद संबध नसला तरी अप्रत्यक्ष त्यांचा दैनंदिन जविनात सहकाराशी संबध मात्र असतो, तो नाकारता येत नाही.

तक्ता क्र. ४.१०

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांचे सहकारी संस्था सभासदत्व लाभानुसार वर्गीकरण :–**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पतपुरवठा | ७२ | ७२ | ७२ | ७२ | ३६ | ३२४ | १४.०९ |
| प्रक्रिया उद्योग | ५२ | ७२ | ७२ | ७२ | ३६ | ३०४ | १३.२२ |
| शेतमाल विक्री | ५० | ७२ | ७२ | ६५ | १५ | २७४ | ११.९१ |
| बाजारपेठ | ६२ | ७२ | ६५ | ६५ | ४२ | ३०६ | १३.३० |
| दुग्धविकास | ५० | ७२ | ६० | ७२ | ४५ | २९९ | १३.०० |
| खते बी–बियाणे | ५९ | ६७ | ६७ | ६७ | २६ | २८६ | १२.४३ |
| कृषी अवजारे | ४२ | ६५ | ६३ | ६७ | २५ | २६२ | ११.३९ |
| जलसिंचन | ४२ | ६० | ३५ | ७२ | ३६ | २४५ | १०.६५ |
| **एकूण** | **४२९** | **५५२** | **५०६** | **५५२** | **२६१** | **२३००** | **१००.००** |

संदर्भ :– क्षेत्रीय पाहणी



अहमदनगर जिल्हयातील राजकीय घराण्यांनी आपआपल्या तालुक्यात सामजिक व आर्थिक विकासासाठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. हे प्रत्येक तालुक्यातील ७२ लाभधारक असे ०५ तालुक्यातील एकुण ३६० प्रतिनिधीक लाभधारकांकडून मुलाखतीद्वारे भरून घेतलेल्या प्रश्नावली वरून स्पष्ट होते.

१. पतपुरवठा सदर निवडलेल्या नमुना सर्वेक्षणातून असे स्पष्ट होते की वरील ०५ तालुक्यामध्ये पतपुरवठा सुविधा ही जिल्हा सहकारी बँक राष्ट्रीयकृत बँका विविध कार्यकारी सोसायटया पतसंस्था साखर कारखाने दुधसंस्था इ. च्या माध्यमातून शेतकऱ्यांना १००% पतपुरवठा होतो.

२. प्रक्रिया उदयोग वरील पाचही तालुक्यांमध्ये शेतमालावर प्रक्रिया करणारे साखर कारखाने कापूस जिनिंग ॲण्ड प्रोसिंग मिल दाळमिल तेलबिया प्रकल्प संकलन व शितकरण प्रक्रिया उदयोगामुळे शेतीतून उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्यांचे शुध्द्ध पक्या मालात रूपांतर केले जाते त्यामुळे शेतकऱ्यांना या सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्या आहेत.

३. शेतमालविक्री यासाठी प्रत्येक तालुक्यात मार्केटयार्ड खरेदी विक्री संघ भाजी मंडई व आठवडा बाजार या सुविधा उपलब्ध आहेत.त्यात फक्त पाथर्डी तालुक्यात शेतमाल विक्री सुविधा कमी दिसून येते.

४. बाजारपेठा सर्व तालुकास्तरांवर व त्यातील काही मोठया लोकसंख्येचा गावात ग्राहकाच्या क्रयशक्तीनूसार स्थानिक बाजारपेठा विकसीत झाल्या आहेत. त्यात संगमनेर ही सर्वात मोठी बाजारपेठ दिसून येते.

५. दुग्धविकास यात सहकारी दुधसंघ व खाजगी डेअरीमार्फत दरदिवस दूधसंकलन व शितकरण यंत्रणा उपलब्थ असून त्यात संगमनेर शेवगाव व नेवासा तालुका या शेतीपुरक व्यवसायात आघाडीवर आहेत. मात्र पाथर्डी तालुका हा जिरायती असल्यामुळे येथे हिरव्या वैरणीचे लागवडीचे प्रमाण कमी असल्यामुळे येथे दुग्धोत्पादन व संकलन कमी दिसून येते.

६. खते व बी–बियाणे आधुनिक कृषी विकासात रासायनिक खते व संकरित बी–बियाणे यांना महत्वाचे स्थान आहे. संकरित बी–बियाणे विकसीत करण्यासाठी कृषी विदयापीठे व खाजगी सरकारमान्य कंपन्या अधिक उत्पादन देणाऱ्या व कमी पाण्यावर तग धरणाऱ्या वाणांसाठी सतत

प्रयत्नशील असतात. त्यात पाथर्डी तालुका वगळता इतर तालुक्यांची स्थिती समाधानकारक दिसून येते.

७. कृषी अवजारे अलिकडे शेतकऱ्याकडील देशी गाईची संख्या कमी झाल्यामुळे पूर्वी भारतीय शेतीमाल महत्वाची शक्ती म्हणजे बैलांची संख्या कमी झाली आहे. झाडांची संख्या कमी झाल्यामुळे पारंपारिक लाकडी अवजारे ही हद्दपार होत आहेत. याची जागा आता लोखंडी व स्वयंचलित अवजारे घेत आहेत. शेतीची पूर्व मशागत पिकांची अंतर्गत निगा पीक कापणी मळणी उफणणी इ. बहुतेक कामे आता लोखंडी व स्वयंचलित यंत्राच्या सहाय्याने (हार्वेस्टर) केली जात आहेत. यात पाथर्डी तालुक्याचा अपवाद वगळता आता इतर तालुक्यामध्ये या अवजारांचा वापर वाढलेला दिसून येतो.

८. जलसिंचन पिकांच्या वाढीसाढी आवश्कतेनूसार पिकांना केला जाणार कृत्रिम पाणी पुरवठा म्हणजे जलसिंचन सुविधेच्या बाबतीत अहमदनगर जिल्हा हा जागरूक जिल्हा मानला जातो.

अलिकडिल राजकारणात आता पाटपाणी हा उत्तर अहमदनगर व दक्षिण अहमदनगर यांच्यात कळिचा मुद्दा बनला आहे.पावसामुळे येथील राजकारण हे उन्हाळयात अधिक तापते कारण मुळा नदीवरील मुळा धरण प्रवरा नदीवरील भंडादरा धरण व गोदावरी नदीचा सर्वात जास्त फायदा हा जिल्हयाच्या उत्तरेकडील तालुक्यांना सर्वात जास्त होतो.त्या तूलनेने तो दक्षिणेकडील तालुक्यांना कमी होतो. एकंदर सरासरी पाहता जलसिंचनाच्या सुविधा समाधानकारक दिसून येते कारण जलसिंचनावरच साखर कारखानदारी आहे.


**तक्ता क्र. ४.११**

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक सभासद घराण्यांच्या काळातील झालेल्या बदलानुसार वर्गीकरण :–**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आर्थिक बदल | ७० | ७२ | ६० | ६६ | ५५ | ३२३ | २६.२२ |
| शिक्षण सुविधा | ७२ | ७२ | ६२ | ६७ | ५० | ३२३ | २६.२२ |
| मुलभूत सोयी | ७१ | ७२ | ५० | ५२ | ४५ | २९० | २३.५४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला सक्षमीकरण | ६७ | ७२ | ५५ | ६२ | ४० | २९६ | २४.०३ |
| **एकूण** | **२८०** | **२८८** | **२२७** | **२४७** | **१९०** | **१२३२** | **१००.००** |

संदर्भ :– क्षेत्रीय पाहणी




सदर ४.११ सांख्यिकी माहिती संकलन तक्त्यानूसार अभ्यासासाठी निवडलेल्या ०५ तालुक्यातील प्रत्येकी ७२ प्रमाणे एकुण ३४० व्यक्तिंच्या मतानूसार खालील बदल कशाप्रकारे झालेले आहेत. या विषयीचे विश्लेषण खालील प्रमाणे आहे.

१. आर्थिक बदल राजकीय घराण्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुक्यांमध्ये आर्थिक बदल झालेला आहे.

२. शैक्षणिक सुविधा प्रत्येक तालुक्यात शैक्षणिक सुविधा समाधानकारक झालेल्या आहेत.

३. सामाजिक व आर्थिक विकास झालेला नाही हे सिध्द होते कारण ही बदलत्या परिस्थितीनूसार परावर्तित होणारी एक अखंड प्रतिमा असते.

४. मूलभूत सोयी सुविधा सर्व तालुक्यामध्ये मूलभूत सुविधा निर्माण होत आहेत. असे मत सर्वांनी व्यक्त केले आहेत.


५. महिला सक्षमीकरण यात ३६०(२४.०३%) पैकी २९६ व्यक्तिंनी महिला सक्षमीकरण झालेले आहे असे मत व्यक्त केले आहे. म्हणजेच संगमनेर तालुका अपवाद सोडता इतर तालुक्यामध्ये महिला सक्षमीकरण योजना राबविण्याची आवश्यकता आहे. सहकारी राजकीय घराण्यामुळे बदलाचे परिणाम दर्शविणारे खालील घटक दिसून येतात. १. वारसदाराची वाटचाल २. राजकारणातील सहभाग ३. सार्वजनिक सुविधांमध्ये झालेली वाढ. ४. शिक्षण संस्था व रोजगारास वाढ ५. राहणीमानांचा सुधारलेला दर्जा ६. उदरनिर्वाहाच्या साधनांची उपलब्धी ७. ग्रामीण विकासाला मिळालेली चालना ८. सर्वसामान्यांमध्ये स्वावलंबन आणि आत्मनिर्भयता ९. मुल्यांची जोपासणा समानतेचे वागणुक १०. परस्पर सहकार्याची वागणुक दिसते ११. वैद्याकीय सुख सुविधा मोठ्या प्रमाणात १२. लघु व कुटीर उद्योगांचे पाठबख १३. व्यावसायिक शिक्षणाची जोड १४. आर्थिक न्यायाची स्थिती निर्माण झाली

**तक्ता क्र. ४.१२**

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक राजकीय घराण्यांचे तालुका विकासातील योगदान याविषयी लाभधारकांचे मत :-**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सहकार घराण्याशाहीमुळे तालुक्याचा विकास झाला आहे. | ६२ | ६९ | ५४ | ६० | ५० | २९५ | ८१.९४ |
| झाला नाही | - | ३ | १८ | - | - | २१ | ५.८३ |
| तटस्थ | १० | ० | ० | १२ | २२ | ४४ | १२.२२ |
| **एकूण** | **७२** | **७२** | **७२** | **७२** | **७२** | **३६०** | **१००.००** |

संदर्भ :– क्षेत्रीय पाहणी




अभ्यासासाठी निवडलेल्या अभ्यासक्षेत्रातील प्रतिनिधीक तत्वानूसार निवड्लेल्या एकुण ३६० लाभधारकांपैकी २९५ (८१.९४%) व्यक्तिंनी सहकार क्षेत्रामुळे तालुक्याचा विकास झाला आहे.अशा सकारात्मक नोंदी केल्या आहेत. तर फक्त २१ व्यक्तिंनी सर्वांगीण विकास झाला नाही असे मत व्यक्त केले आहे. आणि ४४ (१२.२२%) व्यक्तिंनी तटस्थ भूमिका घेऊन या विषयी आपले मत व्यक्त केले नाही म्हणजेच सदयस्थिती पेक्षा आणखी विकास व्हावा अशी त्यांची यातून इच्छा व्यक्त होते.


**तक्ता क्र. ४.१३**

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक राजकीय घराण्यांनी सामाजिक व आर्थिक क्षेत्रात केलेल्या बदलाचे परिणाम :–**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आर्थिक अनुकुल | ७२ | ६९ | ६५ | ६० | ४० | ३०६ | २७.६४ |
| प्रतिकुल | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| सामाजिक अनुकुल | ७२ | ६९ | ५५ | ५८ | ५० | ३०४ | २७.४६ |
| प्रतिकुल | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वैद्यकीय अनुकुल | ७२ | ६९ | १० | ३० | २५ | २०६ | १८.६१ |
| प्रतिकुल | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| कृषी अनुकुल | ७२ | ६९ | ५० | ६० | ४० | २९१ | २६.२९ |
| प्रतिकुल | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| **एकूण** | **२८८** | **२७६** | **१८०** | **२०८** | **१५५** | **११०७** | **१००.००** |

**संदर्भ :– क्षेत्रीय पाहणी :–**





सदर तक्त्यानुसार असे सिध्द होते की वरील सर्व तालुक्यातील राजकीय घराण्यांनी सहकारातून आर्थिक, सामाजिक, वैदयकीय व कृषिक्षेत्रात केलेल्या प्रगतीचे परिणाम हे समाज उन्नतीसाठी अनुकुलच ठरलेले आहेत. त्यात फक्त शेवगाव तालुक्यातील वैदयकीय क्षेत्रातील बदल हा समाधानकारक दिसत नाही तर तेथील लोकप्रतिनिधी या क्षेत्रात आणखी सुविधा निर्माण करून दयाव्यात अशी लाभधारकांची अपेक्षा आहे.

**तक्ता क्र. ४.१४**

**अहमदनगर जिल्ह्यातील निवडक राजकीय घराण्यांमुळे तालुक्याचा सर्वांगीन कायापालट झाला किंवा नाही :-**

| तपशील | राहता | संगमनेर | शेवगाव | नेवासा | पाथर्डी | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कायापालट झालेला आहे | ७२ | ६९ | ५६ | ६१ | ५५ | ३१३ | ८६.९४ |
| नाही | ० | १ | १६ | ९ | १२ | ३८ | १०.५६ |
| तटस्थ | ० | २ | ० | २ | ५ | ९ | २.५० |
| **एकूण** | **७२** | **७२** | **७२** | **७२** | **७२** | **३६०** | **१००.००** |

संदर्भ :- क्षेत्रीय पाहणी




येथे कायापालट हा शब्द सार्वजनिक क्षेत्रातील मूलभूत सोयी सुविधा, आर्थिक घटक, कृषिविषयक घटक, वैद्यकिय घटक, रोजगार इ. ची उपलब्धी व दैनंदिन गरजांची पूर्तता या बरोबरच शारिरिक, मानसिक, सामाजिक व राजकीय स्वस्थता इ. ची सामुहिक एकत्रीतपणे झालेली प्रगती होय. सदर संशोधन अभ्यासानूसार तालुक्याचा कायापालट झालेला आहे व होत आहे. याविषयी वरील ०५ तालुक्यातील एकुण ३६० लाभधारकांपैकी ३१३ (८६.९४%) सहमत आहेत. तर सर्वांगीण कायापालट झाला नाही असे ३८ (१०.५६%) लाभधारकांना वाटते आणि तटस्थ भूमिकेत ०९ (२.५०%) आहेत.

कोणत्याही समाजातील सामाजिक व आर्थिक प्रगती ही एकत्रितपणे एकाच वेळी पूर्ण होणे अशक्य आहे. कारण दिससेंदिवस वाढणारी लोकसंख्या आधुनिक काळातील अमर्याद गरजा मर्यादित साधनसंपत्ती नैसर्गिक साधन संपत्तीचे होणारे शोषण इ. मुळे बदलत्या स्थळकाळानूसार नवनवीन समस्या निर्माण होतात. पर्यावरण असंतूलन निर्माण होते. व याचा परिणाम सामाजिक मानसिक व आर्थिक विकासावर होत असतो. अशावेळी संघटितपणे समता एकता व बंधुता या तत्वावर आधारित विचारपूर्वक भविष्यकालीन नियोजन करून सामुहिक अमंलबजावणी केली तरच सक्षम विकास करता येईल तरच **''विना सहकार! नाही उध्दार!!''** या ब्रीद वाक्याची चांगली प्रचिती येईल.

प्रकरण ५

# माहितीचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३३९ |
| २ | गृहितकांची पडताळणी | ३३९ |
| ३ | निष्कर्ष | ३५५ |
| ४ | शिफारशी | ३६७ |
| ५ | भावी संशोधनाची दिशा | ३६९ |
| | | |

## प्रकरण ५

# माहितीचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## १. प्रस्तावना :–

संशोधन अभ्यास केल्यानंतर व संकलित माहिती आणि आकडेवारीचे विश्लेषण केल्यानंतर प्रथम अभ्यासाची जी उद्दिष्टे मांडली होती. तसेच जी गृहितके गृहित धरली होती. त्याबाबत संशोधनामधून जी सिध्दता प्राप्त झाली ती या प्रकरणामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकरणाची मांडणी करताना प्रथमः संशोधनासाठी जी गृहितके मांडली होती, त्याची सत्यासत्यता तपासून ती सुरूवातीला मांडली आहे. शेवटी संशोधनातून हाती आलेले निष्कर्ष आणि शिफारशी मांडल्या आहेत. त्या संशोधनामधून संशोधक अशा विविध अंगाने भविष्यात अभ्यास व संशोधन करता येईल याची मांडणी प्रकरणाच्या शेवटी केली आहे.

## २. गृहितकांची पडताळणी :–

### १. अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्र महाराष्ट्रात अग्रगण्य आहे :–

प्रस्तुत संशोधनात प्रकरण १ प्रास्ताविक मध्ये सहकार क्षेत्राचा सविस्तर आढावा घेतला आहे. त्यानूसार सहकार चळवळ ही कृषी औदयोगिक अर्थव्यवस्थेसाठी आधार चौकट आहे. स्वांतत्र्यपूर्व काळी शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त करून त्यांचा प्राथमिक आणि मुलभूत गरजा भागवण्यासाठी त्यांना पूरेसे व वेळेवर अर्थसाहाय्य मिळावे हा सहकार चळवळीचा मुख्य हेतू होता. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाने या चळवळीला आर्थिक बळ प्राप्त करून दिले. महाराष्ट्राची आजची सहकारातील ओळख साखर कारखानदारीच्या रूपाने झाली आहे. स्वांतत्र्यपूर्व काळात ऊसपीक क्षेत्रात खाजगी कारखाने होते. १९४१ पर्यंत महाराष्ट्रात १२ खाजगी साखर कारखाने कार्यरत होते. अशा परिस्थितीत १९४५ साली डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे नेतृत्वाखाली व पद्मश्री विठ्ठलराव विखे यांच्या प्रयत्नातून बागायतदार शेतकऱ्यांच्या परिषदेमध्ये एकमताने झालेल्या ठरावानुसार सहकार तत्वावर अशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर येथे उभा केला. सहकार चळवळीतील ही एक क्रांतीकारी घटना समजली जाते. कारखान्याच्या कारभारासाठी विठ्ठलराव विखे यांनी दुरदृष्टीने त्या संस्थात्मक रचना उभ्या केल्या. त्याचेच इतर सहकारी कारखान्यांनी अनुकरण केले आणि केवळ त्या–त्या

परिसराचा विकास साधला असे नव्हे तर महाराष्ट्राचे आर्थिक, सामाजिक व राजकीय चित्र बदलून टाकले या क्रांतिकारक प्रक्रियेत विखे पाटील याच्या सहकारी कारखान्याने उत्प्रेरकाची भूमिका बजावली. मराठवाडयात सहकारी साखर चळवळचे लोण पोहोचले, मात्र विदर्भ आणि कोकण विभागात या चळवळीने फारसे मुळ धरले नाही. जिथे ती मुळ धरू शकली नाही अशा दोन विभागांतील शेतकऱ्यांच्या अवस्थेची तुलना केली तर सहकार चळवळीचे श्रेय किती मोठे आहे याची प्रचिती होते. पूर्वी विदर्भाला धान्याच कोठार समजत आता तेथील शेतकारी उदयोगाने आत्महत्या करू लागले आहेत. राजकीय व सामाजिक चळवळीच्या बाबतीत जिल्हा अत्यंत जागृत समजला जातो आधुनिक महाराष्ट्रात अहमदनगर म्हणजे साखरेचे आगर आहे. भारतातील सगळयात जास्त साखर कारखाने असलेला हा जिल्हा आहे.

ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिधुदुर्ग या जिल्हयांचा मिळुन बनलेले कोकणचा विचार करता सहकारी व संस्थात्मक रचनेचा अभाव हे एक वैशिष्टय नोंदविता येईल. भौगोलिक रचनेमुळे, कृषी उत्पन्न बाजार समित्या व खरेदी–विक्री संघासारख्या संस्थाही निष्प्रभ ठरल्यामुळे राजकीय नेतृत्वांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले आहे. विदर्भाची अर्थव्यवस्था शेती क्षेत्रावर अवलंबुन आहे. शेती क्षेत्रातुनच सहकाराचा थोडाफार विकास झालेला दिसतो. कापुस, संत्री, पानमुळे आणि थोडाफार ऊस यावर आधारीत सहकार क्षेत्र वाढले आहे. विदर्भाचा विकास पश्चिम महाराष्ट्रामुळे झाला नाही. हा मुद्या जनमतामध्ये ठाम आहे. औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, जालना, उस्मानाबाद, हिंगोली, लातूर हे जिल्हे मिळून मराठवाडा हा विभाग उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेने विकासाच्या बाबतीत मागे आहे. मराठवाडयात एकुण महाराष्ट्रातील उदयोगांपैकी फक्त ७ टक्के उदयोग आहेत. उस्मानाबाद–४, औरंगाबाद–९, लातूर–१३, परभणी–०, जालना–० जिल्हयातील सहकारी क्षेत्रातील साखर कारखाने व बँका यांच्यातील प्रभावी नेतृत्व हे गोपीनाथ मुंडे व हरिभाऊ बागडे यामुळे आहे. मराठवाडयातील प्रत्येक पक्षातील नेतृत्व हे या जिल्हयापुरतेच मर्यादित आहे. कारण त्या जिल्हयातील सहकारी संख्या त्यांच्या ताब्यात आहेत. सहकार चळवळ दुर्बल असल्याने जिल्हयाबाहेर नेतृत्वांचा प्रभाव पाडण्यासाठी सहकारतील आर्थिक ताकद कमी आहे. पावसाच्या पाण्याच्या सततच्या असमतोलामुळे पिके अवेळी नष्ट होतात. पिण्याचे पाणी, शेतीच्या पाण्याचा प्रश्न, मोठया उदयोगांचा अभाव यांमुळे सर्व खेडी व शहरी बकाळ बनलेली

आहेत. ज्या भागात साखर कारखाने आहेत तेथील उसवाल्या शेतकऱ्यांचे तेवढे भागू शकते असे म्हणण्यासारखी परिस्थिती आहे.

दक्षिण महाराष्ट्रात सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, या जिल्हयांचा समावेश केला आहे. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार यांची राजकीय परंपरा लाभलेल्या दक्षिण महाराष्ट्रावर वसंतदादा पाटील यांच्यानंतर, शरद पवार याचा राजकीय प्रभाव आहे. सोलापूर जिल्हयात १२, सांगलीमध्ये १७, कोल्हापूर १६, तर साताऱ्यात १२, सहकारी साखर कारखाने आहेत.

एकंदरीत अहमदनगर जिल्हयातील सहकार पुढारलेला दिसून येतो. दुष्काळग्रस्त जिल्हा सहकारामुळे सक्षम बनला आहे. याचे श्रेय जिल्हयातील सहकारी राजकीय नेतृत्वाला दयावे लागेल प्रत्येक तालुक्यात १ सहकारी साखर कारखाना आहे. श्रीगोंदा तालुक्यात ४ साखर कारखाने आहेत. डोंगराळ भूभागावर वृक्षलागवड करणे हे भाऊसाहेब थोरातांचे उदाहरण आहे. तर नेवासा तालुक्यात ३० तळे बांधणे व पाऊस पाण्याची साठवण करणे हे यशवंतराव गडाख यांचे उदाहरण आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकणाचा विचार केला तर सहकार असून ही बाल्यावस्थेत आहे. त्यावरून अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्र महाराष्टात अग्रगण्य आहे हे सिध्द होते.

**२. अहमदनगर जिल्हयातील सहकार नेतृत्व स्थानिक स्वराज्य संस्थामुळे विकसीत झाले आहे :–** प्रकरण क्र. १ मध्ये जिल्हयातील सहकारी नेतृत्वाच्या जिल्हा परिषद विधानसभातील प्रतिनिधित्वाचा आढावा घेतला आहे. काँग्रेसचे हे वर्चस्व दिर्घकाळ टिकुन राहण्यामागे सामाजिक–आर्थिक व संस्थात्मक घटक महत्वाचे होते. महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस, मराठा समाज, सहकारी संस्था त्रिसुत्री घटक होते. १९५६–५७ पासुनच आपली सत्ता टिकाऊ स्वरूपात विकसीत करण्यासाठी काँग्रेसने दोन प्रमुख संस्थात्मक रचनांचा वापर केल्याचे दिसते. त्यातील एक होती ग्रामीण भागातील पंचायत राज्याच्या चौकटीत विकसीत झालेली स्थानिक सत्ताकेंद्रे तर दुसरे होते सहकारी संस्थाचे सर्वदुर विणलेले जाळे होय. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातुन काँग्रेसने गावागावातील राजकीय कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घडवले व राजकीय प्रक्रियेत त्यांचा समावेष सुकर घडवला. राष्ट्रीय चळवळीच्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील

कार्यकर्ते सुरुवातीपासुनच काँग्रेस पक्षाशी जोडलेले होते. त्याचा फायदा घेत काँग्रेसने स्थानिक सत्ताकेंद्रे स्वत:च्या ताब्यात ठेवली. काँग्रेसच्या राज्य पातळीवरील सत्तेला भक्कम संस्थात्मक आधार निर्माण केला.

स्थानिक स्वराज्य संस्थामधुन काँग्रेसने औपचारीक सत्ता स्वत:कडे राखली तर सहकारी संस्थाच्या माध्यमातुन अनौपचारीक पातळीवरील आर्थिक सत्ताकेंद्रे अस्तित्वात आली. यातुन राजकीय अभिजनांनी सत्तेच्या नानाविध संधी उपल्बध झाल्या. ग्रामीण भागातील आर्थिक साधनसामग्रीचे प्रमुख स्त्रोत पक्षाच्या नियंत्रणासाठी ठेवले. एक सुसंघटीत व्यवस्था ग्रामीण महाराष्ट्राच्या निरनिराळया भागांत उभी केली. प्रदिर्घ काळापर्यंत काँग्रेसचे राजकीय वर्चस्व टिकुन राहण्यामागे या संस्थात्मक रचनांचा वाटा महत्वाचा राहिला.

भारताच्या कोणत्याही राज्यात एकाच जातीसमुहाचे एवढे मोठे संख्याबळ आपल्याला आढळत नाही. एवढे मोठे संख्याबळ असूनही समान जातीभाव निर्माण करणे मराठा नेतृत्वाला शक्य झाले. स्थानिक पातळीवर जातीला सत्तेत सहभागी करुन घेतले गेले. मराठा–कुणबी समाज काँग्रेसचा आधार होता. ग्रामीण विकासावर भर देऊन आणि कृषी–औदयौगिक क्षेत्राला प्रोत्साहन देऊन शेतकी हितसंबंध राहतील याची काळजी राजकीय नेतृत्वाने घेतली. त्यामुळे काँग्रेस व मराठा वर्चस्व टिकुन राहिले. स्थानिक सत्ताकेंद्राचा विकास आणि सहकारी संस्थाच्या मार्फत सत्तेला पुरक अशा प्रभाव क्षेत्रांची निर्मिती हे वरील दोन मार्ग होत.

गावपातळीवर भेट लोकांनी निवडुन दिलेल्या ग्रामपंचायती निर्माण करण्यात आल्या. १९६२ मध्ये जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांची निर्मिती करुन विकेंद्रीकरण केले गेले. यांच्यापासुन जिल्हा–तालुका पातळीवर राजकीय दृष्टया जागृत व क्रियाशील असा कार्यकर्त्यांची मुळ फळी तयार झाली. अहमदनगर जिल्हयामध्ये स्थानिक सत्ताकेंद्रे निर्माण झाल्यामुळे हे समावेशन शक्य झाले. यातील बहुसंख्य ग्रामीण कार्यकर्ते काँग्रेसशी जोडलेले होते. त्यांच्यामार्फत स्थानिक सत्ताकेंद्रे ताब्यात ठेवणे काँग्रेसला शक्य झाले. स्थानिक सत्ताकेंद्रामुळे राज्यपातळीवरील काँग्रेसच्या सत्तेला भक्कम संस्थात्मक आधार तयार झाला. निवडणुकीच्या वेळेला स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांना काँग्रेसच्या राजकारणात सहभागी होण्यास जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीमुळे हातभार लागला. स्थानिक पातळीवरचे राजकीय श्रेष्ठजन काँग्रेसच्या राजकारणाचे वाहक बनले.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा दुसरा संस्थात्मक आधार म्हणजे सहकारी संस्था १९५६–५७ पुर्वीच महाराष्ट्रात सहकारी यंत्रणाचा विकास होऊ लागला होता. सहकारी तत्वावर शेतकऱ्यांनी साखर निर्मिती करण्याचा प्रयोगही सुरु झाला. १९५७ नंतर महाराष्ट्र सरकारने ग्रामीण विकास व शेतकऱ्यांचे हितरक्षण या हेतूनी विविध प्रकारच्या सहकारी संस्थाना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. सहकारी साखर कारखान्याखेरीज विविध क्षेत्रातील सहकारी संस्थाचे जाळे या प्रोत्साहनामुळे अल्पावधीत उभे राहीले. इंधन निर्मितीपासुन पतपुरवठयापर्यंतची अनेक प्रकारची कामे या यंत्रणेद्वारे होऊ लागली. जिल्हा पातळीवर सहकारी बँका अस्तित्वात आल्या. या यंत्रणेमुळे स्थानिक पातळीवर सत्तेची शासनबाहय केंद्रे अस्तित्वात आली. पक्ष कार्यकर्त्यांना सत्तेच्या संधी उपलब्ध करुन देणे काँग्रेसच्या श्रेष्ठजनांना शक्य झाले.

जिल्हा परिषद आणि सहकारी संस्था यांचे एक वैशिष्टय म्हणजे त्या स्थानिक पातळीवर साधनसंपत्तीचे नियंत्रण करणात्या संस्था आहेत. म्हणुनच मंत्री होण्याइतकेच महत्व जि. प. अध्यक्ष होण्याला होते. या दोन्ही संस्थात्मक यंत्रणा काँग्रेसच्या प्रभावाखाली राहिल्यामुळे ग्रामीण भागातील साधन सामग्रीवर काँग्रेसचे नियंत्रण राहिले. त्याद्वारे एकीकडे कर्जपुरवठा व परिसर विकास यांच्यामार्फत अनुग्रहीत असा समाज तयार करण्यात आला. तर दुसरीकडे ग्रामीण भागातील बडे प्रस्थापित राजकीय अभिजनांच्या हितसंबंधाची पाठराखण करण्यात आली.

याच धर्तीवर अहमदनगर जिल्हयातील राजकारणात काँग्रेस सहकारी संस्था व मराठा समाज या त्रिसुत्रीचे वातावरण तयार झालेले दिसते. नगर जिल्हयाचा सामाजिक व राजकीय प्रक्रियांवर मराठा समाजाचा प्रभाव दिसुन येतो. सहकार क्षेत्राची अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणावर अर्थकारणावर समाजकारणावर मोठया प्रमाणावर पकड असल्याचे दिसुन येते. म्हणुनच सहकाराने कायापालट झालेला जिल्हा असे चित्र राज्यामध्ये नगर जिल्हयाचे दिसते. अहमदनगर जिल्हयातील सहकारी नेतृत्व हे स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे विकसीत झालेले दिसते यांचे उत्तम उदाहरण म्हणजे बाळासाहेब विखे, शंकरराव काळे, मधुकरराव पिचड, शिवाजीराव नागडवडे, शिवाजीराव कर्डीले, आप्पासाहेब राजळे, यशवंतराव गडाख, नरेंद्र घुले, बबनराव पाचपुते, बबनराव ढाकणे, दादापाटील शेळके, शालिनीताई विखे, राजश्री घुले असे अनेक राजकीय नेतृत्व हे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदातुन विकसीत झाले आहे. हे सर्व राजकीय नेतृत्व मराठा समाजाची आहेत. त्यामुळे बहुसंख्या जिल्हयातील मराठा समाजावर

वर्चस्व करणे सहज शक्य झाले. काँग्रेस चे जेष्ठ राजकीय, बाळासाहेब विखे यांची राजकीय कारकीर्द १९६२ मध्ये नेतृत्व जिल्हा परिषदेतुन सुरु झाली. सात वेळा खासदार केंद्रात अर्थ राज्यमंत्री व अवजड उदयोग मंत्री अशी पदे बाळासाहेब विखेंनी भुषविली. यावरून सिध्द होते की जिल्हयातील नेतृत्व हे स्थानिक स्वराज्य संस्थामुळे विकसीत झाले आहे.

**३. अहमदनगर जिल्हयातील सहकार नेतृत्वाने महाराष्ट्राच्या मंत्री मंडळाने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे :–**

प्रकरण क्र. १ मध्ये सहकार नेतृत्वाने विधानसभा व लोकसभा कार्याची रूपरेषा मांडलेली आहे. अहमदनगर जिल्हयाच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये या जिल्हयातील राजकीय नेतृत्वांचा फारमोठा वाटा आहे. या जिल्हयाच्या विकासाकरिता जे खंबीर व गतिमान नेतृत्व लाभले यामध्ये प्रामुख्याने धनजंयराव गाडगीळ, पद्मश्री विठ्ठलराव विखे, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, बाळासाहेब विखे, भाऊसाहेब थोरात यांचा उल्लेख करावा लागेल यांनी सहकारी चळवळीच्या माध्यमातून अहमदनगर जिल्हयातील ग्रामीण भागाचा कायापालट घडवून आणला या सहकार नेतृत्वाने सहकारी कारखाना, सहकारी बँक, सहकारी पतपुरवठा, सहकारी दुध संघाची स्थापना करून जिल्हयात सहकारी संस्था विकसित केल्या आहेत. म्हणजेच सहकार सामाजिक, शैक्षणिक विकासाबरोबर राजकीय क्षेत्रामध्ये महाराष्ट्रात मंत्री मंडळात उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

**१. बाळासाहेब थोरात–** सहकार क्षेत्रात प्रचंड दबदबा असलेले व्यक्तिमत्व म्हणून भाऊसाहेब थोरात यांचा नगर जिल्हयातच नव्हे तर संपुर्ण राज्यात मोठा दरारा होता. भाऊसाहेब थोरात केवळ एकदाच आमदार झाले. परंतु सहकार क्षेत्रात त्यांनी अजोड कार्य केलेले दिसते. भाऊसाहेब थोरात यांचे पुत्र बाळासाहेब थोरात १९८५ मध्ये विधानसभा मतदार संधातून अपक्ष म्हणून निवडून आले.त्यांनतर सलग सहा वेळा या मतदार संघातून आमदार कायम राहिले. बाळासाहेब थोरात यांनी आपल्या अधिपत्याखालील संगमनेर सहकारी साखर कारखान्याने साखर उतारा व इतर बाबींची देशपातळीवर पारितोषिक मिळवली आहेत. दुग्ध व्यवसायात सहकाराच्या माध्यमातून आघाडीवर आहेत. बाळासाहेब थोरात यांनी सहकारातील अमृतवाहिनी सहकारी दुग्ध उत्पादक संस्था, शासकीय दुग्धशाळा संगमनेर, संगमनेर तालुका सहकारी सुत गिरणी मथुराबाई भाऊसाहेब

थोरात, दोन महाविद्यालय या संस्थाची स्थापना केली. बाळासाहेब थोरातांनी अध्यक्ष–राज्य विडी कामगार वेतन समिती, अध्यक्ष संगमनेर सहकारी साखर कारखाना, अध्यक्ष संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन, संचालक–नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को–ऑपरेटिव्ह लि, संचालक–ऑल इंडिया डिस्टिलरी असोसिशन, सरचिटणीर्स प्रदेश कॉग्रेस इत्यादी पदे भुषविलेली आहेत. सहकार माध्यमातून संगमनेर तालुक्याला बाळासाहेब थोरात व बी. जे. खताळ यांच्या रूपाने मंत्री दिलेले आहेत.

**२. मधुकरराव पिचड –** अकोले तालुक्याच्या राजकारणात मधुकरराव पिचड यांनी १९७२ मध्ये जिल्हा परिषद सदस्य पदापासुन सुरूवात केली १९७७ मध्ये काँग्रेस पक्षातून पंचायत समितीचे सभापती बनले. १९८० पासून मधुकर पिचड सलग सात निवडणूकामध्ये विजयी झाले आहेत. मधुकरराव पिचड कॅबिनेट मंत्री असताना वेगवेगळी खाती संभाळली. १९६२ मध्ये सहकारी दुग्धसंस्थेची स्थापना केली. १९९३ मध्ये अगस्ती सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. आदिवासी उन्नती सेवा मंडळाची स्थापना केली. अनुसुचित जमाती कल्याण समितीचे प्रमुख म्हणून काम पाहिले. अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जिल्हा सहकारी बँक व आदिवासी विकास महामंडळावर आजीवन संचालक आहेत. विधानसभेचे माजी सभापती आहेत. असा प्रकारे मधुकरराव पिचड आदिवासी भागात सहकाराच्या माध्यमातून विकास करतांना दिसतात.

**३. शंकरराव कोल्हे–** १९५० मध्ये येसगावच्या सरपंच पदापासून शंकरराव कोल्हे यांची राजकीय कार्यकिर्द सुरू झाली. जिल्हयात कम्युनिस्टांचा प्रभाव असतांना शंकरराव कोल्हे यांनी काँग्रेसच्या माध्यमातून खंडकरी चळवळ उभारली. हे आंदोलन यशस्वी होऊन खंडकऱ्यांना प्रत्येकी साडेचार एकर जमीन परत मिळावी. या आंदोलनाच्या माध्यमातून शंकरराव कोल्हे यांच्या राजकीय, सामाजिक जडणघडणीला सुरूवात झाली. १९६३ मध्ये संजीवनी सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. गोदावरी खोरे, सहकारी दुग्ध उत्पादक संघ, नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को–ऑप. लि., संजीवनी एज्युकेशन सोसायटी, संजीवनी सहकारी पतसंस्था, यशवंत कुक्कुटपालन, सहकारी संस्था, देवयानी सहकारी बँक, संजीवनी ॲग्रो को–ऑप मार्केटिंग सोसायटीची अशा सहकारी संस्थाची स्थापना केली.

**४. शंकरराव काळे –** शंकरराव काळे यांचे कार्यक्षेत्र कोपरगाव तालुका आहे परंतु जिल्हा परिषद व जिल्हा काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी जिल्हाभर आपल्या कार्याचा ठसा उमटवला. शंकरराव काळे जिल्हा सहकारी बँकेच्या स्थापनेत सक्रीय होते. शेतकरी शोषणमुक्त करण्यासाठी बँकेशिवाय पर्याय नाही या विचाराने त्यांनी गौतम बँकेची स्थापना केली. कोपरगाव सहकारी साखर कारखाना गौतमनगर एज्युकेशन सोसायटी, गोदावरी खोरे व गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपनी लि. शंकरराव काळे सहकारी पतसंस्था, कोपरगाव तालुका सहकारी कापूस जिनिंग अॅन्ड प्रेसिंग सोसायटी, नांदगाव देशमुख विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था या सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. तसेच रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन, वसंतदादा शुगर इन्स्टिटस्टुटचे संचालक, जिल्हा क्रिकेट असेसिशनचे अध्यक्ष, ऑल इंडिया डिस्टीलर्स असोसिशनचे अध्यक्ष, नॅशनल को–ऑपरेटिव्ह डेव्हलमेंट कॉपोरेशनचे संचालक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिशनचे अध्यक्ष व संचालक व महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे संचालक होते. शंकरराव काळे यांनी सहकार, सामाजिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास साधला आहे. काळे यांची तिसरी पिढी राजकारणात सक्रीय आहे.

**५. बबनराव ढाकणे–** देशदिन व सामान्यांच्या प्रश्नांसाठी ३२ वेळा तुरूंगवास बबनराव ढाकणे यांनी भोगला आहे. सत्याग्रहाच्या माध्यमातून १९६७ मध्ये जिल्हा परिषद निवडणुकीत विजयी झाले. १९७२ ते १९७५ या काळात पाथर्डी पंचायत समितीचे सभापती होते. पाथर्डी तालुका हा दुष्काळ ग्रस्त आहे. ऊसतोडणी हा तेथील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. यांचे संघटन करून महाराष्ट्र राज्य उसतोडणी कामगार व मुकादम संघटना स्थापन केली १९८९ मध्ये केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली.

१९८९ मध्ये बीड जिल्हयातून लोकसभा निवडणूक लढविली पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय वीज राज्यमंत्री पद मिळाले. १९९० मध्ये लोकसभा सदस्य अनुपस्थिती समितीचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र विधानसभेचे माजी उपाध्यक्ष, विधानसभेचे माजी विरोधिपक्ष नेते अशी विविध पदे भुषविली. एकलव्य शिक्षणसंस्थेची स्थापना बबनराव ढाकणे यांनी केली.

**६. राधाकृष्ण विखे–** राधाकृष्ण विखे हे विखे घराण्यांचे तिसरे वारसदार आहेत. पाच वेळा आमदार झालेले राधाकृष्ण विखे यांनी अॅग्रो पॉलिक्टेनिकल व अॅग्रो अॅडव्हान्टेज असे उपक्रम

राबविले. जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ६ टक्के दराने कर्जपुरवठा करण्याचा हा राज्यातील नव्हे तर देशात सर्वप्रथम ऐतिहासिक निर्णय राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षपदाच्या काळात घेतला.

**७. गोंविदराव आदिक–** श्रीरामपूर तालुक्यातील आदिक बंधूनी महाराष्ट्राच्या राजकारणावर वेगळा ठसा उमटवला आहे. रामराव आदिक व गोंविदराव आदिक या बंधुचे राज्याच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे. रामराव आदिक यांनी पाटबंधारे, समाजकल्याण, आदिवासी कल्याण, विधी व न्याय खात्यांचे मंत्रीपद भुषविले राज्य मंत्रीमडळात अर्थमंत्री म्हणून काम केले. १९८३ ते १९८५ या काळात उपमुख्यमंत्री म्हणून काम केले रामराम आदिक यांचे बंधु गोंविदराव आदिक यांनी शेतकरी व ग्रामीण विकासाच्या प्रश्नावर आवाज उठवला आहे. १९७२ मध्ये ते प्रथम विधानसभेवर निवडून आले. १९७८ च्या निवडणूकीत विजयी झाले व पुलोद मंत्रीमंडळात त्यांना कॅबीनेट मंत्रीपद मिळाले. तसेच पाटबंधारे, विधी, जनसंपर्क खाते ही सांभाळली. १९८० मध्ये तिसत्यांदा विधानसभेवर निवडून आले. १९९०–९२ मध्ये एस. टी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९९३–२००० पर्यंत राज्यसभेवर निवड झाली. २००३ ते २००५ या काळात राज्यमंत्रीमंडळात कृषी विधी व न्याय खात्यांचे मंत्रीपद भुषविले. २००६ व २००९ मध्ये राज्यसभेवर निवडून गेले. गोंविदराव आदिक यांनी शेती, पाटबंधारे, कामगार, कायदा, शिक्षण व ग्रामीण भागांचे प्रश्न सामाजिक व राजकीय योगदानावर पार पाडले २००९ विधानसभा मतदार संघाच्या पुर्नरचनेनंतर श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघ हा राखीव झाला आहे. त्यामुळे विधानसभेवर निवडून येण्याचा मार्ग बंद झाला.

गोंविदराव आदिक यांनी अशोक सहकारी साखर कारखाना व विनायक सहकारी साखर कारखाना यांचे चेअरमन पदावर कार्य केले. मुळा प्रवरा वीज सहकारी संस्थेवर अध्यक्ष होते. श्रीरामपूर एज्यूकेशन सोसायटी, ग्रामीण विकास प्रतिष्ठान, अहमदनगर जिल्हा विदयार्थी मित्रमंडळ (पुणे) काँग्रेस भवन प्रतिष्ठान व महाराष्ट्र उदयोग व शिक्षण या संस्थांची स्थापना केली. सहकार योगदाना बरोबर कामगार ऊसतोडणी मजदुर या वर्गाचे प्रतिनिधित्व आदिक यांनी केले. महाराष्ट्र इंटक कामगार संघटना, राष्ट्रीय मीठ मजदूर संघ, राज्य राष्ट्रीय साखर कामगार फेडरेशन राज्य

विदयुत मंडळ कर्मचारी महासंघ व राज्य राष्ट्रीय ऊस तोडणी व वाहतूक कामगार संघ या संस्थाचे अध्यक्ष स्थान भुषविले व कार्य केले.

**८. शिवाजीराव कर्डिले–** शिवाजीराव कर्डिले १९८४ पासून बुत्हाणनगर (ता. नगर) येथील सरपंच होते. सलग तीन वेळा संरपंच म्हणून बिनविरोध निवडून आले. २००३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोटयातून राज्यमंत्रीपद व मत्स्य व बंदरे, महिला व बालकल्याण जलसंधारण वने आदि व खात्यांचा कारभार सांभाळला. तसेच बाणेश्वर शिक्षण संस्था बाणेश्वर सेवा सहकारी संस्था व बाणेश्वर सहकारी दुध उत्पादक या संस्थाची स्थापना केली. खेमानंद दुध सहकारी संघ, महाराष्ट्र रोहयो समिती, जिल्हा दक्षता समिती यांची सदस्यत्व केले. संजय गांधी निराधार योजनेचे ते अध्यक्ष होते.

**९. बबनराव पाचपूते–** १९८० ते २००७ या २७ वर्षात राज्याच्या राजकारणात सामाजिक व राजकीय कार्य केले आहे. १९७८ मध्ये काष्टी गणातुन पंचायत समितीचे सदस्य झाले. बबनराव पाचपुते सहा वेळा आमदार होते.आठ निवडणुकीत सात चिन्हांचा विक्रम करत सर्वात तरूण आमदार म्हणुन नोंद झालेली आहे. बबनराव पाचपुते यांनी श्रीगोंदा तालुका ग्रामिण शिक्षण संस्था, श्रीगोंदा तालुका विकास आघाडी, साईकृपा साखर कारखाना, कृष्णाई डेअरी व साईकृपा उद्योग समुहाची स्थापना केली.

श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष म्हणुन त्यांनी कार्य केले. जनता पक्ष युवा आघाडीचे ते प्रदेश उपाध्यक्ष होते. जनता दलाचे प्रदेशाध्यक्ष देखील होते. नामदार बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट चे संस्थापक म्हणुन कार्य केले. खाजगी साखर कारखाना महासंघ, महाराष्ट्र बॉडी बिल्डर असोसिशन, महाराष्ट्र बेसबॉल असोसिशनचे ते अध्यक्ष होते. बबनराव पाचपुते यांची राजकीय कारकीर्द पाहिली तर सहकार क्षेत्र वगळता अन्य निवडणुकात पाचपुतेंनी सातत्यपुर्ण यश मिळविले आहे. राज्य पातळीवरील नेता अशी ओळख निर्माण करणाऱ्या बबनराव पाचपुतेंना मात्र नगर जिल्हयात काही बस्तान बसवता आले नाही. नगर जिल्हयात राजकारणत असणारी नातेसंबंधाची गुंफण पाचपुतेंना विणता आली नाही. राज्याचा नेता जिल्हयात निस्तेज ठरला. सहकार चळवळीवर सदैव ओरखडे ओढणारा नेता खाजगी साखर कारखान्यांचा महर्षी ठरला आहे.

**४. लोकशाही नेतृत्वाला आवश्यक असलेले गुण या सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य नेत्यांच्या वारसदारामध्ये आढळतात.**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. स्वातंत्र्यानंतर लोकशाही बरोबर सहकारी चळवळ देखील भारतात वेगाने वृध्दीगंत होत गेली. भारत हा खेडयांनी बनलेला आहे. जवळपास ६५ ते ७० टक्के जनता खेडयात राहते. ही जनता शेतीवर अवलंबून आहे. शेतीवर अवलंबुन असणारी मोजकी लोकसंख्या सोडली तर प्रचंड लोकसंख्या आर्थिकदृष्टया दुर्बल व मध्यमवर्गीय उत्पन्न गटातील आहे. देशातील या जनतेचा सर्वागीण विकास घडवून आणण्याकरीता सहकार हे महत्वपुर्ण साधन आहे. यामुळे सभासदांना अनेक बाबींचे स्वांतत्रय असते. भारतीय अर्थव्यवस्था ही लोकशाही अर्थव्यवस्था असल्यामुळे नकळत लोकशाहीचा प्रसार सहकाराच्या माध्यमातुन होत असतो. लोकशाहीची मुल्ये व सहकाराची तत्वे मिळती जुळती असल्यामुळे लोकशाही आणि सहकार या नाण्याच्या दोन अशा बाजु आहेत ज्यापैकी कोणतीही बाजु एकाच प्रकारच्या मुल्यांचा पुरस्कार करते.

सहकार चळवळ ही मुल्याधारीत व्यवस्था आहे. सहकाराची उभारणी ही उदात्त, सेवातत्वे, समान नफा विभागणी, लोकशाही समता व्यवस्थापन स्वतःच्या जबाबदारीची जाणीव यासारख्या सामाजिक मुल्यांवर तसेच सचोटी, नियमांचे पालन करण्यांची वृत्ती, विचारातील व वर्तनातील खुलेपणा दुसत्याच्या मतांचा आदर करणे या सारख्या नैतिक व्यक्तिगत मुल्यांवर आधारलेली आहे ही मुल्ये शाश्वत समाजाच्या धारणेला तसेच विकासाला पोशक असल्यामुळे सहकारी चळवळीचे लोकांना आणि एकुणच समाजावर हितकारक परिणाम होत असतात. सहकाराच्या तत्वांच्या माध्यमातुन ही मुल्ये कार्यान्वीत केली जातात.

सहकारी संस्था लोकशाही दृष्टीकोनातुन काम करतात. सभासदांनी मान्य केलेल्या पध्दतीने व निवडुन दिलेल्या संचालकांनी लोकशाही तत्वाने कारभार पाहावा हे सहकारात स्वीकृत करण्यात आले आहे. सहकारी संस्थेतील सभासदांचे भांडवल कितीही असले तरी प्रत्येकास 'एकच मत' देण्याचा अधिकार असतो. तेव्हा संपुर्ण निवडणुक प्रक्रिया लोकशाही मार्गाने होत असते. एका दृष्टीने सहकारी संस्थेतील सर्वच सभासदांना निर्णय प्रक्रियेत व व्यवस्थापन प्रक्रियेत समाविष्ट होण्याची समान संधी उपलब्ध असते. लोकशाहीतील समान हक्क सर्वच सभासदांना

उपभोगता येते. सहकारी संस्थेतील सर्व सभासदांना समान वागणुक दिली जाते. यामुळेच सहकारी संस्थाना लोकशाहीची प्रयोगशाळा असे म्हटले जाते.

सभासदांची, सभासदांसाठी सभासदांनी चालविलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.सहकारी संस्थेची ध्येय धोरण ठरविण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला असतो. सर्वसाधारण सभेत प्रत्येक सभासदाला सहभागी होऊन आपले मत व विचार व्यक्त करता येऊ शकतात. प्रत्येक सभासदाला संस्थेचे हिशेब, पुस्तके व नोंदवहया पाहण्याचा अधिकार असतो. प्रत्येक सभासदाला संस्थेच्या कार्याची माहिती किंवा अहवाल देण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय समितीवर असते. या सर्व बाबी लोकशाहीच्या निर्दशक आहेत. तेव्हा सहकाराची इमारतच लोकशाहीच्या मजबुत पायावर उभारलेली आहे. म्हणुनच सहकारी संस्थाची नियंत्रण प्रक्रिया ही एकाधिकारशाही प्रणित असुन लोकशाही प्रधान म्हणता येईल. सहकारी संस्थेत अंतिम सत्ता व सर्वोच्च अधिकार हे कोणत्याही व्यक्तीला नसुन भागधारकांच्या हाती म्हणजेच सर्वसाधारण सभेला असतात. लोकशाही मध्ये नागरिक हा सर्वश्रेष्ठ मानला जातो त्याप्रमाणे सहकारी संस्थेत सभासद हा सर्वश्रेष्ठ मानला जातो. लोकशाही प्रमाणे सभासदांचे हित व कल्याण यालाच महत्व देण्यात येते. तेव्हा लोकशाही पध्दती हे सहकाराचे अत्यंत महत्वाचे मानले जाते. हे वरील माहितीवरून लक्षात येते.

समता, स्वातंत्रय, बंधुता, एकता हे लोकशाहीचे आधारस्तंभ सहकारात तत्व म्हणुन स्वीकार केला आहे. सभासदांमध्ये बहुभाव वृद्धिंगत होऊन त्यांनी समतेच्या पातळीवर कार्य करावे असे अपेक्षीत असते. सभासदाच्या विकासाकरिता व संस्थेच्या प्रगतीकरिता या तत्वाचा अवलंब सहकारी नेतृत्वाने केला आहे हे तत्व सहकारी संस्था मध्ये रूजावे म्हणून वरील सर्व जीवनमुल्यांची रूजवन सहकारी नेतृत्वाचे कार्य स्पष्ट दिसते.

यशवंतराव चव्हाण एका भाषणात सहकाराबद्दल विचार मांडतात ते म्हणाले सहकाराबाबत सहकारी नेतृत्वाकडुन मोठया जबाबदारीच्या कार्याची अपेक्षा आहे. सहकार ही प्रशासनाची चळवळ नसुन जनतेची चळचळ आहे. सहकारी अर्थव्यवस्थेच्या संकल्पना सहकारी नेतृत्वाने प्रत्यक्ष कृतीत आणायच्या आहेत. सरकारच्या विकास योजना कार्यवाहीत आणण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणा इतकेच सहकाराला महत्व आहे. सहकाराचा उपयोग करून आपणास विकासाचे फायदे खालच्या थरापर्यंत पोहचवावे लागतील. आपण सर्व समाजासाठी आहोत, आपली

दिशाभूल होऊ नये म्हणुन हा विचार सुरूवातीपासून करायला पाहिजे यातच सहकारी नेतृत्वाचे कौशल्य आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची स्थिती मोठी बिकट होती. एक तर उत्तरप्रदेश, बिहारप्रमाणे मोठया नदयांचा आधार नाही. निसर्गाची अनियमितता, जमिन सुधारणेसाठी अपरिमित परिश्रम घ्यावे लागणारे पर्याय नाहीत अशी सर्व प्रतिकुल परिस्थिती होती. पश्चिम महराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या गरजा नव्या आकांक्षा वा इच्छा हे सर्व लक्षात घेऊन व सखोल विचार करूनच अत्यंत व्यवहार्य ठरेल. शेतकऱ्यांनी एकत्रितपणे व परस्पर सहकार्याने प्रयत्न केल्याशिवाय परिणामकारक जमिन सुधारणा होणे शक्य नाही. आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानात स्थित्यंतर घडून येणेही शक्य नाही. ही परिस्थिती असतानांच सहकाराची कल्पना प्रत्यक्षात आणली गेली. सावकाराच्या पाषातून शेतकऱ्यांला मुक्त करण्यासाठी विठ्ठलराव विखेंनी सरल क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी सुरू केली. सहकारी तत्वावर अनेक उपक्रम हाती घेतले. कृशी क्षेत्रात असे सामाजिक–आर्थिक प्रयोग साध्य करण्यासाठी विठ्ठलराव विखे, वैकुंठराव मेहता व धनजयंराव गाडगीळ यांची उदयशीलता चळवळीसाठी मोठी महत्वाची ठरली. यातील पहिला भाग म्हणजे सहकारी तत्वावर शेतकऱ्यांना संघटीत करणे दुसरा भांडवल उभा करणे व तिसरा भाग म्हणजे सहकारी साखर कारखान्यांची स्थापना करणे. लोकशाही तत्वाचा वापर, बौध्दिक, संघटनात्मक आणि राजकीय अशा विविध स्तरावर विठ्ठलराव विखे यांनी प्रयत्न केले. सर्व मान्यवरांना समान न्यायाची वागणूक मिळायला हवी. या आग्रहातून सहकार चळवळ फोफावत गेलेली दिसते.

विठ्ठलराव विखेची चिकाटी, सचोटी, संघटनकौशल्य, प्रामाणिकपणा, विश्वास, दूरदृष्टी, साहस, पुढाकार वृत्ती, सहाकर्य व तडजोड व न्याय समानता हे मुल्य अंगी असल्यामुळे सहकार हाच आपला धर्म मानला. महाराष्ट्रातील व देशातील ग्रामीण समाज–सेवा तरूणांना विखे पाटलांना व धनंजयराव गाडगीळांनी लोकनिष्ठ कर्तबगारीसाठी सहकारी क्षेत्राचा नवा मार्ग दाखवला लोकशाही नेतृत्वामुळे सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीची लाट महाराष्ट्रात उसळली.

विठ्ठलराव विखे या लोकशाही नेतृत्वाचे गुण त्यांच्या वारसदारामध्ये दिसतात बाळासाहेब विखे यांचे सहकार क्षेत्रात मोलाचे कार्य दिसणे. सात वेळा खासदार, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री व अवजड उदयोग मंत्री अशी पदे भुषविताना बाळासाहेब विखे यांनी गावपातळीवरील जनसंपर्क, संघटन कौशल्य, स्थानिक प्रश्नांचा सखोल अभ्यास, सर्वांना सहभाग करून घेणे या लोकशाही

मुल्यांची रूजवणुक केली, शेती, सहकार, कामगार, साखर, उदयोग अशा विविध विषयावर देश व जागतिक पातळीवर कार्य केले. काँग्रेस पक्षांतर्गत लोकशाही संकल्पना प्रभावीरित्या राबवली जावी या हेतूने देशातील ४५ खासदांराचा समावेश असलेले काँग्रेस फोरम फॉर ॲक्शनाची स्थापना केली. प्रकरण क्र ३ मध्ये याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे.

शिस्तप्रियता, कुशल संघटक, समर्थ प्रशासक, गुणग्राहकता व लोकसग्रंह करण्याची हातोटी गुणांमुळे कार्यकर्त्याचे फार मोठे जाळे राधाकृष्ण विखेंनी निर्माण केले शेतीमध्ये नवीन प्रयोग करणात्यांचा उत्साह वाढवावा, नोकरीच्या संधी, व्यवसाय करण्याचा तरूणांना मार्गदर्शन, सहकार्य तसेच राजकारणात येण्यास आजचे तरूण अनुकुल नाहीत मात्र लोकशाही राष्ट्रात नव्या पिढीला या क्षेत्रात येण्यासाठी विखे घराण्यांची चौथी वारसदार सुजय विखेंनी अनुकुल परिस्थिती बनवून तरूणांना जबाबदारी दिली आहे. तरूणांचे संघटन करून त्यांना दिशा दाखवली आहे. जलक्रांती अभियान धार्मिक कार्यक्रम, सर्वधर्मसमभाव सांस्कृतिक कार्यक्रम तसेच शेतकरी कुटुंबासाठी शिक्षण, आरोग्य, नोकरी आणि चरितार्थ चालवण्यासाठी तातडीने हाताला काम, पिठाची गिरणी शिलाई मशिन यातून सामाजिक बांधिलकी बरोबरच नैतिक जबाबदारी घेत कार्य करत आहेत. डॉ. सुजय विखे याची ही योजना पथदर्शी असुन कुटुंब दत्तक योजना देशातील पहिलीच योजना ठरली आहे. अनेक सामाजिक संघटना आणि संस्थानी पुढाकार घेऊन याचे अनुकरण करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यातून लोकशाही नेतृत्वाचे गुण दिसुन येतात.

१९४२ च्या स्वांतत्रयलढया वेळी महात्मा गांधीजींचे विचार संपूर्ण समाज परिवर्तनाचे होते म्हणून स्वांतत्रयाचा लढा हा केवळ विशिष्ट वर्गाचा न राहता तो सर्व समाज्याचा लढा बनला होता. भारतातील सर्व जाती–धर्मातील लोक त्यावेळी एक होऊन जुलमी इंग्रजी राजवटी विरूद्ध लढा दिला त्यामध्ये संगमनेर तालुक्यातील भाऊसाहेब थोरात यांनी स्वांतत्रयासाठी लढा दिला. सहकाराच्या माध्यमातुन थोरातांनी दंडकारण्य अभियान राबवुन ग्लोबल वॉर्मिंगला आळा घालण्यासाठी जागतिक तापमान समतोल राखण्याचा आपल्या कृतीतून आदर्श संदेश दिला आहे. भाऊसाहेब थोरातच्या या अभियानाची दखल युनो ने घेतली आहे. भाऊसाहेब थोरातांचा सहकाराचा वारसा बाळासाहेब थोरात चालवित आहेत. लोकशाही मुल्यांची जोपासना बाळासाहेब थोरात यांनी आपल्या सहकारी साखर कारखान्यांच्या सभासदांना आपल्या निर्णयात सर्वांना सहभागी करून घेत आहेत. व्यवस्थापनामध्ये कर्मचारी वर्गाचे प्रतिनिधिंना सहभागी करून घेतले

जाते. त्यामुळे निर्णयावर एक प्रकारे सामाजिक नियंत्रण ठेवले जातात. त्यामुळे आशिया खंडातील आदर्श आणि उत्कृष्ट साखर कारखाना म्हणुन साखर कारखान्याचे नाव घेतले जाते. २८ पेक्षा जास्त पारितोषिके मिळालेली आहेत. संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्यामध्ये मद्यनिर्मिती न करणारे भाऊसाहेब थोरात राज्यातील नव्हे तर देशातील एकमात्र लोकशाही नेतृत्व ठरले आहे. यातुन थोरातांनी खरे सामाजिक हित राखले आहे.

सहकार चळवळी ही खरी निधर्मी चळवळ आहे. ती कुठल्या जातीची किंवा धर्माची नाही.आतापर्यंत सगळया समाजाला, जातीनाही प्रतिनिधित्व दिले आहे. सहकार ही प्रगत माणसाची समतेच्या आधारावरील वैचारिक चळवळ आहे. सहकार चळवळीचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक दर्जा खऱ्या अर्थाने उच्च प्रतिचा आहे. ती माणसाच्या माणुसकीच्या उन्नतीची, एकात्म जीवनाच्या सर्वागिण विकासाची पध्दती आहे. एकात्म विकासाचे सहकार हे एक साधन आहे. नवीन समाज घडवण्याचे तरूण पिढीचे काम ही चळवळ करते.

अहमदनगर जिल्हयातील सहकारी नेतृत्वाच्या वारसदारामध्ये लोकशाही नेतृत्वाचे गुण दिसतात हे सिध्द होते. आपआपल्या परिसरामध्ये तालुक्यामध्ये सहकारी साखर कारखाना, सहकारी दुग्ध संघचालवितांना सभासदाचा, जनतेच्या कल्याणाचा विचार प्रथम दिसतो. समाजहित, संघटन, एकोपा ठेवला नाही तर जिल्हयातील असे ही उदाहरणे आहेत की सहकारी साखर कारखान्यांना टाळे लावावी लागली. सहकारी संस्थामध्ये सभासदाचे हिताऐवजी राजकारण आणले तर जनता नेतृत्वाला शह देते. विशुध्द सहकाराचा उद्‌देशच समाजाचे भले करणे आहे. पण काही स्वार्थी राजकीय नेत्यांना मात्र ते पाहवत नाही व त्यांना सहकाराची भिती वाटते. एकाधिकारशाहीतून खाजगी कारखानदारीत प्रोत्साहन देण्याचे धोरण राबविले जात आहे. त्यामुळे स्वार्थी सहाकारी नेतृत्वाला आव्हान निर्माण होऊ नये ही भीती वाटत आहे.

**५. अहमदनगर जिल्ह्याचा राजकीय सामाजिक व आर्थिक विकास झालेला दिसून येतो.**

राज्यात सन १९७२ मध्ये पडलेला दुष्काळात अहमदनगर जिल्ह्यात सुमारे अडीच लाख रोजगार हमी योजनेच्या कामावर जात होते. त्यानंतर लोकसंख्येत वाढ होऊनही आजतागायत पडलेल्या दुष्काळामध्ये पूर्ण जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेवर कामासाठी जाण्याची संख्या २५ हजारांपेक्षा पुढे गेली नाही. याचे कारण शोधले असता, जिल्हा सहकारी बँक ग्रामीण भागात सहकारी कारखाना व दुग्धव्यवसाय वाढविण्यासाठी केलेल्या कार्याला जातो. जिल्ह्यामध्ये सुमारे ८० टक्के

शेतजमीन जिरायत असल्यामुळे लोकांना पुरेसा रोजगार मिळत नाही. साखर उद्योग व दुग्ध व्यवसायामुळे ग्रामीण भागात रोजगार वाढविण्यासाठी मोठा हातभार लागला. जिल्ह्यातील १८ कारखान्यापैंकी सुमारे ४० हजार जनतेला थेट रोजगार मिळाला आहे. ऊसतोडी, वाहतूक करणारे अशा सुमारे एक लाख लोकांना रोजगार मिळतो. याशिवाय साखर उद्योगांवर अवलंबून असणारा मोठ्या उद्योगातील सुमारे ३० ते ३५ हजार मजुरांना रोजगार मिळाला. साखर उद्योग हा जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात रोजगार मिळविणारा जिल्हा ठरला आहे. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी जिल्ह्यासाठी आलेले सुमारे १०० कोटी रूपये मंजूर झाले असताना येथे मंजूर मिळत नाहीत. शेती कामासाठी ही मजूर मिळत नाही. ग्रामीण भागातील मजुरांना पुरेसा प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. आता जिल्ह्यातील दुग्ध सोसायट्या, दुग्ध सहकारी केंद्र यांच्या मार्फत सुमारे २५ लाख लिटर दुध संकलन होते. जिल्ह्यामध्ये साखर उद्योगाच्या माध्यमातून १२०० कोटी रूपयांची उलाढाल होते.

विदर्भ मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न घटल्याने तेथील शेतकऱ्यांचे आत्महत्या सत्र सुरू आहे. नगर जिल्ह्यात कारखानदारी त्यावर आधारित उद्योग तसेच जिल्हा बँकेने ग्रामीण भागात केलेल्या आर्थिक विकासांमुळे सुदैवाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर तशी वेळ आली नाही. अल्पभूधारक शेतकरी दुध व्यवसायाकडे वळला त्या शेतकऱ्यांना बँकेने योग्य वेळी कर्ज वाटत केल्याने त्याला उत्पन्नाचे साधन मिळाले. परिणामी दुष्काळातही तो तग धरून राहिला. जिल्ह्यात सहकारी दुध संस्थांद्वारे सुमारे २५ लाख लिटर दुधाची रोज विक्री होते.

दहा वर्षात सहकारी साखर कारखान्यांनी फार मोठ्या प्रमाणात उत्पादनाचे आणि कामाचे विविधीकरण केले आहे. साखर उत्पादनबरोबरच कृषी–औद्योगिक प्रकल्प, मद्य–मद्यार्क–रसायने, आम्ले–अॅसेटिक, अन–हायड्राईड, पोटॅश, अॅसेटोन, ऑक्सलिक अॅसिड, कागद यांची निर्मिती, उपसा जलसिंचन योजना, रस्ते व घरबांधणी, भुमिहिनांना घरे, इस्पितळे, आरोग्य शिबिरे, शाळा–महाविद्यालये, तंत्रनिकेतन चालविणे, गोबरगॅस यंत्र उभारणे, फळबागा लावणे, नागरी सहकारी संस्था चालविणे, दुग्धव्यवसाय, पशुखाद्य, कोंबडीचे खाद्य तयार करणे, कुक्कुटपालन, वराहपालन, पशुपैदास, सोयबिन लागवड, वस्तू भांडार चालविणे अशा अनेक मार्गांनी हे विविधीकरण दिसून येते. साखर कारखान्याच्या कागद व्यवसायाने हळूहळू मुळ धरले आहे. तंत्र, विद्यानिकेतन, वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, कला अॅकडॅमी चालविणे तसेच

बहुतेक सर्व कारखान्यांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू करणे या गोष्टी लक्षणीय आहेत. वसंतदादा साखर संशोधन संस्था व नॅशनल हेवी इंजि.को–ऑप. यांचा पुरस्कार महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाने केला आहे.

## ३. निष्कर्ष :–

### अहमदनगर जिल्हयातील राजकारण व्यक्तीकेंद्रीत दिसते :–

स्वांतत्रयानंतर पंडित नेहरू इंदिरा गांधी व राजीव गांधी यांचे नेतृत्व काँग्रेस पक्षाला मिळाले. या नेत्यांचा प्रभाव जिल्हयातील विठ्ठलराव विखे भाऊसाहेब थोरात या नेतृत्वावर होता. १९६० ते ८० या काळात यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव जिल्हयावर निर्माण झाला. सहकारी साखर कारखाने व बँका यांची भरभराट झाली. सहकारामुळे शेती विकासाच्या शक्यता वाढल्या पंचायतराजमुळे सत्ता विकेंद्रीकरण झाले. त्यामुळे जिल्हयातील लोकांचा राजकीय सहभाग पण वाढलेला दिसतो. १९७० ते १९९० या काळात २० वर्षाच्या निवडणुक काळात साखर कारखान्याकडून संपत्ती व साधनांचा पुरवठा होऊ लागला. यामुळेच बाळासाहेब विखे शंकरराव काळे शंकरराव कोल्हे मारूतराव घुले भाऊसाहेब थोरात यशवंतराव गडाख यांचे आपआपल्या कार्यक्षेत्रावर वर्चस्व वाढलेले दिसते. १९९५ मध्ये राष्टॅवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यानंतर शरद पवार यांचा प्रभाव जिल्हयाच्या राजकारणावर दिसतो. जिल्हयाच्या स्थानिक राजकारणात विखे गट गडाख गट व थोरात गटाभोवती राजकारण फिरताना दिसते. पंचायत समिती व जिल्हा परिषदामध्ये या गटाचा प्रभाव दिसतो. जिल्हयाच्या राजकारणात विखे समर्थक पवार गट अशी ही लढाई होत राहिली आहे. अहमदनगर जिल्हयाचे राजकारण गटबाजीचे राजकारण समजते. जिल्हयामध्ये सर्वत्र शाखा असलेल्या सहकारी बँकेच्या २००२ मधील निवडणूकीमध्ये जिल्हा परिषदेप्रमाणे विखे आणि गडाख या सहकारातील घराण्यांनी एकत्र येऊन बँकेचे पद वाटप केले. त्यांना झालेला विरोध दुबळा ठरला. अध्यक्षपदी यशवंतराव गडाख तर उपाध्यक्षपदी राधाकृष्ण विखे यांनी कार्यभार सांभाळला जिल्हयामधील बहुतांश पंचायत समित्या आणि साखर कारखाने काँग्रेसकडे असल्याने यशवंतराव गडाखांनी पुढाकार घेऊन जिल्हा परिषदेतील पद वाटप केलेले दिसते.

जिल्हयाच्या प्रत्येक तालुक्यात कार्यक्षेत्रात नेतृत्वाने सहकारी संस्थातून विकास साधला आहे.जिल्हयात अहमदनगर नगरपालिका एकूण नऊ नगरपालिका आहेत. या नगपालिकांच्या राजकारणातही या घराण्याचा प्रभाव दिसतो. २००७ च्या नगपालिकाच्या ९ पैकी ४ नगर पालिकांचे नगराध्यक्ष काँग्रेसचे वर्चस्व होते. (संगमनेर, राहाता, श्रीरामपूर, शिर्डी) शिर्डी, राहाता येथे विखे गटाचे वर्चस्व होते. संगमनेर येथे थोरात गटाकडे नगरपरिषद होती. कोपरगाव नगरपरिषदेवर शंकरराव कोल्हे गटाचे नियंत्रण होते. तर राहुरी येथे प्रसाद तनपूरे गटाचा नगराध्यक्ष झाला होता. थोडक्यात अपक्ष व आघाडयांमुळे पक्षीय राजकारणाला अहमदानगर जिल्हयात खीळ बसते व स्थानिक राजकारण केवळ स्थानिक नेत्यामधील सत्ता स्पर्धा ठरते.

**अहमदनगर जिल्हयाच्या निवडणूकांवर सहकार चळवळीचा प्रभाव आहे :–**

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, सहकारी चळवळीतील महत्वाचा जिल्हा म्हणून नगर जिल्हाकडे पाहिले जाते. महाराष्ट्राच्या राजकारणाला दिशा देण्याचे मोलाचे काम नगर जिल्हयातील सर्व चळवळींनी केले आहे. अहमदनगर जिल्हा हा पुरोगामी व विचारांच्या चळवळीचा जिल्हा आहे. जिल्हा हा तसा कम्युनिस्ट विचारसरणीचा जिल्हा म्हणून डाव्या विचारसरणीचा प्रभाव आहे. जिल्हामध्ये कुमार सप्तर्षींनी बहुजन समाजासाठी बहुजन चळवळ उभा केली. विडी कामगरांचे प्रश्न माथडी कामगर चळवळ हमाल चळवळ दलित चळवळ अशा अनेक चळवळी या जिल्हयामध्ये सामजिक नेतृत्वाने उभ्या केल्या आहे. त्यापैकी सहकार चळवळ ही शेतकत्यांना व समाजातील दुर्बल घटकांना सावकारी पाशातून सोडवणारी आंतराराष्ट्रीय स्तरावरील मोठी बळकट चळवळ आहे. या सहकार चळवळीतून जिल्हयामध्ये सहकारी संस्था उभ्या राहिल्या आहेत. जिल्हयातील कोणत्याही चळवळीचा एकंदर परिणाम राजकारणावर झाला नाही तेवढा परिणाम सहकार चळवळीतून झाला आहे. स्थानिक राजकारण आणि सहकारी संस्था या हातात हात घालून चालत असल्याने स्थानिक स्वराज्यसंस्था विधानसभा लोकसभा निवडणूकांवर या सहकारी चळवळीचा प्रभाव आहे.

**अहमदनगर जिल्हयात प्रस्थापित व विस्थापित गट आहे :–**

जिल्हयाच्या राजकारणात असणारी भानुदास मुरकुटे, सुर्यभान वहाडणे, ना. स. फरांदे, दिलीप गांधी, अनिल राठोड, सदाशिव लोखंडे, राम शिंदे, गोविंदराव आदिक, रामराव आदिक ही मंडळी घराण्याला टक्कर देताना दिसत आहे. अशा मंडळींना नगरमध्ये विस्थापित नेतृत्व

म्हणतात. या नेतृत्वाचा सहकारी क्षेत्रापासून अलिप्त आहेत. या नेतृत्वाने सहकारी घराण्याला विरोध केलेला दिसतो. अहमदनगर जिल्हयात रक्ताची नाती प्रभावी आहे नात्यागोत्यांच्या वर्तुळाच्या गटाला प्रस्थापित नेतृत्व संपुर्ण जिल्हाभर दिसून येते सर्वच पक्षांनी तिकीट वाटपामध्ये राजकारणा बाहेर क्वचितच मोठी यशस्वी होताना जिल्हयामध्ये दिसून येते.

**जिल्हयातील राजकारणात सोयरे धायरे व नातेसंबंधाचे वर्तुळ आहे :-**

स्थानिक स्तरावर राजकीय नेतृत्व हे सहकारी संस्था काँग्रेस पक्ष व मराठा समाज या तिन्हीशी जोडलेले असल्याने उदयोगांवर आपल्याच गटाचे नेतृत्व असावे निवडणूकांवर मिळवता यावा सहकारी बँका स्थानिक स्वराज्य संस्थाच्या जिल्हा व राज्यपातळीवरील राजकारण या सर्व कारणातून नातेसंबधाचे वर्तुळ सहकारी घराण्यांचे दिसते. उदा. भाऊसाहेब थोरातानंतर त्याचे चिरंजीव बाळासाहेब थोरात व त्यांचे तीन मेहुणे जयंत पाटील व त्यांचे दोन मेहुणे भाऊसाहेब थोरातांचे मेव्हणे आण्णासाहेब शिंदे थोरातांची बहिण आप्पासाहेब राजळेची पत्नी यशवंतराव गडाख यांची सून आप्पासाहेब राजळे यांची कन्या आहे. मारूतराव घुले यांची नात ही शंकरराव काळेच्या घराण्याची सुन आहे. अशाी सोयरे व नाते संबधाचे वर्तुळ जिल्हयाच्या प्रत्येक सहकारी नेतृत्वामध्ये दिसून येते.

**राजकारणात सर्वसामान्याना सहकारी घराण्यामुळे मिळालेली संधी टिकवता येत नाही :-**

सर्वसामान्यातून आलेल्या नेतृत्वाला समाजामध्ये सामाजिक कार्य करावे लागते. सामाजिक कार्य करताना या नेतृत्वाला अनेक संघर्षाला तोंड दयावे लागते. समाजासाठी कार्य केले ते कार्य लोकप्रिय झाले तर ठिक नाही तर ते नेतृत्व नष्ट होते. या नेतृत्वाला भक्कम आधार एखादया पक्षाचा किंवा संघटनेचा असावा लागतो. तेव्हा तो राजकारणात प्रवेश करू शकतो. शिवसेना या प्रादेशिक पक्षाने जिल्हयामध्ये नवं तरूण नेतृत्व समाजापुढे आणले आहे. परंतु हे नेतृत्व ग्रामीण अर्थकारण समाजकारणांवर टिकू शकत नाही कारण यांच्या ताब्यात सहकारी संस्था नाही. ग्रामीण विकासाची नाळ ही या संस्थावर आधारित आहे. जिल्हयाच्या राजकारणात सहकारी घराण्यांचे वारसदार सहजपणे ग्रामीण जनतेवर वर्चस्व निर्माण करतात. बालवयातच त्यांना राजकारण करण्यास संधी प्राप्त होते हे नेतृत्व किती सक्षम आहे. यापेक्षा घराणे कोणते आहे हा विचार समाज करतो. त्यामुळे समाजात लोकप्रियता होण्यासाठी वारसदारांना पिढीजात

संधी मिळते. राजकारणात सर्वसामान्याना सहकारी घराण्यामुळे मिळालेली संधी टिकवता येत नाही

**महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने हे पर्यायी सत्ताकेंद्र म्हणून प्रसिध्द आहे :–**

साखर उदयोगामध्ये दोन गट आढळून येतात. सत्तेची अभिलाषा राखून साखर उदयोग पक्षासाठी लक्ष्य करताना दिसतात. तर दुसरा प्रत्यक्ष राजकीय सत्तेत असणार गट असतो. या गटाने ग्रामीण भागातील सत्तेची विविध केंद्रे हस्तगत केल्याचे दिसून येते. या केंद्राद्वारेच राजकीय सत्ता मिळवण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी तीन घटकांचे राजकारण केले जाते. १. राज्य पातळीवरील राजकारण २. पंचायत राज व्यवस्थेबाबत ३. सहकारी संस्थाचे राजकारण यामुळे १९९० नंतर राज्याच्या राजकारणाला महत्व प्राप्त झाले आहे. सहकारी संस्थेच्या राजकारणात साखर कारखानाचे स्थान महत्वाचे आहे. त्यातून बहुतांश विधानसभा व लोकसभा सदस्य व मंत्रयाचा सहकारी साखर उदयोग आहे. किंवा नसल्यास नव्याने काढण्याचा प्रयत्न होताना दिसून येतो. कारण राजकीय सत्ताप्राप्तीसाठी आवश्यक साधन सामग्री याच उदयोगातून मिळविता येते त्यामुळे साखर उदयोगात वाढ झाल्याचे दिसते.

साखर उत्पादकांचा मोठा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर आणि धोरणांवर आहे. त्यांचा दबावगट 'शुगर लॉबी' म्हणून ओळखला जातो. साखर कारखाना महासंघ ही औपचारिक संघटना आहे. तसेच स्थानिक नेतृत्व हे साखर उदयोगाच्या राजकारणाशी निगडीत आहे. साखर उदयोगाची लॉबी कोणत्याही पक्षाशिवाय राजकारणात प्रबळ भूमिका बजावते. कधी सत्तेच्या तर कधी दबावगटाच्या माध्यमातून आपले कार्ये साधत असते. सत्ता प्राप्तीच्या स्पर्धेपुरती मर्यादित राखण्याची क्षमता या गटात असते प्रत्यक्षात मात्र परस्परांत वेळ प्रसंगी सहकार्य सुध्दा करताना दिसतात. या नेतृत्वांनी आपआपली कार्यक्षेत्रे व प्रभावी क्षेत्रे राखून ठेवली आहेत. याच गटातून वसंतदादा पाटील शरद पवार विलासराव देशमुख व असे बहुसंख्य मंत्री विधानसभा सदस्य महाराष्ट्राला मिळालेले आहेत. महाराष्ट्रातील सहकारी साखर उदयोग पक्षीय विश्लेषणातून सर्वाधिक कॉंग्रेस पक्षाकडे तर १९९१ नंतर कॉंग्रेसमधील फुटीतून राष्ट्रवादी कॉंग्रेस उदयास आलेल्या पक्षाकडे तर १९९५ ला भाजप शिवसेनेने प्रत्यक्ष यश आल्यानंतर सहकारात शिरकाव केल्याचे दिसून येते.

साखर उदयोगाकडे 'साध्य आणि साधन' या दोन्ही गोष्टी मुबलक असल्याने राजकीय नेतृत्वासाठी साखर कारखाने हे भूषण बनले आहेत.राज्याच्या आर्थिक सामाजिक सत्तेच्या बदलाचे केंद्रस्थान म्हणून या उदयोगांचा उल्लेख करावा लागतो. ३१ ऑगस्ट १९९८ रोजी साखर उदयोग कारखाना मुक्तीनंतर २५ कि. मी. ऐवजी दोन साखर उदयोगांतील अंतर १५ कि. मी असणे एवढीच अट आज शिल्लक राहिली आहे. जळगाव व नाशिक या भागांतील काही साखर कारखाने एकत्र येऊन १२ कोटी रूपये खर्च करून नदयांचे पाणी धरणाने अडवून, डोंगरात बोगदा पाडून गिरणा नदीत सोडण्याचा प्रकल्प राबवित आहेत. त्यामुळे तेथे ऊस क्षेत्र वाढण्याची शक्यताा मोठया प्रमाणात दिसत आहे. नांदेड जिल्हयातील साखर कारखाने एकत्र येऊन सिकॉमच्या साहयाने कागदनिर्मिती कारखाना उभारण्याचे काम करीत आहेत. साखर उदयोगांमार्फत समाजकारण, राजकारण, अर्थकारण होताना दिसून येते. त्याचा समाजावर प्रभाव पडलेला दिसून येतो.

**महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये सहकाराचा वाटा :–**

सहकार हे महाराष्ट्राच्या अर्थव्यस्थेचे व एकूणच महाराष्ट्राच्या प्रगतीचे अन्योन्य वैशिष्टे राहिले आहे. सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकास साध्य करण्याचे महाराष्ट्र हे आदर्श प्ररूप मानले जाते. सहकारी चळवळ ही प्रामुख्याने कृषी पतपुरवठयाच्या क्षेत्रातच विकसीत झाली. सहकारी कृषी पतपुरवठयाची सरंचना त्रिस्तरीय आहे. प्राथमिक स्तरावर प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था कृषक सेवा संस्था आणि बृहत आदिवासी बहुउद्देशीय संस्था शेतकरी सभासदांना पुरवठा करण्याचे काम करतात. प्राथमिक कृषी पतपूरवठा संस्थांना मध्यवर्ती स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका पतपुरवठा करतात. तर या जिल्हा मध्यवर्ती सहकार बँकांना राज्यातील शिखर बँका म्हणजे राज्य सहकारी बँक पतपुरवठा करते.

व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या पिळवणूकीपासून शेतकऱ्यांची सुटका करणे शेती उत्पादनाच्या विक्रीची व्यवस्था करून शेतकऱ्यास उत्पादनाचा चांगला प्रतीचा माल वाजवी दरात उपलब्ध करून देणे ही सहकारी पणनाची उद्दिष्टे आहेत. पणन सहकारी संस्था प्रामुख्याने रासायनिक खते कीटकनाशके कृषी यंत्रसामग्री व साधने आणि प्रमुख कृषी उत्पादनांची खरेदी विक्री व्यवहारात

कार्यरत आहेत. शेती पुरक उदयोगाला सहकाराला चालना मिळाली आहे. महाराष्ट्रामध्ये दुग्धोत्पादन आणि संकलनामध्ये अग्रेसर आहे.

महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळीला वैचारिक जडणघडणीच्या माध्यमातून स्थैर्य व यश प्राप्त झाल्याचे दिसते द्रारिद्रय दुर करण्यासाठी औदयोगिक विकासाला चालना देऊन अविकसित अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी परकीय भांडवलाच्या गुंतवणूकीतून होणात्या फायदयाचा अथवा नुकसानीचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होणार ही गोष्ट औदयोगिकीकरण करीत असताना सार्वजनिक उदयोगधंदे निर्माण करून सार्वजनिक आरोग्य वाहतूक दळणवळण यावर भर दिला जावा असे दादाभाई नौरोजी व न्यायमूर्ती रानडे यांनी मांडले. प्रत्यक्ष स्वरूपात सहकारी उदयोगाची सुरूवात याचे अर्थव्यवस्थेतून झाल्याचे दिसून येते. सहकार हे सत्ताधारी पक्षाच्या हातातील सत्ता टिकवण्याचे सर्वात प्रभावी साधन बनल्याचे सहकार क्षेत्राला महाराष्ट्रात राजाश्रय मिळाला. सहकार क्षेत्राने १९६० ते १९८० य दशकामध्ये मोठी भरारी मारली. १९९० च्या दशकाच्या सुरूवातीला भारतीय अर्थव्यवस्था संकटात सापडल्यानंतरतिला त्यातून बाहेर काढण्यासाठी खाजगीकरण उदारीकरण जागतिकीकरण या धोरणाचा स्वीकारामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत अनेक मुलभूत बदल घडून येण्यास सुरूवात झाली. सहकार क्षेत्रामधील अंतर्गत समस्या व उदारीकरणाने निर्माण केलेली आव्हाने या दुहेरी संकटाचा प्रतिकुल परिणाम सहकारी चळवळीवर या काळात घडून आला. त्यामुळे सहकारी क्षेत्राच्या कामगिरीवरही त्याचा प्रतिकूल परिणाम घडून आला. या दुहेरी आव्हानामुळे सहकार क्षेत्रापुढे अस्तित्वाचे आव्हान निर्माण झाले आहे.

**अहमदनगर जिल्हातील ग्रामीण राजकारणात सहकार क्षेत्राचे वर्चस्व आहे :–**

प्रस्तुत संशोधनातून दिसून येते कि जिल्हात शेती विकास सिंचनव्यवस्था दुग्धव्यवसाय साखर निर्मिती अर्थपुरवठा पाणीपुरवठा उदयोग मजूरी अशा विविध क्षेत्रात सहकाराचे योगदान प्रचंड आहे. ग्रामीण भागातील लोक हे शेती पुरक घटकांशी निगडित असतात. सहकारी साखर कारखान्यामुळे शेतीचा विकास झाला. शेती बरोबरच दुग्धव्यवसायाला चालना मिळाली. शेती पुरक इतर मालाला सहकारी खरेदी विक्री संघामुळे प्रोत्साहन सहकार क्षेत्रामुळे मिळाले. सहकारी अहमदनगर जिल्हा सहकारी बँक ही सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये महत्वाचे स्थान बजावते. विविध कार्यकारी सोसायटयांच्या माध्यमांतून शेतीसाठी कर्जपुरवठा केला जातो. तसेच प्रत्येक

गावासाठी विविध कार्यकारी सोसायटी व तालुक्यात सहकारी बँकेच्या शाखा यामुळे स्थानिक स्तरावर सहकार प्रबळ दिसते. परिणामी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन संचालक मंडळाच्या निवडणूका जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्ष उपाध्यक्षाची निवड दुध संकलनाचे चेअरमन तसेच विविध कार्यकारी सोसायटीच्या निवडणूका यामुळे गावागावातील निवडणुकांवर याचा परिणाम झाला.वरील सहकारी संस्थावर ज्या नेतृत्वाचे वर्चस्व तेच नेतृत्वाचे वर्चस्व ग्रामीण राजकारणावर दिसते.

**सहकार क्षेत्रातून सहकारी राजकीय घराण्यांचा उदय :–**

यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण विकास व शेतकऱ्यांचे हितरक्षण या हेतूंनी विविध प्रकारच्या संस्थांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले. त्यामुळे सहकारी साखर कारखाने सहकारी बॅका सुतगिरण्या दुग्धव्यवसाय या उदयोगाने निर्माण केलेल्या आर्थिक स्त्रोतावर विशिष्ट गटाचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याचे दिसते. एकाच घरात कालांतराने राजकीय सत्ता उपभोगत आहे. तसेच सहकारी संस्था बरोबर स्थानिक राजकारणात प्रभाव निर्माण करणे. एकाच घराण्यातील कुटूंबव्यवस्था सहकारी साखर कारखान्यामुळे अध्यक्ष सहकारी बँकेचे संचालक दुधसंकलनाचा चेअरमन व पंचायत समितीचा सदस्य गावातील सरपंच अशा विविध पदावर विराजमान होते. त्यामुळे अशा उदयोगांमार्फत राजकारण घडून अर्थकारण करताना या सत्तेचा वापर केला जातो. यातूनच घराण्यांचा उदय झाला आहे. उदा. विखे घराण्यांचे बाळासाहेब विखे हे प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे विधानसभेवर तर शालिनी विखे जिल्हा परिषद अध्यक्ष जिल्हयामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये सहकारी घराणे उदयास आलेले आहेत. अकोले तालुक्यात मधुकर पिचड यांनी सहकारी संस्था स्थापन केल्या आज वैभव पिचड राजकारणात सक्रिय आहे. संगमनेर येथे भाऊसाहेब थोरात त्यांचे वारसदार बाळासाहेब थोरात कोपरगाव येथे काळे कोल्हे घराणे पारनेर येथे भास्कर औटी त्याचे वारसदार विजय औटी श्रीगोंदयाचे कुंडलिकराव जगताप यांनी सहकारी साखर कारखाना उभा केला राहुल जगताप हे कारखान्याचे अध्यक्ष आहेत तर राजकारणात अनुराधा जगताप सक्रीय आहे. अशा प्रकारे सहकार क्षेत्रातून सहकारी राजकीय घराण्यांचे वर्चस्व जिल्हाभर दिसून येते.

**ग्रामीण भागातील स्थानिक राजकारणात मराठा राजकीय नेतृत्वाचे वर्चस्व :–**

महाराष्ट्र हे भारतातील एकमेव असे राज्य आहे की एका जातीची लोकसंख्या सर्वत्र पसरलेली आहे. राज्यांत कर्नातक आंध्रप्रदेश गुजरात राज्यात शेतकरी जातीचे वर्चस्व अर्थव्यवस्थेत व राजकारणात आहे. त्या प्रभावी जाती एकमेकीत राजकीय वर्चस्वासाठी स्पर्धा करतात. कारण एक जात एका भागात तर दुसरी जात दुसत्या भागात प्रभावी असते. परंतु महाराष्ट्रात मराठा सर्वत्र प्रभावी आहेत. कोकण व विदर्भात मराठा जातीचा प्रभाव कमी असला तरी तिथे कुणबी जातीचा प्रभाव आहे. कुणबी जात ही मराठा जाती समूहाचाच एक भाग मानली जाते. मराठा जातीच्या प्रभावाचे कारण म्हणजे ग्रामीण भागात असलेला प्रभाव मराठयांची शेतजमिनीवरील मालकी मराठा नेत्यांचा आर्थिक उत्पन्नगट उच्च आहे.ग्रामीण राजकारणात स्थानिक पातळीवर जमीनजुमला बाळगून असते. असेही अभ्यासामध्ये आढळते. दुसरे अशा जमीन मालकीतून येणारी सत्ता जिल्हयातील सहकारी घराण्यांकडे आहे. जमिन बाळगणारी ही घराणी गावावर प्रभुत्व गाजवतात. समान जातीच्या धाग्याने या संपन्न घराणी व इतर सामान्य कुंटूबे राजकीयदृष्ट्या एक आहेत. जिल्हयामध्ये बिगर मराठा शेतकरी जातीचा देखील ग्रामीण भागात प्रभाव आहे. परंतु मराठा राजकीय नेत्यांनी जमिन मालकीवर प्रभुत्व असणात्या इतर जमिनीबरोबर समांतर युती करून आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. मराठा जातीच्या वर्चस्वाचे मुख्य घटक सहकारी संस्था आहे. हे शासनसंस्थेच्या पाठिब्यांवर उभे आहेत. नगर जिल्हयात सामाजिक व राजकीय प्रक्रियेवर मराठयांचा प्रभाव आहे. उदा. विखे, थोरात, गडाख, घुले, कोल्हे, राजळे, नरवडे, झावरे, कर्डिले, शेळके अशा घराण्यांचे वर्चस्व ग्रामीण राजकारणात दिसून येते.

**सहकारी घराण्यांचे सहकारातून राजकारणावर नियंत्रण आहे :–**

सहकारी संस्था या विकासाच्या दुसत्या टप्प्यात जिल्हा व तालुका पातळीवरील जिल्हा परिषदा पंचायत समित्या यांच्या आधारे उभ्या राहिल्या आहेत. जिल्हयात काँगेस संघटनेतील स्थान जिल्हा परिषदेमधील पद व सहकारातील नेतृत्व यांची सरमिसळ झालेली दिसते. ग्रामीण भागातील राजकीय व सामाजिक सत्ता या तीनही रचनांमध्ये उच्च स्थानी घराण्यांच्या हाती एकवटलेली आहे. स्वतःच्या गावातील जमिनीची मालकी याच शेतकरी कुंटूबाकडे केंद्रीत झाली आहे. यातून राजकीय घराण्यांची निर्मिती झाली आहे. त्यामुळे आपल्या तालुक्यातील सत्ता

आपल्याच घराण्यात राहावी म्हणून पंचायत समिती ग्रामपंचायत व जिल्हा परिषदामधील राजकारणावर नियंत्रण मिळविलेले दिसते. म्हणजेच सहकारी घराण्याचे सहकारातून राजकारणावर नियंत्रण आहे.

**अहमदनगर जिल्हयातील उत्तर विभागात सहकार क्षेत्र जास्त पुढारलेले आहे :–**

जिल्हयाच्या उत्तर विभागात अकोले संगमनेर राहाता कोपरगाव राहुरी श्रीरामपुर या तालुक्यात भंडारदरा खाजगी कारखानदारी विकसित झाली. या कारखान्यांमुळे शेतकत्यांची पिळवणूक होत असे. शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन विरोध करावा या कल्पनेतून विठ्ठलराव विखे यांनी सहकारी तत्वावर पहिला सहकारी साखर कारखाना उभा केला यांचीच प्रेरणा जवळच्या इतर तालुक्याला मिळाली. संगमनेर तालुक्यात भाऊसाहेब थोरात यांनी कारखाना उभारला. कोपरगाव तालुक्यात शंकरराव काळे व कोल्हे यांनी सहकार क्षेत्रामध्ये मोठी क्रांती घडून आणली. त्यामुळे सहाजिकच मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती झाली. शेतकत्यांना स्वतःच्या मालकीचा सहकार मिळाल्याने ग्रामीण विकासाबरोबरच शैक्षणिक विकास साधला गेला. पाटपाण्याच्या सोयी नसल्याने पाथर्डी श्रीगोंदा पारनेर कर्जत जामखेड अहमदनगर या भागात शेती कोरडवाहू बनली. त्यामुळे राजकीय नेतृत्वामुळे सहकार क्षेत्राला दिशा मिळाली. पण यश मिळालेले दिसत नाही. श्रीगोंदा तालुक्यात ४ साखर कारखाने आहेत. बबनराव पाचपुते यांनी ३ खाजगी साखर कारखाने उभारले आहे.

**अहमदानगर जिल्हयातील सहकारी संस्था या सहकारी घराण्यांतील मुळ पुरूषाने स्थापन केलेल्या आहेत.**

१९४९ आशिया खंडातील पहिला साखर कारखाना विठ्ठलराव विखे यांनी धनंजयराव गाडगीळ वैकुंठभाई मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली उभारला आहे. खाजगी कारखान्यातून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिळवणूकीसाठी सुटका करणे हा हेतू होता. विखे यांनी गावागावात सहकारी सोसायटयांना स्थापन्यास चालना दिली. प्रवरा सहकारी बँक लोणी बुउद्देशीय सहकारी क्रेडिट संस्था प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था प्रवरा रूरल हॉस्पिटल आणि मेडिकल रिसर्च सेंटर कृषी विज्ञान केंद्र अशा संस्थाची स्थापना केली. या संस्था वाढविण्याचे कार्य विखे घराण्यांचे वारसदार करत आहेत. जिल्हयामध्ये विठ्ठलराव विखे यांच्या प्रेरणेतून प्रत्येक तालुक्यामध्ये सहकारी साखर कारखान्याची उभारणी सुरूवात झाली. १९६० ते ९० या कालावधीत सहकारी संस्था मोठया

प्रमाणात उभ्या राहिल्या या सहकारी संस्था सहकारी घराण्यांतील मुळ पुरूषाने आपल्या हिमतीने व कर्तबगारीतून उभा केला आहे.

या संस्थामुळे तालुक्याचा विकास व्हावा शेतकऱ्यांना लाभ व्हावा गावागावामध्ये उदरनिर्वाहाची साधने निर्माण व्हावा. समाजाचे जीवनमान उंचावे हा उदात्त हेतू या मुळ पुरूषांचे होते सहकारी संस्थाच्या प्राथमिक कालखंडामध्ये संस्था या स्वतंत्रयपणे कारभार करत होत्या सहकारी घराण्याच्या निर्मितीनंतर सहकारी संस्था आणि पंचायतराज व्यवस्था यांच्या मध्ये सरमिसळ झाली. घराण्यांच्या वारसदारांनी सहकारी संस्थाच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. घराण्यातील मुळ पुरूषांने समविचारी शेतकरी माणसांना एकत्र आणून त्यांच्या शक्तीतून काम उभे करणारी लोकशाहीचीच सहकारी चळवळ उभी केली आहे. जिल्हयातील सर्व सहकारी नेतृत्वाने अंगिकारला व जिल्हा सहकारमय केला. शेतकऱ्यांच्या पतपेढयामार्फत त्यांच्या शेतीला कुंटूबाच्या गरजा भागवण्यासाठी भांडवल उपलब्ध करून देणे. त्यांच्या कच्या मालाचे पक्या मालात रूपांतर करणारे उदयोग शेतकऱ्यांच्या मालकीचे असणे आणि कोणत्याही कृषी उदयोगाच्या उभारणीसाठी शेतकत्याची जमीन ताब्यात न घेणे हेच तत्व मुळ पुरूषाने आपल्या प्रयत्नात ठेवले आहे.

**सहकारी राजकीय घराण्यांतून महिला राजकीय नेतृत्व पुढे आले आहे :-**

सहकार क्षेत्रातील सुप्रिया सुळे हे नेतृत्व पुढे आले. प्रणिती शिंदे, वर्षा गायकवाड, पंकजा मुंडे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. राजकारण समाजकारण सहकार शैक्षणिक सहकार बँकिंग या क्षेत्रात महिलांचा दबदबा आहे. सहकारी तत्वावर चालणात्या अनेक बँकामध्ये स्त्रिया लहान योग्य पदावर समक्षपणे काम करून सहकारी चळवळ बळकट करत आहेत. सहकाराचे विश्व त्यातील महिलांच्या योगदानामुळे विस्तारले आहे.

अहमदनगर जिल्हयातील सहकार क्षेत्रातून स्थानिक नेतृत्व करताना शालिनीताई विखे, दुर्गा तांबे, हेमलता पिचड, प्रतिभा पाचपूते, स्नेहलता कोल्हे, सुनिता गडाख, मोनिका राजळे, उषाताई तनपुरे, अनुराधा आदिक आदि महिला सहकार क्षेत्रातून राजकारणात सक्रिय आहेत. शालिनीताई विखे यांचे कार्य मोलाचे आहे. अहमदनगर जिल्हा परिषदेच्या दोनदा अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. या महिलांचे सहकार क्षेत्रातून सामाजिक कार्यावर भर दिसते या महिलांची स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून भरीव कामगिरी आहे. जिल्हयातील महिला सहकार

क्षेत्रातील राजकीय घराण्यातून पुढे आलेल्या दिसून येते तसेच महिला राखीव आरक्षणामुळे महिला सरपंच सभापती अध्यक्ष या पदावर विराजमान झाल्या आहेत. जिल्हयातील महिला स्थानिक स्वराज्य संस्थावर निवडणूक लढविताना दिसता परंतू विधानसभा व लोकसभा या निवडणुकांमध्ये महिला राजकीय नेतृत्वामध्ये उदासिनता दिसून येते. स्थानिक राजकारणात महिला आरक्षणामुळे महिलांचा सहभाग वाढलेला आहे.

**राजकारणामुळे सहकाराला आर्थिक बळ मिळाले सहकाराला भागभांडवलासाठी शासकीय मदत मिळाली आहे :-**

जिल्हयातील बहुसंख्य समाज हा शेतीवर आधारित आहे. स्वातंत्र्यपूर्व काळी शेतकत्यांना सावकारी पाशातून मुक्त करून त्यांच्या प्राथमिक व मूलभूत गरजा भागविण्यासाठी त्यांना पुरेसे व वेळेवर अर्थसहाय्य मिळावे हा सहकार चळवळीचा मुख्य हेतू होता. या चळवळीतून जिल्हयातील सहकारी नेतृत्वाच्या योगदानातून सेतकरी संघटित झाला. व एकत्रित भाग भांडवलातून सहकारी संस्था उभा राहिल्या आहेत. सहकारी पतपेढया विविध कार्यकारी सोसायटया व नागरी बँकाचे जाळे विणले गेले. ग्रामीण भागामध्ये शैक्षणिक सुविधा सहकारामुळेच खेडोपाडी निर्माण होत गेलेल्या दिसतात यातून ग्रामीण विकासाला चालना मिळाली. म्हणजेच सहकारी संस्था एकत्रित भाग भांडवलातून विकसीत झाल्या तरी सरकारी मदतीमुळेच सहकारी संस्थांचा अधिक विकास झाल्याचे दिसते. यासाठी आण्णासाहेब शिंदे, धनजंयराव गाडगीळ व वैकुंठभाई मेहता यांना श्रेय मोठे आहे.

**राजकारणात सहकारी घराण्यांच्या वारसदारांना पिढीजात संधी मिळत आहे :-**

राजकीय नेतृत्वाच्या वारसदारांना राजकीय प्रक्रियेतून संधी दिली जावी अशी मानसिकता मतदारांची आणि राजकीय पक्षांची ही होत आहे. या वारसदारांकडे आर्थिक सामर्थ्य राजकीय वर्चस्व आणि यंत्रणा राबविण्याची ताकत असते. हे सर्व वारसदाराला अलगतपणे मिळते ही घराणेशाही सर्व पक्षात पहायला मिळते. मतदार हा वारसदाराच्या प्रतिक्षेत असतो. नेत्यांच्या वारसदारांना त्यांच्याकडे क्षमता असेल तर का संधी मिळू नये अशी मतदारांची विचारणा असते. हे असताना समान संधीच्या तत्वाचा विचार केल्यास हे वारसदार शर्यत सुरू होण्यापूर्वीच पुढे असतात. भारतामध्ये गांधी घराणे, महाराष्ट्रात देशमुख घराणे, भोसले घराणे, मोहिते घराणे अशी अनेक उदाहरणे देता येतील अहमदनगर जिल्हयातील विखे घराण्याची चौथी पिढी थोरातांची

तिसरी पिढी गडाख, घुले, कोल्हे, काळे, राजळे, तनपूरे यांची तिसरी पिढी सहकारातून राजकीय प्रक्रियेत सक्रीय आहे. तर बबनराव पाचपुते, गोविंदरव आदिक, मधुकरराव पिचड, नंदकुमार झावरे, भास्करराव औटी, दादापाटील शेळके यांची दुसरी पिढी स्थानिक निवडणुकामध्ये प्रतिस्पर्धी म्हणून दिसतात. बिगर घराणेशाही असणाऱ्या नेतृत्वाचे वारसदार निवडणूकीच्या रिंगणात उतरण्यास इच्छूक दिसतात. जिल्हयात सर्वसामान्य कुटंबातील उमेदवार निवडणूकीत तग धरू शकलेले नाही हे चित्र स्थानिक निवडणूकीतून दिसते.

**कॉंग्रेस पक्ष प्रबळ दिसतो :–**

कॉंग्रेस पक्षाने मराठा समाज संस्थात्मक सत्ता व सामाजिक व संस्थात्मक घटकांसोबत भूमिका ठेवली आहे सहकारी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत आर्थिक विकास साधणारी एक व्यवस्था कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात विकसित करण्यात आली. कृषी व कृषी आधारित व्यवस्थांमार्फत ग्रामीण भागामध्ये एक मोठा बदल कॉग्रेसच्या या राजकारणामुळे घडून आला. सहकारी संस्था आणि शासकीय यंत्रणा यांच्या समन्वयातून सत्ताधारी पक्षाने जिल्हयाच्या अर्थकारणावर जबर पकड बसलेली दिसते. साखर कारखाने दुधसंघ सहकारी बँका विविध उत्पादक संघ यांच्यामार्फत जनतेच्या हितंसंबधाशी जोडून घेणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत हितसंबधाचे राजकारण करणे असा उपक्रम कॉंग्रेस पक्षाने वर्षानुवर्षे यशस्वीपणे राबवला आहे. १९९५ साली भारतीय जनता पक्ष शिवसेना युतीचे सरकार सत्तेवर येईपर्यत ही व्यवस्था स्थिर होती. १९९९ नंतर जिल्हयामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस चा प्रभाव दिसतो. कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्या युतीतून सहकारी संस्थेवर वर्चस्व राहिले. २००४ व २००९ या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसची पिछेहाट झालेली दिसते. भाजप व शिवसेना युतीचे विधानसभेवर वर्चस्व दिसते. जिल्हयातील बहुतांश नेत्यांनी कॉंग्रेस सोडून शरद पवार यांना साथ दिली.

**सहाकरी संस्थामुळे रोजगार प्राप्ती झाली आहे :–**

जिल्हयामध्ये सुमारे ८० टक्के शेत जमीन जिरायत असल्यामुळे लोकांना पुरेसा रोजगार मिळत नव्हता. परंतु साखर उदयोग व दुग्ध व्यवसायामुळे ग्रामीण भागात रोजगार वाढविण्यासाठी मोठा हातभार लागला आहे. जिल्हयातील कारखान्यापैकी बहुतांश कारखान्यांना सहकारी जिल्हा बँकेने पत पुरवठा केलेला आहे. जिल्हयातील १८ कारखान्यामधून सुमारे ४० हजार जनतेला

थेट रोजगार मिळाला आहे. ऊसतोडी वाहतुक करणारे अशा सुमारे एक लाख लोकांना रोजगार मिळतो. याशिवाय साखर उदयोगावर अवलंबून असणाऱ्या मोठया उदयोगांतील ३०–३५ हजार मजुरांना रोजगार मिळाला रोजगारात झालेली वाढ ही या सहकारी साखर कारखान्यांना सहकारी जिल्हा बँकेने केलेल्या कर्ज पुरवठयामुळेच शक्य झाले आहे. तालुक्यातील एक सहकारी साखर कारखान्यामुळे ३५ हजार रोजगांना काम मिळाले आहे. इतका रोजगार कोणत्याही संस्थेतून मिळत नाही जिल्हयातील पाथर्डी तालुका ऊसतोड कामगरांचा तालुका आहे. दुष्काळग्रस्त लोक साखर कारखान्यांच्या माध्यमातून ऊसतोड करतात. त्यांच्या उदरनिर्वाहाचे मोठे साधन हे सहाकरी संस्था आहे.

अहमदनगर जिल्हा सहकारी दुध संघाशी एकुण १२ सहकारी दुधसंघ संलग्न आहे.महाराष्ट्राच्या दुग्धोत्पादनात आणि संकलनामध्ये नगर जिल्हा प्रथम क्रमांक आहे वाहतूक, शीतकरण केंद्र इ. मिळून ५००० जणांना यातून रोजगार उपलब्थ झालेला आहे. या रोजगार प्राप्तीमुळे जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण अत्यल्प आहे. विदर्भ व मराठवाडयात हे प्रमाण जास्त आहे लातूर नांदेड, बीड व परभणी या भागांतील शेतकऱ्यांच्या समस्या वाढत आहे.

## ४. शिफारशी :–

१. युवकांचा राजकीय सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

२. नवा तरूण राजकीय कार्यकर्त्यांना राजकीय वैचारिक प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. बौध्दिक वर्ग दोन तीन आठवडयांचे केले जावे.

३. राजकीय पक्षांनी योग्य उत्साही युवकांना निवडून त्यांना प्रशिक्षण दयावे त्यांना मानधन प्रवासखर्च देण्याची नियमित व्यवस्था करावी.

४. महिलांसाठी आरक्षण असल्याने तिला संधी मिळते पण अधिकार तिचा पती गाजवतो. सदरच पतींनाही पक्षांनी प्रशिक्षण देऊन संघटित केले तर पुर्ण कुंटूबाची निष्ठा राजकीय बनू शकेल.

५. तालुक्यांची युवकमंडळे आणि स्थानिक संस्था, नगरपरिषदा, पंचायतसमित्या, ग्रामपंचायती यांच्यात व्यवस्थित समन्वय असला तर राष्ट्र उभारणी, साक्षरता अभियान, लोकसंख्या नियंत्रण, एड्स प्रशिक्षण अशी कामे करुन घेता येतील सध्या तरूणांची शक्ती, बुध्दी निव्वळ वाया जाते

आहे. कोणत्याही खेडयात गेली की पारावर, चावडीवर एस. टी. च्या थांब्यावर, पानटपरीवर, चहाच्या ठेल्यावर असंख्य तरूण रिकामे दिसतात.

६. सरकारी नोकरीत ज्याप्रमाणे ५८ व ६० वर्षे झाली म्हणजे सक्तीची सेवानिवृत्ती असते. त्याप्रमाणे राजकीय व्यक्तींनाही सेवानिवृत्ती असावी तर नव्याा युवकांना वाव मिळेल. सध्या बहुतेक सर्व नेते ७५/८० वयोगटात दिसतात. ती वयोवृध्द मंळळा आजारी असली अपंग झाली असली तरी जागा पदे घट्ट धरून बसतात. नेत्याने असे करावे की वयाची ७० वर्षे झाली की कोणत्याही नेत्याने निवडणूकांच्या राजकारणापासून अलिप्त व्हावे. राष्ट्रीय नेते ७० वय प्रांतिक नेते ६० वय जिल्हा नेते ५५ वय असे वाटल्यास ठरविता येईल. किंवा आमदारकी, खासदारकी जास्तीत जास्त दोन किंवा तीन वेळा मिळेल अशी मर्यादा असावी. अमेरिकेचा अध्यक्ष कितीही लोकप्रियक कर्तबगार असला तरी दोन पेक्षा जास्त वेळा म्हणजे आठ वर्षे अध्यक्ष होऊ शकत नाही. अशी घटनेतच तरतूद आहे. आपल्याकडे नऊ दहा वेळस सलग खासदार असल्याची उदाहरणे कौतुकाने सांगण्यात येतात.

७. राजकीय नेतृत्वाला पंचायत समितीचा अनुभव असल्याशिवाय जिल्हा परिषद नाही. जिल्हा परिषदेत काम केल्याशिवाय आमदार होता येणार नाही. आमदारकीचा अनुभव असल्याशिवाय खासदार होता येणार नाही असे केले तर तरूणांना खालच्या पायरीवर क्रमाक्रमाने कर्तबगारी दाखवत वरवर येता येईल प्रत्येक पायरीला कालमर्यादा ठेवायची.

८. नैतिकदृष्टया स्वच्छ कुशल धाडसी नेतृत्वाची गरज सहकार चळवळीला आहे. या नेतृत्वाला चालना देण्यासाठी सहकारातील दोष कमी करावे लागतील.

९. सहकारी संस्था ग्राहकांना सेवा पुरविण्यासाठी यांत्रिकीकरण व तंत्रज्ञानावर भर दयावी लागेल.

१०. सहकारी उदयोगामध्ये सर्व कर्मचारी पदाधिकारी व सदस्यांना प्रशिक्षण करून गुणात्मक विकास साधने हे सहकार चळवळीचे मुख्य उद्दिष्ट असावे.

११. सरकारी वित्तसंस्थाचे व्यवस्थापनात पारदर्शकता ठेवणे खाजगी वित्तसंस्थांना स्पर्धेला तोंड देण्यासाठी सहकारी वित्तसंस्थांनी निधीची सुयोग्य गुंतवणूक करावे.

१२. सहकारी भांडवल बाजार निर्माण करावा. त्यामुळे गंतवणूकदार या सहकारी भांडवल बाजारात गुंतवणुक करू शकतील.

१३. सहकारातील राजकीय वापर कमी करावे.

१४. सहकारी साखर कारखाने भ्रष्टाचार मुक्त करण्यासाठी स्वतंत्र उपाययोजना राबवावी.

१५. सहकारी संस्थामध्ये प्रशिक्षित सहकारी तत्वाची जाण असणारे उच्चशिक्षित कार्यक्षम कर्मचात्यांची नेमणूक करावी.

१६. कालसुसंगत बदल सहकारात हवा आहे.

१७. राजकारणाप्रमाणे सहकारी संस्थामध्येही वारसदारी बंद करणे.

१८. राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात शेती धोरण, ऊर्जा, पाणी, उदारीकरण, खााजगीकरणाचे धोरण, परराष्ट्रीय धोरण अशा अनेक धोरणांचा समावेश असतो. पण राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यात मुक्त धारण असावे.

१९. जागतिकीकरणाच्या अव्हांनाना तोंड देण्याची ताकद असलेले सहकार हे सक्षम क्षेत्र आहे. अनावश्यक सरकारी हस्तक्षेप टाळून सहकारी संस्थांना मोकळा श्वास घेऊ दिला पाहिजे.

२०. व्यापारी मापदंड लावून सहकारी करायचे संस्थांचे मुल्यमापन करू नये.

२१. प्रामाणिक सभासदांनीच जागरूक राहून स्वार्थी हेतूने सहकारात सामील झालेल्या भ्रष्ट लोकांना बाजुला काढले पाहिजे.

## ५. भावी संशोधनासाठी दिशा :–

भविष्यकाळात संशोधनासाठी दिशा दाखविणे ही प्रत्येक अभ्यासाची जबाबदारी असते. प्रकरण क्र. २ मध्ये या विषयास अनुसरून झालेल्या संशोधनाचा आढावा प्रस्तुत विषयात घेतला आहे. यापुढे संशोधन कोणत्या क्षेत्रात करता येईल हे सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

१. अहमदनगर जिल्ह्यातील दक्षिण भागातील सहकार संस्थांचा विश्लेषणात्मक अभ्यास व उपाययोजना.

२. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या विकासाचे मुल्यमापन.

३. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील महिलांच्या योगदानाचा अभ्यास.

४. लोकसभा व विधानसभा या निवडणूकीत जिल्ह्यातील घराण्यांच्या योगदानाचा स्वंतत्र अभ्यास.

५. सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा महाराष्ट्रात दबदबा असतानाही मुख्यमंत्रीपद अहमदनगर जिल्ह्याला मिळालेले नाही याचा विश्लेषणात्मक अभ्यास.

६. पाथर्डी शेवगाव या दुष्काळी भागात सहकार क्षेत्रावर भर.

७. सहकरातील कार्यपद्धती आणि सक्रिय राजकारण यांच्या सहसंबंधाचा अभ्यास.

८. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील उत्तर विभागातील राजकीय घराणी व दक्षिण विभागातील राजकीय घराणी यांचा तुलनात्मक अभ्यास.

९. पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास.

१०. अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय पक्ष व स्थानिक नेतृत्वाचा सहसंबंधाचा अभ्यास व उपाययोजना.

११. अहमदनगर जिल्ह्यातील जातीय राजकारणाच्या परिणामाचे मुल्यमापान अभ्यास.

## मराठी संदर्भ ग्रंथ :–


१. साधू अरूण, 'सहकार धुरिण', डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा स्टडी सर्कल, रोहन प्रकाशन, पुणे, २००४.

२. 'वाटचाल', अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळ, २०१४.

३. 'झेप', स्मरणिका, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळ अमृत महोत्सवी वर्ष सन (१९५७ ते १९८२) १९९४.

४. खाकुर्डीकर अमृता, 'परिसस्पर्शी' मा. आमदार प्रसादराव तनपुरे यांनी जनहितासाठी केलेल्या कामांचा अल्प परिचय, १५ ऑगस्ट २००४.

५. चौसाळकर अशोक, 'महाराष्ट्राचे राजकारण', नवभारत प्रकाशन, नागपूर, २०१०.

६. जैन अशोक, 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण', शेठ पब्लिकेशन्स, मुंबई १९९८.

७. काळे अशोक, 'विकास सुर्य: कर्मवीर शंकरराव काळे जीवन व कार्य', अशोक काळे प्रकाशन, कोपरगाव.

८. थोरात भाऊसाहेब, 'अमृतगाथा', अमेय प्रकाशन, पुणे, १९९९.

९. थोरात भाऊसाहेब, 'अमृतमंथन', अमेय प्रकाशन पुणे, २००८.

१०. थोरात भाऊसाहेब, 'जीवनपरिचय', अमृतवेल सुर्यभान जायभाये युथ प्रेस क्लब, पुणे, २०११.

११. बोठे बाळ कारभारी, अहमदनगर जिल्हा, २०१७.

१२. कांबळे बाळ, 'अहमदनगर जिल्ह्यातील स्थानिक संस्था आणि महाराष्ट्रातील राजकारण : नवे संदर्भ', नवता प्रकाशन, मुंबई.

१३. विखे बाळासाहेब, 'देह वेचावा कारणी', राजहंस प्रकाशन, पुणे.

१४. भोसले, काटे, 'सहकार', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००८.

१५. भोळे भास्कर, 'राजकीय विश्लेषण', प्रकाशक चंद्रशेखर घुले पाटील, २००३.

१६. भोळे भास्कर, 'राजकीय सिद्धांत', राजकीय नेतृत्व, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, २००८.

१७. बायस प्र. दे., 'सहकार व नियोजन', महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे, २०१०.

१८. कऱ्हाडे बी. एम., ‘शास्त्रीय संशोधन पद्धती’, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, २०११.
१९. पाटील भीमराव, ‘मनामनातील मारुतराव घुले पाटील’, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, १९९५.
२०. देशमुख भूषण, ‘नगर दर्शन’, अहमदनगर, २००२.
२१. राजळे पाटील दादा, ‘राजधर टेमकर पार्श्वभूमी भूषण दादा पाटील राजळे’, अमेय प्रकाशन, पुणे.
२२. देवगावकर एस. जी., राजकीय सिद्धांत’, विकास आणि कल्याणकारी राज्य, श्री साईनाथ प्रकाशन, नागूपर, २००९.
२३. कामत गो. स., ‘सहकार तत्त्व व व्यवहार व्यवस्थापन’, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९३.
२४. देशमुख गणेश, ‘ग्रामवेद’, १९९८ सहकार चळवळीचे संघटन स्मृतीग्रंथ प्रकाशन समिती, कोपरगाव, १९९८.
२५. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, अहमदनगर जिल्हा अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, महाराष्ट्र शासन, अहमदनगर.
२६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, ‘अहमनगर जिल्हा’, २०१५–१६.
२७. अहिरराव जितेंद्र, ‘सहकार’, चिन्मय प्रकाशन, पुणे, २००९.
२८. सावंत शिवाजी, ‘लढत’, १९८०.
२९. आवचार स्मिता, स्त्रिया आणि सहकार चळवळ : तत्वे आणि व्यवहाकर’, नचिकेत प्रकाशन, नागपूर, २०१३.
३०. किलोळ जगदीश, ‘भारतातील सहकार चळवळ : तत्वे व व्यवहार’, नचिकेत प्रकाशन, नागपूर, २०१३.
३१. कराडे जगन, ‘जागतिकीकरण आणि सहकारी चळवळ’, डायमंड प्रकाशन, पुणे, २०१४.
३२. कामत गो. स., ‘सहकारत्व व्यवहार व्यवस्थापन’, विद्या प्रकाशन, पुणे, १९०९.
३३. कावरे एन. एम., ‘महाराष्ट्रातील सहकारी चळवळ’, इंडियन स्ट्रीम्स सर्च जर्नल्स–व्हॅल्युम : २, २०१२.
३४. पाटील कायंदे, ‘सहकार’, चैतन्य प्रकाशन, नाशिक, २०१०.
३५. कदम डी. बी., ‘सहकारी साखर कारखान्याची अर्थव्यवस्था’, प्रकाशक यशवंतराव गडाख, अहमदनगर.

३६. घुले मारुतराव, ‘दीपस्तंभ’, नेवासा टाईम्स, गौरव विशेषांक, नेवासा, २००२.

३७. ‘मी महाराष्ट्राचा महाराष्ट्र माझा, घराणेशाही दिपावली विशेषांक, २०१९.

३८. भावे मधुकर ‘यशवंतराव ते विलासराव’, ग्रामविकास प्रकाशन, पुणे.

३९. ठाकरे प्राचार्य, ‘आधुनिक राजकीय विश्लेषण’, राजकीय बदल आधुनिकीकरण आणि राजकीय विकास, विद्या प्रकाशन, नागूपर, २०१०.

४०. प्रतिम सेन रूलर, मराठी बँक इंडिया टुगेदर, १ सप्टेंबर २००७.

४१. आगलावे प्रदीप, ‘संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे’, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.

४२. पवार प्रकाश, ‘भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल’, राजकीय धुरिणत्व व वर्चस्व, डायमंड प्रकाशन, पुणे, २०१४.

४३. ढाकणे प्रतापराव बबनराव, ‘एकलव्य संस्थेची यशोगाथा’, १९४५– 2012, अहमदनगर.

४४. पाटील सु. भी., ‘सहकारी महाराष्ट्र’, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे, २०१६.

४५. पुजारी वि. भा., ‘महाराष्ट्रातील सहकार चळवळ : कथा आणि व्यथा’, सहकार सारथी, २००४–०५.

४६. वडमारे राजेंद्र, ‘महामेरू’, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र, २००१.

४७. वडमारे राजेंद्र, ‘पद्मश्रींचा संपन्न वारसा’, लोकमहर्षी गौरव विशेषांक, २०१२.

४८. शिंदे रावसाहेब, ‘भावलेली माणसे’, अमेय प्रकाशन, पुणे, २००७.

४९. शिंदे रावसाहेब, ‘ध्यासपर्व’, अमेय प्रकाशन, पुणे, २००५.

५०. काकडे रवींद्र, ‘प्रवरेचा वटवृक्ष’, प्रवरा औद्योगिक शैक्षणिक सांस्कृतिक समूह, प्रवरानगर.

५१. जोंधळे सागर, ‘आधारस्तंभ’, बाळासाहेब थोरात महाराष्ट्र राज्य गौरव विशेषांक.

५२. कारेकर शोभा, ‘महाराष्ट्र शासन आणि राजकारण’, अंशुल प्रकाशन, नागपूर.

५३. चव्हाण शंकर, ‘कामगार चळवळ एक राजकीय विश्लेषण’, शब्दगंध प्रकाशन, पुणे, २००८.

५४. गडाख शंकरराव, ‘संघर्ष पाण्यासाठी’, प्रकाशक नानासाहेब तुवर नेवासा पॅटर्न नेवासा, २०१४.

५५. गडाख शंकरराव ‘परिवर्तन’, दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑप. बँक लि., अहमदनगर (१९५८–२००८).

५६. कोल्हे शंकरराव आणि जोशी सुधाकर, 'सत्याग्रही शेतकरी', संजीवनी सहकारी साखर कारखाना लि., सहजानंदनगर, कोपरगाव, २०१२.

५७. दास्ताने संतोष, 'महाराष्ट्र वार्षिकी', सहकार निराली प्रकाशन, पुणे, २००८.

५८. दास्ताने संतोष, 'महाराष्ट्र वार्षिकी', सहकार निराली प्रकाशन, पुणे, २०१२.

५९. दास्ताने संतोष, 'महाराष्ट्र वार्षिकी', सहकार निराली प्रकाशन, पुणे, २०१३.

६०. पळशीकर सुहास, 'महाराष्ट्राचे राजकारण स्थानिक संदर्भ', अहमदनगर जिल्ह्यातील स्थानिक संस्था, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७.

६१. जोशी सुधाकर, 'सत्याग्रही शेतकरी', शंकरराव गेणूजी काल्हे सहकाराचे भवितव्य, संजीवनी सहकारी साखर कारखाना लि., सहजानंदनगर, कोपरगाव, २०१२.

६२. मानकर सुधाकर, 'सहकार', निराली प्रकाशन, पुणे, २०१०.

६३. शेरकर सुधाकर, 'योगदान', अनिल प्रिंटर्स, अहमदनगर, २००७.

६४. जायभाय सुर्यभान, 'अमृतवेल', भाऊसाहेब थोरात युथ क्लब, पुणे, २०११.

६५. आसोपा योगेश, 'संवाद', बाळासाहेब थोरात गौरव विशेषांक, यश प्रकाशन, संगमनेर.

६६. आभाळे यशवंत, 'श्वास विकासाचा सर्वांगीण प्रगतीचा', मधुकर पिचड समर्थ मिडीया व्हिजन, अकोले, २०१४.

६७. चव्हाण यशवंतराव, 'शेतीनिष्ट यशवंतराव', कृषी औद्योगिकीकरण व सहकाराचे उदगाते, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २०१३.

६८. गडाख यशवंतराव, 'अर्धविराम', ऋतुरंग प्रकाशन, मुंबई, २००६.

६९. गडाख यशवंतराव, 'माझे संचित', ऋतुरंग प्रकाशन, मुंबई, २०१७.

७०. गडाख यशवंतराव, 'सहवास', ऋतुरंग प्रकाशन, मुंबई.

**इंग्रजी संदर्भ ग्रंथ :–**

1. Ake Eden, 'Fatal Remedies, The Co-operative', July 2007, NCUI, New Delhi.

2. Bandyopadhya , 'Hundred Years Of Co-operative Movement, Vision And Mission 2020, Indian Co-operative Review, New Delhi, July 2004.

3. Baviskar B. S., 1980, 'The Politics Of Devolpment : Sugart Co-operative In Rural Maharashtra', Bombay, OUP.

4. Bhatangar K.P., 'Cooperation In India',2009, Kishor Pub. Kanpur.

5. Bhide S. T. 'Producers Companeies', Artical Unpublised.

6. Deshpande Rajeshwari, 'Kunbi Marathas As OBCS : Backward Journey Of A Caste', Economic And Politcal Weekly 2004.Mac

7. Deshpande Rajeshwari, 'Maharashtra : Politics Of Frustraion, Anxieties And Outrage, Economic And Political Weekly, April 14-8 2006.

8. Sushila Ramswamy, 'Political Theory', 'Maclillam Ideas & Concepts Publication 2010.

9. Mathur Dr. B. S., 'Co-operation in indai, sahitya bhavan, agra, 2005.

10. Bhatnagar Dr. K. P., Dr. N. S. Nigam. Dr. T. N. Bhagoliwal, Dr. T. N. Hajela, Co-operation in india and abroad, Kishore Publishing House, Kanpur, 1970.

11. EOI, Gazette Of India, Part III, New, Delhi, 5th February 2005.

12. NCUI, 13th Indian Co-operative Congress Backgruound Paper, New Delhi 1997.

13. Palshikar Suhas, 'Traingular Competition And Bipolar Politics, Election To Local Bodies In Maharashtra, Economics and Political Weekly, March 30.

14. Palshikar Suhas and Birmal Nitin, Fragment Marathas Retain Power In Paul Wallace And Remashrya Roy, (eds.) India's 1999 Elections and Twentieth Century Politics, New Delhi, Sage.

15. Palshikar Suhas and Despande Rajeshwari, 'Maharashtra : Challenges before the Congress System', Journal Of Indian School Of Political Economy, Jan-June 2003.

16. Palshikar Suhas and Despande Rajeshwari, 'Maharashtra : Challenges before the Congress System', Journal Of Indian School Of Political Economy, Vol- 15, No. 1 & , Jan-June 2003.

17. Damani Prakash, Challenges For Agriculture Co-operative in Asia, NCDE Bulletin, August 2003.

18. Bedi R. D. (1977) Theory, History and Practice Of Co-operation, International, Publishing House, Meerut.

19. Shivshankaran T. S. NABARD Consultancy Services Private Ltd. Mumbai, Paper Presented In Semminar Organized By Dept. Of Economics, Shivaji University, Kolhapur, February 2005.

20. Velumani N.P. : Co-operative Potent Vehicles Of Development In Liberalized Economy, NCDC Belletin, April 2000.

21. Vora Rajendra, 'An Agedna For The Study Of Political Economy Of Maharashtra', Occasional Paper No. 1, Pune, Dept. Of Political and Public Administraion, University Of Pune.

22. Yadav Yegendra and Palshikar Suhas, 'From Hegemony to Convergence : Party System and Electoral Politics In Indian States- 1952-2002, Journal of Indian School Of Polictical Economy, Vol- XV, No., 1 & 2, January - June.

**संकेतस्थळ :–**

1. http://www.ahmednagar.nic.in

2. http://www.secc.gov.in

3. http://www.nagarzp.gov.in

4. http://www.ahmednagar.gov.in/election/elehomepage/htm

5. http://www.ceo.maharashtra.gov.in

6. http://www.shodhganga.inflibnet.ac.in/bitstream

7. http://www.ahmednagar.gov.in/gazetter/home.html.

8. http://maharashtratimes.indiantimes.com

9. http://en.wikipedia.org/wiki/main_page

10. http://www.maayboli.com/node44749

**नियतकालिके :–**

१. परिवर्तनाचा वाटसरू, पुणे.

२. लोकप्रभा – साप्ताहिक, मुंबई.

३. साप्ताहिक – सकाळ, पुणे.

४. अनुभव मासिक, पुणे.

५. साप्ताहिक अमृतवाणी, संगमनेर.

**दैनिके :–**

१. दैनिक लोकमत, अहमदनगर.

२. दैनिक लोकसत्ता, अहमदनगर.

३. दैनिक महाराष्ट्र टाइम्स, अहमदनगर.

४. दैनिक सकाळचे वर्धापनदिन विशेष, अहमदनगर.

५. दैनिक सार्वमत, अहमदनगर.

६. दैनिक सार्वमत, जिल्हा परिषद निवडणूक विशेष, अहमदनगर.

**मुलाखत यादी :–**

१. आण्णासाहेब पठारे :– १७/०५/२०१६

२. आप्पासाहेब राजळे :– ०४/०५/२०१६

३. अनिल पवार :– १६/०६/२०१६

४. अविनाश आदिक :– २८/०६/२०१७

५. अंकुश आहेर :– १७/०६/२०१६

६. अशोक शिंदे :– २०/०५/२०१७

७. अशोकराव ढगे :– २४/०६/२०१७

८. बाळासाहेब आरगडे :– ०२/११/२०१६

९. भानुदास मुरकुटे :– १७/०५/२०१६

१०. भास्करराव जोंधळे :– ०५/१०/२०१६

११. बबनराव पाचपुते :– ०४/०८/२०१६

१२. भीमराव पाटील :– ०५/१०/२०१६

१३. भैय्यासाहेब देशमुख :– १५/०६/२०१७

१४. दादापाटील शेळके :– २६/०६/२०१५

१५. दुर्गाताई तांबे :– १५/०६/२०१७

१६. दिलीप गांधी :– ०८/०६/२०१७

१७. दिलीप लांडे :– ०३/११/२०१६

१८. नितीनदादा कोल्हे :– २५/०५/२०१६

१९. शिवाजी महाराज देशमुख :–२४/१०/२०१७

२०. विलास नाबदे :– ३०/०५/२०१८

२१. विद्या वाजे :– २९/०८/२०१७

२२. विठ्ठलराव लंघे :– ३०/१२/२०१७

२३. जनार्दन पठारे :– २४/०६/२०१७

२४. जयाताई गडाख :– २५/०६/२०१७

२५. जयश्रीताई घुले :– ३०/१२/२०१७

२६. काकासाहेब शिंदे :– १७/०५/२०१७

२७. कल्याणराव म्हस्के :– ०२/११/२०१६

२८. कृष्णा खरड :– १४/०९/२०१६

२९. लक्ष्मण मतकर :– ०६/१०/२०१८

३०. नवनाथ बर्डे :– १६/०६/२०१६

३१. प्रशांत गडाख :– २५/०६/२०१७

३२. पाटीलबा बेल्हेकर :- ०३/०५/२०१६

३३. पंढरीनाथ म्हस्के :- २०/०५/२०१७

३४. राहूल जगताप :- २९/०५/२०१७

३५. रामराव भदगले :- ०१/०६/२०१७

३६. रावसाहेब शिंदे :- १७/०५/२०१६

३७. रावसाहेब म्हस्के :- १७/०५/२०१५

३८. संदीप फलके :- १७/०६/२०१६

३९. शंकरराव कोल्हे :- २५/०५/२०१६

४०. सुनिताताई गडाख :- ०९/०५/२०१७

४१. सुधीर तांबे :- १५/०६/२०१७

४२. तुकाराम गडाख :- १७/०५/२०१६

४३. तुकाराम वडार :- १७/०६/२०१७


४४. वंदनाताई मुरकुटे :- १७/०५/२०१६

४५. ज्ञानदेव आरगडे :- ०२/११/२०१६


४६. ज्ञानदेव म्हस्के :- २८/०६/२०१७


४७. उद्धव महाराज मंडलिक :- २४/१०/२०१७

### अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी घराण्यांचे वारसदार :–



**अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाचे मंत्रीपदाचा कालावधी :–**



**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

**सामाजिकशास्त्र विद्याशाखेअंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी सादर करावयाचा प्रबंध**

---

**मुलाखतीसाठी प्रश्नावली**

---

**संशोधन विषय**

**''अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घराण्यांचा अभ्यास''**

---

**संशोधक**

आगळे वैशाली रघुनाथ

**मार्गदर्शक**

प्राचार्य डॉ. के. डी. पुराणे

श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि. पुणे.

---

**मुलाखत :– सहकार घराणी**

**प्रश्नावली :– १. पदाधिकारी**

**प्रश्नावली :– २. निवडक पदाधिकारी**

---

**मुलाखत :– सहकार घराणी**

**सहकार क्षेत्रातीन राजकीय घराणे :–**

| अ. क्र. | घराणे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | बाळासाहेब विखे पाटील | १० |
| २ | भाऊसाहेब थोरात | १० |
| ३ | यशवंतराव गडाख | १० |
| ४ | दादा पाटील राजळे | १० |
| ५ | मारुतीराव घुले | १० |
| | **एकूण** | **५०** |

**प्रश्नावली :– २**

**पदाधिकारी :–**

| **अ. क्र.** | **सहकारी संस्था** | **निवड केलेले तालुके** | **निवडलेले पदाधिकारी** |
|---|---|---|---|
| १ | साखर कारखाने | **२५** | अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक |
| २ | बँक | **२५** | अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक |
| ३ | शिक्षण | **२५** | अध्यक्ष/उपाध्यक्ष/संस्थाप्रमुख |
| ४ | जिल्हा परिषद | **२५** | अध्यक्ष/उपाध्यक्ष/सी. इ. ओ. |
| ५ | बाजार समिती | **२५** | अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव |
| ६ | दुग्ध व्यवसाय | **२५** | अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव |

**प्रश्नावली :– ३**

**निवडक लाभधारक :–**

| **अ. क्र.** | **लाभधारक** | **लाभधारक संख्या** |
|---|---|---|
| १ | महिला | ७२ |
| २ | राजकीय प्रतिनिधी | ७२ |
| ३ | शेतकरी | ७२ |
| ४ | राजकीय कार्यकर्ते | ७२ |
| ५ | पत्रकार | ७२ |
| ६ | व्यावसायिक | ७२ |

## मुलाखत

## सहकार घराणी

१. नाव : ---------------------------------------------

२. हुद्दा : ---------------------------------------------

३. शिक्षण : ---------------------------------------------

४. सहकारी उद्योग : --------------------------------------

५. सहकार क्षेत्रात आपण कसे आकर्षिकत झालात?

घराण्यामुळे/आवड असल्यामुळे

६. कोणत्या सहकारी क्षेत्रात आपण नेतृत्व करत आहात?

पतसंस्था/बँक/ग्रामपंचायत/तालुका पंचायत/जिल्हा परिषद

७. आपण कोणत्या सहकारी संस्थेचे प्रथम नेतृत्व केले? केव्हा? पद कोणते? कालावधी?

---------------------------------------------

८. आपण सहकार क्षेत्र विकासासाठी कोणते उपक्रम राबविले?

---------------------------------------------

९. आपल्या माहितीनुसार सहकार क्षेत्रात काम करणारे आपल्या घराण्यातील मुळ पुरूष कोण?

---------------------------------------------

१०. त्यांचे सहकार क्षेत्र :- पतसंस्था/बँक/साखर कारखाना

११. त्यांचा कालावधी :- ------------------------------------

१२. त्यांचे योगदान :- ---------------------------------------

१३. तुमच्यानंतर तुमच्या मुलांनी देखील सहकार क्षेत्रात काम करावे असे वाटते का? व का?

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

## प्रश्नावली १ पदाधिकारी

१. नाव : ----------------------------------------------

२. शिक्षण : --------------------------------------------

३. कोणत्या संस्थेत काम करत आहात : ----------------------------

४. पद : ----------------------------------------------

५. केव्हापासून : ----------------------------------------

६. सहकार क्षेत्रातील आपल्या कामकाजाचे कोणते सामाजिक व आर्थिक बदल घडून आले ?

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

७. आपल्या संस्थेतील नेतृत्व एकाच घराण्यातील आहे का? त्यामुळे समाजाचे झालेले फायदे सांगा? त्यामुळे सामाजिक आर्थिक तोटे सांगा?

---------------------------------------------------

---------------------------------------------------

## प्रश्नावली २. निवडक लाभधारक

१. नाव : ----------------------------------------

२. गाव : ----------------------------------------

३. प्रतिनिधीत्व महिला :- राजकीय प्रतिनिधी/शेतकरी/राजकीय कार्यकर्ते/पत्रकार/व्यावसायिक

४. आपला या सहकारी संस्थेसंबंधी कोणत्या प्रकारचा संबंध आहे?

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

५. आपल्या परिसरात सहकारी उद्योग राजकीय घराण्यांतील व्यक्तीने स्थापन केला? राबविला वाढविला याबद्दल आले मत सांगा?

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

६. सहकार क्षेत्रातील प्रगतीमुळे कोणते सामाजिक, आर्थिक, राजकीय बदल झाले आहेत?

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

७. सहकार क्षेत्रातील राजकीय घराणी ही आपल्या मते वरदान आहेत किंवा कसे?

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

८. सहकारी संस्थांच्या उभारणीत राजकीय घराण्यांचे योगदान योग्य आहे काय?

----------------------------------------

----------------------------------------

९. आपल्या तालुक्यातील नेतृत्वामुळे खालील कार्याचा आढावा लिहा?

सामाजिक कार्य :-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

विकासात्मक कार्य : -----------------------------------------

-------------------------------------------

-----------------------------------------------

मानवी हितासाठी कार्य : ----------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१०. या नेतृत्वामुळे तालुक्याचा कायापालट झाला असे वाटते का? ते कसे?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------